[इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं]

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें

अथवा

दिल्ली येथील पेशव्यांचे वकील हिंगणे ह्यांचा पत्रव्यवहार.

(इ. स. १७८० – इ. स. १७८९).

भाग १ ला.

हें प्रकरण

दत्तात्रय बळवंत पारसनीस

संपादक 'इतिहाससंग्रह'–सातारा,

ह्यांनीं संशोधून तयार केलें.

तें

मुंबई येथें,

तुकाराम जावजी ह्यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१३.

Printer R. Y. Shedge, } the Nirnaya-sagar Press,
Publisher Tukaram Javaji, } 23, Kolbhat Lane, Bombay.



दिल्ली येथील बादशाही दरबार.

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें.

दिल्ली दरबारांतील पेशव्यांचे वकील

हिंगणे.

दिल्ली येथील राजकारणांत, मराठ्यांचा प्रवेश, मोंगल बादशाहा औरंगजेब व छत्रपति शिवाजी महाराज यांच्या कारकीर्दीपासून झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. औरंगजेब बादशाहाचा सरदार मिर्झा राजा जयसिंग व शिवाजी महाराज यांची भेट इ. स. १६६७ मध्यें झाली. नंतर त्यानें शिवाजी महाराजांस दिल्लीस औरंगजेब बादशाहाच्या भेटीस येण्याबद्दल निमंत्रण दिलें, व बादशाही पत्रेंही आणविलीं. ह्या वेळीं शिवाजी महाराजांनीं रघुनाथपंत या नांवाचा आपला वकील भेटीची योजना करण्यासाठीं दिल्लीस प्रथम पाठविला. हा मोंगल बादशाहाच्या दरबारांतील मराठ्यांचा पहिला वकील होय. यानंतर शाहू महाराजांचे कारकीर्दींत मराठ्यांचे वकील दिल्लीस गेल्याचे दाखले सांपडतात. इ. स. १७०७ मध्यें शाहू महाराजांचे वतीनें रायभान या नांवाचा वकील दिल्लीस गेला होता. इ. स. १७१७ मध्यें शंकराजी मल्हार हे सय्यद बंधूंशीं तहाचें बोलणें लावण्यासाठीं दिल्लीस गेले होते. यांनींच दिल्लीचा मुख्य वजीर हुसेन अल्लीखान याचें मन वळवून, त्याजकडून शिवाजी महाराजांचे वेळीं मराठ्यांच्या अमलाखालीं असलेला 'स्वराज्याचा'प्रांत शाहू महाराजांस परत मिळवून देण्याची खटपट केली. बाळाजी विश्वनाथ पेशवे हे सय्यद बंधूंच्या मदतीसाठीं दिल्लीस जाण्यापूर्वीं बादशाहाकडून 'स्वराज्या'च्या कराराची जी सनद आली, ती शंकराजी मल्हार यांच्या सहीशिक्क्यानिशीं आहे. बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांनीं दिल्लीस गेल्यानंतर तेथें आपलें वर्चस्व स्थापन करून, महंमदशाहा बादशाहाकडून, चौथ, सरदेशमुखी व स्वराज्य अशा तीन हक्कांच्या सनदा मिळविल्या. या वेळीं बाळाजी विश्वनाथ यांनीं दिल्ली येथें देवराव हिंगणे या नांवाचा एक वकील ठेविला, असें मराठ्यांचे इतिहासकार क्याप्टन ग्रँट्‌डफ यांनीं लिहिलें आहे. परंतु त्यांत कांहीं गैरसमज असावा, किंवा नांवामध्यें चूक असावी असें दिसतें. ह्या वेळेपासून मराठ्यांचा राजकीय संबंध दिल्लीच्या बादशाहाशीं विशेष वाढल्यामुळें त्यांचा कायमचा वकील दिल्ली येथें अधिष्ठित झाला, ही गोष्ट निश्चित आहे; परंतु तो देवराव हिंगणे हा होता कीं काय ह्याबद्दल संशय आहे.

थोरले बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दींत मयाराम या नांवाचा एक कायस्थ वकील दिल्लीदरबारीं होता. त्याजकडे, बादशाही पत्रव्यवहार पेशव्यांकडे पाठविणें व पेशव्यांकडील पत्रव्यवहार बादशाहास पोंचविणें आणि दिल्लीदरबारांतील गुप्त बातम्या पेशव्यांस कळविणें, हीं मुख्य कामें होतीं. हा इसम जातीचा मराठा नसल्यामुळें व महत्त्वाच्या राजकारणांत सर्व विश्वास एकट्या परक्या माणसावर टाकणें इष्ट नसल्यामुळें, पेशव्यांकडून दिल्ली येथें मराठी वकील स्वतंत्रपणानें जाऊन राहूं लागले.

इ. स. १७३२ पासून इ. स. १७३९ पर्यंत यादवराव प्रल्हाद या नांवाचा वकील दिल्ली येथें रहात होता. त्याप्रमाणें इ. स. १७३९ पासून बाबूराव मल्हार या नांवाचा इसम तेथें वकिलीच्या कामावर असल्याचें आढळून येतें.

मयाराम वकील हा इ. स. १७४२ पर्यंत दिल्ली येथें होता. त्यानंतर त्याचा पुत्र मनसाराम हा त्याचें काम करीत असे. याशिवाय, बाळाजी बाजीराव पेशव्यांचे कारकीर्दींत, आसाराम या नांवाचा एक वकील इ. स. १७४५ ते ४७ पर्यंत होता, असाही दाखला सांपडतो. परंतु बाळाजी बाजीरावांचे कारकीर्दींत पेशव्यांचे मुख्य वकील महादेव गोविंद हिंगणे व त्यांचे पुत्र बापूजी महादेव, देवराव महादेव आणि दामोदर महादेव हे असून, ते दिल्ली येथील मराठ्यांच्या सर्व राजकारणांचे मुख्य सूत्रचालक होते. एवढेंच नव्हे तर, सवाई माधवरावांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत दिल्लीच्या राजकारणांत त्यांचा विशेष संबंध असून, ते दिल्लीदरबारांतील मराठ्यांचे सनदशीर प्रतिनिधि होत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, अशा इतिहासप्रसिद्ध घराण्याची माहिती अद्यापि अप्रसिद्ध असून, त्यांच्या राजकारणांची पुष्कळांस ओळखही नाहीं! ह्यासाठीं या घराण्याची संक्षिप्त माहिती व त्यांचा पत्रव्यवहार आह्मीं येथें देण्याचें योजिलें आहे.

हिंगणे घराण्याचे मूळ पुरुष, श्रीक्षेत्र नासिक येथील पेशव्यांचे उपाध्ये महादेवभट हिंगणे हे होत. हे वेदशास्त्रपारंगत असून पिशाचलिपी व फारसी भाषा जाणत होते. यांच्या अंगीं वक्तृत्व, बहुश्रुतता आणि चातुर्य इत्यादि अनेक गुण असल्यामुळें बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मर्जी त्यांच्यावर बसली, व त्यांचा विशेष घरोबा जडला. त्यामुळें महादेवभट हे त्यांच्या स्वारीबरोबर जाऊं येऊं लागले. दिल्ली येथें बाळाजी विश्वनाथ पेशवे इ. स. १७१९ मध्यें गेले, त्या वेळीं महादेवभट हिंगणे हे कदाचित् बरोबर गेले असावेत. ग्रँट्डफ् यांनीं देवराव हिंगणे ह्मणून जें नांव दिलें आहे, तें बहुत करून चुकीनें पडलें असून, तें महादेव गोविंद

हें असावें, असें वाटतें. परंतु त्याबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. हिंगण्यांच्या कैफियतीवरून, थोरले बाजीराव साहेब पेशवे यांचे कारकीर्दींत महादेवभट हिंगणे हे इ. स. १७३४ चे सुमारास दिल्लीस गेले, असा दाखला सांपडतो. या वेळीं बादशाहाचे वजीर नवाब अमीर-उल्-उमराव हे होते. इ. स. १७३४ पासून इ. स. १७४० पर्यंत महादेवभट हिंगणे हे दिल्लीस असून, त्या मुदतींत झालेल्या मराठ्यांच्या दिल्ली येथील राजकारणांत त्यांचा संबंध होता व ते मराठ्यांच्या सरदारांस उपयोगीं पडले, असें मानण्यास आधार सांपडतो. राणोजी शिंदे व रामचंद्र मल्हार हे इ. स. १७३८ मध्यें दिल्लीहून परत आले. त्यांनीं बाजीराव पेशव्यांजवळ हिंगण्यांची शिफारस केली. याचा उल्लेख बाजीराव पेशव्यांच्या ता. १२ जुलई इ. स. १७३८ च्या एका पत्रामध्यें आढळून येतो. तो येणेंप्रमाणेः—

"राजश्री राणोजी शिंदे व राजश्री रामचंद्र मल्हार आले. यांनीं तुमचे कष्टमेहेनतीचा मजकूर विस्तारें सांगितला; त्यावरून संतोष वाटला. ऐसियास, तुह्मीं कामकाजास जपून कार्यभाग करून दाखविला. पुढेंही न चुका, ऐसा भरोंसा आहे. कित्येक कार्यभागाचा मजकूर हल्लींही मशारनिल्हेंनीं तुह्मांस लिहिला आहे; तदनुरूप करून वर्तमान लिहीत जाणें. तुमच्या वर्षासनाविषयीं उभयतांनीं विनंति केली. त्यावरून तुमचे गुदस्ताचे रुपये शंभर व सालमजकूरचे शंभर एकूण दोनशें रुपये देवले आहेत. तुह्मांस पावतील. सारांश, सर्व प्रकारें तुमचें आवश्यक आहे. हरएकविशीं समाधान रक्षून कामकाज करीत जाणें." (रा० कृत खंड ६.)

इ. स. १७४० मध्यें बाजीराव पेशवे मृत्यु पावले. त्या वेळीं महादेवभट हिंगणे, बाळाजी बाजीराव व चिमाजी आपा यांचे समाचारासाठीं, पुण्यास आले होते. इ. स. १७४१ मध्यें पेशव्यांनीं त्यांस निरोप देऊन पुन्हां दिल्लीचे वकिलीवर पाठविलें. त्या वेळीं सवाई जयसिंगजी याचे मार्फत मराठ्यांचीं दिल्लीकडील राजकारणें चालू होतीं, व दिल्लीच्या बादशाहाकडून पुष्कळ द्रव्य मिळवून कर्जमुक्त व्हावें, अशी पेशव्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनीं, सवाई जयसिंगाच्या मार्फत हें काम करून घेण्यासाठीं महादेवभट हिंगणे यांची योजना केली. पेशवे त्यांस लिहितातः—

"तुह्मीं उत्तम प्रकारें सवाईजीशीं बोलून, सत्वर कार्य होय ऐसें करणें. दिवस गेले! चालढकलीवर घालून चार दिवस गेले ह्मणजे अगोट समीप आली. लांबणीवर गोष्ट पडते. आह्मांस तों सर्वप्रकारें सवाईजीचा भरंवसा. कर्जावेगळें आह्मांस त्यांनीं करावें. पातशाहापासून जें साधेल तें साधून आह्मांस द्यावें. आपणापासून उत्तम प्रकारें रयात करावी. हें त्यांचे वडीलपणास ये समयीं विहित आहे."

असो. महादेवभट दिल्ली येथें इ. स. १७४१ पासून इ. स. १७४५ पर्यंत वकिलीच्या कामावर असून, त्यांचे पुत्र बापूजी महादेव व दामोदर महादेव हे त्यांच्या समागमें दिल्लीस होते. ते तिघेही दिल्लींतील बादशाही राजकारणांत मराठ्यांच्या वतीनें निमग्न असून, त्यांनीं मराठ्यांची सत्ता, राजपुताना व उत्तर हिंदुस्थान यामध्यें प्रसृत करण्याचे कामीं, पुष्कळ साहाय्य केल्याचें दिसून येतें. महादेवभट व त्यांचे पुत्र बापूजी महादेव व दामोदर महादेव यांनीं दिल्ली येथें राहून बादशाहाच्या दरबारांत आपलें चांगलें वजन बसविलें, आणि बादशाहाच्या मर्जीप्रमाणें अनेक कामकाजें करून त्याची कृपा संपादन केली. त्यामुळें बादशाहानें त्यांजवर प्रसन्न होऊन त्यांस अंतरवेद प्रांतांत सात हजारांचीं गांवें जहागीर दिलीं. महादेवभट हे इ. स. १७४६ चे अखेरीस दिल्ली येथें मृत्यु पावले. त्यांचे पश्चात्, बापूजी महादेव व दामोदर महादेव हे दिल्ली येथील पेशव्यांच्या वकिलीचें काम चालवूं लागले. या दोघांनीं दिल्ली येथें मोठ्या मानमरातबानें राहून आपलें प्रस्थ व डामडौल विशेष वाढविला.

इ. स. १७५० पासून इ. स. १७६१ पर्यंत दिल्ली येथें अनेक मोठीं राजकारणें घडून आलीं. त्या सर्वांमध्यें बापूजी महादेव व दामोदर महादेव यांचें विशेष अंग दिसून येतें. या अवधीमध्यें रोहिले, पठाण, जाट, रजपूत व अयोध्येचा नबाब-वजीर यांच्या बरोबर झालेलीं पेशव्यांचीं राजकारस्थानें अत्यंत महत्त्वाचीं असून, त्या सर्वांवर मराठ्यांनीं आपली छाप चांगलीच बसविली होती. या वेळीं शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदारांनीं आपल्या बाहुपराक्रमाची व बुद्धिकौशल्याची शर्थ करून, दिल्लीपर्यंत मराठ्यांची सत्ता नेऊन पोंचविली होती. इ. स. १७६१ मध्यें अबदालीचें अरिष्ट येऊन पानिपत येथील रणकंदन झालें नसतें, तर दिल्लीपदपातशाहास मराठ्यांनीं अंकित केल्यावांचून कधींही सोडिलें नसतें. या सर्व राजकारणांत हे हिंगणेबंधू अनेक रीतींनीं समाविष्ट होते यांत शंका नाहीं.

बापूजी महादेव व दामोदर महादेव यांनीं दिल्ली येथें स्वार शिबंदी वगैरे ठेवून आपला दर्जा व मरातब मोठा वाढविला होता, आणि दिल्लीदरबारांत आपलें विशेष वजन संस्थापित केलें होतें. एवढेंच नव्हे तर, त्यांनीं बादशाहास चांगल्या रीतीनें अनुकूल करून घेऊन, त्याला पठाण व रोहिले यांच्या ताब्यांतून दूर करून, आपल्या संरक्षणाखालीं ठेवण्याचा घाट घातला होता. त्यांनीं मराठ्यांची पांच हजार फौज दिल्ली येथें ठेवून, बादशाहास सर्वस्वीं आपल्या मुठींत ठेवण्यासाठीं व मराठ्यांचा नक्ष राखण्यासाठीं, अंताजी माणकेश्वर नामक सरदारास दिल्ली येथें

आणविलें, व त्याच्या फौजेच्या खर्चासाठीं बादशाहाकडून दरमाहा तीस हजार रुपये कबूल करून घेतले. त्याप्रमाणें अंताजी माणकेश्वर दिल्ली येथें इ. स. १७५३ मध्यें येऊन दाखल झाले.

बापूजी महादेव, दामोदर महादेव व अंताजी माणकेश्वर हे दिल्ली येथें एकमतानें राहून त्यांनीं पेशव्यांची सेवा एकनिष्ठपणानें केली असती, तर त्या सेवेची योग्यता फारच वर्णनीय झाली असती. परंतु, अंताजी माणकेश्वर व हिंगणेबंधू यांच्यामध्यें परस्पर मत्सर व स्वार्थबुद्धि उत्पन्न होऊन मोठी चुरस लागली. दिल्लीस ज्या वेळीं अंताजी माणकेश्वर गेले व मराठ्यांच्या फौजेचा तेथें कायमचा तळ पडला, त्या वेळीं नवाब-वजीर व पठाण रोहिले यांना मोठें संकट उत्पन्न होऊन, त्यांनीं अंताजी माणकेश्वर यांस लांच देऊन अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु हिंगण्यांनीं त्यांच्याकडून नवाब-वजिराशीं मिलाफ होऊं दिला नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यांच्याकडून असा करार लिहून घेतला कीं, “नवाब-वजिरानें दहा लाख रुपये दिले, तरी ते कामाचे नाहींत. यांत श्रीमंतांचें नुकसान आहे. तरी, नवाब-वजिराचा पैसा न घेतां बादशाहीची चाकरी एकनिष्ठपणें करूं. आणि, तुमच्या आज्ञेप्रमाणें वागून, कोणत्याही गोष्टींत प्रतारणा करणार नाहीं, व तुमच्या मानांत उणेपणा आणणार नाहीं.” परंतु दिल्ली येथील वैभव, तेथील अमीरउमरावांची संपत्ति आणि दरबारांतील अव्यवस्था इत्यादि मोह उत्पन्न करणारी एकंदर परिस्थिति अवलोकन करितांच, अंताजी माणकेश्वर यांस मत्सरबुद्धि उत्पन्न झाली, व दिल्लीदरबारांतील हिंगण्यांचें प्रस्थ कमी करून आपलें घोडें पुढें ढकलावें, अशी लालसा त्यास वाटूं लागली. त्यांनीं तेथें अनेक दुफळ्या व अनेक भानगडी करून तंटे उपस्थित केले, व पेशव्यांस हिंगण्यांचे विरुद्ध चुगल्या लिहून, त्यांचेंही मन कलुषित केलें. हिंगण्यांचा दिल्ली येथील लवाजमा व डामडौल फार अवाढव्य असून त्यांची खर्चाची ओढाताण फार असे. त्यामुळें त्यांना पेशव्यांकडे तिकडील प्रांताचा वसूल पाठविण्यास सवड होत नसे. त्यांत अंताजी माणकेश्वरांची चुरस भरीस पडून पेशव्यांचें मन त्यांचेबद्दल फार कलुषित झालें. इ. स. १७५७ मध्यें ज्या वेळीं रघुनाथराव पेशवे दिल्लीकडे गेले, त्या वेळीं बापूजी महादेव हिंगणे यांच्यावर त्यांची इतराजी होऊन, त्यांनीं त्यांची जहागीर जप्त करण्यापर्यंत मजल आली. पेशव्यांच्या बखरीमध्यें, बापूजी महादेव हिंगणे यांनीं गर्वांध होऊन, मेजवानीच्या प्रसंगीं, ‘श्रीमंत दादासाहेब ते कोणते?’ असा भर पंक्तींत प्रश्न करून पेशव्यांचा अपमान केला; त्यामुळें दादासाहेबांनीं संतप्त होऊन, हिंगण्यांची सर्व संपत्ति यमुनेंत टाकून दिली व जहागीर जप्त केली,

अशी आख्यायिका दिली आहे. ही आख्यायिका कितपत खरी आहे, हें सांगतां येत नाहीं. तथापि, या वेळीं रघुनाथराव पेशव्यांचा व त्यांचा बेबनाव होऊन त्यांनीं त्यांची जहागीर जप्त केली, ही गोष्ट सत्य आहे.

हिंगणे यांनीं दिल्ली येथें आपला इतमाम बराच मोठा वाढवून, पेशव्यांच्या वतीनें तिकडील कित्येक महालांवर आपला अंमल चालवून वेळोवेळीं, पेशव्यांस पुष्कळ द्रव्य दिलें होतें, व नवाब-वजीर याचा तेरा लक्ष खंडणीचा जिम्मा आपल्या माथीं घेऊन, मेरट महाल आपल्या ताब्यांत घेतला होता. परंतु अंताजी माणकेश्वरानें रघुनाथराव पेशव्यांचें मन हिंगण्याविरुद्ध कलुषित करून ते महाल आपल्याकडे घेतले. त्यामुळें हिंगण्यांचें फार नुकसान झालें. तेव्हां दामोदर महादेव यांनीं पुण्यास श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांच्याकडे जाऊन त्यांस आपली स्थिति निवेदन केली. श्रीमंतांनीं, रघुनाथराव दादासाहेबांची समजूत करून, हिंगण्यांची जप्ती उठविण्याबद्दल दुसरा हुकूम पाठविला. रघुनाथराव पेशवे यांनीं हिंगण्यांकडून सहा लक्ष रुपये घेऊन त्यांची जप्ती उठविण्याचें कबूल केलें. पण हिंगणे त्या वेळीं इतके रुपये देण्यास समर्थ नव्हते. तेव्हां त्यांनीं चिंतामण दीक्षितांकडे पांच लक्षांचा व अंताजी माणकेश्वराकडे एक लक्षाचा असा हवाला देऊन जप्ती दूर करविली.

बापूजी महादेव यांचे बंधु पुरुषोत्तम महादेव हे पुढें बरेच दिवस दिल्लीस होते. हे पानिपतच्या लढाईच्या प्रसंगीं महादेव पेशव्यांच्या सल्लामसलतींत असल्याचें दिसून येतें. पानिपतची लढाई झाल्यानंतर मराठ्यांच्या दिल्ली येथील अमलाची वाताहत झाली. तथापि, बापूजी महादेव व पुरुषोत्तम महादेव हे त्या प्रांतींच राहून, तिकडील राजकारणांच्या बातम्या पेशव्यांस पाठवीत असत. पानिपतच्या लढाईत त्यांची सर्व जहागीर वगैरे गेल्यामुळें कांहीं दिवस त्यांची फार हालाखी झाली होती. परंतु थोरले माधवराव पेशव्यांनीं, इ. स १७६९ आक्टोबर १७ तारखेस, पुरुषोत्तम महादेव व देवराव महादेव यांचे नांवें दिल्लीच्या वकिलीच्या पुनः सनदा दिल्या. त्याप्रमाणें ते तेथें राहून काम करूं लागले. पुरुषोत्तम महादेव हे इ. स. १७६९ पासून इ. स. १७८३ पर्यंत दिल्ली येथेंच होते; व देवराव महादेव हे कांहीं दिवस लखनौस सुजाउद्दौल्याकडे वकिलीच्या कामावर होते. बापूजी महादेव मात्र पुढें दिल्लीस राहिले नाहींत. ते पुढें बुंदीस जाऊन राहिले व तेथेंच ते मृत्यु पावले असें दिसतें.

पुरुषोत्तम महादेव यांनीं दिल्ली येथील वकिलीचें काम फार उत्तम रीतीनें बजाविलें. नाना फडनविसांचे कारकीर्दींत दिल्ली येथें मराठ्यांचीं जीं राजकारणें घडून

आलीं, तीं सर्व पुरुषोत्तम महादेव यांच्याच बुद्धिचातुर्यानें होत. त्यामुळें नाना फडणविसांची पुरुषोत्तम महादेव यांच्यावर फार मेहेरबानी होती. पुरुषोत्तम महादेव हे इ. स. १७८३ मध्यें दिल्ली येथें मृत्यु पावले. त्यांच्या पश्चात् त्यांचा मुलगा गोविंदराव पुरुषोत्तम हा अल्पवयी असल्यामुळें, दिल्लीच्या वकिलीचें काम, त्यांचा विश्वासू व प्रामाणिक कारकून शंकराजी सखदेव हा करीत असे. परंतु त्याचें व पुरुषोत्तम महादेव यांचे बंधु देवराव महादेव यांचें न पटल्यामुळें दिल्ली येथील वकिलीचा दर्जा फार कमी झाला. शंकराजी महादेव हा फार प्रामाणिक, हुशार व स्वामिभक्त असल्यामुळें व दिल्ली येथील माहिती त्यास बरीच असल्यामुळें त्यानें नाना फडणविसांस व पेशव्यांस तिकडील कच्ची बातमी देण्यांत कसूर केली नाहीं. त्याच्या एकंदर पत्रांवरून, पेशव्यांकडून त्यास खर्चास भरपूर मिळालें नाहीं, व देवराव महादेव यांनीं त्याचा परामर्ष घेतला नाहीं, असें दिसतें. त्यामुळें दिल्ली येथें हिंगण्यांचें तेज कमी कमी होत जाऊन, ते पेशव्यांच्या वकिलाच्या ऐवजीं त्यांचे अकबरनवीस होऊन राहिले.

इ. स. १७८३ पासून १७८८ पर्यंत, दिल्ली येथें अनेक घडामोडी होऊन मराठ्यांचे रणशूर सरदार महादजी शिंदे यांचा तेथें अंमल झाला. अर्थात् त्यांचे कारकीर्दींत पेशव्यांच्या वकिलाची मातबरी व जरूर राहिली नाहीं. पुरुषोत्तम महादेव यांचे चिरंजीव गोविंद पुरुषोत्तम यांनीं इ. स. १७८९ मध्यें लिहिलेलें एक खाजगी पत्र आह्मांस उपलब्ध झालें आहे. त्यावरून हिंगण्यांच्या त्या वेळच्या स्थितीचें चित्र नेत्रांपुढें उभें राहतें. त्यांची पूर्वीं भरभराट किती झाली होती व ह्या वेळीं त्यांस किती विपदवस्था प्राप्त झाली होती, तें या पत्रावरून चांगलें दिसून येतें. तें पत्र येणेंप्रमाणें:—

श्री.

'पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, आह्मांस येथें लोकांचें व शिबंदीचें देणें तीर्थरूपांचे हातचें आहे. त्यास, याविषयीं पेशजीं हजुरांत विनंति लिहिली होती. त्याचें उत्तर आलें कीं, जहागिरीवर ऐवज घेऊन कर्ज वारणें. त्यास दोन तीन वर्षें जालीं, खुशकी या प्रांतीं पडली आहे, त्याजकरितां जहागिरीपैकीं कपर्दिक न आली. आणि आमचा प्रकार ह्मणावा, तर राजश्री शंकराजी सखदेव व आह्मीं दिल्लींत गहाण सावकारांनीं व शिबंदीचे माणसांनीं अटकावून ठेविलें आहे. बाहेर निघूं पावत नाहीं! विना पैका घेतल्याखेरीज येथून आमचा गुजारा नाहीं. याचें कारण हेंच कीं, जैसें तीर्थस्वरूप राजश्री देवराव तात्या येथून गेले, पुन्हां येथें पैकाही न पाठविला व आपणही परत न केली, तैसें हेही निघून गेलियावर मग आह्मी

पैका कोणापाशीं मागावा ? याप्रमाणें हे बोलतात. याजकरितां विनंति कीं, सरकारांत रोशनगांवाचा ऐवज येणें तो कृपा करून देवाल, तर आमची मुक्तता कर्जापासून व शिबंदीपासून होईल. नाहींतर आणिकही हवाले कफालेबद्दल ऐवज येणें त्यास, सांप्रत तीर्थस्वरूप तात्याही तूर्त दरबारीं आहेत. त्यास कजियाचा फडशा करवून तो ऐवज देवाल तर गुंता उरकेल. ह्या दोहीं गोष्टींतून एक गोष्ट तऱ्ही विल्हेस लावून, येथील देण्यापासून व शिबंदीपासून मुक्त करणार स्वामी समर्थ आहेत, व हल्लीं पातशाहाचे येथें राजश्री पाटीलबावांची मुखत्यारी जाली आहे. त्यास, आजपावेतों ऐवज, मुखत्यार होते ते आपले फौजेचें बळ पाहून, कालानुरूप आमचें चालवीत होते. त्यास पाणिपताची गर्दी जाली. त्यादिवसापासून तों आह्मांस कोणी पुसतच नाहीं, व वकालतीचें काम आमचे हातून कोणीं घेतलें नाहीं. राजश्री विसाजीपंत आले, त्यांनीं राजश्री दादो मल्हार यांचे हातून वकालतीचा कारभार घेतला, व शिंदे होळकर येतात, ते आपले कारकुनाचे हातून काम घेतात. आह्मी सरकारी ह्मणोन आमचे हातून काम घेत नाहींत. त्यास, आतां तर वकालतीचा दर्जा कांहीं राहिलाच नाहीं! पातशाहात सरकारांत आली. पातशाहा आहे त्यास अन्नवस्त्राची मात्र गरज आहे. पातशाहीची व हुकुमाची गरज नाहीं. श्रीकृपेंकरून बंदोबस्त यथास्थित जाल्यास आतां या स्थळावर दुसरियाचा काबू चालणार नाहीं. याजकरितां विनंति कीं, महंमदशाहा पातशाहा व अहंमदशाहा पातशाहापासून आह्मांस पातशाहाचे येथून पावत आलें आहे, त्याचा बंदोबस्त करून देविणार स्वामी समर्थ आहेत.

बितपशीलः—

३ प्रा॰ गणमुक्तेश्वर पैकीं गांव तीन.

१ अफजलगंज, उ॥ विसागंज सरकारी. विसाजीपंतांनीं अंमल केला होता.

१ अमरी खजान्यांत दरमाहा रुपये ४४०० चव्वेताळीसशें.

१ प्रा॰ सरावा दरोबस्त बमय ता॰ भोजपूर व किवारे व साडसोदा.

१ झारेडा वगैरे गांव १३ तेरा.

१ करोडीवर दरमाहा रुपये १००. शंभर.

५ प्रा॰ शिकंदराबाद पैकीं क़ावल नगर वगैरे गांव.

१ प्रा॰ सोहनें दरोबस्त जहागीर.

१ वृंदावन सरकारी. नजबखानानें दिल्हें आहे.

१ प्रा॰ झाडसा दरोबस्त.

१ कुसलीया प्रा॰ डासना.

१ अडतला प्रा॰ लोणी.

१ प्रा॰ सोनपत येथें मालावर दरमाहा रुपये १००० एक हजार.

सदर्हूप्रमाणें पाणिपताची गर्दी जाली, तोंपावेतों आह्मांकडे चालत होती. अलीकडे जाटानें वगैरे लोकांनीं, ज्याची काबू चालली त्यांनीं, आपला अंमल केला आहे. त्यास आतां सलतनत सरकारांत आली आहे, आणि परदरबारीं कारभार आहे. खर्च पातशाहाचा व यश आपलयास. याजकरितां राजश्री पाटील-बावांस एक पत्र व एक अर्जी पातशाहास ऐसीं दोन पत्रें लिहून पाठवावीं कीं, येणेंप्रमाणें सरंजाम पातशाहींतून यांजकडे चालत आला आहे त्याप्रमाणें चालवावें. ह्मणून जरूर जरूर दोन पत्रें शिफारसी लिहून पाठविणार स्वामी समर्थ आहेत. पूर्वीं राजश्री रामचंद्रबावा यांनीं तीर्थस्वरूप दामोदरपंत यांची मुरबेगिरी करून, ऊर्जित करून, चोवीस हत्ती घरचे व सातशें घोडे त्यांचे कृपेनें जाले होते. त्याअलीकडे मुरब्बी व धनी, मायबाप श्रीरघुवीराप्रमाणें आह्मांस आपण आहेत. त्यास, आपले कृपेनें कांसवदृष्टीनेंच आमचें ऊर्जित होईल ऐसा प्रकार आहे. विस्तार लिहिणें विस्तारच आहे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

इ. स. १७८९ पासून इ. स. १८०३ पर्यंत दिल्ली येथें शिंदे ह्यांचा अंमल होता. त्यांच्या अंमलांत हिंगणे हे दिल्लीस राहून तेथून पुण्यास पेशव्यांकडे बातमीपत्रें पाठवीत असत. इ. स. १७९५ पर्यंतचीं त्यांचीं बातमीपत्रें नाना फडणविसांच्या दप्तरांत बहुतेक शाबूद सांपडलीं आहेत. तीं 'इतिहाससंग्रहांत' प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

हिंगणे ह्यांनीं दिल्ली येथून पेशव्यांस लिहिलेलीं पत्रें इतिहासदृष्टीनें फार महत्त्वाचीं आहेत. ह्या पत्रांवरून दिल्ली येथील राजकीय घडामोडींचें उत्कृष्ट चित्र नेत्रांपुढें उभें राहून, अठराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्यें दिल्लीची पातशाहात हस्तगत करून घेऊन तेथें आपल्या सत्तेचा चंचुप्रवेश करण्यासाठीं, मराठे, इंग्रज आणि रोहिले ह्यांच्यामध्यें केवढी चुरस लागली होती, व त्यांनीं कसकसे प्रयत्न केले, तें चांगलें कळून येतें. आह्मांस उपलब्ध झालेलीं पत्रें इ. स. १७८० पासून १७९५ पर्यंतचीं आहेत. हा काल मराठ्यांच्या इतिहासांत अतिशय महत्त्वाचा मानिला जातो. इंग्रज व मराठे ह्यांच्या पहिल्या युद्धापासून तों खर्ड्याच्या रणभूमीवर मराठ्यांच्या शेवटच्या विजयापर्यंत घडलेल्या राजकारणांचा त्यांत समावेश होत असून, मराठेशाहींतील उच्च प्रतीचे मुत्सद्दी व योद्धे ह्यांचा कर्तबगारीचा जो कांहीं शेवटचा प्रकाश चमकला, तो ह्याच अवधीमध्यें होय. हिंदुस्थानामध्यें जी पाश्चात्य राजसत्ता पुढें सम्राट्पदारूढ झाली, तिच्या अभ्युदयाचा हा प्रभातकाल होय असें ह्मटल्यास हरकत नाहीं. अर्थात् हा काल सर्वप्रकारें अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें, त्यांत

घडून आलेल्या राजकारणांचा यथातथ्य, संगतवार व साधार असा इतिहास माहित करून देणारीं अस्सल पत्रें जगापुढें येणें किती अवश्य आहे, हें इतिहासवाचकांस सांगावयास नकोच. ह्या पत्रांमध्यें दिल्लीच्या सलतनतीचा ऱ्हासकाल विशदरीतीनें चित्रित झालेला असून, तेथील सार्वभौमसत्ता व दुसरीं एतद्देशीय राष्ट्रें कोणत्या कारणामुळें विनाश पावलीं, त्यांची विचिकित्सा करण्यास हीं पत्रें फार साधनीभूत होण्यासारखीं आहेत. मि० कीन ह्या नांवाच्या इतिहासकारानें "Fall of the Mogul Empire" ह्या नांवाचें मोंगल बादशाहीच्या ऱ्हासकालावर एक उत्कृष्ट पुस्तक लिहिलें आहे. त्यांतील माहिती व विधानें ह्यांचा पडताळा पाहण्यास, हिंगण्यांचीं दिल्ली येथील राजकारणांचीं पत्रें ह्मणजे केवळ आदर्शच आहेत. ह्या पत्रांच्या वाचनानें, दिल्लीच्या पादशाहातीची शोचनीय स्थिति, एतद्देशीय लोकांची परस्पराविषयींची मत्सरबुद्धि आणि स्वार्थैकपरता, आणि पाश्चात्य लोकांचें दूरदर्शित्व आणि उच्च प्रतीचें राजकारणचातुर्य हीं व्यक्त झाल्यावांचून राहत नाहींत. जी ब्रिटिश राजसत्ता परमेश्वराच्या कृपेनें आजमितीस हिंदुस्थानांत साम्राज्यपदावर आरूढ झाली आहे व जिच्या यशोदुंदुभीचा मेघनाद सर्व पृथ्वीतलावर गर्जत आहे, आणि जिच्या भाग्यरवीचा दिव्य प्रकाश सर्व जगास दिपवून सोडीत आहे, तिच्या अभ्युदयाचा खरा वृत्तांत देखील ह्याच पत्रांवरून कळून येतो. त्यामुळें अनेक दृष्टींनीं हीं पत्रें फार महत्त्वाचीं व विचारार्ह आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. ह्या पत्रांत नमूद झालेल्या गोष्टी गतकालांतील असून, त्यांचें निरीक्षण केवळ इतिहासदृष्टीनेंच केलें पाहिजे, हें निराळें सांगावयास नकोच आहे.

हिंगण्यांच्या चार बंधूंपैकीं बापूजी महादेव, दामोदर महादेव व पुरुषोत्तम महादेव हे इ. स. १७८९ पर्यंत मृत्यु पावले. बाकी राहिले देवराव महादेव, ते दक्षिणेंत आले.

या चार बंधूंपैकीं कनिष्ठ बंधु देवराव महादेव हे मोठे मुत्सद्दी असून, ते नाना फडणविसांच्या सांगण्यावरून अहिल्याबाई व तुकोजी होळकर यांचा तंटा मिटविण्याकरितां इ. स. १७९३ त महेश्वरास गेले होते. ते इ. स. १७९६ त वारले. त्यांचे वंशज नासिक जिल्ह्यामध्यें चांदोरी येथें आहेत. त्यांच्याकडे सुमारें सात हजारांचे इनामी गांव चालू आहेत.

दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें.

भाग पहिला.

इ. स. १७८०.

पो। चंद्र २९ जमादिलावल, समानीन. हस्तें कासीद अजुरदार.

लेखांक १.

श्रीवरद.

५ मे. इ. स. १७८०.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

"विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत चंद्र २९ माहे रविलाखर मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनें-करून यथास्थित असे. विशेषः— इकडील वर्तमान, सविस्तर विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं, तीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. सरकारचें आज्ञापत्र आलें कीं, "गोहदकर जाटांनीं सरकारतालुक्यांत उपद्रव केला होता. त्यास, सरदारां-कडील फौज व राजश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंडदेव आदिकरून सरकारची फौज [ह्यांनीं] त्यांजकडील गढ्या व ठाणीं कांहीं घेतलीं. सरकारचा अम्मल बसविला आहे. तंबी चांगलीच केली आहे. आणीकही ठाणीं व गढ्या घेत आहेत. तुह्मीं बादशाहांसीं व नजबखानांशीं बोलून, पक्कें करून, कुमक न करीत तें करणें. इंग्रज सांप्रत हांवभरी होऊन गुजराथ प्रांतीं हंगाम करूं लागले. याजकरितां त्यांचे तंबीस उभयतां सरदार व सरकारची फौज गुजराथ प्रांतीं रवाना केली आहे. लवकरच पारिपत्य होईल. दक्षिणेकडे कंपू येऊं लागल्यास सरकारची फौज व सरदाराकडील फौज ते प्रांतीं आहेच. तिकडून इंग्रज येतील तर ठासून राखावें, येविषयीं पत्रें गेलींच आहेत. काम पडल्यास वरचेवर पत्रें आणीख जातील. तुह्मीं नजबखानाची व सरकारची एकवाक्यता होयसें करून, इंग्रेजांस ताण बसून इकडे न येत तें करणें, व हैदरनाईकाकडील विजापूरचे सनदेविषयीं फिरून पैगाम करितील, तरी त्याचे बोलण्याचें संधान राखून, पुन्हां पादशाहांसीं बोलून, सनद न द्यावयाचें पक्कें करणें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यांस व नजबखानास एकत्र करून इंग्रेजांची कुमक न करावी ह्मणून पक्कें केलें आहे, व पुढें त्यांशीं बिघाड करावा याअन्वयें बोलणें बहुत जालें, तो मजकूर सविस्तर पुरवणीपत्रीं लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. उत्तरें येतील त्याप्रमाणें पुढें यांस श्रुत करूं. व

हैदरनाईकाकडील प्रथम वकील आला होता. त्याचा जाबसाल भाजी केला. याजकरितां हल्लीं मुकुंदराव नामें वकील दुसरा आला आहे. यांनीं नजबखानास कांहीं लालूच दाखवून विजापूरचे सनदेचें काम करून घ्यावें या विचारांत आहेत. परंतु आह्मीं पादशाहांसीं एकांतीं गांठ घालून आपले सरकारचे बंदगीचा मजकूर समजाऊन सनद न द्यावीसें पक्कें केलें आहे. नजबखानांसींही मोठी मसलत फिरंगी यांचे बिघाडाची व आपले सख्यत्वाची गोष्ट समजाऊन, सनद न द्यावी व पुढें फिरंग्यांसीं बिघाड करावा हें ठरविलें आहे. परंतु अनुभवास येईल तें खरें. तात्पर्य, गुजराथप्रांतीं लढाई आहे. श्रीकृपेनें फत्ते जाल्यास हें सर्व सरकारचें लक्षाखेरीज कांहीं करूं शकत नाहींत. इंग्रेजांशीं सलूख केल्यास सर्वांचीं लक्षें तिकडे लागतील. श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक २.

श्रीवरद. मे. इ. स. १७८०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञप्ति ऐसीजे. नवाब नजबखानास हेंही श्रुत केलें कीं, हैदरनाईकाशीं व श्रीमंतांशीं सलूख जाला. वीस लक्ष रुपये खंडणी सरकारांत दिधली. येथें विजापुरची सनद मागावयास वकील पाठविले नाहींत. गृहस्थ आले आहेत ते, तुमचा श्रीमंत स्वामींचा स्नेह आहे तो खरा खोटा पाहावयास तुह्मांस लालूच दाखऊन बोलतात. येविषयीं चित्तांत संदेह असेल तर प्रथम सुजाखान नामें वकील हैदर नाईकाचा आला आहे त्यास पुसणें. अबदुल अहदखानानें या गोष्टीमुळेंच सनद विजापुरची हैदर नाईकास न दिधली. याप्रमाणें सुजाखानाचे हातेंही दाखला नजबखानास पुरविला. त्याजला दाखला पुरवायाकरितां सरकारचे चाकरीचे उमेदवार केलें आहे. व मुकुंदराव काम करून गेल्यास तो अयशी होईल हें त्यास समजाऊन व उमेदवार सरकारचे कृपेचा करून, पातशाहा (व) नजबखानास दगा आहे ह्मणून सा़शंकित करून, विजापुरची सनद न देणें ठरविलें. श्रुत होय. पुढें होईल तें विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक ३.

श्रीवरद. मे. इ. स. १७८०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति उपरी केशवराव हरकारियांचे पुत्र, बदरीनाथराव, येथें निजामअल्लीखानाकडून हरकारगिरीचे कामावर आहेत. या दिवसांत निजामअल्लीखानाकडील

बातमी पातशाहा (व) नजबखानास पाविली कीं, निजामअलीखान व हैदरनाईक व इंग्रज व सरदार उभयतां एकचित्त होऊन, श्रीमंत दादासाहेबांस स्थापून, स्वामींसीं विपरीत करावें. हें वृत्त बदरीनाथानें नजबखानास श्रुत केल्यावर, आह्मांसीं खानमजकूर मोघम बोलिले कीं, 'कितीक विपरीत वृत्त दक्षिणचें येतें. त्याजवर आह्मांस मदार नाहीं.' ह्मणून सांगितल्यावर आह्मीं पुसिलें कीं, 'काय आहे तें सांगावें.' तेव्हां बोलले कीं 'सांगावें याजोगें नाहीं!' त्यावरून आह्मीं शोध केला. तों कळलें कीं, बदरीनाथानें हें वृत्त यांस श्रुत केलें आहे. त्याजवरून सेवेसीं श्रुत करणें जरूर जालें. त्यास, स्वामींनीं निजामअलीखानास, राजश्री कृष्णराव बल्लाळ यांस न कळतां लिहून, अथवा मातबर पाठवून, आपले स्नेहाची पोक्तगी करावी. कृष्णराव बल्लाळ यांस न कळतां निजामअलीखानास लिहावयास सांगावयास कारण काय ह्मणाल, तर त्यांचीं पत्रें बदरीनाथाकडे येतात, व यांचीं त्याजकडे जात आहेत. हें वृत्त फिरून बदरीनाथास कळेल, तेव्हां आह्मांस त्यांचें घरचें वृत्त तथ्य कळतें, तें कळणार नाहीं. यास्तव लिहिलें असे. कृष्णरावजीचा व बदरीनाथाचा स्नेह स्वामींस श्रुत केला. याकरितां आह्मांसीं ते विषम मानितील ह्मणोन मनांत ठेऊन, जे सलाह असेल तें करणार स्वामी समर्थ आहेत. विनंति मनन करून फाडून टाकावी. श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४. मे इ. स. १७८०.

श्रीवरद.

"पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञप्ति ऐसीजे, पूर्वीं पातशाहासीं व नजबखानासीं बोलणीं जालीं, त्याचा मजकूर सेवेसीं विनंतिपत्रें पाठविलीं. तें प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं पातशाहासीं व नजबखानासीं दुहराऊन बोलून पक्कें केलें. त्याचें उत्तर त्यांनीं दिधलें कीं, "आह्मीं इकडे यांसीं स्वच्छ बिघाड केला, आणि तुम्हीं तिकडे गुजराथ प्रांतीं कंपू गेला आहे त्यासी सलूख केला, तर मग हे गोष्ट बहुत विलग पडेल. याचें कारण हेंच कीं, तुह्मी दूर आणि आह्मी यांचे समीप. यांनीं हा मुलूख सर्व वेष्टिला आहे. आह्मी यांचे पोटांत आहोंत. याजकरितां तुह्मीं व उभयतां सरदार एक विचार पक्का करून, करोड रुपये फिरंगीं यांनीं दिल्हे तरी त्यांसीं सलूख न करावा. आह्मी यांसीं इकडे बिघाड करावयासी सिद्ध आहोंत." याप्रमाणें पातशाहांसीं व नवाब नजबखानासीं बोलणें जालें, व हजूर याप्रमाणें

लिहून पाठवा आणि पत्राचीं उत्तरें सत्वर आणवा" ह्मणून सांगितलें; व हेही बोलले कीं, "जर कदाचित् तदबिरीचे तूर्त मसलतीमुळें इंग्रेजांसीं सलूख केला, तर पुढले वर्षीं फिरोन इंग्रेज पुण्यास येतील, यांत संदेह न जाणावा. आपले-कडील, निजामअल्लीखान व हैदरनाईकाकडील आह्मांस पत्रें आलीं होतीं, त्यांचीं उत्तरें लिहिलीं. त्यांत आह्मीं हेंही लिहिलें आहे कीं, श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांसीं व इंग्रेजांसीं लढाई लागली आहे. त्यास श्रीमंतांची फत्ते, तुह्मी आपले मनोदय एक जाणून, हिंदुस्थानचे सलतनतीस उपयोगी होणें सलाह आहे. याप्रमाणें इशारा निजामअल्लीखानासही लिहिला. खोलून न लिहावयास कारण हेंच कीं, फराशीसांस आह्मीं पत्रोत्तर लिहिलें, तें पत्र बजिन्नस त्यांचे मुनशीनें इंग्रेजांचे स्वाधीन केलें. फराशीसांसीं व इंग्रेजांसीं शत्रुत्व आहे, तैसें कोणासीं नाहीं. असें असतां, तेथें मंत्रभेद त्यांचेच मातबरानें केला. यास्तव निजाम-अल्लीखानास इशारा आह्मीं लिहिला आहे. तर श्रीमंतांनीं त्यांस अधिक ममतेंत घेऊन इंग्रेजांचे पारपत्यास निजामअल्लीखानाचीही फौज आणवावी, व हैदर-नाईकाचीही फौज सामील करून घ्यावी, कीं त्याचा व इंग्रेजांचा बाह्यात्कारें विरोध पडल्यास श्रीमंतांसीं विपरीत होऊं पावणार नाहींत. यास्तव जलदीनें श्रीमंतांस विनंति लिहिणें. ह्मणून सांगितलें; व भोंसल्यास बंगाल्याकडे पाठविलें. परंतु, त्यांचा व इंग्रेजांचा अंतस्थ सलूख आहे ह्मणून श्रवणांत आलें आहे. जर भोंस-ल्यांनीं बंगाल्यास जाऊन त्यांसीं बिघाड केला, तर इकडून पाण्याप्रमाणें धाऊन कलकत्त्यापर्यंत आह्मी प्रांतांत अमल करूं. गोहदेकडे तुमची फौज आहे, त्यांनीं सामील व्हावें व आणीक हजूरची फौज जरूरीस आणवूं; नाहीं तर आमची फौज व तोफा तीनशें, पायदळ कंपू तीन, चकमकी व तोडेदार, याशिवाय फौज राऊत पन्नास हजार तयार आहेत. परंतु जायदाद टाकून दुसरे कामास जाव-यास फौजेस रुपया आह्मांपाशीं नाहीं, यास्तव नाइलाज आहों! जर बंगाल्याकडे भोंसल्यांनीं बिघाड केल्यास आह्मी इकडून कलकत्त्यापर्यंत जावयास कुमक इच्छित नाहीं." याप्रमाणें स्वामींशीं एकनिष्ठतेचीं भाषणें बहुत केलीं. तात्पर्य, सर्वांचें मानस कीं, गुजराथेस कंपू गेला आहे त्याचें पारिपत्य आपले फौजेचे हातून व्हावें....या लक्षावर सर्व ध्यान धरून आहेत. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन हे विज्ञप्ति."

लेखांक ५.

पैवस्ती छ० २५ रमजान. **श्रीवरद.** २१ जून सन १७८०.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

"विज्ञप्ति ऐसीजे:– पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहास अर्जी व नवाब नजबखान जुलफकारदौले बहादूर यांस सरकारांतून पत्रें रवाना केलीं आहेत, व दौले बहादूर यांस राजश्री बाळाजी जनार्दन यांनीं विस्तारें लिहिलें आहे. हा मजकूर तुह्मांस समजावा सबब मसोदे पाठविले आहेत, त्याजवरून कळेल. त्याप्रमाणें बोलून इंग्रेजांची मसलत लिहिल्याप्रमाणें विस्कळीत होऊन, सरकारकाम अमलांत येईल तें करणें. सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन लिहितील त्यावरून कळेल." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, स्वामींचे आज्ञेप्रमाणें पातशाहांस वरचेवर उत्तेजन देऊन इंग्रेजांचा यांचा स्नेहसंदर्भ होता तो तोडिला. सेवकासीं पातशाहांनीं व नवाब नजबखानांनीं शपथ वाहून सांगितलें जे, "नानांनीं लिहिलें आहे, हेंच आमचे चित्तांत आहे. याप्रमाणेंच करूं." ह्मणोन वचन दिधलें. वजिराकडील चार हजार फौजेनसीं पातशाहाचे तैनातीस लताफत आहे. त्याचा आमचा जोड आहे. आपले सरकारची फौज दोन हजार सेवकापासीं असिल्यास पातशाहाचें मनास आल्हाद होईल. अतःपर पुढें श्रीमंतांस लिहून आपले सरकारची फौज हुकुमांत राहेसी जलदीनें हुजुरांत ये तें करणें ह्मणून लिहावयास सांगितलें, तें लिहिलें असे. आपला मातबर माणूस सेवकाचे समागमें देऊन सेवेसीं रवाना करितों ह्मणतात. अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. तख्ताची जागा, या स्थलीं सरकारची फौज असिल्यास यांजवर दाब राहून, शत्रूचे पारिपत्याची तजवीज वरचेवर होईल तें सेवक करील. प्रथम पातशाहापासीं खर्चाची तंगी; त्यांत एक उमराव ह्याजला दुसरीयाचें बल नाहीं. त्यांत मोंगल लोक काबूची. यास्तव सेवेसीं विनंति लिहिली असे. तर सलाह असलियास एक दोन पथकें धोंडो दत्तात्रय व पवार तऱ्ही सेवकाचे तैनातीस पाठवावें कीं, सरकारचे फौजांची आमदानी यांजला कळून, नवा प्रांत घेऊन, खर्चाची तंगी दूर करावयाची उमेद दाखवून, कंबर बांधऊन, डेरे दाखल करऊन, होईल ते चाकरी करूं. इंग्रेज तूर्त खर्चास रुपये देऊं ह्मणतात. आह्मी कोरडी गोष्ट फौजेविना सांगून, नफे भारी दाखवून, स्वामींचे आज्ञेप्रमाणें आजवर इंग्रेजांचा रुपया पातशाहास घेऊं दिधला नाहीं, व वचनींही गुंतूं देत नाहीं. पातशाहा स्वामींस रुपया मागत नाहींत; फौज आणा ह्मणतात. यास्तव सेवेसीं लिहिलें असे. गोहद प्रांतीं पथकें आहेत, त्यांपैकीं एखादें दोन पथकें सेवकापासीं राहिल्यास सरकारउपयोगी आहे. श्रुत होय. उत्तम असेल तें करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक ६.

श्रीवरद.

पैवस्ती छ० २५ रमजान. २१ जून सन १७८०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:-

विज्ञप्ति ऐसीजे, इंग्रेजांचा कंपू इटावीयास होता, तो गोहदकर एकत्र होऊन, खंडेराव हरी वगैरेचें तोंडावर गोहदकरास ठेऊन, इंग्रेजांनीं लाहरचें ठाणें घेतलें. कछवाघारेंत अमल त्यांचा जाला. यास्तव नजबखानास आह्मीं सांगितलें कीं, तुह्मीं आपली फौज दाहा हजार, खंडेराव हरीचे कुमकेस पाठविणें, कीं इकडे तुमचे फौजेनें सरकारचें काम केल्यानें श्रीमंतांस व सरदारांस संतोष होय. व आज त्यांनीं त्या प्रांतांत अंमल केला, उदईक तुमचा प्रांत जाईल. यास्तव, तुह्मी व ते एक होऊन, गोहदकराचें पारपत्य करणें. हे सलाह निवेदिल्यावर पातशाहांपासीं येऊन पातशाहांस कूच करावयाविषयीं अर्ज केला. त्यांनींही मान्य केलें. डेरे वगैरेची तयारी करितात. कूच निश्चयात्मक अयोध्येकडे करितों ह्मणून निश्चय केला आहे. जे दिवशीं कूच करतील व फौज गोहदकरावर रवाना करितील तें लिहूं. तात्पर्य, हेंच कीं, सरकारची फौज एक मातबर सरदार ये प्रांतीं आलियास, हे सामील होऊन ये प्रांतीं इंग्रेजांसीं खोडाली करितील. अयोध्येकडील इंग्रेजही कलकत्त्यास जाणार ह्मणून वर्तमान आलें. दुहराहून वृत्त येईल व इंग्रेज जातील, तेव्हां सेवेसीं विनंति लिहूं. मुख्य गोष्ट, नजबखान व पातशाहा, काया-वाचा-मनसा स्वामींचे पत्राचे खातरजमेनें.......आहेत. खर्चाचे तंगीमुळें मागें पुढें पाहात होते.......स्वामींचे आज्ञेप्रमाणें सविस्तर पत्रार्थ नजबखानास व नजबखानांनीं व सेवकांनीं पातशाहास संकल्प केला. पातशाहांनीं श्रवण करून सिद्धतेंत लागले आहेत. परंतु आपले सरकारचा एक सरदार मातबर आलियावर, इकडील तिकडील इंग्रजाचें पारपत्य करावयास जमाव बसेल, तें सत्वर करणार स्वामी समर्थ आहेत. येथें पातशाहापासीं व नजबखानापासीं तोफा तीनशें, जिलेबी व स्वार प्यादे पन्नास हजार, तोडे चकमकी व बंदूख आहे; व इंग्रजांचे दोन कंपू लखनऊस आहेत, त्यांचा मुकाबिला घ्यावयास कजाखी फौज असिल्यास एकतोंडीं झुंज पडणार नाहीं, व इंग्रजांचे तोफखानीयावर यांचा तोफखाना गालिब! कजाखी फौजेचे योगानें त्यांचे तोफखानियाचे जोरापुढें ठरतील. यास्तव, सरकारची फौज गोहदप्रांतीं आहे, त्यास येथें सेवकापासीं पाठवावी कीं, यांजला सरकारचे फौजेनें उत्साह विशेष होईल, व येथें स्वामींचा दाब अधिक होईल तें करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन हे विज्ञप्ति."

लेखांक ७.

पैवस्ती छ. २५ रमजान. **श्रीवरद.** २१ जून इ. स. १७८०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञप्तिपत्रीं आज्ञा कीं, "नवाब निजामअलीखान बहादूर व राजश्री खंडोजी भोंसले सेनाबहादूर यांस हुजूरचे फर्मान इनायत व्हावें कीं, तुह्मीं व राव पंतप्रधान एकदिल होऊन इंग्रेजांचे तंबीची मसलत ठराविली ह्मणून हुजुरांत अर्ज जाला. त्यास हे गोष्ट बज्या आहे. हजुराहूनही इकडील कुल्हापोशाची सजा करणें मंजूर आहे. तुह्मीं व राव पंतप्रधान खातरजमेनें दिलखा तदारुक अमलांत आणावा; याअन्वयें शिरस्तेप्रमाणें फर्मान यावें. याशिवाय जयपूर व उदेपूर व बुंदेलखंड व गोहदकर जाट यांस तमाम फर्मान कीं, इंग्रेजांची तंबी मोकरर हजुराहून जाली, आणि राव पंतप्रधान यांसही फर्माविलें आहे. तर तुह्मीं आपलाले जमावांनिसीं राव पंतप्रधान यांचे फौजेस सामील होऊन, इंग्रेजांची तंबी व तदारुक खातरखा करणें, ऐसें फर्मान सत्वर यावें. यास दिवसगत न लागावी. जरूर लिहिल्याप्रमाणें घेऊन पाठवावें" ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यावरून पातशाहास सरकारची गरज न दाखवितां, सलाह तरीक समर्पक विनंति केली. त्यावरून फर्मान ल्याहावयास विचारांत पडले कीं, तूर्तच इंग्रेजांस बातमी जाऊन विषम मानतील. हें लक्ष जाणून, सेवकानें कितीका प्रकारें पूर्वील सरकारचाकरीचे प्रकार यांस समजाऊन, नवाब निजामअलीखान व राजेश्री खंडोजी भोंसले सेनाबहाद्दर यांस फर्मान लिहून पाठवणें ठराविलें आहे. तयार जालीयावर घेऊन सेवेसीं रवाना करूं. स्वामीकारणें नजबखानांनीं पत्र लिहिलें, तें बहुत स्नेहममतेनें. याचें उत्तर अलंकाब वजिराप्रमाणें लिहून पाठवावें, कीं यांचें समाधान होय. हलका अलकाब लिहिलियामुळें विषम मानितात. यास्तव पुढें कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञप्ति."

लेखांक ८.

पैवस्ती छ. २५ रमजान. **श्रीवरद.** २१ जून इ. स. १७८०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १६ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः– छ० २६ रविलाखरचीं पत्रें पाठविलीं, तें छ० २३ जमादिलावलीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, "अलीकडे तुह्मांकडून पत्र येऊन वर्त-

मान कळत नाहीं. त्यास सविस्तर वरचेवर लिहीत असावें. सरकारांतून पातशाहास अर्जी व नवाब नजबखानास पत्रें व आह्मांकडून खानमजकुरास पत्रें पाठविलीं आहेत, तें त्यास देऊन लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडोन ये सें जरूर व्हावें. पारसी पत्रांतील मजकूर तुह्मांस समजावा याजकरितां मसोदे आलाहिदा पाठविले आहेत, त्यांजवरून कळेल. कित्येक मजकूर आलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिला आहे, त्याप्रमाणें अमलांत आणणें." ह्मणोन लिहिलें. त्यास, पैदरपै विनंतिपत्रें सेवेसीं पाठवितों. त्यांचीं उत्तरेंही सेवकास येतात, व आज्ञेप्रमाणें पत्रें आपलीं व सरकारचीं पातशाहास व नजबखानास देऊन, त्यांस इंग्रेजांचे शाम करावेंसें वारंवार बोध करून ठेविलें आहे. त्याचा तपसील सरकारांत विनंतिपत्रें लिहिलीं आहेत, त्यांवरून ध्यानास येईल. सेवकाच्यानें यथाज्ञानेंकरून जे चाकरी घडोन येईल, तीस अंतर करणार नाहीं. परंतु लोकांचें येथील देणें वारून स्वामिदर्शन घडें तें करणार आपण आहेत. खर्चाची आबाळ विशेष! यास्तव विनंति मान्य करणार स्वामी समर्थ आहेत. सविस्तर पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. नजबखानांनीं स्वामीस पत्र बहुत स्नेहवृद्धीचें व सरकारउपयोगी लिहिलें आहे. त्याचे उत्तरीं, विशेष लोभानें व पातशाहास इंग्रेजावर मोहिमेस घेऊन निघतों ह्मणून सेवकानें तुमचे जबानीं लिहिलें, त्यावरून बहुत संतोष जालियाचें लिहावयास आज्ञा करावी. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन हे विनंति."

लेखांक ९.

(नक्कल.) **श्रीवरद.** २१ जून इ. स. १७८०.

"श्रीमंत राजश्री पाटीलसाहेब गोसावी यांसीः—

स्नेहांकित पुरुषोत्तम महादेव कृतानेक आशीर्वाद विनंति येथील कुशल तागाईत छ० १७ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः—आपलीं पत्रें चंद्र २६ रविलाखरचीं आलीं, तीं येथें चंद्र १३ जमादिलावलीं पाऊन बहुत संतोष जाला. पत्रीं आज्ञा कीं, "इंग्रेज बलवान नजबखान यांनीं होऊं न द्यावें. पातशाहांनींही यांसीं राजकारण लावणें ठीक नाहीं. वजीर सुजायद्दौले यांचे घरांत पाय इंग्रजांचा शिरला असतां, सारेंच हाताखालें घातलें, हें त्यांस न समजलेंसें नाहीं. सांप्रत तिकडे कायममिजाज व मजबूत एक नवाब नजबखान आहेत. यांनीं इंग्रेजांचा पाय शिरूं न द्यावा. आमची स्वारी, गुजराथेंत इंग्रजांनीं दखल केली याकरितां त्यांचे पारपत्यास

आली आहे. इंग्रेजांचा व स्वारीचा मुकाबिला आहे. थोडक्याच दिवसांत इंग्रेजांचें पारपत्य करून, स्वारी उज्जनीस येऊन पुढें त्या प्रांतीं येईल. नवाब नजबखान यांच्या भेटी होऊन इंग्रजांचें पारपत्य होणें तेंच होईल. स्वारी येई तोंपर्यंत इंग्रजांस ताण बसे तेंच करावें. राजश्री देवराव महादेव यांचे खर्चाविसीं लिहिलें, त्यास कोव्यावर नेमणूक आहे त्याचा बंदोबस्त करून देविला जाईल." म्हणून पत्रीं आज्ञा. त्यावरून पातशाहास व नबाब नजबखानास वारंवार दूरआंदेशीच्या व परिणामाच्या गोष्टी समजाऊन, इंग्रेजांकडील भला माणूस यांजपासीं लालूच दाखवून आपला पाय दिल्लींत कायम करावा या विचारावर आला होता, त्यास यांजकडून साफ उत्तर देविलें. तो न पुसतां रुसून उठोन गेला. पातशाहांसीं व नजबखानांसीं शपथपूर्वक पक्केपणें बोलणें बोलून, इंग्रेजांचे मोहिमेस कुचाचा निश्चय ठरविला आहे. तमाम रोहिले व शीख वगैरे गंगापारील जमीदार या सर्वांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, खासा स्वारी इंग्रेजांचे पारपत्यास निघणार; त्यास, तुम्हीं आपलाले सामानांनसीं येऊन हजर होणें. म्हणून पत्रें गेलीं आहेत, व कोणा कोणाचे वकील हुजूर हजर आहेत. त्यांनीं उत्तर केलें कीं, स्वारी जाल्यास चाकरी करून दाखवायास सिद्ध आहेत. म्हणून बोलणीं जालीं. त्यावरून पातशाहांनीं फरासखाना सिद्ध करावयास आज्ञा केली आहे. तयारी होत आहे. मासपक्षांत डेरेदाखल होणार. यांजपाशीं सरंजाम, तोफखाना जरब सुमार तीनशें, जिलेबी व पायदळ व फौज मिळून पन्नास हजार स्वार माणसांची भीड आहे. त्यांची यांची लढाई बरोबरीची आहे. त्यांत अंतर हेंच कीं, इंग्रेजांची तोफ जलद चालते. यांचे तोफेस बार व्हावयास विलंब लागतो! या अर्थीं कजाकी फौज यांचे कुमकेस असल्यास हे त्यांस मारून चालवितील म्हणून बोलत होते. त्यास, आपली खासा स्वारी या प्रांतीं आलियास हे सर्व आपली ताबेदारी करून, हें यश आपल्यासच ईश्वरें नेमिलें आहे. या दिवसांत अयोध्येकडून जनरल कोट नामें इंग्रजांकडील होता, तो जातीनसीं कलकत्त्यास गेला. व परलंग (?) इंग्रेज आहे, तो पलटण नवें तयार करून इटावियास येणें ठराविलें आहे. गोहदकर जाटाकडील वृत्त व सरकारचें फौजेचें वृत्त परस्परें श्रुत जालेंच असेल. नजबखानापासून वचन घेतलें कीं, पातशाहास इंग्रेजांचे मोहिमेस अयोध्येकडे न्यावें, व बंगस, रोहिले, शीख जमा करावयास सिद्ध आहे. परंतु भोंसले यांणीं कलकत्त्याकडे ताण बसवावा, व आपण व राजश्री सुभेदार यांणीं गुजराथ प्रांतीं पिच्छा न सोडावा. हें न जाल्यास दिल्लीहून इंग्रज जवळ आहेत, यांजला तोंडांत टाकतील. बिघाड केल्यावर कुमक आपली

जाली पाहिजे. कजाकी फौज यांजपासीं आपली येथें असल्यास, शिखास पथरगडाकडे उतरा देतील, व अयोध्येकडे खलश करावयास आरंभ करावयास सिद्ध आहेत. सरकारची स्वारी इकडे आली तर सामील होऊन, मोहिमेस तयार आहेत.………………………यास्तव रात्रंदिवस आपले फत्तेस इच्छितात. या दिवसांत पातशाहाचे घरीं वर्तमान आलें कीं, आपली छावणी उज्जेन इंदूर होणार, व इंग्रज भडोचेस गेले. त्यास, काय ठराव जाला तें पत्रीं कृपा करून लिहावें कीं समाधान होय. आपले आज्ञेप्रमाणें चिरंजीव देवराव यांनीं सविस्तर पातशाहास व नजबखानास श्रुत करावयास लिहिलें. तें यथाज्ञानें समर्पक सुचलें तें समजाऊन, यांचें चित्त इंग्रजापासून रुपये घेणें व त्यास दखल देणें मोडिलें, व साहेबांची स्वारी येऊन पातशाहाचे खर्चाची खातरजमा केली, व नजबखानास पुढें मोहीम करून रुपये मिळतील त्यांत घेणें देणें पूर्वील त्याचे कराराप्रमाणें उमेदवार करून, कौलनामा पूर्वीं आह्मीं घेतला तो दाखवून, लाजऊन, लालूच साहेबांचे कृपेची दाखऊन, इंग्रेजांकडून काया-वाचा-मनसा तोडिलें; वारंवार शपथ घेतली व पोख्तगी केली, व पातशाहाचा शुक्का व नजबखानाचें पत्र आपणास पाठविलें आहे, तें पावून सविस्तर श्रुत होईल. याचीं उत्तरें सत्वर पातशाहास व नजबखानास पाठविलीं पाहिजेत. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंति.''

लेखांक १०.

पैवस्ती छ० २५ रमजान. **श्रीवरद.** २१ जून सन १७८०.

''विनंति कीं, नजबखानासहित पातशाहापासून शपथ घेतली, व श्रीमंत स्वामींसीं सामील व्हावयास निजामअलीखानास त्याचे वकिलाकडून नजबखानांनीं लिहिविलें. त्याचीं पत्रें स्वामींस व श्रीमंतांस घेऊन पाठविलीं आहेत. त्यावरून व पातशाहाचा शुक्का पाऊन वृत्तांत श्रुत होईल. तात्पर्य, अंतःकरणांतून इंग्रेजांची जड पातशाहींतून काढावी व सरकारचे फौजेस सामील व्हावें. परंतु कदाचित् आपण तिकडे सलूख केला, तर इकडे इंग्रेज यांस समीप आहेत; एकले हे त्यांचें पारिपत्य करितीलसें दिसत नाहीं, पेंचांत येऊं; या साशंकिततेची ………………………विनंति लिहावयास बहुत ममतेनें नजबखानांनीं सांगितलें. तें श्रीमंत स्वामींचे सेवेसीं विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत होईल. मुख्य यांचे मनांतील भाव, इंग्रेजांसीं आपण सलूख न करावा, व ते जेर जालियावर यांनीं त्यांचे प्रांतासीं खलश करावयाचे समयीं, सरकारचा एक सरदार, मातबर

फौजेचा, निःकपट पातशाहापासीं असिल्यास, नजबखान चाल करील यांत संदेह नाहीं. इंग्रेजांची ताबेदारी न करावी, स्वामींची फत्ते व्हावी, हें अंतःकरणापासून शपथ वाहून वारंवार बोलतात. इंग्रेजांसीं स्वामींनीं एकोपा केलीयास सरदार फौजेसहित येऊन, जाटाचा प्रांत व जयपूर प्रांत नजबखानापासून सोडवितील, या धाकांत साशंकितही आहे. यास्तव स्वामींसीं निःकपटता करून, सरकारची फौज सामील करून घेऊन, इंग्रेजांसीं बिघाड करून, आपले प्रांतास उपद्रव न लागावा, या मनोदयास्तव सरकारचे फौजेची इच्छा करितात. उभयतां सरदार एकचित्त होऊन, हिंदुस्थानांत येऊन, यांचें संरक्षण करून पुढें यांजला राहूं देतील, हा यांजला भरंवसा पुरता पुरत नाहीं. सेवकानें सरदाराकडूनही खातरजमा केली, व पत्रापत्रीं स्नेहवृद्धि सरदारांची यांचीही केली आहे. परंतु, मनांतून शंकित होऊन ह्मणतात कीं, इंग्रेजांसीं तुह्मी सलूख कराल, तर इंग्रेज दिल्लीही घेतील; तेव्हां आह्मांस कुमक कोणाची येणार? यास्तव वारंवार सलूख न करावयाविषयीं नजबखानांनीं सेवकास सांगितलें, व सोबत पत्रांतही याच प्रकारें लिहिलें आहे, तें श्रुत होईल. पातशाहाचें मनांत नजबखान नसावा, व याचे कबजांत न राहावें. स्वामींचे काबूंत राहावें. दिल्ली आग्रे यांत स्वामींचा बंदोबस्त असलियास पातशाहास सुख आहे. परंतु नजबखान नसावा, हें अंतःकरण पातशाहाचें आहे. यास्तव सेवेसीं विनंति. राजश्री हरिपंत अथवा राजश्री महादजी शिंदे, एकानें दिल्लीस राहून, दोन लक्ष रुपये दरमाहा पातशाहास खर्चास देऊन, हें स्थळें करोडीचीं हस्तगत करावीं, व पातशाही हुकूम आपले ताबे ठेविणार स्वामी समर्थ आहेत. नजबखानांनीं पत्रें बहुत स्नेहवृद्धीनें लिहिलीं आहेत. यांचीं उत्तरें पाठवावीं. निजामअल्लीखानास व खंडोजी भोंसले यांस शुके स्वामींचे आज्ञेप्रमाणें लिहिविले आहेत. ते तयार करऊन सेवेसीं मागाहून पाठवितों. नजबखानांनीं करार केला आहे कीं, पातशाहास अंतरवेदींत डेरेदाखल करितों; व इंग्रजांचे कलकत्त्याकडे भोंसल्यांनीं ताण बसवावा; व सरदारांनीं त्यांचा पिच्छा न सोडावा. हें करणें स्वामींचें स्वाधीन आहे. येविषयीं पैं दरपैं हुजूर विनंति लिहावयास सेवकास सांगतात कीं, सलूख कदाचित् केला तर पुढें जड जाईल........आपण समयोचित उत्तम असेल तें करावें. स्वामींचे प्रतापें ईश्वर फत्ते करील तो सुदिन. पूर्वींही एक दोनदां सेवेसीं विनंति लिहिली कीं, नजबखानास श्रीमंतांचे पत्रांत अलकाब केवळ हलका पूर्वस्थितीप्रमाणें मुनशी लिहितात. यास वजिराप्रमाणें पत्रांत श्रीमंत स्वामींकडून लिहावयास आज्ञा केली पाहिजे. वाढऊन लिहिणियांत मनास

उत्साह होऊन, कामास तत्पर विशेष होतील तें करावें. हलके फारसींत लिहिलें यास्तव विषम मानिलें. आह्मीं श्रुत केलें कीं, आमचीं पत्रें श्रीमंतांपाशीं न पावलीं. पावलियावर वजिराप्रमाणेंच लिहितील. याप्रमाणें सांगून समाधान केलें. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. येथील बाह्य अंतस्थ सविस्तर ध्यानारूढ असावें, याकरितां लिहिलें. अधिक विस्ताराकरितां रागास न यावें. श्रीमंत स्वामींस पातशाही इनायत टिका वगैरे घेऊन यावयास्तव उत्कंठा, व कर्जदारी-मुळें एकादशी शिवरात्र मोडावयास्तव बाळाजी [व] गंगाधर गोविंदास सरकारचीं सनदापत्रें पाठविलीं, त्यांचें उत्तरही न देत ! मग रुपये नेमणुकेपैकीं बाकीचे पाठवणें व वसुली जमेचे गांव लाऊन देणें कळतच आहे !! उल्हासें हजूर लिहावें, त्याचें उत्तर त्याजवरच ताकिदीनें आज्ञापत्र येतें. ते उत्तरही न देत ! पांच सालांत एकसाला ऐवज कमालजमेचे गांव लाऊन दिधले आहेत, त्याच गांवांवर दुसाला कर्ज दहा हजार रुपये कालपी प्रांताचे साहुकाराकडून आणविलें. तेथें एकसालाही कर्ज मागील देणें गांवावर ठेविलें आहे, यामुळें न मिळे. दुसरें कारण, खंडेराव हरी, पवार वगैरे फौज ग्वालेर प्रांत सोडून झांसी प्रांतांत व कोंचकालपीकडे लूट करावयास पोट भरावयास गेले आहेत. कछवाघरांत गोहदकराचा अंमल जाला. इंग्रेजसहित गोहदकरानें रात्रौ धाऊन छापा घातला. पांच सहाशें घोडें माणूस गमाविलें. आतां सुरक्षित भांडेरीस आहेत. हेंही कारण जालें. या दिवसांत सेवकाचें हजूर येणें व येथें ठेरणें दुस्तर जालें. जाणून विनंति मान्य करून, बाळाजी गोविंदाचे कारकुनास सत्वर लाऊन, एक साल रुपये येथें खर्चास पाठवावे कीं, येथील देणें वारून सेवेंत येऊन, बुंदेलखंड व झांसीचे रुपये सालबसाल कांहीं स्वामींस पावेत, तो विचार श्रुत करूं. बाळा-जीपंत कायम राहून सरकारकाम होय तें करावेंसी मर्जी असिल्यास, विनंति करूं. सेवकाची नेमणूक (न) दिधली यास्तवच लिहीत नाहीं. त्यांचे अस्ताव्यस्ततेनें सरकारकाम होत नाहीं, म्हणोन तात्पर्य लिहिलें असे. तर, हरएक साहुकारा-पासून कर्ज घेऊन, सेवकास दहा हजार रुपये तऱ्ही जरूर पाठविणार स्वामी समर्थ आहेत, व या रुपयांची तनखा साहुकाराची बाळाजी गोविंदाचे कारकुनावर करावी कीं, त्यास तिडीक लागून रुपये हजूर आणऊन घेईल, तें केलें पाहिजे. निराश्रित सेवकास दर्शनलाभ होऊन सनाथ करावयास आपण समर्थ आहां. "स्वस्थे चित्ते बुद्धियः संभवन्ति." कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. श्रीच कृपा करो, व स्वामींचा प्रताप अधिकोत्तर होय ते सुघडी. बहुत काय लिहूं हे विनंति."

लेखांक ११.

श्रीवरद. जून इ. स. १७८०.

"सेवेसीं विनंति कीं, राजेश्री बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांस लिहितां व कारकुनाचे मुशारे देतां थकलों! परंतु पत्रोत्तर सा सा महिने न पाठवीत. मग बाकीचे रुपये व वसुली जमेचे गांव लाऊन देणें कळतच आहे! कदाचित् पत्रोत्तर आलें, तर आपला ओढा लिहून उमेदवारी लिहितात. याचा विस्तार पूर्वीं वरचेवर सेवेसीं विनंति लिहिली, व उत्तरें त्यांस ताकीदपत्रांसहित आलीं, तें त्यांजकडे पाठविलीं. उत्तरें येतील तें सेवेसीं पाठवूं. तूर्त सेवकास हजूर पातशाही टिका घेऊन यावयाची त्वरा, व वर्षाकाळ समीप आलीयामुळें फसाव होईल. बहुत दिवस दर्शनलाभ न जाला, या उत्कंठेंत अत्यंत चिंताग्रस्तता. दुसरें, स्वामींस शत्रूचें पारपत्य करावयाचे अहिर्निश उद्वेगाकरितां चित्त उद्विग्न. यांत सेवकानें आपली अवस्था लिहिणें परम संकट जाणून विनंति लिहिली कीं, बुंदेल्याचे मातबर तेथें असतील, त्यांजपासून कर्ज रुपये दहा हजार स्वामींनीं घेऊन पाठवावे. तरच जीवनोपाय होऊन दर्शनलाभ घडेल व स्वामींचा शब्द लागणार नाहीं व ऊर्जित होईल तो सुदिन करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. हजूर येणें व येथें राहाणें खर्चाचे तंगीमुळें दुस्तर जालें. याकरितां दरपत्रीं विनंति लिहिली, याचा अपराध क्षमा केला पाहिजे. केतकीचे फुलाचा अर्क एक शिसा सेवेसीं पावेल. प्रातःकाळीं पूजनोत्तर, अथवा जेव्हां सरबत घेणें मर्जीस येईल ते समयीं एक तोळाभर पाण्यांत घालून घेतल्यास ढकार सुगंध येईल. घरीं तयार ब्राह्मणाकडून करवून सेवेसीं रवाना केला असे. सुरक्षित पावल्याचें उत्तरीं कृतार्थ केलें पाहिजे. दर्शनलाभ घडे ते सुघडी. हे विनंति."

लेखांक १२.

श्रीवरद. २२ आगष्ट इ. स. १७८०.

"पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञप्ति ऐसीजेः—सरकारांतून नजबखानास खलिता पाठविला होता, त्यांत अलकाब हमेशा पूर्वींपासून लिहितात तोच लिहिला होता. याजविसीं पूर्वीं विनंतिपत्रें हुजूर पाठविलीं. त्या समयीं वरचेवर विनंति लिहिली होती कीं, असफदौला वजीर यांस अलकाब सरकारांतून लिहीत असतां, तो नजबखानास लिहीत जावा; ह्मणून विज्ञप्ति लिहिली. परंतु विस्मरणेंकडून फिरून पूर्ववत्प्रमाणेंच पत्र लिहिलें आलें. तें यांस द्यावें तर अलकाब हलका लिहिलियामुळें पूर्वीं

विषम मानिलें व हल्लींही मानितील, यास्तव न दिधलें. यांचा प्रकार पहिला राहिला नाहीं. त्या अलकाबावर बहुत वाईट मानितात. ह्मणून तें पत्र न दिधलें. तर आतां कृपा करून असफदौलाप्रमाणें अलकाब ल्याहावयाची आज्ञा राजेश्री नारायणराव मुनशीजीस करावी, कीं हे संतोषी राहून सरकारउपयोगी राहते तें करणार स्वामी समर्थ आहेत. ईश्वरें स्वामींचा प्रताप थोर केला आहे, यास्तव सर्व मान इच्छितात. कृपा करावी व पत्रामृतीं नजबखानास स्नेहवृद्धीनें सेवकवत् करावें. हे विज्ञप्ति."

लेखांक १३.

श्रीवरद. २२ आगष्ट इ. स. १७८०.

"पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे:– छ० १९ साबानीं इंग्रेजांकडील वकील फजलअल्लीखान नामें कांहीं जाबसाल घेऊन आला आहे. त्याचा तात्पर्य हाच कीं, आमचे कोठीस दिल्लीस आगरियास जागा द्यावी, व खर्चास दोन लक्ष रुपये दरमाहा घेत जावा; व पूर्वील बंगालीयाचे वर्षासनाचे व बाकीचे रुपये आह्मी पेशजीं देऊं, व कोठीस जागा द्यावयाची नजरेचे ठरावयास वकील खानमजकूर आला आहे. पुढें बाह्य अंतस्थ ठरेल तो शोध घेऊन सेवेसीं विनंति लिहूं. मुख्य गोष्ट, पूर्वीपासून इंग्रेज, जागा कोठीस जयपूर, दिल्ली, आगरे वगैरे मातबर स्थळीं इच्छितात. आतां ग्वालेर त्यांचे हातास गेली. याकरितां इंग्रेज सर्वास्थळीं अंमल जालासें जाणतात. श्रीइच्छा प्रमाण. यास्तव फौजा ये प्रांतीं जलदीनें आल्यास पृथ्वीपतीस खातरजमा होऊन इंग्रेजांसीं ललोप तों न करीत, व हें स्थळ सरकारचें व पातशाहाचें काबूंत राहे तें श्रीस्वामींचे प्रतापें करो. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक १४.

पैवस्ती छ २३ सवाल इहिदे समानीन. हा॥ अजुरदार.

श्रीवरद. २७ सप्टंबर इ. स. १७८०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना, येथील कुशल तागाईत छ० २७ माहे रमजान मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असें. विशेष:– सरकारचें आज्ञापत्र छ० १७ जमादिलावलचें आलें, तें छ० १६ रजबीं पावलें. त्यास, सविस्तर वृत्त आज्ञेप्रमाणें व यथामतीनें समर्पक सुचलें तें पातशाहास व नजबखानास श्रुत केलें. बहुत संतोषी होऊन

बोलिले कीं, "आमचे मनोदयानरूपच श्रीमंतांचा इरादा आहे. परंतु तूर्त तताथबा करून इंग्रेज सुरतेस गेले, व सरदार उज्जनीस इंदुरास आले, व गोहदेकडील सरदार आपलाले ठिकाणीं गेले. आह्मीं आपली फौज पाठवावी, तर वर्षाकाल, नदी नाले चढले आहेत. या दिवसांत फौज व तोफखाना कैसा जातो? यास्तव वर्षाकालानंतर श्रीमंतांचे सरकारची फौज आल्यास, आह्मीही फौज रवाना करूं. तोंवर आमचा व सरदारांचा इमान प्रमाण करून देणें कीं पुढें अंतर न पडे. व इंग्रेजांसीं आह्मीं इकडे बिघाड केलियावर तुह्मांकडील आश्रा पक्का न राहिला तरी आह्मी एकले पडून त्यांचे काबूंत सांपडूं, तें न करावें." तेव्हां आह्मीं पुरती खातरजमा केली, व आपली कैसी खातरजमा होईल हें पुसिलें. त्यावरून बोलिले कीं, "त्यांचा आमचा कौल करार जाला ह्मणिजे खातरजमाच आहे." याप्रमाणें बोलणें जालें आहे. हल्लीं इंग्रेजांची मोहीम अपुरी सोडून सरदार उज्जनीस इंदुरास आले. यास्तव यांस वसवास होऊन, पातशाहाकडून कमर नामें खोजा व नजबखानानें आपलेकडील इलमास नामें खोजा, वजिरास नालकी, व इंग्रेजांस वस्त्रें जवाहीर व पत्रें, व असफदौलाचे मातुश्रीस व आजीस वस्त्रें देऊन अयोद्धेस रवाना केलें. ते समयीं आह्मीं पृच्छा केली कीं, हा शिष्टाचार करावयाचें कारण काय? तेव्हां बोलिले कीं, "वजिराची अब्रू वाढावी, आणि इंग्रेजांनीं वजिरास ग्रासिलें आहे, ते तूर्त आमचे खातरदास्त केवळ ग्रासून चुकणार नाहींत. तोंवर सरकारची फौज सरदार या प्रांतीं आलियावर त्यांचे आमचे विचारें जें करणें तें करूं. येविषयीं तुह्मीं आपलें चित्तांत संदेह न मानावा." याप्रमाणें आमची खातरजमा केली, व पूर्वीं पातशाहांनीं डेरेदाखल व्हावें व अंतरवेदींत उतरावें हें ठरलें होतें, याचें कारण हेंच कीं, सरदारांनीं इंग्रेजांस सुरतप्रांतीं सरकारचे फौजेनें घेरलें होतें या प्रतापावर हे बहुत उत्साहयुक्त होते. आतां सरदार, फौज घरोघर गेले, व एकदोन स्थळीं फौज इंग्रजांनीं मोडिली, व या प्रांतीं गोहदेकडील फौजेवर शह बसून पडला. सरदार वीस हजार फौज असतां आपसांत फुटून गेले. अंबाजी इंगळे यांनीं ग्वालेरसारखा किल्ला गमाविला; इंग्रेजांनीं घेतला. आपले फौजेचें बळ नाहींसें जाणून, हे साशंकित होऊन, बाहीर निघणें राहिलें. वर्षाकालानंतर सरदार मातबर फौजेनें आलियावर, त्यांचे आमचे सलाहानें उत्तम असेल तें करूं ह्मणतात. जें वर्तमान आह्मांस कळत नाहीं तें बातमी, पुणीयाहून कुंवरसेन नामें कोणी आहे, तो तेथून दिल्लीस नजबखानास वगैरे चहूंकडे बातमी लिहितो, व उज्जेनचीही बातमी कच्ची पक्की वरचेवर अनुपगीर गोसाव्याकडे येते, तो यांस श्रुत करितो. तें वर्तमान आह्मांस नजबखानांनीं सांगितलें. तेव्हां आमचे कर्ण शिथिल जाले! परस्परें पातशाहास व नजबखानास याप्रमाणें बातमी

येते. ते वेळेस हे ह्मणतात कीं, हे आपले सरकारच्या गोष्टी उजमाच्या सांगतात. परंतु तेथील लिहिणार लिहितात, ह्या गोष्टी सत्य आहेत. याप्रमाणें इकडील जालेलें वृत्त श्रवण व्हावें ह्मणून विनंति लिहिली असे. व शेवटीं आह्मीं यांसीं बोलिलों कीं, इंग्रेजांची जड कायम ठेविलीयास आमचे सरकारचें नुकसान नाहीं; परंतु पातशाहीस ठीक नाहीं. तेव्हां बोलिले कीं, "श्रीमंतही त्यांचे पारपत्यास सिद्ध आहेत, व आह्मांसही तेच आपले मकदुराप्रमाणें करणें प्राप्तच आहे. वर्षाकालानंतर श्रीकृपेनें सरकारचे फौजेसहित सरदार आलियास, त्यांचेच विचारें जें करणें तें करूं." याप्रमाणें यांसीं पक्कें केलें आहे. पुढें इंग्रेजांची यांची तुटातूट होऊन त्यांचे प्रांतावर मोहीम करीत तें करावयास सरदारांस सेवकानेंही लिहिलें, व पातशाहा नजबखानाकडूनही लिहिविलें व वचनीं गोविलें आहे.........यास्तव एक सरदार मातबर ये प्रांतीं पाठविणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक १५.

श्रीवरद. ७ आक्टोबर इ. स. १७८०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत चंद्र ८ सव्वाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लिहिला पाहिजे. विशेषः–इकडील सविस्तर वृत्त श्रीमंत स्वामींचे सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. हल्लीं आपलीं आज्ञापत्रें छ० १२ रमजानचीं आलीं, ते चंद्र ६ सव्वालीं पाहून सनाथ जालों. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयास अंतर करीत नाहीं. पसंतीलायख सरस तसबीर तलास करीत आहे. हातास आली ह्मणजे ते दिवशीं रवाना करूं. दिल्लींत न मिळे हें अपूर्व आपणांस वाटलें, तें न वाटावें. कां कीं, रोहिल्यांचे अंमलापासून वस्तीचे लोक तफरका जाले. यास्तव सेवकाचे शोधास शब्द न लावावा. स्वामींनीं संदेह न धरावा. अहिर्निश ध्यान ईश्वराप्रमाणें रक्षून मनोरंजनाचे शोधांत तत्पर आहे, व जमा केली आहे तें अपूर्व नाहींत. मार्गाचे दुस्तरतेमुळें व बेखर्चीस्तव आजवर सेवेसीं न पावली, व हेंच कारणें सेवकाचें येथें अटकणें जालें. खरीदीस्तव समयास रुपया नाहीं! अवस्था सेवेसीं लिहावयाची लज्जा वाटते! यास्तव विनंति, सेवकाचे नेमणुकीपैकीं रुपये दहा हजार हरएका साहुकाराकडून कर्ज घेऊन हुंडी करून पाठविणार धणी समर्थ आपण आहेत. बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांजपासून हरएक कावा दावा करून रुपये उगवून घेतल्यास सेवकाचा जीवनोपाय होईल, तें

करावें. इतकें खोलून लिहावयाचें कारण, पुढें इतराजी जाल्यास भूमंडळांत स्वामीशिवाय दुसरा आश्रय नाहीं. कृपा करणार व पालन करून सेवा घेणार स्वामी समर्थ आहेत. दर्शनलाभ होय तो सुदिन. दया केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १६.

पैवस्ती छ० १९ जिल्काद. **श्रीगणराज.** १० नोव्हेंबर इ. स. १७८०

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १२ जिल्काद स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असों. विशेषः—कृपा करून पत्र छ० १९ रमजानचें पाठविलें, तें पावोन परम संतोष जाला. पत्रीं आज्ञा कीं, "सरकारचा जाबसाल होणें यास्तव राजश्री पाटिलबावांचा निरोप घेऊन पुण्यास येणें, ह्मणोन पेशर्जी तुह्मांस लिहिलें होतें; परंतु त्याचें उत्तर न आलें. त्यास तुह्मी कोठें आहां? काय करतां? वर्तमान काय? तें सविस्तर लिहून पाठवावें." ह्मणून आज्ञा. त्यास, पुणियाहून स्वामींपासून आज्ञा घेऊन जांबगांवीं आलों. तेथून राजश्री पाटिलबावांची स्वारी गुजरात प्रांतीं जावयाची जाली, तें साकल्य विनंति लिहिलीं. त्याचीं उत्तरें आलीं. त्यांत आज्ञा येणियाविसीं जाली. त्याजवरून यावें. परंतु पांच वर्षें यांचे संग्रहीं राहिलों; यांनीं सरकारचे सनदेप्रमाणें दरमाहा व आपले तर्फेनें विशेष करून वरात संस्थान कोटें येथें करून दिधली. त्यास पांच वर्षें जालीं. पैशास ठिकाण नाहीं! पदरचे सुखी आह्मी कोणे प्रकारें व काय अवस्थेनें दिवस काढितों, हे अवस्था स्वामीचरणांसीं लोपली नाहीं. चार दिवस येथें काळहरणार्थ आलों, तों येथील नेमणूक दरमाहाचा दरमाहा द्यावासी केली. त्यास, पांच वर्षें समूळ ठिकाण नाहीं. तेव्हां येथें लोकांचें देणें पोटामुळें जालें. कुटुंबसहित येथें फसाव जाला. निघणें संकट! यास्तव, कोंडाईबारीपर्यंत समागमें आलों. वरातीची ताकीद होऊन कार्य होईल. नित्य विनंति केल्यास उत्तर हेंच कीं, 'देवितों.' ज्यांचें देणें तेही लष्करांतच. त्यांचा आग्रह वरातीस ठिकाण लाऊन आमचा निकाल पाडून जावें. तेव्हां निरुपाय होऊन बारी उतरणें प्राप्त जाली. वरातीचें उत्तर निस्तोष होत नाहीं. हेंही होईना. वरकड कोणी अनकूळ होऊन ममता धरून, हटकून कार्य करून निकाल पाडून घ्यावा व साहुकाराचें समाधान चार गोष्टी बोलून करावें, तर अनकूल होते ते देखील प्रतिकूळ जाले. त्याचें कारण जालें तें जांबगांवींहून साकल्य विनंति सेवेसीं लिहिलीच होती. निरुपाय होऊन गुजराथ प्रांत पाहून संपूर्ण मुलगिरी [?]

महर्गता, शरीरीं समाधान नाहीं हें सोसून, मधें सोबत पाहून कोणेही प्रकारें चरणापासीं यावेंसें योजिलें. परंतु निर्फळ होऊन उज्जेनपर्यंत येणें प्राप्त जालें. येथें येतां दीड दोन महिने शरीरीं पीडा प्राणांतिक जाली. स्वामींचे कृपेंकरून उलगडलों. संस्थान कोटें येथील कमाविसदार येथें आले. नित्य ताकिदीचें हटकितां, आज उद्यां करतां आजपर्यंत जाले. शेवट प्रतिकूल होतें तें अनुकूल करून घेण्यास, यांची मर्जी कार्य करून देण्याविषयीं आणण्यास, प्रयत्न करितां, सांप्रत जाबसाल सोईस येऊन, कमाविसदारास ताकीद मागील बाकी देण्याविषयीं व पुढें चालवण्याविषयीं जाली आहे. आतां कमाविसदाराकडून तजविजेनें साहुकारांसीं गांठ घालून, त्यांची खातरजमा करून यावें, हें बाकी आहे. त्यास उद्योगास लागलों आहों. स्वामीकडील शिफारस आणून कार्य करून घ्यावें, तर तोही प्रकार येथें उपयोगी पडणार नाहीं. हें जाणून सेवेसीं विनंति लिहिली. आपली हलाकी वारंवार वर्तमान लिहावी, तर मर्जी दिक होईल. वारंवार रड लिहितां. सेवकाचें लक्ष तों चरणापाशीं कीं, कोणेही प्रकारें उलगडून यावें. आमचें भयत्राता ईश्वरस्थानीं आपण. इहलोकीं संसार सर्व आज वीस वर्षें सेवकाचा स्वामीचरणांचे आधारावर. स्वामींनीं कृपा करून, शरीरसंरक्षण व अन्नसंरक्षण केलें, व करितात. दैवदशा बलवत्तर आहे. इतःपर मासपक्षांत सर्व कुटुंबसुद्धां देशास यावें. चिरंजीव आठा नवा वर्षांचा आहे. त्यास स्वामींचे शागिर्दीस ह्मणून हातीं द्यावें. चार कामें असतील त्यांचा मार्ग स्वामींचे मर्जीस येईल तैसा करतील. न जाल्यास श्रीइच्छा ह्मणून स्वामींची आज्ञा घेऊन, एकाकीं श्रीकाशीवास अथवा तीर्थाटन करून जन्म सफळ करावा हाच निजध्यास. येविषयीं विनंति समक्ष केलीच आहे. येणेंकडून माझा इहलोक परलोक यथास्थित स्वामीचरणांचे कृपेनें जालासा होईल. हा निजध्यास अहर्निशीं लागला आहे. येथील उलगडा पाडावा सांगतां. परंतु स्वामींचे कृपेनें सांप्रत कांहीं सोईस आला आहे. मासपक्षांत निकाल पाडून स्वार होऊन, यांची स्वारी जलदीनें आल्यास यांजसमागमेंच येतों. कदाचित् दिवसगतीखालीं असल्यास, विनंति लिहिल्याप्रमाणें येथील गुंता उरकून येतों. साकल्य चरणदर्शनांतीं निवेदन करीन. पत्रीं लिहितां विस्तार आहे. तीर्थस्वरूप राजश्री पुरुषोत्तमपंत नानाकडील पत्रें व मुजरद कासद आला, त्याची रवानगी उदईक सेवेसीं करितों. त्याजवरून साकल्य कळेल. त्यांचें संरक्षण व आमचें करणार स्वामी समर्थ आहेत. सत्वर येतों. येथें एक एक घटका युगवत् जाते. त्याचा विस्तार काय लिहूं? विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति.

वेदमूर्ति राजश्री गोविंद भटजी तात्या स्वामींस साष्टांग नमस्कार. विनंति लिखितार्थ परसोन कृपा करावी. येथून उलगडून निघावें व पत्राचें उत्तर पाठवावें

यास्तव उत्तरीं लिहिलें. परंतु ग्रहदशा बलवत्तर. आणखी मास पक्षाचा अवकाश पाहून उत्तर लिहिलें. अहर्निशीं निजध्यास हाच आहे. इतःपर सत्वर कोणेही प्रकारें येतों. कळावें लोभ कीजे, हे विनंति."

पो छ० ११ मोहरम इहिदे समानीन ह॥ कासीदजोडी.

लेखांक १७.

श्रीवरद.

२५ नोव्हेंबर इ. स. १७८०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २१ माहे जिल्काद मुक्काम दिल्ली जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेषः– पूर्वीं पै दर पै विनंतिपत्रें व आपलें नावें नवाब नजबखानाचा खलिता व नवाब निजामअल्लीखानास व राजश्री खंडोजी भोंसले यांस पातशाहांचे शुके फर्मान पाठविले, ते पावलेच असतील. उत्तरीं सनाथ करणार धणी समर्थ आहेत. हल्लीं इकडील वर्तमान तरी, स्वामींचे आज्ञेप्रमाणें नित्यानीं पातशाहास व नवाब नजबखानास इंग्रेजांवर निघावयास उत्तेजन देत आहोंत. पातशाही खेम्याची वगैरे तयारीची मात्र आज्ञा केली आहे. तयारी होते. आह्मांस आश्वासन देतात कीं बाहीर निघतों. परंतु अनुभवास येईल तें खरें. विना आपले सरकारची फौज मातबर सरदार आलियाखेरीज यांची खातरजमा हिंमत होत नाहीं, व इंग्रेजांनीं आपला वकील फयाजअल्लीखान पाठविला होता. त्यानें यांसीं चापकेसीच्या गोष्टी सांगून, नादीं लाऊन, आपलीं पलटणें सामील करून, पातशाहास भक्षावयास देऊन, पातशाहाची स्वारी बाहीर काढावी, या विचारावर आला होता. व ह्या गोष्टी नजबखानासीं व पातशाहासीं बोलणीं जालीं. हें वृत्त आह्मीं ऐकून पातशाहास व नवाब नजबखानास अर्ज केला कीं, श्रीमंत राजश्री पंतप्रधान व नवाब निजामअल्लीखान व हैदरनाईक हे सर्व एकत्र होऊन, तुमचे मर्जीप्रमाणें हैदर नाईक अर्काट चिनापट्टणाकडे मोहिमेस गेले आहेत. त्यांनीं इंग्रेजांचें पारपत्य केलें व पुढें आणीक करीत जातात. हें वर्तमान परस्परें आपणांस बातमी येतच आहे, व नवाब निजामअल्लीखानाकडील फौज, धौशा वगैरे, शिकाकोलाकडे गेलेच आहेत, व राजश्री खंडोजी भोंसले यांची श्रीजगन्नाथीं छावणी होती. या दिवसांत कलकत्त्याकडे लूट हंगामा केला आहे. कलकत्ता पळून पाहाडांत गेला. हें वर्तमान आपले सरकारांत परस्परें आलेंच आहे. व आमचे श्रीमंत स्वामींचे सरकारची फौज सुरतेकडे व वसईकडे सरदार विजयादशमीचे मुहूर्तें गेले आहेत.

आपण मात्र दिल्लींत बसून आमच्या समाधानाच्या कोरड्या गोष्टी सांगतां. याप्रमाणें कित्येक मजकूर, सरकारचे उपयोगी, यथामतीनें यांसीं बोलून, इंग्रेजांकडील वकील फैयाजअल्लीखान आला होता, त्यास तोंडीं न लावितां, त्याचे मतलबाची गोष्ट कांहींही कबूल न करितां, त्यास रुसकत करून देविलें. तो इंग्रेजांकडे गेला. अतःपर यांजला दिल्लीहून बाहीर इंग्रेजांचे प्रांताकडे काढावयाचे ताकिदींत लागलों आहों. परंतु आपली फौज कांहीं यांजपासीं आलियास बेधडक इंग्रेजांचे प्रांतांत जातीलसें बोलतात. निश्चयें इंग्रेजांसीं बिघाड करावयाचें इमानप्रमाण आह्मी मागतों, हें 'देतों' ह्मणतात. सेवकाचे हस्तगत जालियावर सविस्तर लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. राजश्री बाळाजी गोविंद याजकडील रुपये खर्चास त्वरेनें येथें पावेत तें करणार स्वामी समर्थ आहेत. लाईलाजीस्तव दरपत्रीं सेवेसीं विनंति लिहितों. रागास न यावें. ईश्वर स्वामींचा प्रताप अधिकोत्तर करो. कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० ११ मोहरम पौष

लेखांक १८.

इहिदे समानीन हस्तें कासीदजोडी. **श्रीवरद.** २७ नोव्हेंबर सन १७८०.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति उपरी. येथें लखनऊहून बातमी आली कीं, हैदरनाईकानें अर्काट मारून तेथें अमल केला, व चिनापट्टणास मोर्चे लाविले आहेत. त्यावरून कलकत्याहून एक कंपू अर्काटचे कुमकेस पाठविला. त्यास मशारनिल्हेंनीं अर्काटेंत अंमल केला. त्याजवरून कंपू इंग्रेज माघारा फिरून कलकत्यास आला, व तीनशें गोरा हैदरनाईकानें जिवंत धरून आणिला, व शेंकडो मारले गेले. हें वर्तमान येथें आलियावर पातशाहा व नवाब नजबखान बहुत खुश जाले, आणि हैदरनाईकाचा स्तव बहुत केला; व नाईकाचा, येथें व लखनऊंत वजिरापासीं लौकिक बहुत जाला. मोठें यश त्यानें संपादिलें, ह्मणून सर्वतोमुखीं जालें आहे. व राजश्री चिमणाजी भोंसले यांची फौज कलकत्याकडे गेली आहे. त्यांनींही तिकडे तमाम मुलूख जाळून ताराज केला. कलकत्ता पळून पाहाडांत गेला. शहर उजाड जालें आहे. त्यावरून इंग्रेजांनीं भोंसल्यांकडे आपला वकील पाठऊन, त्यांजकडील वकिलास बोलाऊन नेऊन, त्याचा शिष्टाचार फार केला, आणि बहुत सन्मान करून, वस्त्रें पात्रें हत्ती घोडा वगैरे देऊन, बहुत खुश वकिलास करून पैगाम केला आहे कीं, श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींसीं व आह्मांसीं सलूख करून द्यावा. ह्मणून भोंसल्यांकडे पैगाम केला आहे. भोंसल्यांचेही फौजेची

जरब इंग्रेजांवर बसली आहे. याप्रमाणें येथें वर्तमान, पातशाहापासीं व नजबखानापासीं लखनऊहून बातमी आली, ते लिहिली असे. मागाहून वृत्त येईल तें लिहूं. श्रीमंत स्वामींचे प्रतापें शत्रूचा नाश होईल व स्वामींस यश येऊन आश्रित जनांचें पालन होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ घडे ते सुघडी. हे विनंति."

पैवस्ती छ० ११ मोहरम पौष इहिदे **लेखांक १९.**

समानीन ह्या। कासीदजोडी. **श्रीवरद.** २७ नोव्हेंबर सन १७८०.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २९ माहे जिलकाद मुक्काम दिल्ली जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष:- इकडील वृत्त सविस्तर पूर्वीं श्रीमंत स्वामींस व आपणांस पत्रें पाठविलीं, त्यावरून श्रुत जालें असेल. हल्लीं सविस्तर वृत्त विनंतिपत्रावरून श्रुत होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. इंग्रेजाकडील फैज नामें सरदार सहा पलटणें घेऊन मुंबईचे कुमकेस ग्वालेरीहून गेला, तो हांडीयाचे वाटें नर्मदा उतरून बऱ्हाणपुरावरून जाणार. मार्गीं त्याचें पारिपत्य करावयास सरदारांसही लिहिलें आहे. होईल तें करतील. अमलांत येईल तें लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २२ मोहरम इहिदे **लेखांक २०.**

समानीन. **श्रीवरद.** १७ दिसेंबर सन १७८०.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे:- येथील कुशल तागाईत छ० २० माहे जिल्हेज मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेष:- इकडील वृत्त पै दर पै विनंतिपत्रें पाठविलीं, तीं पाऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, नवाब नजबखान यांनीं आपला भाचा मिर्जा सफीखान व जाबतेखान ऐसे विसा पंचविसा हजार स्वारप्याद्यांनिसीं शिखांवर रवाना केलें. ते कुंजपुरीयासमीप मुक्काम करून आहेत. तिकडून शिखांच्याही फौजा यांचे मुकाबिल्यास येत जातात. पुढें अमलांत येईल तें विनंतीं लिहूं, व लखनऊकडील बातमी पातशाहाकडे आली कीं, हैदरनाईकानें अर्काटचा किल्ला घेतला, व तिकडील मुलूख मारून ताराज करून आपलीं

ठाणीं बसविलीं. पुढें चिनापट्टणाकडे चाल केली आहे. इंग्रेजांचे बंदरांतून किमखाप व मुशजर व बनात व मखमल वगैरे कापड व मोतीं व खजाना बहुत व हत्ती शंभर व घोडीं व तोफा व बंदुका, जकीरा, दौलत बहुत हातास लागली. आणि पुढें अंमल करीत चालला आहे. हें वृत्त पातशाहा व नजबखान ऐकून बहुत खुश जाले. सर्वत्र तारीफ करितात. व भोंसल्यांकडील फौज कलकत्त्याकडे गेली आहे, त्यास इंग्रेजांनीं आपले वकील पाठवून, मागील देणें चवदा सालची बाकी राहिली आहे तिचा जाबसाल लाविला आहे, ह्मणून वृत्त आलें. व निजामअल्लीखान याजपासीं चिनापट्टणचे इंग्रेजांचे वकील हैदराबादेस आले आहेत; नवाब निजामअल्लीखान यांसीं सख्याचा जाबसाल लाविला आहे. व कलकत्त्यासही कागदींपत्रीं लिहिणें बोलणें घरोब्याचें व सख्यत्वाचें लागलें आहे. निजामअल्लीखान व इंग्रेज एक विचारें असावें. ह्मणून औरंगाबादेहून वर्तमान आलें, तें सेवेसीं श्रुत व्हावें ह्मणून लिहिलें असे, व येथील प्रकार ह्मणावा, तर पातशाहा व नजबखान दिल्लींत आहेत. आह्मांसीं करार केला होता कीं, बाद बरसात आह्मी बाहीर निघूं. त्यास ते गोष्ट अद्याप अमलांत येत नाहीं. ह्मणून आह्मी रोज तगादा करितों कीं, तुमचे सांगितल्याप्रमाणें सरकारांत विनंति लिहिली कीं, पातशाहा व नवाब नजबखान आपले विचाराप्रमाणें बाद बरसात बाहीर निघतील. त्यास आपण अद्यापि बाहीर निघत नाहींत. याजवरून श्रीमंतांस आपली कमहिंमत दिसेल. आमचें लिहिणें मिथ्या वाटेल. ह्मणून कितेकाप्रमाणें उत्तेजनाच्या गोष्टी बोलून जाबसाल करितों. हे आह्मांस आश्वासन मात्र देतात कीं, सत्वरच बाहीर निघतों. परंतु सरकारची फौज श्रीमंतांस लिहून सत्वर आणवणें. सरदार मातबर आले ह्मणिजे,—दक्षिणी फौज दहा वीस हजार, नामी सरदार कोणी आला,— ह्मणजे आमची सिद्धता आहे. ते फौज कजाखीस व आमची फौज सन्मुख झुंजास कामास येईल व पोक्त मसलत घडेल, ह्मणून बोलतात. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. व जयपूरप्रांतीं मूर्तजाखान व महमुदअल्लीखान दोन्ही सरदार मिळून स्वार प्यादा तीस पस्तीस हजार आहेत. तमाम मुलूख काबीज करून अंमल केला, व जयपूरकर मामलतही करितात. परंतु नजबखानाचें मानस कीं, पैकाही घ्यावा आणि मुलूख घेतला आहे तोही न सोडावा, याप्रमाणें आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. विलायती मेवा सेव दाणे पंधरा, एक पेटारी सेवेसीं पावेल. उत्तरीं कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञप्ति.”

पैवस्ती छ० २२ मोहरम इहिदे समानीन

लेखांक २१.

श्रीवरद.

११ दिसेंबर सन १७८०.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम तागाईत छ० २० जिल्हेज मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लिहावयास आज्ञा केली पाहिजे. विशेषः– इकडील वृत्त पूर्वीं सविस्तर वरचेवर सेवेसीं विनंति लिहिली, व नवाब निजामअलीखानास व खंडोजी भोंसले यांस पातशाही शुके इंग्रेजांचे पारपत्यास्तव व सरकारचे मनोदयानरूप वर्तावयास लिहून घेऊन सेवेसीं पाठविलें, ते पावल्याचें उत्तर न आलें व नजबखानास श्रीमंत स्वामींकडून पत्रें आलीं, त्यांत अलकाब हलका लिहितात, यास्तव विषम मानितात. तर निजामअली-खानास सरकारांतून वजिरास लिहितां, त्याप्रमाणें नजबखानास लिहावयास आज्ञा करावी, ह्मणून वारंवार विनंति लिहिली. परंतु पूर्ववतच त्यास खलित्यांत अलकाब लिहिला, व सेवकास उत्तरीं येविसीं काय मर्जी ते आज्ञा न लिहिली. तर कृपा करून सनाथ करावें. पूर्वीं आज्ञा आली, त्याप्रमाणें पातशाहास व नजबखानास उत्तेजन देत आहों. "वर्षाकाल गेला; शीतकाल आला. अतःपर विलंब न करतां, श्रीगंगापार फौजांसहित चालणें व प्रांत हस्तगत करणें. हा समय पुढें येणार नाहीं. हैदरनायकांनीं चिनापट्टणास मोर्चे लाविले. भोंसले यांनीं कलकत्ता घेरला. तुह्मीं कांहीं पराक्रम करणें." ह्मणून वरचेवर लाजवितों. त्याचें उत्तर नजबखान देतात कीं, "आह्मी सिद्ध आहों. पातशाहा चालत नाहीं. श्रीमंतांचे सरकारची फौज एक सरदार मातबर आल्यास यांची स्वारी इंग्रेजांवर काढूं. शपथपूर्वक इंग्रेजांचे पारपत्यास अंतर करणें नाहीं." ह्मणतात. पातशा-हास अंतस्थ विचारिलें. ते आज्ञा करितात कीं, "सरकारची फौज आली तरच आमची खातरजमा होईल. नजबखानाचे कबजांतून सोडवाल, तर तुमची पातशाही आहे. नित्यकृत्याचें घर बसल्या चालत नाहीं! स्वारीस निघाल्यावर, मोहिमेस लागल्यावर, तंगी खर्चाची जाल्यास, पराधीनता कार्याची नाहीं. तर स्वामींस लिहून, मातबर सरदार एक, अब्रूची गरज असेल व नक्ष करीलसा असेल, तो बोलावणें. निजामअलीखान इंग्रेजांकडे जाबसाल करितात व त्यांजकडे जोड करितात, हे गोष्ट कामाची नाहीं. सर्वां-नीं एकचित्त होऊन, शत्रूचें पारिपत्य करावें, येविषयीं परस्परेंही त्यांस ताकीद लिहिली आहे, कीं श्रीमंत पंतप्रधान स्वामींसीं जोड करणें." ह्मणून पातशाहांनीं आज्ञा केली. त्यास, निजामअलीखान उठावयाचें कारण

काय ते आज्ञा करावी. त्याप्रमाणें यांस श्रुत करूं. व यांचें वचनप्रमाण लिहून घेऊन सेवेसीं यांची इनायतसहित येऊं, व नजबखानास सरकारचें पत्र, अलकाब वाढवून लिहाल, त्यांत खातरजमा लिहावी व फौज पाठवावी कीं, ह्यांजकडे सूत्र न करीत. पातशाहाकडे बुभुक्षित व नजबखानाकडे कृतकृत्यता जाली आहे. या समयीं सरकारची फौज एकदिल सरदार पाठवाल, तर यांची फौज व सरदार आहेत ते सर्व, निरनिराळे सरकारचे ताबेदारींत राहतीलसें पक्कें करून ठेविलें आहे. श्रुत होय. निजामअल्लीखानाचे बंधू मोंगलअल्लीखान आजवर येथें होते. उपजीविका न चाले, यास्तव अबदालीकडे गेले. पूर्वीं सेवकानें विनंति लिहिली होती कीं, निजामअल्लीखानाचें सूत्र इंग्रेजांकडे लागलें आहे. त्यांसीं स्नेहाची पोख्तगी करावी. अंतस्थ होतें तें आतां प्रगट जालें. हैदरनायकाचे फौजेसीं झुंजास निजामअल्लीची फौज गेली. शिकाकोलाकडे गेली नाहीं. येथले ह्मणतात, यास्तव सेवेसीं लिहिलें. उत्तम असेल तें करून, उत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. या दिवसांत विलायती मेवा सेव आले. त्यांत सेव तीस सेवकाचे हातास आले, ते सेवेसीं पाठविले आहेत. त्यांत एक पेटारी श्रीमंत स्वामींस व एक स्वामींनीं घेऊन उत्तर पावलियाचें लिहावें. पुढें मेवा येईल तो सेवेसीं पाठऊं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. राजश्री बाळाजी गोविंद आज्ञेप्रमाणें खर्चास न पाठवीत, यामुळें येथें फसलों, व स्वामींचे मनोरंजनीं कृष्णजीची तसबीर फर्माश हातास न ये. बाळाजीपंत गंगाधरपंतास सरकारची आज्ञा निक्षून असतां सेवकास वोढाच लिहितात. त्यास ताकीद मानीतसें केलें पाहिजे. निराश्रित सेवक, स्वामींचें दर्शन घडे ते सुघडी. बहुत काय लिहूं, हे विनंति."

इ. स. १७८१.

पै॥ छ. २६ रविलाखर इहिदे समानीन ह॥ अजुरदार

लेखांक २२.

श्रीवरद. २२ मार्च इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पो पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता। छ० २६ माहे रविलावल मुक्काम दिल्ली जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः— आपण कृपा करून छ २७ जिल्कादचें पत्र पाठविलें, तें छ. ७ मोहरमीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, कितेक मजकूर अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिला आहे, त्यावरून कळेल; व केतकीचा अर्क व स्फटिकाची स्मरणी पावली, हें पेशजीं लिहिलेंच आहे ह्मणून आज्ञा लिहिली, ते शिरसा वंदिली. ऐसीयास, इकडील सविस्तर पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत होईल. व कासीद अजूरदार पत्रें देऊन हुजूर पाठवितों, त्यांस अजुरा मिळून पत्रांचे जाब सत्वर येत नाहींत, तर पत्रांचीं उत्तरें वरचेवर येत, तें करणार स्वामी समर्थ आहेत. इकडील वर्तमान तर पातशाहा व नवाब नजबखान दिल्लींत आहेत. येथून कलकत्त्यापावेतों इंग्रेजांचे तीन कंपू, त्यांपैकीं कलकत्त्यांत एक कंपू, व लखनऊस एक कंपू, व कानपुरीं एक कंपू होता. त्यांपैकीं पांच पलटणें फुलयेर नामें इंग्रेज घेऊन, ग्वालेर प्रांतीं सा पलटणें आहेत त्यांचे कुमकेस इटाव्यास येऊन पोंहचला आहे. अद्याप सामील जाला नाहीं. राजश्री महादजी शिंदे यांजकडील वर्तमान पातशाहाकडे आलें कीं, राणेखान वगैरे हिंदुस्थानी फौज रजवाड्यांची मिळून सिरोंजेस आले. तेथें इंग्रेजांकडील तीन पलटणें होतीं, त्यांसीं कांहीं झटपट होऊन, तें पलटणें माघारा नवी सराईस कालेबागापासीं आलीं. त्यांचे पाठोपाठ फौजा येऊन, तीन पलटणें सराईत घेरलीं आहेत. मागाहून पाटीलबावाही येऊन पोंहचले आहेत. भेलशाहून तोफखाना आणून, गोळ्याखालें पलटणें मारून ताराज करावीं, ह्मणून वर्तमान आलें आहे, व कलकत्त्याकडे भोंसले आहेत, त्यांजला कांहीं इंग्रेजांनीं मागील खंडणीपैकीं पैका देऊन, शांतवन करून ठेविलें आहे. कांहीं लढाईबिडाईचा प्रसंग नाहीं. ह्मणून बातमी यांजकडे आली. विशेष वर्तमान आलीयास विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन, हे विनंति."

पैवस्ति छ १९ जमादिलावल इहिदे समानीन.

लेखांक २३.

श्रीवरद. १५ एप्रील इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २० माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेषः– इकडील वर्तमान पै दर पै विनंतिपत्रें हजूर पाठविलीं, तें पावून वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा व नवाब नजबखान दिल्लींतच आहेत. यांजकडील फौजा व पलटणें, तोफखाना, अंबाल्याकडे शिखांवर मिर्जा सफीखान यांसमागमें गेले आहेत. तिकडून शीखही भारी जमावानिशीं मुकाबल्यास आले आहेत. नित्यांनीं गोळागोळीचें झुंज होतें. परंतु शिखांचा गलबा भारी जाणून, यांजपाशीं दिल्लींत फौज व पलटणें व तोफखाना आहे त्यांतून आणीक सरंजाम त्यांजकडे स्वार व पलटणें रवाना करितात. आह्मी नित्यांनीं इंग्रेजांचे प्रांतांत बाहेर निघण्याविषयीं तगादा करितों. त्यास उत्तर देतात कीं, "शिखांशीं झुंज लागलें; आतां त्यांसीं दबून सलूख करावा, तर सलतनतेची अब्रू रहात नाहीं. जर त्यांसीं सलूख न करावा, तरी तुह्मांसीं बोलत गेलों व श्रीमंतांस लिहीत गेलों, या गोष्टींत अप्रामाणिकता येते. या अर्थीं राहिली साहिली हजूरची फौज तेही शिखांवर पाठवून, सरहद्दपर्यंत मुलूख हस्तगत करून तिकडील खातरजमा जाली, ह्मणजे पातशाहासहित अंतरवेदींत उतरतों." ह्मणून धातुपोषणाच्या गोष्टी मात्र बोलून आमचें समाधान करितात; परंतु अमलांत येईल तेव्हां खरें. वरकड सविस्तर पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २४.

श्रीवरद. १९ मे इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पो पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल ता॥ छ० २४ माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेषः– इकडील वृत्त सविस्तर पूर्वीं विनंति लिहिली, त्याउपरी जाबतेखानांनीं अंतरवेदींत पातशाही ठाणीं घेतलीं. नजबखानाचे अनुमतें अंतर केलें. हें श्रवणांत येतांच, फरुखंदे बकश पातशाहाजादी सहित नवाब अबदूल अहदखान, छ० १८ माहे मजकुरीं आज्ञा घेऊन, अंतरवेदींत जाबतेखा-

नाचे पारपत्यास यमुनातीरास कूच केला. हें वृत्त श्रवण करून जाबतेखानांनीं मिन्नत करावयास वकील पाठविला आहे, व तिकडे प्रांतांत धूम करीत आहे. यास्तव आह्मांस आपलेकडे पातशाहांनीं बिदा केलें कीं, सत्वर स्वामीपासीं पावून, सरदारांची स्वारी ये प्रांतीं ये, तो अर्थ करावयास सेवेसीं विनंति करावी. दर्शनोत्तर सविस्तर श्रुत करूं. दर्शनलाभ होय तो सुदिन. सरकारची अजूर जोडीसमागमें पत्रें अबदुल अहदखानास पैदरपै दोन पावलीं. परस्परें पत्रें यावयाचें कारण काय ? स्वामींचे कृपेचा स्फुंद सदैव गात असतां, ह्मणून नवाब मजकुरांनीं आह्मांस शब्द लाविला; व पत्रोत्तर स्नेहबुद्धीनें श्रीमंतांस लिहून कासिदास इनाम देऊन सेवेसीं रवाना केलें. तें पावून वृत्त श्रुत होईल. सदैव पत्रामृतीं कृपा केली पाहिजे. निराश्रित सेवक स्वामींचे अंकित आहों, हे विनंति."

लेखांक २५.

श्रीवरद.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति छ० ५ साबानीं हुंडी पत्र संक्रमणाचे तीळ शर्करासहित पावले. सनाथ जालों. छ० १४ सफरचीं पत्रें सा महिनियांत कासीद येऊन पावला. जबानीं सांगतो कीं, इंग्रेजांकडे धरला गेला. कैदेंत होता. आपले घरीं राहिला किंवा कैद, हें ईश्वर जाणे. पुढें मर्जीप्रमाणें येथून उलगडा पाडून, सेवेसीं यावयाचे उद्योगांत लागलों. बाकी देणें पाहिलें. याविषयीं कमाविसदारास ताकीद निक्षून स्वामींनीं करून, नेमणुकीचे बाकीपैकीं रुपये आज्ञेप्रमाणें पावीत, तें करावें. व वसुली जमेचे गांव विसा हजारांचे लाऊन देणें, ह्मणून फडणिसी दप्तरची सनद पाठवावी कीं, बाळाजी गोविंद गांव वसुली जमेचे देतील तर पुढें सेवेसीं विनंति लिहिणें न पडे. तें करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक २६.

श्रीवरद. २४ मे इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपर येथील क्षेम तागाईत छ. २९ जमादिलावल मुक्काम लष्कर जाणून स्वानंद लिहावयास आज्ञा केली पाहिजे. विशेषः-हस्ताक्षर पत्रामृतीं ममतापूर्वक गौरविलें. ईश्वर स्वामींचे

मनोरथ पूर्ण करो. आज्ञेप्रमाणें तसबिरा जमा केल्या आहेत. या वर्षाकाळाकरितां पुढें सेवेसीं रवाना करूं. वरकड तोफा जिन्नस मिळेल तो घेऊन सेवेंत येतों. दर्शनलाभ घडेल तो सुदिन. अहर्निश आपण मनांत ध्यानांत दिसतां. भूमंडळांत दुसरा आश्रय नाहीं. दोन वर्षें जालीं, बाळाजी (व) गंगाधरपंत गोविंद गांव वसुली व बाकीचे ऐवजास्तव ताकीद निक्षून इच्छितात. त्यास बोध होय तें करणार स्वामी समर्थ आहेत. दूर पंथ; परराज्य; रांगडे दाबाचे स्नेही! सरकारची फौज इकडे आलीयावर एकचित्त राहून सरकारकाम करितील व सरदार एकदेटीं जाबसाल ठेवितील, तें केलें पाहिजे. नजबखान बक्षी यांनीं आपणांस पत्र लिहिलें आहे. त्यास मनन करून, उत्तरीं कृपा केली पाहिजे. वरकड वृत्त श्रीमंत स्वामींचे सेवेसीं विनंतिपत्र लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. विशेष चिरंजीव देवराव सेवेसीं लिहितील. आपले चरणापासीं कांहीं सोय करून दिधलियास सेवेंत समीप राहूं तें केलें पाहिजे. भेट होय ते सुघडी. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७.

श्रीवरद. इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति कीं, पातशाहाचें येथें छ ५ मीनहूस श्रीकाशीची बातमी आली कीं, "या दिवसांत इंग्रेजांचे विलायतींत फरासीसांसीं व वलंदेजांसीं एकोपा होऊन, इंग्रेजांचे पातशाहासीं बिघाड जाला. फरासीस गालब आहेत. इंग्रेजांनीं नवी दुनिया ह्मणून शंभर कोस आसपास ऐसा मुलूक समुद्राचे बेटांत वसविला होता, तो मुलूक फरासीसांनीं घेतला. तेव्हां इंग्रेजांचे पातशाहाकडून पांच प्यादे व कांहीं खजाना कुमकेस यावयाची उमेद नाहीं. आणि हैदरनाईकाकडील व भोंसल्यांकडील फौजा तों समीप येऊन बाज खाल्या, व आपलेपासीं फौजही नाहीं, व खजानाही नाहीं. या स्थळीं बसून राहावें, तों एकादे दिवसीं स्थळही दुष्मन घेतील आणि अब्रूही जाईल. याजकरितां तेथील कंपेश बंदोबस्त करून हिंदुस्थानांत जावें, कीं राजा चेतसिंग काशीचा व सुजाउद्दौलाची मातुश्री व स्त्री, व फैजुल्लाखान रोहिला यांचा झाडा घेऊन, खजाना जमा करून व पातशाहा काबूंत घेऊन दक्षणेस यावें. हैदरनाईकाचे प्रांतांत शिरावें. या विचारावर श्रीकाशीस येऊन, राजे चेतसिंग, बलवंतसिंगाचा पुत्र भेटीस गेले. यास गोष्टी मातेंत गोंवून कैद केलें. इंग्रेजांचे समागमें चार पलटणें व तीनशें गोरा, तीनशें तुरकस्वार येणेंप्रमाणें सरंजाम आहे. त्यास तीन प्रहर राजा कैदेंत होता. त्याचे

दिवाणांनीं व भाऊबंद मुदामी लोक होते यांनीं विचार केला कीं, हे फिरंगी कैद आहे, पैकाही घेतील आणि जिवेंही सोडणार नाहींत; या अर्थीं मरणें बरें. हा निश्चय करून, दोन हजार स्वार येकांडे रात्रीस तयार होऊन, इंग्रेजांचे गोटावर पडले. गोट मारून ताराज केला. पांच सातशें माणूस तेलंगा व फौजेचा बक्षी व दिवाण व मातबर दहा पांच गोरे याप्रमाणें इंग्रेजांचे लोक मारले गेले, आणि राजे चेतसिंगास कैदेंतून सोडवून सांभाळून घेऊन गेले. इष्टीन साहेब व त्याची स्त्री पलंगावरून पळून, लष्कर सोडून, बाहीर निघून गेली होती. ते दिवस निघाल्यावर लष्करांत आपले डेऱ्यास आली. याप्रमाणें राजाकडील लोकांनीं इंग्रेजांची फजीती केली. असफद्दौला यास फौजसुद्धां व रोहिल्यास फौजसुद्धां बोलाविलें आहे. वजीर तीन कोस लखनऊहून बाहीर डेरे देऊन आहे. राजाचें वृत्त ऐकिल्यावर यासही धीर पुढें जावयास पुरत नाहीं, व रोहिलाही आपले ठिकाणीं फौज जमा करितो. याप्रमाणें चहूंकडे गव्हारगर्दी जाली आहे.'' ....त्याचा विस्तार आलाहिदा पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २८.

श्रीवरद. ३१ मे. इ. स. १७८१.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, पातशाहा व नवाब नजबखान दिल्लींत आहेत. यांजकडील सरदार मिर्जा सफीखान यांस कुंजपुऱ्याकडे पाठविलें होतें. त्यांनीं गजपतसिंग जाटाचा मामला सा लक्षांचा करून, त्यांपैकीं तीन लक्ष रुपये वसूल घेऊन, त्याचे पुत्रास वोलीस ठेऊन, त्यास वस्त्रें देऊन मार्गस्त केलें. तीन लक्ष रुपये राहिले, तेही किस्तीप्रमाणें येतील. व कलकत्त्याकडील बातमी आली कीं, मिस्तर इष्टीन यास कांहीं भ्रम होऊन वेडा जाला आहे, व तेथें मरी आली आहे. नित्यांनीं माणसें बहुत मृत्य पावतात. याप्रमाणें लखनऊहून वर्तमान आलें कीं, इंग्रेजांनीं वजीरास सांगितलें कीं, आमच्यानें तुमचा मुलूक राखवत नाहीं. तुह्मीं आपली फौज ठेवून मुलकाचें संरक्षण करणें. त्यांनीं उत्तर दिल्हें कीं, आमची फौज होती ते तुह्मीं खराब केली. आतां आह्मीं नवी फौज ठेवावी, तर आह्मांपासीं पैका नाहीं! याप्रमाणें उत्तर देऊन स्वार होऊन शिकारीस गेले; व कारभारी यास आज्ञा केली कीं, फौज मिळेल ते ठेवणें. याप्रमाणें वजीराकडील वृत्त आलें,

तें श्रुत व्हावयास लिहिलें असे. इंग्रेजांकडील जहाज,–कलकत्त्यास इष्टीनचे बदलीचा सरदार येत होता तें जहाज, आंग्रे यांनीं मारिलें, बुडविलें. हें वृत्त कलकत्तेकराचें श्रवण करून संतोषी जाले. पुढें येईल तें विनंति लिहूं. दर्शनलाभ होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ १६ रजब इसन्ने समानीन. ह॥ सरकारची जोडी.

लेखांक २९.

श्रीवरद.

२१ मे इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:––

विनंति सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशलतागायत छ ५ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः–कृपा करून छ १५ रविलावलचें पत्र पाठविलें, तें छ ५ माहे जमादिलावलीं सरकारचे कासिदासमागमें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "तुह्मी पातशाहांसीं व नबाब नजबखानांसीं बोलून इंग्रेजांचे तंबीचा अहदपैमान घेऊन पाठविणें. वरकड सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन यांस लिहिलें आहे, त्यावरून कळेल" ह्मणून आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें यांजपासून अहदपैमान सरकारचे नांवें लिहून घेतला आहे. त्याप्रमाणें राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें मागतों. पाटीलबावा यांणीं ग्वालेरप्रांताची इंग्रेजांची लढाई मारिली ह्मणजे यांजवर दाब बसून, पूर्वीं कौलनामा लिहून दिधला आहे त्याप्रमाणेंच वर्तणूक करितील, व सरकारचे सरदाराचे सामील होतील. वरकड सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन यांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होईल. सदैव कृपा करून हस्ताक्षरपत्रामृतीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. दर्शनलाभ होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक ३०.

श्रीवरद.

२१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति पत्रीं आज्ञा कीं, "सरदार तिकडे पाठवावयाचा निश्चय जाला; इंग्रेजांसीं सलूख होणेंच नाहीं; सर्व त्यांचे तंबीवर; ऐसें असतां इकडून सलूख कैसा घडेल ? येविषयींचीं खातरजमेचीं पत्रें पेशजीं तुह्मांकडे पाठविलीं, व राजश्री महादजी शिंदे यांनीं लिहिलें, त्यावरून तुह्मी पातशाहाची व नबाब नजबखानाची

खातरजमा करून खेमेदाखल करविलेच असेल. शीख वगैरे सर्वांची खातरतसली होऊन जमाव जालाच असेल. कदाचित् नसलियास सरदार फौजेसह येण्याविषयीं व इंग्रेजांसीं सलूख न करण्याविशीं पक्की खातरजमा करून, लौकर खेमेदाखल होऊन, तंबीचे मसलतीस नमूद होत, तें करवावें. पातशाहा व नवाब नजबखान यांचे अहदपैमान व नानकुरान इंग्रेजांचे तंबीचे मसलतीविषयीं घेऊन पाठवावे. त्या बमोजीब इकडूनही पाठविण्यांत येतील. सारांश, बरसात जाली, आतां दिवसगत लागों नये." ह्मणून लिहिलें. त्यास आज्ञेप्रमाणें पातशाहांस व नजबखानास पत्रें दाखविलीं. त्यांनीं वाचून बोलिले कीं, "आमची फौज शिखांकडे अटकली आहे. हे श्रीकृपेनें थोडक्याच दिवसांत शिखांचे मसलतीचा समारोप करून सत्वरच स्वारीस निघतों, व इमान पूर्वीं लिहून दिधलें आहे, त्यांत अंतर नाहीं." ह्मणून बोलिले. आह्मीं तक्रार इंग्रेजांसीं बिघाडाची केली. तेव्हां बोलिले कीं, "आह्मांस इंग्रेजांसीं एकोपा राखणें असता, तर श्रीमंतांस व निजामअल्लीखानांस व भोंसल्यांस श्रीमंतांचे अनुमतें इंग्रेजांचे पारपत्यास लागणें ह्मणून पत्रें कशास लिहितों ? व श्रीमंतांस व आपणांस वरचेवर इकडे फौज, सरदार मातबर पाठवावयास किंनिमित्य लिहितों ?" याप्रमाणें बोलिल्यावर आह्मीं अर्ज केला कीं, "श्रीमंतांस कौल इमान दिधला, त्यांत इंग्रेजांचा मजकूर नाहीं." तेव्हां बोलिले, "शत्रु तुमचा तो आमचा, लिहून शपथ लिहिली आहे; त्यांत अंतर नाहीं." ह्मणोन निश्चय करून बोलिल्यावर, आह्मीं ह्मटलें कीं, "ज्याप्रमाणें श्रीमंतांस लिहून दिधलें आहे, त्याप्रमाणेंच लिहावें. परंतु, इंग्रेजांचे पारपत्याचें लिहून राजश्री महादजी शिंदे यांचेच नांवें इमानप्रमाण लिहून देणें." त्यावरून इमानप्रमाण लिहून देतों ह्मणून करार केला आहे. पुढें अंमलांत येईल तें लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"विनंति कीं, महबूब अल्लीखान नामें खोजे यांजला जैपूरप्रांतीं नजबखानांनीं पाठविलें. प्रांत हस्तगत केल्यावर यांची सरदारी मोडून, अनुपगीर गोसावी यांस ते प्रांतीं पाठविलें. यास्तव ते अर्जुदा होऊन मक्कयास गेले. पांच सात लाख रुपये आपले पदरचे खर्चून फौज जमा केली. प्रांत हस्तगत केलेला गेला ! पुढें यांजपासून नाउमेद होऊन ते प्रांतीं आले आहेत. नजबखानांनीं बहुत मिन्नत केली, परंतु न मानिलें. येथून चालते समयीं स्वामींस विनंति लिहाव-

यास सांगून पत्रें दिधलीं, ते पाठवलीं आहेत. मर्जीस आल्यास उत्तरीं सनाथ करावें. व वजिराकडील प्रांतास वाकीफगार व शिपाई व सरदारीचा ठसा त्यांचा कडेकुरे प्रांतीं चांगलाच आहे. यास्तव ममतेंत घेऊन स्वामींचे कृपेचे उमेद्वार केलें, व त्यांसीं करार केला आहे कीं, मक्कयाहून स्वामींपासीं जाणें. तुमचे योग्यतेप्रमाणें मातबर सरदार तुह्मांस पुढें पाठवून घेऊन जातील, व कांहीं फौजेची सरदारी देऊन अंतरवेदीचे अथवा हरएक जुंजाचे कामास तुह्मांस पुढें करितील. याप्रमाणें बोलून रवाना केलें. ते कदाचित् आपलेपासीं आले, तर ममतापूर्वक आदरसत्कार करून संग्रहीं ठेवावे. या प्रांतीं त्यांचे सलुकानें शत्रूचे मातबर फुटून सरकारचे अंकित होतील. पत्रोत्तरें पाठवावीं. त्यांचे बंधू येथें आहेत, ते त्यांचेपासीं पावतीं करितील; ह्मणजे खातरजमेनें सेवेसीं येतील. श्रुत होय. या दिवसांत यशवंतराव वाबळे यांनीं जैपूर प्रांतीं येऊन, प्रांतांत दंगा केला. तेव्हां महाराजे जैपूरकरांनीं फौज पाठवून जुंजांत धरून घेतलें. त्यांचा पुत्र ठार जाला. दोन तीनशें घोडीं लूट राजे यांचे घरीं पावलीं. अंबरचे किल्ल्यांत राजे खुशमूराम कैद आहे, तेथेंच त्यांसही ठेविलें आहे. छ २ साबानीं, कुंवरसेन नामें खतरी पूर्वींपासून पुण्यांत आहे, त्याचीं पत्रें नजबखान वगैरेस आलीं, तें बजिन्नस धरून पाठविलीं आहेत. तेथें रहात असतां इंग्रेजांची वरिष्ठता लिहितो ! याकरितां पूर्वींही पत्रें धरून घेऊन सेवेसीं पाठविलीं व हल्लींही पाठविलीं आहेत. नजबखानास अर्जी लिहिली आहे, त्यावरून वृत्त व्यंग लिहिलें तें श्रुत होईल. वरकडांचीं पत्रें आहेत, त्याचा विस्तार त्यांचेच पत्रांवरून विदित होईल. गरीब पोटार्थी आहे, यास्तव हरकोठें पांच सात रुपये दरमहा करून तेथून दूर ठेवावें. तेथें राहिल्यास स्वामींचें राज्य श्रीमहादेवाचें आहे. उणें अधिक लोपत नाहीं. गुप्त गोष्टही प्रगट होतें. यास्तव लिहिलें असें. श्रुत होय. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. छ १२ साबानीं वर्तमान आलें कीं, राजश्री महादजी शिंदे यांनीं इंग्रेजांची फौज मारून ताराज केली. हजार बाराशें माणूस राहिले, ते दो ठिकाणीं कोंडिले आहेत. वरकड गोहदकर व भदावरकर वगैरे त्यांचे लोक गस्त करून गेले, तेव्हां सेवेस पावलेंच असेल. ईश्वर स्वामींचा प्रताप अधिकोत्तर करो. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.''

लेखांक ३२.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ५ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लिहिला पाहिजे. विशेषः– छ० १५ रविलावलचीं पत्रें सरकारचे जोडीसमागमें पाठविलीं, ते छ ५ माहे मजकुरीं पावलीं. त्यास इकडील वर्तमान पै दर पै विनंतिपत्रें हजूर पाठविलीं, ते पावून वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरीः– पातशाहा व नवाब नजबखान दिल्लींतच आहेत, व राजश्री महादजी शिंदे सिप्रीकोलारास. इंग्रेजांचीं सा पलटणें ग्वाल्हेरीचे व सिप्रीचे दरम्यान मुक्काम करून आहेत. इंग्रेजांचे व यांचे लष्करांत महागाई आहे. पाटीलबावांपाशीं इकडील रांगडी व देशची फौज भारी आहे. पुढें होईल ते विनंति लिहूं. वरकड वृत्त पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. नवाब नजबखान यांनीं स्वामींस पत्र लिहिलें आहे, व पातशाहाचा शुका सेवेसीं पाठविला आहे. त्यावरून वृत्त कळेल. उत्तरीं कृपा करून लिहावयास आज्ञा करावी कीं, लिहिलेप्रमाणें सत्वर अमलांत आणावें. ह्मणजे लिहिल्याचें व सेवकाकडून वारंवार फौजेचा बोज लिहिविल्याचें सार्थक होईल. विशेष मर्जीस येईल तें लिहावें. सेवाश्रम केलीयाचें सार्थक होईल, तो ईश्वरकृपेनें सुदिन. विलायती अनारें या दिवसांत तेथवर गर्मीमुळें न पावतील. यास्तव रस काढून रुह करून पाठविला असे. हे विनंति."

लेखांक ३३.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंतिपत्रीं आज्ञा कीं, 'नवाब नजबखान यांचें जाणें शिंद्याकडे न होय, तर कोणी उमदा सरदार त्याजबरोबर फौज पोख्त सामान देऊन जरूर रवाना करावा, ह्मणिजे शिंदे व तिकडील फौज मिळोन दुहेरी शहानें इंग्रेजी पलटणें शिकस्त होतील.' ह्मणून लिहिलें. त्यास, याअन्वयें लिहिल्याप्रमाणेंच बोलून, महमदबेग हमदानी ढवळपुरीं आहे त्यास पत्र, व अनुपगीर गोसावी जैपुरीं नजबखानाकडून मामल्याचे ऐवजास वसूल करावयास गेला आहे त्यास पत्रें, नजबखानाचीं कीं, तुह्मीं आपले फौजेनसीं सरंजामसुद्धां जाऊन राजश्री पाटीलबावांस सामील होणें; व पाटीलबावांचे नांवें पत्र कीं, तूर्त दोन्हीं पथकें तुह्मांकडे रवाना केलींच आहेत;


ते येऊन सामील होतील. बादबरसात शिखांकडील फौज रिकामी जाली, ह्मणजे आह्मीही पातशाहासहित बाहिर निघतों. याप्रमाणें तीन पत्रें तयार केलीं. इतक्यांत कलकत्त्याहून हाल साहेब इंग्रेज आला होता; त्याजकरितां तीं पत्रें आह्मांपासीं न देतां आपले पासींच ठेवून घेतलीं. आतां तो गेलीयावर फिरून हटकिलें. त्यावरून पुन्हां पत्रें द्यावींसें ठराविलें आहे. पत्रें हातास आलीयावर पाटीलबावांकडे रवाना करितों. परंतु हे इंग्रेजांस भितात. फार खुलून खेळत नाहींत. पुढें अमलांत येईल, तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. भेट होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ३४.

श्रीवरद. २१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंतिः– पत्रीं आज्ञा कीं, 'हैदरअल्लीखान बहादूर यांजकडील मजकूर पेशजीं लिहिण्यांत आलाच आहे. इंग्रेजांस जक त्यांनीं फार दिल्ही. हुल्लीगुलूर देवणापट्टण ह्मणोन बंदरकिनारा जागा अडचणीची आहे, तेथें जमीयत सुद्धां कर्नेल कोट आहे. हैदरखान यांनीं सभोंवता महासरा दिला आहे. बंदी केली. फरारीसही सरंजाम पोख्त जलद येणार. फरासीसांचें राजकारण खानाशीं पक्कें जालें आहे. सरकारांतही फरासीसांचा सिलसिला अव्वलीपासून आहे. याप्रमाणें तिकडील वर्तमान आहे. तुह्मीं हजुरांत अर्ज करावा व नजबखान यांसही सांगावें. त्यांचेंही परभारें अकबारेवरून वर्तमान येतच असेल.' ह्मणून लिहिलें. त्यास आज्ञेप्रमाणें पातशाहांस व नजबखानास हें वृत्त श्रवण केलें. ऐकून बोलिले कीं, 'या दिवसांत हैदरअल्लीखान यांजपाशीं फौजेचा व पैक्याचा सरंजाम पोख्त आहे; त्यावरून सर्व गोष्टी अमलांत येतात.' आह्मी बोलिलों कीं, 'सर्व गोष्टी मेहेनतीच्या व जुरतीच्या आहेत. पूर्वीपासून जो कोणी जुरत मेहेनत करीत आला आहे, त्यास मुलुखास व खजान्यास व फौजेस कमी नाहीं.' ह्मणून बोलिलों. त्याचें उत्तर हेंच केलें कीं, 'सत्य आहे.' याप्रमाणें हरएक समयीं उत्तेजन देतों. आतां बादबरसात पातशाहासुद्धां बाहेर निघतों, ह्मणून आह्मांसीं करार करितात, व तोफखाना वगैरे सरंजामही तयार करितात, व कुंजपुरीयाकडील फौजही रिकामी करावयाची तर्तूद केली आहे. परंतु अमलांत येऊन सरकारचे मसलतीस उपयोगीं पडत, याच्या विचारांत रात्रंदिवस आहोंत. अनुभवास येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होईल तो सुदिन. हे विनंति."



दिल्ली येथील दिवान-इ-खास.

लेखांक ३५.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'इंग्रेजांसीं बिघाड करून मसलत करणें, तेव्हां शिखांशीं बिघाड करावयाचा नव्हता. जाला ! असो. हल्लीं दरवजेनें शिखांस शामील करून घ्यावें, हे मसलत फार चांगली. जरूर लिहिल्याप्रमाणें अमलांत यावें. इंग्रेजांचें पारिपत्य केल्याखेरीज पातशाहींत कोणास चैन पडणार नाहीं, हें पुर्तें समजावें. याप्रमाणें बोलावें.' ह्मणून लिहिलें. त्यास, आपले आज्ञेप्रमाणें यांसीं भाषणें केलीं व खचित केलें. यांनींही पूर्वीं गजपतसिंग जाट यास, मिर्जा सफीखान याची फौज कुंजपुरीयाकडे आहे, तेथें धरून कैद केलें होतें. याचा तपशील पूर्वींच विनंतिपत्रें पाठविलीं होतीं. त्यास, हल्लीं नजबखान यांनीं गजपतसिंगास दिल्लीस बोलावून आणून, साहा लक्षांचा मामला फडशा करून घेऊन, त्यांस वस्त्रें व शिरपेंच व झालरदार पालखी याप्रमाणें बहुत सन्मान करून, पुत्रास व कारभारी यांस व भावाबंदांस यथायोग्य वस्त्रें देऊन बोलण्यांत आणिलें कीं, शिखांचा मुलुख आहे, तो शिखांकडे असावा. आणि त्यांनीं व तुह्मीं आपले फौजेनिशीं आमचे शामील असावें. ह्मणून पक्केपणें बोलून, त्यास छ० १५ रजबीं रुकसत करून कुंजपुरीयाकडे मार्गस्थ केलें, व यापूर्वीं जाबतेखानासही छ० ५ माहे मजकुरीं याच कार्यानिमित्त रुकसत केलें, ते गोसगडास गेले आहेत. त्यास जाबतेखान व गजपतसिंग एकत्र होऊन, शिखांसीं सलूख करून, तिकडील फौज मिर्जा सफीखान सुद्धां रिकामी करून, अंतर्वेदींत मेरट प्रांतीं छावणी करावी, हा विचार ठरविला आहे; व तोफखान्याचीही तयारी आहे. वादबरसात पातशाहासुद्धां बाहीर निघतो, ह्मणून आह्मांसीं बोलतात. परंतु काबूची रंग पाहून आहेत. अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होईल तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ३६.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें इमानप्रमाण लिहून देतों, ह्मणून नजबखान बोलिले. त्यास त्यांसीं दोन चार वेळां बोलून, बोलल्याप्रमाणें पत्रें लेहून घेऊन सत्वर पाठवावीं. यास आलस करूं नये.

व सरकारांतही पाठवावीं, ह्मणजे मसलतीस पक्कें जालेंसें होईल.' ह्मणून लिहिलें. त्यास सिपरीकोलारस येथें लढाईस दिसगत लागली. हा रंग पाहून, यांनीं प्रथम राजश्री महादजीबावा यांचें नांवें कौलकरार लिहून देणें करार केलें होतें. चाल ढाल करून, त्याजकडून कौलकरार लिहून आणवा, ह्मणून मसोदा करून आह्मांपासीं दिधला. त्याची नक्कल पेशजीं हजूर पाठविलीच आहे. त्याप्रमाणेंच त्यांत कांहीं तपसील उणा करून हल्लींही दुसरा मसोदा करून दिल्हा. त्याचीही नक्कल राजश्री महादजी शिंदे यांजकडे पाठविली व साहेबांकडेही पाठविली आहे. त्यावरून कळं येईल. त्यास हा मसोदा पाहून, आह्मीं यांसी स्वच्छ उत्तर दिधलें कीं, 'आपण मसोदा करून दिधला आहे, यांत 'सब खेती हमारी' याप्रमाणें लिहिलें आहे. तेव्हां आमचे फौजेनें काय खाऊन बंगाल्यापावेतों पातशाहासांगातें चाकरी करावी ? प्रथम तुह्मीं श्रीमंतांचें नांवें कौलकरार करून लिहून दिधला आहे, त्याप्रमाणेंच राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें लिहून द्यावा व त्यांजकडूनही त्याप्रमाणेंच लिहून येईल, आणि आतां आपण याप्रमाणें इच्छितां, तेव्हां श्रीमंत तुह्मांस काबूची ह्मणतील.' याप्रमाणें बोलून कायल केलें, आणि आह्मी कौलनाम्याची याद त्यांजकडे पाठवीत नाहीं ह्मणून बोलून, प्रथम कौल केला आहे त्याजवरच कायम रहावें. त्याप्रमाणेंही अंमलांत आल्यास तुह्मांस फार नफे आहेत. कसें ह्मणाल तर साडे बावीस सुबे पातशाहीचे, त्यांत निमेनिम तुमचे हातास आल्यास फारच नफा आहे. हे वृथा दिक्कत काढून, आपण क्षणभंगुर श्रीमंतांपासीं व्हाल तें न करावें. याप्रमाणें कितीक यथामतीनें बोलून, मेळवून घेऊन ठेविलें आहे. हे रंग पाहतात. पाटीलबावांनीं ग्वालेरीपासीं लढाई मारून पुढें अंतरवेदींत इटाव्यास आले, ह्मणजे हे पातशाहासहित सामीलही होतील, आणि पूर्वींप्रमाणें कौलनामाही लिहून देतील. पुढें अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.''

लेखांक ३७.

श्रीवरद. २१ मे इ. स. १७८१.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'इंग्रेजांचा सहवास नजबखानास बहुत. पातशाहींत त्यांचा कदम न शिरावा हें आहेच. श्रीमंत राव पंतप्रधान हजूरचे फिदवी, यांची फत्ते असावी हें रात्रंदिवस चित्तांत आहेच, यांत संशय नाहीं. टोपीकरांचे

वकिलास रुकसत दिली, हें फार नेकसलाह केली. तुह्मीं लिहिल्यावरून व मूळची हजूरची इनायत याजवरून इकडील खातरजमा आहेच. सरकारचे सरदार आजपावेतों येऊन पोंचले असते; गुंता नव्हता. परंतु दरमियान इंग्रेजी पलटणें आलीं; तो शह पडला. ह्मणून दिक्कत पडलियाची तरतूद अलाहिदा लिहिली. त्याप्रमाणें अमलांत यावें ह्मणजे सर्व गोष्टी उभयपक्षीं खातरखा होऊन, योजिली मसलत सिद्ध जाली, ऐसें आहे. गाडर कोंकणांतून घाट चढून आला होता. त्यास सरकारचे सरदारांनीं शिकस्त दिल्ही. त्याचा तपशील अलाहिदा लिहिला आहे, त्यावरून कळेल.' ह्मणून लिहिलें. त्यास, आज्ञेप्रमाणें हा मजकूर सविस्तर नजबखानांस समजावून, प्रसंग पाहून संतोषातें पाविलें. तेव्हां बहुत ममतेनें पूर्वीं वचनें दिधलीं आहेत, ते दुहराऊन बोलून, त्यांनीं उत्तर दिधलें कीं, 'श्रीकृपेनें बादबरसात काय घडून येतें तें प्रत्ययास येईल. इंग्रेजांची व आमची बरोबरीची लढाई आहे. त्यास आमचा तोफखाना व पलटणें सन्मुख व तुह्मांकडील फौज करोलीस उपराळ्यास असलिया, सा महिनीयांचें काम आठा दिवसांत फडशा करूं. इंग्रेज काय वस्तु आहेत?' याप्रमाणें बोलून आपल्यास व श्रीमंत स्वामींस खलितापत्रें दिधलीं आहेत. त्यावरून ध्यानारूढ होईल. पुढें अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."


लेखांक ३८.

श्रीवरद. ता. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'गाडर वसईहून मगरुरीनें दाहाबारा पलटणें कवायती, हजार गोरा, वीस पस्तीस तोफा या सरंजामानिसीं घाट चढून वर आला. त्याचे मुकाबिल्यास राजश्री हरीपंत, व तुकोजी होळकर, व परशरामपंत वगैरे फौज व सरंजामानिसीं होते. त्यास इंग्रेजांस मैदानांत काढून सजा करावी, ही तजवीज होती. परंतु सरकारी फौजेनें लढाईच्या मुकाबिल्यामुळें मैदानांत यावयाची जुरत न करितां, घाटमाथा अडचणीची जागा पाहून राहिला. तेव्हां राजश्री परशरामपंत यांस फौजसुद्धां घाटाखाले इंग्रेजांची रसद बंद करून माहासरा द्यावा याकरितां पाठविलें. त्यास, परशरामपंत यांणीं इंग्रेजी रसद येत होती त्यास माहासिरा करून, सात आठ हजार बैल गल्ल्याचे कुल लुटून आणिले, व कित्तेक इंग्रेजी लोक यांस तंबी करून गारत केलें. याजउपरी पनवेलीहून पांच सहा

पलटणें, आठ दहा तोफा ऐसे सरंजामसुद्धां, घाटरूखें गाडर यांचे कुमकेस येतात ही बातमी सरकारची आली. त्यावरून राजश्री हरीपंत यांस बमय हुजुरात फौज, तोफा, व गाडदी घाटावर गाडराचे मुकाबिल्यास ठेवून, तुकोजी होळकर यांस बमय फौज सरंजाम घाटाखाले पाठविलें. त्यास, तुकोजी होळकर, व परशरामपंत यांनीं पनवेलीहून पलटणें येत होतीं, त्यांस माहासिरा देऊन लढाई दिल्ही. होळकर यांनीं सुतरनालाची व करोलाची मार बरी दिली, व लढाई चांगली जाहाली. इंग्रेजांकडील कवायती लोक व गोरे पांच सहाशें ठार, शिवाय जखमी जाहाले. सरकारचे लोकही फार कामास आले. शेवटीं पलटणें झाडीचा आश्रय करून, बहुत मुष्किलीनें गाडर याजपासीं जाऊन पोंहचलीं. त्या दोहों दिवसांत हरीपंत यांनींही घाटावरून निकड करून गाडरासीं मुकाबिला केला. दुतर्फा लढाईची निकड बहुत जाली. रसद बिलकूल पोंहचेना. तेव्हां बेताब होऊन, छ २३ रविलाखरीं रात्रौ घाट उतरून पळोन गेला. त्याचे ताकुबावर हरीपंत फौजसुद्धां घाटाखाले गेले. एकीकडून हरीपंत, व एकीकडून होळकर व परशरामपंत, याप्रमाणें इंग्रेजांस दुतर्फा घेरून, दोन तीन लढाया निकडीच्या जाहाल्या. तोफा व बाणांची मारगिरी जाली. लोकांनींही घोडे घालून लगट फार केली. याजमुळें इंग्रेज बहुत घाबरा जाहाला. एक तोफ, व बंदुखा, व दारू गोळ्याचे संदूक व छकडे व रथ वगैरे सरंजाम बेसुमार पाडाव आला. मिस्तर पारकल नामें, गाडर याचे बरोबरीचा सरदार, लढाई व तरदूदकार होता, तो गोळीची जखम लागून जाया जाला. गोरे व कवायती लोक मिळून सात आठशें पडले. शिवाय जखमीही बहुताद आहेत. सरकारचींही घोडीं व लोक बहुत कामास आले. शेवटीं गाडर जान बचावून पळाला. थोडका सबब पनवेली दऱ्याचे असरीयास जाऊन पोंहचला. सरकारच्या फौजाही पनवेलीजवळ मुक्काम करून आहेत. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. बादशाहा व नवाब नजबखान यांसही कळवावें. इंग्रेजांची शिकस्त श्रीमंतांचे प्रतापेंकरून मोठी जाली, व त्यांचा नाशही फार जाला.' ह्मणून लिहिलें. त्यास, आज्ञेप्रमाणें या पत्राची पारसी करून, पातशाहास व नवाब नजबखानास सविस्तर मजकूर समजाविला. वाचून बहुत संतोष पावून उत्तर केलें कीं, 'ईश्वर हमेशा याप्रमाणें श्रीमंतांची फत्ते करो व इंग्रेजांचा कदम पातशाहींतून निघून लयातें पावो!' ह्मणून आशीर्वाद ममतापूर्वक देऊन, नजबखानांस आज्ञा केली, कीं तुह्मीही कांहीं उद्योग कराल किंवा नाहीं? नजबखान यांनीं अर्ज केला कीं, 'तोफखाना वगैरे सर्व तयारी आहे. कुंजपुरीयाकडील फौज रिकामी जाली ह्मणजे सर्व गोष्टी मर्जीनुरूप घडण्यांत येतील.



दिल्ली येथील दिवान. इ. खास. [नं. २.]

याप्रमाणें बोलिलें. पुढें अंमलांत येईल तें मागाहून विनंति लिहिण्यांत येईल. ....तदबीर नवाब नजबखान बहादूर विशेषच सांगतात. परंतु स्वामींचे प्रत्ययास येऊन, आह्मांकडून लिहिविलें व यांनीं सेवेसीं लिहिलें तें खरें होय तो सुदिन. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३९.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति कीं, इंग्रेजांकडील वकील पेशजीं आला होता, व हल्लीं इंग्रेज एक आला होता, व हमेशा पत्रें चकत्या त्यांजकडील येतात. त्यांचें परिमार्जन करून, आपले सरकारचा स्नेह व ममता पातशाहांसीं व नवाब नजबखानांसीं दृढता आजपावेतों ठेविली, व पुढेंही स्नेहाचे वृद्धीची पैवंदी करीतच आहों. हें वृत्त इंग्रेजांनीं लखनऊस श्रवण करून, लतापत अल्लीखान खोजा चौ पलटणानसीं पातशाहांचे तैनातीस वजिराकडून येथें आहे, त्यास सांगून पाठविलें कीं, 'फलाणे वकील दिल्लींत श्रीमंतांकडून आहेत. ते पातशाहांची व नवाब नजबखानांची मर्जी इंग्रेजांकडे ठीक राहूं देत नाहींत. या अर्थीं हरयेक बहाणा करून त्यांचें पारपत्य करणें.' ह्मणून खोजास पत्र आलें. त्यावरून माणसांमाणसीं ज्येष्ठ मासीं खटखट करून आह्मांवर हात घातला. हें वृत्त लखनऊस आपले सरकारचे परमस्नेही व त्यांचे मुख्य साहेब आहेत, त्यांनीं लिहिलें. त्यावरून श्रुत व्हावयास लिहिलें आहे. त्याचा तपसील पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. तात्पर्य, ...जीव घ्यावयास देखील चुकले नाहींत. परंतु आयुष्य होतें, व स्वामींचे प्रतापेंच वांचलों, व पुढेंही रक्षणार स्वामींचेंच पुण्य समर्थ! कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ४०.

श्रीवरद. ३१ मे इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. आमचें वर्तमान तर ज्येष्ठ शुद्ध १० दशमीस यमुनास्नानास निगमबोधास गेलों होतों. त्यास, यमुनातीरीं माणसांमाणसीं लतापत अल्लीखान ह्मणून खोजा वजिराकडील चौ पलटणांनिसीं पातशाहाचे तैनातीस आहे, त्यासीं परस्परें कजीया माणसांमाणसीं जाला. त्याकडील जमाव भारी. दोन माणसें

मारलीं गेलीं. आह्मांकडील एक खिजमतगार मारला गेला, व प्यादा एक जखमी जाला; व हत्तीस सात जखमा आल्या, व आह्मांस चार जखमा जाल्या. भवईवर एक, व हातावर एक, व पोटावर एक, व पाठीवर एक, ऐशा चार जखमा आल्या. त्यांत पोटावरील जखम भारी होती. परंतु, आपले प्रतापें व पुण्येंकडून वांचलों. जखमा बऱ्या जाल्या. एक महिना मानसीं स्नान जालें. आतां स्नान करीत असतों. तात्पर्य, आज आठदहा वर्षें जालीं, सरकारची फौज इकडे आली नाहीं; आणि नजबखान बळावला. याजकरितां, व इंग्रेज पलटणें पुण्यासमीप आलीं त्यांचें पारपत्य खातरखा न जालें; व ग्वालेरीपासीं पलटणें आहेत त्यांचें पारपत्य अद्यापि खातरखा होत नाहीं; हा रंग रांगडे पाहून, आपलाले ठिकाणीं बदमस्त जाले आहेत. कोणास खातेरस आणीत नाहींत, व आह्मांपासीं जमाव तो तैनाती बाळाजी गोविंदाकडील सरकारांतून देविला, तो त्यांनीं न दिधला. जुजबी माणसें व दक्षणी कोण कोठें आहेत, हाही मजकूर कोणाचे ध्यानांत राहिला नाहीं. परंतु या काळांत आपले प्रतापेंकडून पूर्वील फरपटीवर भ्रम व सर्वांसीं स्नेह आहे, त्यावर जीव अब्रू आहे. कपर्दिकेची प्राप्त यांजकडून नाहीं. इतकेंही असोन सरकारकामास्तव जडाव राखून, आपली अब्रू रक्षून, स्वामींचें नांव यशाप्रमाणें आजपावेतों श्रीनें रक्षिलें. पुढें पोख्त सरंजाम देऊन शत्रूचें पारपत्य सेवकाचे हातें करविणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति.''

लेखांक ४१.

श्रीवरद. ता. १५ आगष्ट इ. स. १७८१.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ २३ माहे साबान मुक्काम दिल्ली जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः– आपण पत्र छ १७ जमादिलावलचें पाठविलें, तें छ १ रज्जबीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, 'इस्तकबीलपासून कित्येक तदबीरा व मनसबे लिहिण्यांत आले व तिकडूनही स्नेहाचीं उत्तरें आलीं, त्याप्रमाणें कांहीं तरतूद होऊन नमुदास यावी. याची पैरवी मुत्सद्यांपासीं तुह्मी करीतच असाल, व करावी.' ह्मणून आज्ञा त्यास, आजपावेतों आपली व यांची स्नेहाची वृद्धि ठेऊन, इंग्रेजांकडील जो कोणी आला त्यास लागूं दिधलें नाहीं; व पुढें यांनीं पातशाहासहित इंग्रेजांचें पारपत्यास निघावें, हाच मजकूर बोलतों. त्यास, या दिवसांत हाल साहेब नामें इंग्रेज यांज-

कडील कलकत्त्याहून आला होता. त्यानें यांसीं सवाल केला कीं, 'कांहीं पलटणें व तोफखाना आह्मांस द्याल तर लढाईंत चाकरी करून दाखवूं.' हा बहाणा करून फौजेस सरंजाम मुलूख लाऊन घेऊन, आपला कबजा करून, यांचे सरकारांत माहीत व्हावें ह्मणून, इंग्रेजांनीं कवायद करून पाठविला होता. त्यास ते गोष्ट यांस समजून, यांस त्यांचा प्रातेज न पडे ह्मणून छ ५ रजबीं पांच वस्त्रें व शिरपेंच जवाहीर दागिना एक देऊन मार्गस्थ केलें. तो लखनऊस गेला. तात्पर्य, इंग्रेज आपलें साम दाम कपट भेद करणें तो उपाय हरएक तऱ्हेनें करितात. परंतु आजपावेतों नजबखानांपासीं व पातशाहापांसीं अंतर्गत एकोपा जाला नाहीं, व पुढेंही होणार नाहीं, या तरतुदींत रात्रंदिवस आहोंत. पुढें होईल तें मागाहून विनंति लिहूं. आतांच वर्तमान आलें कीं, कलकत्तेकर इंग्रेज इष्टीन श्रीकाशीस यावयास तेथून रवाना जाला. पुढें आलियावर होईल तें वृत्त लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ४२.

श्रीवरद. ता. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'नवाब नजबखान बहादूर यांचा खलिता, व पातशाही शुके, नवाब निजाम अल्लीखान बहादूर व खंडोजी भोंसले यांचे नांवें पाठविले, ते पावले. नवाब मोसूफ यांचे खलित्याचा जबाब, व सरकारांतून खातरजमेची अर्जी पातशाहाचे हजुरांत व नवाब नजबखान बहादूर यांस वजिराप्रमाणें अलकाब तुमचे लिहिल्याप्रमाणें वाढवून खातरजमेचीं पत्रें मुजरद कासीदजोडीबरोबर तुह्मांकडे रवाना केलीं, तें पावलेच असतील. त्यांचीं उत्तरें पातशाहाकडून व नवाब मोसूफ यांजकडून सरकारची खातरजमा होयेसीं घेऊन पाठवावीं.' ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें पेशजींच पत्रांचीं उत्तरें, खलिता व शुका पातशाही घेऊन पाठविलीं आहेत. ते हजुरांत पावून वृत्त श्रुत जालेंच असेल, व राजश्री खंडोजी भोंसले व निजाम अल्लीखान यांस शुके पातशाहांचे पाठविले, त्याचीं उत्तरें पातशाहास न पाठविलीं, ह्मणून पातशाहा व नवाब नजबखान विस्मय करत होते. त्यास कृपा करून उत्तरें आणऊन पाठवायास आज्ञा करावी. पत्रोत्तरीं आज्ञा कीं, वरचेवर शुके व फरमान भोंसले व निजामअली यांस परभारेंही पाठवणें ह्मणून आज्ञा. त्यास उभयतांपासीं आपले सरकारचे मातबर कोण कोण आहेत त्यांस पत्रें लिहून, येथून शुके, फर्मान जे

हस्तगत होईल ते पाठऊं. राजश्री देवाजीपंत, भोंसल्याकडील दिवाण, राजेश्री खंडोजी भोंसल्यापासीं असले, तर त्यांजपासीं पत्रें फर्मान पाठऊं. पूर्वीं शुके पाठविले, त्यांचीं उत्तरें आणऊन पाठविणार व सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. तात्पर्य, पादशाहांस व नजबखानांस इंग्रेजांशीं मिळूं देत नाहीं. त्यांजकडील पैगाम लालूच दाखवून वरचेवर लिहितात व माणसें येतात. श्रुत होय कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक ४३.

श्रीवरद. १५ आगष्ट सन १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, कुंवरसेन नामें खतरी पुणियांत आहे. त्यास, लटकेंच पूर्वीं मलकाजमानीकडील वकील ह्मणून तेथें गुजराण करून होता. तदोत्तर अबदुलअहदखानाकडे बातमी लिहीत होता. हल्लीं नजबखानास तेथील बातमीचीं पत्रें लिहून पाठविलीं होतीं. तेंच बजिन्नस धरून आपणांकडे पाठविलीं आहेत. त्यावरून ध्यानारूढ होईल. सरकारचीं पत्रें येतात, त्याप्रमाणें आह्मी येथील रंग पाहून, पूर्वींपासून दाबाचा जाबसाल करणें तो करितों. आणि तेथील कच्ची बातमी, पोटार्थी याप्रमाणें लिहितात ! याजकरितां जाबसालांत अंतर पडतें. तें बजिन्नस पारसी पत्रें कुंवरसेनाचीं लिहिलेलीं पाठविलीं आहेत. तें मनन करून मर्जीस येईल त्याप्रमाणें शिक्षा करावी. कीं, अतःपर कोणी तेथील घराऊ कच्ची बातमी नजबखानास न लिही, तें करणार आपण आहेत. सरकारचे पदरीं दोन हजार बैल रसदेचे इंग्रेजांकडील वळून आणिले ह्मणून लिहिलें आहे, व कुंवरसेनानें, तीनशें बैल वळून आणिले ह्मणून लिहिलें आहे, व इंग्रेज, श्रीमंतांस जेरबार करितात व जंगलांत गुलजार करून स्वस्थ आहेत, असे कितीक डंश लिहिले आहेत. या गोष्टीनें आमचे बोलण्यांत अंतर पडतें. याचा बंदोबस्त आपण उत्तम जाणतील त्याप्रमाणें करतील. वरकड बारीक मोठें त्याचेंच पत्र वाचल्यानें ध्यानास येईल. याप्रमाणेंच फरुकाबादेस व अयुद्धेस पत्रें व येथें आणीख कितीकांस पत्रें पाठवितों. यास्तव मर्जीस आलें तर, तेथून खानदेशांत अथवा हर कोठें, पांच सात रुपये दरमाहा करून, अन्नास लाऊन, पुणियाहून व आपले लष्करांतून काढावा. याहीवर उत्तम असेल तें करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४४.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, पूर्वीं यांजपासून कौलनामा लिहून घेतला आहे त्याची नक्कल, व हल्लीं यांनीं याद लिहून काहाडली आहे त्याची नक्कल, ऐशा दोन्ही नकला, हिंदवी करून पाठविल्या आहेत; त्यावरून ध्यानास येईल. तात्पर्य, पहिलें याजपासून लिहून घेतलें आहे त्या कौलनाम्यावरून अंतरवेद सरकारचे पदरीं पूर्ववत्‌प्रमाणें पडते. याजकरितां यांचा जीव इच्छित नाहीं कीं, याप्रमाणेंच दुसरा कौलनामा राजश्री महादजी शिंदे यांचे नांवें लिहून द्यावा. प्रथम कौलनामा लिहून दिघला आहे, त्यांत शपथ लिहून दिधली आहे तींस अंतर पडून, बेइमानी पदरीं पडते; याजकरितां इंग्रेजांसीं मिळूं शकत नाहींत. आणि आह्मी नित्यांनीं तगादा करितों कीं, पाटीलबावा समीप आले आहेत, तुह्मींच चालून सामील व्हावें; किंवा आपली फौज त्यांचे सामील पाठवावी. त्यास, ह्या गोष्टी ऐकून टाळाटाळ करितात. याचें कारण हेंच कीं, इंग्रेजांस भितात. खोलून त्यांसीं बिघाड करूं शकत नाहींत. अंतस्थ आह्मांसीं बोलणीं मात्र बोलून आजपावेतों बोलत गेले व सरकारांतही लिहित गेले, त्याप्रमाणेंच आतांही लाऊन ठेविलें आहे. यांचें मानस कीं, इंग्रेजांचीं पलटणें पाटीलबावांनीं मारून अंतरवेदींत उतरले, व सरकारची फौज व सरदार जबरदस्त पडेलसें जाणतील, तेव्हां सामील होतील; आणि पेशजीं कौलनामा लिहून दिधला आहे त्याजवरच कायम रहातील. जोंपावेतों ग्वालेरप्रांतीं इंग्रेज आहेत, त्यांचें पारपत्य जाल्याखेरीज हे दिल्ली बाहेर निघत नाहींतसें दिसतें. पहिलेच वचनीं गुंतले आहेत, याजकरितां इंग्रेजांसही सामील होत नाहींत. दोहींकडे स्नेह ठेवितात. परंतु अंतःकरणपूर्वक इंग्रेजांचें पारपत्य व्हावें ह्मणून कायावाचामनेंकरून यांचें बोलणें शपथपूर्वक आहे. व पूर्वीं कौलनाम्याप्रमाणें अंतरवेदींतील महाल मुलूक दिल्लीसमीपील आहे, तो जातो ह्मणून आतां आशा उत्पन्न जाली आहे, व तूर्त यांची फौज शिखांकडेही अटकिली आहे, याजकरितां दुसरीकडे खलश करूं शकत नाहींत. श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४५.

श्रीवरद. आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, "पहिला कौलनामा तुह्मीं लिहून घेतला आहे, तो ठीकच आहे. हल्लीं मनस्वीपणें कलमें यादीवर लिहिलीं आहेत, याचें कारण नाहीं. सारांश, इंग्रेजांची पैरवी खुशकींत जाल्यास कोणाचेंही स्वरूप रक्षितील ऐसा अर्थ नाहीं. हे दूरअंदेशी अर्थ त्यांसीं बोलण्यांत आला. .... पाटीलबावा यांनीं कोलारसानजीक इंग्रेजांस........ताण बसविला आहे. त्यास, पातशाही फौज व पलटणें शामील होऊन, इंग्रेजांचें पारपत्य करून, बंगाल्यापावेतों खरडीत नेऊन, मुलूख सोडवून, पुन्हां खुशकींत त्यांची पैवस्ती न होय, ऐसें जालें असतां सर्वांस चांगलें. यास्तव लिहिल्याप्रमाचें अमलांत येईल तें करावें. इंग्रेजांनीं करोडो रुपयांचा मुलूख कबजांत आणिला आहे. तो सोडविला असतां मोठेच नफे व नक्ष आहे. घरांतीलच वाटावाट करणें हें कांहीं चांगलें नाहीं. श्रीमंतांकडे मुलूख आहे, तर चाकरीही पातशाहांची घडते." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें मजकूर पातशाहांस व नजबखानांस समजावून ह्मटलें कीं, आपण डेरेदाखल व्हावें, यांतच सलतनतीचा दाब आहे. ह्मणून बहुतां प्रकारें यांचा पिच्छा घेतला. तेव्हां दसरियाचे दिवशीं प्रस्थान मात्र केलें आहे. येथून निघोन आगरियास चालतील तेव्हां खरें. अंमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं, व स्वामींकडे कौलनाम्याची नक्कल पाठविली, त्याप्रमाणें सेवकापाशीं नजबखानांचे मोहरेनिशीं कौलनामा शपथपूर्वक आहे. त्यास, आतां इष्टीन मारला गेला, व जिकडे तिकडे हिंदुस्थानांत जागां जागां इंग्रेज होते, ते जेथील तेथेंच गवारांनीं मारून ताराज केले. झाडून पथ्थरगडापासून गंगापार व अंतर्वेदीपासून तों कलकत्त्यापर्यंत मुलूख खालीं पडला आहे. गवार गर्दी जाली आहे. याजकरितां नजबखानांस आशा मुलुखाची उत्पन्न होऊन दुसरा कौलनामा करूं इच्छितात. त्यास, आह्मांसीं बोलावें तो आह्मांपाशीं कौलनामा शपथपूर्वक आहे. याजकरितां नेट देऊन आह्मांशीं बोलूं सकत नाहीं. ह्मणून परभारां, अनुपगीर गोसावी याचा व राजश्री महादजी शिंदे यांचा स्नेह आहे, ह्मणून त्यांजकडे सूत्र लावून, दुसरे तऱ्हेचा कौलनामा लिहून आणविला आहे; तो अनुपगीरापाशीं आहे. अनुपगीर जयपूर प्रांतीं आहे. तो मासपक्षानंतर दिल्लीस येणार. त्या कौलनाम्यांत पाटीलसाहेबीं काय लिहून दिधलें आहे हें सेवकास अद्यापि कांहीं समजलें नाहीं. व राजश्री

पाटीलबावांनींही मोघमच आह्मांस लिहिलें कीं, अनुपगीरापाशीं कौलनामा मोहोर करून दिधला आहे; ते तुह्मी एक होऊन जाबसाल करणें. त्यांत काय लिहिलें आहे, तें समजल्यावर मागाहून विनंति लिहूं. इंग्रेजांचे पारिपत्य चहूंकडे जालें. आणि नित्यांनीं....करीतच आहेत. आणि पाटीलसाहेब, ग्वाल्हेर प्रांतीं चार पलटणें इंग्रेजांचीं आहेत, तेथेंच आज सा महिने अटकले आहेत. ह्मणूनही नजबखानाचे मनांतून दहशत उडोन स्वस्थ चित्तें आहेत. लायकसिंग कनोजकर व फरोकाबादकर व मैनपुरीकर वगैरे छोटेखानी पठाण व राजे यांचीं पत्रें सेवकास आलीं आहेत कीं, तुमचे सरकारची फौज अंतर्वेदींत आली, ह्मणजे कालपीपासून दरोबस्त अंतर्वेद आह्मी अवघे शामील होऊन अंमल करून देऊं, ह्मणून बोलतात. त्यांचे पत्रांचीं उत्तरें लिहून पाठविलीं आहेत कीं, पाटीलबावांचे नांवें पत्रें आह्मांस लिहिल्याप्रमाणें पाठवून देणें; ह्मणजे फौजेची रवानगीविषयीं लिहूं. ह्मणून लिहिलें आहे. श्रुत होय कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ४६.

श्री. आगष्ट इ. स. १७८१.

"नवाब नजबखान बहादूर याजकडून पूर्वीं कौलनामा लिहून घेतला आहे त्याची नक्कलः—

श्रीमंत पंतप्रधान साहेबांसीं व आह्मांसीं दोस्ती व इरतबात कदीम आहे, त्यांत किमपि अंतर नाहीं. ह्मणून दुहराऊन कौलकरार दीन इमानची शपथपूर्वक लिहितों कीं, तुमचा मित्र तो आमचा मित्र; तुमचा शत्रु तो आमचा शत्रु, व आजपर्यंत जो मुलूख आमचे व आपले कबजांत आहे, त्यांत खलश रतिभार न व्हावा, व कांहीं मवाखजा मध्यें नसावा. पुढें दोन्हीकडील फौज मिळून शिवाय परगनात अंतरवेद जहागीर, श्रीमंत पंतप्रधान साहेब जो मुलूख नवा हस्तगत करूं त्यांत निम्मे हिस्सा वांटून घेऊं; व जरूर जाल्यास परस्परें कुमक करीत जावें. दोन्हींकडून फौजेचे खर्चाचा उपद्रव नसावा. यांत अंतर करूं तर पातशाहाचे पायाची व खुदा वरसुल खुदाची शपथ आहे. दोन्हींकडून दोस्ती व येगानगत रोजबरोज वृद्धींत असावी. छ० १५ जमादिलाखर संवत् १८३५ सन १९ पातशाही."

लेखांक ४७.

श्री. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"नवाब नजबखान बहादूर हे हल्लीं याप्रमाणें कौलनामा लिहून देऊं ह्मणतात त्याची नक्कलः—

१ मेरट वगैरे महाल व इटावा वगैरे महाल व कडाकुरा कदीम, पातशाही भोजनखर्च व तोफखाना वगैरेची तनखाह आहे ते बदस्तुर आह्मांकडे असावे.

१ बंगाला वगैरे मुलूख कदीम पातशाही आहे ते दुष्मनाकडून काढून, बदस्तुर आह्मांकडे असावा.

१ सहारंगपूर वगैरे मुलूख बदस्तुर आह्मांकडे असावा.

१ शिफारस जाटाची न करावी.

१ सुभे इलाहाबाद आमचा आहे, तो बदस्तुर आह्मांकडे असावा.

१ नवाब वजिरांनीं मुलूख हल्लीं घेतला आहे व कदीम आहे, तो नवाब वजिराकडे असावा.

१ अहंमदखान बंगश याचा मुलूख वजिरांनीं घेतला आहे. बंगश मजकुराचा पुत्र चाकरीस हजीर जालीयास, पातशाही बंदा आहे. वजिराची खातरदास्त त्याचा प्रांत सोडावा.

१ शिखांकडील मुलूख आमची व तुमची फौजेचे इतफाकानें हस्तगत होईल, त्यांत निम्मे हिस्सा वांटून घेऊं.


१ ग्वाल्हेरचा मुलूख इंग्रेजांनीं घेतला आहे. त्यास ग्वाल्हेर किल्ला पातशाही आहे, तो बदस्तुर पेशकश हुजूरची करावी.

१ राजे जयपूर व राजे मारवाड कदीम बंदे पातशाही आहेत. हल्लीं हुजूर-चाकरीस हजीर जालीयास, आपले कदीम मुलुखांवर सरफराज राहतील. जर बागी होतील, तर त्यांची तंबी करूं. जयपूरचा मामला आह्मांकडे असावा, व मारवाडचा मामला आपणांकडे असावा.

१ इंग्रेजांनीं दक्षिणचा मुलूख हल्लीं घेतला आहे व कदीम आहे, त्यांत निमे वांटून घ्यावा. श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचे खातरदास्त सुभेदारी श्रीमंत पंतप्रधान साहेबांची असावी.

१ सुभे अजमेर आपणांकडे असावा.

१ जो तुमचा मित्र तो आमचा मित्र. तुमचा शत्रु तो आमचा शत्रु. त्याची तंबी करावयांत अंतर करूं, तर शपथ आहे.



हुमायूनची कबर.—दिल्ली.

१ राजे गोहदकडील व आणिक तिकडील मुलूख तरवारचे जोरावर हस्तगत होईल. जर तिकडील राजे हजीर जालीयास मामला आह्मांकडे असावा. बागी जालीयास तंबी करून निमे मुलूख वांटून घेऊं.

१ उमराव राजे तिकडील पातशाहांचे बंदगींत हजीर होतील, त्यांसीं न बोलावें. व वसुल हुकमी केलीयास त्याचे तंबीस शामील राहूं.

१ मुलूख काल्पी व झांशी आपणाकडे असावे.

१ कोणी आमचा चाकर उठून तुह्मांकडे जाईल, त्यास तुह्मीं चाकर न ठेवावें; व तुमचा चाकर आह्मांकडे येईल तर आह्मी चाकर ठेवणार नाहीं.

१ तूर्त तुह्मांस मोहीम रुबकार आहे, त्यास हुजूरचे फौजांस खर्चास तुह्मीं द्यावें. व पुढें हे करार असे कीं, आमची फौज तुमचे कुमकेस जाईल तर तुह्मीं खर्चास द्यावें. तुमची फौज आमचे कुमकेस आली तर आह्मी खर्चास देऊं.

छ० २१ जमादिलाखर संवत् १८३८ सन २२ पातशाही."

लेखांक ४८.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, "नवाब नजबखान बहादूर यांस तुमचे लिहिल्याप्रमाणें वजीराचा अलकाब ठरावून लिहिलें, तें पत्रें पावलीं असतील. नजबखान सरकारचे दौलतखाई व इकडील दोस्ती ठेवितात. तेव्हां त्यांस ज्यांत भूषण तेंच इकडेही अवश्यक ह्मणून लिहिलें." ऐसीयास स्वामींचे लिहिल्याप्रमाणें मशारनिल्हेस मजकूर समजाविला. श्रवण करून बहुत संतोषी जाले, व दोस्तीवर कायम आहेत. इंग्रेजांकडील पैगाम, मीर खलील याचे विद्यमानें पन्नास लक्ष रुपये देतों, आमचे सामील व्हावें ह्मणून आहे. त्यास आजचे घटकेपर्यंत नित्यांनीं आपले स्नेहाची वृद्धि करून आपलेकडे यांचें लक्ष ठेविलें आहे, व बोलतात कीं, जितकी काळजी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींस इंग्रेजांचे पारपत्याची नाहीं, तितकी मजला इंग्रेजांचे पारपत्याची व श्रीमंतांचे दौलतीचे रोशनीचें समाधान आहे. याप्रमाणें नित्यांनीं बोलून आमचें समाधान करितात. पुढें अंमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ४९.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'सरकारांतून उमदा सरदार बमय फौज पातशाहांचे हजुरांत येऊन पातशाहांनीं व सरकारचे फौजेनें मिळून अंतरवेद, बंगाल वगैरे मोहिम मातबर करावी ऐसें होतें. परंतु प्रस्तुत बरसात दोन चार महिने राहिली, आणि इंग्रेजी पलटणें जमा होऊन सिपरीवर आलीं; त्यांची तंबी करणें प्राप्त आहे. याजकरितां राजश्री महादजी शिंदे व शिवाजी विठ्ठल मातबर फौजेनें इंग्रेजी पलटणांचे पारपत्यास गेलेच आहेत. या समयांत पातशाहांचे हजूरची फौज दहा बारा हजार, बमय सरंजाम जंगी, व एक सरदार बवकूफ याजप्रमाणें राजश्री महादजी शिंदे यांजकडे येऊन, मशारनिल्हे यांनीं व त्यांनीं मिळून सिपरीवर पलटणें आलीं आहेत त्यांचें पारपत्य करावें. बरसातीस चार महिने अवकाश आहे. याजमध्यें या पलटणांचें पारपत्य करून गारत करावें हे नेकसलाह याजकरितां तुह्मीं पातशाहास व नजबखानांस मसलतीचे मार्गें बोलोन, फौज इंग्रेजांचें पारपत्यास लवकर ये, ऐसें करावें. बरसात जालीयावर मातबर मसलत करावी. तूर्त बरसातीस थोडे दिवस राहिलीयां हें काम करावें. येणेंकरून फार चांगलें आहे'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें पातशाहांस व नवाब नजबखानांस समजावून उत्तेजन बहुताप्रकारें दिल्हें कीं, तुह्मी श्रीमंतांस पत्रें लिहित गेलां, व आह्मांकडून लिहवीत गेलां. आतां तुमचे लिहिलेप्रमाणें राजश्री पाटीलबावा आले आहेत; यांचे सामील आपली फौज पाठवावी. यांनीं उत्तर केलें कीं, उगेच आह्मांस कशास लाजवितां? आह्मांपासीं फौज आहे ते शिखांकडे अटकली आहे. तिकडून रिकामी जालीयावर श्रीमंतांचे मनोदयानुरूप अंमलांत येईल ह्मणून बोलतात. अनुभवास येईल तें मागाहून विनंति लिहूं. इंग्रेजांकडील रुपये घेऊन त्यांस सामील न जाले, तें एक पातशाहांचे भयानें व स्वामींचे सेवेंत वचनीं गुंतले आहेत त्या शरमेनें आजवर राखिले आहेत. पुढें सेवकाचा पाय येथें ठरणें कठीण जालें, व यांजला त्यांचें आश्वासन वरचेवर येतच आहे. ते बातनी ठेऊन वारंवार यांस अर्ज करितों कीं, तुमचे नशिबानें जुंज लागलें. नाहींतर आजपावेतों दिल्लींत अम्मल करते. आतां आपला नक्ष राखणें तर राजश्री महादजी शिंदे यांस सामील होणें. नाहींतर आतां लालूच दाखवून पुढें ग्रास करितील तेव्हां पस्तावा कराल, व आमचें बोलणें स्मराल. तें न करणें.

ऐसें प्रातःकाल सायंकाल नित्यांनीं तऱ्हेतऱ्हेची ममता दृढ करून उत्तेजन देत आहों. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. ईश्वर सत्वर शत्रूचा नाश करो व स्वामींचा प्रताप अधिकोत्तर होय ते सुघडी. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५०.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—


विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'सांप्रत इंग्रेजी दहा पलटणें सिप्री कोलारसावर आलीं. त्यांचे पारिपत्यास राजश्री महादजी शिंदे यांनीं प्रथम फौजेची रवानगी करून, मागाहून आपणही राजश्री शिवाजी विठ्ठल व बळवंतराव धोंडदेव यांसहित व एकदोन राजे रजवाडे शामील करून घेऊन, पंचवीस हजार फौज व तोफखाना वगैरे जंगी सरंजामसुद्धां कुल्हापोशाचे तंबीवर रवाना जहाले. रा० बाळाजी गोविंद दहा हजारा फौजेनशीं शिंदे यांजकडे जलदच जाणार. एकूण तीस पस्तीस हजार फौजेचा जथा जाला. ईश्वरइच्छेनें मुखालीफाची तंबी खातरखांच होईल. ऐशा संधींत नवाब नजबखान बहादूर यांनींही बमय फौज, तोफखाना वगैरे सरंजाम सलतनतसुद्धां कुच करून, सिप्री कोलारसाचे रोखें यावें ह्मणजे पलटणास दुतर्फा शह बसून गारतच होतील. येविशीं तुह्मीं पातशाहांस व नजबखान यांसीं बोलून, लिहिल्याप्रमाणें लवकर नमुदास येईल तें करावें. या पलटणाची तंबी खातरखा जालियावर सरदार पुढील अंतरवेद व बंगाला ताराज करण्याविषयींचे मसलतीस पातशाहांचे हजुरांत येऊन पोहोंचतील. सारांश, सरकारच्या फौजा इंग्रेजांचे पारिपत्यास नमुद आहेत. ऐशा समयास नवाब मौसुफ यांनीं अजम केल्यास पातशाही दाब व बहुत कामें घडून येतील'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें वर्तमान पातशाहास व नजबखानांस सांगितलें, व उत्तेजन द्यावयाचें तें वरचेवर देतों. परंतु त्यांनीं एकच उत्तर केलें कीं, शिखांकडून फौज रिकामी जाल्याखेरीज कोणीही गोष्ट अंमलांत येत नाहीं. श्रीकृपेनें शिखांच्या मसलतीचा समारोप करून सत्वरच श्रीमंतांच्या लिहिल्याप्रमाणें अमलांत येईल, ह्मणून भाषणें मात्र करितात. प्रत्यास येईल तें मागाहून विनंति लिहूं. आपण रा० बाळाजी गोविंद दहा हजारा फौजेनशीं येऊन शामील होतील ह्मणून आज्ञा लिहिली. त्यांचें लक्षण व फौज आहे तें सविस्तर राजश्री पाटीलबावांनीं लिहिलेंच असेल. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५१.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'भोंसले फौजसुद्धां बंगाल्याचे सरहद्देस छावणी करून होते. बरसातींत इंग्रेजांचा उपसर्ग न व्हावा, कोणेही प्रकारें दिवस घ्यावे ह्मणोन कळलें. तैसे छावणीचे दिवस घालविले. आतां खुलासा जाला. याउपर बंगाला ताख्त ताराज करण्यांत येईल, गुंता नाहीं, ऐसीं त्यांचीं पत्रें आलीं. याउपर फौजा बंगाल्यांत शिरल्या असतील, कीं शिरतील. तिकडेही वर्तमान येतच असेल. नवाब निजामअल्लीखान बहादूर यांचे सरदार व फौजा जमा जाल्या व होतात. पातशाहा व नजबखान यांनीं सत्वर बाहीर निघावें, दिवसगत न लावावी. हंगामाचे दिवस हेच आहेत. सरदार फौजसुद्धां लौकरच पातशाहांचे हजूर येऊन पोंहचतील'. ह्मणून लिहिलें. त्यास, आज्ञेप्रमाणें नजबखानांस व पातशाहांस पत्रें समजाविलीं, आणि विनंति केली कीं, चहूंकडून इंग्रेजांस तान दिल्हा आहे व इकडील तोंड मात्र मोकळें आहे. त्यास आपण स्वारी बाहीर काहाडून इकडून इंग्रेजांस तान द्यावा, ह्मणजे चहूंकडे इंग्रेजांस तान बसून जे........... ....एकमेकांचे कुमकेस पोंहचणार नाहींत. पातशाईचा बंदोबस्त होऊन लहान थोर सर्व बंदगींत हजर रहात जातील. ह्मणून नजबखान समीप असतां पातशाहांस विनंति केली. त्यावरून त्यांनीं उत्तर केलें कीं, दक्षणी सरदार सत्वर कोणी येऊन पोंहचे, याजकरितां जाबतेखानास कुंजपुऱ्याकडे पाठवून शिखांसीं संमत करून, त्यांस समागमें घेऊन स्वारीस निघावें. इतक्यांत मिरजासफीखान यांनीं लेंकूरपण करून शिखांसीं बिघाड केला. आतां त्यांसीं दबून सलूक करावा, तर सलतनतीचा दाब राहत नाहीं; व सलूक न करावा तर आह्मी श्रीमंतांस लिहीत गेलों व वारंवार तुह्मांसीं बोलत गेलों, त्या गोष्टींत अंतर पडतें. या संकटांत आहोंत. ऐसें साशंकित होऊन बोलिले कीं, थोडक्याच दिवसांत शिखांसीं सलूक करून बाहेर निघतों. इतक्यांत राजश्री महादजी शिंदेही ग्वालेर प्रांतची इंग्रेजांची लढाई मारून पुढें येतील. ते व आह्मी सामील होऊन येथून कलकत्त्यापावेतों दो महिन्यांत जाऊन पोंहचतों. ह्मणून पातशाहांचे रुबरू नजबखान बोलिले. पुढें नित्यांनीं यास उत्तेजन देतच आहोंत. अंमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."



निजामुद्दीन अवलियाची कबर.—दिल्ली.

लेखांक ५२.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'राजश्री खंडोजी भोंसले बंगाल्याचे सरहद्देस आहेत. त्यांजकडून पत्रें सरकारांत येतात कीं, "इंग्रेजाचे तालुक्यांत शिरोन जलदच तख्त ताराज करितों." या खबरा लौकरच सरकारांत येतील. ऐसीं लिहिलीं येतात. तेव्हां लिहिल्याप्रमाणें बंगाल्यांत शिरोन खंडोजी भोंसले यांनीं ताख्त ताराजी सुरू केलीच असेल. बातनी आलियावर लिहिण्यांत येईल. हैदरअल्लीखान यांनीं पेशजी चिनापट्टण वगैरे इंग्रेजी पलटणें गारत करून अर्काट वगैरे मकानें तसरुफांत आणिलीं. हें कलकत्तेकरांस समजतांच, करनेल कूट यास दाहा पलटणें समागमें देऊन, चिनापट्टणकरांचे कुमकेस रवाना केलें. कूट मजकूर चिनापट्टणास पाणियांतून येऊन, लढाईचा सरंजाम करून, खानबहादूर यांसीं मुकाबिला करावयाचे इरादियानें चालून आला. इतकियांत हैदरखान यांनीं फरासिसी जमीयत कुमकेस आणविली होती, त्यास कांहीं जाहाजें फरासिसी जंगी सरंजामसुद्धां फुलचरीचे रोखें येऊन पोहोंचलीं. हें वर्तमान कूट मजकूर यास समजतांच बेहिंमत होऊन फुलचरीचे आश्रियास गेला. हैदरअल्लीखान यांहीं फौजेसुद्धां जाऊन त्यास माहासरा दिल्हा आहे'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें हें वर्तमान पातशाहांस व नवाब नजबखान यांस सांगितलें. यांजकडे बातनी आली कीं, फुलचरी हैदरअल्लीखान यांनीं घेऊन फरासिसांस दिधली व चिनापट्टणास मोर्चे लाविले आहेत. व खंडोजी भोंसले यांनीं इंग्रेजापासून एक वेळ तीस लक्ष रुपये, व एक वेळ पंधरा लक्ष रुपये, व एक वेळ सात लक्ष रुपये, येणेंप्रमाणें बावन लक्ष रुपये घेऊन त्यांसीं सामदाम करून चिनापट्टणास इंग्रेजी पलटणें कुमकेस जातात त्यांस मार्ग दिल्हा, ह्मणून पातशाहांनीं व नवाब नजबखान यांनीं वर्तमान सांगितलें. भोंसले तेथें रुपाया घेऊन स्वस्थ फौज ताजी करून आहेत ह्मणून बातनी आली. तें सेवेसीं श्रुत व्हावयास लिहिलें असे. पुढें वर्तमान येईल तें मागाहून विनंति लिहूं. निजामअल्लीखान यांस दाहा लक्ष रुपये इंग्रेजांनीं खर्चास पाठविले व करार परस्परें केला कीं, एकवट होऊन सरकारचे अंमलासीं बेआदाई करावी. ह्मणून येथें वर्तमान आलें. त्यास तेथें स्वामींचे प्रत्ययास येईल तें लिहावयास आज्ञा केली पाहिजे. दर्शन घडे ते सुघडी. कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ५३.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- पातशाहाचे येथें वृत्त आलें कीं, कलकत्त्यास इंग्रेज आहे त्यांनीं भोंसल्यांस बेताळीस लक्ष रुपये देऊन शांतवन केलें; व करार केला कीं, तुमचे खंडणीचा पैका राहिला आहे तो घेणें व आमचीं पलटणें चिनापट्टणाकडे कुमकेस जाऊं देणें. त्यावरून दोन कंपूस भोंसल्यांनीं मार्ग दिधला. ते सुरक्षित दोन कंपू चिनापट्टणास रवाना जाले. कलकत्ता हैदरनाईकाच्या इबरतीनें भयाभीत होऊन, साशें नांवा भरून माल व सरंजाम व रांडापोरें इंग्रेजाचीं अयोध्येकडे व लखनौकडे आलीं. या दिवसांत असफउद्दौला वजीर यांस इंग्रेजांनीं उत्तर दिधलें कीं, आमच्यानें तुमचा मुलूख राखवत नाहीं. तुह्मीं आपली खबरदारी करून घेणें. त्यावरून वजीराचे येथें फौजेची निगादास्त हिंदुस्थानी लोकांची कंबेश आहे. श्रीकृपेनें राजश्री महादजी शिंदे यांनीं ग्वालेरचे इंग्रजांचें पारिपत्य करून इटाव्याकडे किंवा कालपीकडे अंतर्वेदींत उतरले, तर तमाम अंतर्वेद खाली आहे. नजबखानांचे काबूंत पातशाहा व नजबखान आजपावेतों शपथपूर्वक ह्मणतात कीं, शिखांचे झुंजाचा फैसल्ला जाला ह्मणजे आह्मी राजश्री महादजी शिंदे यांचे शामील होतों. इंग्रेजांशीं झुंजास नमूद होत नाहींत. सरकारची जरब भारी जालीयावर ताबेदारी करितील. इंग्रेजास अतिशय भितात, व पूर्वीं स्वामींस पत्रें लिहिलीं व सेवकाकडून साहेबीं लिहविलें, तैशींच बोलणीं आहेत. अंमलांत येत नाहीं. पुढें होईल तें लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ५४.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'भोंसल्यांची फौज बंगाल्याचे हद्देस गेली. तिकडे छावणी जाली. हवा वाईट सबब छावणींत तमाम घोडीं मेलीं. लोकांत बळ राहिला नाहीं. इतक्या फौजेनसीं बंगाल्याची ताख्तताराजी होणार नाहीं. तेव्हां उगेच माघारा फिरोन जावें, तों आब जातो; फौजेचें देणें आंगावर येतें; शत्रु शेर होतो; ऐसें जाणून काबू पुर्ते इंग्रजांसीं बोलणें करून पैका घेतला. मुलूक ताराज केलीयानें आपले हातीं कांहीं लागत नाहीं. पैका घेतल्यानें आपल्या फौजेची हुशारी व शत्रूचा मुलूक मारल्याचें फळ आलें. पैक्यानें शत्रु खालीं

केला; आपलें काम जालें. ऐसें जाणून, पैका घेऊन फौजा माघारा आल्या. आपल्यास कळावें ह्मणून लिहिलें असे. राजश्री मुधोजी भोंसले यांनीं व दिवाकरपंत यांनीं सरकारांत लिहिलें होतें. बंगाल्यांत फौज पाठवावयाची तजवीज होत आहे. फौज तयार जाली ह्मणजे बंगाल्यास चालावयास तयार. ऐसें भोंसल्याचें बोलणें आहे, व सरकारचेही वकील भोंसल्यापासीं आहेत त्यांचे लिहिण्यांत ऐसेंच आहे. नवाब निजामअल्लीखान यांनीं दहा लक्ष रुपये घेतले नाहींत. घेतले असतील ते आपले मख्ल्यापैकीं घेतले असतील. दुसरें कांहीं नाहीं. हैदरअल्लीखान यांनीं फुलचरी घेतली नाहीं. जरनेल कुटास लढाईस ताकत नाहीं. सबब पलटणासुद्धां देवणापट्टण ह्मणून जागा आहे; तेथें नवाब बहाद्दर यांची फौज व गाडद बादीस + +' ह्मणून आज्ञा लिहिली. त्यास सदरहू मजकूर पातशाहांस व नवाब नजबखानांस निवेदन केला. तो ऐकून आपले तदबिरीची व सर्वा सरदारांस हुकुमांत ठेवण्याची तारीफ बहुत केली कीं, राजश्री नानांनीं तरतूद इंग्रेजांचे पारपत्याची फारच अपूर्व केली, आणि आह्मांस सांगितलें कीं, तुह्मीं आपलें पत्रीं त्यास ल्याहावें कीं, हैदरअल्लीखान व निजामअल्लीखान यांसीं एकवाक्यता ठेवून आपलाले सरहद्देस इंग्रेजांचे पारपत्यास मजबूत राहत. आणि कोणीही सलूखाचा मजकूर मधें न आणीत तें करणें; व भोंसल्यास ताकीद करून बंगाल्यास फिरून फौजा सत्वर जात तें करणें; ह्मणून सेवकास पातशाहांनीं निक्षून ताकीद करून लिहावयास आज्ञा केली. त्यावरून विनंति लिहिली आहे. श्रुत होय कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ५५.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'नक्षाप्रमाणें हैदरअल्लीखान बहादूर यांनीं चिनापट्टणाकडे इंग्रेजांस तंग केलें. करनेल मंडोर व बेली फौजसुद्धां चालून आले होते, ते दरोबस्त गारत केले. कांहीं बाकी ठेविली नाहीं. याचा तपशील पेशजीं लिहिलाच होता. त्याउपर अर्काट स्थळ, नामी सुभा, रहावयाचा जागा आणि मजबूत जाणून अर्काटेस माहासरा होता. महमदअल्लीखान यांचे दिवाण आचण्णापंत पोख्त सरंजामासीं आंत होते, तें स्थळ छ ४ जिलकादीं हैदरखानांनीं हल्ला करून घेतलें. आचण्णापंत धरले. आरणी वगैरे तमाम किल्ले जात हस्तगत केले. राहतांना बाकीस चेनापट्टण व त्रिचनापल्ली व येलूर तीन स्थळें राहिलीं. त्यास

चेनापट्टणास माहासरा करण्यास खानबहादूर जाणार होते. गेले असतील. वरकड रामेश्वरपावेतों इंग्रेजांचा मुलूक हैदरखानांनीं काबीज केला. इंग्रेजांचे लोक बेलीच्या लढाईंत व अर्काट मिळून दहा हजार पगडीवाले व दोन हजार टोपीवाले ठार हैदरखानांनीं मारिले. सातशें गोरे व बेली सरदार इंग्रेजांचा पाडाव करून आणिले. ऐसें चहूंकडून जाहाल्यानें इंग्रेजांचें पारपत्य होऊन पातशाहीचा नक्षा होईल'. ह्मणून लिहिलें. त्यास, आज्ञेप्रमाणें या पत्राची पारसी करून पातशाहांस,व नवाब नजबखानांस दाखविलीं. वाचून हैदरअल्लीखानाचा स्तव केला व बोलिले कीं, श्रीमंतांचें दैव थोर आहे. आह्मीं ह्मटलें कीं, तिकडून हैदरअल्लीखान यांनीं तान बसविला आहे; याप्रमाणें आपणही स्वारी बाहीर काढून इंग्रेजांस तान बसवावा. ऐसा समय पुढें येणार नाहीं. जर इंग्रेज जबर पडले तर पातशाहीचे दावेदार आहेत, ऐसें स्पष्ट बोलिलों. त्यांनीं उत्तर केलें कीं, मीही त्याच तजविजींत आहे. श्रीकृपेंकरून थोडक्याच दिवसांत अमलांत येईल ह्मणून बोलिले आहेत. परंतु अंमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ५६.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'तुह्मीं पातशाहांस व नजबखान बहादूर यांस हरवख्त इतल्ला करून टोपीकरांचे वकिलास रुसकत करविलें, हे गोष्ट चांगलीच केली. इंग्रेज, गुरबत दाखवून काबू साधावयास चुकणार नाहींत. मागें त्यांनीं मकर फेरब करून भुलावा देऊन सुजायतद्दौला याचे रियासतींत व बंगाला वगैरे पातशाही मुलुखांत आपला तसरूफ केला, व चार दिवस रास्ती व दुरुस्तीची चाल दाखवून, अखेर काय काय बदसलुखी अमलांत आणिली हे पातशाहा व नवाब मोसूफ यांस जाहीर व रोशन असतां इंग्रेजांचे वकिलास रुख देणारच नाहींत. त्यांत तुह्मीं हरवख्त सुचवून वकिलास रुकसत करविलें, नेक सलाह दिली. पुढेंही इंग्रेज फंदफरेब करून पातशाहा व नवाब नजबखान यांस भुलावा द्यावयास कसूर करणार नाहीं. सबब त्यांची बातनी पक्की राखून पातशाहा व नवाब नजबखान यांजपाशीं टोपीकरांचा दखल हरगीज न होय तें करावें'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यांस आज्ञेप्रमाणें यांचे घरांत, अंतःपुरांत, वगैरे खवासास राजी राखून तेथील बोलण्याची देखील बातमी राखितों. आणि रात्रंदिवस दरबारची मेहनत

करितों. यांचें कारण हेंच कीं, यांनीं बोलल्याप्रमाणें व लिहिल्याप्रमाणें सरकारचे सरदारांचे शामील, फौजसुद्धां व्हावें. ते तो गोष्ट आजपावेतों प्रत्ययास येत नाहीं. पुढेंही याचे साधनांत आहोंत कीं, द्रव्याची लालूच न धरितां इंग्रेजांस न मिळावें, याच तोडजोडांत रात्रंदिवस असतों. स्वामींचे प्रतापेंकरून यांचा व इंग्रेजांचा मेळ होऊं देत नाहीं. यांनीं राजश्री पाटीलबावांस शामील व्हावयास्तव रात्रंदिवस चिंतातुर असों. ईश्वर स्वामींचा प्रताप अधिकोत्तर करो. दर्शन घडे तो सुदिन. कृपा केली पाहिजे. हे विनंति.''

लेखांक ५७.

श्रीवरद. १५ आगस्ट इ. स. १७८१.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'करनेल गाडर सुरतेजवळ जमावसुद्धां होता. एक दोन पलटणें खानदेशांत नमुद केलीं, तेव्हां बादबरसात हाच रूख धरील, ऐसें समजोन राजश्री गणेशपंत बाहीर त्या तोंडावर ठेविले. फौजेचा जथही तिकडेच घातला. पुढें गाडरानें खानदेशाचे मैदानांत यावें, हे इच्छा. परंतु मैदानांत इंग्रेजांचा परिणाम लागणार नाहीं, ऐसें समजोन तमाम सरंजामसुद्धां कोंकणांत समुद्रकिनाऱ्यानें उतरला. सरकारांतून सरदार राजश्री रामचंद्र गणेश, व चिमाप्पा पानसी, व भवानी शिवराम वगैरे जमावानसीं रवाना जाले. लहानमोठ्या लढाया एक दोन जाल्या. त्यांत इंग्रेज हटवून घातले. सरकारच्या फौजा संपूर्ण जमा जाल्या नाहींत. आठा चौ रोजांत होतील. थोडेच दिवसांत इंग्रेजांस इकडून तंबी होईल. तें लिहिण्यांत येईल' ह्मणून लिहिलें. त्याप्रमाणें या पत्राची पारसी करून पातशाहांस व नजबखानांस समजाविली. वाचून बहुत संतोष मानून, आपले कार्यकर्तेपणाचें व रुस्तमाचें स्तवन बहुत केलें. धन्य श्रीमंतांची पुण्याई, कीं त्यांचे संग्रहीं ऐसे दौलत आटोपायाजोगतीं माणसें! ह्मणून स्तुत बहुत केली. पुढें अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. ईश्वर स्वामींस यश देणार समर्थ आहे. कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ५८.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'कलकत्त्याहून थोडा बहुत सरंजाम चेनापट्टणाकडे गेला; त्याजवरून जरनेल कूट हुशारी मानून, अडचण सोसून बाहीर निघाला. त्याची व हैदरनाईकाची लढाई होऊन इंग्रेजांची सिकस्त जाली. तीन हजार माणूस मारिलें, व दोन हजार जखमी जालें. हत्यारबंद धरून आणिले, व तोफा हस्तगत केल्या. हैदरखानाची जरब चांगली बसली, व सरकारचे फौजांनीं गाडर सिकस्त केला, तो .... मुंबईस गेला. पुढें उमेद धरून खुशकींत चाल केल्यास इकडीलही फौज तयार आहे. श्रीमंतांचे प्रतापें उत्तमच होईल. सुरतेकडील मुलूक ताराज करून शहावर फौजा आहेतच. शिंदे यांची लढाई कुलारसावर नेहमीं होतच आहे. याप्रमाणें इंग्रेजांस चहूंकडून तान बसविला आहे. गाडर बोरघाटावरून सिकस्त खाऊन माघारा चालला. तेव्हां सरकारचे सरदारांनीं दोन तीन लढाया मातबर केल्या. इंग्रेजांचा नाश फार जाला. पळून नजीक दऱ्याव ह्मणून जहाजांत बसून मुमईस गेला. तेथें गेलीयावर बातमी आली कीं, सोळाशें माणूस ठार जालें. व दोन सरदार थोर, व लहान सरदार बेताळीस याप्रमाणें ठार, व सव्वीसशें माणूस जखमी, याप्रमाणें त्याची खराबी जाली. तुह्मांस कळावें ह्मणून लिहिलें आहे'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, या पत्राची पारसी करून पातशाहांस व नवाब नजबखानांस मजकूर समजाविला. वाचून बहुत संतोष पावले; आणि ह्मणाले जे, 'धन्य श्रीमंतांचें पुण्य, कीं धणी सात वर्षांचा, आणि कारभारी यांनीं याप्रमाणें तरतूद करून, सर्वांस ममतेंत घेऊन, चहूंकडून इंग्रेजांस जरब बसविली आहे. आमचे सलतनतींत ऐसा प्रकार असता तर दौलत दुष्मनाचे हवाला करते! याप्रमाणें पातशाहींत माणूस कोणी नाहीं'. ह्मणून पातशाहा व नवाब नजबखान स्वामींची तारीफ दोन घटकांपर्यंत करीत होते. शेवटीं पातशाहांनीं नजबखानास आज्ञा केली कीं, कांहीं तुह्मीं आपली तारीफ पातशाहींत दाखविणें. त्याचें उत्तर नजबखान बोलिले कीं, ईश्वरकृपेनें सत्वरच नमुदांत येईल. याप्रमाणें बोलणीं जालीं. पुढें प्रत्ययास येईल तें लिहूं. श्रुत होय कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ५९.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'सिपरी कोलारसाकडून पलटणावर राजश्री महादजी शिंदे फौजसुद्धां चालून गेले. तिकडील वर्तमान वरचेवर तुह्मांस कळतच असेल. शिंदे यांणींही तुह्मांस पत्रें लिहिलीं असतील. त्याप्रमाणें तुह्मीं पातशाहांसीं व नजबखानबहादूर यांसीं बोलोन, नजबखान यांनीं सरंजामसुद्धां तयार होऊन इंग्रेजांचे पलटणावर तिकडून यावें. इकडून शिंदे दुहेरी तान बसल्यानें पलटणें गारत होतात. पुढें शिंदे फौजसुद्धां नजबखान मिळून थोरली मसलत होईल. यांत कामें फार निघतात. नेक सलाह आहे. इंग्रेजांवर मोठी गालबता होती. पुढें निर्वैर, कलकत्त्याकडील मसलत करावयास चांगलें. इतकीयांत शिखांसींही सलूख होऊन सामील होतील. नजबखान व शिंदे यांचे विचारें छावणी कोणे ठिकाणीं करावी ह्मणजे बादबरसात नीट पडेल. याप्रमाणें तुह्मीं कारस्थान करून नजबखान यांचे निघण्यास दिरंग लागेसा असलियास फौज सरंजाम पुढें फौज पलटणें इंग्रेजी पलटणांवर रवाना व्हावीं. मागाहून त्यांनीं निघावें. या गोष्टीस दिवसगत न लागावी. लिहिल्याप्रमाणें घडावें. यांत पुढील मनसब्यास फार उपयोग आहेत'. ह्मणून लिहिलें. त्यास आज्ञेप्रमाणें यांसीं हा मजकूर बोलिलों. नजबखानानें उत्तर दिल्हें कीं, 'आमची फौज हातावर. आमचे पदरीं पैका नाहीं, कीं फौजेस वांटून रवानगी करावी. जे फौज सरंजामी, ते फौज मिर्जासफीखान याजपासी कुंजपुऱ्याकडे अटकिली. त्यास बादबरसात मीच पातशाहासहित फौजसुद्धां बाहीर निघतों. मीं निघाल्याखेरीज वेगळी फौज पुढें पाठविली, तर फौजेची आब राहाणार नाहीं. आह्मांपासीं पैका नाहीं, व राजश्री पाटिलबावापासीं मागावा, तर त्यांपासींही पैका नाहीं. याजकरितां ईश्वरइच्छेनें मीच पातशाहासुद्धां बाहीर निघतों'. ह्मणून बोलतात. प्रत्ययास येईल तें मागाहून विनंती लिहूं. कृपा केली पाहिजे. नजबखानांनीं व शिंदे यांनीं एक होऊन, ... छावणी एकविचारें करून अंतरवेदींत शिरावें. येविषयींचीं उत्तेजनें तऱ्हतऱ्हेनें दिधलीं. परंतु अमलांत न आलें. यास्तव हलीं सेवकानें निग्रह केला कीं, तुह्मांस पातशाहीची रीत करणें नाहीं, तर आह्मांस आज्ञा देणें. श्रीमंत स्वामींपासीं जाऊं व दुसरी तदबीर त्यांस सुचवूं. आपणाकडील नाउमेद जाली. आमचें तुमचें लिहिण्याची अ (?) चांगली श्रीमंताचें मनांत दृढ जाली. अतःपर उमेदवार करावें व लिहावें व लिहिवावें. यांत सलतनतीस उत्तम नाहीं, व दगा खाल.

याप्रमाणें समर्पक स्नेहवादें लाजविलें. त्याचीं उत्तरें विशेष त्यांनीं केलीं. तात्पर्य, निश्चय ठराविला कीं, वर्षाकालानंतर निघतों. अंतर करणें नाहीं. न निघालों तर आमचें नुकसान भारी. यास्तव शत्रूचें निःपात करणेंच सलाह. सेवेसीं विनंति ल्याहावयास बहुत ममतेनें व इरादियानें शपथा वाहून सांगितलें, तें लिहिलें असे. पुढें अमलांत येईल तें खरें. सेवेसीं श्रुत होय. दर्शन घडे ते सुघडी. हे विनंति."

लेखांक ६०.

श्रीवरद. १५ आगष्ट इ. स. १७८१.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, 'पेशजीं कर्नेल गाडर कलकत्त्याहून आला, तो सुरतेस होता. तेथून पाण्याचे मार्गें अडचणींतून आपले जमावानिसीं मम‍ईस आला. मम‍ईकरांसीं व त्यासीं कौशल जाहालें. तेव्हां कोंकणांत वस‍ईवर हंगामा सुरू करतील ऐसें समजोन, वस‍ईंत सरंजाम पहिला होता, आणखीही सरंजाम पोख्त करून मजबुती केली होती; त्यास इंग्रेज येऊन वस‍ईस नमुद जाले. त्याजवरून सरकारांतून रामचंद्र गणेश बमय फौज व सरंजाम किल्याचे कुमकेस पाठविले, कीं एकीकडून किल्याचा मार व दुसरीकडून फौजेचा माहासरा. येणेंकडून मुखालिफ यानें घायास येऊन अंदेशांत यावें. त्याप्रमाणें मशारनिल्हे फौजसुद्धां जाऊन पोहोंचले. इतकीयांत हरामखोरांनीं वस‍ईचा किल्ला इंग्रेजांचे हवालें केला. उपरांत रामचंद्र गणेश यांची व इंग्रेजांची लढाई चांगली जाहाली. ते लढाईंत खासा रामचंद्र गणेश व कांहीं लोक कामास आले, व इंग्रेजांकडील कांहीं लोक व सरदार ठार व जाया जाले. त्यानंतर सरकारचे फौजेंत त्यांचे पुत्र माधवराव रामचंद्र होते. ते फौजसुद्धां इंग्रेजांस माहासरा देऊन राहिले होते. मागाहून राजश्री हरिपंत यांस बमय फौज हुजुरात व तोफखाना व पायदळ बोरघाटाखालें गाडराचे मुकाबिल्यास पाठविले, व राजश्री तुकोजी होळकर इंदुरास होते, त्यांस पत्रें सरकारांतून पाठविलीं होतीं कीं, तुह्मीं आपले फौज सरंजामसुद्धां निघोन खानदेशांत सुलतानपूर नंदुरबार येथें केशवपंत दातार व चंद्रराव पवार, दोन चार हजार फौज व दोन पलटणें इंग्रेजी व तोफा ऐसा जमाव करून हंगामा केला आहे, त्यावर गणेशपंत बेहरे सरकारांतून फौजसुद्धां आहे तेथें तुह्मींही येऊन केशवपंतास तंबी पोहोंचाऊन दरमजल हजूर यावें. त्यावरून होळकर बमय फौज व सरंजाम निघोन नंदुरबारेस येऊन, गणेशपंत बेहरे व आपण मिळोन केशोपंत यांची तंबी करून दोन

पलटणें गारत केलीं. चार तोफा व दोन हत्ती व दोन हजार बंदुका व घोडी वगैरे सरंजाम पाडावा आला व चंद्रराव पवार ठार जाले. केशोपंत एकलाच पळून झाडींत गेला. उपरांत गणेशपंत यांसीं सुरत प्रांतांत ताख्तताराजी करावयास रवाना केलें. तुकोजी होळकर दरमजल हजूर आले. श्रीमंतांची भेट जाहालियावर राजश्री हरीपंत यांजकडे रवाना केले. ते बोरघाटावर जाऊन पोहोंचले. इतक्यांत गाडर वसईहून निघोन बोरघाटाचे रोखें अडचणींतून येऊं लागला. तेव्हां राजश्री हरीपंत व पुढील फौज मिळोन, दोन टोळ्या करून, दुतर्फा माहासरा देऊन तोफांची मार होत होती. परंतु तेथें मैदान नाहीं; अडचणीची जागा; फौजेनें निकड केल्यानें काम होणार नाहीं; सबब मैदानांत आणावयाचे तजविजींत होते. इतक्यांत इंग्रेज मगरुरीनें बोरघाट चढून घाटमाथां आला. नंतर राजश्री परशरामपंत मिरजकर यांस दहा हजार फौजेनसीं कोंकणांत इंग्रेजांचे पछाडीस रसद बंद करून पायबंद द्यावयाकरितां पाठविले आहेत. त्यांनीं दोन हजार बैल गल्याचे व किरानवाबेचे छकडे वगैरे रसद जात होती ते मारून आणिली. घाटावरते इंग्रेजांचे मुकाबिल्यास राजश्री हरीपंत व होळकर तीस हजार फौज व तोफखाना व पंधरा हजार पायदळ समेत आहेत. रोज लढाई सुरू आहे. इंग्रेजांकडील दोन तीन सरदार, कांहीं लोक गोळ्यांनीं व बाणांनीं ठार जाले. त्यांचे लष्करांत रसद पोंचत नाहीं, यामुळें माहागाई फार आहे. दहा अकरा पलटणें व तीस पसतीस तोफा व एक हजार तुरुक स्वार याप्रमाणें त्यांचा सरंजाम आहे. घाटाखालें व घाटावर सरकारी फौजा आहेत. सबब इंग्रेज बहुत फिकिरींत व आंदेशांत आहे. घाटावर ज्या अडचणींत राहिला आहे, तेथेंच आहे. कूच करून पुढें येत नाहीं. राजश्री हरीपंताचे पुस्तगरमीवर आह्मींही दाहा हजार फौजेनसीं आठा दाहा कोसांचे फासल्यानें आहों'. ह्मणोन लिहिलें. तें सविस्तर अक्षरशा पारसी करून पातशाहांस व नवाब नजबखानांस येथें वर्तमान आगाऊ आलें नव्हतें, तें समजाविलें. त्यांनीं हें वर्तमान ऐकून आपली स्तुत तरतुदीची बहुत केली, कीं 'आज आठ वर्षें जालीं. घरच्या धण्याचा फितुर व मुख्य धणी तो लहान नादान, ऐसें असोन, इंग्रेजाचें झुंज आजपावेतों मोडिलें; व पुढेंही लढाईस मुस्तेद आहेत. हें काम दक्षणचेच सरदाराचें कीं इतके दिवस ठरून राहिले. ईश्वरें कारभारी व सरदार मुत्सद्दी दौलतीस द्यावे तर याप्रमाणेंच द्यावे'. ह्मणून बहुत प्रकारें स्तव करून बोलिले, कीं श्रीमंत माधवरायाचे ताले शिकंदर कीं, हैदरनाईकही झुंजास शरीक जाला. राजश्री नानांनीं इतकी मेहनत करून दौलत राखिली आहे. त्याप्रमाणें इंग्रेजांचे फंद फरेबांत येऊन

त्यांसीं सलूख किमपि न करावा. कदाचित् इंग्रेजांनीं दबून सलूख केला, तर पुढें सरंजाम करून घ्यावयास चुकणार नाहींत. याजकरितां सलाह हेंच आहे कीं, इंग्रेजास नेस्तनाबूत करावें. यांतच सर्वांचें रूप व अब्रू आहे. याप्रमाणें बोलून आपले ईश्वराचें नांव घेऊन श्रीमंतांस आशीर्वाद दिधला......कीं, ईश्वर त्यांस यश दे. ....

याप्रमाणें भाषणें जालीं, व हेही बोलिले कीं, माधवराव जाधवराई कोण आहे, त्यास इंग्रेजांचें बोलाविल्याप्रमाणें सलुकास पाठविलें, त्यास काय ठरलें? तेव्हां आह्मीं उत्तर दिधलें कीं, सलुकास पाठविलें नसेल. त्यांनीं बोलाविलें असेल. तर त्यांचा मनोदय व लांबी रुंदी पाहावयास पाठविलें असेल. हें वृत्त आह्मांस आलें नाहीं. लिहून उत्तर येईल तें अर्ज करूं. ह्मणून बोलून सेवेसीं श्रुत व्हावयास विनंति लिहिली असे. तर कृपा करून जाबसाल काय लागला आहे, तें लिहावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विनंति."

लेखांक ६१.

पै॥ छ १३ सवाल. **श्रीवरद.** ५ सप्टेंबर इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ १६ माहे रमजान मु॥ दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः– मिस्तर इष्टीन इंग्रेज कलकत्त्याहून श्रीकाशीस कुटुंब व सरंजामसुद्धां आला होता. त्यास श्रीकाशीचा राजा चेतासिंगासीं त्यांसीं बिघाड होऊन जुंझ जालें. इंग्रेजांची शिकस्त जाली. राजानें फौज मारून ताराज केली. इंग्रेज पळून पट्टणाकडे जात होता, तों राजाच्या फौजेनें पिच्छा करून, बारा कोसांवर मारून डोकें कापून आणिलें, व स्त्री धरून आणिली. फरुकाबादेस व अयुद्धेस व शृंगीरामपुरीं वगैरे जागा जागा फिरंगी होते, ते गव्हारांनीं जेथील तेथेंच मारून लुटून घेतले. स्वामींचे प्रतापें शत्रूचा नाश जाला. वरकड वृत्त तपशिलें राजश्री बाळाजी जनार्दन विनंति करितील त्यावरून श्रुत होईल. कृपा करून हस्ताक्षर पत्रोत्तरीं दर्शनलाभ देणार स्वामी समर्थ आहेत. दर्शन घडे ते सुघडी. हे विज्ञप्ति."

लेखांक ६२.

श्रीवरद. सप्टेंबर इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, ग्वालेरप्रांतीं राजश्री महादजी शिंदे आहेत. तेथें इंग्रेजांचे लोक आहेत, तेही बहुत जेर आहेत. जर श्रीकृपेनें त्यांचें पारपत्य सत्वर विजयादशमीचे अलीकडे होऊन राजश्री पाटीलबावा अंतरवेदींत कुरीयाकडे उतरतील, तर या दिवसांत वजीर व राजा चेतसिंग खर्चासही देतील, व फौजेसहित कलकत्त्यापावेतों चाकरीसही समागमें राहतील. याप्रमाणें समय आहे. श्रीकृपेनें घडेल तें मागाहून विनंति लिहूं. श्रीकाशीहून चेतसिंग राजाचेंही सूत्र सेवकाकडे आलें आहे. परंतु खातरजमा नाहीं. आह्मींही पत्रें पाठविलीं आहेत. खातरजमा जालीयावर हजूर विनंति लिहूं. मोठी खातरजमा, फौजेस खर्चास कबूल करून निशा पाठवितील, तर राजश्री महादजी शिंदे यांजला खातरजमा लिहूं; व सेवक त्यांजपासीं जाऊन येऊन, कांहीं फौज दिल्लीकडील घेऊन, श्रीगंगापारीं, व रोहिले, व अंतरवेदींतील बंगश वगैरे जमा करून, असफद्दौलास सामील करून घेऊन, श्रीकाशीस या मार्गें जावयास राजश्री पाटीलबावा फौज थोडीसी चांगली देतील तर घेऊन, स्वामींचे प्रतापें नक्ष होय तें ईश्वर करो! राजश्री पाटीलबावांनीं यमुनातीरानेंच श्रीकाशीस जावें. राजे चेतसिंग, बलवंतसिंगाचा पुत्र, श्रीगंगा आपले प्रांतांत पूल बांधून अथवा नावांवर उतरून घेईल, हा विचार सेवकानें आपले मनांत नेमून, राजे चेतसिंगास पत्रें पाठविलीं आहेत. खर्चाची सोय जालीयास घडोन येईल, तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. श्रीमंत स्वामींचा प्रताप वृद्धीतें पाविणार, स्वामींचे तखदिरीनें श्रीसांब समर्थ आहे. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६३.

श्रीवरद. २४ आक्टोबर इ. स. १७८१.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य पुरुषोत्तम महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंति. येथील कुशल तागाईत छ० ६ माहे जिलकाद मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखन करीत असावें. विशेष:— आपण छ० ९ साबानचें पत्र पाठविलें, तें छ० २ सवालीं सरकारजोडीसमागमें पावलें. पत्रीं आज्ञा कीं, 'इंग्रेज यांचें पारपत्य सर्वांनीं करावें. त्यांत पातशाहा खाविंद यास अगत्य. ....अनायासें काबू

साधला, ऐसी संधी पुढें करून केल्यास घडावयाची नाहीं. शिखांकडील मसलत करितां फौजा राजश्री माहादजी शिंदे यांजकडे येत्या, तर इतके दिवसांत सिपरीवरील इंग्रेजांचें पारपत्य करून, शिंदेसहित फौजा पुढें इंग्रेजांच्या मुलुकांत जात्या. अद्यापि शिखांकडील समेट होऊन फौजा रिकाम्या व्हाव्या. दसरीयाचे हंगामीं नवाब नजबखानबहादूर यांणीं सरंजामसहित यावें. शिंदे व त्यांनीं मिळोन सिपरीवरील इंग्रेजांचें पारिपत्य करावें. सहजांत होईल. उपरांत बंगाल्यांत अगर गंगापार जाण्याचा मनसबा करावा; यांत पैका मिळतो व लौकिक पातशाहीचा होतो. शत्रूची कमरशिलाणी होते, ऐसें आहे. सर्व मनसबे तुह्मीं पातशाहांसीं व नवाब मोसुफ यांसीं बोलून लिहिल्याप्रमाणें लवकर अमलांत ये तो अर्थ करावा. शिंदे यांजकडील वर्तमान वरचेवर इकडे येतच आहे'. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें पातशाहांसीं व नजबखानांसीं सविस्तर मजकूर श्रुत केला कीं, इंग्रेजांत कांहींच जीव नाहीं. वरचेवर तुह्मांकडे वर्तमान येत असतां, ईश्वरें मुलूख दिल्हेला असतां, तुह्मी घेत नाहींत. श्रीमंत पातशाही बंदे आहेत. ज्यांत पातशाहांची सरसबजी, ते गोष्ट समयास पातशाहांस व आपल्यास अर्ज करावा, याजकरितां वारंवार आह्मांस आज्ञा लिहितात. त्याजवरून अर्ज करितों. नाहींतरी इंग्रेजांचें पारपत्य दक्षिणेस करणें तें केलें, व ग्वालेर प्रांतीं राजश्री महादजी शिंदे पाठविलेच आहेत. श्रीकृपेनें या इंग्रेजांचें पारपत्य सत्वरच ते करतील, व हैदरनाईक व निजामअल्लीखान आपलाले सरहद्देस इंग्रेजांचें पारपत्यास गेलेच आहेत. आणि या दिवसांत इष्टीन इंग्रेज .... काशीचे चेतसिंग राजानें मारून, तमाम पटण्यापावेतों मुलूख खाली करून घेतला असतां, आणि आपण फौजेसहित घरोघर बसिलें राहावें, हें धणीपणास योग्य नाहीं. आह्मीं तों कदीम पातशाही बंदे आहोंत. या पातशाहीकरितां विलायतचे पातशाहांसीं झुंजून कैलासवासी विश्वासरावसाहेब व भाऊसाहेब व जनकोजी शिंदे व येशवंतराव पवार आदिकरून सरदारांनीं जहांबाजी केली व सर्व दौलत खर्चली. इतकेंही होऊन आतांही आमचा धणी लहान व कारभारी यांणीं तरतूद करून, आज सात वर्षें झुंजत मारीत फिरतात. हे कदर आपण मनांत आणावी कीं सरकार चाकरीवर जाफिशानी करितात, किंवा त्यांचें पोट भरत नाहीं ह्मणून मेहनत करीत फिरतात? ऐशा नानाप्रकारें उत्तेजनाच्या गोष्टी बोलून, दसरियाचे दिवशीं पातशाहांकडून व नजबखानांकडून प्रस्थान ठेविलें आहे. यांचे तोफखान्याची व फौजेची तयारीच आहे. दिपवाळीचे अलीकडे येथून कूच करून आगरीयास चालतो. तेथें गेलियावर तुह्मांस पुढें राजश्री महादजी शिंदे यांजकडे रवाना करितों. तुह्मीं त्यांस आगरीयापलीकडे दाहा पंधरा कोसांवर

घेऊन या. व त्यांचा आमचा कौल इमान भेटी जालियावर, परस्परेंच सलाहानें जे मसलत उत्तम जाणूं तें करूं. याप्रमाणें बोलणें करारांत आणून प्रस्थान ठेविलें आहे. प्रत्ययास येईल तें मागाहून विनंति लिहूं. यांनीं आपणास पत्र व पातशाही शुका पाठविला आहे, त्यावरून ध्यानास येईल. यांचें लिहिणें व बोलणें स्वामींचे प्रत्ययास येईल तें खरें. जोंवर शत्रू निःशेष होय तोंवर यास ममतेंत लावून घेऊं. करारास अमलांत आणावयाचें सेवक अहर्निश हित उपदेश करीतच आहे. घडोन येईल तें विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन. हे विज्ञप्ति."

लेखांक ६४.

श्री. जून इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, "खुशकींतील दौलती आपले कबजेंत आणाव्या, हें मनांत आणून त्यांनीं खुशकींत कदम टाकून दौलती पेंचांत आणिल्या. यांची चाल दुरुस्त नाहीं. पातशाहींत अमर्यादा करूं पाहतात. हें समजोन पारपत्याचा नक्षा ठरविला. त्यापासून तंबीवर फौजा राहून लढाया राहिलेल्याच आहेत; व सिकस्तही पावून दर्या व किनारा आश्रयास जातात. तथापि फौजा मुकाबिल्यावर आहेत. चहूंकडून तंग करून, खुशकींत पुनः पैरवी न करीत, ऐसें केलें असतां, पातशाहींत नक्ष! ऐसें समयांत पातशाहांनीं त्यांचें भय पोटांत धरून मसलत करावयास पर्याय आणून टाळाटाळ करितात. त्यास इंग्रेज जबरदस्त पडल्यावर तख्ताची मर्यादा ठेवितील कीं काय? सर्व सरदार एकदिल होऊन तंबीवर नमूद आहेत. ऐसा वख्त पारपत्यास यावयाचा नाहीं. ऐशा समयांत पातशाहा व नजबखान मसलत करावयाची उपेक्षा करितात. येणेंकरून इंग्रेजांची चाल मनांत दूरआंदेशानें येत नाहीं, ऐसा अर्थ दिसतो. येविसीं वारंवार काय ल्याहावें? ज्या गोष्टींत पातशाहाची अमर्यादा होय, ऐसा विचार त्यांनीं पाहून करणें तें करावें. शिंद्यांनीं सलूक केला ह्मणतात. त्यास, शिंदे सरकारचे पदरचे सरदार. हुकुमाखेरीज सलूख कैसा करतील? सिपरीवरील पलटणें घेऊन दहा महिने पातशाही सरंजामाची प्रतीक्षा करीत राहिले. * * * * * मोहिमीवर न निघाले, आणि इतला * * * * ठीक नाहीं. इंग्रेज मिनत करीत * * *

त्याजपासून पाडाव घेऊन यमुनापार जाऊं द्यावें. आपण पाठीमागून जावें. ह्याही इरादा धरून, पाडाव घेऊन लावून देऊन, पुढील मसलतीवर नमूद आहेत. पातशाहांनीं निघावें; त्यांनीं आपण मिळून मसलत करावी ही प्रतीक्षा करितात. ऐसें असतां त्यांनीं सलूख केला, ही आशंका धरून राहणें ठीक नाहीं. वरकड शिंद्यांचीं पत्रें तुह्मीं खातरजमेचीं आणिविलींच आहेत. आलीं असतील. याउपरी पातशाहा बाहेर निघून, शिंदे व ते एक होऊन, मसलत व इंग्रेजांची तंबी घडे तें करावें; यांत सर्व चांगलें आहे. तुह्मीं उघडून तेथें बोलण्यांत आणून, पातशाहांसीं व शिंदे यांसीं गांठ घालून मसलतीचा उपयोग जाला ह्मणजे तुह्मीं येणें तरी यावें. पातशाहा व नजबखान यांचे पत्रांचीं उत्तरें पाठविलीं आहेत. त्यांच्या नकला तुमचे पत्रांत घालून पाठविल्या आहेत त्यावरून कळेल. अलीकडे हैदरनाईकाची व इंग्रेजांची लढाई मातबर जाली. हैदरखानांनीं एक टोळी इंग्रेजांची, आठ हजार माणूस, पलटणें व तोफासुद्धां होतीं, ते गारत केली. कर्णेल बास [बेली ?] सरदार मुख्य टोळींत होता तो, व एकूणवीस सरदार पालखीनसीन व तीनशें गोरा इंग्रेज व तोफा पाडाव आणिले. बहुत खराबी इंग्रेजांची जाली. व सरकारचे फौजेची व इंग्रेजांची, कोहन मकान सरकारचें आहे तेथें लढाई जाली. सिकस्त होऊन एक सरदार इंग्रेजांचा पालखीनसीन पाडाव आणिला. बंदुखा वगैरे पाडाव आणिलें. इंग्रेज पाणीयाचे आश्रयास गेला. शहावर फौज आहे. बाहेर पडूं पावत नाहीं. पुढें होईल तें लिहून पाठवूं. इंग्रेजांवर सरकारचे फौजेची व हैदरनाईकाचे फौजेची जबरदस्ती पडली ह्मणजे पाण्यांतील जाग्यांत जाऊन राहतात. फिरून कांहीं दिवस बाहीर निघतात. मागतीं नामोहरम जाले ह्मणजे जात, असें जाणून सरकारांतून .... नानांनीं फरासीसांचे पातशाहास पत्रें पाठविलीं. * * * * * व वलंदेज मिळोन साठ जहाजें व माणूस लढणार पाठविलें. सरदारही मातबर आहेत, ते फुलचरीस येऊन दाखल जाले. पत्रें आलीयाउपर इंग्रेजांचें काय होतें तें ऐकाल. विशेष काय ल्याहावें. पगडीवाल्यांच्या जुरतीच गेल्या! लिहून काय व्हावयाचें बरें! पातशाहाची बंदगी जेथवर बजावून आणावयाची ते आणूं! चिंता नाहीं." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास या पत्राचा अन्वय अक्षरशः पातशाहांस समजाविला. व अफराशा * * * तूर्त नजबखानाचे जागा त्याचा चेला * * * * करितो त्यासही समजाविलें. खान * * उत्तर केलें कीं, श्रीमंतांहीं राजश्री पाटीलबावांस ताकीद लिहून पाठवावी कीं, पातशाहापासीं येऊन यांस सामील करून घेऊन पुढें मसलत करावी; आह्मी या गोष्टीस सिद्ध आहोंत. ह्मणून बोलून, आपण

नजबखानांस पत्रें लिहिलीं होतीं, त्यांचीं उत्तरें या अन्वयांनीं आपले नांवें लिहिलीं आहेत. त्यावरून ध्यानास येईल. नजबखानाचे घरांत बघेडा आपसांत जाला आहे. त्याची विनंति अलाहिदा पुरवणीपत्रीं लिहिली आहे. या प्रसंगीं राजश्री पाटीलबावांचें येणें बहुतच उपयोगी. नजबखान मृत्यु पावल्यापासून येण्याविषयीं पत्रें बहुत पाठविलीं. व पातशाहांनीं शुक्के बहुत पाठविले. या प्रसंगीं येथें येणें जाल्यास विपुल द्रव्य हातीं लागेल, व विना लढाई कार्य व्हावें, हा प्रसंग येथील आहे. फोडाफाड लोकांची करून त्यांचींही सूत्रें लिहिलीं, परंतु कोणे प्रकारें येणें होतां दिसत नाहीं. सांप्रत येथील कित्येक सरदारांचीं सूत्रें व पृथ्वीपतीचें अनुमत घेऊन, पत्रें अंतस्त घेऊन, आह्मी आज स्वार होऊन फरीदाबादेस आलों. दरमजल पाटीलबावांपासीं जाऊन सर्व सांगून येथें येणें जाल्यास अल्प आयासें महत्फळ होईलसा समय आहे. येथील सर्व सलतनत हातीं लागल्यास बंगाल्याकडील इरादा जो केला तो सिद्धीस जाईल. इकडील सर्व अनुकूल आहेत. त्यांचें येणें जाल्यास, पातशाहांचा जोड पडून अंतरवेदींत उतरणें होईल. यास्तव पातशाहांची आज्ञा घेऊन चाललों आहों. पाटीलबावांची भेट जालीयावर, होईल तें साकल्य विनंति लिहूं. श्रुत होय. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति.''

लेखांक ६५.

श्री. ९ जुलईनंतरचें इ. स. १७८२.

''विज्ञापना ऐसीजेः--आमदानीचें व दिल्लीकडील सरदारांचें विरुद्ध पडलें; यामुळें पातशाहाजाद्यास घेऊन, मिर्जासफी व अफरासियाबखान वगैरे आग्र्यास आले. त्या उभयतांकडील मातबर राजश्री पाटीलबावांकडे आले आहेत. याउपर होईल तें मागाहून लिहून पाठवीन ह्मणोन वर्तमान पूर्वीं येथून विनविलें होतें. त्यावर, आमदानीचें त्यांचें परस्परें तिकडील तिकडेच रहस्य होऊन भेटी जाहाल्यावर अफरासियाबखान कोलजलेश्वराकडे माघारा गेला. आमदानी जयपुराकडे गेला. मिर्जासफी पातशाहाजाद्यासहित भरतपूर तालुक्यांत मासपक्ष होता. अनुपगीर गोसावी त्याजकडून पहिल्यानें पाटीलबावांकडे आला होता. त्यावर मिर्जासफी यांनीं पाटीलबावांकडे गोसाव्याचे हातून बोलणें लाविलें कीं, आमची आपली भेट होऊन स्वच्छता व्हावी. नजबखानाचा आपला भाऊपणा होता; त्याचा काल जाला. त्याचे पाठीमागें आह्मांस आपण वडील आहेत. आमचा

परामर्ष करावा. यांत परस्परें लौकिक आहे. याप्रमाणें बहुत घरोब्याचें बोलणें लावून भेटीचा निश्चय ठरविला. त्यावर पाटीलबावांनीं सांगून पाठविलें कीं, आमदानी जयपुराकडून माघारा आला आहे. त्याची भेट आह्मी घेणार नाहीं. तुह्मीं त्यास समागमें घेऊन येऊं नये. ही गोष्ट त्यांनींही मान्य करून आमदानीस बारा चवदा कोस मागें टाकून, मिर्जासफी पातशाहाजाद्यास व बेगमेस घेऊन दहा बारा हजार फौज, व नऊ दहा पलटणें, ऐशी नव्वद तोफा, याप्रमाणें सरंजामानसीं ढवळपुरचे सुमारें आला. इकडून पाटीलबावा चार पांच हजार फौजेनसीं सडे होऊन गेले. त्याजकडील सरंजाम भारी होता, व यांस संशय बहुतांनीं घातला कीं, तुरुक दिल्लीवाले आहेत, विश्वास धरूं नये. त्यावरून यांणीं त्यांजकडे सांगून पाठविलें कीं, हजार दोन हजार फौजेनसीं पुढें चमेलीनदीवर यावें. त्यावरून त्यांनीं आपली फौज चार कोस मागें टाकून, पातशाहाजादा व नजफखानाची बहीण बेगम यांस घेऊन, हजार दोन हजार फौज व तीन चार पलटणें, दहा पांच तोफा, एवढ्या सरंजामानसीं नदीवर आले. इकडून पाटीलबावा गेले. यांच्या त्यांच्या ज्येष्ठ व॥ चतुर्दसीचे दिवसीं भेटी होऊन, चमेलीचे पैलतीरीं ते राहिले. ऐलतीरीं पाटीलबावा राहिले. चार पांच रोज मुक्काम परस्परें होऊन, पातशाहाजाद्याची मुलाजमत वगैरे सर्वत्रांच्या भेटीचा समारंभ, आगतस्वागत, वस्त्रें, जवाहिर, घोडे, हत्ती, तोफाताफा, सवगात बावांनीं त्यांस दिल्हें. त्यांणीं बावांस दिल्हें. समुदाय बराबर होता. त्यांसही वस्त्रें भूषणें परस्परें दिल्हीं, घेतलीं. दोन तीन वेळ हे त्यांच्या डेऱ्यास गेले. मिर्जासफी, यांच्या डेऱ्यास आले. इंग्रेजांचा वकील एक त्याबराबरही होता. त्यांणीं यांस भेटविला. यांणीं इंद्रसेन मिर्जासफीस भेटविला. याप्रमाणें समारंभ पाटीलबावांचें तेज त्यांजवर गालीब राहून यथास्थित जाहला. गोसावी दरम्यान होता. त्याणें जशी यांची खातरजमा केली होती तसाच प्रसंग बावांचे मर्जीनुरूप चांगला उरकला. जसा नजबखानांचा यांचा भाऊपणा होता, त्याप्रमाणेंच मिर्जासफींनीं पगडीबदल भाऊपणा बावांसीं करून, 'सर्वप्रकारें आह्मी आपले आहों. दिल्लीकडील बंदोबस्त यथास्थित नाहीं, याकरितां आपण तिकडे चलावें. आमचा बंदोबस्त पातशाहीचा करून द्यावा,' याप्रमाणें बोलणें लाविलें. बावांनीं उत्तर केलें जे, 'उत्तम आहे. ग्वालेर गोहदची मसलत उरकली ह्मणजे बाद्बरसात तिकडे येऊन तुमचा बंदोबस्त यथास्थित करून देतों.' याअन्वयें उभयपक्षीं रहस चांगलें होऊन, ते तिकडे कूच करून गेले. पाटीलबावा मागतीं मुक्काममजकुरीं आले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ६६.

श्री. ४ सप्टेंबर इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहाजवळ कारभारी जो होईल, त्याजपासून सरकारचे दौलतीविषयीं इमानें इतबारें चालावें असा दस्ताऐवज लिहून घेऊन पाठऊन देणें कीं, सरकारचे लक्षाप्रमाणें चालूं. यांत अंतर करणार नाहीं." ऐसें शपथपूर्वक लिहून घेण्याविषयीं आज्ञा. त्यास, नजबखान मेल्यापासून दिल्लींत बखेडाच होत गेला, तों सांप्रत बहुतच हवा तेथील बिघडली आहे. एक कारभारी व हिंमतीचा माणूस नमुदास येत नाहींत. अबदुल अहदखान सुटले होते, ते पुनः कैदेंत आले. सांप्रत गर्दी जाली आहे. मासपक्षांत निवळून इतक्यांत जरब होऊन ज्याची चीज होईल त्यासी आज्ञेप्रमाणें माफलात करून, पकाई करून घेऊन सेवेसीं पावतील. सांप्रत गर्दी दिल्लींत जाली आहे. आपसचा कलह तुटून एक पक्कें जालयावर त्यांची पकाई होईल. पत्रें घेऊन सेवेसीं पावतील. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६७.

श्री. सप्टेंबर इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहाजवळ नवा कारभारी होईल त्याजपासून सरकारचे दौलतीविसीं इमानें इतबारें चालावें, ऐसा दस्तऐवज लिहून घेऊन पाठऊन द्यावा. सरकारचे लक्षाप्रमाणें चालायांत अंतर करणार नाहीं, ऐसें शपथपूर्वक लिहून घ्यावें ह्मणून आज्ञा. त्यास, आतां तूर्त परस्परें कलह आहे. दोहींतून एक ठरल्यावर आज्ञेप्रमाणें दस्तऐवजीं कौलनामा शपथपूर्वक घेऊन पाठवितों. इतकियांत विजयादशमी जालियावर कदाचित् राजश्री पाटिलबावा अथवा सरकारांतून हजूरची फौज किंवा होळकर आले, तरी येथील अधिकार सर्व सरकारचाच आहे. सूचनार्थ विज्ञप्ति लिहिली असे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ६८.

श्री. सप्टेंबर इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, "मिर्जासफीकडील राजश्री पाटिलबावांकडे बोलणें लागलें आहे, व मागाहून राजे मनीराम यांसही पाटिलबावांकडे पाठविणार होते. ते गेले असतील, व दिल्लीहून आनंदराव नरसीसही पाठविणार. तेही गेले असतील. बोलणीं होऊन ठराव जाला असेल, तो सविस्तर लिहून पाठवावा." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास मिर्जासफीखानासीं व राजश्री पाटिलबावांसीं भेटी जाल्या. त्या गोष्टीस दोन मास जाले. स्वामींस आह्मीं विनंति इतक्याकरितांच लिहिली नाहीं कीं, त्या कारभारांत अनुपगीर गोसावी होता. आणि भेटी चमेल नदीचे कांठीं आटेरीसमीप जाल्या. तेथें आह्मांकडील कोणी नव्हतें. ठराव जाला व दार मदार कसा जाला व कौलकरार कैसा ठरला, हें वृत्त कच्चें, राजश्री नारो शिवदेव पाटिलबावांपासीं आहेत त्यांनीं सविस्तर कच्चें वृत्त तेथील ऐकिलें पाहिलें असेल. तें त्यांनीं लिहिलें असेल. ह्मणून सेवकानें ल्याहावयाची सुस्ती केली. परंतु ऐकिल्यांत आलें कीं, परस्परें स्नेह शिष्टाचार, हत्ती, घोडे, वस्त्रें, जवाहीर देऊन, एकोपा होऊन पगडीबदली भाईचारा जाला; आणि कौलकरार जाला कीं, आमचा दुष्मन तो तुमचा दुष्मन. आमचा दोस्त तो तुमचा दोस्त. याप्रमाणें मोघम कौलकरार परस्परें जाला, व बोलण्यांत आलें कीं, ग्वालेरचे व गोहदचे मोहिमेपासून रिकामे जालियावर मग तुमचे आमचे विचारें सलतनतचा बंदोबस्त करावा. तोंपावेतों तुह्मीं पातशाहांची खर्चाची आबाळ होऊं न द्यावी. ह्मणून पाटिलबावांनीं निर्वणूक करून देऊन, ते ग्वालेरीकडे कूच करून गेले. मिर्जासफीखान कूच करून डिगेस आले. तेथें छावणी करून आहेत. पुढें अमलांत येईल तें विनंती लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ६९.

श्री. २५ सप्टेंबर इ. स. १७८२.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:-

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १७ माहे सवाल मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनें-

करून यथास्थित असे. विशेषः– छ. २२ साबानचें आज्ञापत्र सादर जालें. तें छ ५ सवालीं पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, "नवाब अफराशाबखान व हमसिरा बेगम यांस तुह्मीं लिहिल्याअन्वयें पत्रें लेहून खलिते पाठविले आहेत." ह्मणून लिहिलें. त्यास आज्ञेप्रमाणें हमसिरा बेगम यांचे खलिते देऊन उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत, व नवाब अफराशाबखान यांचा व मिर्जासफीखान यांचा घरकलह. याजकरितां पातशाहापासील कारभार सोडून, त्याचा सरंजामी मुलूख कोळजळेश्वर वगैरे महाल आहेत तेथें गेले. आतां मीरबक्षीगिरी व मुख्त्यारी तूर्त मिर्जासफीखान यांजकडे जाली आहे. यांचे खलिते घेऊन पाठविले आहेत. उत्तरें समाधानपूर्वक स्नेहवृद्धीचीं बेगमेचीं व नवाब मिर्जासफीखान यांचीं ल्याहावयास आज्ञा करावी. वरकड इकडील सविस्तर राजश्री बाळाजी जनार्दन यांचे पत्रीं लिहिलें आहे. ते विनंति करतील त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ७०.

श्री. सप्टेंबर इ. स. १७८२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, येथून खलिते व शुके पातशाही पाठविले आहेत. ब तपसीलः—

३ श्रीमंत स्वामींचे नांवें.

- १ मिर्जासफीखान यांचें पत्र.
- १ हमसिराबेगम यांचें पत्र.
- १ शुका पातशाहांचा.
- ३

४ आपले नांवें.

- १ मिर्जासफीखान यांचें पत्र.
- १ हमसिराबेगम यांचें पत्र.
- १ पातशाहांचा शुका.
- १ आपण पातशाहांस अर्जी पाठविली होती, तिचा जाब बहुत ममतापुरस्कर लिहिला आहे. व अंतस्त सांगितलें कीं, 'या समयीं फौज येईल तर उत्तम आहे, व पाटलांसही ताकीद तुमचे हजुरीहून होय कीं, सत्वर हजुरांत येऊन हजर होय

तें करणें.' ह्मणून आह्मांसही विनंति ल्याहावयास सांगितलें व शुक्यांतही लिहिलें असे.

४

७


सदरहू सात पत्रें पाठविलीं आहेत. उत्तरीं लोभ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ७१.

श्री. ता. २५ सप्टंबर सन १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विज्ञापना कीं, पेशजीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. त्यांवरून सविस्तर श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा नजबखानाकडील सरदार फौज दिल्लींत आहेत. शीख हरिद्वारापासून तो दिल्लीपावेतों अंतरवेदींत लुटीत फिरतात. नजबखानाचे सरदार व भाचे व चेले यांची अपसांत परस्परें चित्तशुद्धता नाहीं. त्यास, नजबकुलीखान चेला व अफराशाबखान चेला हे दोघे घरचे एक विचारें. व नजबखानाची बहीण व भाचे जेनुलअबदीखान व मिर्जासफीखान व मिर्जाजाफर ऐसे एकविचारें. ऐशा दोन फळ्या जाल्या आहेत. त्यास नजबकुली व अफराशाबखान यांनीं छ० २ रमजानीं नवाब अबदुल अहदखान यांस कैदेंतून सोडून, पातशाहाकडून हत्ती, घोडा, जवाहीर, जेगा, सिरपेंच व मलहूजखास वस्त्रें देऊन, सर्फराज करून, खालशाची मुख्त्यारी नायब वजीर बदस्तुर केलें. यांनीं एक मास कारभार करून, कांहींसा बंदोबस्त डौलावर आणून, मिर्जासफीखान यांस स्वाल केला कीं, खालशाचे महाल तुह्मांकडे आहेत ते व तोफखाना सरकारांत द्यावा. त्याजवरून करार मदार ठरतां ठरला कीं, मरेट वगैरे आठ महाल व पानिपत वगैरे चार महाल एकूण बारा माहाल सोडावे, व तोफखान्यापैकीं एकूणवीस तोफा द्याव्या, व नख्त तीन लक्ष रुपये. त्यापैकीं तूर्त पाऊणलक्ष, व खरिफावर पाऊण लक्ष, व रबीवर दीड लक्ष, येणेंप्रमाणें झाडा करून द्यावा. आणि छ २५ रमजानीं मिर्जासफीखान यांस मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें द्यावीं. हा विचार ठरला. इतकियांत अफराशाबखान ह्मणूं लागेल कीं, 'म्यां आजपावेतों पातशाहांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक केली. किल्यांत व नजबखानाचे हातचा बंदोबस्त पलटणें होतीं, तीं उठविलीं. किल्ला पातशाहांचे काबूंत करून दिल्हा. व नायब वजीर, अबदुलअहदखान यांस सोडून दिल्हें, व तीन लक्ष रुपये खर्चास दिल्हे.



सफदरजंगाची कबर.—दिल्ली.

इतकी खिजमत केली असतां, नायब वजीर अबदुल अहदखान व मीरबक्षी मिर्जा सफीखान! तेव्हां मी कांहींच न राहिलों ? याप्रमाणें जाबसाल करून दिल्लीचे बंदोबस्तास नजबकुलीखानास ठेऊन, आपण, बमय तोफखाना जो त्याजपासीं होता तो व फौजसुद्धां, लताफतअलीखान खोजा–पातशाहांचे तैनातीस वजिराकडून पेशजीं होता, हल्लीं तिकडील चाकरी सुटून अफराशाबखान यांजकडेस चौ पलटणांनसीं चाकर राहिले आहेत त्यासुद्धां–कूच करून कोलजलेश्वरास जाऊं लागले. तेव्हां पातशाहांनीं उत्तर केलें कीं, "आज सा महिने जाले, नजबखान मृत्यु पावले त्या दिवसापासून तुह्मांस मुख्त्यारीचे सात खिलत दिल्हे, व तोफखाना दिल्हा. व पातशाहाजादा समागमें करून दिल्हा. इतकेंही असतां तुमच्यानें बंदोबस्त न जाला. आतां रुसून जातां. हें तुह्मांस काय उचित आहे?" अशीं परस्परें भाषणें होऊन, निदान अफराशाबखान कूच करून कोलेस गेले. मागें छ २ सवालीं, मिर्जासफीखान यांनीं तमाम फौज व तोफखाना तयार करून, किल्यापासून निगमबोधपावेतों व त्रिपुल्यापासून कशमिरी दरवाजापावेतों कूचेबंदी मोर्चे लाऊन अबदुल अहदखान व नजबकुलीखान यासीं झुंज जालें. परस्परें हजार बाराशें माणूस जखमी जालें, व मारलें गेलें. जलालखान, तोफखान्याचा दारोगा, नजबकुलीखानाकडील मातबर माणूस मारला गेला. निदान अबदुल अहदखानास व नजबकुलीखानास व शिवराम दिवाण नजबखानाचा व त्याचा पेशकार नारायणदास येणेंप्रमाणें जीवंत मिर्जासफीखान यांनीं धरून आणून कैद केले आहेत. या गर्दींत नजबकुलीची व अबदुल अहदखानाची दौलत, तोफखाना, हत्ती, घोडे, जामदारखाना, बमय बेगमा व अर्धी दिल्ली लुटली गेली. लाखों रुपयांचे सराफांचीं व वाण्यांचीं नुकसानें शहरचीं जालीं, व या दोघांची तों दौलत सर्व बुडाली! व तमाम यांजकडे मुलूख होता, त्याचे जप्तीस फौजा रवाना केल्या आहेत; व अफराशाबखान यांजवरही फौज सुद्धां जाणार. छ० ४ मिनहूस झेंडे व डेरे यमुनापार गेले आहेत. पुढें काय होईल तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७२.

श्रीवरद. १० आक्टोबर इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं:–

विनंति कीं, छ २ जिलकादीं लखनऊहून बातनी पातशाहांचे येथें आली कीं, मवाटीन साहेब इंग्रेजांकडील मुख्तार लखनऊस होता, तो छ २७ सव्वालीं

वजिराचे येथें येऊन, असफउदौलासीं स्वाल केला कीं, 'आह्मांस एक करोड रुपये सरंजाम करून द्या.' यांनीं उत्तर केलें कीं, 'आह्मांपासीं पैका कोठें?' तेव्हां मवाटीन बोलिला कीं, 'तुह्मीं आपले आजीपासून व मातुश्रीपासून पैका घेऊन देणें.' यांनीं उत्तर केलें कीं, 'त्यांजपासीं पैका नाहीं.' हें बोलोन उठोन महालांत चालिला. इतक्यांत मवाटीनानें वजिराचा हात धरून बसवीत होता, तों वजिरानें हात हिसकून महालांत गेला, आणि बोलिला कीं, 'कोणी आहे?' इतक्यांत राजे भवानीसिंग अरजलीवाला समीप होता, तो ह्मणाला कीं मी हजर आहें. त्यास आज्ञा केली कीं, 'काय पहातोस?' त्याजवरून भवानीसिंगासीं व मवाटीनासीं तरवार चालून उभयतांही मारले गेले. हे बातनी आली. दुहराहून तथ्य येईल तें मागाहून लिहूं. * * * * इष्टीन व मवाटीन हे दोघेही सरदार मातबरच मारले गेले. इंग्रेजांचा पडदा मात्र आहे. पुढें लखनऊस वजिराचे येथें काय नक्षा ठरतो, तें वर्तमान पक्कें आलीयावर विनंति लिहूं. चेतसिंग राजा फौजबंदी करीतच आहे. * * * * * * * * * * * काशी प्रांतीं दरोबस्त बंदोबस्त आहे. याप्रमाणें वृत्त पातशाहांचें येथें आलें. मागाहून तथ्य वृत्त आलीयावर विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे. दर्शनलाभ होय तो सुदिन हे विनंति."

लेखांक ७३.

श्री. आक्टोबर अखेर इ. स. १७८२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे,—पत्रीं आज्ञा कीं, "पारसी पत्रें पातशाहास एक, व नवाब अफराशाबखान यांचे नांवचीं दोन, व हमसिरा बेगम यांचे नांवें दोन, व अबदुल अहदखान यांचे नांवें दोन, एकूण सात पत्रें पारसीचीं पाठविलीं आहेत. त्यांतील मजकुराच्या हिंदवी नकला तुम्हांकडे पाठविल्या आहेत. त्याजवरून साकल्य पारसी पत्रांतील समजेल. कलकत्त्याहून इंग्रेजांचे वकील दिल्लीस येणार, म्हणोन वर्तमान कळलें. त्यास, ते हरतऱ्हेनें पातशाहास ममतेंत घ्यावयाचें करतील. * * * * * याकरितां या गोष्टीचा पुरता विचार पातशाहासीं व अधिकारी असतील त्यांसीं बोलून, त्यांचा प्रवेश न होय तें करावें. राजकारण नाजुक आहे. फार जपावें." ह्मणून आज्ञा. त्यास इंग्रजांकडील वकील नवा कोणी अद्याप आला नाहीं. * * * * * * * * * परंतु सांप्रत बखेडा दिल्लीस जाला, यांत पातशाहा लाचार आहेत. आपले यख्तियारांत

गर्दी मोडून आल्यावर सरकारचें लक्ष तेंच पातशाहाचें आहे. सेवकाडून जी बुती राखावयाची तितकी राखीतच आहे. या प्रसंगीं कांहीं फौज सरकारची दिल्लीकडे मातबर सरदार आल्यास, पातशाहासुद्धां काबूंत येतील. बखेडा मोडेलसा समय आहे. पारसी पत्रांचीं उत्तरें दिल्लीहून सेवेसीं पावतील. छ १७ जिल्हेजीं पत्रें दिल्लीहून रवाना चिरंजीव गोविंदराव पुरुषोत्तम यांचे नांवें लिहून रवानगी केलीं, व पारसी पत्रांचीं उत्तरें पाठविलीं, तीं सेवेसीं पाऊन साकल्य कळलें असेल. सांप्रत छ १० जिलकादचें दिल्लीचे वर्तमानाचीं पत्रें चिरंजिवाचे नांवें आलीं, तीं सेवेसीं रवाना केलीं आहेत. त्यांजवरून सर्व निवेदन होईल. या प्रसंगीं सरकारच्या फौजा पोहोंचून पातशाहासुद्धां काबूंत राहून बहुत उपयोग पडतील. सांप्रत कलकत्त्याहून जान बरूस साहेब, एक पलटण गोरें व सात पलटणें आणीख घेऊन काशीनजीक आले, व खासा इष्टीनही चालणार, ह्मणून लखनऊचें वर्तमान आलें आहे. सत्य मिथ्या पक्की बातनी आल्यावर विनंति लिहूं. सांप्रत कानपुरास ब्रह्मावर्तापासीं चार हजार माणूस मात्र आहे. अंतर्वेद सर्व खाली आहे. करोडो रुपयांचा मुलूख खातात. जमाव त्यांचा आल्यास दिल्लीचा कस्त करतील. वर्तमान दुहराऊन येईल तें सेवेसीं विनंति लिहूं. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक ७४.

श्री. नोव्हेंबर इ. स. १७८२.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, छ २१ जिलकादीं जवांबख्त पातशाहाजाद्यास अकबराबादेची सुभेदारी देऊन, खिलत सरबस्ता पागोटें व ढाल तलवार, व लताफतअल्लीखान खोज्यास सरबस्ता पागोटें व तलवार, व पोल फरासीस यास सरबस्ता पागोटें, व समरू फिरंगी याचा पुत्र जफरयाबखान यास सरबस्ता पागोटें व निमअस्तीन व जेगा सिरपेंच व हत्ती घोडा व तलवार, येणेंप्रमाणें बहुमान करून बिदा केले आहेत. ते येथून कूच करून, हामाऊंचे मुकरब्यापासीं आरबाचे सराईसमीप मुक्काम करून आहेत, व नजबकुलीखान यास पेशजीं मिर्जासफीखान यांनीं कैद केलें होतें. त्यास जातेसमईं यास घेऊन जावयास मिर्जासफीस फुरसद न जाली, यास हवेलींतच टाकून गेले होते. त्यास पातशाहांनीं नजबकुलीखानापासून लाख रुपये नजर करार करून, सरबस्ता पागोटें व निमअस्तीन व ढाल तलवार येणेंप्रमाणें सन्मान करून, छ २३ रोजीं गुरुवारीं मशारनिल्हेस सोडून,

बदस्तुर दुय्यम बक्षीगिरी करार केली. पुढें दिनचर्येचें वृत्त होईल तें विनंति लिहूं. शेवेचा मुरबा वजन ८८२ दोन शेर पाठविला आहे. मर्जीस बरासा वाटल्यास आणीख पाठऊन देऊं. वडिलामागें या संस्थानीं अन्न राहून पाळग्रहण करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७५.

श्री. ३ नोव्हेंबर इ. स. १७८२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २६ माहे जिल्काद मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ १७ सवालीं विनंतिपत्रें पाठविलीं होतीं, तें पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरः— पातशाहा दिल्लींत आहेत. शीख सबजीमंडईपावेतों व पटपरगंजपावेतों दिल्लीचे आसपास लुटीत फिरतात. हरिद्वारापासून खुर्जापावेतों अंतर्वेद तमाम लुटून ताराज केली. गढीबंद गांव आहेत, ते मात्र वस्ते आहेत. बाकी रयत उठोन गंगापार गेली. दिल्लींत दाहा शेर अन्न आहे. व मिर्जासफीखान यास मीरबक्षीगिरी देऊन पातशाहांनीं मुख्त्यार केलें होतें, त्यास परस्परें चित्त मलीन होऊन कलह उत्पन्न जाला. त्यास पातशाहांनीं, महमद याकूब ह्मणून खवास आहे, याचे विद्यमानें लताफत खोजा चार पलटणें, व पोल फरासीस समरूचा गुमास्ता यांचीं चार पलटणें, व गंगाराम व सैदअली वगैरे किरकोळी चार पांच पलटणें, येणेंप्रमाणें बारा तेरा पलटणांचे सरदार फोडून, आपले मायेंत मेळऊन, मिर्जासफीखान यांचे हवेलीचे आसपास मोर्चे लाऊन धरून घ्यावेसें केलें. त्यास मिर्जासफीस कांहींसी फरासद पावली. इतकियांत नवाब अबदुल अहदखान व शिवराम दिवाण व राजे मनीराम व मेहेदी कुलीखान या चौघांस हातीं पालखींत घालून, हवेलीहून निघोन दरमजल अकबराबादेकडे गेले. डिगेअलीकडे कोसी ह्मणून गांव आहे, तेथें मुक्काम करून आहेत. दहा हजार स्वार प्यादा जमा जाला आहे. महमद बेग हमदानी, मिर्जासफीकडील, लक्षुमणगडाचे रोखें राजे प्रतापसिंग जैपुरकर यांजवर गेले होते. त्यांजकडून खुशालीराम व दौलतराम हे दोघे कारभारी येऊन, सा लक्ष रुपये खंडणी नजबखानास सालाबाद देत होते, त्यांपैकीं चार लक्ष रुपये करारमदार करून, हमदानीचा कूच माघारा करविला, व अफराशाबखानाचा परस्परें घर-

कलह होता, त्यास दिवाण शिवराम यांचे विद्यमानें सलूक जाला. अफराशाबखान यांनीं मिर्जासफीखानास वीस उंट फराशखाना, डेरे राहुव्या व पोशाकी वस्त्रें, व वीस हजार रुपये नख्त, येणेंप्रमाणें सरंजाम कोसीस पाठविला. त्यास महमदबेग हमदानी व अफराशाबखान हे दोघे मिर्जासफीस सामील होऊन त्रिवर्ग फौजसुद्धां दिल्लीस येणार. त्यास त्या मंडळांत नवाब अबदुल अहदखान पातशाहाचे मायेचे आहेत ह्मणून पातशाहा फिरून काबू पाहून तिकडे मिळतील, किंवा या करकषांत काय ईश्वरें नेमिलें असेल तें घडेल. या प्रकारचें येथील वृत्त आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७६.

श्री. २६ नोव्हेंबर इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विज्ञापना ऐसीजे, छ २० जिल्हेजीं महमदबेग हमदानी व अफराशाबखान व नवाब अबदुल अहदखान हे त्रिवर्ग, हमसिरा बेगम यांचे हवेलीस जाऊन, मुलाजमत केली. माफक मरातब नजरा देऊन विनंति केली कीं, 'आह्मांस नवाब नजबखान मरहूम यांचे जागा आपण आहेत. त्यास ज्याप्रमाणें त्यांचे आज्ञेंत चालत होतों, त्याप्रमाणें आपले आज्ञेनरूप मिर्जासफीखान यांचे आज्ञेंत चालत जाऊं.' ह्मणून बोलण्यांत आणून, तेथेंच सर्वांनीं भोजन एकत्र करून, बेगमेनें खिलत, महमदबेग हमदानीस सरबस्ता पागोटें बमय गोषवारा, जेगा सिरपेंच मोत्यांची माळ, हालखालक हत्ती घोडा येणेंप्रमाणें; व अफराशाबखान यास सरबस्ता पागोटें बमय गोषवारा व जेगा सिरपेंच माळ मोत्यांची व हालखालक व हत्ती घोडा; व नवाब अबदुल अहदखान यास सात किर्ती वस्त्रें व हत्ती घोडा, येणेंप्रमाणें सर्वांचा सन्मान करून, केलेल्या कारभाराची पकाई होऊन, बेगमेपासून रुकसत होऊन, आपलाले डेरियास गेले. अद्यापि सर्वांचे मुक्काम दिल्लीचे बाहीर रेतीवर आहेत. पुढें कोणे वेळेस काय प्रकार घडेल, व काय विचार होऊन कोणती गोष्ट अमलांत येईल, तें मागाहून विनंति लिहूं. येथील कारभार क्षणभंगुर बारभाईचा जाला आहे. एकांत एक मिळत नाहींत. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७७.

श्री. १ डिसेंबर इ. स. १७८२.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २५ माहे जिल्हेज मुक्काम दिल्ली जाणून स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ० २७ जिल्कादीं विनंतिपत्रें पाठविलीं, ते पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर मिर्जासफीखान कोसीस होते. यांनीं महंमदबेग हमदानी व अफराशाबखान यांसीं एकवाक्यता परस्परें शपथपूर्वक करून, तेथून कूच करून त्रिवर्ग फरिदाबादेस आले. त्रिवर्ग मिळून समागमें स्वार प्यादे फौज चाळीस हजार व तोफा सुमार ७२ बाहात्तर, येणें-प्रमाणें सरंजामानिसीं आले. हें वर्तमान पातशाहांनीं ऐकून, छ० ७ जिल्हेजीं सा घटका दिवस चढतां, धन लग्नावर दिल्लीहून कूच करून, किसनदासाचे तळ्यावर डेरेदाखल जाले. पहिले जुवाबख्त पातशाहाजादा बारापुल्यावर जाऊन उतरले होते, त्यांसही समागमें घेऊन गेले. यांजसांगातें सरंजाम, पोल फरासीस व लताफत अल्लीखान हे दोघे आठा पलटणांनिसीं, व किरकोळी दोन पलटणें, एकूण दाहा-हजार माणूस व बादलबेग वगैरे मोंगलिये पांच सातशें स्वार, येणेंप्रमाणें सरंजाम पातशाहासमागमें. त्यास नवाब अबदुल अहदखान यांचें मानस पातशाहासीं बेअदबी न करितां, यांची ममनुनी करून, आपली तकसीर माफ करून घेऊन, पुन्हां पातशाहास दिल्लींत दाखल करावें; व महमद याकूब व लालू खवास व पोल व लताफत या त्रिवर्गांचे मतें कीं, मिर्जासफीखानास खराब करून, खारीज करून काढून द्यावें; ऐसें या तिघांचें मानस. त्यास मिर्जा-सफीनें व महमदबेग हमदानी यांनीं पातशाहाकडे जाबसाल लाविला कीं, आह्मांस हजुरांत विनंति करणें आहे, त्यास महमद याकुफखान व पोलसाहेब व लताफत अल्लीखान या तिघांस पाठऊन द्यावें; ह्मणजे यासीं पक्केपणें बोलणें तें बोलून, हे हजुरांत विनंति करितील त्याप्रमाणें बंदगींत हजर होऊं. ह्मणून निरोप जुवाबख्त पातशाहाजाद्याकडे बहादुरअल्लीखान खोजा खानसामा यांजसमा-गमें पाठविला. त्यावरून छ० ११ रोज सोमवारीं मिनहूस पातशाहांनीं महमद याकुफखान व पोल व लताफत या तिघांस गोष्टी पक्या करावयासाठीं पाठविलें. त्या सांगातें दोन पलटणें व बारा तोफा होत्या. हे बादरपूरचा नाला उतरून पलीकडे जाऊन उभे राहिले. फरिदाबादेहून मिर्जासफीखान व महमदबेग हमदानी व रावराजा प्रतापसिंग व खुशालीराम-जयपुरकर राजाकडून चार पांचशें स्वारांनसीं

कुमकीस आले होते—त्यासुद्धां चाळीस हजार स्वार प्यादा व बाहात्तर तोफांनसीं तयार होऊन आले. यांच्या त्यांच्या हत्तीवर भेटी होऊन कांहींसे शिष्टाचार बोलतात तों तमाम फौज गीर्द यांचे होऊन, या तिघांस घेऊन, फरिदाबादेकडे चालिले. इतक्यांत यांजकडील पलटणासीं व मिर्जासफीचे फौजेसीं झटपट होऊन, परस्परें पांच सात माणूस मारामार करून, लताफतास व पोलास व महमद याकुफखान यास कैद करून घेऊन गेले. ते अद्यापि कैदेंतच आहेत. राजे दयाराम ह्मणून कश्मिरी ब्राह्मण पातशाहाचे पदरचेच आहेत. यांस मध्यस्त घालून, आह्मी गुलाम खानाजाद, बंदे पातशाही आहोंत, ह्मणून पातशाहास मनुन करून, छ. १९ रोज सोमवारीं मिनहूस या सर्वांची मुलाजमत दोनप्रहरां जाली. मिर्जासफीखान यास सरबस्ता पागोटें व निमअस्तीन बमय गोषवारा व जेगा बमय परगिरी व शिरपेंच व ढाल तरवार व हत्ती घोडा व माळ मोत्यांची येणेंप्रमाणें; व महमदबेग हमदानीस सरबस्ता पागोटें बमय गोषवारा व नुकेसी तुरा व जेगा शिरपेंच निमअस्तीन तरवार येणेंप्रमाणें; व अफराशाबखान यास सरबस्ता पागोटें बमय गोषवारा नुकेसी तुरा व निमअस्तीन व जेगा सिरपेंच व तरवार येणेंप्रमाणें; व रावराजा प्रतापसिंग याचे वाला यास साता परचाचा खिलत व जेगा शिरपेंच व तरवार येणेंप्रमाणें; व खुशालीराम जैपुराकडील यास पांच पारच्याचा खिलत व सिरपेंच येणेंप्रमाणें; व नवाब अबदुल अहदखास यास सरबस्ता पागोटें बमय गोषवारा व नुकेसी तुरा व निमअस्तीन व तरवार येणेंप्रमाणें; सर्वांचा सन्मान करून पातशाहांनीं कूच केला. त्या समयीं भोयांचे जागां आह्मींच भोई व गुलाम सरकारचे आहोंत, ह्मणून सर्वांनीं पातशाहाचें तख्त उचलून आपले खांद्यावर घेऊन वाडाबाहीर आणून हत्तीवर बसविलें. हें सर्व फौजसुद्धां स्वारीसमागमें होऊन, किल्ल्यांत दोन घटका दिवस राहतां छ० १९ मीनहूस दाखल केलें. मीरबक्षीगिरी मिर्जासफीखान यांजकडे, यांनीं फौजसुद्धां सरहद्देकडे जाऊन शिखांचा बंदोबस्त करावा. व आगरियाकडे महमदबेग हमदानी यांनीं जाऊन, जैपूरकर राजाकडील खंडणीचा पैका उगवून घ्यावा; तिकडील बंदोबस्त राखावा. व अफराशाबखान यांनीं बदस्तुर कोलेकडेस जावें. व नवाब अबदुल अहदखान यांहीं खालशाची दिवाणगिरी करून, खालशाचे महाल आहेत यांचा बंदोबस्त करून हजुरांत असावें. व महमद बेग हमदानी यांनीं फौजसुद्धां राजश्री पाटीलबावांस सामील होऊन पूर्वेकडे जावें. मैदान खाली आहे. इंग्रेजांकडील फौज हैदरनाईकाकडे सर्व गुंतली आहे. ऐसा समय सांपडणार नाहीं. ह्मणून बोलण्यांत नवाब अबदुल अहदखान यांचे विद्यमानें आणिलें आहे. परंतु अमलांत येईल तें खरें.

व किल्ल्यांत बंदोबस्त पातशाहाचाच राहिला. दुसरियाचा दखल नाहीं. याप्रमाणें सांप्रत येथील वृत्त आहे. पुढें कोणते वेळेस काय विचार ठरून काय घडेल, तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ७८.

श्री. इ. स. १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे– आह्मीं श्रीमथुरेचे मुक्कामीं राजश्री पाटिलबावांची भेट घेतली. त्यास सहा महिने जाले. आतां आज्ञा जाली आहे कीं, राजश्री मुरारराव दौलत पातशाहापासीं यांजकडून खानसामा आहेत, त्याजसमागमें दिल्लीस जाऊन सरंजाम नजराण्याचा पातशाहास गुजरणें. त्यास रावमजकूर लाडोजी देशमुखाचे रोजमुऱ्या वगैरे बंदोबस्ताकरितां लष्करांत आठा चौ रोजांचा गुंता आहे. मशारनिल्हे दिल्लीस चालतील तेव्हां त्याजसमागमें जाऊन, सरकारचा तोफातापा गुजराणोन, माघारा लष्करांत आलियावर काय आज्ञा करतील तें करूं. सहा महिने यांजपासीं राहिलों. दोन चार वेळां रोजमुऱ्याविसीं व पागेचे नेमणुकेविषयीं विनंति केली कीं, बंदोबस्त करून द्यावा. त्यास कांहींही उत्तर होत नाहीं. सरकारांतून हत्ती घोड्याचे खर्चास हजार रुपये दिल्हे होते, ते खर्च होऊन आणीक पांच सातशें रुपये जास्ती खर्च जाला. तेव्हां आतां आज्ञा जाली कीं, दिल्लीस जाणें. याप्रमाणें वृत्त आहे. त्यास राणेखानभाईस आपलें एक पत्र कीं, यांचा बंदोबस्त करून देवावा. वरकड वर्तमान पारसी आकबारावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ७९.

श्री. जानेवारी इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं "इंग्रेजाचे तंबीवर मुंबई व सुरत व गुजराथ प्रांतीं आदिकरून मुकाबलियावर सरकारचे फौजांचा शह आहे. हैदरखान यांची लढाई नेहमीं चाललीच आहे. शिंदे तिकडे मसलतीवर आहेत. याखेरीज बंगाल्यांत सरकारच्या फौजा जाणार. याजवरून मुंबईहून इंग्रेजांचीं पत्रें आलीं कीं, सरकारांत सलूख इच्छितो; मातबर माणूस पाठवितो. त्यांचे बोलण्यांत

सर्व दर्जे ध्यानांत येतील म्हणून आलीं. त्यांचीं उत्तरें समर्पक गेलीं असतां, उदीष्ट नामें इंग्रेज मातबर माणूस मुंबईहून रवाना केला. तो छ० २९ मोहरमीं पुण्यास आला. सरासरी भेटी मात्र जाल्या. सलुखाचें बोलणें ऐकतच आहों, व लढाईवर फौजेची जारी आहेच. बंगाल्यांत मसलतीस राजेश्री भवानी शिवराम यांची मातबर फौजेनसीं तयारी करविली, अगर सलुखही होणें जाल्यास जबरदस्तीचे पोटीं सलुख होईल, तो चांगला. ऐशा संधींत पातशाहानीं जलदी करून, अंतरवेदींत उतरून, बंगाल्यापावेतों तान द्यावा, हें काम मोठेंच आहे. नेक सलाह असेल, ते त्यांनीं करावी. सविस्तर तुह्मांस कळावें म्हणोन लिहिलें असे. फरासिसांचे वकील येऊन सरकारांत भेटले. त्यांजकडील जाहाजें वगैरे लढाईचा सरंजाम मारेस बंदराहून हैदरखान यांजकडे रवाना जाला. तोही महिन्या पंधरा दिवसांत दाखल होईल. फरासिसांचे सरंजाम येऊन दाखल जाल्याचीं पत्रें आलीं. इंग्रेजांचा वकील आला होता. तो बहुत मिनतीनें, सर्व मकानें व मुलुख सरकारचा माघारा देतों, पुढें बदमामली होणार नाहीं, ऐसें बोलत होता. परंतु साफच उत्तर दिलें कीं, सलुख करणें मंजूर नाहीं. याप्रमाणें बोलून रुकसत दिल्ही." म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास सदर्हू पत्राचा फारसी तरजुमा करून पातशाहास दाखविला, आणि विनंति केली कीं, "कदीम फिदवी आहेत. त्यांच्यानें आजपावेतों सरकारची बंदगी व तरतूद जाली ते केली, आणि पुढेंही करणें तें करीतच आहेत. या दिवसांत आपण स्वारीस निघावें, हें नेक सलाह आहे. ऐसा समय फिरून येणार नाहीं." म्हणून बोलिलों. पातशाहांनीं उत्तर केलें कीं, "नजबखान मेला नसता, तरी आजपावेतों गंगापार स्वारी पावली असती. आतांही चालावयाचा विचार आहेच. परंतु येथील प्रकार तुह्मी पाहातच आहां कीं, नजबखानामागें त्याचे घरचे सरदारांचा वगैरे माणसांचा एकोपा एकमेकांत मिळत नाहींत. याजकरितां बादबरसात घरचा बंदोबस्त करून स्वारी बाहीर निघतों. यांत संदेह नाहीं." ह्मणून बोलून, आपले मनसब्याची रीत व नजबखानास पत्र लिहिलें होतें तें अक्षरशाहा वाचून, बहुतच समाधान पाऊन, उत्तर केलें कीं, "थोरल्या दौलतींत अशीं माणसें असणें हें मोठें पुण्याईचें फळ आहे." ह्मणून स्तुत बहुतच केली. पुढें बोलल्याप्रमाणें अमलांत येईल. व नजबखानाकडील सरदार आहेत यांची परस्परें चित्तशुद्धता होऊन, फौज व तोफखाना पातशाहाचे उपयोगीं पडेल किंवा न पडे, हें कांहीं सुचिन्ह दिसत नाहीं. माणुसमात्राचीं चित्तें वेगळीं वेगळीं जालीं आहेत. या दिवसांत कोणी मातबर फौज आली, तर

पातशाहा व नजबखानाची फौज व तोफखाना सर्व त्यांचे काबूंत येईलसा समय आहे. हें वर्तमान राजश्री पाटिलबावांसही लिहिलें आहे. त्यांचें उत्तर आलें. "येतों येतों" ह्मणतात. या प्रसंगीं दिल्लीस फौजा देसींहून रवाना जाल्यास सर्व काबू सरकारचा होऊन, द्रव्य, मुलुख, नजबखानाचा सरंजाम, सर्व अल्पआयासें हातीं लागेलसा समय आहे. पुढें होईल तें विनंति लिहूं. नजबखानाचा मृत्यु जाला त्या दिवसापासून, येथील वर्तमान दिनचर्येचें राजश्री पाटिलबावांस लिहिलें व लिहितों; व पातशाहांचे शुके पाठविले; व सूत्रें येथील लोकांचीं सर्वांचीं फौजेचीं आहेत, तें सर्व लिहिलीं. त्यांचीं पत्रें, दस्तावेज देखील घेतले. राजे-रजवाडे जमीदार सर्व अनुकूल व यांची फौज सर्व फुटलेली! दौलत सर्व हातीं लागून पातशाहा स्वाधीन होतो व राजी सर्वप्रकारें होतात. ऐसा समय पुन्हां येणार नाहीं. हे सर्व दर्जे लिहिले. परंतु उत्तरें येतात त्यांत, "फौजेचा गवगवा भारी आहे. यांची समजाविशीस लागलों आहों. पैसा नाहीं. त्याही तजविजीस लागलों आहों; जालियावर येऊं. तुह्मीं सर्व सूत्रें लाऊन ठेवणें." हे येतात. आह्मी येथें बोलतों. जलदच येतात. त्यास पातशाहास आखबारेंत तेथील वर्तमान, फौजेची अवस्था, गोहदवाले, दतीयावाले जमीदार यांचें देखील पारिपत्य होत नाहीं. व जमीदार शेर होऊन पंचमाहालांतून पुढें चाल करूं देत नाहींत. नालबंदीची फौज नाहीं. त्यांत इंग्रेजाचे नादीं लागून, इंद्रसेन नामें इष्टिनाकडील आला, त्याचे विद्यमानें कलकत्त्यास जाबसाल लाविला आहे; व आनंदराव नरसिंह मिर्जाआमानीकडे पाठऊन, त्यांस येथें पातशाहापासीं बोलावयास पाठविलें, तेही बोलतात. व अनुपगीर गोसावी यांस व पाटीलबावांसीं पगडीबदल, पूर्वीं गोहदेस श्रीमंत राजश्री दादासाहेब आले होते ते समयीं, गोसावी यांनीं जाटाकडे फितुर केला, त्याजवरून जाटानें लुटून घेतलें; ते पळून पाटिलबावांचे लष्करांत आले, तेवेळेस जाली होती. तो स्नेह पत्रोपत्रीं चालतो. त्याजवर गोसावी यांची डांक व वकील अल्लीनकीखानाचा लेंक नेहमीं तेथें एक व येथें एक राहतो. तो दिनचर्येचें वर्तमान लिहितो. गोसावी बोलतात कीं, "पाटिलबावा व मी भाऊ आहों. जैसा मी नजबखानाचा चाकर, तैसेंच त्यांस जाणावें. त्यांस इकडील कस्त करूं देत नाहीं." याप्रमाणें आफरासाहेबखान वगैरेसीं बोलतो. व पत्रें त्यांचेही विद्यमानें पातशाहास व अफरासाहेबास येतात. पूर्वीं सुजाउद्दवला यासीं बोलणें व कौलकरार, राजश्री विसाजी कृष्ण इकडे होते ते समयीं, पाटिलबावा-कडून बहिरजी ताकपीर व बाळाराव गोविंद गेले होते व एलचखानाचे विद्यमानें व गोसावी यांचे विद्यमानें बोलून ठरविलें, त्यांतील सर्व मजकूर विसाजीपंतास

माहीत आहे. तो सरकार उपयोगी नाहींसें जाणून विसाजीपंतांनीं मान्य न केलें. त्याजवरून यांचा त्यांचा पेंच पडला. तेच कौलकराराची यादी आनंदराव नरसीसमागमें लखनऊस पाठऊन तेथून दिल्लीस आली आहे. आनंदराव पातशाहासीं बोलतात. त्यास, दोन वर्षें कमकसर स्वारी इकडे फिरते. इकडील लोक, जमीदार व हिंदुस्थानी सर्व, जोर व करण्याची चाल पाहून, तैसी वर्तणूक करितात. पातशाहा सर्व प्रकारें सरकारच्या फौजांचें येणें, आपला काबू होऊन बंदोबस्त व्हावासें इच्छितात. सांप्रत इंग्रेज कलकत्त्यापर्यंत सर्व चिनापट्टणाकडे गेले आहेत. त्यांचा काबू इकडे नाहीं. या प्रसंगीं वीस हजार फौज व होळकर यांची रवानगी जलद ये प्रांतीं जाल्यास, लाहोरपर्यंत व कलकत्त्यापर्यंत त्या प्रांतीचे जमीदार राजेरजवाडे अनुकूल होऊन, कार्यें मनोदयानुरूप होतील. एकवाक्यता व एकहातीं काम मात्र असावें. पाटीलबावा इकडे आहेतच. यांच्यानें होईल तें हेही करतील. व हुजुरून उभयतांची रवानगी जलद व्हावी. भवानी शिवराम यांस कलकत्त्याकडे रवाना करणार, ते याच मार्गें जाल्यास बहुत उपयोग. पैसाही पैदा वाकफगारीनें होईल. फौजेचा खर्चही बाहेर पडेल. नक्ष मोठा होऊन, पुन्हां इंग्रेजाचा काबू इकडे होणार नाहीं. मिर्जाआमानी केवळ इंग्रेजांचे काबूंत पडून, ऐशीं लक्ष रुपये इंग्रेजांनीं घेऊन, शहर लखनऊ अयोध्या देखील लुटितात. व वजिराची आई व आजी यांसीं कैद करून, त्यांचे खोजे एख्त्यारी धरून, नित्य मार त्यांस देऊन, पैसा जवाहीर जें निघतें तें घेतात. याप्रमाणें तेथील अवस्था ! वजीर मद्यप्राशन करून त्यांचे काबूंत पडले आहेत. ते सर्व सरकारचे काबूंत येतील. पातशाहासुद्धां मोहीम तिकडील करावीसा समय आहे. यास विलंब लागल्यास, चिनापट्टणाकडील मसलतीपासून रिकामे इंग्रेज जाल्यास, बंगाल्यापासून अंतरवेदीपर्यंत सर्व मुलूख, विना फौजेचा खर्च दाहा हजार माणसांनसीं खातात, हे गोडी त्यांस विना जोर सुटणार नाहीं. मातबर मसलत पडेल. पैसा खर्च होईल. व ते जागा सोडणार नाहींत. यास्तव समय जाणून विनंति लिहिली. व पातशाहाची मर्जी हीच. यास्तव पाटिलबावांसीं बोलून साकल्य वर्तमान सेवेसीं लिहीन. श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ८०.

श्री. इ. स. १७८३.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब कैलासवासी जाले, आणि त्यांचे मागें आपले सरकारांत, एक एका माणसानें एक एक रंग घेऊन

उठोन बखेडे केले, त्याप्रमाणेंच नवाब नजबखान मृत्यु पावले त्या दिवसापासून, येथेंही आपलाले जागां नरवीर होऊन, नानाप्रकारें आपसांत बखेडे करितात. त्यास, हल्लीं हा मजकूर ठरला आहे. परंतु सर्वांची बुध्य एकसा राहून, बोलला कारभाराची निभावणी करतीलसें दिसत नाहीं. श्रीमंत राजश्री पंतप्रधान दैववान व आपल्यासारखे सारथी पुण्यवान होते ह्मणून सर्व बखेडे मोडून राज्याचा बंदोबस्त केला, हें वर्तमान आपले कर्तेपणाचें, येथील मातबर पातशाहा व अबदुल अहदखान यांसुद्धां तारीफ करितात. याचा तपशील पत्रीं काय ल्याहावा? ईश्वर श्रीमंत साहेबांस व आपल्यास सलामत बेमलामत राखो! येथील बंदोबस्त व एकवाक्यतेनें चालतीलसें दिसत नाहीं. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८१.

श्री. २ मार्च इ. स. १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. सेवक शंकराजी सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० २७ माहे रविलावल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः- इकडील वर्तमान सविस्तर आमचे यजमानांहीं विनंति लिहिली आहे, त्याजवरून श्रुत होईल. तात्पर्य, येथील प्रकार या काळांत ऐसा जाला आहे कीं, दिल्लीचे कोटापासून गुजर वाणी बकाल सराफाचीं मुलें व सराफ वगैरे लोक, कालिकेस अथवा जुन्या किल्ल्यापासीं भैरवदर्शनास जातात. त्यांस धरून नेऊन, हजार पांचसें जैसा जो माणूस आसिला, त्याजपासून दंड घेऊन सोडितात. त्याचा देखील बंदोबस्त यांच्यानें होत नाहीं. मग फौजबंद जो कोणी गनीम येईल, त्याचा बंदोबस्त करणें कळतच आहे! त्यास, येथील प्रकार ऐसा हलका जाला आहे कीं, जो कोणी फौजबंद हिंमतीचा माणूस असेल त्यानें येऊन, येथील अधिकाऱ्यांस भक्षावयास मात्र देऊन, मनास येईल त्याप्रमाणें मुलकाचा बंदोबस्त आपले खातरखा करून घ्यावा, ऐसा समय आला आहे. येथील फौज व सरदार कोणीही एकमेकांत नाहींत. सर्वांचीं चित्तें वेगळीं वेगळीं जालीं आहेत, आणि निसत्वी जाले आहेत. जैसे श्रीकृष्णजी निजधामास गेले, त्यांनीं अर्जुन आदिकरून सर्वांच्या शक्ती हरून नेल्या, आणि काव्याकाव्यांनीं गोपिका लुटल्या, हे अवस्था या दिवसांत या स्थळाची नजबखान मेल्यानें जाली आहे. सूचनार्थ विज्ञप्ति लिहिली असे. व आमचे यजमानांचें येथें देणेंदारीचा

दंगा बहुत. सेवकाची बेहुरमत करितात. याचा तपसील पत्रीं कोठवर ल्याहावा? याजकरितां येथें अटकून पडलों आहें. आज दाहा वर्षें जालीं, लेंकरें बाळें, घरदार सुटलें. यजमान कैलासवासी पुरुषोत्तमपंत यांस नित्यांनीं तगादा करीत होतों कीं, आह्मांस आज्ञा घरीं जावयास द्यावी. त्यास आज्ञा न देत. ह्मणत कीं, मीच टिका घेऊन श्रीमंतांस चालतों. शेवटीं त्यांनीं यमुनावास केला. आतां दोन वर्षें जालीं. राजश्री देवरावतात्या दिल्लीचे कर्जदारीमुळें झांशीस जाऊन बसले आहेत. तेथें त्यांस कपर्दिक खुशकीमुळें जागिरीपैकीं हातीं लागत नाहीं. ते तेथील कर्जदारीकरितां दिल्लीस येत नाहींत, आणि देशींही आपले चरणापासीं येऊं पावत नाहींत. याजकरितां विज्ञप्ति हेच कीं, विसा हजारांची हुंडी, श्रीमंत स्वामींस विनंति करून पाठऊन दिधल्यास, येथील स्थित अब्रू आपली दिधलेली आहे ते राहील. नाहींतर वकिलांनीं आज चाळीस पन्नास वर्षें सरकारची सेवा करून अब्रू मेळविली आहे, ते जाते! मुरबी स्वामी आहेत, हे जनांत लौकिक आहे. या गोष्टीचा अभिमान धरून, या कर्जापासून मुक्त करणार आणि यांस माणसांत ठेवणार, स्वामीवांचून दुसरा त्राता नाहीं. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.''

लेखांक ८२.

श्री. ता. २३ मे सन १७८३.

''श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० २१ माहे जमादिलाखर मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. पेशजीं छ० २ मिनहूस विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें सेवेसीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर पातशाहानीं रेवाडीचे मुक्कामीं नजबकुलीखान यांजकडील जाबसाल फडशा करून, दिल्लीस छ १८ मिनहूस दाखल जाले आहेत. फौजेचे सरदार व पलटणें व तोफखाना दरोबस्त सरंजाम बदस्तुर आहेत. पुढें काय मसलत करतील ते विनंति लिहूं. वरकड सविस्तर राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्याजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ८३.

श्री. इ. स. १७८३.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना. येथील वर्तमान तर, नजबखानाचे हातीं जाटाचें घर लागलें, याजकरितां तोफखाना व मुलुख व फौज व खजाना जवाहीर याची कमीगमी, जोंपावेतों तो होता तोंपावेतों कांहींच कमी राहिली नाहीं. आतां सरंजाम तोफखाना व फौज तेच आहे; परंतु आपसांत चित्तशुद्धता नाहीं. याकरितां कलह करून परस्परें मरतात, व मारले जातात. या दिवसांत आपली फौज, तिकडील बंदोबस्त खातरखा जाला असला तरी, या प्रांतीं यावयाचा समय आहे. इंग्रेजांस हैदरनाईकाकडील पायबंद लागला आहे. याजकरितां लखनऊकडील वगैरे पलटणें सर्व तिकडे गेलीं आहेत. इकडे सरदार फौजबंद येईल, त्यासी सामील व्हावयास हे फौज फुटून तयार आहे. नाहींतर ताबेदारी करून जिकडे घेऊन जातील, तिकडे चाकरी करावयास सिद्ध आहेत. याप्रमाणें आहे. श्रुत होय. इंग्रेजांचे पारपत्याचा मजकूर, जो नजबखानासीं बोलत होतों व ते सरकारांत पत्रें लिहित होते तो मजकूर, सविस्तर मिर्जा सफीखान यांसीं बोलिलों. त्यास त्यांनीं उत्तर केलें कीं, आमचा घरकलह विल्हे लागून, घरची शुद्धता जाली, ह्मणजे जे श्रीमंत आज्ञा करतील त्यास आह्मी सिद्ध आहोंत. ह्मणून बोलून, सरकारांत व आपल्यास पातशाही शुके व आपलीं पत्रें खलितें पाठविले आहेत; व आपण पातशाहास अर्जी पाठविली होती, तिचा जाब शुका पाठविला आहे. त्यांचीं उत्तरें स्नेहपूर्वक पाठविणार धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८४.

पै॥ छ. १३ रजमान. श्री. ता. २५ मे इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- इकडील वर्तमान पूर्वीं साकल्य सेवेसीं लिहिलें. अलीकडे छ. २३ जमादिलाखरपर्यंत मुजरद कासीदजोडीसमागमें लिहिलें आहे. त्याजवरून सविस्तर ध्यानास आलें असेल. त्या अलीकडे वर्तमान तर, शाहाजादे जवांबख्त डेरेदाखल, अफराशाबखान, अनुपगीर गोसावी यांचे मसलतीनें करून पुढें स्वारीस निघावें, मिर्जासफी व अमदानी व नजबकुलीखान यांस दबाऊन सर्वांवर आपण व्हावें, हा विचार यांनीं केला होता. त्यास हमसिर

बेगम, नजबखानाची बहीण यांसही समागमें घेऊन चालवावें, व पातशाहजादे हातीं आल्यास मुलकावर हुकूम चालेल, व बेगम हातीं असिल्यास घरचे फौजेवर हुकूम चालेल, हा विचार केला होता. त्यास पातशाहाची मर्जी शाहाजाद्यास द्यावें, हें सर्वथैव नाहीं. परंतु हे फौजेचे धणी. व किल्ल्यांत देखील बंदोबस्त यांचा. सीफळे तोरे भाषणें दोन चार दाहा पातशाहासीं गोसावी व अफराशाबखानांनीं केलीं, तीं अयोग्य केलीं. यास्तव पातशाहांनीं विचार केला कीं, यांस वोढूं नये. तूर्त सांगतील तैसें करून यांचे घरांत फूट करावी. त्यास शाहाजाद्यास डेरेदाखल केलें. पुढें पातशाहास खर्चास देणें, तेंही प्रत्ययास न आलें, व फौजेची वगैरे संचणी करावी व मागील लोकांचें देणें वारावें, तेंही न जालें. बेगमची मर्जी राखावी, तर शिवाय पैसा राहत नाहीं. यांची करणी केवळ हलकी पडूं लागली. तेव्हां पातशाहांनीं विषम मानिलेंच होतें. पातशाहांनीं बेगमकडे बोलणें लाऊन ममतेंत घेतलें. तेव्हां यांनीं पातशाहासीं सलुख गाजुदीखानाप्रमाणें करावा, हा इरादा करून पाहिला. त्यास दोन चार दिवस मसलत गोसावी व अफराशाबखान व शिवराम दिवाण नजबखानाचा, यांनीं हेंही पाहिलें. तें ही गोष्ट सिद्धीस गेल्यास पुढें पेंच भारी, व एवढें कारभाराची निभावणी होणार नाहीं. हें पाहून पातशाहांची मर्जी राखावी. शाहाजाद्यास फिरोन किल्लेदाखल करावें हा विचार करून, छ० २९ जमादिलाखरीं शाहाजाद्याचे डेऱ्यास जाऊन, त्यांजला हत्तीवर बसवून आपण खवासींत बसून फिरोन किल्लेदाखल केलें. त्यानें गोष्ट अगोदर हलकी होतीच, व शाहाजादा फिरून आलियानें केवळच हलकी बहुतच जाली. शाहाजाद्याचे दाखल होण्यांत तोफखाना वगैरे सर्व बेगमेपासीं गेले. अफराशाबखानांनीं चार पांच लक्ष रुपये नजबखान मेल्यातागाईत पदरचे खर्चिले, ते वृथा गेले. गोसावी अनुपगीर सर्वांसीं दुशमन जाले व खपीप जाले. यास्तव कूच करून तीन कोस मुक्काम केला. हें खपीप बेगमनें केलें. हे पातशाहाकडे न मिळती तर आह्मी खपीप न होतों. यास्तव शिक्के कटार व मसनत वगैरे बेगमेकडे पाठऊन दिधली. व त्या दिवसापासून नित्य बेगमेसीं कजिया सुरू बहुतच जाला. लोकांस खायास खर्चास नाहीं. नजबखानाची खाजगत हुजूर रिसाल्याचे लोक फांकेकशी करितात, घोडे हत्ती उपाशी मरतात! नित्यचें भक्षावयाचें बेगमचें देखील बंद जालें! तीन दिवस बेगमेस देखील फांका जाला. फारच नाचाखी होऊन घरकलह लागला. बेगमनें पत्रें मिर्जासफी, साहेबजादा, नजबखानाचा भाचा, यास पाठविलीं. व नजबकुलीखानास व अमदानीस पाठविलीं कीं, यांनीं

येथें निमकहरामी अनुपगीर गोसावी यांचे मसलतीनें या प्रकारें केली. त्यास तुह्मीं सत्वर येऊन दिल्लीस पोंहचावें व नजबखानाचें नांव रक्षावें. त्याजवरून नजबकुलीखान यांनीं जयनगरवाल्याची मामलत साडेसाहा लक्षांवर करून, जयनगरवाल्याचे कारभारी यास वस्त्रें देऊन, व राजास हत्ती जवाहीर वस्त्रें देऊन, फौज तोफखान्यासुद्धां कूच करून, लताफत खोजांच्या जागिरींत वगैरे खंडण्या घेतल्या; व गोसावी अनुपगीर यांनीं जयनगरचे मामलतींत पांच लक्ष ऐंसी हजार रुपये वसूल घेतला, तो मधेंच ठेविला. सरकारांत दाखल न केला. त्याची याद कारभारी राजाकडील यापासून घेतली. व याशिवाय जागीर राजांनीं गोसावी यांस मध्यस्तींत पूर्वीं दिधली होती, ते आजपर्यंत चालत होती. त्याचा वसूल बाकीस काढिला व पुढें जागीर जयनगरवाल्याकडून जप्त करविली. व आपण कूच करून कृष्णगडास आले, व हमदानी यांनीं जाटांसीं सलुख करून, डिगे अलीकडे तीन कोस कूच करून आले. कृष्णगडास मुरादबेगखान यांचे घरीं मेजवानी घेऊन, दिल्लीकडे कूच नजबकुलीचें व अमदानीचें दरमजल होऊन, पांचा साता रोजा येथें येणार. व मिर्जासफीखान यांनीं किराण्याहून कूच करून, यमुना उतरून, सोनपताकडे येऊन, नेरल्याहून पांच कोस तेथें पेश खेमा पाठविला आहे. आपण सोनपतानजीक येथून विसां कोसांवर आहेत. बेगमेचे नित्य शुतरस्वार जातात. त्यास नजबकुलीखान, अमदानी यांचें कूच होऊन अलीकडे आले, ह्मणजे त्रिवर्गांनीं समागमें येऊन दाखल दिल्लीस व्हावें, हा विचार केला आहे. बेगमेचे विचारें, नजबखानाची कन्या अकरा वर्षांची आहे, ते मिर्जासफी साहेबजाद्यास द्यावी, व बक्षीगिरीचा खिलत पातशाहाकडून त्यास देववून बंदोबस्त करावा, व सर्वांनीं ताबेदारी त्याची करावी. सांप्रत या विचारास अनुकूल, नजबकुलीखान व अमदानी मिर्जासफी व नजबखानाचे खाजगत रिसालदार वगैरे जाले आहेत. व त्रिवर्ग सरदार फौजेचे धणी आहेत, त्यांची येणीयाची अमदानी येथें बहुत गरम जाली. यास्तव अफराशाबखान व गोसावी व लताफत खोजा यांचें अवसान व शिवराम दिवाण यांचें गेलें. दोन तीन दिवस मसलत केली. एकही सुधी न पडे. तेव्हां पातशाहाचा आश्रय करावा; पातशाहास राजी करावें; बक्षीगिरीचा खिलत आपण घ्यावा, व मुख्त्यारीच आपण घेऊन किल्ल्यांत अबदुल अहदखानाचे आतषखान्यांत राहावें; पातशाहास राजी राखून पातशाहाचे तर्फेनें बेगमेसीं कजिया करावा; व जवाहीर वगैरे बेगमेपासून नजबखानाची जप्ती घ्यावी हा विचार केला. वाजबुल-अर्ज पातशाहापासून दसखत करून मागितली. पातशाहांसही तूर्त लाऊन

घेणें प्राप्त. परंतु त्याचें किल्ल्यांत राहाणें ठीक नाहीं. यास्तव पातशाहांनीं गोष्टी मान्य सर्व केल्या. किल्ल्यांत राहावें हें मान्य न केलें. मुद्दा घातला कीं, किल्ल्यांतील बंदोबस्त तुह्मीं सर्व आपला उठऊन न्यावा, ह्मणजे सर्व मुद्दे कबूल. यांजला रजावंदी पातशाहाची राखणें जरूर, तेव्हां यांनीं मान्य केलें. पंधरावे तारखेस खिलत मुख्त्यारीचा घ्यावा, हें ठराऊन गेले. फिरोन मसलत फिरली कीं, बक्षीगिरीचा खिलत, बेगमेसीं वाईटपण केल्यास परिणाम लागणार नाहीं, हें समजून तोही मजकूर राहिला. ज्यांत पातशाहा शपथपूर्वक राजी राहातील तें करावें, हा विचार करून पातशाहापासीं गेले. गोसावी, लताफत खोजा यांनीं पातशाहासीं बोलले. तेव्हां त्यांनीं सांगितलें, "माझी रजावंदी, किल्याचा बंदोबस्त तुह्मीं आपला उठवावा, व आमचा करून द्यावा, व आमची जागीर खाजगत खर्चाची त्याचा मागील पैसा दाखल करावा. त्याजवरून त्यांनीं मान्य केलें. किल्ल्यांतील बंदोबस्त छ० १८ रज्जबीं दरोबस्त अफराशाबखानाचा उठऊन, पातशाही लाल पलटणें वगैरे लोक किल्ल्यांत दाखल जाले. किल्याचा बंदोबस्त पातशाहांनीं अहमदअल्लीखान, पातशाहाचा भाचा आहे, त्याजकडे कुल सांगितला. किल्ला आपले स्वाधीन करून घेतला. नाजर मंजूरअल्लीखान यांचे ठिकाणीं पातशाहाचा विश्वास नाहीं. मध्यें कित्येक बखेडे जाले, याजमुळें भाच्याकडे काम किल्याचें सांगितलें. अफराशाबखानांनीं शपथ कुराण दिधलें कीं, पातशाही चाकर जालों, नजबखानाचा चाकर नाहीं. पातशाहाचा खर्च चालवावा, व जागीर त्यांजकडे आहे, व कारभार बदस्तुर अबदुल अहदखान करावा. याप्रमाणें ठरावांत आणिलें आहे. व गोसावी व लताफत खोजा या पेच्यांत तकसीर माफ करऊन पातशाहाचे सेवेंत हजर जाले आहेत. लताफत खोजास जिनसी पातशाही त्याचें दारोगीचें काम, खवासाचें दारोगीचें काम सांगितलें; उमेदवार केलें; व लाख रुपयांची जागीर नवी द्यावीसें पातशाहांनीं केलें आहे. तूर्त पातशाहा आपला काबू साधितात. किल्ल्यांतील बंदोबस्त यांचा काढला आहे. व दुमाहा सलातीन वगैरे खाजगत खर्चास रुपये घेतले आहेत. नजबकुलीखान व मिर्जासफीखान अमदानी यांच्याही अंतस्थ अर्ज्या येतात. त्यांसीं सूत्र लाविलें आहे. बेगमेशींही लाविलें आहे. अफराशाबखान यांनीं आपली फौज जागीरदार वगैरे बोलाविले, तेही जमा होत जातात. चार पलटणें लताफत खोजा व चार पलटणें दिलाराम काफर व अफराशाबखान वगैरे आहेत. दोन तीन हजार स्वार इतक्यांनिसीं पातशाहाकडून अबदुल अहदखानाचे जागा होऊन, शहरचा बंदोबस्त करून आपला काबू राखावा; नजबकुलीखान, अमदानी व मिर्जासफीखान सर्व एक होऊन येतात, हे आपला

काबू इच्छितील तर होऊं न द्यावा; शहर आपले हातीं ठेऊन झुंजावें; हा यांचा विचार जाला आहे. पातशाहाचा विचार, हे परस्परें भांडतील, यांसीं कलह लाऊन जे मारले जातील ते मारवावे, व श्रीमंतांच्या फौजेची वाट पाहावी. जलद आल्यास बाकी राहिले त्यांचें पारिपत्य त्यांजकडून करऊन आपला काबू करावा; व बंदोबस्त करून, मुलुख हाताखाले घालून, पातशाहातेस स्वरूप आणावें, व परस्वाधीनता सोडवावी; आपले यख्तियारांत राहावें; ऐसें आहे. मिर्जासफीखान व नजबकुलीखान व अमदानी भारी फौजेचे सरदार आहेत. ते मसलतीस अटकले होते. त्यास मिर्जासफींनीं शिखासीं सलुख करून मोकळे जाले. व जाबतेखान व ते एक जाले. व अमदानी जाटासीं सलुख करून मोकळे जाले. नजबकुलीखान जयनगरवाल्यासीं सलुख करून मोकळे होऊन ....

....

सरकारचे फौजेची मार्गप्रतीक्षा बहुत केली, व करितात. परंतु चार महिने येणें राजश्री पाटिलबावांचें घडत नाहीं, व या फौजा पुढें येऊन यांचें पारपत्य करावें इतका जमाव नाहीं, यास्तव जुरत वाढत नाहीं ह्मणोन बोलतात. वर्षाकाल आहे तोंपर्यंत, हे आपसाचा कलह करून एक ठेरले, व बंदोबस्त त्यांचा जाल्यावर, पुढें मसलत पाटिलबावांस भारी पडेल. विना मातबर लढाई मैदानची काबू गांठणार नाहीं ह्मणून बोलतात. आह्मी सांगतों, "जलद स्वारी येते. मर्जीप्रमाणें कामें होतील. व मैदानचीही लढाई पडल्यास चिंता नाहीं. सरंजाम भारी आहे, व आणखीही फौजा बोलाविल्या आहेत." ह्मणून बोलतों. व अफराशाबखानास सांगितलें कीं, नवाब नजबखानासीं करार जाला आहे त्याप्रमाणें करारावर कायम आहेत. तेही ह्मणाले, आह्मी सिद्धच आहों. बाद बरसात एक होऊन बंदोबस्त करूं, व कित्येक गोष्टी बंदोबस्ताच्या बोलले. परंतु येथील करण्याची चाल येणेंप्रमाणें पडली आहे. हे सर्व आपसची खानाजंगी करून जो नजबखानाचे जागां कायम होईल, तो करारमदार त्याचे निभावील. तोंपर्यंत बखेडाच आहे. शिखांचा विचार, पाटलासीं एकवाक्यता करून, यांचे मुलुकांत बखेडा करून अंमल चहूंकडील उठऊन द्यावा. सरकारच्या फौजांनीं पुढें यावें; तिकडून शिखांनीं अंमल उठवीत यावें. राजेरजवाडे सर्वांस मेळऊन घ्यावें. मुलकाचा अंमल यांचा चहूंकडील उठला ह्मणजे जायदादेचे लोक राहाणार नाहींत. फौजेस पैसा द्यावा, तर खजाना यांजपासीं नाहीं. घरकलह! ऐशांत समय आहे. त्यास जैसिंग कन्हैया वगैरे शीख मातबर सरदार सर्व पटाल्यास जमा जाले आहेत. त्यास जयसिंग कन्हैया यांनीं पत्रें राजश्री पाटिल-

बावांस लिहिलीं, व आह्मांस लिहिलीं. त्यांजकडील महेश्वरदास येथें आहेत. त्यांनीं बोलले. त्यास तें पत्रें राजश्री पाटिलबावांकडे पाठविलीं आहेत. उत्तरें आलियावर शिखाकडे पाठऊं. वरकड पातशाहा वगैरे अंतस्थ सूत्रें सर्व लाऊन आज्ञेप्रमाणें ठेविलीं आहेत, व ठेवितों. फौजांस पाटिलबावांस यावयास दिरंग, यास्तव नाउमेद लोकांस होते. त्यास वर्षाकालानंतर तरी जलदी असावी. सूत्रें जे आहेत तीं पक्कीं राखितों. एक वेळ फौज यावी व एकहातीं काम असल्यास चाकरी करून दाखवावी, हेच उमेद आहे. श्रीमंतांचे ताळे शिकंदर आहेत, व सेवकानें सेवा करावी हा धर्मच आहे. तीर्थस्वरूप कैलासवासी पुरुषोत्तमपंत नानास पुत्र जाला. तो अडीच महिनीयांचा जाला. पातशाहांनीं कृपा करून त्यांचा किताब वगैरे चिरंजिवास दिधला. सेवेसीं श्रुत होय. मिर्जा सफीखान व नजबकुलीखान दिल्लीस येऊन दाखल जाले. मिर्जासफीखान, हमसिरा बेगम,–नजबखानाची बहीण, तिचा नातू, सुजाउद्दौलाचा पुतण्या. व सुजाउद्दौलाची कन्या ही त्यासच दिधली आहे. यास्तव मिर्जाआमानी यांनीं विजारतचे नियाबतीचा खिलत पाठवावासें केलें आहे. व हमसिरा बेगमेचा विचार, नजबखानाची कन्या अकरा वर्षांची आहे ते यास द्यावी, व दवलतीचे धणी त्यास करावें. यास्तव मिर्जामजकुरास फौजसुद्धां बोलाविलें आहे. अफराशाबखान यांनीं बखेडा करावा, होऊं न द्यावेंसें केलें आहे. यास्तव बेगमेंनीं फौज जमा केली. व अमदानी वीस पंचवीस हजार स्वार प्याद्यांनसीं अफरासाहेब व गोसावी यांचे जागिरींतील अंमल उठवावयास अंतरवेदींतील उतरले. ते, सरकारची फौज व आपण एक व्हावें, हा विचार करतात. जो तो आपण जबरदस्त व्हावें ह्मणतात. फितुर भारी जाला आहे. फौजेचे लोकांस एकास ठिकाण नाहीं. ह्मणून सरकारची खातरजमा व जागिरा चालवावयाचा करार करून, तेच येऊन चाकरीस हजर होऊन, हरोल होऊन दिल्लीसुद्धां स्वाधीन करितात, ऐसा प्रसंग पुढें दिवसगतीनंतर येईल. यास्तव इकडील ज्यांचीं ज्यांचीं सूत्रें उपयोगीं लहान मोठीं सर्व घेऊन, राजश्री पाटिलबावांकडे चाललों आहों. वर्तमान सर्व त्यांस निवेदन करून, होईल तें साकल्य विनंति लिहूं. येथें राजश्री शंकराजी सखदेव यांस ठेविलें आहे. वर्तमान होईल तें, चिरंजीव येथें आहेत त्यांचे नांवें, सेवेसीं विनंति लिहितील. विशेष काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८५.

श्री.

माहे मे इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, "इंग्रेजांचे सलुकाचा ठराव, राजश्री महादजी शिंदे यांजपासीं इंद्रसेन साहेब फिरंगी आहे, त्याचे विद्यमानें जाला. सरकारचे किल्ले कोट वगैरे मुलुख इंग्रेजांनीं घेतला होता, तो माघारा दिल्हा. व श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचीं पत्रें सुरतेहून आलीं कीं, आह्मी देसीं येतों; आमची खातरजमा करावयास राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर यांस पाठवावें. त्याजवरून राजश्री हरिपंत व तुकोजी होळकर यांजसमागमें फौज देऊन रवाना केले. त्यांच्या व श्रीमंतांच्या भेटी जाल्या. तेथून गंगातीरास कुंभारीस येऊन राहिले आहेत. पुढें होईल तें लिहूं." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास राजश्री दादासाहेब गंगातीरीं कुंभारीसच आहेत किंवा पुण्यास आले हें वृत्त, व नवाब निजामअल्लीखानासीं व सरकारासीं कांहीं जाबसाल मुलुक सोडून द्यावा ह्मणून लागला आहे, व हैदरनाइकाचे पुत्रानें सरकारचे वकिलासीं कांहीं बदसलुकी केली ह्मणून येथें श्रवणांत आलें हें वृत्त, सविस्तर ल्याहावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. व नवाब अबदुल अहदखान यांनीं सरकारांत व आपल्यास स्नेहवृद्धीचीं पत्रें खलितें पाठविले होते, त्या गोष्टीस आठ महिने जाले. कासदानें सहजपा मीर्धा याचे विद्यमानें पत्रें दिधलीं होतीं, त्या पत्रांचे जाब तों आले. परंतु खलित्याचीं उत्तरें न आलीं. याजकरितां नवाब अबदुल अहदखान वारंवार स्मरण करितात कीं, आमचे पत्रांचीं उत्तरें न आलीं, याचें कारण काय? त्यास कृपा करून उत्तरीं लोभ करावा. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८६.

श्री. ता. २२ जून इ. स. १७८३.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० २२ माहे रज्जब मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः—सरकारचें आज्ञापत्र छ० २९ रबिलाखरचें सादर जालें, तें छ० १ रज्जबीं पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, तिकडील वर्तमान होत जाईल तें वरचेवर लिहीत जाणें ह्मणोन आज्ञा. त्यास इकडील वर्तमान

पेशजीं छ० २१ जमादिलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें सेवेसीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा बदस्तुर दिल्लींत आयाश करून आहेत; व वजीर असफद्दौला लखनौस कूच करून बहिणीचे लग्नास्तव अयोद्धेस जाणार; व राजे प्रतापसिंग जयपूरकर लग्नाकरितां जोतपुरास जाणार; ह्मणोन वर्तमान पातशाहाचें येथें बातनी आली त्याजवरून विनंति लिहिली आहे. त्याजवरून ध्यानारूढ होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८७.

श्री. माहे जुलाई इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना कीं, जाबतेखानासीं व गुलाम कादर, त्यांचा पुत्र, यांसीं परस्परें चित्तशुद्धता नव्हती. ह्मणून जाबतेखानानें त्याची जागीर जप्त केली. त्यास गुलाम कादर गोसगडीहून उठोन दिल्लीस पातशाहापासीं आला. त्यास येथेंही भक्षावयास न मिळे. तेव्हां मिर्जासफीखान यांजपासीं कांहीं दिवस होता. थोडें बहुत पोटास देत होते, तें न पुरे. व आज्ञा मागूं लागला. त्यास आज्ञाही न देत. तेव्हां येथून पळून लखनऊस असफदौला यांजपासीं गेला. त्यांनीं साता पारचाचा खिलत, व जेगा, सिरपेंच, हत्ती, घोडा, माळ मोत्यांची, डेरे, राहुट्या, खेमा, बारा हजार रुपये नख्त खर्चास देऊन, सन्मान करून, दोन हजार स्वारांचा रिसाला देऊन, आपलेपासीं ठेविलें आहे. याचें कारण हेंच कीं, जाबतेखान पथरगडाकडे सिखांसमागमें घेऊन जावेंसी वळवळ करितात. ह्मणून त्याचे पुत्राचा आदर करून, लाऊन, फिरंगी याचे विचारें ठेविलें आहे. व पातशाहाचें येथें वृत्त आलें जे, जरनेल कोट चिनापट्टणास सरदार फिरंगी होता, तो सद्या कलकत्त्यास इष्टिनापाशीं आला आहे. त्यास तेथील बंदोबस्त करून फौज ठेऊन आला आहे, किंवा पळून आला आहे, व कीं कांहीं मशवरा करावयास आला आहे, हें वृत्त कच्चें कांहीं लिहिणारानें लिहिलें नाहीं. दुसरी बातमी आलियावर कच्चें वृत्त कळेल, तें मागाहून विनंति लिहूं. व लखनऊस इंग्रेज आहे, त्याचे बदलीं कलकत्त्याहून होऊन दुसरा साहेब येणार. त्यास आज्ञा आहे कीं दिल्लीसही जावें. तो कलकत्त्याहून दोन मजला अलीकडे आला आहे ह्मणून वर्तमान आजच पातशाहाचें येथें आलें. त्यावरून लिहिलें असे. मागाहून पक्कें वृत्त आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८८.

श्री. ता. २३ सपटेंबर स. १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १९ माहे सवाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली केली पाहिजे. विशेषः– छ० ३ रज्जबचें आज्ञापत्र पाठविलें, तें छ० २४ साबानीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, 'इंग्रेजांसीं संधान हरगीज करणें ठीक नाहीं, ह्मणून वारंवार पातशाहास अर्ज करीत जावा.' ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें आजपावेतों तो अर्ज करून व भयप्रीत दाखऊन, संधान राखिलें आहे. इंग्रेजांस यांचीं पत्रें जातात, त्यांचीं यांस येतात. परंतु इंग्रेजी पलटणें अनुपशहरापाशीं आलीं होतीं, तेही माघारा फरुकाबादेस गेलीं. इंग्रेजांत कांहीं ... दिसत नाहीं. इंद्रसेन नामें इंग्रेज राजश्री पाटीलबावांपासीं साधन करून आहेत. व मेजर ब्राउन नामें इंग्रेज मिर्जा सफीखान यांजपासीं साधन करून डिगेस आहेत. मिर्जासफीखानाची छावणी डिगेस ठैरली आहे. नजबखानाचे कन्येशीं लग्नाचा विचार आहे. इंग्रेजांस चिनापट्टणाकडील जुंझाची ओढ हैदरनाइकाचे लेंकाकडील भारी आहे. इंग्रेजांत कांहीं जीव नाहीं ह्मणून पातशाहाचें येथें वर्तमान आहे. व इंग्रेजांचें मानस कीं, कसेंही करून दिल्लींत पाय शिरवावा, या विचारांत आहेत. व आपल्या फौजा या प्रांतीं सत्वर याव्या आणि सलतनतचा बंदोबस्त व्हावा, हें मानस पातशाहाचें विशेष आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ८९.

श्री. इ.स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना. पत्रीं आज्ञा कीं, "पारसी पत्रें पातशाहाचे नांवें एक व नवाब अफराशाबखान यांचे नांवें दोन व हमसिराबेगम यांचें नांवें दोन व अबदुल अहदखां यांचे नांवें दोन, एकूण सात पत्रें पारसी पाठविलीं आहेत. त्यांतील मजकुराच्या हिंदवी नकला तुह्मांकडे पाठविल्या आहेत. त्याजवरून पारसी पत्रांतील मजकूर समजेल. कलकत्त्याहून इंग्रेजांचे वकील दिल्लीस येणार. त्यास ते हरतऱ्हेनें पातशाहास ममतेंत घ्यावयाचें करतील. .... त्यास, या गोष्टीचा पुरता विचार पातशाहांसीं व कोण अधिकारी असतील त्यांसीं बोलून, त्यांचा प्रवेश

न होय तें करावें. राजकारण नाजुक आहे. फार जपावें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास दोन तीन वर्षांपासून आजपावेतों पातशाहास हाच बोध तीर्थरूप कैलासवासी करीत होते, कीं इंग्रेजांचा पाय सलतनतींत शिरणें योग्य नाहीं. ह्या गोष्टी बाह्य होऊन, निदान जखमी होऊन मृत्यु पावले. हल्लीं ज्या समयीं इंग्रेजांचा जिकीर निघतो, त्यासमयीं राजश्री शंकराजी सखदेव वारंवार पूर्वस्मरण पातशाहास यांजकडून देवितों. पातशाहाचे चित्तांत हे गोष्ट खचित आहे कीं, इंग्रेज दिल्लींत आलियावर आमची पातशाहात राहात नाहीं. व आतां नवे कारभारी जाले आहेत, यांचा व नवाब अफराशाबखान यांचा घरकलह लागला आहे. त्यास यांचें त्यांचें झुंज किंवा सलुख दोहींतून एक ठैरलें, ह्मणजे आज्ञेप्रमाणें त्यांसीही बोध करऊन ज्यांत सरकार उपयोगी मनसबा पडे, तेच गोष्ट आपले पुण्येंकडून घडल्यांत येईल. तीर्थरूप कैलासवासी जाले ह्मणून सरकारकामाविसीं व राजकारणाविसीं गुंता काडीमात्र पडणार नाहीं. श्रीमंतांचे प्रतापें व आपले पुण्येंकरून ईश्वर सर्व निर्वाह करील. येथील राजकारणाची काळजी आपण न धरावी. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९०

श्री. ता. २४ सप्टेंबर स. १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, ताजाकलम वर्तमान आतांच श्रवणांत आलें कीं, मिर्जासफीखान व अमदानी यांसीं परस्परें विरुद्ध विशेष वाढलें होतें. त्यासी अमदानी भेटीस मिर्जासफीचे आला. तेथें मिर्जासफीस दगा जाला. ह्मणून वर्तमान आलें. विशेष वर्तमान मागाहून आमचे कारकुनाचे लिहिलें आलियावर लिहूं. श्रवणांत आलें तें सेवेसीं लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९१.

श्री. ता. २६ सप्टेंबर सन १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

"पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २८ माहे सवाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—इकडील वर्तमान सविस्तर पेशजीं छ २५ माहे मजकुरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्त-

मान तर, मेजर ब्राऊन साहेब यांनीं मिर्जासफीखान यांजपासीं आज्ञा मागितली कीं, आह्मांस पातशाहाकडे रुकसत करावें. त्यास मेजर ब्राऊन दिल्लीस येऊन पातशाहाची भेट जालियावर, पातशाहा कांहीं आपलें वर्तमान त्यांस फाके-कसीचें सांगतील व पातशाहा इंग्रेजांसीं मिळून द्वैत करतील, ह्मणून पेस्तर राजे मनीराम यांस दिल्लीस पाठविलें होतें, आणि पातशाहासीं स्वाल केला होता कीं, "मेरट वगैरे माहाल आह्मी सोडून देतों. आपण जेनुल आबदीखान यांजसमागमें एक हजार स्वार व चार पलटणें आहेत, यांस भक्षावयाची खबर घ्यावी. आपण स्वारीस बाहेर निघावें. जर आपली मर्जी बाहेर निघावयाची नाहीं, तर तोफखाना पातशाही व गुसलखाना व किल्यांत दोही दरवाज्यांवर आमचा बंदोबस्त करून द्यावा. व आह्मी मेजर ब्राऊन यांस घेऊन दिल्लीस येतों. त्यास इंग्रेजांसीं आह्मांवेगळें न बोलावें." याप्रमाणें राजे मनीराम यांनीं मिर्जासफीखान यांजकडून स्वाल केला. पातशाहांनीं उत्तर केलें कीं, "आह्मी बाहीर निघतों. आमचे फराशखान्याचा, भारबारदारीचा, व स्वारीचे लोकांचा खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा." मनीराम यांनीं उत्तर केलें कीं, "मेरट वगैरे माहाल सोडितों. त्यांत सर्व आपला बंदोबस्त खर्चाचा व फराशखान्याचा व भारबारदारीचा करून घ्यावा." त्यास पातशाहानीं उत्तर केलें कीं, "खुशकी या-प्रमाणें पर्जन्य नाहीं. आठ शेर अन्न! याहीवर जेनुल अबदीखान यांचे फौजेस खर्चास द्यावें, ह्या गोष्टी कैशा घडतात?" निदान दोन तीन रोज खलबताचा मझेला होऊन निदान हें ठरलें कीं, मिर्जासफीखानास पत्रें लिहिलीं होतीं कीं, तुह्मीं दिल्लीस येणें. मग तुमच्या विचारें जो विचार ठरेल तो करूं. ह्मणून पत्रें गेलीं होतीं. उत्तरें आलीं नव्हतीं. महमदबेग हमदानीसीं व मिर्जासीं विरुद्ध! त्या बखेड्यांत मिर्जासफीखान होते. त्यास छ० २५ सवालीं मंगळवारीं कासमजान वगैरे मोंगलीये सरदार यांनीं मध्यस्त पडून भेटीचा ठराव केला. त्यास छ० मजकुरीं चार घटका दिवस राहतांना, महमद बेग हमदानी तिकडून तयारी करून डिगेसमीप आला. इकडून मिर्जासफीखान तयार होऊन डिगेहून बाहेर निघाले. परस्परें भेटी व्हाव्या इतक्यांत मोंगलीये सरदार महमदबेगाकडे मिळाले होते, यांनीं मिर्जासफीखान यांचा हात धरिला. हें पाहून महमदबेग हमदानीनें पेशकबज पोटांत चालऊन मिर्जासफीखानास मारून टाकिलें. इतक्यांत हंगामा होऊन महमदबेगही जखमी जाला आहे ह्मणून वर्तमान आहे. तोही मरेल किंवा वांचेल हें नकळे. मागाहून दुसरें वर्तमान पक्कें आलियावर विनंति लिहूं. परंतु मिर्जासफीखान मारला गेला.

हिंदुस्थान सारें रिकामें पडलें आहे. अफराशाबखान व नजबकुलीखान हे दोघे सरदार नजबखानाकडील आहेत, हे जो कोणी फौजबंद सरदार येईल त्याची चाकरी करावयास सिद्ध आहेत. हिंदुस्थानांत लढाई तरवार राहिली नाहीं! या अर्थीं इकडे फौज पाठऊन खबर घेणें जरूर आहे. नाहींतर सिखाचा अथवा फिरंगी यांचा काबू दिल्लींत जालियावर मग मसलत भारी पडेल. सेवेसीं श्रुत व्हावें ह्मणून विनंति लिहिली आहे. फिरंगी यांचे मानस, दिल्लीस पातशाहांपासीं येऊन यांस आपले ममतेंत काबूंत घ्यावें आणि सर्वोपर व्हावें, हे मर्जी इंग्रेजांची आहे. या अर्थीं जलदी करून आपली फौज दिल्लीस आली तरी पातशाहा व हिंदुस्थान काबूंत राहेल. जर या गोष्टीस विलंब लागल्यास मग पुढें मसलत भारी पडेल. ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९२.

श्री. आक्टोबर इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, मिर्जासफीखान मारला गेलियावर राजे मनीराम व मेहदीकुलीखान यांनीं पातशाहापासीं पैगाम केला कीं, तीन लक्ष रुपये नजराणा घ्यावे आणि मिर्जासफीचा भाऊ जैनुल आबदीखान दौलतीचा वारस आहे, यास मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें द्यावीं ह्मणून पैगाम केला. त्यास पैगाम परस्परें पातशाहाकडे केला. नवाब अबदुल अहदखान यांचे विचारें न केला. ह्मणून यांनीं अफराशाबखान याजकडे आपलें एकोप्याचें सूत्र पक्कें करून, त्यास बक्षीगिरीचीं वस्त्रें पाठविलीं. आणि नजबकुलीखानास कानोडेहून बोलाऊन आणून, त्याचे हातून राजे मनीराम व मेहदीकुलीखान मिर्जासफीचे पक्षाचे आणि पातशाहासीं वेगळीं बोलणीं बोलतात हें जाणून, त्यांस कैद करून, राजे मनीराम यांपासून दहा हजार रुपये नख्त घेऊन सोडले. व मेहदीकुलीखानापासून सर्वस्व घेऊन, कैद करून, कानोडेस किल्ल्यांत नेऊन ठेविलें आहे. पुढें होईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९३.

श्री. आक्टोबर १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. मिर्जासफीखान मारले गेले ते अफराशाहाबखान व मोंगलीये

सरदार हे सर्व महमदबेग अमदानीसीं मिळून हा दगा केला. त्यास मिर्जासफीखान मारला गेलियावर तिसरे दिवसीं, महमदबेगाकडील वकील लछीराम अफराशाहाबखानापासीं येऊन बोलून, दहा हजार रुपये नख्त खर्चास, व तुह्मांकडे मुलुख ढवळपूर वगैरे आहे तो, व रावराजा प्रतापसिंग यांजकडील मामला व जयपूरकर राजे प्रतापसिंग यांजकडील मामला बदस्तुर तुह्मांकडे बाहाल आहे, याप्रमाणें बोलणें पक्कें करून त्यास आज्ञा दिधली. तो कूच करून ढवळपुराकडे गेला. अफराशाहाबखान यांनीं दरोबस्त फौजेचा व तोफखान्याचा बंदोबस्त केला. जुने दारोगे दूर करून, नवे दारोगे आपले ममतेचे ठेऊन, आपला काबू डिगेचे किल्ल्यांत वगैरे करून, तेथून हमसिरा बेगम यांस समागमें घेऊन, आगरियाचे किल्ल्याच्या बंदोबस्तास कूच केला आहे. ते मथुरेस आले आहेत. पुढें आगरियास जाऊन तेथील बंदोबस्त करून, मग दिल्लीस पातशाहाकडे येणार, हा विचार ठरला आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ २ मोहरम सन आर्बा समानीन मार्गशीर्ष मास

लेखांक ९४.

श्री.

ता. २४ आक्टोबर १७८३.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २७ माहे जिल्काद मुक्काम दिल्ली जाणून, स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः— येथील वर्तमान तर छ० १४ रोजीं सिलेमां सिको पातशाहाजाद्यास व अफराशाबखानास खिलत रवाना राजे दयाराम याजसमागमें केले. राजेमजकूर छ० १५ मिनहूस येथून कूच करून पातशाहाजाद्याकडे अफराशाहाबखानाकडे व शहाजाद्यास वस्त्रें निमअस्तीन सरबस्ता, पागोटें बमय गोशवारा, नुकेसी तुरा, व हमसिरा बेगमेस एक दुशाला पल्लेदार मातमपुरसीचा, व अफराशाबखान यांस वस्त्रें खिलत सात पारचाचा व हत्ती घोडा व कंठी मोत्याची व जेगा सिरपेंच व ढाल तरवार, येणेंप्रमाणें मीरबक्षीगिरीचा खिलत दिल्हा. याचें कारण हेंच कीं, हे भुकिस्त. त्यानें दोन लक्ष रुपये देणें करार केलें, व पुढें पासष्ट हजार रुपये दरमाहा त्याजकडे पातशाही परगणे आहेत त्यांजपैकीं देत जावा. ऐसा करारमदार कागदीं पत्रीं त्याजकडील वकील बाहादरसिंग वाणी येथें नवाब अबदुल आहदखान याजपासीं आहे, याचे विद्यमानें जाला आहे. परंतु पैका पावेल न पावेल हें अमलांत येईल तें खरें. दुसरें, मिर्जासफीखान मृत्यु

पावला आणि यांनीं इतकी जलदी करून मीरबक्षीगिरीचा खिलत अफराशाबखानास द्यावयाचें कारण हेंच कीं, मेजर ब्राउन फिरंगी त्याजपासीं आहे. त्यास फिरंगी व अफराशाबखान एकविचारें होऊन सिलेमा सीको पातशाहाजाद्यावर तेथें छत्र फिरऊन बखेडा केला, तर काय करावें ? आपले पासीं फौज व खजाना नाहीं कीं झुंजत फिरावें ? ते जबरदस्त ऐशी दहशत खाऊन, अबदुल अहदखानाचे विचारें उभयतांस खिलत पाठविले आहेत. त्यास, पातशाहा सरकारचे फौजेची मार्गप्रतीक्षा पर्जन्यन्यायें करितात. जर सरकारचे फौजेचें आगमन सत्वर होय, तर उत्तम आहे. नाहींतर हें संस्थान हातचें जातें. फिरंगी अथवा सीख पातशाहास आपले काबूंत करून सर्वांवर हुकूम करतील. या दिवसांत पातशाहास धीर पुरत नाहीं. सूचनार्थ विनंति लिहिली असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९५.

श्री. इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, पातशाहांनीं येथें वर्तमान ऐकिलें कीं, गाजुदीखान पुण्यास येणार. त्यास आह्मांस आज्ञा जाली कीं, "गाजुदीखान निमकहराम आहे. तुह्मीं श्रीमंतांस विनंति ल्याहावी कीं, गाजुदीखान पुणियास आलियास त्याचा गौरव किमपि न करणें, व त्यास तेथें थारा न देतां काढून देणें. यांतच आमची खुषी आहे. ह्मणून वारंवार दोन वेळ आज्ञा केली कीं, तुह्मीं जरूर जरूर लिहून पाठविणें." त्याजवरून विनंति लिहिली असे. आपणही पातशाहास एक अर्जी लिहून पाठवावी कीं, जे हजरतची मर्जी, त्याप्रमाणें अमलांत येईल. व शाहा अबदाली यांचा शुका व त्याचे वजिराचें पत्र ऐसीं दोन पत्रें त्यांजकडील सरकारचे नांवें आलीं, ते सेवेसीं पाठविलीं आहेत. व त्याजकडील वकिलानें सरकारांत अर्जी व आपल्यास पत्र ऐसीं पाठविलीं आहेत. तरी पातशाहाचे शुक्याचा जाब, अर्जी व वजिराचे पत्राचा जाब व वकिलाचे पत्रांचीं उत्तरें ऐसीं पाठऊन द्यावीं. व पातशाहानीं आह्मांस शुका पाठविला आहे, व वजिरानें पत्र लिहिलें आहे. हें बजिन्नस तिकडील वर्तमान कळावें ह्मणून सेवेसीं पत्रें पाठविलीं आहेत. त्यांजवरून विलायतचें वृत्त कळेल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९६.

श्री. इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पटिलाईच्या आसपासील सीख किरकोळी सरदार मिळून, चौदा पंधरा हजार स्वार व पंधरा वीस हजार प्यादे, बमय बायका लेंकरेंसुद्धां, तिकडे काळ पडला ह्मणून पोट भरावयास, या प्रांतीं बुढ्या सारंगपूरचा घाट यमुना उतरून आले आहेत. अंतरवेदींत सारंगपूर वगैरे आसपासचे गांव लुटून ताराज केले. पुढें कूच करून देबानेस आले. इकडून जे सीख भागसिंग व भंगेलसिंग वगैरे अंतरवेदींत रखीवाले होते ते, व जाबतेखान यांची फौज व दोन पलटणें व नाहारसिंग गुजर, वगैरे जमाव करून गोसगडाकडे गेले. त्यांसीं यांसीं झुंज जालें. शेवटीं जाबतेखानाकडील फौजेनें शिकस्त खाऊन, माघारा पळून गोसगडास आले. परस्परें चार पांचशें माणूस मारले गेले. त्यास सीख पुढें दरकूच मेरटप्रांतीं येणार ह्मणून वर्तमान आलें. त्याजवरून येथें सरदार आहेत ते गडबडून, त्यांजवर कूच अफराशाबखान पातशाहाजादासुद्धां मेरटकडे सिखावर जाणार. व रावराजा यांनीं कृष्णगडाकडे धामधूम केली आहे ह्मणून तिकडील बंदोबस्तास नजबकुलीखान जाणार. व पातशाहा व अबदुल अहदखान दिल्लींत आहेत. येणेंप्रमाणें तूर्त मसलत ठरली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९७.

श्री. इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. अफराशाबखान यांनीं अबदुल अहदखान यांचे विद्यमानें पातशाहास आपले मतलबाची याद लिहून दिधली, कीं याजवर दसकत करून द्यावें ह्मणजे आमची खातरजमा होईल. वितपसील कलमें:—

१ अकबराबादेची सुभेदारी व किल्लेदारी.

१ तोफखाना पातशाही हशम याची दारोगी.

१ मीरबक्षीगिरीची जागीर बदस्तुर नजबखान यास होती ते.

१ मराठे व फिरंगी व जयपूर व बिकानेर वगैरे राजे रजवाडे यांचे जाबसाल आमचे विद्यमानें असावे.

१ आमचे फौजेंतील मोंगल किंवा पलटणवाले जमातदार जो कोणी अर्जुदा

होऊन उठोन हजुरांत आला, त्यास हजुरांत न ठेवावें; आणि त्याची जायदाद आहे त्याची मुखत्यारी आमची आह्मांकडे असावी.

१ खैर परगणा पेशजीं फुलयेर फिरंगी सरकारचा चाकर पातशाही होता, त्याजकडे खैरचा परगणा जायदाद होती. तो आह्मांकडे असावा.

१ साडेबावीस सुभे पातशाही त्यांजवर मुख्त्यारीचा हुकूम आमचा असावा.

१ स्वारीस चालावें, त्यास बक्षीगिरीचे माहाल व खालशाचे माहाल याखेरीज नवा मुलूख सुटेल त्यापैकीं फौजेचा खर्च मजुरा द्यावा, आणि आमचे जातीची सरफराजी करावी.

१ चित्तापासून आमचे ठायीं कृपा ममता असावी. कोणीही आह्मांविषयीं किंतु मनांत घातला तर न आणावा. आह्मांस बोलाऊन आणून परस्परें शुद्धता करावी."

—
९

सदरहू नव कलमें लिहून दिधलीं होतीं. त्यांपैकीं पातशाहांनीं दसकत करून दिल्हें कीं, आगरियाची सुभेदारी व किल्लेदारी व मीरबक्षीगिरीचे माहाल जागीर बदस्तुर नजबखान येणेंप्रमाणें करार दसकत करून दिल्हें. बाकी कलमांचा जाब दिधला कीं, विचारून मग जे आज्ञा करणें तें करूं. याप्रमाणें जाबसाल जाले. पुढें काय विचार ठरेल ते विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९८.

श्री. डिसेंबर १७८२.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, मिर्जासफीखान मारला गेलियावर नवाब अफराशाहाबखान यांस मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें पातशाहानीं पाठविलीं. हें वर्तमान सविस्तर पेशजीं छ २७ जिलकादीं पत्रें पाठविलीं तें पावून वृत्त श्रुत जालेंच असेल. अलीकडे वर्तमान तर, मिर्जासफीखान मारला गेला, तो अफराशाहाबखान व मोंगलीये सरदार या सर्वांचे मतें मारला गेला. अफराशाहबखानास मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें जालियावर, पातशाहास अर्जी व नबाब अबदुल अहदखानास पत्रें पाठविलीं कीं, महमदबेग हमदानीस आह्मीं खिलत तयार केला आहे; आपणही हजुरीहून मेहेरबानगीचा खिलत पाठवावा. त्याजवरून अबदुल अहदखान यांनीं पातशाही खवास या समागमें देऊन वस्त्रें पाठवावीं ह्मणून तयारी केली आहे.

व मिर्जासफीखान यांचा बंधु जेनुल आबदीखान अंतर्वेदींत मेरटेकडे होता, त्यास काढून देऊन, मेरट वगैरे अकरा महाल सरकारांत घ्यावे हें अबदुल अहदखान यांचें मानस. त्याजवर यांची आज्ञा न चाले. त्याजबराबर चार पलटणें व एक हजार मोंगलीये स्वार व एक हजार सीख येणेंप्रमाणें सरंजाम आहे. ह्मणून यांनीं आपलीं पत्रें व पातशाहाचे शुके पाठवून, कानोडेस नजबकुलीखान होता त्यास बोलावून आणून बहुत सन्मान केला. सरबस्ता पागोटें, बमय गोशवारा, व मुकेसी तुरा, व निम अस्तिन व ढाल तरवार, दुय्यम बक्षीगिरीचीं वस्त्रें देऊन, त्यांजसमागमें भले माणूस जमातदार मातबर माणूस होते त्यांस सा निम अस्तिना व बावीस दुशाले व सा गोशवारे येणेंप्रमाणें देऊन, अंतर्वेदींत जेनुल अबदीखान यांचे व शिखांचे पारिपत्यास पाठवावें, तों इतक्यांत नवाब अफराशाहबखान यांनीं आगरियाकडील बंदोबस्त करून, हमसिरा बेगमेस समागमें घेऊन, कूच करून, मेरटेसमीप भुडबराल ह्मणून गांव चार कोस आहे, तेथें आले. दिल्लीहून नजबकुलीखानही कूच करून शामील जाले. व जेनुल आबदीखान बागपतास होता, तो तेथून कूच करून मेरट पाठीशीं देऊन, बागांत डेरे देऊन, लढाईस मुस्तेद जाला. हें पाहून आफराशाहबखान यांनीं जान अल्लीखान ह्मणून लथापतअल्लीखान खोजा—ज्यांस गुदस्तां मिर्जासफीनें धरून अंध केलें त्याजकडील दिवाण—मातबर माणूस आहे, त्याजसमागमें कुराण शपथपूर्वक पाठवून सलूख केला कीं, आपसांत झुंजणें ठीक नाहीं. ज्याप्रमाणें तुह्मी साहेबजादे नवाब महरूम नजबखान त्यांजपाशीं राहत होतां, त्याप्रमाणें आतां हमसिरा बेगमेपासीं असत जावें. ह्मणून बोलणें होऊन समरू फिरंगी याचे बेगमेचे विद्यमानें भेटी ठैरल्या. त्यास लष्करापुढें दोन कोस समरूचे बेगमेचे डेरे होते. तेथें छ २८ मोहरमीं हमसिरा बेगम व अफराशाहबखान व नजबकुलीखान गेले. तिकडून जेनुल आबदीखान दोनशां रावतांनिसीं आले. तेथें कुल बंदोबस्त समरूचे बेगमेचे पलटणाचा होता. तेथें परस्परें भेटी जाल्या. स्नेहवृद्धि करून आपलाल्या डेरियास गेले. दुसरे दिवशीं जेनुल आबदीखान हमसिरा बेगम यांचे डेरियास आले. तेथें अफराशाहबखान जाऊन, सरबस्ता पागोटें, बमय गोशवारा, व जेगा व शिरपेंच व निम अस्तिन व हत्ती घोडा तरवार, व हमराई जमातदार होते त्यांस दुशाले व गोशवारे देऊन, सन्मान करून, सिलेमा सिको पातशाजाहाजादा यांचे डेरियास नेऊन सरबस्ता पागोटें, बमय गोशवारा, मुकेसी तुरा व निम अस्तिन व दुशाला व तरवार येणेंप्रमाणें देऊन, समाधानाच्या गोष्टी बोलविल्या कीं, तुह्मीं सर्वांनीं एक

विचारें असोन, सरकार काम करीत जावें. ह्मणून बोलून आपलाले डेरियास गेले. जेनुल आबदीखानाचें बोलणें आहे कीं, नवाब नजबखान यांनीं मिर्जासफीखान यांस मेरट वगैरे अकरा महाल जायदाद दिली होती, ते त्यांनीं आह्मांस दिधली आहे. हे बदस्तुर आह्मांकडे असावी. नवाब अफराशाहबखान ह्मणतात कीं, हा मुलूख पातशाही आहे. त्यास मेरट वगैरे परगणे व तोफखाना व पलटणें हा सरंजाम सर्व सरकारचा आहे, तो तुह्मीं सोडून द्यावा. तुह्मी आह्मी दिल्लीस पातशाहापासीं जाऊं. ते धनी आहेत. जें देतील ते घ्यावें. नाहीं तर ज्याप्रमाणें नवाब नजबखानाचे वेळेस तुह्मांस चोविसां हजारांची जहागीर होती, ते मी देतों. भक्षून हमसिरा बेगमेसमागमें असावें. याप्रमाणें बोलणीं परस्परें होतीं. निदान ठैरलें कीं, पांचशें राऊत व दोन पलटणें यांचा सरंजाम लावून द्यावा. याप्रमाणें करारमदार ठैरून सलूख पक्का जाला. पुढें गुलाब गुजर परीक्षतगडकर यांजकडील व चत्रा जाटाकडील मामलत करून कुंज-पुरीयाकडे सीखांचा बंदोबस्त करीत जाणार ह्मणून मनसबा आहे. तूर्त पातशाहा-जादा सिलेमा सीको व अफराशाहबखान व हमसिराबेगम व नजबकुलीखान व जेनुल आबदीखान सर्व एक विचारें कसबें मेरट येथें सूर्यकुंडावर मुक्काम करून आहेत. पुढें काय मसलत ठरेल ते विनंति लिहूं. एक विचार हाही आहे कीं, दिल्लीस सर्वांनीं येऊन, पातशाहाची भेट घेऊन, मग जिकडे जाणें तिकडे जावें. अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ९९.

श्री. इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं विलायती नासपाती सुमार २५ पंचवीस व अंगुराची कुती एक, येणेंप्रमाणें पावला. दुसरियानें मेवा अद्याप आला नाहीं. त्यास पाठवीत जावा. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास यंदा या प्रांतीं सिखाची गडबड बहुत ह्मणून महाप्रयासें एकवेळ विलायती मेवा आला, तोही कांहीं चांगला आला नाहीं. नासपाती बहुतच लहान होत्या. आणि सेव तो आलेच नाहींत. त्यास दुसरियानें मेवा आला असता तर जरूर जरूर हजुरांत पाठवितों. दुसरियानें मेवाच आला नाहीं ह्मणून पाठविला नाहीं. व या दिवसांत हैदरनाइकाचे पुत्राचीं पत्रें पातशाहास अर्जी व मिर्जासफीखानास पत्रें आलीं आहेत कीं, आमचे वकील राव बालमुकुंद हजुरांत आहेत, त्यांस बिदा करून द्यावें. व बालमुकुं-


दासही पत्र कीं, तुह्मीं उठोन येणें. त्यावरून वकील मशारनिल्हे दिल्लीहून जैपूरचे मार्गे जाणार. पातशाहास अर्ज, हैदरनाइकाचे पुत्रास मातमपुरसीचीं वस्त्रें द्यावीं ह्मणून केला होता. त्यास पातशाहानीं कांहीं उत्तर न दिधलें. व नवाब अबदुल अहदखान यांसीही दहा पांच वेळां हाटकिलें कीं, मातमपुरसीची वस्त्रें द्यावीं. त्यास यांनींही टाळाटाळच केली. वकिलास मात्र रुखसतीचीं वस्त्रें देऊन बिदा केलें. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १००.

श्री. इ. स. १७८३.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः–

विनंति ऐसीजे. राजश्री पाटिलबावा यांसी व आबा चिटणीस व राणेखान यांसी ल्याहावें कीं, कोट्याचे वरातीचा फडशा करून हरएक विषयीं साहित्य करणें ह्मणून ल्याहावेंसें लिहिलें. त्यास पुरुषोत्तमपंत वारल्यावर, तुह्मी तेथें आहां हें पाटिलबावांस पेशजीं लिहिलेंच आहे. कोट्याचे वरातीचा मजकूर पाटिलबावांस लिहिला असतां तुह्मांस तेथें बरा पडतो कीं काय, तें लिहून पाठवावें. ह्मणोन आज्ञा. त्यास, आबा चिटणीस व राणेखान व राजश्री नारो शिवदेव यांसीं पत्रें कीं, कोट्याचे वरातीचा निकाल पडे, व रावतांचे बोलीचा ऐवज दरसाल पावे, व हरएक विषयीं यांचे साहित्य करून दिल्लीस यांचे कामांत बखेडा न पडे, व याचे हातें काम चाले, ह्मणोन त्रिवर्गास पत्रें; व पाटिलबावांसही पत्र कीं यांचे ठिकाणीं आपण कृपा करितच आहां, व विशेष करून चालवावें. बुंदेले व झांशीकर यांसीं निक्षून ताकीद करून यांचे बाकीचा ऐवज उभयतांकडे असेल तो देवावा, पुढें खेडीं वसुली लाऊन देवावीं. हरएक विषयीं यांचें चालवावें. ह्मणोन पत्रें जरूर पाठवावीं. येथें उपयोगीं पडतील. नारो शिवदेव व आबा चिटणीस यांस अधिक ल्याहावें कीं, उपयोगी प्रसंगीं पडतील. नारो शिवदेव यांसी स्वामींनीं खाजगत पत्रें पाठवावीं. त्यांतही एक दोन वेळां ल्याहावें कीं ममता धरून प्रसंगीं आमचे उपयोगी पडत. * * * * * व किल्ल्याची शिबंदी मनस्वी चढली आहे. इतका सरंजाम मशारनिल्हेकडून होणार नाहीं. बखेडा होऊन किल्ल्यास अपकार अथवा रांगड्याचे हातीं जाऊन बखेडा जाल्यास प्रांतास अपकार. व दुसरी गोहदकराप्रमाणेंच मसलत उभी राहील. यास्तव सुचली विनंति लिहितों कीं, मामलतीचे तगेरीचा हंगाम नाहीं. सांप्रतच्या प्रसंगांत बखेडा नसावा. यास्तव यांसीच चार रुपये ठराऊन मामलत



दुसरा अकबरशहा.

(शहाअलम बादशाहाचा पुत्र. दिल्लीचा बादशाहा इ. स. १८०६–१८३७.)

ठेवावी. पुढें सरकारच्या फौजा इकडे येतील व पाटिलबावा गोहदेचे मसलतीपासून उलगडून येतील, तेव्हां जो अर्थ करणें तो करावा; किंवा घरचें सामान व पैकेकरी व इतबारी मातबर त्यांचे जिमेस जागा करावी. बंदोबस्त चांगला करून फौज या प्रांतीं राहिल्यास पैका येईल. येथील चर्या बखेड्याची आहे. व दिवस नाहींत जाणून विनंति लिहिली आहे. स्वामी करणें तें करतील. खावंदाचे प्रतापें सर्व बंदोबस्त होतील. येथील मामलेदार करारी होतील त्यांस ताकीदपत्रें व सनद आलाहिदा याद लिहिली आहे. त्याप्रमाणें जलदीनें पाठवावयास आज्ञा जाली पाहिजे. बुंदेल्यास व झांसीकरास निक्षून ताकीद कीं जागा लाऊन, मागील बाकी व हाल दरसालचा ऐवज बोभाट न ये, तें करणें ह्मणोन पत्र; व हुजरे कारकून बहुत निकड करून ऐवज व जागा पदरीं पडेसें करीत, इतका जोर व निकड सरकारची जाल्यासच यांजकडील कांहीं निकाल पडून उपयोगी पडेल. विनासक्ती हे कांहीं काम करीत नाहींत. प्रयत्न तितका जाला. निरुपाय विनंति स्वामींस लिहिली आहे. सिद्धीस जाईल. गोहदकरानें इंग्रेजांकडे कलकत्त्यास वकील पाठविला आहे. व इंद्रसेन इंग्रजांकडील पाटिलबावांपासीं आहे. लष्करांत पावलियावर साकल्य वर्तमान सेवेसीं विनंति लिहूं. सेवेसीं श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०१.

पै ॥ छ० १९ रविलावल. **श्री.** १३ जानेवारी इ. स. १७८४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १९ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणून स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– आपण छ० १० सवालचें पत्र पाठविलें, तें छ० १९ जिल्हेजीं पावून, शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, "मेजर बारून इंग्रेज दिल्लीस येऊन बोलणें होईल तें लिहून पाठवावें, व गोहदची मसलत आटोपून दिल्लीकडे जावें; पातशाहाची भेट घेऊन तिकडील बंदोबस्त करावा; ह्मणून राजश्री महादजी शिंदे यांस लिहिलें आहे. ते मसलत आटोपली ह्मणजे तिकडेच येतील. पातशाहानीं इंग्रेजांसीं राजकारण हरगीज लावूं नये. इंग्रेजांचा पाय पातशाहींत एक वेळ शिरला असतां पातशाहीस अपाय. याजकरितां त्यांजकडील संधान ठेवूं नये. जें लिहिणें तें राजश्री महादजी शिंदे यांस लिहिलें असतां, ते मसलत आटोपली ह्मणजे तिकडे येतील." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, मेजर

बारून इंग्रेज, नवाब अफराशाहबखान यांजपासून आज्ञा घेऊन, शरीरीं समाधान नाहीं ह्मणून, आज एक मास जाला आहे, दिल्लीस आला आहे. नवाब अबदुलअहदखान यांनीं सबदरजंगाचे हवेलींत आपले समीप जागा राहावयास दिधली आहे. इंग्रेजांकडील वकील सलाउद्दीखान यांसीं नित्यानीं खिलबत होत असतें. खिलबताचा मजकूर अद्यापि समजण्यांत आला नाहीं. समजल्यावर विनंति लिहूं. अद्याप इंग्रजाची पातशाहासीं मुलाजमत जाली नाहीं. नवाब अफराशाहबखान यांची परवानगी येईल, अथवा तेच दिल्लीस येतील, तेव्हां मुलाजमत होईल. मुलाजमत जालियावर काय मनसबा ठैरावतील ते विनंति लिहूं. व राजश्री पाटीलबावांकडील प्रकार ह्मणावा, तर बदस्तुर गोहदेस घेरा घालून बसलेच आहेत. अद्यापि तेथील कांहीं गुंता उरकला नाहीं. आह्मी येथील वृत्त वरचेवर आज्ञेप्रमाणें राजश्री पाटीलबावांस लिहीत असतों. तेथील वृत्त राजश्री नारो शिवदेव बारीक मोठें लिहीतच असतील. त्याजवरून ध्यानांत येतच असेल. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. ते स्वीकारून उत्तरीं लोभ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १०२.

श्री. माहे फेब्रुवारी इ. स. १७८४.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति. पत्रीं आज्ञा कीं, ''पातशाहा पूर्वी प्रयागास असतां व त्याचे अगोदर व अलीकडे, इंग्रेजांसीं त्यांचे करारमदार कैसे कैसे जाले आहेत, व मुलकाच्या सनदा कोठकोठील कैशा दिल्या आहेत? अंतरवेदींत केवढ्याचा मुलुख दिल्हा, त्याच्या सनदा दिलेल्या आहेत किंवा कसें आहे? याचा शोध बारकाईनें काढून, तपसीलवार लिहून पाठवणें''. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास पातशाहाचे दप्तरीं मनास आणिलें. त्यांत मजकूर कीं, प्रयागीं पातशाहा होते त्यासमयीं, इंग्रेज, शिवाय तोफा ताहफ, सव्वीस लक्ष रुपये दरसाल देत होते. व प्रयागचा सुभा व कडा कुरा हे दोन्हीं स्थळें सुजातद्दौलाकडून सोडवून पातशाहास देविलीं होतीं. त्यांत तेहतीस लक्ष रुपये पातशाहास येत होते दरसाल. व पातशाहांनीं इंग्रेजांस सनद, बर्दवान व इसलामनगर येथील कमाविसीनें मामलत सांगितली आहे ह्मणून सनद, व सुभे बंगाला व सुभे पट्टणा येथील दिवाणगिरीची सनद, याप्रमाणें दोन सनदा मात्र जाल्या आहेत. याशिवाय अंतरवेद वगैरे कोठीलही सनद पातशाहाचे घरींहून दिधली नाहीं. त्याची याद पातशाही दफ्तरची, पारसीची,

राय सिद्धराय पेशकार दप्तरचे, त्यांजपासून आणवून सेवेसीं पाठविली आहे. त्याजवरून ध्यानास येईल. दप्तरीं सनदा बंगाल्याची व पट्टण्याची दिवाणगिरी इंग्रेजांचे नांवें व सुभा पातशाही अलाबिर्दीखानाचा नातू मुबारकजंगबहाद्दर याचे नावें व बर्दवान इसलामनगर यांची मामलत कमाविसीनें आमानी सांगितली आहे. ह्याचा दफ्तरीं दाखला इतकाच आहे. याजशिवाय पातशाहा त्याचे काबूंत होते तेसमयीं, खास दसखती शुके व फर्द दसखत करून त्यांत दस्तऐवज कांहीं असल्यास न कळे. सनदी दप्तरीं दाखला इतकाच, ह्मणून खालशाचे पेशकारांनीं सांगितलें. व याजशिवाय महमदखान पठाण वगैरे पातशाहास देत होते. दप्तरीची पारसी याद पाठविली आहे. त्याजवरून श्रुत होईल. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०३.

श्री. माहे फेब्रुआरी इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, छ० १३ गुरुवारीं माहे मजकुरीं मेजर बारून व बक्षी बुरट व दोघे इंग्रज आणीक, यांची पातशाहासीं मुलाजमत अफराशाहाबखान यांचे विद्यमानें जाली. नजर पातशाहास व पातशाहाजाद्यास मिळून, मोहरा चारशें साठ दिधल्या. मेजर बारून त्यास सातापारच्याचा खिलत, व मोत्यांची माळ व जेगा व सिरपेंच, हत्ती, घोडा, तरवार येणेंप्रमाणें, व बक्षी बुरट यास पांचा पारच्याचा खिलत, सिरपेंच, व घोडा, व दोन इंग्रेज त्यांस पांचा पारच्याचा खिलत. व हमराई वकील व दिवाण मुनशी यांस पांच दुशाले व दोन गोशवारे येणेंप्रमाणें देऊन बहुमान केला; आणि विचार ठैराविला आहे कीं, दो चौ रोजां यांस येथून रुकसत करून द्यावें. लखनौस जातील. हें अफराशाहाबखानाचें मानस. व अबदुल अहदखान यांनीं फिरंगी यांस लाऊन घेऊन, पातशाहाचें त्यांचें अंतस्थ एक करून दिल्हें आहे कीं, आह्मांपाशीं तुह्मीं असावें. याचें कारण हेंच कीं, पातशाहाचे कारखाने उपासीं मरतात, आणि अबदुल अहदखान यांसही भक्षावयास नाहीं. मुलुक व जागिरा आहेत त्यांत अफत आसमानी जाली. व शीख व यांच्या फौजांनीं लुटून ताराज केला. ह्मणून खानखानाचा मुकरबा संगमरवरी होता, तो फिरंग्यास विकला. त्यांनीं दीडशें गाडी भरून लखनौस एक खेप गेली, पुढें आणीकही जाणार. त्यास यांची हे अवस्था ह्मणून, फिरंग्यास लावून घेऊन, निदान दिल्लींत यांनीं कोठीही केली तर करूं द्यावी, आणि त्यांजपासून पैका घेऊन

आपला कालक्षेप करावा, या विचारांत आहेत. मेजर बारून यांचें मानस कीं, पातशाहा व अबदुल अहदखान मुकित्त, व यांची फौज अफराशाहबखान व नजबकुलीखान वगैरे आहेत, हे एकमेकांत नाहींत. याजकरितां पातशाहास व अबदुल अहदखान यांस भक्षावयास देऊन, आपलेकडे लावून घेऊन, सर्वांवर हुकूम राजे रजवाडे वगैरेवर करावा, या लक्षांत इंग्रेज आहेत. मेजर बारून यांनीं स्वतंत्र एक खत्री मुत्सद्दी व वीस हरकारे, जैसिंग कन्हया वगैरे शिखांचे सरदार मातबर आहेत त्यांकडे पाठविला आहे, आणि करार करून पाठविला आहे कीं, लाख स्वार घेऊन येणें. तुह्मी आह्मी मिळून जो मुलूक नवा घेऊं, त्यापैकीं सा आणे तुमचे व दहा आणे आमचे. तुह्मीं आह्मीं एक विचारें असावें. ह्मणून जाबसालास वकील, जैसिंग कन्हया वगैरेकडे गेला आहे. त्यांजपासीं पावून अद्याप उत्तर आलें नाहीं. तात्पर्य, फिरंगी यांचें मानस कीं, दिल्लींत पाय सिरऊन जैसे लखनौस मालक होऊन बसले आहेत, तैसे दिल्लींतही मालक होऊन बसावें, या लक्षांत आहेत. पुढें काय विचार ठरेल तें विनंति लिहूं. छ. १८ मीनहूस फिरंगी यांनीं पातशाहांस नजर वस्त्रें एकतीस किस्ती बंगाली कापड सफेद बाबथानें सुमार ४० चाळीस, व मुशजर वगैरे रेशमी थानें सुमार ३० तीस, एकूण कापड थानें सत्तर, व तरवार एक, व कटार एक, फिरंगी तांब्याच्या कबजा चार सोनेरी रंगाच्या, येणेंप्रमाणें गुजराणिलें. पातशाहांनीं मेहेरबानगीचा खिलत मेजर बारून यांस निमअस्तीन किनखापी व गोशवारा, बक्षी बुरट यास निमअस्तीन किनखापी, येणेंप्रमाणें देऊन आज्ञा केली कीं, तुह्मीं नी त्यांनीं मुजऱ्यास येत जाणें. येणेंप्रमाणें फिरंगी यांस लाऊन घेतलें आहे. मागाहून निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०४.

श्री. १० फेब्रुवारी इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति कीं, या दिवसांत नवाब अबदुल अहदखान भीष्मपितामह होऊन, पातशाहास पुर्तेपणें आपले लगामीं लाऊन घेतलें आहे. नजबकुलीखानास बगलेंत घेऊन, अफराशाबखानासीं जाबसाल लाविला आहे कीं, पातशाहांस स्वारीस काढितां, तर स्वारीची तयारीस व माहालचे खर्चाची बेगमी करून द्यावी; ह्मणिजे तयारी करून स्वारीस चालूं. त्यास, अफराशाबखान यांचें मानस कीं,

रणजितसिंग जाट भरतपूरकराची मामलत, मेजर ब्राऊन फिरंगी यांचे विद्यमानें लाख रुपये जाली आहे, तोच ऐवज परस्परें फिरंग्याकडून पातशाहास देवावा; आणि फिरंगी यास रुसकत करून लखनऊस वाटेस लावावें; आणि पातशाहास स्वारीस बाहेर काढावें; याप्रमाणें अफराशाबखान यांचें मानस आहे. दुसरें, जैपुराकडे स्वारीस चालावें. व पातशाहाचें व अबदुल अहदखान यांचे मतें कीं, सरहद्देकडे शिखांवर चालावें. याप्रमाणें जाबसाल आहेत. अबदुल अहदखान यांचें मानस कीं, आपसांत परस्परें विरुद्ध पाडून, नजबखानाचें नांव कोठें न राहे या विचारांत आहेत. ह्मणून इंग्रेजांसही लाऊन अंतस्थ ठेविलें आहे, व शिखांकडेही जाबसाल आहेत. व आपलेकडील खाशा फौजांचीही मार्गप्रतीक्षा आहे कीं, पुण्याहून होळकर व खाशी फौज, व गोहद सुटून राजश्री पाटीलबावाही लौकर येत, असें ईश्वर कधीं करील तो सुदिन! पातशाहा आदिकरून सर्वांचें लक्ष लागलें आहे. मनोरथ पूर्ण होईल तो सुदिन. हें अवघें कटकपें अबदुल अहदखान करितात. हें अफराशाबखान यांनीं जाणून, अबदुल अहदखानास विरुद्ध दाखविलें. तेव्हां हे दबून, पातशाहास विनंति केली कीं, अवघें निमित्त मजवर येतें, आणि हे माझी पुन्हां बेअब्रू करितील. त्याजवरून पातशाहांनीं पुन्हां सिलेमा सीको पातशाहाजाद्यास छ १८ रोज मंगळवारीं अफराशाबखान यांचे स्वाधीन केलें, कीं यास स्वारीसमागमें घेऊन जावें. त्यांनीं छ० मजकुरीं पातशाहाजाद्यास लष्करांत दाखल करून, गोसगडाकडे शीख आले आहेत त्यांजवर तूर्त जाणार. कळावें बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०५.

श्री. १९ फेब्रुवारी इ. स. १७८४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २७ माहे रविलावल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—आपण....जिल्हेजचें पत्र पाठविलें, तें छ २ सफरीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "सरकारची फौज लवकर यावी ह्मणून लिहिलें. त्यास हें वर्तमान ....महादजी शिंदे यांस दिल्लीकडील बंदोबस्ताविषयीं लिहिलें आहे. गोहदकर जाटाची मसलत आटोपांत आली आहे. ते आटोपली ह्मणिजे तिकडेच येतील. तुह्मींही राजश्री महादजी शिंदे यांस वरचेवर वर्तमान लिहित जावें. व पातशाहास अर्ज करावा कीं, इंग्रेजांसीं व शिखांसीं हरगीज राजकारण करूं नये. यांचा

पातशाहींत एक वेळ पाय शिरला ह्मणजे मग भारी पडेल. याजकरितां त्यांसीं राजकारण लाविलें असल्यास तोडून टाकावें. जें सांगणें तें शिंद्यांस सांगावें हें चांगलें. याप्रमाणें तुह्मीं अर्ज करावा. वरकड अधिक उणें वर्तमान होत जाईल तें लिहित जावें. मिर्जासफी मारला गेलियावर कसें कसें जालें, तें लिहून पाठवावें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास, इकडील वर्तमान पेशजीं छ १९ सफरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, ते पावून वर्तमान श्रुत जालेंच असेल. त्यास, स्वामींचे आज्ञे-प्रमाणें रा० महादजी शिंदे यांस वरचेवर येथील वर्तमानाचीं पत्रें पाठवितों. ते समीप ह्मणून आधीं त्यांजकडे पत्रें रवाना करितों. मग हजुरांत पाठवितों. व आज्ञेप्रमाणें पातशाहास विनंति केली कीं, आमचे साहेबांनीं अर्ज केला आहे कीं, फिरंग्यांकडे व शिखांकडे जाबसाल ठेवणें ठीक नाहीं. हे कोमबंद (?) आहेत हें आपणही जाणतात. त्यास जे आज्ञा करणें ते, रा० माधवराव शिंदे समीप आहेत, यांस आज्ञा करणें ते करीत जावी. याचें उत्तर पातशाहांनीं दिधलें कीं, "ज्या दिवसापासून विसाजीपंत गेले आहेत, त्या दिवसापासून पुन्हां इकडील खबर घेतलीच नाहीं. व राजश्री पाटीलबावांस आज दोन वर्षें जालीं, लिहितां लिहितां थकलों! त्यांजकडील आनंदराव नरसी, एक वर्ष जालें, स्वतंत्र येऊन बसला आहे. तो नित्यांनीं लबाडी करितो कीं, आज पाटीलसाहेब येतात, उद्यां येतात! परंतु त्याची गोष्ट कांहींच अमलांत येत नाहीं." ह्मणून आज्ञा केली. त्याजवरून पुन्हां विनंति पातशाहास केली कीं, आतां गोहद बहुतच जेर जाली आहे. तेथील फडशा सत्वरच करून, राजश्री पाटीलबावा हजुरांत येतील. व श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचीही ताकीद आहे कीं, सत्वर हजुरांत जाणें. व आजपावेतों दक्षिणेंत इंग्रेजांचा वगैरे बखेडा होता, ह्मणून फौजा या प्रांतीं न आल्या. आतां तिकडील सर्व बंदोबस्त मनोदयानुरूप जाला आहे. हजूरच्याही फौजा सत्वरच येतील ह्मणून विनंति केली. याचें उत्तर पातशाहांनीं दिल्हें कीं, "जोंपावेतों ते येतील, तोंपावेतों ईश्वरें काय नेमिलें असेल तें घडेल." आह्मीं उत्तर दिल्हें कीं, ईश्वर उत्तमच करील. याप्रमाणें बोलणें जालें. परंतु यांनीं अबदुल अहदखान यांचे विचारें इंग्रेजांस लावून ठेविलें आहे. व येथें आनंदराव नरसी वेरूळकर गृहस्थ, राजश्री पाटीलबावांकडून वकालतीस पातशाहापासीं स्वतंत्र आहे. तोही परस्परें पातशाहासीं नाजराचे विद्यमानें बोलत असतो, व येथील वर्तमानही वरचेवर यांस लिहित असतो, व आह्मीही लिहित असतों. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०६.

श्री. १२ जुलई इ. स. १७८४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० २३ माहे साबान मुक्काम श्रीमथुरा जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– इकडील वर्तमान पेशजीं छ०६ माहे मजकुरीं विनंतिपत्रें पाठविलीं, तीं पावून वर्तमान सविस्तर कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पूर्वी राजश्री पाटीलबावा चमेल उतरून आगरियाचे समीप येऊन, पातशाहाच्या व यांच्या भेटी जालियावर पातशाहांनीं आज्ञा केली कीं, सलतनतीचा बंदोबस्त करावा. त्यास राजश्री पाटीलबावांहीं विनंति केली कीं, कांहीं पदाखेरीज सलतनतीचा बंदोबस्त कैसा होतो? त्यावरून पातशाहा बोलले जे, "राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री तुकोजी होळकर व तुह्मी ऐसे त्रिवर्ग एकत्र असतां, श्रीमंत राजश्री नारायणराव यांचे नांवें मीरबक्षीगिरीची खिजमत दसकत करून घेतली, आणि पुन्हां त्यांचा तुमचा बेबनाव जाला. तुह्मी कूच करून रेवा उतरून देशीं गेले. त्या उभयतांनीं किल्ल्यास मोर्चे लावून बदमामली करून झुंजले. पुढें तैसें आह्मीं आणीक पद तुह्मांकडे सांगावें, आणि आपलें घर तुह्मांस सोपून, पुन्हां हरकोणी येऊन बदमामली आह्मांसीं करील, ऐसा प्रकार न घडावा. याजकरितां चित्त प्रशस्त होत नाहीं." त्याजवरून राजश्री पाटीलबावा बोलिले जे, "विना पद दिल्याखेरीज चौघांवर दाब बसून सलतनतीचा बंदोबस्तही होणार नाहीं." त्याजवरून पातशाहा बोलिले कीं, "तुह्मांकडे पद सांगावें, आणि वजीर व इंग्रेज आदिकरून सर्वांवर दबाव पडून सलतनतीचा बंदोबस्त व्हावा, ऐसा प्रकार घडला पाहिजे. त्यास श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचे नांवें वकील-मुतलखी व मीरबक्षीगिरी हें दोन्ही पदें त्यांजकडे देऊन, त्यांची नायबत आह्मी तुह्मांस देतों." याप्रमाणें बोलणें होऊन, राजश्री पाटीलबावांनीं विनंति केली कीं, "आह्मी श्रीमंतांस विनंति लिहून पाठवितों. तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं." त्याजवरून पातशाहा बोलिले जे, "आफराशाबखान मृत्यु पावला, याजकरितां फौजेंत व तोफखान्यांत बखेडा जाला आहे. तुह्मीं दक्षिणेस पत्रें पाठवाल आणि तेथून उत्तरें येतील या गोष्टीस दिवसगत लागेल; आणि येथें बखेडा वाढेल. याजकरितां तुह्मांस नायबतीचीं वस्त्रें दोहीं पदाचीं देतों. हें घेऊन बंदोबस्त करावा, हें ठीक आहे." त्याजवरून यांणीं प्रथम श्रीमंतांचे नांवें वकील-मुतलखीचीं वस्त्रें व नालकी व मीरबक्षीगिरीचा खिलत व कांहीं मरातब व............सरंजाम

घेऊन, चौथे रोजीं आपण नायबतीचा खिलत व नालकी घेतली. याप्रमाणें वर्तमान जालें. त्या समयीं आह्मी येथें लष्करांत नव्हतों; दिल्लीस होतों. याजकरितां हल्लीं मागील वर्तमान मनन करून विनंति लिहिली आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०७.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पृथ्वीसिंग राजा जयपूरकर याचा पुत्र किसनगडीं आजुळीं आहे. त्यास रावराजा प्रतापसिंग माचेडीकर यांचें मानस कीं, त्या मुलास आणून जयपुरीं राज्यावर बसवावें; आणि सरकारची नजर ठरेल त्याची निशा मी करून देईन. तेथील मुख्त्यारी व कारभार मजकडे सांगावा. राजा प्रतापसिंग हल्लीं राज्यावर आहे, तो नालायक आहे. कांहीं राज्यायोग्य नाहीं; आणि राज्याचा अधिकारही त्यास नाहीं. ज्येष्ठ पुत्राचा पुत्र आहे, त्यास अधिकार आहे. ऐसीं बोलणीं घटवटना आहे. त्यास खुशालीराम बोहरा जयपुराहून जाबसालास येणार. तो आलीयावर पूर्वी मामला जाला आहे, त्या ऐवजाचा फडशा करून दिल्हा तर उत्तम. नाहीं तरी रावराजा प्रतापसिंग यानें किसनगडचें राजकारण ह्मणतो तें करावें. ऐसा विचार आहे. परंतु प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०८.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. मोहरसिंग सीख यास रावराजा प्रतापसिंग याजवर तंखा करून पत्रें दिधलीं आहेत कीं, पावणेतीन लक्ष रुपयांचे परगणे जयपूरपैकीं लावून देणें. ह्मणून पत्रें लिहून देऊन, करारमदार जाला कीं, पातशाही खालशाचा मुलुख आहे, त्यांत धामधूम करूं नये व राखी घेऊं नये. येणेंप्रमाणें वर्तणूक करून, जयपूरचे माहाल रावराजा लावून देईल, तो ऐवज घेऊन स्वस्थ असावें. सरकारचा अंमल सरहद्देकडील जाईल, त्या समयीं पांचा हजार स्वारांनसीं समागमें असावें. तिकडील मुलुख सुटेल, त्यांपैकीं दाहा लक्षांची जागा आणीक लावून देऊं. ह्मणून करारमदार होऊन, त्यास वस्त्रें देऊन बिदा केलें. त्यास

मोहरसिंग व तुलज्यासिंग हे दोही थोकांकडील दोघे जण लष्करास असतां, याप्रमाणें बोलणें बोलत असतां, व सरंजाम लाऊन देणें व दिल्हा ऐसें असोन, यांचे निसबतीचे सीख अंतरवेदींत मेरटेकडे जाऊन, दर रुपयास दोन आणे रखी येणेंप्रमाणें तमाम अंतरवेदींत हंसील केली व करितात. याप्रमाणें वर्तमान आहे. मुलुख मोठा, कारभार मोठा, परंतु अद्यापि खातरखा बंदोबस्त नाहीं. पुढें प्रत्ययास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १०९.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पूर्वीं राजश्री लालाजी बल्लाळ यांजकडे आगऱ्याचा सुभा सांगिला होता. त्यासी ते शिबंदी जाजती मागूं लागले, ह्मणून राजश्री बाळोबा पागनीस यांजकडे आगऱ्याचा सुभा सांगोन, राजश्री रायाजी पाटील यांस तेथून बोलावून आणून, कोलस रामगड उर्फ अल्लीगडाकडे पाठविणार त्यांच्या तैनातीस फौज व पलटणें रवाना केले आहेत. ते यमुनापार जाऊन उतरले आहेत. राजश्री रायाजी पाटील यांस दो चौ रोजा पार उतरून, अल्लीगड खाली करून घ्यावा या उद्योगास रवाना करणार. नजबकुलीखान यांचे विद्यमानें कांहीं रुपये देऊन किल्ला आपलेकडे ठेवावा, नाहीं तर कांहीं भक्षावयास जागीर करार करून घेऊन किल्ला स्वाधीन करावा, ऐसा जाबसालही आहे. प्रत्यास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११०.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री पाटीलबावांनीं आपलेकडून खिलत वस्त्रें रवाना केलीं बतपसील:—

१ मंजूरअल्लीखान नाजर यांसी खिलत पाठविली. साता पारच्याचा खिलत, वस्त्रें, व मोत्यांची कंठी व जेगा शिरपेंच व हत्ती व घोडा येणेंप्रमाणें.

१ सीतलदास मशारनिल्हेच्या कडील. त्यासी पांचा पारच्याचा खिलत, जेगा व शिरपेंच, येणेंप्रमाणें.

१ हसन रजाखान वजिराचा कारभारी. त्यासी पांचा पारच्याचा खिलत, वस्त्रें व जेगा व शिरपेंच, येणेंप्रमाणें.

१ हैदरबेगखान वजिराचा मुख्त्यार. यासी साहा पारच्याचा खिलत, व जेगा, शिरपेंच येणेंप्रमाणें.

१ राजश्री सदाशिवपंत बक्षी, पाटीलबावांकडील वकील. यांसी पांचा पारच्याचा खिलत वस्त्रें व जेगा शिरपेंच येणेंप्रमाणें.

एकूण पांच खिलत रवाना केले आहेत. व या दिवसांत हापड साहेब इंग्रज पारमरसाहेबाचे बदली होऊन, मेघफासन साहेब याजकडून कलकत्त्याहून लखनौस आला आहे, ह्मणून वर्तमान आहे. पुढें विशेष वर्तमान ऐकिल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १११.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री अंबाजी इंगळे यांस राजश्री पाटिलबावांनीं दिल्लीचे बंदोबस्तास व शीख दिल्लीचे आसपास व गुजर धामधूम करित ह्मेते ह्मणून पाठविले होते. त्यास मशारनिल्हेनीं दिल्लीसमीप पाहाड आहे, तिकडे धांवणी करून, पांच सात गांव गुजराचे मारून, कांहीं चाळीस पन्नास गुजर व एक दोन त्यांचे सरदार मारून, गुजरांचा बंदोबस्त करून, तेथून कूच करून, दिल्लीपलीकडे मौजे बेराडी पलीकडे चार कोसांवर, दिल्लीहून बारा कोसांवर, यमुनातीरीं मुक्काम करून आहेत. तिकडून शिखांची फौज रायसिंग व जसासिंग वगैरे पांच सरदार डल्लेवाले व भागसिंग व भंगासिंग वगैरे चार सरदार, एकूण नव सरदार शिखांचे, फौज दहा बारा हजार आहे; ते पाणिपताकडून कूच करून, यांजपासून तीन कोसांवर सोनपतासमीप मुक्काम करून आहेत. यांचा त्यांचा जाबसाल होऊन ठराव जाला कीं, त्यांची रखी, गांव पाहून प्राचीन आहे त्याप्रमाणें त्यांनीं घ्यावी, आणि यांजसमागमें फौजेसुद्धां चाकरी करावी. याप्रमाणें अंबाजी इंगळे यांचे विद्यमानें ठराव जाला आहे. शिखांच्या व इंगळ्यांच्या भेटी छ १६ मिनहूस जाल्या. ते सरदार शीख यांचे डेरियास आले. यांनीं वस्त्रें घोडीं शिष्टाचार केला. हे त्यांचे डेरियास गेले. त्यांनीं वस्त्रें घोडीं शिष्टाचार केला. याप्रमाणें होऊन, अंबाजी इंगळे यांनीं करार केला कीं, तुह्मांतून दोन सरदार मातबर आह्मांसांगातें चाला. मी श्रीमंत राजश्री पाटिलबावांसीं भेटी करून देतों, आणि याप्रमाणें ठराव

जाला आहे ह्मणून विनंति करितों. मग ते जे आज्ञा करितील, ते तुह्मीं आह्मीं मान्य करून वर्तणूक करावी. याप्रमाणें बोलणें ठरलें आहे. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११२.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री कृष्णराव गोविंद यांचे पुत्राकडे उदेपूरचा कारभार होता; तो त्याजकडून काढून, राजश्री लालाजी बल्लाळ कोटेकर यांजपासून पाऊण लक्ष रुपये घेऊन, त्यांजकडे उदेपूरचा कारभार सांगितला. त्यांस हत्ती घोडा शिरपेंच जेगा व पागा व वस्त्रें येणेंप्रमाणें देऊन व सन्मान करून, त्यांस बिदा केलें आहे. परंतु कागदापत्रांचा बंदोबस्त होणें ह्मणून राहिले आहेत. आठा पंधरा रोजा जाणार. बुंदी, कोटे, उदेपूर, ऐशा, तीही संस्थानच्या वकालती व चवथाईचे अमलाची मामलत मशारनिल्हेकडेस करार जाली. मागील हिशेबाचे कांहीं फडशे जाले, कांहीं शेष बाकी फडशा होणें आहे, तो करून जाणार. व रामगडाकडे रायाजी पाटील फौजसुद्धां गेले आहेत. त्यांनीं कोलचे शहरांत ठाणें बसविलें. तेथें दोन पलटणें व चाळीस तोफा होत्या, त्यांपैकीं एक पलटण वाक फुटून यांजकडे जाबसाल लाविला. त्याची खातरजमा रायाजी पाटील यांनीं केली. त्यानें कोलचे दोन दरवाजे उघडून दिल्हे. त्या मार्गें यांजकडील फौज व पलटणें आंत शिरून, एका पलटणाची लढाई होऊन, यांजकडील जखमी व जाया चारशें माणूस जालें. पलटण पळून गेलें. चाळीस तोफा वगैरे सरंजाम सरकारांत आला. कसबें कोल येथील ठाण्याचा बंदोबस्त करून, रामगडास घेरा घालून रायाजी पाटील आहेत. कांहींका दिवसां रामगडही खाली होईल. आंत जमादार व पलटणवाले आहेत, त्यांत फूट आहे. त्यांजकडीलही बोलणीं लागलीं आहेत. प्रत्ययास येऊन गड खाली जालियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक ११३.

श्री. १३ जुलई इ. स. १७८४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. बाबाराव नामें गृहस्थ, नवाब निजामअल्लीखान यांजकडून राजश्री पाटिलबावांकडे वकालतीस आले आहेत. याचें कारण कीं, हैदरा-

बादेपलीकडे सरहद्देस कांहीं नवाबाचे परगणे आहेत, ते इंग्रेजांहीं पूर्वी इजारा करून घेतले होते. त्याचा पैका प्रथम दिल्हा; आतां देत नाहींत. हिशेब करितां, एक करोड सत्रा लक्ष रुपये इंग्रेजांकडे नवाबाचे निघतात. त्यास इंग्रेजांचा सलुक श्रीमंतांसीं राजश्री पाटिलबावा यांचे विद्यमानें जाला आहे. यांचा इंग्रेजांचा स्नेह आहे, ह्मणून यांजकडे आपला गृहस्थ जाबसालास पाठविला आहे कीं, यांचे हातून कांहीं सामदामानें इंग्रेजांकडून ऐवज पदरीं पडला, तर उगऊन द्यावा. ह्मणून यांजकडेस पाठविलें आहे. त्यास राजश्री पाटिलबावांनीं इंद्रसेनासीं बोलून, आपलीं पत्रें व इंद्रसेनाचीं पत्रें कलकत्त्यास पाठविलीं आहेत. तेथून अद्यापि जाबसाल आला नाहीं. ह्मणून बाबाराय राजश्री पाटिलबावांपासींच आहेत. त्यास, यांसीं व नवाब निजामअल्लीखान यांसीं स्नेहवृद्धि व्हावी ह्मणून, वतरीक मेजमानी ह्मणून हत्ती एक व घोडा एक व मोत्यांची माळ व जेगा शिरपेंच व किनखाप साहा व शालजोड्या ६ व तरदाम बंगाली थान ६ व फुलकारी बदामी थान ६ व तीन हजार रुपये नख्त दिल्हे कीं, ब्ऱ्हाणपुरीहून शेले पागोटीं कच्च्या रंगाचीं ब्ऱ्हाणपुरीं घेऊन जावीं, ह्मणून कारकुनास आज्ञा. व नवाबाकडील मुख्त्यार कारभारी त्यांस घोडा एक व किनखाप ४ व शालजोड्या ४ व तरदाम ४ व फुलकारी ४ व मोत्यांची कंठी व जेगा शिरपेंच येणेंप्रमाणें सरंजाम आपला कारकुनासमागमें देऊन रवाना केला. व यांची बहीण आनंदीबाई महाराज निंबाळकर यांस दिल्ही होती, ते यांचे भेटीस आली होती. तीस या प्रांतीं पन्नास हजार रुपये कर्ज जालें. त्यास, ते यांची आज्ञा घेऊन माघारा जाऊं लागली; ते समयीं पन्नास हजार रुपये सावकारांचे वारून, पंचवीस हजार रुपये मार्गी खर्चास देऊन, येथून बिदा केली. ते ग्वालेरीसमीप जाऊन मृत्यु पावली. तिच्या नाती दोघी मुली समागमें होत्या. व सरंजाम सुखरूप देशीं कल्याणराव कवडे यांजपासीं जाऊन पोंहोचावा, ह्मणून येथून कारकून बिदा केला आहे. तो पावता करील. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११४.

श्री. माहे जुलई इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. आपण राजश्री पाटिलबावांस सांगून पाठविलें कीं, "टिपू सुलतान यांसीं व श्रीमंतांसीं बिघाड जाला आहे, त्यास पुढें काय विचार करावा? इंग्रेजांहीं आह्मांसीं व टिपू सुलतान यांसीं दोहीकडे सलूक केला आहे. त्यास तुह्मीं इंग्रेजांस पुसावें कीं, तुह्मी त्याजकडे होतां किंवा आह्मांकडे होतां? हें यांस

पुसून आह्मांस लिहिणें" ह्मणून आपण राजश्री सदाशिव दिनकर यांचे विद्यमानें पत्र पाठविलें होतें. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं इंद्रसेन साहेबास बोलाऊन आणून हा मजकूर त्यास पुसला. त्यानें उत्तर दिल्हें कीं, टिपू सुलतान यानें तुमचा मुलूख दरोबस्त घेतला तर आह्मांस गरज नाहीं. व तुह्मी त्याचा मुलुख घेऊन त्यास खारीज केलें तर आह्मांस गरज नाहीं. आह्मी तुह्मांकडेसही कुमकेस येणार नाहीं, व त्याजकडेसही जाणार नाहीं. येणेंप्रमाणें परस्परें बोलणें होऊन, इंद्रसेनानें कलकत्त्यास व लखनऊस पारमलसाहेब व पापडसाहेब आहेत, त्यांजकडेस पत्रें पाठविलीं आहेत कीं, याप्रमाणें राजश्री पाटिलबावांचें बोलणें आहे. ह्मणून वर्तमान ऐकिलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.

राजश्री सदाशिव दिनकर यांसीं व राजश्री पाटिलबावा यांसीं कांहीं दिवस कांहीं जाबसालाकरितां तंटा पडला होता. हे दरबारास जात नव्हते. तेव्हां यांनीं कांहीं मतलबाच्या यादी सरकारसंबंधीं किंवा आपल्या खाजगत हें कांहीं समजलें नाहीं. त्यास त्या यादी त्यांनीं करारमदार मखलसी करून दिल्या. आतां सख्य जालें आहे. दरबारास जात असतात. याप्रमाणें श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक. ११५.

श्री. माहे जुलई इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. वाटसाहेब इंग्रेज यानें हैदरनाइकाचे पुत्राकडील मामला तीन करोडीवर फैसल करून मंदराजचे किल्याची लढाई महकूफ करविली. व मुलुख हैदर नाइकाचे पुत्रानें घेतला आहे, तो याजकडे बदस्तुर बहाल असावा, याप्रमाणें फैसला करून, मंदराज किल्याहून कलकत्त्यास आला. मेघफास साहेब यांस भेटून वर्तमान सांगितलें. त्यांनीं उत्तर दिल्हें कीं, जें सर्वांचें मनास कंवसलियाचें आलें, ते गोष्ट आह्मांस मान्य आहे. हैदरनाइकाचे पुत्रासीं सलुख करणेंच योग्य आहे, ह्मणून बोलण्यांत आलें आहे. व महमदअलीखान अरकाटचा सुभा याचें पत्र कलकत्त्यास मेघफास साहेबास आलें कीं, फौजेची व खर्चाची खबर घेतां तर हा मुलुख राहतो. नाहींतर हैदरनाइकाचा पुत्र आह्मांवर गालब आहे. या दिवसांत खबर घेणें योग्य आहे. ह्मणून लिहिलें आहे. याप्रमाणें वर्तमान लखनऊहून आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक ११६.

श्री. १६ नोव्हेंबर इ. स. १७८४.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. छ ३ मीनहूस पातशाहा, अफराशाबखान यांचे लष्करांतून कूच करून, आंबाजी इंगळे यांचे व पाटीलबावांचे लष्कराचे मध्यें जाऊन मुक्काम केला, डेरियास दाखल जाले. त्या समयीं राजश्री पाटीलबावांनीं एकवीस मोहरा नजर केल्या. पाटीलबावांचे लष्करांत पातशाहा दाखल जाले. हिंदुस्थानी लष्कर दरोबस्त एकीकडे आहे. पाटीलबावा, पातशाहा, आंबाजी इंगळे ऐसे एकीकडे आहेत. या नक्षानें मुक्काम करून आहेत. चारशें तोफा व दहा हजार स्वार........एकूण चाळीस हजार स्वार प्यादा विना तरवार पादाक्रांत होऊन, जैसी पाण्यांत माती पडून विरून जाती, त्याप्रमाणें यवनाचे फौजेची अवस्था जाली आहे! कोणी कोणांत मिळत नाहींत. याप्रमाणें जालें. पुढें अंमलांत येईल, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ११७.

पैवस्ती छ० ६ सफर सन खमस समानीन पौषमास. श्री. २३ नोव्हेंबर इ. स. १७८४.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ९ माहे मोहरम जाणोन स्वानंद लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः- आपण छ २६ जिलकादचें आज्ञापत्र पाठविलें, तें छ० ३० जिल्हेजीं पाऊन सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहा आगरियास दाखल जालेच आहेत. तेथून पुढें गेले किंवा तेथेंच आहेत, तें ल्याहावें. व राजश्री महादजी शिंदे यांच्या व पातशाहांच्या भेटी कधीं होणार? शिंद्यास येथून वरचेवर पत्रें लिहिलीं. त्यास त्यांत तुह्मींही होईल तें मशारनिल्हेस वरचेवर सुचवीत जावें" ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें विशेष वृत्त असल्यास पाटिलबावांस लिहितों, व श्रुत करीत असतों. इकडील बारीक मोठें वृत्त, छ० १९ व छ० २१ माहे जिल्हेजीं पै दर पै दोन विनंतिपत्रें पाठविलीं, तीं पावलीं असतील; त्यावरून श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, महमदबेग हमदानी यास आणून कैद केलें आहे. त्याचा असबाब तोफा पंचावन्न व हत्ती बारा वगैरे सरंजाम होता. त्यापैकीं कांहीं राजश्री पाटीलबावांनीं आपले सरकारांत घेतला. कांहीं हिंमत-

बहाद्दर यांजकडील तोफा महमदबेगानें पेशजीं लुटून नेल्या होत्या, त्या त्यास दिधल्या. राहिला सरंजाम अफराशाबखान यांचे सरकारांत दिधला. याचें कारण हेंच कीं, राजे हिंमतबहाद्दर गोसावी व नारायणदास मुखत्यार अफराशाबखान यांचे घरचे आहेत, त्यांजपासून कांहीं पैका घेणें. त्यांनीं राजश्री पाटिलबावांसीं करार मदार केला आहे कीं, आमची सरदारी आह्मांकडे असावी. त्यावरून करार करून त्याचे पुत्रास सरदारी करार केली आहे. त्याचें नांव हुसेन दौलाबहादूर महमद हुसेनखान गालबजंग ह्मणून किताब देऊन वस्त्रें मातमपुरसीचीं व पैका आणावयास अलिगडास माणसें पाठविलीं आहेत. व तो मूल तीन वर्षांचा आहे, त्यासही लष्करांत बोलाविलें आहे. व मोंगलीये वगैरे सरदार यांस हिंमतबहाद्दर व नारायणदास यांनीं जाबसाल लाविला आहे कीं, तुह्मी बहुता दिवसापासून सरंजाम खातां. आतां कांहीं पैक्याचे तुह्मींही कुमक करावी. ह्मणून महमदबेगसुद्धां जितके सरदार मोंगलीये वगैरे होते, त्यांस तगादा आहे. त्यांचे लष्करचे आसपास राजश्री पाटिलबावा यांचीं पलटणें व फौजेची चौकी आहे, ते हिरासा आहेत. हिंदुस्थानचे यवनांची, शिवाय पातशाहां निपुता शांत जाली! कांहीं त्यांत जीव राहिला नाहीं. पातशाहाची मर्जी सर्व प्रकारें राजश्री पाटिलबावांकडे मुतवजे आहे. छ० ४ तारखेस पातशाहांसीं व राजश्री पाटिलबावांसीं खिलबत जालें. पातशाहांनीं आज्ञा केली कीं, 'तुह्मी आमचे घरची मुख्त्यारी कबूल करा.' यांनीं उत्तर दिल्हें कीं, 'ताजीयाचे दिवस आहेत. हे गेलियावर विनंति करीन.' ह्मणून बोलून, आपले डेरियास आले. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हें विनंति."

लेखांक ११८.

श्री. २४ नोव्हेंबर इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—इष्टीन साहेब इंग्रेज पातशाहाजाद्यास घेऊन श्रीकाशीस गेले. हें वर्तमान विलायतेस कंपनीनें ऐकून, इष्टिनास पत्र लिहिलें कीं, तुह्मी हिंदुस्थानचे पातशाहाचा पुत्र पातशाहाजादा समागमें घेऊन येतां. त्यास तुमचा काय इरादा आहे तें लिहून पाठविणें. एक तर, दक्षणी सरदारांचा आमचा सलुख जाला आहे, आणि त्यांचे मर्जीशिवाय त्यांसीं बदसलुकी करून पातशाहाजाद्यास विना त्यांची मर्जी घेऊन आलां, ठीक नाहीं. तर, देखतपत्र पातशाहा-

जायास माघारां राजश्री पाटीलबावापांशीं बिदा करणें. ते पातशाहांस विनंति करून, पातशाहाजाद्याची तकसीर माफ करून, त्यांचे स्वाधीन करितील. तुह्मीं या बखेड्यांत न पडावें. ह्मणून लिहिलें होतें. त्याजवरून इष्टीन इंग्रज यानें पातशाहाजाद्यासमागमें दोन पलटणें देऊन, राजश्री सदाशिवपंत बक्षी, राजश्री पाटीलबावांकडील, यांजसमागमें बिदा केलें. ते लखनऊस आले आहेत. पुढें लष्करांत दाखल जालियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ११९.

श्री. २४ नोव्हेंबर इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब अफराशाबखान मारला गेला, त्याचा आरोप जयनुल अबदीखान यांजकडे आला. त्याजवरून त्यास कैद करून, गाढवावर बसऊन, तोंड काळें करून, लष्कराचे आसपास फिरऊन, भीक मागऊन, कैद करून ग्वालेरीस पाठविलें. दुसरे खुशालीराम, वकील राजे जयनगरकर यांचा, लष्करांत होता. तो पेशजीं राव राजा प्रतापसिंग माचेडीवाला याची दिवाणगिरी मुखत्यारी करून होता. अलिकडे नजबखानासीं मिळून, मागें रावराजास लुटविलें होतें ह्मणून, त्याची व यांची आकस होती. त्यास एका शिपायानें मारून टाकिलें. तो आरोप रावराजा प्रतापसिंग यांचे डिकऱ्यावर आला. त्याजवरून त्याचे लष्करावर दोन हजार फौजेची चौकी राजश्री पाटीलबावांनीं पाठविली आहे. पुढें जें ठरेल तें विनंति करूं. तात्पर्य, पैका मेळवावयाचे दिवस आहेत. श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेब दैववान आहेत, कीं त्यांचे प्रतापें ऐसीं यशें सेवक लोकांस यत्न न करितां येतात. ईश्वर त्यांस सदोदित बेमलामत राखो, आणि दिवसोंदिवस अधिक प्रताप हो. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२०.

श्री. २४ नोव्हेंबर इ. स. १७८४.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. छ० २६ माहे जिल्हेजीं पातशाहा आगऱ्याहून कूच करून, सिलम किस्ती दरगाहास जारत करून, मौजे फत्तेपुरीं समीप लष्कर अफरासिया-



दिल्ली येथील मोंगल घोडेस्वार.

बखान यांचें होतें, तेथें दाखल जाले. राजश्री पाटीलबावा भरतपूरचे नजीक होते. ते तेथून कूच करून पातशाहाचे लष्करासमीप आदकोसावर येऊन मुक्काम केला. छ. २९ रोजीं मिर्जा अकबरशाहा यांस पातशाहांनीं नवाब बेहूरमखानास समागमें देऊन, सामोरा पाठविलें. राजश्री पाटीलबावांनीं आपले लष्कराबाहेर डेरा उभारला होता, तेथें त्यांस नेऊन बसविलें. हत्ती व एक घोडा .... वस्त्रें व किस्ती जवाहीर व एकशें एक मोहोरा नजर व हमराही सरदार राजश्री कृष्णाजी पवार वगैरे यांनीं माफकमरातब नजरा देऊन, त्यांजसमागमें पातशाहापासीं येऊन, पातशाहाची मुलाजमत जाली. पायांवर डोई ठेवून एकशें एक मोहोरा नजर केली. पातशाहाजाद्यास पांच पांच मोहोरा नजर केल्या. यांजसमागमील सरदार कृष्णाजी पवार आदिकरून किरकोळी होते, त्यांनीं माफकमरातब अवघ्यांनीं नजरा केल्या. राजश्री पाटीलबावा यांचे पाठीवर पातशाहांनीं बहुत ममतापुरस्कर हात ठेऊन आज्ञा केली कीं, "तुह्मी उरुबरू बसा." त्याजवरून राजश्री पाटीलबावा बसले. पातशाहांनीं साता पारच्यांचा खिलत, जेगा बमय परगिरी, व शिरपेंच व मोत्यांची कंठी व हत्ती घोडा तरवार ढाल येणेंप्रमाणें सन्मान केला. हमराही कृष्णाजी पवार वगैरे सरदार होते, त्यांस खिलत पांच पांच पारच्यांचे बमय शिरपेंच, जेगे सुद्धां, सुमार खिलत ५० पन्नास व दुशाले सुमार १५० व गोशवारे १५० येणेंप्रमाणें, व तरवारीचे कबजे चार व वस्त्रें देऊन, सन्मान करून, दोन घटका पातशाहासीं खिलबत करून, रुकसत होऊन, आपले डेरियास जाऊन, पातशाहाचे लष्करचा व अफरासियाबखानाचे लष्करचा बंदोबस्त आपलीं पलटणें बसवून केला. शिवाय पाटीलबावांचे परवानगी, इकडून तिकडे कोणी जाऊं पावत नाहीं. अफरासियाबखान याचे लष्करांतून शिवाय परवानगी कोणी पातशाहापासीं जाऊं शकत नाहीं. पातशाहांचे लष्करचे अफरासियाबखान यांचे लष्करांत कोणी जाऊं पावत नाहीं. याप्रमाणें बंदोबस्त करून, पैका कराराप्रमाणें आणवावयाचा तगादा आहे. पुढें पातशाहाचे विचारें राजश्री पाटीलबावा मसलत ठरावितील, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२१.

श्री. इ. स. १७८४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. लखनऊहून वर्तमान आलें कीं, इष्टिन साहेब इंग्रज याकडे कंपनीची बाकी विलायतेचे पातशाहाची आठरा करोड रुपये होती. त्यास चार

वर्षें आपल्यासीं व टिपू सुलतान हैदरनाईकासीं लढाई कायम राहिली, त्यांत तो ऐवज खर्च जाला. हें वर्तमान पातशाहांनीं कंपनीनें ऐकून, इष्टिनावर इतराजी केली कीं, इतका पैका सरकारचा खर्च करून, काम कांहीं न होतां वृथा पैका खर्च केला! ह्मणून इष्टिनानें आपली बिबी विलायतेस पाठवून, पातशाहाकडील मामला दुरुस्त करून, मशारनिल्हेस बहालीचीं वस्त्रें पाठविलीं. त्याजवरून यांनीं कांहीं कलकत्त्यांत व कांहीं चिनाडचे किल्ह्यांत, जिन्नस रुपें सोनें व पशमिना व बंगाली कापड वगैरे व खजाना नख्त ऐशा नावा भरून विलायतीस बिदा केलें. व पातशाहाकडून वस्त्रें बाहालींचीं आलीं होतीं तें घेऊन, अवघे इंग्रेज कंवसलवाले वगैरे होते, त्यांनीं नजरा केल्या. व फरोकाबाद व लखनऊस वगैरे जागा जागा इंग्रेज आहेत, त्यांस पातशाहांचीं चकतीं पत्रें विलायतीहून मेहेरबानगीचीं आलीं, त्यांच्या नकला करून वजीर असफदौला व पातशाहाजादा जुवांबख्त याजकडे पाठविल्या. त्याजवरून सर्वांनीं इष्टिनास नजरा व मुबारकबादीचीं पत्रें पाठविलीं आहेत. व मंदराज बंदराहून पत्रें इष्टिनास आलीं कीं, येथें खर्चाची व गल्ल्याची तंगी बहुत आहे, व टिपू सुलतान यांची लढाई कायम आहे. त्यास जर तुह्मांस यासीं लढाई कायम ठेवणें, तर गल्ला व खर्चास पैका पाठवून द्यावा. नाहीं तर आज्ञा कराल तर यासीं सलुख करूं. याजवरून यांनीं पत्राचें उत्तर दिल्हें कीं, पेशजीं तो तीन करोड रुपये मागत होता, त्याप्रमाणें त्यासीं बनेल त्या रीतीनें सलुख करावा. तिकडील मसलत आटोपली ह्मणजे आह्मांस दिल्लीप्रांतीं जाणें आहे. लखनऊस पातशाहाजादा आमची मार्गप्रतीक्षा करितो. म्हणून उत्तर लिहिलें. त्यास इष्टिनाची खातरजमा आपले खाविंदाकडून जाली. त्याचें मानस हिंदुस्थानांत पातशाहाजाद्यास घेऊन यावें. व राजश्री पाटीलबावांची व इष्टिनाची एकवाक्यता, इंद्रसेन साहेब व मेजर ब्रौन साहेब इंग्रेज यांजपासीं आहेत, त्यांचे विद्यमानें व सदाशिवपंत बक्षी यांचे विद्यमानें आहे. त्यांच्या यांच्या भेटी कालानरूप जालियावर कोणती मसलत करितात तें पाहावें. याप्रमाणें लखनऊहून वर्तमान लिहिलें आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२२.

श्री. इ. स. १७८४ अखेर.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. इष्टिन इंग्रेज याजवर विलायतेस कंपनीची इतराजी जाली आहे. तेथून बाहाली दुसरा इंग्रेज या प्रांतीं पाठवावा, ह्मणून वर्तमान इष्टिनानें

ऐकून, आपली बायकोस विलायतेस कंपनीकडे रवाना केलें आहे कीं, तेथील तोडजोड करून आपली खिजमत कायम ठेवावी, या विचारांत आहेत. व फरासीचा फरसडांग ह्मणून कलकत्त्यासमीप जागा आहे, ते फरासिसांस देऊन त्यांसीं सख्य केलें व इकडे आपल्यासींही सख्य केलें आहे. एक हैदरनाईकाचे पुत्रासीं मात्र कटाक्ष आहे. त्यासींही सलुख करावा, या विचारांत आहेत. ह्मणून वर्तमान लखनऊहून आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. जुवांबख्त पातशाहाजादा लखनऊहून पांच कोस अलिकडे मुक्काम करून आहे. राजश्री सदाशिवपंत बक्षी, पातशाहाजाद्याची आज्ञा घेऊन, गयावर्जन करावयास गेले आहेत. ते आलियावर, तेथून कूच करून पातशाहापासीं व पाटिलबावांसीं येणार, ह्मणोन वृत्त आहे. श्रुत होय. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १२३.

श्री. इ. स. १७८४.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– नवाब निजामअल्लीखान यांजपासीं नवाब असफउद्दौलाकडील वकील हैदराबादेस आहे. त्याचीं पत्रें लखनौस आलीं. त्यांत मजकूर कीं, नवाब निजामअल्लीखान यांनीं टिपूकडील मामला खातरखा करून घेतला, आणि मराठीयांचे मुलुखांतून व आपले मुलुखांतून टिपूस काढून दिल्हें; तो माघारां तुंगभद्रा उतरून आपले मुलुखांत गेला. ह्मणून लिहिलें होतें. हें पत्रें वाचून कासदास इनाम शंभर रुपये नवाब वजिरांनीं देऊन, मुनसीस आज्ञा केली कीं, आपलेकडूनही स्नेहवृद्धीचीं पत्रें लिहून द्यावीं, व आपले वकिलास पत्रांचे जाब लिहून द्यावे. ह्मणोन आज्ञा जाली. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १२४.

श्री. इ. स. १७८४.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. मेरटचे मुक्कामीं अफराशाहबखान यांनीं जाबतेखानास बोलावून आणून, परस्परें शपथप्रमाण जालें कीं, तुह्मीं आह्मीं एकविचारें असावें.

ह्मणून एकवाक्यता करून, परस्परें वस्त्रें, हत्ती, घोडे देऊन घेऊन, मसलत ठैराविली कीं, आह्मी दिल्लीस जातों. तेथें गेलियावर पातशाहास घेऊन जयपुराकडे मुलुखगिरीस जाऊं. तुह्मीं या प्रांतीं अंतर्वेदींत शिखांचा बंदोबस्त करून असावें. दिल्लीप्रांतीं शीख धामधूम न करीत, तें करावें. ह्मणून बोलणें करारांत आणून, जाबतेखानास गोसगडास रुकसत केलें, आणि आपण दिल्लीस आले. मार्गीं येतांना, जेनुल अबदीखान, मिर्जासफीखानाचा भाऊ, यासमागमें स्वार पलटणें होतीं, तें फोडून आपले लगामीं लावून घेतलीं; व त्यांस कांहीं परगणे लावून देणें करार केले होते ते न देतां, दों घोड्यांनिसीं व एका पालखीनसीं हमसिराबेगमेसमागमें बतरीक नजरबंद ठेविले आहेत. दिल्लीस आलियावर आपले घरीं सत्तर खिलत, निमअस्तिना, कारचोबी व गोशवारे व कारचोबी जामे तयार करून, पातशाहाची भेट घेतली. पातशाहास एकवीस मोहरा व शाहाजाद्यास दोन दोन मोहरा मिळून एकशेंवीस मोहरा नजर करून, सिलेमा सीको पातशाहाजाद्यासुद्धां भेटले. अफराशाहबखानास सरबस्ता पागोटें व बमय गोशवारा व मुकेशी तुरा व निमअस्तिन भरजरी व हत्ती घोडा, मोत्यांची कंठी व जेगा शिरपेंच व ढालतरवार येणेंप्रमाणें; व सिलेमा सीको पातशाहाजाद्यास सरबस्ता पागोटें, बमय गोशवारा, मुकेशी तुरा व निम अस्तिन येणेंप्रमाणें; व सत्तर खिलत समागमें करून आणिले होते, ते सर्व जमादार समागमीं व वकील राजे जयपूर व बिकानेर व रावराजांकडील वगैरेस, जो ज्याप्रमाणें होता त्यांस देऊन, डेऱ्यास रुकसत जालें. त्यासमयीं सिलेमा सीको पातशाहाजाद्यांस पातशाहांनीं ठेवून घेतलें कीं, यास आपले मातुश्रीस भेटावयास सोडून जाणें. ह्मणून बोलून पातशाहाजाद्यास ठेवून घेतलें. दुसरे दिवशीं पातशाहाजाद्याच्या बायका व डेरे, हत्ती, घोडे, सरंजाम, जो अफराशाहबखानाचे लष्करांत होता, तो सर्व आणून घेतला. तेव्हां अफराशाहबखान यांनीं विषम मानिलें. तेव्हां त्यांस बोलावून आणून, अबदुल अहदखान यांचे विद्यमानें पातशाहांनीं समाधान केलें कीं, "जिकडे स्वारीस चालणें तिकडे आह्मीच चालतों. नाहींतर एक पातशाहाजादा काय, चौघे पातशाहाजादेच पाहिजेत तर समागमें देतों." ह्मणून समाधान करून, चारखोन अन्नाचे भक्षावयास उच्छिष्ट पाठवून, समाधान करून, डेरियास रुकसत केलें. आणि आज्ञा केली कीं, "आमचे स्वारीची तयारी करणें. आह्मीच स्वारीस चालावयास सिद्ध आहोंत." ह्मणून बोलले. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १२५.

श्री. इ. स. १७८४.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. नागपूरकर भोंसले यांनीं पत्र इष्टिनास कलकत्त्यास पाठविलें कीं, आह्मांस दररोज पत्रें टिपू सुलतान, हैदरनाईकाचा पुत्र, याचीं येतात कीं, श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांसीं व आह्मांसीं सलुख एकदिली आहे. तुह्मीं इंग्रेजांची रफाकत करणें ठीक नाहीं. ह्मणून इष्टिनास आपले स्नेहवृद्धीकरितां पत्र लिहिलें होतें. त्याचें उत्तर इष्टिनानें पाठविलें कीं, तुह्मांस हैदरनाईकाचे पुत्राचें पत्र आलें आहे, तें आह्मांस पहावयास पाठवणें. व इकडून गल्ला व चार पलटणें मंदराज बंदरास रवाना केलीं आहेत, तें आपली हद्दपार करून देणें, ह्मणून लिहिलें. व मंदराज बंदराहून पत्र इष्टिनास आलें कीं, हैदर नाईकाचे पुत्रानें रात्रीं मंदराज किल्ल्यावर छापा घातला. त्याजकरितां दरवाज्यावर गोरे वगैरे लोक होते ते, व त्यांचीं कुटुंबें, लेंकरेबाळें, बहुत माणसें व हशमांचा सरदार मारला गेला. पुढें त्याजकडे फौजेची निगादास्त जारी आहे. ह्मणून घाबरून पत्र मंदराजचे किल्लेदारानें पाठविलें होतें. त्याचें उत्तर इष्टिनानें पाठविलें कीं, गल्ला व चार पलटणें येथून रवाना केलीं आहेत, तें पावतील. परंतु लिहिल्याप्रमाणें त्यासीं सलाह करणें. ह्मणून वर्तमान लखनऊहून आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. व इष्टिनाचे बिबीनें कंपनीची रजावंदीप्रमाणें मामला फैसल करून, कलकत्त्याचे आदालतीची खिजमत आपले नांवें करून घेऊन, त्याजपासून आज्ञा घेऊन, तीही कलकत्त्यास येणार ऐसें वृत्त आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

सेवेसीं विनंति सेवक शंकराजी सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. लिहिलें परिसोन कृपा केली पाहिजे. जाहीरदारीचें वर्तमान लखनऊहून व पातशाहाकडील व राजेश्री पाटिलबावाकडील श्रवणांत आलें, तें विनंति लिहिली आहे. कृपा करणार धणी समर्थ आहेत. हे विज्ञप्ति."

लेखांक १२६.

पैवस्ती चंद्र २८ रविलावल. श्री. ६ जानेवारी इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत चंद्र २४ माहे सफर जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः-

पेशजीं चंद्र २७ मोहरमीं विनंतिपत्रें पै दर पै व पारसी वाकायाच्या फर्दा दररोजच्या पाठविल्या, ते पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, रावराजा प्रतापसिंग व रंजितसिंग जाट व राजे प्रतापसिंग जैपूरकर वगैरे किरकोळ कोठडीवाले रजपूत यांजकडील मामले करून, ऐवज नख्त व किस्तबंद्या करून, कूच करून, पातशाहा व राजश्री पाटिलबावा डिगेस येऊन, आगरियाचे किल्ल्याचा बंदोबस्त करून, श्रीमथुरेवरून दिल्लीस जाणार. दिल्लीस दाखल जालियावर शिखांचा बंदोबस्त होणें, तो होईल. शीख जयसिंग कन्हया वगैरे आणीक मातबर सरदार दोनचार जमूकडे गेले होते. तेथील राजास खारीज करून, दोन प्रहरपर्यंत तमाम साहुकारा वगैरे लाखों रुपयांची लूट बहुत जाली. शेवटीं तेथें आपला अंमल केला. त्यास तेथील हवा न मानली. जयसिंग कन्हया वगैरे सरदार व फौजेचे लोक बहुत मृत्यु पावले. ऐसें वर्तमान आलें. परंतु राजश्री पाटिलबावांसमागमें फौज थोडी, याजकरितां कांहीं दिवस बंदोबस्तास दिवसगत लागणें ते लागो. त्यास श्रीमंत राजश्री पंतप्रधान व आपणास रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. ते स्वीकारून उत्तरीं सनाथ करावें. वाकायाच्या फर्दा पातशाहांकडील व राजश्री पाटिलबावांकडील व वजिराकडील लखनऊचें वर्तमान रोजच्या फरदा पारसी पाठविल्या आहेत. त्याजवरून किरकोळी वृत्त सविस्तर कळूं येईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति."

पैवस्ती चंद्र २१ रविलाखर **लेखांक १२७.**

सन खमस समानीन फाल्गुन मास. **श्री.** २१ जानेवारी इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत चंद्र १९ माहे रविलावल जाणून स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं चंद्र २४ सफरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा व राजश्री पाटिलबावा यांणीं जयपूर व रावराजा माचेडीवाला व रंजितसिंग जाट वगैरे कोठडीवाले रजपूत यांजकडील मामले करून माघारा डिगेस आले. डिगेचे किल्ल्यांत हशम होते, त्यांची तलब पंधरा हजार रुपये चढले होते. ते त्यास देऊन, किल्ला खाली करून, देवजी पाटील नामें किल्लेदार करून, एक पलटण किल्ल्यांत व शहरांत

आपला अंमल केला. पुढें आगरियाचे किल्ल्याचा जाबसाल आहे. सुजादिनखान पठाण, आफराशाहबखान यांचा सासरा, किल्लेदार आगरियाचा आहे. त्यानें जुंझाची तयारी केली आहे. परंतु जाबसाल होऊन मासपक्षांत आगरियाचे किल्ल्यांतही अंमल करून, मग पातशाहासुद्धां दिल्लीस जाणार. आगरे प्रांताचा तमाम मुलुखाचा बंदोबस्त जाला. राजश्री अंबाजी इंगळे यांस दिल्लीचे बंदोबस्तास व पानिपतपावेतों शिखांचे बंदोबस्तास रवाना केलें आहे. ते लष्करांतून निघून दोन मजला मेवातेकडे गेले आहेत. मेवातचा बंदोबस्त आठा पंधरा दिवसांत करून दिल्लीस जाणार. व राजश्री बापूजी मल्हार यांस तमाम अंतरवेदींतील बत्तीस माहाल यांचे बंदोबस्तास पाठविले आहेत. ते हंसीयागंजाजवळ नजीक मथुरा, मुक्काम करून, खुरजा शिकंदरापावतों ठाणीं बसवून, पुढें मेरटेकडे येणार. याप्रमाणें वर्तमान आहे. लखनऊहून वर्तमान आलें कीं, मुसाकश साहेब यांचें पत्र मंदराजचे किल्याहून आलें. इष्टिनास कीं, तुह्मांस टिपू सुलतान यासीं सलुख करणें असेल, तर लिहून पाठवणें. आह्मी यासीं सलुख करूं. यांनीं त्या पत्राचें उत्तर पाठविलें कीं, आह्मांस त्यासीं सलाह करणें जरूर आहे; परंतु शिवाय मंदराजचे किल्याचें बोलणें ठरल्यास सलूख करूं, ह्मणून उत्तर लिहून पाठविलें. व कानपुरीं करनेल लास साहेब आहे, त्यास पत्र आलें कीं, एक कंपू तुह्मीं तेथें चाकर ठेऊन तयार करणें; आह्मी जलद लखनऊस येतों ह्मणून. याप्रमाणेंच फरोकाबादेस व लखनऊस ऐसी तीन ठिकाणीं तीन कंपू चाकर ठेवावयाची परवानगी पाठविली आहे, व इकडे यावयाची गरमीही केली आहे. मग न जाणो, मंदराजचा किल्ला जेर बहुत जाला आहे, तिकडे कुमकेस जाईल किंवा इकडे येईल, हें नकळे. व कंवसलवाले फिरंगी इष्टिनास बोलले जे, राजे चेतसिंग यांची आबदी कासीद कराल, तर आह्मी जामीन होऊं. त्यास आबद करावें. इष्टिनानें उत्तर दिल्हें कीं, तो आपल्या आपुन आल्यास आबदी करूं, ह्मणून बोलला. याप्रमाणें आहे. पुढें अंमलांत येईल, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.

पातशाहाकडील व राजश्री पाटिलबावाकडील रोजच्यारोज बाकायाच्या फरदा व लखनऊकडील ऐशा पारशी पाठविल्या आहेत. त्यांजवरून दररोजचें वर्तमान श्रुत होईल. कृपा केली पाहिजे, हे विनंति.”

लेखांक १२८.

पौ. छ १९ जमादिलावल **श्री.** २७ फेब्रुवारी इ. स. १७८५.
सन खमस समानीन–अधिक चैत्र मास.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ. १७ माहे रविलाखर जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० १९ रविलावलीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहा व राजश्री पाटीलबावा दिगेस आहेत. नवाब नजबखान व नवाब अफराशाहाबखान यांचा तोफखाना बजितखान पठाण याजकडे होता. त्याचा भाऊ सुजादिलखान अकबराबादेचे किल्ल्यांत किल्लेदार आहे. त्यास तगीर करून रायाजी पाटील यांस आग्र्याच्या किल्लेदारीची सनद देऊन पाठविलें. त्यास सुजादिलखानानें किल्ला द्यावयास अनमान केला. लढाईची तयारी करून आहे. हें वर्तमान राजश्री पाटीलबावांनीं ऐकून बजितखान, मशारनिल्हेचा भाऊ, यास कैद करून, दरोबस्त तोफखान्यांत आपला अंमल केला; आणि तोफखान्याचे बैलांस घासदाणा लालजी सराफ याजकडून देविला. व आग्र्यास राजश्री खंडेराव हरी यांजला सामानसुद्धां पाठवावें आणि किल्ला खाली करून घ्यावा, या विचारांत आहेत. पेशजीं आग्र्यास राजश्री रायाजी पाटील यांस पाठविलें आहे. त्यानें तमाम शहरांत व गंजांत व मंडींत वगैरे दरोबस्त आपला बंदोबस्त करून, आग्र्याचे किल्ल्याचे आसपास मोर्चे लाविले आहेत. सुजादिलखानासमागमें चांद पलटण तैनातीस अफराशाहाबखान यांनीं करून दिल्हें होतें, तें फुटून रायाजी पाटील यांजकडे येऊन मिळालें. त्याजवरून सुजादिलखान ढिला होऊन, पातशाहांस व राजश्री पाटीलबावांस अर्जी पाठविली आहे कीं, "मी गुलाम खानाजाद आहें. मजला कौलनामा पाठवून द्यावा. म्हणजे मी किल्ला खाली करून देऊन, मी हुजुरांत येईन." याप्रमाणें त्याचीं पत्रें आल्यावर अनुपगीर गोसावी यानें अफराशाहाबखान याचे पुत्रास राजश्री पाटीलबावांचे डेऱ्यास घेऊन जाऊन, त्यास हत्ती, घोडा, मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच, वस्त्रें देऊन, सा लक्षांचा सरंजाम मशारनिल्हेस, व दो लक्षांचा सरंजाम सुजादिलीखान व बजीदखान यांस; एकूण आठ लक्षांचा सरंजाम, व कोलचा किल्ला व अलीगड व मुंडसान ऐसीं तीन स्थळें त्यांचीं त्यांजकडे व तिन्ही किल्ले त्यांचे ताबीन ठेवावे, ऐसा करारमदार जाला आहे. त्यास दो चौ रोजांत आग्र्याचा किल्लाही खाली होऊन, आपला अंमल

दाखल होईल. तिकडील प्रांताचा तो दरोबस्त बंदोबस्त दीगचे किल्ल्यासुद्धां राजश्री पाटीलबावांचा जालाच आहे. आग्र्याचे किल्ल्यांत ठाणें दाखल जालें ह्मणजे राजश्री पाटीलबावा पातशाहासुद्धां दिल्लीस जाणार. व राजश्री आंबाजी इंगळे यांस दिल्लीचे बंदोबस्तास पेस्तर रवाना केलें होतें, त्यास ते छ. १ रोजीं शनवारीं दिल्लीस दाखल होऊन, दरोबस्त शहरचा व दरवाजीयाचा बंदोबस्त नवाब नजबकुलीखान यांचा होता तो उठवून, मशारनिल्हेनीं आपला बंदोबस्त केला. व दिल्लीचे आसपास गुजर धामधूम करून होते, त्यांपैकीं दोन अडीचशें गुजर पाळत लावून, एका गुजराचे घरीं लग्न सुरजपुरासमीप होतें तेथें फौज पाठवून, दोन अडीचशें गुजर मारून टाकिले, व कांहीं धरले. जिवंत आले त्यांस कोतवालाचे स्वाधीन करून, त्यांसहि मारून टाकिलें. दुसरे दिवशीं कूच करून कालिकेचे आसपास वीस कोस लांब पहाड आहे, तेथें रावराजा व नजबकुलीखान व दरोबस्त मोंगलिये सरदार ऐसे मशारनिल्हेचे तैनातीस आहेत त्यांजसुद्धां व आपली फौज मऱ्हाठी हजार बाराशें आहे त्यासुद्धां जाऊन, तमाम पहाडास घेरा घालून, गुजरास कोंडिलें आहे. त्यास यांचे चित्तांत आहे कीं मारून कत्तल करावी. जर रात्रीस पळून गेले तर गेले, नाहींतर मारून कत्तल करतील. याप्रमाणें दिल्लीचा बंदोबस्त करून, शिखांचे पारपत्यास पुढें एक मजल सोनपताचे रोखें हरणमुजाऱ्यापासीं मुक्काम करून असावें, या विचारांत आंबाजी इंगळे आहेत. व बापूजी मल्हार त्यांचा दिवाण सेणवाई आहे, त्यास बत्तीसा महालांची सनद अंतरवेदीतील चकले, शिकंदरा, वगैरे अठ्ठावीस महाल, व कोल वगैरे चार महाल, ऐसे बत्तीस महालांची मामलत सांगून, दोन हजार स्वार, व दोन तीन पलटणें प्यादे ऐसें समागमें देऊन पाठविले आहेत. त्यांनीं कोलखुर्जापासून तों मेरटेपावेतों तमाम बंदोबस्त करून आपलीं ठाणीं बसविलीं. पुढेंही ठाणेबंदी करीत गोसगडाकडे जावें या विचारांत आहेत. व मेरटप्रांतांत शीख होते ते तमाम जमा होऊन, गोसगडापासीं जमाव करून आहेत. व पलीकडे कुरुक्षेत्राकडून व हरिद्वाराकडून पंधरा वीस हजार शीख जमाव धरून, हरिद्वारासमीप शुक्रतालाचे खादरांत मुक्काम करून आहेत. त्यांचें मानस कीं, मेरटेहून अलीकडे दक्षण्यांची फौज आली ह्मणजे त्यांशीं झुंजावें, या विचारांत आहेत. त्याजवरून राजश्री आंबाजी इंगळे यांनीं राजश्री बापूजी मल्हार यांस पत्रें पाठविलीं आहेत कीं, तुह्मीं जलदी करून पुढें न जाणें. तिकडून कूच करून लोणीजलालाबादेसमीप यमुनातीरीं यावें. तुह्मी आह्मी एक होऊन, मग पुढें शिखांचे पारपत्याची तजवीज करणें ते करूं. याप्रमाणें पत्रें गेलीं

आहेत. त्यास तेही कूच करून दिल्लीसमीप येणार. ते व हे एकत्र जालीयावर जे मसलत करणें ते करावी, ऐसा विचार ठरला आहे. तात्पर्य, श्रीमंत साहेबांचे प्रतापें दिल्लीपावेतों सरकारचा बंदोबस्त जाला; व पुढेंही साहेबांचे प्रतापें शिखांचें पारपत्य होऊन, लाहोरपावेतों बंदोबस्त बहुत यत्न न करितां होईलसा दिसतो. याचें कारण हेंच कीं, तमाम जमीदार शिखाशीं फुटून पेस्तर पुढें येऊन, आपलीं ठाणीं घेऊन जातात, आणि शीखही एकविचारें नाहींत. ते एकमेकांत विरुद्ध करून आहेत. याजकरितां ऐसें दिसतें कीं, लाहोरपावेतों अंमल दसऱ्यापावेतों होईलसा प्रकार आहे. परंतु दक्षणी फौज थोडी आहे, याजकरितां मात्र चित्तांत संशय वाटतो. आजपावेतों प्रकार जाला, तो एक श्रीमंतसाहेबांचे पुण्य साहाय्य आहे, तर अटकेपावेतों बंदोबस्त होईलसा समय घडून आला आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १२९.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८५.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजे, इष्टीन साहेब यांस विलायतेहून चकती त्याचे बिबीनें बहालीची पाठविली होती, ते कृत्रिम करून पाठविली होती. विलायतेचे पातशाहाची इतराजी इष्टीनावर आहे, ते तैसीच आहे. इष्टीनाकडे बाकी निघाली आहे, त्यापैकीं तूर्त दोन करोड रुपये पातशाहा मागतात. त्यास इष्टीनानें उत्तर केलें कीं, मंदराजचे किल्ल्यावर टिपू सुलतान यांचे लढाईत वगैरे तमाम खर्च जाला; आतां आह्मांपासीं पैका द्यावयास कोठें आहे? व तमाम लोकांत शोहरत जाली कीं, यास पातशाहांनीं बोलाविलें आहे, व यांची तगीरी जाली आहे. याजकरितां आतां आह्मांस येथें राहणें ठीक नाहीं. ह्मणून विलायतेस जायाची तयारी केली आहे. याजपासीं कंवसलवाले इंग्रेज हुजुरचे आहेत. त्यांनीं सल्ला दिधली कीं, तुह्मीं हे जागा खाली टाकून जाणें ठीक नाहीं. याजकरितां आपला अहवाल लिहून विलायतेस पाठवावा. त्याचें दुसरें उत्तर चकती बोलावण्याची आली ह्मणजे जावें. तोंपावेतों जावयाचा मनसबा तहकूफ असूं द्यावा. याप्रमाणें मसलत ठेरली आहे. परंतु विलायतेस जावयाकरितां त्यांनीं एक हजार जहाज बजेर तयार केले आहेत. व कलकत्त्यास मिस्तर परलंग साहेब यांस कोठीयांचा वगैरे मुख्त्यार करून ठविलें आहे. व जरनेल इष्टवरीष्ठ यास दरोबस्त कंपूचा मालक, हिंदुस्थानचे फौजेचा बहाली बरतर्फीचा मुख्त्यार

केला आहे. याप्रमाणें बंदोबस्त करून आपण छ० २० रविलावलीं कलकत्त्याहून कूच करून नवशें इंग्रेज समागमें घेऊन इष्टीन साहेब विलायतेस गेले. जाते समयीं सर्वांचें समाधान केलें कीं, आठ महिने जाणें येणें यास लागतील; आणि एक महिना पातशाहापासीं राहून दहावे महिन्यांत सत्वरच माघारा येतों. ह्मणून सर्वांचें समाधान करून, एक हजार जहाज व शिवाय नावा व नावाडे ऐसे भरून, सरंजाम या प्रांताचा तोफातायफ जिन्नस व नख्त घेऊन गेले. ह्मणून वर्तमान लखनहून आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० १५ जमादिलाखर
सन खमस समानीन चैत्रमास.

लेखांक १३०.

श्री.

३१ मार्च इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १९ माहे जमादिलावल जाणून स्वानंद लेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेषः– इकडील वर्तमान छ० १७ रविलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तर आज एक मास जाला, राजश्री पाटिलबावा व रायाजी पाटील यांस आगरियाचा किल्ला घ्यावा ह्मणून डिगेचे मुक्कामींहून रवाना केलें होतें. त्यास हे आगरियास जाऊन शहरांत अंमल करून किल्यास मोर्चे लाविले होते. त्यास छ० ११ मीनहूपावेतों किल्ला झुंजला. निदान भवानीसिंग वगैरे पलटणवाले व गोलंदाज किल्ल्यांत होते, ते फुटून छ० १२ मीनहूस येऊन, रायाजी पाटील यांस भेटून, मागील तलब द्यावी आणि पुढें आमचे जायदादेचा बंदोबस्त करून द्यावा ह्मणून बोलून, परस्परें वचनप्रमाण होऊन, छ० १५ मीनहूस आगरियाचे किल्ल्यांत राजश्री पाटिलबावाकडून धनपतराव नामें गृहस्थ दाखल जाला. सुजादिलखान यांजकडील अमलाफैला सर्व किल्ल्यांतून बाहीर निघून जुमामहजदपाशीं येऊन, डेरा केला आहे. किल्ल्यांत राजश्री पाटिलबावांकडील बंदोबस्त जाला. व सुजादिलखानाचेही भेटीचा ठराव राणेखानभाई व रायाजी पाटील यांचे विद्यमानें ठैरलें आहे कीं, मशारनिल्हेसही जायदाद लाऊन देऊन, त्यांचेंही चालवावें ह्मणून ठैरलें आहे. त्यास पुढें एक विचार आहे कीं, श्रीयमुना उतरून, प्रांत कोल समीप रामगड—अलिकडे नजबखानानें 'अलीगड' ह्मणून नांव ठेविलें आहे—तेथें जाऊन तोही किल्ला खाली करून, आपला अंमल करून पात-

शाहासुद्धां दिल्लीस जावें, हा एक विचार आहे. परंतु पातशाहा दिल्लीस जावयाची जलदी बहुत करितात. याजकरितां दुसरा विचार आहे कीं, अलीगडाकडेस एक सरदार मातबर व फौज पलटणें समागमें देऊन, त्यास तिकडे रवाना करावें. व पातशाहासहित आपण दिल्लीस जावें. ऐसे दोन विचार ठैरले आहेत. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. वरकड बारिक मोठें वर्तमान रोजच्या वाकायांच्या फर्दा पातशाहाच्या दरबारच्या व राजश्री पाटिलबावांच्या व वजिराचे दरबारच्या व कलकत्त्याकडील वर्तमान सविस्तर पारसी फर्दावरून कळेल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३१.

पैवस्ती छ० २८ रज्जब सन खमस समानीन वैशाख मास.

श्री.

४ मे इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २४ माहे जमादिलाखर मुक्काम श्रीमथुरा जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं छ० १७ जमादिलावलीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस सांगून पाठविलें कीं, आमचें दिल्लीस कूच आहे. त्याजवरून यांनीं आपले कारभारी राणेखानभाई व आबा चिटणीस व माधवराव गंगाधर व आंबाजी इंगळे यांस पाठवून विनंति केली कीं, आणीक पंधरा दिवस मुक्काम करून असावें. या अवसरांत रामगडाचा बंदोबस्त होईल. मग येथून कूच करावा. ह्मणून बोलून दुसरे दिवशीं आपण पातशाहापासीं जाऊन, त्यांचें यांचें बोलणें होऊन, एक लक्ष रुपये खर्चास एकमाहा देऊन, येथें आणीक पंधरा दिवस मुक्काम ठैराविला आहे. व या दिवसांत मेजर ब्राऊन यांचे येथें दोन वेळां खासे गेले होते; आणि त्यांजकडील मोलवी ह्मणून वकील आहे, त्यासींही बहुत खलबत असतें. काय मजकूर आहे, हें समजल्यांत येत नाहीं. समजल्यांत आलियावर विनंति लिहूं. रामगड व अलीगड यांचें बोलणें राजश्री आंबाजी इंगळे व सुजादिलखान पठाण यांचें विद्यमानें लागलें आहे. त्यास मासपक्षांत तेथेंही सरकारचा अंमल जाला, ह्मणजे पातशाहासमागमें आंबाजी इंगळे यांस देऊन, पातशाहांची रवानगी दिल्लीस करावी आणि आपण खासा स्वारी जयपुराकडे स्वारीस जाणार, ऐसा विचार आहे. व श्रीमंत साहेबांस पातशाहाकडून खिलत वस्त्रें व नालकी व माहीमरातब व तोबतुमन व हत्ती घोडा व

ढालतरवार, मोत्याची कंठी व शिरपेंच जेगा बमय कलगी वगैरे तरकश कमाना व तरवार आणिक किरकोळी सरंजाम वगैरे जिन्नस आपलेकडून येथून गंगाजी हुजरे व आनंदराव नरसी यांचा पुत्र लक्ष्मणपंत यांजसमागमें रवाना केला आहे; तो सेवेसीं पावेल. आह्मीं यांसी विनंति केली कीं, "पातशाहाकडून वस्त्रें घेऊन जावीं, हा ओहोदा आमचा आहे." त्यास भाईनीं उत्तर दिल्हें जे, "राजश्री देवराव महादेव वस्त्रें घेऊन गेले, ते परभारां झांसीहून गेले. ते यांस पुसून देखील गेले नाहींत! तेव्हां हा प्रकार कैसा घडतो?" ऐसें बोलणें जालें. त्यास आह्मी सांप्रत येथें लष्करांत आहों. परंतु राजश्री पाटिलबावांचें लक्ष आह्मांकडे नाहीं. तीर्थ रक्षून मात्र आहों. इकडील बंदोबस्ताचा प्रकार ह्मणावा, तर दक्षिणी फौज केवळ थोडी. नजबखानासमागमील फौज व तोफखाना आहे, त्याचा सरंजाम प्रो आहेत, ते त्यांजकडे बदस्तुर आहेत. नजबखानाचा व अफराशाबखानाचा व पातशाहाचा खालसा मुलूख जो होता, तो यांनीं आपला अंमल बंदोबस्त केला आहे. व खंडेराव हरी भेलशाचे कमाविसदार यांजसमागमें फौज देऊन बुंदेलखंडांत बुंदेल्याचे बंदोबस्तास रवाना केले आहेत. तिकडे रजवाडे आहेत त्यांजपासोन पैका घ्यावा, या लक्षांत आहेत. या दिवसांत गोसावी अनुपगीर व राजे नारायणदास त्यांसी व यांसी चित्तशुद्धता नाहीं. अनुपगीर व नारायणदास एकविचारें आहेत. पाहावें, मासपक्षांत प्रकार कैसा घडतो! सांप्रत परमेश्वरानें मुलूख बहुत दिल्हा आहे, परंतु मुलकाचा बंदोबस्त नाहीं. कारभाराचा आटोप नाहीं. याप्रकारचें येथील वृत्त आहे. येथील बारीक मोठें वर्तमान सविस्तर राजश्री सदाशिव दिनकर विनंति लिहितच असतील. त्याजवरून श्रुत होत असेल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १३२.

श्री. ४ मे इ. स. १७८५

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. ज्या समयीं अफराशाबखान मारला गेला, त्या समयीं राजश्री पाटिलबावा यांजकडे पातशाहांनीं आपले घरची मुख्त्यारी द्यावी, ऐसा विचार ठैरला. त्या समयीं पातशाहांनीं वकीलमुतलकीच्या दोन फर्दा दसखत केल्या. एक श्रीमंतांचे नांवें व एक राजश्री पाटिलबावांचे नांवें. व दोन फर्दा मीरबक्षी-गिरीच्या, एक श्रीमतांचे नांवें व एक राजश्री पाटिलबावांचे नांवें; एकूण चार फर्दा दोघांचे नांवें दसखत करून, यांजकडे पाठविल्या. आणि सांगून पाठविलें

कीं, "दोन खिजमता तुह्मांकडे सांगितल्या आहेत. त्यास पाहिजेल तर श्रीमंतांचे नांवें कारभार शिक्का खोदून करा; आणि पाहिजेल तर तुह्मी आपलें नांवें शिक्का खोदून कारभार करा. जे उत्तम सल्ला असेल तें करावें." ह्मणून राजश्री आनंदराव नरसी यांजसमागमें सांगून पाठविलें. त्यास यांनीं आज आठ नव महिने जाले, आपलेच नांवें वकीलमुतलकीचा शिक्का खोदून कारभार चालविला, आणि खिलत वस्त्रें सरकारांत रवाना केलीं. त्यास कांहीं हिसकासा बसून उज्जनीस ठैरली, आणि सरकारची मर्जी कांहींसी खटीसी आढळली. याजवरून हल्लीं वकीलमुतलखीचा शिक्का दुसरा खोदून चालविला आहे. त्याची नक्कल पेशजीं सेवेसीं पाठविली आहे. त्यावरून व राजश्री सदाशिव दिनकर यांनीं कोरे कागदावर वठऊन, दोन शिक्के करून, यांस पुसून आपलेकडे पाठविले आहेत. त्या अक्षरांचा भाव मुनसीनें सर्व समजाविलाच असेल. त्यास पातशाहांनीं दुहीरी फर्दा दसकत करून दिधल्या आहेत. हें वर्तमान पहिलें कांहीं समजलें नव्हतें. त्यास सरकारची लक्षता पाहून यांनीं दुसरा शिक्का खोदला. तेव्हां हें वर्तमान समजल्यांत आलें कीं, पातशाहांनीं दुहीरी फर्दा दसखत करून पाठविल्या होत्या. हें वृत्त हल्लीं श्रवणांत आलें, त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १३३.

श्री. मे इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. रंजितसिंग जाट व रावराजा प्रतापसिंग माचेडीवाला यांजकडील मामलत जाली. मौजे सैदपूर येथून कूच करून, नजीक वैर तेथें जाऊन, मुक्काम करून पातशाहासुद्धां आहेत. तेथें राजे प्रतापसिंग जैपुरकर यांजकडील मामलत करून दिल्लीस जाणार. पातशाहांनीं राजश्री पाटिलबावा यांचे विचारें श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांस मुखत्यारन-मुलुख किताब घेऊन, वस्त्रें हत्ती घोडा जेगा बमयपरगिरी व शिरपेंच बमयलटक व मोत्यांची कंठी माहीमरातब नगारा ढाल तरवार येणेंप्रमाणें खिलत घेऊन, एकशें एक मोहर श्रीमंतांकडून नजर पातशाहास केली. व पांच मोहरा तरवारीच्या नजर केल्या. व रावराजा याजकडील मामलत फडशा जाली, ह्मणून त्यास हत्ती, घोडा, वस्त्रें, जेगा, शिरपेंच, तरवार देऊन, त्यास आपले घरास रुकसत करविलें. श्रीमंतांचा खिलत पुण्याकडे रवाना करून, चंद्र २१ मिनहूस श्रीमंत राजश्री

पंतप्रधान स्वामी यांचे नायबतीचीं वस्त्रें मुखत्यारीचीं आपण घेतलीं. चारकुबा व नालकी पातशाहांनीं दिधली. चारकुबा ह्मणजे एक आंगरखा असतो, त्यास बाह्या नाहींत. बाहूपावेतों आणि आगापिछा मात्र असतो. आणि आघाडीस व बाहूवर मोत्याची झालर लागली असते. यास 'चारकुबा खिलत' ह्मणतात. आण नालकीही जाली. हा खिलत व मुखत्यारन-मुलुख ह्मणिजे मुतलख-वकील याचा मरातब जाला. पातशाहाजाद्यांनीं देखील आपले कामासाठीं यांचे घरास जावें, चिंता नाहीं. याप्रमाणें आहे. खिलत घेऊन पातशाहांस पांचशें मोहरा नजर केल्या, आणि रुकसत होऊन आपले डेरियास आले. त्यासमयीं मार्गांत हिंमतबहादर गोसावी व नारायणदास वगैरे कुल फौज मोंगलिये, परा धरून डावे बाजूस, व दरोबस्त राजश्री पाटिलबावांची फौज परा धरून उजवे बाजूस, सर्वांनीं मुजरा केला. आपले डेरियास दाखल जालियावर माफक मरातब सर्वांनीं नजरा दिधल्या, आणि मुखत्यारीचे दसकत करूं लागले आहेत. आणि किताबाप्रमाणें मोहर खोदविली आहे. रावराजा यानें राजश्री पाटिलबावां-पासून रुकसत होऊन, जातेसमयीं विनंति केली कीं, "जयपुरकर मामलत करीत असतील तर उत्तम; नाहीं तर मजला आज्ञा करावी. राजे पृथ्वीसिंग यांचा पुत्र कृष्णगडीं आपले अजूळीं आहे, त्यास आणून राज्यीं बसऊन द्यावें. मी पैक्याची निशा करून देतों." याप्रमाणें बोलणें बोलून रुकसत जाला. त्याजवरून जयपूरकराकडे मामल्याची ताकीद आहे. त्याजकडीलही वकील नित्यानीं बोलणीं बोलतात. मामल्याचे आंखाचा बंद बसत नाहीं. ह्मणून पातशा-हासुद्धां जयपुराकडे कूच केलें आहे. त्यास जयपूरकरांत कांहीं जीव नाहीं कीं कटकट करावी. राजश्री पाटिलबावांचे मर्जीनरूप मामलत करितील. तेथील मामलत जाली ह्मणिजे पातशाहांची मर्जी आहे कीं सत्वर दिल्लीस जावें. नित्याची नित्य वाकायाच्या फर्दा पारसी एकत्र करून चंद्र २२ पावेतों पाठ-विल्या आहेत. त्यास मुनशीजीस एकीकडे चार घटका बसून वाचून दाखवितील. त्याजवरून कच्चा हवाल अवघा ध्यानास येईल. व राजश्री पाटिलबावापासीं फौज थोडी आणि सारे हिंदुस्थानचें काम भारी. मुख्त्यारीचा कारभार ह्मणिजे पातशाहाचे प्रतिनिधी. वजिरास व मीरबक्षीस वगैरे ज्यास ज्या समयीं च्याहतील त्यास दूर करतील, अथवा ज्यास च्याहतील त्यास बहाल करतील, ऐसा प्रकार आहे. त्यास या प्रकारासीं आणि दांजपासीं फौज आहे या सामानासीं ठीक नाहीं. ह्मणून विनंति लिहिली आहे. आपण धणी आहेत. उत्तम जाणतील तें करतील. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १३४.

श्री. ४ मे इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, दिल्लीकडील वर्तमान तर अंगेलसिंग व गुरदत्तसिंग व रायसिंग वगैरे शीख सर्व एक होऊन, राजश्री आंबाजी इंगळे यांसीं भेटले. परस्परें करारमदार जाला कीं, दरोबस्त राखी पातशाही खालशा मुलखांतून उठवावी, आणि तुह्मीं व आमची फौज एकत्र होऊन, नवा पैका उत्पन्न करावा. त्यापैकीं एक रुपया तुह्मीं घ्यावा व दोन रुपये सरकारांत द्यावे. येणेंप्रमाणें तिसरा हिस्सा शिखांचा करारमदार होऊन, कौल करार जाले. त्यांनीं राखी दरोबस्त पातशाही मुलकांतून उठविली. त्यांजसमागमें आपली फौज व पलटणें व राजश्री शामराव आप्पाजी यांज समागमें देऊन, पानिपताकडे रवानगी केली. इतकियांत वर्तमान राघोगडाकडून आलें कीं, गुगुळ छिबडे हीं दोन्हीं ठाणीं खेचीनें घेतलीं. त्याजवरून राजश्री आंबाजी इंगळे यांनीं दिल्लीस आपला भाऊ विठोजी इंगळे यांस ठेऊन, आपण दोन रोजांत लष्करांत मथुरेचे मुक्कामीं येऊन दाखल जाले. राजश्री पाटिलबावांस विनंति करून, कांहीं फौज व पलटणें व तोफखाना येथून छिबडेयाचे बंदोबस्तास रवाना केले आहेत. व देशीहून देवजी गौळी फौज घेऊन आले आहेत. त्यास त्यांचीं ताकीदपत्रें गेलीं आहेत कीं, खेचीचें पारिपत्य करून मग पुढें येणें. याप्रमाणें तिकडील बंदोबस्त करून, तूर्त आंबाजी इंगळे लष्करांत पाटिलबावा यांजपासीं कारभार करून आहेत. पानिपताकडे सरकारची फौज व शिखांची रवानगी केली होती, ते पानिपतापावेतों जाऊन बंदोबस्त केला. करणाळेस आला जाटाचा पुतण्या गजपतसिंग आहे, त्याजकडील भले माणूस येऊन भेटले. करणाळच्या मामलयाचा जाबसाल रूपकार आहे. तो मामला ठैरला ह्मणजे पुढें पटालीयास आला जाटाचा नातू आहे, त्याचा मामला करावा, या विचारांत शामराव आप्पाजी व शीख आहेत. राजश्री लालाजी बल्लाळ कोटेकर यांजकडे आग्र्याचा सुभा सांगितला. एका दो रोजांत तेही लष्करांतून कूच करून जाणार. साम्रत आग्र्यांत रामाजी पाटील आहेत. हे आगरियांत दाखल जाले ह्मणजे पाटिलमजकूर तेथून कूच करून लष्करांत येतील. याप्रमाणें आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विनंति."

पैवस्ती छ० २ रमजान सन सीत समानीन आषाढ मास.

लेखांक १३५.

श्री. १४ जून इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ६ माहे साबान मुक्काम श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं छ० २४ जमादिलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं, तीं पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, राजश्री आंबाजी इंगळे यांणीं दिल्लीहून भंगेलसिंग शिखाकडून दुल्लभसिंग नामें सरदार समागमें घेऊन लष्करांत आले होते. त्यासीं करारमदार राजश्री पाटिलबावांचे मोहरे-निसीं जाहला कीं, पाणिपताअलीकडे दरोबस्त पातशाही खालसा वगैरे मुलुख आहे, त्यांतून रखी न द्यावी, व धूमधाम लूटलाट करूं नये. पांचा हजारा स्वारांनसीं चाकरी करावी. आणि परगणे गोहाणा व परगणे खरखोदा व परगणे तोक्रम व परगणे महीम एकूण चार परगणे पाणिपताचे आसपास अडचा लक्षा जमेचे त्यास देऊन, सनदा करून दिल्ह्या. व पुढें करार केला कीं, सरहद प्रांतीं सरकारचा अंमल जाहला ह्मणजे तिकडे दहा लक्षांचे परगणे लाऊन देऊं. येणेंप्रमाणें करार मदार करून, हत्ती, घोडे, वस्त्रें, मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच, समागमील मानकरी होते त्यांस वस्त्रें; व दोन महिने लष्करांत राहिले तेव्हां खर्चास पांच हजार रुपये नख्त, येणेंप्रमाणें देऊन, त्यास रुकसत केलें. परंतु शीख बेमान आहेत. दोन महिने लष्करांत राहून, लष्करचा रंग पाहून, याची रजावंदी रक्षून कूच करून गेले. पुढें त्यांची वर्तणूक अमलांत येईल ते खरी. व मोहरसिंग शीख सरदार डलेवाल्याकडील अद्याप येथेंच आहे. त्याचा जाबसाल निर्गमांत आला नाहीं. त्याजकडील जाबसाल निर्गमांत आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३६.

श्री. जून इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः- पानिपताकडे सरकारची फौज शामराव बक्षी व पलटणें व भंगेलसिंग शीख वगैरे पानिपतापलीकडे सा कोसांवर मुक्काम करून आहेत. गज-पतासिंग व आलाजाटाचा नातू वगैरे किरकोळी जमीदार यांजकडील वकील येऊन मामल्याचा जाबसाल करितात. परंतु अद्यापि ठराऊन चार रुपये वसूल दिल्हा नाहीं.

रंग पाहून मात्र आहेत. पावसाळा प्राप्त जाला. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. किरकोळी गांव आहेत तेथील मामले चुकवून फौजेचा कालक्षेप करितात. याप्रमाणें वर्तमान आहे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३७.

श्री. १४ जून इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. भंगेलसिंग व रायसिंग डलेवाले या दोही थोकांस साडेपांचा लक्षांचे परगणे दिल्लीपलीकडे पाणिपताचे आसपास देऊन, त्यांचें समाधान केलें आहे. तेही तूर्त यांचे लक्षांतच आहेत. परंतु किरकोळी शीख बाराभाई आहेत, ते मेरट प्रांतीं वगैरे धामधूम करून आहेत. त्यांचे बंदोबस्तास राजश्री धारराव शिंदे पाठविले आहेत. त्यास शिखांचा बंदोबस्त होऊन अंमलांत येईल तें खरें. याचें कारण हेंच कीं, धारराव यासमागमें फौज रांगडी आहे; दक्षणी स्वार कमी आहेत. याजकरितां शिखांचें पारिपत्य होऊन जख बसेल, तो सुदिन. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३८.

श्री. ३० जुलई इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ० २३ माहे रमजान मुक्काम श्री मथुरा जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० २३ माहे साबानीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहा छ०१८ रोज मंगळवारीं येथून कूच करून छावणीस दिल्लीस गेले. त्याजसमागमें राजश्री पाटीलबावा यांनीं आपणाकडून लाडोजी सितोळे जांवई व मुराररराव दौलत, व आनंदराव नरसी व केसोपंत, व नथमल मुनसी राजश्री बालारायापासीं होता तो, एकूण तीन कारभारी, व दोन हजार स्वार, व चार पलटणें प्यादे येणेंप्रमाणें सरंजाम, व एक लाख तीस हजार रुपये दरमहा करार केला आहे. लाख रुपये खाशांचे व तीस हजार शागिर्दपेशा, एकूण एक लाख तीस हजार एकमाही खर्चास समागमें देऊन, पुढें दरमहाचा दरमहा द्यावा, ऐसी राजश्री

बापूजी नाईक भावे यांची निशा देऊन, पातशाहास दिल्लीस बिदा केलें. जाते समयीं परस्परें बोलण्यांत आलें कीं, "रामगडचे मोहिमेस रायाजी पाटिलांस पाठविलें आहे. त्यास किल्ला मासपक्षांत फत्ते जाला ह्मणजे मीच दिल्लीस आपणापासीं येतों. नाहींतर आपल्यास विनंतिपत्र पाठवूं; आपण यावें. मग बादबरसात जे मसलत करणें ते करावी." याप्रमाणें बोलणें पातशाहासीं होऊन, बिदा होते समयीं, नालकी नवी दिल्लीहून तयार करून आणली होती,—तीस लागत रुपये पसतीसशें लागले होते.— नालकी व सरबस्ता पागोटें बमय गोषवारा व यांचे मुत्सद्दी आदीकरून मानकरी त्यांस खिलत द्यावयास तयार नव्हते, ह्मणून पंचवीस हजार रुपये नख्त देविले, कीं सर्वांस खिलत रुसकतीचे तयार करून देणें. ह्मणून फर्द दसकत करून दिधली. व इंद्रसेन साहेब इंग्रेज यांजसमागमें आहेत. त्यांजपासीं लखनहून आणीक चार साहेब नवे आले, त्यांची मुलाजमत जाली. ह्मणून चौ साहेबांस चार चार पारच्यांच्या खिलत व इंद्रसेन सुद्धां पेशजीं येथें तीन इंग्रेज होते, त्यांस चार चार पारचे, व इंद्रसेनास शिरपेंच, जेगा व सलाउद्दीखान ह्मणून इंद्रसेनाकडील त्यास निमअस्तीन गोषपेंच, येणेंप्रमाणें यांस रुसकतीचे खिलत देऊन, राजश्री पाटिलबावांपासीं ठेविलें. व मुरारराव दौलत व केसोपंत या उभयतांस तीन तीन पारच्यांचे खिलत दिल्हे, कीं समागमें चाकरीस येतात. येणेंप्रमाणें देऊन पातशाहा दिल्लीस गेले. राजश्री पाटीलबावा त्यांस दोन कोस पोंहोचावून माघारा लष्करांत आले. छ० १९ तारखेस राजश्री लाडोजी देशमुख त्यांस बऱ्हाणपुरीं शेलापागोटें व किनखाप ठाण एक, व दोन महमुद्या, व मोत्यांची कंठी, व जेगा शिरपेंच, व व घोडा उदेपुरीहून राण्याकडून आला होता तो, बमय सरंजाम, येणेंप्रमाणें देऊन, यांनीं पातशाहापासीं असावें ह्मणून बिदा केले. तेही मागाहून गेले. त्यांच्या व पातशाहाच्या भेटी होडलचे मुक्कामीं एका जागा होऊन, पुढें दरकूच दिल्लीस गेले आहेत. तेथें गेलीयावर जें वर्तमान होईल, तें विनंति मागाहून लिहूं. आह्मांस आज्ञा केली आहे कीं, आठा चौ रोजां तुह्मांसही बिदा करून देऊं, ह्मणून आज्ञा जाली आहे. त्याजवरून येथें आहोंत. हे बिदा करतील तेव्हां जाऊं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति. वरकड दिनचर्येचें वर्तमान किरकोळी पारसी एकबारा फर्दा पाठविल्या आहेत, त्याजवरून श्रुत होईल. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १३९.

श्री. १ आगष्ट इ. स. १७८५.

"विज्ञापना ऐसीजेः–राजश्री पाटिलबावा यांचे मोठे मोहरेचा अलकाब–"वकील मुतलख उमेदतुलउमराव मुक्तारूलमुमालिक फरजंद अलीजाह महाराजाधिराज माधवराव शिंदे श्रीनाथबहादूर मनसूर जहा फिदवी शाहाअलम पातशाहा गाजी." येणेंप्रमाणें मोठी मोहर आहे. दस्ती मोहर लहान "वकील मुतलक अलीजाह श्रीनाथ महाराजे माधवराव शिंदे बहादूर" येणेंप्रमाणें लहान मोहर आहे.

पैवस्ती छ० १० मोहोरम.

लेखांक १४०.

कार्तिक

श्री. १५ आक्टोबर इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसींः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १२ माहे जिल्हेज मुक्काम श्रीवृंदावन नजीक जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– इकडील वर्तमान पेशजीं छ० ७ माहे जिलकादीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांचा मुक्काम येथें आहे. पातशाहा दिल्लीस आहेत. तेथें राहून इंग्रेजांकडे व वजिराकडे व जुवांबख्त पातशाहाजादा यांजकडे लखनऊस फितुराचीं पत्रें लिहितो, कीं सर्व दिल्ली प्रांत, आगरे व डीग वगैरे पाणिपत पावेतों यांणीं मुलूख आपले काबूंत घेतला. एक रामगड ऊर्फ अलीगड मात्र राहिला आहे. त्यास हाही यांनीं घेतला ह्मणजे सर्व मुसलमानीचा क्षय जाला. याजकरितां तुह्मीं जलद येऊन, अलिगडवाल्यांसीं कुमक करावी, हें ठीक आहे. ह्मणून वारंवार फितुराचीं पत्रें पाठवितात. ह्मणून राजश्री पाटिलबावा मथुरेहून कूच करून, दिल्लीचे रोखें सेरगड ह्मणून गांव श्रीयमुनातीरीं होडलेचे बरोबर आहे, तेथपावेतों जाऊन, तेथें वैरणपाणी, मैदान चांगलें आहे व रामगड नजीक आहे, व इकडे दिल्लीही तीस पस्तीस कोस राहाते, ऐसी समीपता पाहून, तेथें मुक्काम करून, राजश्री भागोजी देशमुख यांचे जांवई पातशाहापासीं आहेत, त्यांस पत्रें व पातशाहास अर्जी पाठविली आहे. व येथून दोनशें उंटें भारबारदारीसाठीं पाठविले आहेत कीं, आपण कूच करून यावें. व देशमुखास लिहिलें आहे कीं, त्यास घेऊन यावें, ह्मणून पत्रें गेलीं आहेत. त्याजवरून पातशाहांनीं कलंदरबेग फरासखान्याचा दारोगा यास ताकीद केली आहे कीं, खेम्याची डागडोजी वगैरे तयारी करणें. ह्मणून आज्ञा जाली आहे. त्यास राजश्री पाटिलबावांचें मानस कीं,

पातशाहा लिहिल्याप्रमाणें सत्वर दिल्लीहून निघून लष्करांत आले, तर उत्तम आहे. नाहींतरी आपण सडेस्वारीनसीं जाऊन पातशाहास घेऊन लष्करांत यावें. इतकी खटपट करावयाचें कारण कीं, चहूंकडे चार मसलती येऊन लागल्या आहेत. एक राघोगड व एक रामगड व एक जयपूर व एक पाणिपत. एकूण चौ ठिकाणीं फौजा शहास अटकल्या आहेत. व चौ ठिकाणींही झुंज लागलें आहे. पातशाहांची प्रकृत कुभंडी आणि आपलेपासीं कोणी तोरा नाहीं. श्रीमंत साहेब असावें, ते दूर राहिले. त्यापेक्षां पातशाहाच समीप आहे; त्यांचेच गळा पडून आपले काबूंत आणून समीप ठेवावा. ह्मणजे इंग्रज व असफदौला वजीर व जुवांबख्त पातशाहाजादा या सर्वांवर दाब राहून मसलत सिद्धीस जाईल. नाहींतर इंग्रेजांपासीं पातशाहाजादा वजीर त्याचे काबूंत आहेत; त्याचे मनांत विकल्प आल्यास मग मसलत कठीण पडेल. ह्मणून विचार करून येथून कूच दिल्लीचे रोखें केला आहे. तिकडून पातशाहास आणून आपण यांनीं एकत्र असावें, हे सल्ला ठैराविली आहे, कीं पातशाहा आपण एकत्र असल्यास सर्वांवर राजे रजवाडे वजीर आदिकरून सर्वांवर दाब राहून केलेली मसलत सिद्धीस जावी. यांजमध्यें कोणीही डोई उचलून, पातशाहासमीप असल्यास येऊं शकणार नाहीं, ह्मणून सल्ला ठैरली आहे. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४१.

पैवस्ती छ० २ रविलाखर सीत. **श्री.** २९ दिसेंबर इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २६ माहे सफर मुक्काम लष्कर नजीक सेरगड यमुनातीर सीरघाट जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० २० मोहरमीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर जहांगीरखान, अफराशाबखान यांचा कनिष्ठ बंधू, व अफराशाहबखानाची बेगम ऐसीं रामगडास होतीं. त्यांस मुंडसानचा किल्ला व एक लाख दाहा हजारांची जागीर देणें करार करून, त्यास किल्ल्यांतून अकबरखान ह्मणून जमादार मोंगल आहे, त्याचे विद्यमानें किल्ला खाली केला. बेगम आपली वस्तभाव घेऊन मुंडसानचे किल्ल्यांत दाखल जाली. जहांगीरखानास लष्करांत घेऊन आले. त्यास सापारच्यांचा खिलत व हत्ती, घोडा, जेगा, शिरपेंच, मोत्यांची कंठी, तरवार येणें-

प्रमाणें सन्मान करून, लष्करांत एक पक्षानंतर त्याजवर चौकी बसविली; व बेगम मुंडसानचे किल्ल्यांत होती, तीसही धरून आणून, लष्करांत कैदेंत आहे. मुंडसानांत वस्तभाव होती ते सर्व जप्त केली. एक लाख दाहा हजारांचे परगणे कागदीं पत्रीं मात्र दिल्हे होते. तेथें बेगमेचा अंमल जाला नाहीं. यांचेच कमाविसदार जे आहेत, तेच आहेत. उभयतांस लष्करांत कैद करून, नजबखानाचें व अबदुल अहदखान यांस कैद केलें त्याचे घरचें, व लथापतास वगैरे लुटलें त्याचे घरचें जवाहीर व खजाना अफराशाबखान यानें कोल व खुर्जा वगैरे बारा माहालचा ऐवज बारा वर्षें जमा केला तो पैका, एकूण जवाहीर व पैक्याचा तगादा लाविला आहे. ते ह्मणतात कीं, आह्मांस कांहीं ठाऊक नाहीं. अनुपगीर गोसावी व नारायणदास दिवाण तुह्मांपासीं आहेत, त्यांस पुसून घ्यावें. ह्मणून जाबसाल आहे. पुढें काय ठरेल, ते विनंति लिहूं. मुंडसानचे किल्ल्यांत जप्ती केली होती, ते वस्तभाव कलमबंद होऊन, लष्करांत उंटें रथ भरून जामदारखान्यांत जिन्नस दाखल होतो. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४२.

श्री. २९ दिसेंबर इ. स. १७८५.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० २६ माहे सफर मुक्काम नजीक शेरगड यमुनातीर सीरघांट जाणून स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष:— पेशजीं छ० २० मोहरमीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, ते पावून सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं इकडील वृत्त पातशाहाकडील व राजश्री पाटीलबावा तहमुरशहा दुराणी यांजकडील सविस्तर राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार धनी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, ही विज्ञप्ति."

लेखांक १४३.

श्री. २९ डिसेंबर इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसिजे. मुक्काममजकुरींहून कूच करून जैपुरास जावें. तेथील खंडणीचे पैक्यास ठिकाण लागलें तर लावून ऐवज वसूल करावा, नाहींतर मुलकाची

जप्ती करून आपलीं ठाणीं बसविलींच आहेत, तेथेंही आपला अम्मल करून, तिकडून दिल्लीकडे फिरतेसमयीं रेवाडीचा मित्रसेन आहीर मृत्यु पावला आहे तेथील जप्ती करून आपलें ठाणें रेवाडींत बसवून, लाहोराकडे तहमूरशहा न आला तर पातशहासुद्धां दिल्लीस जावें. नाहींतर पातशाहांची बिदा दिल्लीस करावी, आपण रेवाडीहून डिगेस येऊन मुक्काम करून, येथून फौजा पाठवून मुलकाचा बंदोबस्त राखावा ह्मणून एक विचार हाही आहे. पुढें प्रत्ययास येईल तें खरें. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४४.

श्री. डिसेंबर इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री शिवाजी विठ्ठल ग्वालेरप्रांतीं होते, ते लष्करांत फौजसुद्धां आले. राजश्री पाटिलबावांच्या भेटी जाल्या. पुढें पातशाहांची मुलाजमत करावी. त्यास राजश्री शिवाजीपंत यांनीं सांगून पाठविलें कीं, ज्याप्रमाणें आमची रीत मुलाजमतीची आहे, त्याप्रमाणें पातशाहास नजर देऊन, सलाम करून बसूं. पातशाहापुढें उभे राहाणार नाहीं. ह्मणून सांगून पाठविलें. त्याजवरून पाटिलबावांनीं सांगितलें कीं, "आह्मांस मात्र आज्ञा पातशाहाची बसावयाची आहे. दुसऱ्यास आज्ञा बसावयाची नाहीं." त्याजवरून शिवाजीपंत बोलले कीं, "आह्मांस पातशाहाचे भेटीचें तरी प्रयोजन काय आहे? जर आमची रीत आहे, त्याप्रमाणें भेट जाली तर उत्तम. नाहीं तर आह्मांस गरज नाहीं." त्याजवरून एक मास जाला लष्करांत आले आहेत, परंतु पातशाहाची भेट नाहीं. पुढें होईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४५.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे:– कलकत्त्याहून वर्तमान लखनौस आलें. तेथून वर्तमान दिल्लीस पातशाहाकडे आलें कीं, हिष्टिन साहेब इंग्रेज यानें एकविसां करोडीची टीप लिहून दिधली, आणि पुन्हां कलकत्त्याची व हिंदुस्थानची बदस्तुर बहाली करून घेतली. आणि त्याची बायको पहिलेच विलायतेस जाऊन बसली होती कीं, हा मामला बदस्तुर हिष्टिनाकडे बहाल असावा. त्यासमयीं तिनें कांहीं

लबाडीचीं पत्रें हिष्टिनाकडून आलीं, ह्मणून मध्येंच लिहून पातशाहास गुजराणलीं होतीं. तें वर्तमान पातशाहास कळलें कीं, इनें मधेंच लबाडी करून पत्रें गुजराणलीं. त्याजवरून पातशाहांनीं तीस कैद केलें होतें. त्यास तिची तकसीर पातशाहापासून माफ करवून, तीस सोडवून, पातशाहांची कृपा संपादिली. पातशाहांनीं आज्ञा केली कीं, एक कंपू हजूरचा व कांहीं गोरे व समुद्रांतील मार्गांची दस्तकें हजूरचीं, येणेंप्रमाणें सरंजाम समागमें घेऊन जाऊन, बदस्तुर आपला अंमल करणें ह्मणून आज्ञा जाली. त्यास याप्रमाणें हिष्टिनाचीं पत्रें कलकत्त्यास आलीं कीं, आह्मी....त्या प्रांतीं येतों. तें वर्तमान पातशाहापाशीं आलें ह्मणून श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. सरकारचा वकीलही कलकत्त्यांत असेल, तोही सरकारांत विनंति लिहीत असेल. आह्मीं येथें वृत्त ऐकिलें, तें सेवेसीं लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १४६.

श्री. इ. स. १७८५.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे, अफराशाहाबखान याचे बेगमेनें व जहांगीरखान यांनीं कांहीं जवाहीर वगैरे वस्तभाव फरोकाबादेस आपले माहेरीं रामगडीहून पळविली ह्मणून श्रवणांत आलें. त्याजवरून इंद्रसेनसाहेब इंग्रेजांकडून वकालतीस आहे, त्यास बोलावून आणून दोन वेळां खिलबत जालें; आणि सांगितलें कीं, जवाहीर व वस्तभाव बेगमेनें आपले माहेरीं फरोकाबादेस लांबविली आहे, त्यास तुह्मीं हापडसाहेबांस लखनऊस पत्रें लिहून पाठवून, पातशाहांचें सरकारची वस्तभाव आहे तिचें ठिकाण लाऊन आणवणें. ह्मणून बोलणें होऊन पत्रें पाठविलीं आहेत. अद्यापि उत्तरें आलीं नाहींत. उत्तर आल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १४७.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. अफराशहाबखान यांची बेगम व जहांगीरखान त्याचा बंधु रामगडांत झुंझत होते. त्यासमयीं नारायणदास काश्मीरी दिवाण व राजे आनुपगीर गोसावी यांनीं त्यांजकडे फितुराचीं पत्रें पाठविलीं होतीं कीं, तुह्मीं आंव न सोडणें व हिम्मत धरून झुंझणें. तोंपावेतों आह्मीं वजीरास व इंग्रेजांस

पत्रें पाठविलीं आहेत, तेही तुमची कुमक करितील; व आह्मीही येथें यांचे तदबिरींत आहोंत. ऐसीं पत्रें होतीं. त्यास बेगमची जप्त जाली. त्यांत ते कागद सांपडले. त्यांजवरून नारायणदास व बजीदखान व सुजादिलखान या तिघांस कैद केलें. आणि गोसाव्यास सांगून पाठविलें कीं, तुह्मीं सरंजामी महाल आहेत, ते सोडून देणें आणि उठोन जाणें. त्याजवरून गोसाव्यानें महालच्या सोडचिठ्या भांडेर वगैरे नजबखानानें व यांनीं प्रगणे दिले होते, ते सर्व सोडविले. तेथें आपले कमाविसदार पाठविले आहेत. एक मोटची गढई व मोटचा प्रगणा झांशीपैकीं, त्याजपाशीं आहे, तो मात्र ठेविला. बाकी अवघ्या ठिकाणीं आपला अंमल करून घेतला. कमाविसदार व फौज गेली आहे. ठाणीं दाखल जालीयाचीं पत्रें अद्यापि आलीं नाहींत. याप्रमाणें वृत्त आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति.”

लेखांक १४८.

श्री. इ. स. १७८५.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. मोटचा किल्ला तालुक्यासुद्धां अनुपगीर गोसावी त्याजकडे होता. त्याजकडून दूर करून राजश्री गोपाळराव त्रिंबक यांजकडे सांगितला. व राजश्री खंडेराव हरी व रघुनाथ हरी व राजधर गुजर व दतीयेकर राजा यांस साहित्यपत्रें लिहून दिधलीं कीं, गोसाव्याकडून मोटचा किल्ला व तालुका दूर करून, राजश्री गोपाळराव त्रिंबक यांजकडे दिधला आहे. तर तुह्मीं त्यांचें साहित्य करून, किल्ल्यांत ठाणें बसऊन, अंमल करूं न देणें. ह्मणून पत्रें सरकारचीं लिहून देविलीं आहेत. परंतु यांजकडील कारकून अद्यापि गेले नाहींत. गोपाळरायांचें मानस आहे कीं जयपूरचा मामला जाला, आतां आपले पथकाची परवानगी घेऊन, मोटकडे रवानगी करून, आपला अंमल करून घेऊं. या विचारांत आहेत. मोटेंत ठाणें बसेल तेव्हां विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक १४९.

श्री. इ. स. १७८५.

“श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—अनुपगीर गोसावी यांजकडील प्रगणे दूर करून, त्यास आज्ञा केली कीं, तुह्मीं उठून जावें. त्यानें विनंति केली कीं, “मजला कोठें जावयास

ठिकाण नाहीं. ह्मणून एक मास पडून राहिला. तेव्हां प्रगणे मोट तालुके झांशी पैकीं व वृंदावन ह्या दोन्ही जागा त्याजकडे करार करून, पांच लाख रुपये फौजेचे खर्चास सालिना द्यावा; फौजेनें स्वारीसमागमें चाकरी करावी; खाशानें वृंदावनीं असावें; याप्रमाणें करारमदार होऊन, गोंसावीमजकुरास वृंदावनास डिगचे मुक्कामींहून बिदा करून, त्याची फौज चाकरीस समागमें घेऊन, इकडे कूच केला. याप्रमाणें वर्तमान जालें. पुढें येईल ते विनंति लिहूं. नारायणदास कशमिरी व अफराशाहाबखान यांचा भाऊ जहांगीर........त्याची धाकटी बेगम व तिचा बंधु व चुलता हे सर्व अद्यापि कैदेंतच आहेत. कांहीं फैसल्ला जाला नाहीं. फैसल्ला जाल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५०.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. या दिवसांत वजीर असफदौला व पातशाहाजादा जुवांबख्त लखनऊहून कूच करून बंगाल्यास अयोध्येस गेले आहेत. पातशाहाजाद्याची मर्जी आहे कीं, एक वेळ कलकत्त्यास जाऊन, तिकडीलही सहल करून यावेंसें मानस आहे. प्रत्ययास येईल तें खरें. व राजे बखतासिंग भदावरकर यांजला बहापिनाट-पैकीं दोन तालुके पन्नास हजारांचे जागीर देऊन, त्यांसी स्थापना करावी; बिना गढी, वाडा नुस्ता चार दिवाली बांधून असावें. याप्रमाणें जमीदारी करून असावें, ह्मणून करारमदार होऊन, त्यासीं स्थापना करावीसें ठरलें आहे. व गुलाम कादर, जाबतेखानाचा पुत्र, त्याचा मुलुख त्याजकडे करार करून, दरबारखर्च सुद्धां तीन लक्षांची मालत त्यासी जाली. अखेर पौषमासपावेतों बेबाकी करून द्यावीसा करार ठराऊन, त्याजकडील वकिलास वस्त्रें देऊन बिदा केले आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५१.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राघोगडकर खिची यांस रामजी पाटील जाधव व महमद बेग हमदानी यांनीं बहादरीनें राघोगडांतून काढून सरकारचें ठाणें बसविलें. हें वर्तमान राजश्री पाटिलबावांनीं ऐकून बहुत रागास आले कीं, त्यास बहादरीनें

काढावयाचें प्रयोजन काय? त्याजवरून रा॰ आंबाजी इंगळे यांची रवानगी राघोगडाकडे केली कीं, त्यास धरून मारून टाकणें किंवा कैद करणें, ह्मणून आज्ञा. त्याजवरून आंबाजी इंगळे यांनीं राघोगडवाल्यास कैद करून, पायीं बेड्या घालून, ग्वालेरीचे किल्ल्यावर ठेविलें; व त्याचीं दोन मुलें व बायका एका एका वस्त्रानसीं कैद करून, भेलशाचे किल्ल्यांत ठेविलीं. त्याची वस्तभाव, हत्ती घोडे वगैरे, तोफा व बंदुका, सर्व सरंजाम सुतळीचा तोडा जप्त करून, सरकारांत आणिला. व तिकडील फौज राघोगडाकडील कुल सरकारचा बंदोबस्त करून, राजश्री खंडोजी इंगळे यांचा बंदोबस्त करून देऊन, ते फौज कुल देवजी गवळी व तोफखाना वगैरे सरंजाम सरकारनिजबतीचा होता, तो लष्करांत आला. व कोटेकराकडील कुमकी फौज होती, ते जिकडील तिकडे गेली, ह्मणून श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५२.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री पाटिलबावांनीं, इंग्रेजांची लढाई व ग्वालेर व गोहद घेऊन पातशाहापासीं येऊन, आफराशाहबखान मृत्यु पाऊन पातशाहाचे घरचीं मुखत्यारीचीं वस्त्रें श्रीमंत साहेबांस पाठऊन, आपण मुतालकीचीं वस्त्रें घेतलीं. इतका प्रकार जाला, तो एक श्रीमंत स्वामींचे प्रतापेंकडून व राजश्री पाटिलबावांचे तहमुली धिमेपणाकरितां जाला आहे. त्यास ऐसा समय पुढें येणार नाहीं. हिंदुस्थान केवळ निवारसी जालें आहे; आणि चकत्याचें पातशाहीची समाप्त बारावी सद्दी एक वर्ष बाकी राहिली आहे. संवत १८४२ बेतालीसांत सर्व यवनाची समाप्त आहे. असफदौला वजिराचे शरीरीं समाधान नाहीं. त्यास दिल्लीची पातशाहात आपले हातीं लागली आहे. या पातशाहीस एक रोग विलायतेचा मात्र आहे. त्यास पन्नास हजार स्वार प्यादा लाहोरास राहून, अटकचे दऱ्याचा व कशमीरचे सुभ्याचा बंदोबस्त करून, तेथील मजबुती राखल्यास चहूंकडे दाब बसून, पैक्यास कांहीं कमी नाहीं. मुबलग पैका दृष्टीस पडून सलतनतीचा बंदोबस्त होईल. नाहींतर इंग्रेज रिकामा जालियावर, तो अथवा शीख कोण्ही विलायतेचा सरदार येऊन दिल्लींत बसल्यास, मग आपल्यासच भारी पडेल. याजकरितां अज्ञानपणें विनंति लिहिली आहे. त्यास जो बंदोबस्त व

फौजेचें बल करणें, तें सत्वर करावें. नाहींतर राजश्री विसाजीपंत धुळीवरील सारवण करून गेले आणि मागें नजबखान बळावला, आणि इटावा वगैरे दरोबस्त अंतरवेद वजिरानें घेतली, तैसा प्रकार होऊं न पावे तें आपण करतील. याहीवर आपण दूरआंदेश धणी आहेत. उत्तम जाणतील तें करतील. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५३.

श्री. इ. स. १७८५.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– छ. १६ रविलावलीं नवाब जाबतेखान गोसगडीं होता, त्यास तरळ होऊन देवाज्ञा जाली. व छ० १ माहे मिनहूस दलेलखान कुंजपुरेवाला यासही देवाज्ञा जाली. अंतर्वेदींत शीख होते, तेही दरोबस्त जमा होऊन, बुढिया सारंगपुर यमुनातीरीं मुक्काम करून आहेत. दिल्लीपासून सारंगपुरपावेतों कोणी आडवी काठी करणार राहिला नाहीं. राजश्री आंबाजी इंगळे व बापूजी मल्हार या उभयतांस राजश्री पाटिलबावांनीं दिल्लीच्या व अंतर्वेदीच्या बंदोबस्तास पाठविले आहेत. तेही आठा पंधरा दिवसांत जाऊन पोहोंचतील. श्रीमंत साहेबांच्या प्रतापेंकरून मनोदयानुरूप बंदोबस्त होईल. वजीर असफदौला यांचे शरीरीं समाधान नव्हतें. परंतु आतां बरे जाले आहेत. भडोचेकडे शिकारीस पातशाहा-जाद्यासुद्धां गेले आहेत. तिकडून लखनौस सत्वरच माघारां येणार. याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १५४.

श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक शंकराजी सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० २४ माहे साबान मुक्काम डीग जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेष:– आपण कृपापत्र छ० १२ जमादिलाखरचें पाठविलें, तें छ० १६ मिनहूस पावलें. पत्रीं आज्ञा कीं, 'तुह्मीं वर्तमान लिहिलें तें कळलें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें.' ह्मणून आज्ञा. त्यास पेशजीं छ० २१ रजबीं विनंति-पत्रें पाठविलीं आहेत, तें पावलींच असतील. त्यांजवरून सर्व श्रुत जालेंच असेल.

इकडील वृत्त आमचे यजमानांहीं विनंति लिहिली आहे, त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार धनी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विज्ञप्ति."

लेखांक १५५.

छ० २० रबिलाखर सीत. श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १७ माहे रबिलावल मुक्काम नजीक डीग जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० २६ सफरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावोन सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, शिरघाटाहून नजीक शेरगड यमुनातीर तेथून कूच करून, नजीक डीग दीड कोस येथें येऊन, मुक्काम केला आहे. जयपुराकडील तेविसा लक्षांचा मामला जाला आहे. त्यापैकीं दो लक्षांची हुंडी आली, बाकीचा ऐवज येत नाहीं. ह्मणून मुक्काममजकुरीं येऊन काम्पांत ठाणें सरकारचें बसविलें. व लष्करचे आसपास मेवात्यांनीं धुमधाम फार केली. कांहीं उंटें लष्करचीं घेऊन गेले. ह्मणून त्यांचे पारिपत्यास रा. आंबाजी इंगळे फौज देऊन पाठविले आहेत. त्यांनीं दोनचार गांव मेवात्यांचे मारून बंदी धरली आहे; व पुढेंही मेवात्यांचें पारपत्य करून बंदोबस्त करावा, या विचारांत आहेत. पुढें विशेष वृत्त आल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १५६.

श्री. १८ जानेवारी. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. तहमूरशाहा अबदाली पिशोरास मुक्काम करून होता. त्यास कंधाराकडे नादिरशाहाच[1] नातू आहे. त्यानें फौजबंदी करून तहमूरशहाचीं ठाणीं कंधाराकडे होतीं तें उठवून आपला बंदोबस्त केला, ह्मणून वर्तमान पिशोरास तहमूरशहास आलें. त्याजवरून झिलम व टवा भकड व पिशोर व किशमीर (काश्मीर) व मुलतान येथील सरसुभेदारी हुमायूं पातशाहाजाद्यास देऊन, यांजसमागमें दहा हजार फौज दुराणी ठेऊन, इकडील बंदोबस्त करून, आपण फौजसुद्धां कंधाराकडे कूच करून गेला. याप्रमाणें वर्तमान दिल्लीस व पातशाहाचे येथें आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १५७.

श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. मित्रसेन आहीर रेवाडीवाला मृत्यु पावला. त्याजकडील मामला तीन लक्षांचा जाला होता, त्याचा फडशा न जाला; ह्मणून रेवाडीस फौज पाठवून गोकुळगड वगैरेचा सरकार बंदोबस्त करून खालसा रेवाडी केली. व राजश्री नारो शिवदेव यांचे पुतणे बापू लष्करांत येऊन दाखल जाले. कळावें ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १५८.

श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. तहमूरशहा अबदाली पिशोरास मुक्काम करून आहेत. त्यांचा पुत्र हमायूशाहा अटक उतरून झिलिम ह्मणून जागा लाहोरापलीकडे शंभर कोस आहे, तेथें चार दस्ते फौज चाळीस हजार समागमें आहेत. तेथें मुक्काम करून कशमीर व टवाभकड वगैरे सिंधेकडे व बिकानेरचे सरहद्देकडे त्यांचा मुलूक अटक अलीकडे आहे, त्याचा बंदोबस्त करून आहे. पातशाहांस हमायूनें सांगून पाठविलें होतें कीं, मजला आज्ञा होईल तर मी लाहोरास जाईन. त्यानें उत्तर पाठविलें कीं, मी झिलमचे मुक्कामीं येईन, मग पुढें तुह्मांस लाहोराकडे बिदा करीन. तोंपावेतों आपले मुलकाचा बंदोबस्त करून असणें. व चरससिंग शीख याचा पुत्र महासिंग, लाहोरचा सुभा, हमायूस जाऊन भेटला आहे. ह्मणतो कीं, काश्मीरचा सुभा आह्मांकडे इजाऱ्यानें सांगावा. आह्मी आपले स्वारीसमागमें हिंदुस्थानास चालतों. त्यास शिखांनीं जैसिंग कन्हैय्या वगैरेनीं विचार ठैराविला आहे कीं, अबदालीची फौज लाहोरास आली ह्मणजे अवघे एकविचारें होऊन, महासिंग त्यास भेटला आहे, त्याचे फौजसुद्धां झुंझावें. ऐसी शपथप्रमाण सर्वा शिखांची होऊन, अमरसरावर अवघे सरदार फौजसुद्धां मुक्काम करून आहेत. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १५९.

श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. राजश्री धारराव शिंदे फौज सुद्धां पाणिपतास होते. त्यास नानुमल दिवाण, आलाजाटाचा नातू साहेबसिंग आहे त्याजकडून येऊन, यांस पांच हजार रुपये रोज करार करून, सरहद्देकडे घेऊन गेले. त्याचीं ठाणीं कांहीं शिखांनीं घेतलीं होतीं, ते पुनः यांनीं मोरचे लाऊन तमाम आपलीं ठाणीं खाली करून घेऊन, नानुमलानें आपला बंदोबस्त केला. बोलल्याप्रमाणें हिशेब करून, शिंदे मजकुरास पांच लाख रुपये देऊन बिदा केलें. ते माघारा करनालेस आले. इतकियांत करनालकर गजपतसिंग जाट यांस देवाज्ञा जाली. त्याचे दोघे पुत्र आपसांत भांडूं लागले. त्यांतून धाकटा पुत्र येऊन, यांस भेटून, करनाल व सफेदा वगैरे दहाबारा लक्षांचा मुलूक आहे, त्यांत यांचा बंदोबस्त करून देऊन ठाणीं बसविलीं. त्यास हल्लीं सरकारचा अम्मल व बंदोबस्त सरहद्देअलीकडे वीस कोस पावेतों जाला. याप्रमाणें वर्तमान आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक १६०.

श्री. १८ जानेवारी इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-राजश्री धारराव शिंदे पानिपताकडे व कुंजपुऱ्याकडे मुलुखगिरी शिखांचा बंदोबस्त करून होते. त्यास पतियाल्याहून अमरसिंग जाट, आला जाटाचा नातू यानें आपले दिवाणांस नानुमलास पाठवून तीन लक्ष रुपये नख्त, दररोज पांच हजार रुपये खर्चास देणें करार करून, झुंजास दारूगोळी जामगी जो खर्च लागेल तो जाटानें द्यावा याप्रमाणें करारमदार होऊन, यांचा कूच करवून, पतियाल्याकडे घेऊन गेले आहेत. प्रथुतीर्थपर्यंत शीखांच्या गढ्या दोन चार घेऊन, नानुमलाचा बंदोबस्त करून दिधला. पुढें गढ्या घेत जातात. याप्रमाणें वर्तमान आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६१.

श्री. जानेवारी इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– जयपूरकरांकडील मामला ठरला आहे, त्यापैकीं पैका येत नाहीं. कांहीं जाबसाल बाकीस राहिले आहेत. ह्मणून खुशालीराम बोहरा जाबसालास येणार. त्याची मार्गप्रतीक्षा करितात. तो येऊन जाबसालाचा फडशा केला तरी उत्तम. नाहीं तरी राव राजा प्रतापसिंग माचेडीकर व नजबकुलीखान यांस राजश्री पाटीलबावांनीं आज्ञा केली आहे कीं, तुह्मी दोन महिने छावणी आपले जागांत करून, मागाहून आह्मी पत्रें पाठवून देऊं त्याप्रमाणें जयपूरचे मुलुखांत जाऊन, आपला बंदोबस्त करावा. येणेंप्रमाणें उभयतांसीं करारमदार करून, पातशाहाकडून हत्ती, घोडे, वस्त्रें, तरवारा, मोत्याच्या कंठ्या, जेगे, शिरपेंच व त्यांकडील मानकरी समागमें होते, त्यांसही वस्त्रें शिरपेंच देऊन, बहुमान करून रुकसत केलें आहे. एका दों रोजांत लष्करांतून कूच करून जाणार. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६२.

पै॥ छ१० जमादिलाखर
सन सीत चैत्रमास.

श्री. १० एप्रिल इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील........ २ जमादिलावल मुक्काम लालसोट नजीक जयपूर वीस कोस जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ १७ रविलावलीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरीः– पातशाहा व राजश्री पाटीलबावा मुक्काममजकुरीं आहेत. जयपूरचा मामला सालगुदस्तां तेविसां लक्षांचा जाला होता त्यापैकीं हिंडोल वगैरे परगणे दहा लक्षांचे लावून दिल्हे व लाख रुपये नक्त दिल्हे. व दोन लक्षांच्या हुंड्या श्रावणमासीं पाठवून दिधल्या होत्या. आणि जाबसाल करीत होते कीं, रावराजा प्रतापसिंग व नजबकुलीखान या दोघांनीं नारनोल वगैरे परगणे दाबून बसले आहेत; त्यांस ताकीद करून परगणे सोडवून देवावे. आणि आपले सरकारची फौज मलक महमदखान वगैरे गेले आहेत, त्यांनीं पायमाली केली आहे. ते मजुरा देऊन, बाकी सरकारची निघेल ती घ्यावी. ह्मणून जयपूरकराकडील

वकील बोलत होते. त्यास, रावराजाकडील परगणे जातात, हें रावराजानें पाहून, राजश्री पाटीलबावांस विनंति केली कीं, "मजला आज्ञा कराल तरी मी राजा पृथ्वीसिंग याचा पुत्र कृष्णगडीं आहे, त्यास मी घेऊन येतों. त्यास राज्यीं बसवून द्यावें. मी पन्नासा लक्षांची निशा करून देतों." ह्मणून बोलणें करारमदार होऊन रावराजांस बिदा केलें. त्यानें जाऊन कृष्णगडीहून पृथ्वीसिंगाचा पुत्र मानसिंग यास घेऊन येऊन, जयपुरापाशीं सांगानेराकडे मुक्काम करून आहेत. तेथून राजश्री पाटिलबावांस सांगून पाठविलें कीं, आपण यावें. त्याजवरून हे पातशाहासुद्धां कूच करून मुक्काममजकुरीं आले आहेत. जयपूरकरांकडील खुशालीराम बोहरा व बालानंद महंत रावराजापाशीं राजे प्रतापसिंगाकडून आले आहेत. त्यांनीं रावराजांस पत्र लिहून दिधलें कीं, जे राजश्री पाटीलसाहेब आज्ञा करितील, ते आह्मांस मान्य आहे. ह्मणून बोलणें ठैरून, जाबसालास राव राजा प्रतापसिंग येणार. पुढें ठरेल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६३.

श्री. ७ एप्रिल इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ७ माहे जमादिलाखर मुक्काम नजीक लालसोट प्रांत जयपूर सोळा कोस जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः– आपण छ० १५ रविलावलचें पत्र पाठविलें, तें छ० २७ जमादिलावलीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, तिकडील बातमीचें वर्तमान वरचेवर लिहीत जावें ह्मणून आज्ञा. त्यास, पेशजीं छ० २ माहे जमादिलावलीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. ते पावून सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरः– जयपूरकरांकडून जाबसालास रावराजा प्रतापसिंग व बोहोरा खुशालीराम व महंत बालानंद हे तिघेजण आले. त्यास छ ५ जमादिलावलीं राव राजा प्रतापसिंग राजश्री पाटिलबावांचे भेटीस आला. त्यास आपले डोईचें पागोटें व किनखाबचा आंगरखा, पायजमा व जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी येणें-प्रमाणें, व त्यासमागमें सदारखान वगैरे असामी त्यास एक एक शालजोडी व तिघांस तीन किनखाब व तीन पागोटीं व तीन शीट जोड्या, येणेंप्रमाणें सन्मान करून बिदा केलें. अंबाजी इंगळे यांचा बंधु बाळाजी इंगळे त्यांसही येणेंप्रमाणें सनगें, विडे देऊन वाटेस लाविलें. दुसरे दिवशीं बोहोरा खुशालीराम भेटीस आले.

त्यांस अत्तर पानदान देऊन, त्यांस व रावराजा प्रतापसिंग यांस समागमें घेऊन पातशाहांचे येथें गेले. खुशालीरामानें राजे प्रतापसिंग यांजकडून एकशें एक मोहोर नजर केली, व आपलेकडून अकरा मोहोरा नजर केली. व राजा प्रतापसिंग यांनीं एकवीस मोहोरा नजर केल्या. "आह्मी खानाजाद फिदवी गुलाम या घरचे आहोंत." ह्मणून विनंति केली. त्यास पातशाहांनीं तबरूख देवायाची आज्ञा केली. त्याजवरून बोहोरा खुशालीरामास सा पारच्यांचा खिलत वस्त्रें व जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी व हत्ती व घोडा व तरवार येणेंप्रमाणें इनायत जाली; व याजप्रमाणेंच रावराजा प्रतापसिंगासही इनायत जाली. व पांचजण हमराई यांचे रजपूत होते. त्यांस दोघांस चार पारचे वस्त्रें व तिघांस तीन पारचे वस्त्रें देऊन बिदा केलें. तिसरे रोजीं राजश्री पाटिलबावा महंत बालानंद यांचे डेरियास दर्शनास गेले. त्यांजपुढें पांच मोहरा ठेवून नमस्कार केला. त्यांनीं मोत्यांची कंठी व तुळशीची माळ प्रसाद दिधला. तेथून खुशालीराम बोहोरा यांचे डेरीयास गेले. त्यानें चौदा खोन कापड शालजोड्या व सांगानेरीं छिटें व पागोटीं व किनखाब वगैरे कापड व मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच व एक हत्ती व चार घोडे येणेंप्रमाणें देऊन, तेथून रावराजा प्रतापसिंग यांचे डेरीयास गेले. त्यांनीं येणेंप्रमाणेंच कापड व मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच व हत्ती व घोडे चार दिधले. सदरहू घेऊन आपले डेरीयास आले. चवथे रोजीं बोहोरा खुशालीराम व रावराजा प्रतापसिंग राजश्री पाटिलबावांचे डेरीयास आले. त्याजसमागमील हमराई मानकरी रजपूत वगैरे सरदार होते, त्यांस वस्त्रें दुसाले सुमारें २४ व किनखाब सुमारीं १५ व छीट जोडी सुमारी १५ व पागोटीं सुमारीं १५ येणेंप्रमाणें शिरपेंच सुमारी ९ व जवाहीर व अत्तर पानदान देऊन बिदा केलें. पांचवे रोजापासून रावराजा प्रतापसिंग व बोहोरा खुशालीराम येऊन, मामलयाचा जाबसाल करूं लागले. त्यास यांनीं तीन करोड चाळीस लक्ष रुपये त्यांजकडे बाकी व हालचा मामला येणेप्रमाणें सवाल केला. त्यांनीं उत्तर केलें कीं, "इतके दगड देखील आमचे हवेलीस नाहींत. मग पैका कोठून द्यावा?" त्याजवरून हे रागास येऊन आज्ञा केली कीं, "जयपूरकर वकील आहेत, त्यांस लष्करांतून मार्गस्थ करा. आह्मी पुढें जयपुराकडे कूच करितों." ह्मणोन आज्ञा जाली. त्या गोष्टीस दोन चार दिवस दम खाऊन, रावराजा प्रतापसिंग यानें भानगड करून, साठ लक्ष रुपये यांचा मामला केला, व तीन लक्ष रुपये अंतस्थ दरबार खर्चाबद्दल, एकूण त्रेसष्ट लाखांचा करारमदार जाला. लिहिलें जालें. याचा तपशील:—

आकरा लक्ष रुपये नक्त द्यावे ह्मणून करार. १

दहा लक्ष रुपये सा महिन्यांचे मुदतीनें द्यावे ह्मणून करार. १

विसां लक्षांचे परगणे खाशा अंमलापैकीं लावून द्यावे ह्मणून करार. १

बावीस लक्ष रुपये, ठाकूर लोकांकडे मुलुख आहे त्यापैकीं जप्ती केली आहे, तो ऐवज मजुरा घेऊन, बाकी वसूल करून द्यावे. येणेंप्रमाणें करार. १

एकूण त्रेसष्ट लक्षांचा झाडा करून द्यावा ह्मणून करारमदार ठरून, सावकारी निशा तूर्त द्यावयाचा ऐवज अकरा लक्ष, त्याच्या हुंड्या आणावयास जयपुरीं त्यांजकडील कारभारी गेले आहेत. सावकारी हुंड्या निशा आली ह्मणजे येथून कूच होईल. याप्रमाणें श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १६४.

श्री. १० मे इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक शंकराजी सखदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० ११ माहे रज्जब मुक्काम लष्कर पातशाहा व राजश्री पाटिलबावा नजीक जयपूर वीस कोस जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः— इकडील वृत्त सविस्तर आमचे यजमानांहीं विनंति लिहिली आहे, त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार धनी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना."

लेखांक १६५.

श्री. १० मे इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ११ माहे रज्जब मुक्काम लालसोट नजीक जयपूर वीस कोस जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः— इकडील वर्तमान पेशर्जी छ ७ माहे जमादिलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, त्याजवरून सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरीः—पातशाहा व राजश्री पाटीलबावा मुक्काममजकुरीं आहेत. जयपुरकरांकडील मामला जाला आहे. त्यापैकीं तूर्त किस्त देणें ठरली आहे. त्यापैकीं दोन लक्ष रुपये नख्त व लाख रुपयांचें जवाहीर एकूण तीन लक्ष मात्र आले आहेत. बाकीची निशा करून देतों, ह्मणून खुशालीराम बोहोरा

जयपुरकरांकडील कारभारी आठां दिवसांचा करार करून, यांची आज्ञा घेऊन जयपुरास गेले. त्यास वीस दिवस जाले. अद्यापि कांहीं पैक्याची निशाची सोय पडली नाहीं. ह्मणून चंव कोसांचा कूच करून मुक्काममजकुरीं आले. त्यास एका दों रोजां जयपुरकराकडून कारभारी येऊन, निशेची खातर जमा करून दिधली, तरी उभयतांचें कूच माघारा होईल. जर ऐवजाचे निशेस दिवसगत लागली, तर जयपुरासमीप जाऊन बारा कोसांवर मुक्काम करून असावें, याप्रमाणें ठरलें आहे. व जयपुरकरांचें वर्तमान ऐकतों कीं, त्यांचे सरकारांत पैका नाहीं, व कोणी माणूसही खानदानचें नाहीं. रोडाराम ह्मणून मुसाहेब मुख्त्यार राज्याचा आहे. तो शिंपी आहे. दुसरे बोहोरा खुशालीराम आहेत. हे राजे माधवसिंग यांचे गंगाजळीवालेपाणी पाजणार आहेत. वरकड या दोघांअलीकडे जे आहेत, ते वाणी आहेत. याप्रमाणें राज्याचे कारभारी! व फौज नाहीं. व बारा कोठडीवाले सरदार आहेत, ते फुटून रावराजा प्रतापसिंग यांचे विद्यमानें यांस भेटून, आपलाले तालुक्याचे मामले फैसल करून, तहसिलीस यांजकडील फौजसरदार तहसिलीस गेले आहेत. जे कोणी येऊन भेटले नाहींत, त्यांचे तालुक्याची व खाजगीखालें मुलुख आहे त्याची जप्ती केली आहे व करीत जातात. याप्रमाणें वर्तमान आहे. जयपूरचे राज्यांत कांहीं त्राण राहिला नाहीं. जैसें जाटाचें राज्य नजीबखानानें घेतलें होतें, तोच प्रसंग जयपूरचाही आहे. यंदाची छावणी या प्रांतीं जाली ह्मणजे सहज सलाबतीनेंच जयपुरांत अंमल होईल, ऐसा प्रसंग आहे. पुढें अमलांत येईल, ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १६६.

श्री. मे इ. स. १७८६.

"पुाा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- आपण छ २७ रविलाखरचीं पत्रें पाठविलीं, तें छ १५ रजबीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, जयपूरचे बाकीचे ऐवजाचें काय जालें, व तैमूरशाहाचे लकावर शीख जाणार होते, तें काय जालें? व राजश्री पाटिलबावा फौज पाठविणार होते, ते गेली किंवा नाहीं. व पुढें मसलत काय करणार? व गोसावी फितुरांत सांपडला असतां मोकळा काय ह्मणून सोडला? व अफराशाहाबखानाचे बेगमेचे वस्तभावेचें ठिकाण सांपडलेंच असेल, ते कोठपर्यंत सांपडलें असे? त्याचा शोध करून लिहून पाठवावें. व मथुरा वृंदावन गोसाव्याकडून सुटलें, या अर्थीं

सरकारांत ठेवावें, येविसीं राजश्री पाटिलबावांस पत्र पाठविलें आहे. तुह्मीं बोलून, पातशाहापासून करार करून घ्यावयाचें करावें. येविसीं पूर्वींही राजश्री पाटिलबावांस लिहिलें होतें. तेसमयीं गोसाव्याकडे दिल्ही, ह्मणून उत्तर आलें होतें. हल्लीं जप्ती केली आहे. ते सरकारांत घेण्याविसीं बोलून करून घ्यावें. व पत्र पाठविलें आहे, तें देऊन काम होत असल्यास करून घ्यावें. नाहीं तर आपलें अंग न दाखवितां पत्र प्रविष्ट करून देत असल्यास तैसें करावें. ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास जयपूरचा मजकूर तर पूर्वीं पत्रावरून कळेल. व तैमूरशाहाचा पुत्र झीलमेअलीकडे आला नाहीं. याजकरितां कोणी शीख त्याजवर गेले नाहींत. राजश्री पाटिल बावांची फौज धारराव शिंदे चार पलटणें व तीन हजार स्वारांनसीं पानिपतापाशीं आहेत. ते करनालचा वगैरेचा बंदोबस्त करून आहेत. व गोसाव्यापाशीं शेंपन्नास माणूस जीवदार धारकरी चांगले होते. ह्मणून त्याजवर हात न पडला. व अफराशाहाबखानाची बेगम, नारायणदास व जहांगीरखान भाऊ व सुजादिलखान व सुजातखान........बदस्तुर कैदेंत आहेत. अद्यापि कांहीं वस्तभावाचें ठिकाण लागलें नाहीं. बेगम आदिकरून ह्मणतात कीं, आमचे घरचा कारभारी नारायणदास होता; जें आहे तें याचे कागदीं पत्रीं आहे; ह्मणून बोलतात. नारायणदास ह्मणतो कीं, मीं कांहीं वाकबगार नाहीं. असे जाबसाल होतात. परंतु वस्तभावचा अद्यापि ठिकाण नाहीं. पातशाहास दिल्लीस वाटेस लाविलीयावर मग छावणींत रिकामपणीं यांची छान करून, ठिकाण लावावें ह्मणून ऐकतों. व मथुरा वृंदावन तूर्त राजश्री पाटिलबावांचे खाजगींत आहे. तात्या फोंडेकर शेणवई, चांभारगोंदेकर यांचा पाग्या व सुतरखान्याचा दरोगा आहे. याजकडे कमाविशीनें दोन्हीं स्थळें आहेत. त्यास याजविषयीं आपलीं दोन पत्रें राजश्री सदाशिव दिनकर यांचे विद्यमानें आलीं होतीं. त्यास एका पत्राचें उत्तर पहिलें दिल्हें कीं, गोसाव्याकडे आहेत. दुसरे पत्राचें उत्तर दिल्हें कीं, धर्मादायाखालें दोन्हीं स्थळें दिधलीं. ह्मणून वर्तमान राजश्री सदाशिव दिनकर यांचे मुखें ऐकिलें. त्याजवरून आह्मीं तें पत्र आपलेपाशींच ठेवून घेतलें आहे, आणि कोठें उल्लेखही केला नाहीं. सदाशिव दिनकरासीं दोन वेळां नकार निघाला. तेव्हां आह्मांकडे सरकारचें पत्र यांस आलें आहे, ह्मणून सदाशिव दिनकराशीं देखील बोलिलों नाहीं. पुढें कांहीं यांची मर्जी काबू तशी असली, तर पत्र दाखवून उत्तर देतील तें घेऊन पाठवूं. नाहीं तर आपण आज्ञा करतील त्याप्रमाणें करूं. आपण लिहिलें कीं, आपलें अंग न दाखवितां काम होत असल्यास करून घ्यावें; ह्मणून पत्र तैसेंच ठेविलें आहे. पुढें आज्ञा येईल तैसें करूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६७.

श्री. मे इ. स. १७८६.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- इंद्रसेन साहेब इंग्रेज वकालतीवर पातशाहापासीं व राजश्री पाटिलबावांपासीं होता. त्यास, त्यांजकडून सलाउद्दीनखान व मौलवी फकरोद्दिन हे दोघेजण दरबारास जाबसालास नित्यानीं येत होते. त्यास त्यांनीं कांहीं इंग्रेजां कडील भेदाच्या गोष्टी यांसीं बोलिले. तें वर्तमान इंद्रसेनास कळलें. त्याजवरून सलाउद्दिखानास व मौलवी फकरूद्दीस दूर केलें. त्या दोघांस राजश्री पाटील-साहेबीं आपले पार्शी ठेविलें. ह्मणून व जुवाबख्त पातशाहाजाद्यास आग्रीयाचा किल्ला व सुभेदारी द्यावी आणि त्यास आणून आग्रीयांत दाखल करावें, ह्मणून इंद्रसेनाचे मार्फत जाबसाल होतो. ते गोष्ट कांहीं प्रत्ययास न आली. ह्मणून रागास येऊन, लष्करांतून कूच करून आग्रीयास जाऊन राहिला आहे. त्यास राजश्री पाटील-बावा त्याचे डेरीयास समजावयासही गेले होते. त्यानें यांस सांगितलें कीं, "मी कूच केला ह्मणून हापड साहेबास लखनौस व बडेसाहेबास कलकत्यास लिहिलें आहे. आतां मजला रहातां येत नाहीं. आग्रीयास जाऊन रहातों. मग तिकडील आज्ञा आली तर माघारा येईन. नाहीं तर पुढें कूच करून जाईन." ह्मणून बोलणें होऊन येथून कूच करून गेला आहे. आग्रीयांत आहे. पुढें वर्तमान आलीयावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १६८.

श्री. २१ जून इ. स. १७८६.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, भंगासिंग व कर्मसिंग वगैरे शीख पांच हजार फौजेनशीं यमुना उतरून गोसगड प्रांतीं दोन चार गांव ताख्तताराज केले. नंतर अंतरवेद प्रांतीं मेरठ हापड वगैरे येथील रखी घेऊन गडमुक्तेश्वर दरोबस्त लुटून नेलें. व जमीदार गुजर मिळोन त्या प्रांतीं दुंडी केली आहे. शाहद्र्यापावेतों दिल्लीहून दोन कोस मार्ग चालत नाहीं. हल्लीं रवळोजी शिंदे यांची आवाई व शाहनिजामुद्दीन दिल्लीस पावल्यावर कांहीं शीख यमुना पार उतरून गेले, व शिखांचे सरदार कर्मासिंग वगैरे अद्यापि गोसगड अंतरवेदप्रातीं मुक्काम करून आहेत. बापुजी मल्हार व देवजी गवळी दोन तीन हजार लोकांनिशीं गोसगड नजीक थान्यास मुक्काम करून आहेत. नित्य करोलीची लढाई होते. परंतु

शीख व गुजर मिळोन जमात भारी, ह्मणून अद्यापि मुकाबिला जाला नाहीं. खळोजी शिंदे यांजबरोबर रणजीतसिंग जाटाकडील एक हजार लोक स्वार प्यादे मिळोन आहेत, व दोन पलटणें एकूण दोन अडीच हजार फौज व तोफा व आठ दहा बरोबर आहेत. परंतु गडमुक्तेश्वर लुटल्याची आंवाई श्रवण करून, अद्यापि हातरस नजीक मथुरेहून चौदा कोसांवर मुक्काम करून आहेत. नवाब नाजर यास राजश्री पाटिलबावांनीं शहाकडे पाठविलें आहे. त्यास पातशाहाची मर्जी आहे कीं, मशारनिल्हेस जिवें मारावें. परंतु शहाजींनीं रदबदली बहुत केली कीं, अन्नवस्त्रें देऊन कैदेंत ठेवावें. त्यास हजरताचे मर्जीनुरूप घडेलसें वाटतें. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ २ सवाल सन सब्बा संमानीन श्रावणमास शु॥ ३

लेखांक १६९.

श्री.

२१ जून इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २४ माहे साबान मुक्काम डीग जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ ११ रज्जबीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वर्तमान कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहा व राजश्री पाटिलबावा जयपूरचा मामला फैसल करून मुक्काममजकुरीं आले. येथून छ २५ मिनहूस पातशाहास छावणीस दिल्लीस मार्गस्थ करणार. व आपण येथून कूच करून मथुरा वृंदावनासमीप जाऊन छावणी करावी; तमाम फौज पथकें पार अंतर्वेदींत पाठवून मुंडसानचा किल्ला व खुर्जापाशीं याकूबखान याचा किल्ला आहे तो, एकूण दोन्हीं स्थळें जमीदाराकडे आहेत ते मवासी करितात, याजकरितां त्यांस खारीज करून, सरकारचा बंदोबस्त करावा; याप्रमाणें मानस आहे. व इंद्रसेन साहेब इंग्रेजांकडील वकील रुसून आग्रीयास गेला होता. त्यांस सदाशिव मल्हार वकील, यांजकडून इंग्रेजाकडील जाबसाल करितात, त्यास पाठवून मशारनिल्हेस समजावून आणिलें. ते छ २१ तारिखेस लष्करांत डिगेचे मुक्कामीं दाखल जाले. वरकड वर्तमान पु॥ पत्रावरून व पारसी एकबारावरून कळूं येईल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७०.

पै॥ छ जिल्काद सन सब्बा
भाद्रपदमास.

श्री.

२३ जुलई इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ २६ माहे रमजान मुकाम श्री मथुरा जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं इकडील बारीक मोठें वृत्त सविस्तर छ २४ माहे साबानीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पावून श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी पातशाहा दिल्लीस आहेत. राजश्री पाटिलबावा मुक्काममजकुरीं छावणी करून आहेत. जयपुरकराकडे व खोपरकराकडे वगैरे जिकडून ऐवज सरकार खंडणी पैकीं येणें, तिकडे तगादे करून आहेत. तूर्त नवी मसलत कांहीं नाहीं. बादबरसात जे मसलत ठरेल ते लिहूं. सुभ्यापाशीं याकुबगड ह्मणून आहे त्यास, व रेवाडीचा गोकुळगड त्यास मोर्चे, फौजा पाठवून लाविले आहेत. अद्यापि खालीं जाले नाहींत. वरचेवर तोफखाना व दारूगोळा सरजा रवाना होत आहे. मास पक्षांत खालीं होऊन सरकारखालसा होईल, ऐसें आहे. वरकड वर्तमान पारसी एकबारा पाठविल्या आहेत, त्यांवरून पातशाहाचे दरबारचें व राजश्री पाटिलबावांचे दरबारचें वृत्त कळूं येईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७१.

पा॥ छ १५ जिल्हेज

श्री.

१ सप्टेंबर इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ७ माहे जिलकाद मुक्काम श्री मथुरा जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः- इकडील वृत्त पेशजीं छ २३ माहे रमजानीं विनंति पत्रें पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहा दिल्लीस आहेत. राजश्री पाटिलबावा मुक्काममजकुरीं आहेत. रामगडाकडे फौज गेली आहे, ते रामगडाचे आसपास कोस कोसांवर मुक्काम करून आहेत. अद्यापि मोर्चे लाविले नाहींत. अफराशाहाबखान याचा भाऊ जहांगीरखान रामगडांत आहे. त्यानें लखनौस वजीराकडे व हापड साहेब फिरंगी यांजकडे, राजे दयाराम किशमेरी ब्राह्मण मातबर माणूस आहे, त्याज समागमें पत्रें पाठविलीं आहेत; आणि सांगून पाठविलें आहे कीं, "श्रीगंगेअलीकडे हिंदूंचें

राज्य जालें, मुसलमानी बुडाली. आह्मीं आजपावेतों मुसलमानीचा तगमा जतन करून आहोंत. आमची कुमक करितां तर उत्तम आहे. नाहीं तर आह्मांस सुचेल त्याप्रमाणें करूं." ह्मणून सांगून पाठविलें आहे. त्याचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. याप्रमाणें वर्तमान श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक. १७२.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— किर्कपह्यासू पाद्री साहेब इंग्रेज, लाट कलफदानस सितैन साहेब यांजकडून कलकत्त्याहून बदली, इंद्रसेन साहेब इष्टिनाकडून राजश्री पाटिलबावांपासीं वकालतीस होता, त्याची बदलीस आला. त्याचा सन्मान, हत्ती व घोडा व जेगा व शिरपेंच, मोत्यांची कंठी, सात किस्ती वस्त्रें येणेंप्रमाणें देऊन बहुमान केला. समागमें इंग्रेज तीन असाम्या, त्यांस चार चार पारचे वस्त्रें; व आणिक समागमें चार मुत्सद्दी, त्यांस दुशाले व पागोटीं चार दिधलीं. तिसरे रोजीं राजश्री पाटिलबावा इंग्रेजमजकुराचे डेरियास गेले. त्यांनींही सदर्हूप्रमाणें हत्ती, घोडा, मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच व सात किस्ती वस्त्रें व फिरंगी दोन पेटिया व कांहीं इंग्रेजी घड्याळ वगैरे सरंजाम देऊन बहुमान केला. समागमें लष्करांत होते. हल्लीं दिल्लीस आले आहेत. अद्याप पातशाहाची मुलाजमत जाली नाहीं. मुलाजमत जालियावर सविस्तर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७३.

श्री. इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

मुरादबेग मोंगल हजार स्वार व दोन पलटणेचा सरदार नजबखानाकडील होता. त्याजकडे कृष्णगड पातशाही किल्ला व दरोबस्त मेवात त्याचे सरंजामांत होते. तो राजश्री पाटिलबावांसमागमें चाकरी करीत होता. त्याजकडून कृष्णगड व मेवातची मामलत दूर करून, नौबतराय खत्री आग्रेकर यांजकडे सांगितली. पुढें मासपक्षांत तिकडील मेवातचा बंदोबस्त जाला ह्मणजे दिल्लीकडे येऊन शिखांवर दबाव द्यावा ऐसी मसलत आहे. दिल्लीपासून तिसां कोसांवर पलवले पलिकडे मुक्काम करून आहेत. पुढें अमलांत येईल, ते विनंति लिहूं.

राजश्री गणपतराव कृष्ण यांजकडे प्रगणे मेरट वगैरे बत्तीस महालांची मामलत आहे. त्यास मेरटकडे शिखांचा हंगामा. याजकरितां मेरटहून कूच करून बागपतास यमुनातीरीं आले आहेत. समागमें हैबतराव फाळके वगैरे सरकारची फौजही आहे. त्याचे मुकाबल्यास चार हजार स्वार डलेवाले ह्मणून एक जथा शिखांचा आहे, ते आपले जमावानिशीं आले आहेत. अद्याप लढाई जाली नाहीं. युद्धप्रसंग जालियावर मागाहून विनंति लिहूं.

जयपुरकराकडे खुशालीराम ब्राह्मण कारभारी होता. त्यानें सालगुदस्तां राजश्री पाटिलबावांकडे येऊन जयपूरचा मामला केला. त्या मामल्याचे ऐवजाचा फडशा होऊन, बाकी दहा लक्ष रुपये राहिले. त्याचा निकाल कांहीं जाला, कांहीं न जाला. सबब जयपुरकरांचे महाल रायाजी पाटलासमागमें फौज देऊन जप्त केले. रावराजा प्रतापसिंग व खुशालीराम एक विचारें होऊन, राजश्री पाटिलबावांचे ममतेंत रायाजी पाटलासमागमें आहेत. हें जाणून, राणावत ह्मणोन रजपूत जयपुरकरांकडील सरदार आहेत, त्यांजकडे राजानें सांगोन पाठविलें कीं, तुह्मांकडे मामल्यास रायाजी पाटील बमय फौज येतील. त्या मामल्याचे बोलण्यांत खुशालीरामास कैद करून, मारून टाकणें. त्यावरून मशारनिल्हेस मारून टाकलें. जोधपुरकर व जयपुरकर एकविचारें आहेत. पुन्हां राजश्री पाटिलबावांची स्वारी जयपुराकडे गेली, तर बिघाड करावा या लक्षांत आहेत. ह्मणोन श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. रायाजी पाटील जयपुरकरांच्या एक्या गढीवर चढून गेले. तेथें हल्ला करितांनां सातशें माणूस मारलें गेलें. गढी हातांस आली नाहीं. जयपुरकरांचा दबाव रायाजी पाटिलावर विशेष आहे, ह्मणोन पत्रें राजश्री पाटिलबावांकडे आलीं होतीं. पुढें विचार ठरेल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७४.

श्री. इ. स. १७८६.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. या दिवसांत पातशाहापासीं मुख्त्यार नाजर मंजूरअलीखान आहेत. यांनीं वीस हजार स्वार प्यादा चाकर ठेऊन, आपली बाजी शेर केली कीं, राजश्री पाटिलबावांस दिल्लींत येऊं न दिल्हें. ते रेवाडीस येऊन, येथील रंग पाहून माघारा अजमेरीचे रोखें कूच करून गेले. पुढें तिकडल्या वाटेनें डिगेकडे, ढवळपूर बाडीकडे, आगऱ्याचे रोखें चमेल अलीकडे राहावें, या

विचारावर माघारा इकडून कूच करून आले आहेत. त्यास येथें शिबंदीचा हंगामा पातशाहाकडील ! कोणास भक्षावयास देत नाहींत. दोन तीन लक्ष रुपयांचें रुपें, कांहीं पलंग व कांहीं तार्टे वाट्या, कांहीं फरासी पंखे यांच्या दांड्या वगैरे जिन्नस रुप्याचा होता, तो दिल्हा. पुढें पैसा एक देत नाहींत. ह्मणून नाजरची व पातशाहांची चित्तशुद्धता नाहीं. त्याजवरून नाजरजींनीं गुलाम कादरखान यासीं संधान लाऊन आपला एकोपा केला, आणि परस्परें एकवाक्यता जाली. व तहनामा जाला कीं, पातशाहीची मुख्त्यारी तुह्मीं करावी. याप्रमाणें तह ठरला आहे. परंतु या गोष्टीस पातशाहा राजी नाहींत. ह्मणोन खैरून्निसा पातशाहाची बहीण धाकटी आहे, तिचे दोघे पुत्र बहुत काबील व शाहाणे आहेत. त्यांचें वय पंचविसातिसा वर्षांचें आहे. त्यांतून एकास पातशाहा करावें व बारा लक्ष रुपये फौजेचे खर्चास द्यावे, ह्मणोन करारमदार ठरला आहे. जर पातशाहांनीं दबून फौजेस खर्चास दिल्हें, अथवा हेच फौज घेऊन बाहीर निघाले, आणि मुलुख जबरदस्तांनीं दाबला आहे तो सोडून फौजेस सरंजाम लाऊन दिल्हा, तर उत्तम. जर ह्या दोन्ही गोष्टींतून एकही गोष्ट पातशाहांनीं न केली, आणि सुखावर दृष्टि देऊन दिल्लींतून न निघाले, तरी यांस कारागृहीं घालून खैरुन्निसाचे एका पुत्रास पातशाहा करावें, ऐसी सल्ला ठरली आहे. गुलाम कादरखान रोहिला याजपासीं तूर्त रोहिले वगैरे हिंदुस्थानी फौज वीस पंचवीस हजार स्वार प्यादा जमा जाला आहे. व नाजरजीची व खानमजकुराची एकवाक्यता होऊन शपथ प्रमाण कुराण जालें आहे. हें वर्तमान सविस्तर पातशाहांस समजलें. त्याजवरून पातशाहांनीं जुवाबक्ष शाहाजाद्यास आगरियास पैदरपै भले माणूस व खवास पाठऊन, पातशाहाजादा जुवाबक्ष यास आपलेपासीं बोलाविलें; आणि आगरियाचे सुब्याचीं सुभेदारीचीं वस्त्रें दिधलीं. आणि जितकी फौज नाजरजीहीं ठेविली होती, तितकी कुलपांत शाहाजाद्याचे ताबीन केली. आणि आज्ञा केली कीं, "जो मुलुख पातशाही खालसा आहे, तो दरोबस्त फौजेचे सरदारांस सरंजामांत लाऊन देणें. कांहीं लोक राहतील, त्यांस तूर्त नगदी देऊन बाहीर निघावें. मीही समागमें निघतों. जो मुलुक मुफसदांनीं घेतला आहे, त्याचें पारपत्य करून, मुलुख सोडवून, जे नगदीचे लोक राहतील त्यांस द्यावा." याप्रमाणें सल्ला ठरली आहे. हें वर्तमान गुलाम कादरखान यांनीं ऐकून, कूच करून शिकंदरा व खुर्जा शिकारपूर वगैरे ठाणीं बसवीत, रामगड कोलेकडे गेला आहे. पातशाहाजाद्याची मर्जी आहे कीं, अवघी यवनमंडळी मिळून राजश्री पाटिलबावांस चमेली पार करून द्यावें. मग गुलाम कादरखान याचें पारपत्य करून,

याजकडे मुलुख आहे तो सर्व सोडवून घ्यावा. ऐसे दोन विचार आहेत. परंतु पातशाहाची मर्जी आहे कीं, राजश्री पाटिलबावांस खारीज न करावें. प्रथम रोहिल्यास खारीज करून, याचा मुलुख हाताखालें घालून, मग जें करणें तें करावें. ह्मणोन पातशाहांची मर्जी आहे. परंतु घडल्यांत येईल तें खरें. मसलती व सल्ला बहुत करितात. परंतु एकही गोष्ट ठरून अंमलांत येत नाहीं. पुढें प्रत्यास येईल, ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७५.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:– आपण छ० ९ जमादिलाखरचें पत्र पाठविलें, तें छ० ४ माहे रज्जबीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. इकडील वर्तमान तरी, टिपू तुंगभद्रापार दक्षिणतीरीं गेला. सरकारची फौज तुंगभद्रा अलीकडे उत्तरतीरीं तीन मजलीवर आहे. सलूखाचें बोलणें टिपूकडून लागलें आहे. अद्यापि ठराव जाला नाहीं. त्याचा कारभार लबाडीचा आहे. विश्वास नाहीं. घडेल तें लिहिलें जाईल. विलायती मेव्याचा मजकूर लिहिला तो व बेदाणा अनार तीस पाठविले ते पावले. जिकडील तिकडे प्रविष्ट जालें. आणिक विलायती मेवा येईल त्याची बातमी राखून पाठवावा, तर मेवा पाठवावयाचा होता. मग कांहीं नासता, कांहीं चांगला रहाता." ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास येथें पुण्याची एकबारेचें वर्तमान वरचेवर पंधरावे सतरावे रोजीं राजश्री पाटिलबावांचे येथें येतें. त्यांत वर्तमान ऐकिलें कीं, टिपूची मामलत होऊन, सरकारच्या फौजा ज्येष्ठ वद्यांत पुण्यास दाखल होणार; ह्मणून श्रवणांत आलें. विलायती मेव्याविसीं आज्ञा. त्यास, कांहीं चांगला पोंचला, कांहीं नासला. इतका विश्वास मेवा फरोशाचे सांगितल्यावरून पुरला. याजकरितां अंतर पडलें. अतःपर कार्तिक मार्गशीर्ष मासीं मेवा येईल, तो माघमासीपावेतों वरचेवर एक दोन वेळां येत असतो. त्यास आज्ञेप्रमाणें जसा बनेल, तसा मेवा पाठवून देऊं. परंतु अंतर करणार नाहीं. यावेळेस तरी मेवे फरोशाचे बोलण्यावर चूक पडली. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १७६.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– पृथ्वीसिंगाचा पुत्र मानसिंग यासही कृष्णगडीहून आणून बगलेंत रावराजाचे विद्यमानें घेतला आहे. व राजे प्रतापसिंग यांजकडील कारभारी खुशालीराम बोहरा व बालानंद महंत हेही रावराजापासीं येऊन हजर जाले आहेत. व बोलतात कीं, राजश्री पाटिलसाहेब जे आज्ञा करितील, ते आह्मांस मान्य आहे. ह्मणून राजानें सांगून पाठविलें आहे. व येणेंप्रमाणें उभयतांनीं राजाकडून पत्र देखील लिहून दिल्हें आहे कीं, जे राजश्री पाटिलसाहेब आज्ञा करितील ते मान्य. व यांनीं मुक्काम मजकुरीं येऊन, तमाम जयपुरप्रांताच्या जप्त्या करून, आपले सरकारचे कारकून पाठवून, ठाणेबंदीचा बंदोबस्त केला, व करीत जातात. पुढें एका दों रोजां रावराजा भेटीस जाबसालास येणार. तो आलियावर जिकडून पैका सरकारांत अधिक येईल, तिकडे राजाची स्थापना होईल ऐसा विचार आहे. घडल्यांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७७.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– मिर्जा रहीम बेग यांजकडे पेशजीं मंडीसर व अजमेर हे दोन किल्ले व त्यांजखालील परगणे, तेथील मामलत दरोबस्त मशारनिल्हेकडे होती. हल्लीं डीगचा किल्ला व डिगेखाले परगणे आहेत ते दरोबस्त राजश्री लक्ष्मणराव हरी पाऱ्होळकर यांजकडून दूर करून मिर्जाकडे सांगितली. व लक्ष्मणराव हरी यांचे फाजील डिगेसंबंधीं चाळीस हजार रुपये निघाले. ह्मणून त्यांजकडे खुर्जा व मलकपूर आहार व सिकारपूर व चंडो....वगैरे सात महाल सालगुदस्तां जो आकार जाला त्याजवर दिढी चढ घालून, रावमजकुराकडे साल हालापासून मामलत सांगितली. सालगुदस्तां हरीबा बाजीचे चिरंजीव, गोपाळराव हरी, यांजकडे हे महाल होते. त्यांच्यानें महालाचा बंदोबस्त होऊन पैक्यास ठिकाण न लागे, ह्मणून त्यांजकडे पैक्याचा तगादा आहे. व हे सात महाल यांजकडून दूर करून लक्ष्मणरावजीकडे सांगितले. याप्रमाणें वृत्त जालें. आपणांस कळावें ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७८.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– बखतावरसिंग, रावराजाचा पुत्र, अलवारचे किल्ल्यांत बंदोबस्तें-करून आहे. रामसेवक दिवाण यासीं व जीवनखान होशदारखानासीं पहिल्यापासून चित्तशुद्धता नाहीं. रावराजा मृत्यु पावल्यावर सांप्रत काळीं राणीचे अनुमतेंकरून जीवनखानांनीं रामसेवक दिवाण यास कैद करावेंसें केलें होतें. त्याजवरून मशारनिल्हे जयपुरास पळून आला. त्याची सरंजाम जीवनखां व राणींनीं जप्त केला. दिवाणमजकुरांनीं राजश्री पाटिलबावांस पत्रें पाठविलीं कीं, मी आज्ञेप्रमाणें फौज घेऊन रेवाडीस जाणार होतों. इतक्यांत ऐसा प्रकार फितुराचा घडला. तात्पर्य, रावराजाचे घरांत आपसांत कलह बहुत जाला आहे. जयपुरकरांचा मामला ठरल्यावर काय जाबसाल रावमजकुराचे मुलुखाचा ठरेल, तें प्रत्ययास आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. अंतर्वेद प्रांतीं शिखांनीं बहुत उपद्रव केला होता. इतक्यांत रवळोजी शिंदे पांच सात हजार फौजेनिसीं दरकूच हापडास आल्यानें दरोबस्त शीख हिरासा होऊन, यमुनापार पानिपताकडे गेले. मालियत बहुत नेली. देवजी गवळी व बापू मल्हार वगैरे आठ हजार फौजेनें त्यांचे मुकाबल्यास गेले आहेत. शिखांचा विचार आहे कीं, रब्बीचे हंगामांत पुन्हां अंतर्वेद प्रांतीं येऊन, रखी दुसाला घ्यावी, ऐसी अवई आहे. राजश्री रवळोजी शिंदे किराण्याचे नजीक मुक्काम करून आहेत. जोधपुरकरांचा सलूख ठरल्याचें वृत्त सर्वांनीं श्रवण करून जमीदार मवास वगैरे भयभीत आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्ययास येईल, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १७९.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:– येथें पातशाहाचे व राजश्री पाटिलबावांचे येथें एकबारांत लखनौहून वर्तमान आलें कीं, टिपू सुलतान यासीं व कोणी संस्थानिक होता त्यासीं युद्ध जालें. त्या प्रसंगीं टिपूस गोळी लागून मृत्यु पावला. ह्मणून वर्तमान आहे. परंतु आपले सरकारांतून वर्तमान आलें असेल तें खरें. याजकरितां येथील पक्केंसें वर्तमान ऐसी खातरजमा नाहीं. तरी सविस्तर लिहावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति. वरकड

वर्तमान पारसी एकबारा वजिराकडील व पातशाहाकडील व पाटिलबावांकडील पाठविल्या आहेत. त्याजवरून कळों येईल. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८०.

श्री.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसी जे:—राजश्री अंबाजी इंगळे यांसीं पानिपताकडे शिखांचे बंदोबस्तास पाठविलें होतें. त्यास शिखांची धूमधाम मेरट प्रांतीं रखीची आहे. तो बंदोबस्त इंगळे मजकुराच्यानें अद्यापि जाला नाहीं. परंतु हल्लीं सरकारचीं पत्रें गेलीं आहेत कीं, तिकडील बंदोबस्त करून, कांहीं फौज पलटणें तिकडें ठेवून, तुह्मीं आह्मांपाशीं लष्करांत येणें. ह्मणून पत्रें गेलीं आहेत. त्याजवरून राजश्री शामराव आपाजी यांजसमागमें दोन पलटणें व पांचशें स्वार व गुलाम कादर जाबेतखानाचा पुत्र, याप्रमाणें जमाव पानिपताकडे ठेऊन, राजश्री अंबाजी इंगळे लष्करांत येणार. याप्रमाणें वृत्त आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८१.

श्री. इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. येथील प्रकार तर हिंदुस्थान निक्षत्री जालें. शीख आहेत, त्यांत फूट आहे. कोणी कोणाचें स्वाधीन नाहीं. तदबाव पडल्यास जमीदारी करावयासही लागतील जर जबरदस्ती न पाहिली, तर लुटींत फिरतच आहेत. हें शिखाचें वर्तमान आहे. वजिराचा प्रकार ह्मणावा, तर इंग्रेजांवर त्याची दवलत आहे. त्यास सांप्रत्य इंग्रेजांचा प्रकार हलका दिसतो. हिस्टीन विलायतेस गेला. त्याचे बदली बडेसाहेब ह्मणून आले आहेत. त्याचा बंदोबस्त हिस्टनाप्रमाणें नाहीं. व खजानाही पूर्ववत्प्रमाणें नाहीं. परंतु पहिली फरपट चालत आली आहे, त्याजप्रमाणें कारभार चालतो. व पातशाहाचा प्रकार ह्मणावा, तरी एक लाख तीस हजार रुपये दरमाहाचा चाकर आहे. तितका पैका अक्षत मरीट मिळाला ह्मणजे त्यास एका गांवाशीं व बिघाभर जमीनीची गरज नाहीं. याप्रमाणें हिंदुस्थानची अवस्था आहे. त्यास अवघे हिंदुस्थानचे बंदोबस्ताचें ओझें एकल्या राजेश्री पाटिलबावांवर आहे. जितका

बंदोबस्त यांचे जीवेंकडून जातीनें करणें तो केला आहे. व करावयाचा तो करितात. परंतु यांचे पदरीं कोणी माणूस नाहीं कीं, यांचे सरदारीचा पडदा राखून, मुलकी बंदोबस्त करून, पैका उत्पन्न करून दौलत सांभाळीसा माणूस नाहीं. याजकरितां स्वामींस सूचनार्थ विनंति लिहिली आहे. जो प्रकार दृष्टीनें पाहिला आणि प्रत्ययास आला आहे, ऐसें जाणून विनंति लिहिली आहे. पुढें उत्तम जाणतील, तें करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८२.

श्री. इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–


विनंति ऐसीजे:–राघोगडवाल्यास बहादारीनें किल्ल्यांतून खंडोजी इंगळे व रामजी पाटील जाधव व महंमद बेग हमदानी यांनीं सरंजामसुद्धां काढलें; ह्मणून वर्तमान आलें. त्यावरून राजश्री पाटिलबावा रागास बहुत आले कीं, लाखों रुपये खर्च होऊन, त्यास बहादारीनें काढून, त्यासीं पगडीबदल भाऊपणं करावयाचें प्रयोजन काय? त्याजवरून येथून राजश्री अंबाजी इंगळे यांची रवानगी केली आहे कीं, त्यास मारून टाकावें. नाहीं तर धरून आणून ग्वाल्हेरचे किल्ल्यावर टाकावें. येणेंप्रमाणें बोलणें करारांत येऊन, राजश्री अंबाजी इंगळे यांस राघोगडास रवाना केलें आहे. पुढें वर्तमान येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १८३.

श्री. इ. स. १७८६.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– जुफकारखान खानजादा अल्लीनगर ह्मणून जागा डिगेसमीप दोन लक्षांची त्याजकडे होती. त्यास त्याजकडून दूर करून, अल्लीनगरीं सरकारचें ठाणें बसविलें. आणि त्याचे कुटुंबास भक्षावयास आडिंग ह्मणून एक जागा पथानीयाचे परगणीयाची आहे. त्यापैकीं पंधरा हजाराची कमाल जमेचीं खेडीं लावून देऊन, त्याचे कुटुंबास रहावयास गोवर्धनीं आपले कमाविसदारांस सांगून, एक हवेली रहावयास खाली करवून देविली. आणि त्याचे घरचे शें दीडशें घोडे व तीन हत्ती आहेत, त्यांस सिलेदारीनें चाकर ठेऊन त्याचें



निजामउद्दीन अवलियाची कबर.

(जुनें चित्र.)

चालवावें. येणेंप्रमाणें करारमदार होऊन, अलीनगर खाली करवून, आपला अंमल केला. कळावें ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८४.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- अनुपगीर गोसावी मकनपुरासमीप मुक्काम करून होता. तेथून असफदौला वजीर यांजकडे जाबसाल लावून, आपली चाकरी करारमदार करून त्याची भेटी घेतली. सात पारच्यांचा खिलत व हत्ती व घोडा, मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच याप्रमाणें बहुमान करून, इलमासखान अंतर्वेदीचा इटावे वगैरेचा कमाविसदार आहे, त्याजवर यांचे दरमहाची खर्चाची नेमणूक करून दिधली ह्मणून वर्तमान ऐकिलें. व त्याचा भाऊ उमरावगीर यानें दोन चार हजार माणूस जमा करून, सरकारचे महाल डभई वगैरे आहेत तिकडे धूमधाम करून, सरकारचीं ठाणीं उठवून देऊन, आपलीं ठाणीं बसविलीं होतीं. त्यास देवजी गवळी वगैरे फौज राघोगड फत्ते करून आली होती, त्यास उमराव गिरावर पाठविलें. त्याचें यांचें सातां कोसांचें अंतर होतें. फौज आली, हें वर्तमान उमरावगिरानें ऐकतांच पळून श्रीगंगापार गेला. तोही अनुपगिरापाशीं लखनौस जाणार. त्यास देवजी गवळी यांनीं डभई वगैरे परगणियांत सरकारचे कमाविसदारांचा बंदोबस्त करून देऊन, सरकारांत पत्रें पाठविलीं. त्यावरून आज्ञा जाली कीं, याकुबखान खुर्जेवाला यास गढीसमोर चकवून सरकारचें ठाणें बसविणें. त्याजवरून देवजी गवळी व विठोजी शिंदे कूच करून, खुर्जास मोर्चे लाविले आहेत. तेही जागा मासपक्षांत खाली होऊन, सरकारचा बंदोबस्त होईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८५.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— जोधपुरकरांकडील वकील डिगेचे मुकामीं येऊन जोधपुरचा मामला तीन लक्षांचा केला. त्यापैकीं नख्त पन्नास हजार रुपये हुंडी देऊन, बाकी अडीच लक्ष रुपये राहिले; त्याचा करार केला कीं, अखेर चैत्रमास-

पावेतों बेबाकी करून देऊं. ह्मणून लिहिलें होऊन, राजश्री पाटीलबावांनीं वकिलास आज्ञा केली कीं, "जयपुरकरांचा आमचा बिघाड. त्यांचें पारिपत्य करणें आह्मांस अगत्य आहे. आह्मी तिकडे पातशाहासुद्धां कूच करितों. त्यास तुह्मीं जयपुरकरांस शामील न व्हावें ह्मणून शपथपूर्वक आपले धन्याचें पत्र आमचे नांवें आणून द्यावें." ह्मणून आज्ञा केली. त्याजवरून वकिलांनीं जोधपुरीं लिहून पाठवून उत्तर आणून दिल्हें कीं, आह्मी जयपूरकरास शामील होणार नाहीं. याप्रमाणें श्रवणांत आलें, त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८६.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- राजे बदुरीनाथ ठाकोर, नवाब निजाम अल्लीखान यांजकडील वकील, यांचे मार्फत रमजानचे इदीबद्दल नजर मोहोरा सुमार एकशें एक नवाबांनीं पातशाहांस पाठविल्या होत्या. त्याची रसीद व नवाबांस इदेबद्दल वस्त्रें पावलीं नव्हतीं ह्मणून राजश्री बदरीनाथ यांनीं, राजश्री बाबाराव वकील नवाबांकडील निंबाळकरांचे निसबतीचा गृहस्थ येथें आहे, त्यांचे विद्यमानें राजश्री पाटिलबावांस विनंति करून, नजरची रसीद व सात पारच्यांचा खिलत व ढाल तरवार येणेंप्रमाणें सरंजाम, पातशाहाचा शुका नवाबांस व राजश्री पाटिलबावांचीं पत्रें, येणेंप्रमाणें घेऊन, यांनीं आपले चिरंजीव देवरावनामें आहेत, त्यांजसमागमें रवाना नवाब निजाम अल्लीखान यांजकडे केले आहेत. व यांचे बंधु मुकुंदराव हरकारे व पुतणे जगजीवनराव हे दोघेही जण, दोन वर्षांत पितापुत्र मृत्यु पावले; याजकरितां यांचे जहागिरीचाही पैका गुमास्ते कांहीं खर्चास पाठवीत नाहींत. त्याचाही बंदोबस्त करून घेतला पाहिजे. ह्मणून............समागमें नवाबांसही पातशाहाकडून वस्त्रें........करून तिकडे आले आहेत. त्यास, हें वर्तमान आपल्यास कळावें ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक १८७.

श्री.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- पतियाल्याकडील वर्तमान आलें कीं, आला जाटाचा नातू

साहेबसिंग यासीं व त्याचे घरचा बक्षी फौजेचा होता त्यासीं फौजेचे हजिरीगणतीकरितां कटकट जाली. त्यास बक्षीमजकुरानें साहेबसिंगाचे तोंडांत मारली. तो रडत आपले मातुश्रीपासीं गेला, आणि बहुत आक्रोश केला. त्याजवरून मातुश्रीनें आज्ञा केली कीं, त्यास कैद करा. त्याजवरून बक्षीस कैद केलें. त्याचे भाऊबंद होते, त्यांजकडे चार किल्ले मातबर होते. त्यांनीं हें वृत्त ऐकून भगेलसिंग व रायसिंग डलेवाले वगैरे शिखांचे स्वाधीन किल्ले केले. याकरितां जयसिंग कन्हय्या वगैरे शीख सतलूज पलीकडील आहेत, ते साहेबसिंग जाटाचे सोयरे आहेत. त्यांस बोलावूं पाठविलें आहे. त्यास, जे शीख इकडे अंतर्वेदींत धांवत होते, ते तमाम जमा होऊन पतियाल्याकडे जाणार, ह्मणून वर्तमान आहे. अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८८.

श्री. इ. स. १७८६.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री गोविंदराव कृष्ण यांचे चिरंजीव गणपतराव गोविंद यांजकडून उदेपुरचा मामला दूर करून लालाजी बल्लाळास सांगितला. ह्मणून त्यांजकडील जिवाजी मोरेश्वर कारभारी त्यांस राजश्री धारराव शिंदे यांची दिवाणगिरी सांगितली. आणि गणपतरावाचे घरचे दोन तीनशें घोडे पागेचे आहे, त्यांची कांहीं सोय नाहीं ह्मणून शिलेदारानें पागाची बोली करून, राजश्री धारराव यांचे तैनातीस राजश्री गणपतरायाकडील सरंजाम द्यावा याप्रमाणें करारमदार ठरला आहे. ते अद्यापि सरंजामसुद्धां उदेपुरीहून आले नाहींत. लष्करांत आलियावर अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १८९.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे।– उदेपुरची मामलत राजश्री लालाजी बल्लाळ यांजकडे सांगितली. त्याजवरून उदेपुरकर राणा यांजकडून त्यांचा मुनसी व कारभारी आले आहेत. हे विनंति करितात कीं, "लालाजी बल्लाळांसीं व आह्मांसीं आकस आहे.

त्याजकडे आपण आह्मांकडील मामलत सांगावयाचें प्रयोजन काय? श्रीमंत पंतप्रधान स्वामींचे दीडलक्ष रुपये सालाबादचे आहेत. ते आपण सालाबाद घेतच आहेत. व मागील खंडणीची बाकी आहे, त्यापैकीं चौथाई मुलूख आपण लावून घेतलाच आहे. त्याजवर तुह्मांकडील कमाविसदार स्वतंत्र आहेत. त्यांचा बंदोबस्त आहेच. इतकेंही असोन आमचे दुष्मनास आह्मांकडील मामलत सांगून कलहवृद्धि करावी, हा प्रकार ठीक नाहीं.'' ह्मणून विनंति करितात. ते लष्करांत आहेत. अद्यापि कांहीं जाबसाल ठरला नाहीं. जो कारभार केला आहे, तोच करार आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक १९०.

श्री. इ. स. १७८६.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:-राजे प्रतापसिंग शहरांत आहेत. खुशालीराम बोहोऱ्यास कैद करून, दोन लक्षांची निशा घेऊन, नजरबंद ठेविलें आहे. करोलीवाली राणी राजाची स्त्री, तिनें बारा लक्ष रुपये कबूल करून, दौलतरामास कारभार सांगावा ऐसा विचार आहे. व शहरांतील लोकांसीं दाड (?) घेतला. त्यानें बहुतेक सावकार वगैरे लोक देशांतरास उठोन गेले. राजेमजकूर स्वस्थ ऐष-आराम करितात. ठाकूर पहाडसिंग फौजसुद्धां पाटणाचे अलीकडे मुक्काम करून आहे. रावराजाचे मुलुखांत दखल करून खंडणी घ्यावी ऐसा इरादा करून आहे. परंतु तिकडे पाटणवाला राव तोही जयपुरकरासीं सेखावल सुद्धां फिरून राहिले आहेत. ह्मणून राजे व कारभारी आपल्या ठिकाणीं घरचे बंदोबस्तांत आहेत. मिर्जाकडील वकिलाची बहुत खातरजमा करून ठेविलें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं.

राजश्री सुभेदारांकडील फौजेचा गवगवा होता. त्याची समजूत खाशांनीं व राजश्री पाराजीपंत यांणीं करून फौजेची रवानगी काशीबा होळकर व शरीफभाई यांजबरोबर केली. ते दरकूच मेवातचे मार्गानें दिल्लीस जातात. वाटेंत इस्माईल बेगाकडील ठाणें परगणे नुह येथें होतें. त्यास दूर करून आपला बंदोबस्त केला. व पेंढारी दिवसां दौड करून लुटतात व रात्रीं मेवाती बदला घेऊन, मार्गांत माणूस निभूं देत नाहींत. ऐसा प्रकार आहे. पातशाहांनीं व शहाजींनीं यांची आवई ऐकोन खिलताची तयारी केली आहे. दिल्लीस गेल्यावर अगोदर

पातशाहाची मुलाजमत करून, मग तेथून त्यांचे विचारें व येथील लिहिल्याअन्वयें कूच करितील ऐसा बेत आहे.

मागें बंगालीचे जमीदार हिरासा होऊन उठोन गेलियावर मिर्जांनीं गांवांची दरोबस्त जप्ती केली. गल्ला जिन्नस दों तीन लक्षांचा सरंजाम मिळाला. त्यास हल्लीं बेलदार लावून, गावांतील जिन्नस लांकडें, कड्या, सोटा वगैरे सर्व हिसार प्रांतीं पाठवितात. व हिसारचे किल्ल्यांत जकिऱ्याची तयारी होते. तात्पर्य हें कीं, भंभोखां व शीख यांसीं सूत्र करून, किल्ल्याचे आश्रयानें पतियाल्याकडे जाऊन, राजश्री बाळोजी इंगळे यांजवर मोहीम करावी, ऐसा बेत श्रवणांत आला आहे. मिर्जाचीं पत्रें राजश्री पाटीलबावा व राणेखानभाई व आबा चिटणीस वगैरे सरदारांस येतात कीं, "आह्मीं अकृत्रिम चाकरी सेवा आज्ञेप्रमाणें केली. आपण फौजेचा वगैरे खर्चाचा एकही उपराळा न करितां मसलत करून इकडील बंदोबस्त केला. आतां आपण फौजा इकडे रवाना करितां. ह्मणून अनेक कल्प येतात. मी चाकरीस हजर आहें." याप्रमाणें जाहीरदारी पत्रें येतात. त्याजवरून येथूनही खातरजमेचीं उत्तरें लिहितात कीं, मध्यस्थ आपसांत कलह लावितात. इकडून कोणेविसीं संशय न आणावा. फौजा दिल्लीकडे रवाना केल्या आहेत. याप्रमाणें परस्परें जाबसाल आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

बाराभाई वगैरे शिलेदार यांची हजेरी गणती होते. एक दों दिवसां जालियावर फौज राजश्री अंबाजी इंगळे यांजसमागमें देऊन दिल्लीकडे पाठवावें ह्मणून राजश्री पाटीलबावांनीं सर्व शिलेदार, सरदार, व बाराभाई वगैरे यांस सांगितलें कीं, तुह्मीं मशारनिल्हेबरोबर जावें. त्यावरून वाबळे वगैरे शिलेदार यांनीं उत्तर केलें कीं, इंगळे मजकुरांचे तैनातीस आह्मी जाणार नाहीं. राणेखानांचे तैनातीस हजर आहों. याप्रमाणें स्पष्ट बोलणें जालें. त्यास हजीरी होऊन काय ठरेल, तें सेवेसीं विनंति लिहूं. हे विनंति."

लेखांक १९१.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:- कलकत्त्यास मदराज बंदराहून वर्तमान आलें कीं, हैदरनाईकाचा पुत्र मदराजचे किल्ल्यापासून पंधरा कोसांवर मुक्काम करून आहेत. तमाम आसपास मुलूख जाळून ताराज केला आहे. मदराजचे शहरांत महा-

गाई फार आहे. व फुलचेरीहून पंधरा सरदार फरासीसांकडून चाकर रहावयास आले आहेत. त्यांस चाकर ठेवून, आपले लष्करांत दंवडी फिरविली कीं, फरासीसांकडील लोक सवद्यासुतास वगैरे लष्करांत फिरतील, तर त्यांस मुजाहीम न होणें. ह्मणून ताकीद जाली. याप्रमाणें वृत्त श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९२.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– रघोजी आंग्रे सरखेल यांचे येथें पुत्र जाला ह्मणून राजश्री चिमणाजी गोविंद मशारनिल्हेकडील वकील आहेत, यांनीं विनंति केली. व त्यांजकडील पत्रेंही आलीं होतीं, तें दिधलीं. त्याजवरून मुलास वस्त्रें व हासळी, बिंदली, मोत्यांची कंठी व जेगा शिरपेंच, व बायकांस वस्त्रें लुगडीं वीस व किनखाब थान दोन येणेप्रमाणें, व खांशास सातां पारच्यांचा खिलत व वडील पुत्रास पांचा पारच्यांचा खिलत व हत्ती नग एक, येणेंप्रमाणें सरंजाम बाळंतविड्याबद्दल रवाना सरखेलीकडे केला. व झालरदार पालखी तयार करून पाठवावी ह्मणून परवानगी जाली आहे. व मोर्चेल जोडी येथून पेशर्जी पातशाहांची परवानगी घेऊन पाठविली होती. हें वृत्त आपणांस कळलेंच असेल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९३.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–हबीबशाहा बीडकर फकीर, राजश्री पाटीलबावांचा गुरुबंधु येथें आले होते. त्यास तमाम जितका पातशाही मुलूख आहे, दक्षिण आदिकरून साडेबावीस सुभे, त्याजवर सरदेही दोन रुपये द्यावे ह्मणून वकील मुतलखीचे मोहोरेनिसीं परवाने करून दिल्हे. व पातशाहाचे शुकेही सुभ्या सुभ्याचे नांवें लिहून देविले. व येथून त्यांस देशीं विदा केलें त्यासमयीं, पन्नासां हजारांची पट्टी नख्त, आपण व आपले मुत्सद्दी व फौजेचे सरदार मातबर यांजवर करून देऊन, त्यांसीं बिदा करून दिधली. ते श्रावणमासीं कूच करून येथून देशीं बिडास गेले. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९४.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-तमाम अंतर्वेदींतील महाल इजारीयानें मामलेदारांकडे सांगितले. त्यांजपासून सरकारांत रसदा पेशजीं घेतल्या. कांहीं महाल मेरटेपासून तों पानिपत-पावेतों आहेत, तेही इजारीयानें रामरतन व गणेसीलाल व लालजीमल हे रांगडे मामलतदार उभे करून, त्यांस इजारीयानें महाल सांगून ऐवज इजारीयाचा ठरला. त्याची हप्तेबंदी करून, चार हप्ते खरीपाचे व चार हप्ते रब्बीचे एकूण आकार चैत्रमासपावेतों इजारीयाचे ऐवजाची बेबाकी करून द्यावी, याप्रमाणें करारमदार ठरविला. तेव्हां रांगड्या इजारदारांनीं विनंति केली कीं, आमचे महालांत शिखांचा उपद्रव आहे. त्याजवरून राजश्री साबाजी शिंदे यांचा नातू राजश्री धारराव शिंदे यांजसमागमें राजश्री जिवाजी मोरेश्वर निसबत गोविंद कृष्ण उदेपूरकर यांजकडील गृहस्थ दिवाणगिरीस, व चार पलटणें व तीन हजार स्वार, हिंदुस्थानी व दक्षणी, ऐसे तैनातीस देऊन, दरोबस्त चमेल-शिकंदऱ्यापासून तों पानिपत-कर्नोल पावेतों, सरसुभेदारी शिखांचे व जोरतलबी जमीदार यांचे बंदोबस्तास रवाना केले आहेत. ते दिल्लीस गेले आहेत. तेथेंच मुक्काम त्यांचा करविला आहे. पातशाहा निघोन इकडे लष्करांत आले ह्मणजे त्यांनीं कूच करून पुढें पानिपताकडे जावें, ऐसी सल्ला ठरली आहे. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९५.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— महमद अल्लीखान अर्काटचा सुभा याची अर्जी व एकशें एक मोहोर पातशाहास नजर आली. अर्जींत हा मजकूर लिहिला होता कीं, अवघा प्रांत आह्मांकडील इंग्रेजांहीं ग्रासिला आहे व वैराण आहे; याप्रमाणें आमची अवस्था आहे. ह्मणून लिहिलें होतें. वकिलानें अर्जीचा दरजाब व नजरची पावती व मेहेरबानगीचा खिलत द्यावा ह्मणून सवाल केला आहे. परंतु अद्यापि कांहीं उत्तर द्यावयाची आज्ञा जाली नाहीं. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९६.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः— राजश्री माधवराव गंगाधर यांजपाशीं कांहीं ऐवज कर्जाऊ खर्चास मागत होते. त्यास यांनीं उत्तर केलें कीं, कार्तिकमासीं दीड लक्ष रुपये बुडते दिधले. आतां आणिक पैका मागतां ? त्यास एखत्यारीचा कारभार मजकडे सांगत असल्यास जो पैका पाहिजे तो सरदारीस लावितों. नाहीं तर आतां ज्याप्रमाणें आज्ञेनुरूप एकुणात हिशेबावर व पत्रावर विनंति करून आहे, याप्रमाणें असल्यास आह्मांस पैका कोण देतो ? व आह्मीं सरदारीचें काम खर्चाचें कैसें चालवावें ? याप्रमाणें उत्तरें जालियावर राजश्री पाटीलबावा रागें भरून आज्ञा केली कीं, "मी एका बटकीहातून दिवाणगिरीचें काम घेईन. मजला दिवाण कशास पाहिजे ?" याप्रमाणें बोलून, बाळाजी सखदेव ह्मणून खाजगीचा कारकून विसा वर्षांचा मुलगा होता. त्याजकडून हिशेबावर एकुणाता व कागदपत्रावर विनंति करवितात. व आपणही पत्रावर आशीर्वाद विनंति करितात. राजश्री सदाशिवपंत फडणीस खाजगीचा व रामचंद्र बाबदेव फडणीस पातशाही मुलुखाचा, हे दोघेजण सनदी गैरसनदी हिशेब निवडून, खाशांस समजावितात. मग ते आज्ञा करितात त्याप्रमाणें बाळाजी सखदेव एकुणाता करून देतो. आणि राजश्री माधव गंगाधर यांजकडून दिवाणगिरीचा कारभार दूर करून घरीं बसविले आहेत. खाजगीचे कारकुनांहीं खाशांस हें समजाविलें आहे कीं, तीन हजार रुपये दरमाहा दिवाणास द्यावा लागतो. या खेरीज मुलकी कारभारांत वगैरे दोन तीन लाख रुपये कारकुनीचे उत्पन्न होतात, आणि जें करणें तें महाराज करितात. ऐसें असून वृथा पैका गमावावा यांत विशेष काय ? याजकरितां दिवाणगिरी खाजगत ठेऊन, पकौ दिवाणगिरीबद्दल येईल तो खाजगींत ठेवावा. याप्रमाणें समजाविलें आहे. याजवरून तूर्त दिवाणगिरीचें काम खांसेच चालवितात. माधवराव, दोन महिने जाले, आपले घरीं बेरोजगार बसून आहेत. पुढें होईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक १९७.

श्री. इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः— राजश्री बळवंतराव धोंडदेव यांचे कारभारी यशवंतराव आहेत. यांसीं व बळवंतराव यांचा मामा देवरीयाचा कमाविसदार यांसीं वाद

जाला. मामा कांहीं कारभारी यांचे काबूंत न ये. ह्मणून राजश्री पाटीलबावांस पेशजीं दत (?) घ्यावया परवानगीबद्दल रुपये पन्नास हजार करार केलेच होते. हल्लीं या वादामुळें कारभारी यांनीं जास्ती दहा हजार कबूल करून, सरसा पत्रें घेऊन, देवरीस जप्ती पाठविली. एकूण सरकारांत साठ हजार रुपये नजर देऊन, या खेरीज दरबार खर्च करून, आपली गोष्ट कारभारी यांनीं सिद्धीस नेली. घरांत व मामलतींत आपली काबू करून घेतली. याप्रमाणें वृत्त श्रुत जालें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० २० जमादिलावल सबा फाल्गुन.

लेखांक १९८.

श्री.

५ फेब्रुवारी इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १६ माहे रविलाखर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखन करीत असिलें पाहिजे. विशेषः— इकडील वृत्त विस्तारें पेशजीं छ० ६ माहे रविलावलीं विनंतिपत्रें पाठविलीं होतीं, तें सेवेसीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं सविस्तर वृत्त पुरवणीपत्रांवरून निवेदन होईल. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसीं पाठविले आहेत. ते स्वीकारून उत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० २२ जमादिलाखर सबा.

लेखांक १९९.

श्री.

२२ फेब्रुवारी इ. स. १७८७.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. जैपुरीं बिजेसिंग जोतपूरकर यानें पांच हजार स्वार व पांच हजार प्यादा, पंधरा हजारपावेतों जमा केले आहेत. येणेंप्रमाणें जमाव करून शहराचा बंदोबस्त करून आहेत. नजबकुलीखान व महमदबेग हमदानी हें दोन्हीं पथकें आपलेकडून रायाजी पाटील यांचे कुमकेस पाठविलीं आहेत. त्यास हे दोघेही जयपूरकराकडील फितुराचा संदर्भ आहे. वरकड रायाजी पाटील आदिकरून सरकारी फौज, जयपुराहून दोन तीन कोसांवर तीही दरवाजांकडे वांटणी करून दाणाघास बंद करून आहेत. परंतु शहरचा दाणाघास रसद

बंद होत नाहीं. व जयपुरकरांनीं वजिराकडे आपला वकील पाठऊन, वजिरासीं व फिरंगी यांसीं पकाई करून आले आहेत. इंग्रेजांचीही चाल या दिवसांत कांहीं बिघाडाचीसी दिसते. एक कंपू दारानगरीं व एक कंपू इटाव्यास आपले मुलकाचे सरहद्देस आले आहेत. अद्याप आपले मुलकांत सरहद्देंत पाय दिल्हा नाहीं. व आपलें येथील वर्तमान तरी, कोणी मुत्सद्दी नाहीं. कुलकारभार जातीवरच चालतो. फौज राजी नाहीं. तोफखाना व पलटणें आहेत यांचा भरंवसा नाहीं कीं, झुंजाचे समयीं एक बार बंदुकीचा काहाडतील. याप्रमाणें माणूसमात्र जे आहे, ते दिक आहेत. एक श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे प्रतापेंकरून जें होणें तें होईल. वरकड अर्थ फौजेचा व मुलकी आबादीचा सर्व ईश्वरइच्छाच आहे! याप्रमाणें वर्तमान ऐकिलें, त्याजवरून विनंति लिहिली. पुढें निदर्शनास येईल तें लिहूं. कृपा करणार आपण समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २००.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. कान्होजी आंगरे यांनीं राजश्री पाटिलबावांस चिकणसुपारी व सुकेळें व पिस्ते व बदाम व फणसपोळ्या व ओली नारळ वगैरे कोंकणचा जिन्नस पंचवीस बैल भरून पाठविले होते. त्यापैकीं कांहीं सरंजाम यांनीं ठेविला. कांहीं दिल्लीस पातशाहाकडे पाठविला आहे. वरकड वर्तमान पारसी एकबरावरून व पुरवणीपत्रांवरून श्रुत होईल. राजश्री पाटिलबावा जैपुरासमीप सातां कोसांवर होते. तेथून कूच करून पंचविसां कोसावर आले. याजकरितां तमाम गव्हारगर्दी मुलकांत जाली आहे. जैपुराकडील पांच सात हजार फौज बाहेर मुलकांत निघोन, रावराजे प्रतापसिंग व त्यांचे मुलकांत व आपले सरकारचीं ठाणीं जैपुर प्रांतीं बसलीं होतीं, तें उठविलीं. व लष्कराबाहेर वाट चालत नाहीं. तमाम काफिले मार्गांत लुटले जातात. जोतपूरकराकडील बक्षी भीमसिंग पंधरा हजार स्वारप्यादांनसीं जैपुरकरास येऊन भेटला. त्यांची यांची सलाह होऊन, आपले फौजेचे मुकाबिलयास जैपुराअलीकडे आठां कोसांवर आले आहेत. आपले फौजेसीं अठरा कोसांचा अंतर आहे. पुढें कूच करून येणार, ह्मणून श्रवणांत आलें. घडेल तें विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २०१.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. जयपुराकडील जाबसाल तरी, राजश्री पाटीलबावा जयपुराहून सात कोसांवर मोती टेकडीचे सुमारें मुक्काम करून आहेत. त्यास रावराजा प्रतापसिंग माचेडीवाला व बोहरा खुशालीराम व रामकृष्ण महंत हे तिघेजण राजश्री पाटिलबावांचे ममतेंत शिरून जाबसाल करितात कीं, राजे पृथ्वीसिंगाचा पुत्र मानसिंग वृंदावनांत आहेत, त्यास तुमचे स्वाधीन करावें. आणि देवासें ह्मणून जयपुराहून सोळा सत्रा कोस किल्ला आहे, तें स्थळ आमचे स्वाधीन करावें. ह्मणजे जयपुराकडील खंडणीचे ऐवजाची निशा आह्मी करून देऊं. ह्मणोन रावराजाचें वगैरे बोलणें आहे. व रोडाराम व राजे प्रतापसिंग जयपुरकर यांचें बोलणें आहे कीं, बारा लक्ष रुपये गुदस्ताचे खंडणीबद्दल बाकी आहे. त्यांजपैकीं चार लक्ष रुपये तूर्त घ्यावे, आणि आपण कूच करून माघारा जावें. दोन लक्ष रुपये श्रावणमासीं देऊं. व बाकी सा लक्षांचे परगणे लाऊन घ्यावे. ह्मणोन जयपूरवाल्यांचें बोलणें लागलें आहे. राजश्री पाटिलबावा दोन्ही भिंतीवर हात देऊन आहेत. जिकडून पैका हस्तगत होईल, तिकडे कल देऊन मामला करतील. याप्रमाणें मर्जी आहे. जयपूरकरांचें मानस कीं, याप्रमाणें मामला विल्हेस लागला तरी उत्तम. नाहीं तरी त्यांची मर्जी जयपुर घ्यावी अशी असली, व जयपुरासमीप येऊन मोर्चे लाविले, तरी परिछिन्न झुंजावें. यांत जोतपुरवालेही सामील आहेत. जोतपुराकडील स्वार पांच हजार व प्यादे गोसावी मिळोन पांच हजार ऐसी दाहा हजारांची भीड सामरासमीप येऊन मुक्काम करून आहेत. राजश्री पाटीलबावा येथून कूच करून जयपुरासमीप गेले ह्मणजे त्यांनीं तिकडून कूच करून जयपुरकरांचे सामील व्हावें ऐसें करारांत आलें आहे. जयपुरकरानेंही पंधरा वीस हजार स्वारप्यादे सेकावत वगैरे रजपूत आपले जागिरदार जमा केले आहेत. तेही आपले मजबुतीनें आहेत. मारवाडवाले वकील जयपुरकरांचे जाबसालांत आहेत. बोलल्याप्रमाणें हालचा जाबसाल फडशा करून घ्यावा. पुढल्या सालचा जिमा आमचा आहे. याप्रमाणें राजश्री पाटिलबावांची खातरजमा करितात. तात्पर्य, दोहींकडील जाबसाल लाऊन ठेविले आहेत. ज्यांत सरकार काम होईल तें करतील, याप्रमाणें वृत्त आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २०२.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री खंडेराव हरी स्वार प्यादे मिळोन दाहा हजारांचे जमावानसीं व राजश्री आंबाजी इंगळे स्वार प्यादे मिळून पांच हजार जमावानसीं लष्करांत दाखल जाले आहेत. अद्यापि कांहीं झुंजाची तऱ्हे नाहीं. आपले खासे फौजेचें व राजे प्रतापसिंग यांचें खासे फौजेचें साता कोसांचें अंतर आहे. हे आपले ठिकाणीं त्यांचे फौजेस जपून आहेत. अद्यापि कांहीं सलुकाचा जाबसाल नाहीं. पहिले जाबसाल सा लक्ष रुपये द्यावे, ऐसें ह्मणत होते. परंतु तोही जाबसाल तुटून, पुढें परस्परें झुंजावें या भरावर उभयतां सरदार आहेत. पुढें ठरेल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २०३.

पैवस्ती छ० २२ जमादिलाखर सबा समानीन चैत्र मास.

श्री. ७ मार्च इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ. १६ माहे जमादिलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः– इकडील वृत्त सविस्तर पेशजीं छ० १६ रविलाखरीं पत्रें पाठविलीं होतीं, तें पावून वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं पातशाहांस सरकारचीं वस्त्रें, हत्ती व घोडीं, व जवाहिर व नजर मोहरा व अर्ज्या पाठविल्या होत्या, त्या गुजराणून पातशाहांचे रसीदेचे शुके घेऊन पाठविले आहेत. ते पाऊन ध्यानारूढ होईल. व पारसी अखबरा राजश्री पाटिलबावांचे दरबारच्या व पातशाहांचे दरबारच्या पाठविल्या आहेत. त्यावरून निवेदन होईल. वरकड पुरवणीपत्रांवरून श्रुत होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २०४.

पैवस्ती छ० २२ जमादिलाखर सबा. श्री. १४ मार्च इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. शाहा निजामुद्दी फकीर पातशाहाकडील कारभारी राजश्री पाटिलबावांनीं लाडोजी देशमुख सुद्धां बोलाऊन नेले आहेत. व त्यांसीं बोलतात

कीं, इंग्रेजांची मर्जी आहे कीं, आगरियांत कोठी करावी. व जयपुराकडीलही मसलत. त्यास तुह्मीं उभयतां पातशाहांचें संरक्षण करावें. नाहींतर बाहीर काढून लष्करांत स्वारीसमागमें ठेवावें. याप्रमाणें बोलणें जालें. तेव्हां हें ठरलें कीं, शाहा निजामुद्दीनीं [व]लाडोजी देशमुखांनीं दिल्लींत राहून, पातशाहांची मर्जी संरक्षण करून असावें; आणि राजश्री पाटिलबावांनीं जयपुरास स्वारीस जावें. याप्रमाणें सल्ला ठरून उभयतांस दिल्लीस रवाना केलें. व आपण दिल्लीकडे जयपूरचे रोखें कूच केला आहे. परंतु इंग्रेजांचा एक कंपू कानपुरीहून कूच करून इटावियाचे रोखें आला आहे. अद्याप ते आपले सरहद्देंत आहेत. पुढें चाल केलियास विशेष ऐकिल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

पैवस्ती छ० २२ जमादिलाखर सवा.

लेखांक २०५.

श्री.

११ एप्रिल इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री शिवाजी विठ्ठल बापू यांचे येथें देशीहून वकिलानें पत्रें पाठविलीं कीं, इकडे टिपूची मसलत भारी आहे. फौज नाहीं. याजकरितां श्रीमंतांकडून हुजरे व पत्रें येणार कीं, आपण व पवार व रघुनाथराव बल्लाळ व गोपाळराव त्रिंबक वगैरे सरकारी पथकें आहेत, तें सर्व बोलाऊन घ्यावीं. ह्मणून पत्रें आलीं आहेत. हें वर्तमान ऐकिलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे, हे विनंति.''

पैवस्ती छ. २२ जमादिलाखर सवा.

लेखांक २०६.

श्री.

११ एप्रिल इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. लाहोराकडील वर्तमान तरी, शाहा आबदाली अहमदशाहा पिशोरांत अटकेपलीकडे आहेत, त्यांचे पुत्र तैमुरशाहा अटकेअलीकडे कशमीरचा वगैरे बंदोबस्त करून आहेत. चरखासिंग शीख याचा लेक भगवतसिंग शीख वगैरे लाहोरापासून तों शतद्रूपावेतों सरहद्देपर्यंत बंदोबस्त करून, आपलाले ठिकाणीं आहेत. आला जाटाचा नातू व जगपतसिंगाचे पुत्र सरहद्देअलीकडे पाणिपतपावेतों आपलें स्थळ संरक्षण करून आहेत. इकडे अंतरवेदींत शीख येऊन धामधूम करितात, ह्मणोन राजश्री आंबाजी इंगळे यांस पाणिपताकडील सरसु-

भेदारी देऊन रवाना केलें. ते पाणिपतास जाऊन पावले आहेत. पुढें शिखांचा बंदोबस्त होऊन अंतरवेद मेरट वगैरे माहाल निर्वेद होतील, ते विनंति लिहूं. जाबतेखानाचे पुत्र गुलामकादरखान यांसीं व शिखांसीं झुंज सारंगपूर हुडियापासीं यमुनातीरीं जालें. खानमजकुराचे पुत्रानें शिखांची लढाई फत्ते केली. शीख पळाले. पुढें वर्तमान आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २०७.

श्री. एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजेः- तैमूरशाहा अबदाली अद्यापि पिशोरीं आहे. कांहीं फौज व हमाऊ पातशाहाज्यादा सिंधूनद अटक उतरून, झिलमेस मुक्काम करून आहेत. तेथून कांहीं फौज कशमीरचे सुभ्याचे बंदोबस्तास पाठविली आहे. व कांहीं फौज टवाभकड वगैरे प्रांताचे बंदोबस्तास पाठविली आहे. त्यास कशमीरचे सुभ्यानें चोविसां लक्षांचा मामला करून बारा लक्ष रुपये नख्त दिल्हे, आणि बारा लक्षांचा करार केला कीं, पेस्तर सालीं देईन. ऐसा करारमदार जाला असतां, पातशाहाचे मनांत कीं, सुभेमजकुराचें पारपत्यच करावें. त्याजवर आणिक फौज बिदा केली. त्याजवरून शिकंदरशाहा, अबदालीचा भाऊ, पळून कशमिरास आला होता. त्याजवर छत्र फिरवून कशमीरचा सुभा झुंजला. परंतु अबदालीची फौज भारी. शेवटीं त्यांनीं कशमीरचे तीन पुरे कत्तल करून, सुभ्यास धरून, कशमिरेंत ठाणें बसवून, त्यास अबदालीकडे पाठविलें. पातशाहानें पोंट चिरून काव्या भरून, मारून टाकिलें. त्याचा भाऊ शिकंदरशाहा कशमीरीहून पळून पहाडांत एक गढी कोणी आहे, तेथें जाऊन बसला आहे. त्याचा पाठलाग करून, फौज गढीस जाऊन लागली आहे. परंतु अद्यापि हस्तगत जाल्याचें वर्तमान आलें नाहीं. पूर्वीं हिंदुस्थानांत यावें, हे आवई होती. उपरी त्यास त्या प्रांतींच बंदोबस्तास अटकाव जाला, ह्मणून यंदा इकडे येणें होत नाहीं. आणि त्याचें मानस कीं, उगेंच धावून जाऊन मुलुखगिरी करावी, हें ठीक नाहीं. याजकरितां जितका मुलुख आपले काबूंत येईल तितका पुरतेपणें बंदोबस्त करून, मग पुढें पेशकदमी करणें ठीक आहे. ह्मणून वर्तमान श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति. नित्यचें वर्तमान पातशाहाचे दरबारचें व राजश्री पाटील-

बावांचे दरबारचें व लखनौकडील वजिराचें दरबारचें पारसी एकबारा पाठविल्या आहेत, त्यांजवरून श्रुत होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, हे विनंति."

लेखांक २०८.

श्री. एप्रिल इ. स. १७८६.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पिशोराकडून पातशाहाचे येथें वकील, पत्रें, शिष्टाचार परस्परें स्नेहवृद्धीचे आले आहेत. व तिकडील वर्तमान तरी, मुरादशाहनामें उजबकाचा पातशाहा दो लाखा स्वारांनशीं चढून तैमूरशाहा अबदाली याचे मुलखांत खंदाराकडे आला आहे. त्याजवर तैमूरशाहाही स्वार होऊन जाणार. ह्मणून तमाम फौज जमा करून तिकडे पिशोराहून कूच करून खंदाराकडे बंदोबस्तास जाणार. हें वर्तमान अटकेअलीकडे पाळेगार वगैरे जमीदार आहेत, यांनीं टवाभकड व झिलीम व कश्मीर वगैरे मुलुक आहे, त्या स्थळीं अबदालीचे अंमलांत बदअमली केली आहे, ह्मणोन वर्तमान श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. लाहोर प्रांतीं चरखासिंग व गुजरसिंग वगैरे आहेत. त्यांचा बंदोबस्त बदस्तुर लाहोर प्रांतीं आहेत. आला जाटाचा नातू महासिंग सरहद्देंत वगैरे आपले मुलकांत अंमल करून बदस्तूर आहेत. व महासिंग व गजपतसिंग जाटाचा पुत्र पतियाळापासून तों पाणिपतपावेतों आपले मुलकाचा बंदोबस्त लावून बदस्तूर आहे. पाणिपतापासून तों दिल्लीपावेतों पातशाही मुलूक आहे. त्यांत तमाम शीख व गुजर लुटीत व मारीत फिरतात; मार्ग चालूं देत नाहींत. दरोबस्त पातशाही अंमल पाणिपतापासून तों कोलेपर्यंत आहे. तेथें शिखांनीं आपली चौथाई ठराविली आहे. याप्रमाणें तमाम शिखांनीं आपला अंमल करून चौथाई पैका घेतात. दिल्लींत नित्यांनीं आसपास गुजर आहेत, ते येऊन रात्रीस डाके घालितात. याप्रमाणें येथील वृत्त आहे. पुढें श्रवणांत येईल व पाहिल्यांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक. २०९.

पैवस्ती छ. २२ जमादिलाखर सबा.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. नवाब सालारजंग, मिर्जा अमानी वजीर याचा मामा, त्याचा नातू समशेरजंग हे लखनऊहून चाकरीचे उमेदवारीवर राजश्री पाटिलबावांपासीं

आले होते. त्यास यांजपासीं कांहीं सोय न जाली. लखनऊहून जातो ह्मणून आज्ञा घेऊन आगरियास गेले. जयपुरकरांची भेट घेतली. त्यांनीं बहुत सन्मान करून ठेविलें. एका दिवशीं राजांनीं आपलें जवाहीर यांस दाखविलें. यांनीं तें जवाहीर पाहून नापसंत केलें. दुसरे दिवशीं आपले घरचें जवाहीर साता आठा लक्षांचें एका पेटारींत घालून राजास दाखवावयास नेलें. त्यांनीं पाहून यांस रुकसत करून आपले डेरियास वाटें लाविलें. राजे आपले माहालांत गेले. दहा माणसें, ज्या माणसांपासीं पेटारीं जवाहिरांचीं होतीं, त्यांस स्वारींत मार्गीं जातांना मारून टाकिलें. पेटारीं आणून सरकारांत आपलेपासीं ठेविलीं. हल्लीं राजश्री पाटिलबावांस नवाब समशेरजंग यांचीं पत्रें जयपुरीहून आलीं आहेत कीं, हे अवस्था आमची जाली! ह्मणून लिहिलें होतें. यांनीं पत्रांचे जाब अद्यापि कांहीं दिल्हे नाहींत. याप्रमाणें वर्तमान जालें. पुढें ठरेल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

पैवस्ती छ २२ जमा-
दिलाखर सवा.

लेखांक २१०.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. जयपुराकडे जावयाचें कारण हेंच कीं, अंतस्थ जयपूरकरास फिरंग्याकडील फौजही पांच सात हजार कुमकेस आली आहे. याजकरितां सालाबादप्रमाणें जयपूरकर खंडणीचा पैका देत नाहींत. ह्मणून तिकडे जावें, हे मर्जी राजश्री पाटिलबावांची आहे. व बोलतात कीं, जैसी गोहद खाली करून घेतली, तैसें जयपूरही खाली करून घेतों. पुढें प्रत्ययास येईल त्याप्रमाणें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

पैवस्ती छ. २२ जमा-
दिलाखर सवा.

लेखांक २११.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. जयपुराकडील खबर एकबार पातशाहासीं आलीं कीं, जोतपूरकर व जयपूरकर एक सल्ला करून, दौलतराम खुशालीराम याचा भाऊ यास मुख्त्यार केलें कीं, आह्मांकडील फौज व जयपुराकडील फौज समागमें घेऊन, तुह्मीं राजश्री पाटिलबावांसीं झुंजावें. याप्रमाणें आपले घरांत मसलत करून, झुंजाची तयारी करून आहेत. जर राजश्री पाटिलबावा जयपुराकडे

स्वारीस गेले तर यांसीं झुंजतील. याप्रमाणें सविस्तर वर्तमान राजश्री पाटिल-बावांस समजलें. त्याजवरून जयपुराकडील वकील व डांक लष्करांत होती, त्यांस लष्करांतून काढून दिल्हें. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० २२ जमा-दिलाखर सबा.

लेखांक २१२.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. राजश्री पाटिलबावांचे येथील वर्तमान तर, राजश्री माधवराव गंगाधर यांजवर इतराजी जाली. ते वेडे होऊन आपले घरास गेले. जिऊबा बक्षी याजवर इतराजी जाली. ते कैदेंत आहेत. त्यांजकडील बक्षीगिरीचें काम नौबतराय खत्री हिंदुस्थानी आगरेकर याजकडे सांगितलें. याजमुळें दरोबस्त फौज दिलगीर. एकदिली नाहीं. व पलटणाची व तोफखान्याची दरोबस्त मुख्त्यारी नौबतरायाकडे. सर्व कारभार फौजेचा मशारनिल्हेकडे दिल्हा आहे. याजकरितां सर्व दक्षिणी माणूस दिक आहे. हल्लीं मसलत ठरली आहे कीं, बाळोबा पागनीस यांजकडे दिवाणगिरीचें काम सांगावें. व जिऊबाची मुक्तता करून पुन्हां बक्षीगिरीचें काम त्यांचें त्यांजकडे सांगावें. परंतु उभयतांही कबूल करीत नाहींत. पुढें प्रत्ययास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २२ जमा-दिलाखर सबा.

लेखांक २१३.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. पातशाहांनीं लष्करांत राजेश्री पाटिलबावांस पत्र लिहिलें कीं, फिरंगी याचे वकिलानें दिल्लीहून लष्करपावेतों व लष्कराहून लखनऊ-पावेतों सांडणीस्वारांची डांक बसविली आहे. त्यास लखनऊहून वर्तमान आलें कीं, कानपुरीहून दोन कंपू इंग्रेजांचे स्वार होऊन इकडे येणार; त्यास तुह्मीं गाफील न राहावें; व जयपुरकराकडे जावयाचा विचार करूं नये. तुह्मी जयपुराकडे जाऊन मसलतीस आटकाल, आणि आह्मी दिल्लीस आहोंत, येथें इंग्रेजांचीं पलटणें दाखल होतील. मग तुह्मांस दोन्ही मसलती सांभाळणार नाहींत. याजकरितां जें करणें तें बहुत समजून, दूरअंदेसीनें करावें. याप्रमाणें

पत्र लिहून पाठविलें आहे. पुढें अमलांत येईल, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २२ जमादिलाखर सबा.

लेखांक २१४.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. कर्क पाहसू पाद्री साहेब इंग्रेजांकडून राजश्री पाटिलबावांपासीं आला होता. त्यांची आज्ञा घेऊन दिल्लीस आले. पातशाहांची मुलाजमत जाली. साता पारचांचा खिलत, जेगा, शिरपेंच, मोत्यांची कंठी, समशेर, हत्ती, घोडा, येणेंप्रमाणें द्यावें ह्मणून लिहून पाठविलें. त्याप्रमाणें इनायत जाली. तत्क्षणीं पातशाहांनीं मशारनिल्हेस आज्ञा केली कीं, "तुह्मीं कूच करून लष्करांत राजश्री पाटिलबावांपासीं जावें." त्यास मशारनिल्हेनीं पातशाहास विनंति केली कीं, कांहीं दिवस राहून मग जाईन. याप्रमाणें बोलून दिल्लीस राहिले आहेत. चार पांचशें उंट खरीदी करून दिल्लीपासून तों लखनऊपावेतों डांक बसविली आहे. याप्रमाणेंच पुढेंही सांडणीयांची डांक कलकत्त्यापावेतों बसवावी, ह्मणोन श्रवणांत आलें. वकीलमजकूर सबदरजंगाचे हवेलींत दिल्लीस आहेत. हें वर्तमान सर्व राजश्री पाटिलबावांस विदित आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ २२ जमादिलाखर सबा.

लेखांक २१५.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. लाडोजी देशमुख पुणेकर सितोळे राजश्री पाटिलबावांकडून मुख्त्यार शाहा निजामुद्दी ह्मणोन फकीर आहे. या उभयतांस लष्करांत पलवेलचे मुक्कामींहून बोलावूं पाठविलें. त्याजवरून पातशाहांनीं साता पारच्यांचा खिलत, बमय सरबस्ता पागोटें, व मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच, दोन घोडे, एक हत्ती, ढाल, तरवार, येणेंप्रमाणें सरंजाम देऊन, उभयतां कारभारी यांस लष्करांत रवाना केलें. लष्करांत दाखल जालियाचें वर्तमान आलें कीं, यांच्या त्यांच्या भेटी जाल्या. एक कोस सामोरा येऊन, शाहानिजामुद्दीस व देशमुखास घेऊन, पातशाहांनीं खिलत पाठविला होता तो घेऊन, उभयतांस समागमें घेऊन डेरियास दाखल जाले. शाहानिजामुद्दीस सात पारच्यांचा खिलत, व त्याचे पुत्रास

खिलत, व हत्ती, घोडा, जेगा, शिरपेंच, मोत्यांची कंठी, येणेंप्रमाणें पितापुत्रास देऊन, हमराई मुत्सद्दी पांच असामी त्यांस पांच पांच पारचे खिलत, व दोन शिरपेंच, येणेंप्रमाणें सन्मान करून, आपले डेरियास बिदा केलें. लष्करांत उभयतां कारभारी राहून, राजश्री पाटिलबावांची व यांची सल्ला ठरून पातशाहापासीं आले. व राजश्री पाटिलबावांनीं जयपुराकडे एक कूच केला आहे. पुढें घडल्यांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २२ **लेखांक २१६.**

जमादिलाखर सबा. **श्री.** एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. लखनऊकडील वर्तमान तर, वजीर लखनऊस आहे. इंग्रेजाकडील पलटणें कानपुरीं होतीं. त्यांपैकीं एक कंपू कूच करून इटाव्यास आला. व लखनऊहून एक कंपू आणीख कानपुरीं गोरे वगैरे तोफा सुमार वीस येणेंप्रमाणं आले आहेत. परंतु आजपर्यंत आपले मुलखांतच आहेत. अनुपशहरकर राजा यांनीं सरकारचे तालुक्यांपैकीं आहारचे परगणियांत धामधूम करून, चार गांव मारले. व कलकत्त्यास इंग्रेज इष्टिनाची बदली आला आहे. लाट कलफदानश सितेन साहेब हेही कलकत्त्याहून कूच करून श्रीकाशीस येणार. जवांबख्त पातशाहाजादा यांची भेट श्रीकाशीस घेऊन, पुढें लखनऊस वजिराकडे येणार, ह्मणून वर्तमान आहे. राजश्री पाटिलबावा तूर्त पलवेलहून शाहानिजामुद्दी व लाडोजी देशमुख यांची बिदा दिल्लीस पातशाहापासीं करून, आज्ञा केली कीं, पातशाहा इंग्रेजांकडे कागदपत्र न पाठवीत, व त्यांचे व इंग्रेजांचे वकिलाचें एकांतीं बोलणें न होय, फितुर न करीत, ऐसा बंदोबस्त करून असावें. याप्रमाणें निर्वणूक करून, आपण कूच करून डिगेकडे गेले आहेत. डिगेस मुक्काम करून फौज जयपुराकडे रायाजी पाटलापासीं आणीक कुमकेस पाठवावी, व आपण तूर्त मास दोन मास जयपुरावरही दबाव व इकडे दिल्ली आगरें हीं समीप, ऐसीं दोन्हीं नाकीं दाबून मुक्काम करून असावें, ऐसी मसलत ठराऊन, कूच करून डिगेकडे गेले. हुताशनी डिगेस करणार. पुढें विशेष आढळल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० २२
जमादिलाखर सबा.

लेखांक २१७.

श्री. ११ एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. शाहा निजामुद्दी व लाडोजी देशमुख यांस दिल्लीहून राजश्री पाटिलबावांनीं बोलाऊन लष्करांत नेलें. पातशाहांनीं या उभयतांस पाठविलें. कारण कीं, सातमाही रुपये करारप्रमाणें दरमाहा एक लक्ष तीसहजारप्रमाणें एकूण रुपये ८,४०,००० आठलक्ष चाळीस हजार रुपयांची तजवीज करून द्यावी, ह्मणून या दोघांस पाठविलें होतें. त्यास राजश्री पाटिलबावांनीं दोन लक्षांची नख्त निशा करून दिल्ही. व पांच लक्षांची तनखा मेरट वगैरेवर वरात करून दिल्ही. व बाकी एक लक्ष चाळीस हजार राहिले, याचा करार करून दिल्हा कीं, दो महिनियांत बेबाकी करून देऊं. याप्रमाणें करारमदार होऊन, कांहींजण जपसन (?) वर्शगांटीचे व जडावलीचें साहित्य वस्त्रें पातशाहांस वगैरे देऊन, यांस दिल्लीचे मुख्त्यार शाहानिजामुद्दी व लाडोजी देशमुख यांस करून, दिल्लीहून पातशाहांनीं सात पारचे, खिलत व जेगा, शिरपेंच व मोत्यांची कंठी व हत्ती, घोडा व ढालतरवार, कलगी परगीरी, येणेंप्रमाणें घेऊन गेले होते. त्यास फरमानबाडी उभी करून छ० ५ मिनहूस खिलत घेतला, व शाहाजीस व देशमुखास यांचीं कामें काजें करून देऊन बिदा केलें. ते दिल्लीस दाखल जाले. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २१८.

श्री. एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ९ माहे रज्जब मुक्काम नजीक जयपूर सात-कोस जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— आपण छ० ९ व छ. २७ व छ. २९ रबिलावलचीं तीन पत्रें व छ० १२ रबिलाखरचें एक पत्र एकूण चार पत्रें पाठविलीं, तें छ. १ रज्जबीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, "तिकडील वर्तमान वरचे-वर लिहित जाणें, व संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत, ते स्वीकारून पावलियाचें उत्तर पाठवावें." त्यास आज्ञेप्रमाणें शिरसा वंदून स्वीकारले. सनाथ जालों. व टिपूकडील वर्तमान, "राजश्री हरिपंत तात्या फौजसुद्धां टिपूभोंताले

फिरतात. दोन चार वेळां छापा घालावयास आला होता. परंतु सरकारचे फौजेनें टाळून राखिला. सावनूरकराचे लेंकाजवळून सावनूर फितूर करून टिपूनें घेतलें होतें, तें सरकारची फौज पायदळ जाऊन सावनूर सरकारांत घेतलें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास हें सविस्तर पातशाहास निवेदन जाहलें. त्यावरून श्रीमंतांचे प्रतापाची बहुत वर्णना केली. "श्रीमंत प्रतापवान आहेत. शत्रूचें पारपत्यच करतील. व पूर्वापार पारपत्य मगरुरांचें करीतच आले आहेत." ह्मणोन बोलले. इकडील सविस्तर वर्तमान पुरवणी पत्रावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २१९.

श्री. एप्रिल इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. इकडील सविस्तर वृत्त पेशजीं छ० १६ जमादिलावलीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पाऊन वर्तमान विदित जालेंच असेल. पूर्वी राजश्री पाटिलबावांची आज्ञा घेऊन दिल्लीस गेलों. तेथें जाऊन पातशाहांची मुलाजमत केली. सरकारचीं वस्त्रें, हत्ती घोडे, जवाहीर जो सरंजाम आणिला होता, तो पातशाहास गुजराणोन, त्याची रसीद व पत्रांचीं उत्तरें पातशाहांचे शुके घेऊन पेशजीं पाठविलींच आहेत; ते पावलेच असतील. त्याउपरी पातशाहांची आज्ञा घेऊन आह्मी राजश्री पाटिलबावांचे लष्करांत आलों. येथें येऊन जयपुरासमीप यांची भेट घेतली. समागमें आहोंत. अद्यापि कांहीं पोटाची सोय जाहली नाहीं. सोय जालियावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २२०.

पैवस्ती छ० २५ रमजान
समान समानीन आषाढमास. **श्री.** ९ जून इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २२ माहे साबान मुक्काम सारसा नजीक टोंक प्रांत जैपूर जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० १० माहे रज्जबचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, त्यांजवरून सविस्तर श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहा दिल्लीस आहेत. राजश्री पाटिल-

बावांस दोन तीन वेळां शुके लिहिले कीं, तुह्मीं डिगेहून पलीकडे जैपुराकडे न जावें. जैपूरचा मामला डिगेसच बनेल तैसा उरकोन घेऊन, याच मैदानांत मुक्काम करून असावें. ह्मणजे चहूंकडील बंदोबस्त राहेल. त्यास, राजश्री पाटिलबावांस रावराजा प्रतापसिंग यांनीं भर दिल्हा कीं, जैपुरकरांनीं मामला दिल्हा तर उत्तम; नाहीं तरी जैपुर खाली करून घेऊं. त्याजवरून दरमजल जयपुरासमीप आले. त्यांनीं आपले वकील पाठऊन जाबसाल केला कीं, तूर्त चार लक्ष रुपये घ्यावे; बाकी तुमचा ऐवज राहिला, त्यास (खुशालीरामास) आमचे हातीं द्यावें; ह्मणजे आह्मी तुमचे मामल्याची बेबाकी करून देऊं. ह्मणून बोलणें जालें. त्यास यांनीं उत्तर दिल्हें कीं, पायमाली आह्मी मुजरा देत नाहीं. व खुशालीरामासही तुमचे स्वाधीन करीत नाहीं. साल हाल व साल गुदस्तची खंडणीची बेबाकी करून देणें. याप्रमाणें उत्तर जालें. त्याजवरून यांचा व जैपुरकरांचा बिघाड ठैरला. जैपुरकरांनीं आपले सरंजामी लोक पंचवीस तीस हजार जमा केले. व जोतपुरकरांचा व यांचा एक पेटा आहे. याजकरितां जोतपुरकराकडील पांच सात हजार स्वार कुमकेस आला आहे. एकूण सर्व फौज मिळोन, जैपुरकरांचा पस्तीस हजार जमाव जाला आहे. हें जाणून राजश्री पाटिलबावांनीं मसलत ठैराविली कीं, जैपुरासमीप आहों, हें ठीक नाहीं. याजकरितां पैस धरून, दरोबस्त जैपुरकरांच्या गढीबंदी कोटडीवाले सरंजामी लोक आहेत, त्यांची जागा जप्त करून, तमाम गढ्या काबीज करून, मग जैपुरासीं झटावें. याप्रमाणें मसलत ठैराऊन, जैपुरासमीप होते तेथून कूच करून नेवाईकडे आले. झिलाया व नेवाई वगैरे पांच सात गढ्या होत्या, त्या घेऊन सवा लक्ष रुपये खंडणी नेवाई व झिलाया येथील रयतीपासून घेऊन, ठाणेबंदी दरोबस्त करून, जैपुरास उजवें घेऊन, बुंदीचे रुखें जैपुरकरांचे मेड्यावर जैपूरकरांच्या गढ्या आहेत त्या घ्याव्या, ह्मणून तजवीज आहे. पुढें जें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, ही विनंति.”

लेखांक २२१.

श्री. जून इ. स. १७८७.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. महमदबेग अमदानी जैपूरचे उत्तरेस सेकावताचे मुलकांत यांजकडून होता. त्यासीं जैपूरकरांचा संदर्भ लागून, त्यास दररोज तीन हजार रुपये राजांनीं करार करून त्यास आपलेपासीं चाकर ठेविलें. राजाच्या व मह-

मदबेग हमदानीच्या भेटी जाल्या. राजांनीं त्यास वस्त्रें, हत्ती, घोडा, जवाहीर देऊन सन्मान केला. हे वर्तमान ऐकून राजश्री पाटिलबावांनीं खुशालीराम बोहरा यांस राजे मानसिंग याची नायबत ह्मणून वस्त्रें, हत्ती, घोडा, जवाहीर मशारनिल्हेस दिल्हे. व आदतराम दिवाण यांस बोहराजीचीं नायबतीचीं वस्त्रें, जवाहीर दिल्हें. आणि राजे मानसिंग प्रतापसिंगाचे पुत्र वृंदावनीं होते, त्यांस डिगेस येणें ह्मणून बोलावूं गेलें आहे. व डिगेस मिर्जा रहिमबेग यांचे बंधु आहेत. त्यांस पत्रें गेलीं आहेत कीं, एक हवेली चांगली खाली करून, राजेमजकुरास राहावयास देणें, ह्मणून लिहिलें आहे. जोतपूरकर राजे यांजकडील वकीलही राणेखानभाई यांचे विद्यमानें बोलतात कीं, "हे दोनीं राज्यें हिंदूंचीं आहेत. आजपावेतों यवनांनीं देखील यांस बिघडलें नाहीं. त्यास तुह्मी हिंदू आहांत आणि आह्मी हेंच इच्छीत होतों कीं, हिंदूंचें राज्य व्हावें, आणि आमचे स्थळांचें संरक्षण व्हावें, हे इच्छा होती. त्यास तुह्मी आह्मांस राज्यभ्रष्ट करितां, हें ठीक नाहीं." आपले खंडणीचा ऐवज घेऊन, आमचे राज्यांतून फौज काढावी ह्मणून बोलतात. परंतु अद्यापि कांहीं ठरावांत आलें नाहीं. बोलणीं बाह्यात्कारीं बोलतात. परंतु रांगड्यांचा जमाव भारी जाला. हें जाणून राजश्री पाटिलबावा नेवाई व झिला यापासीं होते, तेथून पुढें जाणार होते. ते न जातां माघारा खुशालगडाकडे करोलीहून नवकोस अलीकडे येऊन मुक्काम केला आहे. येथून हिरा पेंढारा, व खंडेराव हरी व रायाजी पाटील व आंबाजी इंगळे वगैरे फौजा, जैपूर प्रांतीं घालून, मारून मुलूक ताराज करावा, हे सल्ला ठैराविली आहे. समागमें बाहीरबुणगें व बायका वगैरे बाजार बहुत होता. याजकरितां रांगड्यांसीं गांठ न घातली. माघारा येऊन, सड्या फौजा जैपूरप्रांतीं घालाव्या, याप्रमाणें सल्ला ठैरली आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, ही विनंति."

पैवस्ती छ० ५ जिल्काद

लेखांक २२२.

सन समान समानीन श्रावणमास. **श्री.** १२ जुलई इ. स. १७८७.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० २६ माहे रमजान मुक्काम लालसोट प्रांत जैपूर जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः- इकडील वर्तमान पेशजीं छ० २२ साबानीं विनंतिपत्रें पाठविलीं होतीं, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत

जालेंच असेल. हल्लीं छ० २९ जमादिलाखरचीं आज्ञापत्रें पाठविलीं, तें छ० १४ मीनहूस पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहाचे स्वारीस निघावयाचें कैसें ठरलें, तें लिहून पाठवावें. व जैपूरकराकडील वर्तमान काय आहे, व इंग्रेजांचा वकील दिल्लीस आला आहे, त्याचें व पातशाहांचें बोलणें काय जालें, याचा शोध करून, पाटिलबावांकडे कधीं येणार, हें लिहून पाठवावें. इंग्रेजांचे कंपू दोन दोहों जागा आहेत. त्यांची चाल कशी काय करणार, हें लिहिणें. व पारसी येकबरा पाठविल्या, त्या पावल्या. मजकूर सर्व कळला. याप्रमाणें पुढें होत जाईल, तें वरचेवर लिहीत जावें. पातशाहाचे जाब शुके पाठविले, ते पावले." म्हणून पत्रीं आज्ञा. त्यास पातशाहा स्वारीस निघणार होते. त्यांजकडून पेशजीं शाहानिजामुद्दी राजश्री पाटिलबावांपासीं पिंगोरचे मुक्कामीं येऊन जाबसाल ठेराविला कीं, पातशाहांनीं स्वारीस न निघावें. जैपूरकरांचें पारपत्य पातशाहांचे एकबालेंकरूनच होईल. म्हणोन शाहाजीसीं बोलून त्यांस दिल्लीस मार्गस्त केलें. हल्लीं पातशाहा दिल्लीसच आहेत. व जैपूरकर पेशजीं सा लक्ष रुपये देऊन सलूख करीत होते, त्यास हे गोष्ट राजश्री पाटिलबावांनीं न मानली. त्याजवरून त्यांनीं राजे बिजेसिंग जोतपूरकर यांस लिहून पाठविलें. त्याजकडून भीमासिंग नामें बक्षी त्यांचे फौजेचा, वीस हजार फौज समागमें घेऊन कुमकेस आला आहे. जैपूरकर व जोतपूरकर एकविचारें होऊन झुंजास सिद्ध जाले आहेत. त्यांचे फौजेसीं व आपले सडे फौजेसीं पांचा साता कोसांचा तफावत आहे. लढाई रूबकार आहे. तूर्त मामल्याचा कांहीं जाबसाल नाहीं. पुढें ठरेल तें विनंति लिहूं. व इंग्रेजांचे वकिलाचें व पातशाहांचें बोलणें शिष्टाचार घरोब्याचें मात्र उजागिरीचें बोलणें जालें. तो तेव्हांच पातशाहांची आज्ञा घेऊन, राजश्री पाटिलबावांचे लष्करांत आला होता. हें वर्तमान पेशजीं पत्रीं विनंति लिहिली होती. त्याजवरून श्रुत जालेंच असेल. इंग्रेजांचे कंपू दारानगरीं वगैरे आपले सरहद्देस आपले मुलकाचा बंदोबस्त करून आहेत. पुढें अद्यापि हालचाल कांहीं केली नाहीं. पारसी येकबरा हल्लीं पाठविल्या आहेत; त्यांजवरून वृत्त श्रुत होईल. वरकड वर्तमान पुरवणीपत्रावरून कळून येईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २२३.

श्री. आगष्ट इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– छ. १८ माहे सव्वालीं राजे बिजेसिंग यांनीं सात हजार

सिंधी, भीमसिंग बक्षी यांचे कुमकेस पाठविले, ते लष्करांत राजे प्रतापसिंग याजपाशीं दाखल जाले, व राजे बिजेसिंग यांनीं राजश्री पाटिलबावांस पत्र पाठविलें होतें कीं, "आह्मी जमीदार आहोंत, आणि आपण वजीर आहांत. त्यास पूर्वापर तुह्मी आमचा प्रतिपाळ करीतच आलां आहांत. आह्मी तुमचे स्थापित आहोंत. याजकरितां कृपा करून, राजे प्रतापसिंग याजवर कृपालोभ करावा. तें मूल आहे. त्यांचे गुणदोषांवर दृष्टि न द्यावी. आह्मांवर दृष्टि देऊन पूर्वापर आमची स्थापना करीत आलां आहांत, तैसी आतांही स्थापनाच करावी." ह्मणोन लिहिलें होतें. याचें उत्तर राजश्री पाटिलबावांनीं काय लिहिलें, हें कांहीं समजल्यांत आलें नाहीं. याप्रमाणें पत्रें छ. १७ मीनहूस संध्याकाळीं आलीं; आणि सिंधी सात हजार त्याचे फौजेंत दाखल जाले. दुसरे दिवशीं संध्याकाळीं आपले कडील पलटणें त्याजकडे तोफा घेऊन उठोन गेलीं, व आपले फौजेंत रसद न ये. माहागाई रुपयाचें सा शेर अन्न ! व तिकडील जमाव भारी जाणून, फौज हिरासा होऊन, माघारा बुणगे वगैरे सांभाळून आले. पुढें काय सल्ला ठरेल, ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २२४.

श्री. आगष्ट स. १७८७.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. दुसरी लढाई छ० १२ माहे सवाल रोज मंदवारीं जाहाली. राणेखान भाई व राजश्री आंबाजी इंगळे व खंडेराव हरी वगैरे तोफखाना व फौजा राजांचे लष्करावर चालून गेले. तिकडूनही जैपूरवाले राजे व भीमसिंग राठोड व महमदबेग हमदानी वगैरे सर्व फौजा तयार होऊन आपले गोटांतून पौण कोसावर निघोन लढाई जाली. राठोडांनीं राजश्री आंबाजी इंगळे यांजवर चाल करून आले. परस्परें झुंज लागल्यावर राजश्री शिवाजी विठ्ठल यांचा पथक व राजश्री खंडेराव हरी व रायाजी पाटील पांच सात हजार स्वारांनसीं उठोन राठोडावर चालून गेले. यांचा त्यांचा झुंज रुबकर होऊन, शेवटीं राठोडास मारून माघारें घातलें. सोभाराम भंडारी व भीमसिंग राठोडाचा मेहुणा व याशिवाय पंधरा वीस मातबर जमादार रणांत पडले. व साहाशें लोक राठोडाकडील रणांत ठार राहिले, व जखमी हजार माणूस त्याजकडे जाहालें. अखेर राठोर माघारें हटून अर्ध कोस गेले. आपली बाजी शेर राहिली. राजश्री शिवाजीपंत बापूकडील चिमणाजी खंडेराव जखमी जाले, व तीस पस्तीस बारगीर व शिलेदार जखमी जाहाले. व मुर्तजाखान भडेच याचा भाऊ, गाजीखान

सरदार, तरवारचे जखमेंकरून रणांत राहिला. इकडील शंभर दीडशें लोक ठार जाले, व याप्रमाणें जखमी जाहाले. शेवटीं राठोडाचा मोड जाहाला. माघारें हटून गेले. फत्ते आपल्याकडील जाहाली. महमदबेग हमदानी यास इकडील तोफेचा गोळा लागला. हत्तीवरून खाले पडून मृत्यु पावला. येणेंप्रमाणें लढाई जाहाली. तोफखाना व पलटणें व फौजेची तरतूद लढाईचे समयीं राजश्री पाटिलबावांनीं फार चांगली केली. श्रीमंत साहेबांचे प्रतापेंकरून फत्ते जाली. पुढें ही लढाई रूबकर आहे. आपले लष्करचे बुणगे जैपूरकरांचे फौजेसीं आठा कोसांचें अंतर आहे. सडी फौज पांच कोस, पुढें जयपूरकरांचे फौजेसीं तीन कोसांचें अंतरानें राजश्री पाटिलबावा आहेत. तेथून दोन कोसांवर फौजा व तोफखाना व पलटणें झुंजास जातात. येणेंप्रमाणें लढाईची तरतूद आहे. उभयपक्षीं लढाईचा इरादा आहे. अद्यापि कांहीं सलुकाचा जाबसाल नाहीं. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ १४ जिल्काद समानीन.

लेखांक २२५.

श्री.

ता. २ आगष्ट इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १७ माहे सवाल मुक्काम लष्कर नजीक लालसोट प्रांत जैपूर जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं छ० २६ रमजानचीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन वर्तमान श्रुत जाहालें असेल. हल्लीं वर्तमान तरी पातशाहा दिल्लीस आहेत. दिल्लीस दोन पलटणें राजश्री लाडोजी देशमुख यांचे तैनातीस होतीं. त्यास सा महिने तलब चढली होती. ह्मणून पलटणवाल्यांनीं तलबेचा दंगा मोठा केला. दोन दिवस राजश्री लाडोजी देशमुखाचे हवेलीचा दरवाजा बंद होता. परस्परें लढाई होऊन, दाहा पांच माणूस मारलें गेलें. त्यावरून तें दोन पलटणें तेथून दूर करून, अंतर-वेदींत राजश्री गणपतराव कृष्ण यांचे तैनातीस पाठविलीं आहेत. त्याच ऐवजीं शाहा निजामुद्दी, पातशाहाकडील कारभारी, यांनीं दोन हजार माणूस चाकर ठेऊन, दिल्लीचे दरवाजे आदिकरून बंदोबस्त केला आहे. दिल्लीचे आसपास गव्हार गर्दी आहे, व शीख डलेवाले मार्ग चालूं देत नाहींत. येणेंप्रमाणें वृत्त आहे. वरकड सविस्तर पुरवणी पत्रांवरून व इकबारेवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २२६.

पैवस्ती छ० ९ जिल्हेज सन समान समानीन भाद्रपदमास.

श्री.

८ आगष्ट इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २३ माहे सवाल मुक्काम भुसावर प्रांत जटवाडा जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं छ० १७ माहे मजकूरचीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान, तारीख १८ मिनहूस राजश्री पाटिलबावाकडील आठ पलटणाचे कुमेदान व जमादार वगैरे लोकांनीं हंगामा तलबेसाठीं केला कीं, सा महिन्यांचे तलबेची निशा करून द्यावी. त्यांचे सात महिने चहडले होते. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं, राजश्री रायाजी पाटील यांचे विद्यमानें तीनमाहा द्यावा. त्यापैकीं एकमाहा नख्त देत होते व दोन महिन्यांची तनखा आगरियावर देत होते. त्यास पलटणवाले व गोलंदाज न मानीत. निदान दोन घटका दिवस संध्याकाळचा राहातांना आठ पलटणा व गोलंदाज तोफांसुद्धां तोफा सुमार ९६ व खुशालगडांत तोफा ७ एकूण एकशें तीन तोफा बमय पेट्या दारूच्या व गोळ्याचे छकडे, चार दिवस रात्रंदिवस झुंज लागलें आणि तोफखाना चालविला तर सामान पुरेल, याप्रमाणें साहित्य होतें. तें सर्व घेऊन राजे प्रतापसिंग यांचे लष्करांत जाऊन सामील जाले. आपले सडे फौजेसीं व राजाचे फौजेसीं दिडा कोसाचें अंतर होतें. तिकडून पांच सात हजार स्वार तयार होऊन, पुढें पलटणास सामोरा येऊन घेऊन गेले. पलटणवाल्यांचे संदर्भ राजाकडे पेशजींच आठ नव दिवस लागलाच होता. हें वर्तमान कोणास समजलें नाहीं. याप्रमाणें फितूर होऊन दंगा जाला. हें जाणून राजश्री पाटिलबावांनीं राजाचा शह सोडून, आपले बहिरबुणगे सांभाळून घेऊन, परगणे भुसावर येथें माघारा आले. येथून दरकूच दोन दिवसांनीं डिगेस जाणार. तेथें कांहीं दिवस राहून दिल्लीस पातशाहापासीं जावें, ऐसी सल्ला ठैरली आहे. परंतु डिगेस गेलियावर जे सल्ला प्रत्यास येईल, ते विनंती लिहूं. पहिले लढाई जाली, त्या समयीं सरकारची फत्ते होऊन नक्ष बराच जाला. परंतु पलटणांनीं फितूर केला, व मुरादबेग वगैरे हजार बाराशें राऊत हिंदुस्थानी मोंगलिये वगैरे उठोन गेले. त्याजवरून आपले फौजेस धीर न पुरे. ह्मणून सर्व लष्कर सांभाळून माघारा आले. हें वर्तमान सर्वांनीं ऐकून चहूंकडे गव्हार गर्दी जाली.
......................................जाबतेखानाचा पुत्र यांनीं ....

...........झिनाना, बरनावा, बडोद, बुढापा, वगैरे अंतरवेदींतील परगणे जप्त करून मेरटपावेतों आला आहे. परंतु अद्यापि मेरटचें ठाणें कायम आहे. आतां राजश्री पाटिलबावांची स्वारी डिगेस आली आहे. पुढें जो बंदोबस्त होईल, ते विनंति लिहूं. नजबकुलीखान दिल्लीपलीकडे विसा कोसांवर आहे, तेथेंच आहेत. अलिकडे आले नाहींत. व सरकारचे आमील आहेत, तेथेंही उपद्रव दिल्हा नाहीं, व कलकत्त्याचा लाट कलफदानीश सीतेन साहेबही कलकत्त्याहून कूच करून पटण्यास आला आहे. पुढें दरकूच लखनऊस येऊन फरुकाबादेस येणार आहेत. राजे प्रतापसिंग जयपूरकर यांचें व इंग्रजांचें सूत्र एकोप्याचें आहे, ह्मणून श्रवणांत आलें आहेत. प्रत्यास आलियावर समजल्यांत येईल, तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २२७.

पैवस्ती छ० २५ जिल्हेज सन समान समानीन. भाद्रपद मास बराबर कासीदजोडी.

श्री.

४ सप्टेंबर १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २१ माहे जिलकाद मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— इकडील वर्तमान तर, पेशजीं छ० २१ सव्वालीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं होतीं, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा दिल्लीस आहेत. नवाब जाबतेखान रोहिले यांचा पुत्र रोशनद्दौलेबाहादर गुलाम कादरखान यांनीं तमाम मेरट आदिकरून अंतरवेदींत सरकारचा अंमल उठवून मशारनिल्हेंनीं आपला बंदोबस्त केला, आणि आपण दिल्लीसमीप शाहदरियास आला. हें वर्तमान राजश्री लाडोजी नरसिंगराव देशमुख शितोळे व शाहा निजामुद्दी पातशाहाचे कारभारी यांनीं पाहून, दिल्लीहून पातशाहांस न पुसतां निघोन रात्रीस पळून गेले. त्यासमयीं देशमुखांची वस्तभाव वीस उंटें दिल्लीचे सोद्यांनीं लुटून घेतलीं, व शाहानिजामुद्दी न पुसतां गेला ह्मणोन त्याचे घरीं जप्ती जाली आहे व त्याचा भाऊ कैदेंत आहे. गुलाम कादरखान येऊन पातशाहांची मुलाजमत केली. पातशाहांनीं सातापारच्यांचा खिलत व जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी व ढाल तलवार, हत्ती घोडा येणेंप्रमाणें सन्मान केला. दुसरे दिवशीं त्यांची फौज कूच करून, यमुना उतरून अलीकडे येऊन, दिल्लीदरवाजापासीं व तुरकमान दरवाजापावेतों मुक्काम करून आहेत.

पातशाहांसीं जाबसाल आहे कीं, माझे आजास व माझे बापास जो किताब मीरबक्षीगिरी होती, त्याप्रमाणें आह्मांसही मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें द्यावीं. व माझे फौजेची हजीरी घेऊन भक्षावयास द्यावें. ह्मणोन नाजर मंजूरअलीखान यांचे विद्यमानें जाबसाल आहे. पाणिपतापासून तों अगरियापावेतों मुलूख होता, तो दरोबस्त ठाणीं उठोन पळून गेलीं. अवघ्या मुलखांत मराठा दृष्टीस न पडावा ऐसी बदअामली जाली. पुढें जें ठरेल तें विनंति लिहूं. राजश्री पाटिलबावांनीं आपलीं कुटुंबें व तोफखाना व नौबतखाना वस्तभाव सर्व ग्वालेरीस वाटे लाविलीं. त्याजवरून जितकी हिंदुस्थानी फौज होती, ते हिरासा होऊन त्यांजपासून उठोन दिल्लीस आली. कांहीं थोडी बहुत लोक राहिले आहेत. त्यास तमाम जटवाडांतील माहाल व अंतरवेदींतील लाऊन दिल्हे. जसा मुलूख मेळविला होता तैसाच गमाविला! कांहीं राहिला आहे तो, ज्या जबरदस्ताचा हात पोंहोचला, त्यानें जप्त केला. याप्रमाणें चहूंकडे गव्हारगर्दी जाली आहे. राजश्री पाटिलबावा अलवारेस गेले आहेत. तेथें रावराजानें एक लाख रुपये खर्चास दिल्हे. व किल्ला सरंजामसुद्धां अलवरेचा राहावयास खाली करून दिल्हा. राजश्री आंबाजी इंगळे यांचा बंदोबस्त आहे. यांस मेजमानी केली. सात किस्ती वस्त्रें, जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी, हत्ती एक व घोडे दोन नजर केले. राजश्री पाटिलबावांनीं रावराजाचे दत्त पुत्रास व बायकांस दक्षणी वस्त्रें दिल्हीं. याप्रमाणें वर्तमान आलें, त्याजवरून विनंति लिहिली असे. पुढें श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २२८.

श्री. ता. ५ सप्टेंबर इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. छ० २२ जिलकादीं दोन प्रहर दिवस चढतां, रोशनदौला गुलाम कादरखान, दो हजार रोहिले समागमें घेऊन, किल्ल्यांत पातशाहांचे दरबारास आले. दिल्लीदरवाजांत खल होऊन, तेथून आपला बंदोबस्त करीत, दिवाणखासांत आले. तसबीरखान्यांत पातशाहांस मुजरा केला, आणि विनंति केली कीं, "मजपासीं फौज जमा जाली आहे. नित्यानीं भक्षावयास पाहिजे. याजकरितां आपण फौजेस भक्षावयास द्यावें. जितके दिवस आज्ञा कराल, तितके दिवस दिल्लीस आपलेपाशीं राहूं. नाहींतर जे माझे आजास व बापास खिजमत होती, ते मजकडे सांगावी. दोन वस्त्रें द्या, ह्मणजे मी कूच करून आगरियाकडे

जटवाड्यांत जाईन.” याप्रमाणें विनंति केली. व खानमजकुराचे नेत्र आरक्त, बेबदल पाहून, खानमजकुरास दबून, मीरबक्षी अमीरुल-उमराईचीं वस्त्रें, सरबस्ता पागोटें बमय गोशवारा व सातपारचांचा खिलत व मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच, ढाल, तरवार, हत्ती, घोडा येणेंप्रमाणें इनायत करून, खालसेवाले सिधराय याचा भाऊ व धारीराय याचा भाऊ दोघेजण हजर होते, त्यांस आज्ञा केली कीं, “तुह्मी खालशाचा कागद समजाऊन, मीरबक्षीगिरीचे माहाल वेगळे काढून, सनद करून देणें, व खालशाचेही माहाल त्यांचीही मुख्यत्यारीचा कारभार बंदोबस्त रोशन-दौला बाहादर करतील.” याप्रमाणें आज्ञा जाली. व फराशास आज्ञा जाली कीं, “तुह्मी यांस मखतबखान्यांत फर्श करून देणें. त्याजवरून खानमजकूर बमय कारभारी व खालशाचे मुत्सद्दी बसून, माहालांची निवडानिवड करून सनद करून घेतली. खानमजकूर रसद घेऊन पातशाहास मुजरा केला. तरवारीची नजर करावयास एक मोहोर पाहिली, तर कोठें न मिळाली! हे अवस्था मीर-बक्षीगिरीची आहे! ज्या समयीं खिलतवस्त्रें दिधलीं, त्या समयीं पातशाहा व नाजर व जितके पातशाही खवास, खोजे व मुत्सद्दी, दिल्लीचे लोक मुजराही होते, तितके बहुत दिक व नाखुश जाले. कोणी कोणी बोलिले कीं, “या खिजमतीस हे योग्य नाहींत”! त्याजवरून पातशाहा बोलिले कीं, “दिल्लीहून बलाय काढून कशी तरी द्यावी, इतकाच मात्र विचार आहे. नाहींतर रोहिल्यानें शहरावर हात घातला, तर येथें सांभाळणार कोण आहे? याजकरितां यास येथून काढून द्यावें. याचा संतोष राखावा. हेच सलाह आहे.” ह्मणोन नाजरासीं विचार करून, वस्त्रें जवाहीर देऊन त्यास बिदा केलें. मशारनिल्हे आपले लष्करांत जाऊन तोफा सोडल्या, व अबघे जमादार व मुत्सद्दी सर्वांनीं नजरा केल्या, व समरूचे बेगमेनेंही ताबेदारी करावी, याप्रणें कारभार ठरला. पुढें अमलांत येईल तें विनति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.”

लेखांक २२९.

पैवस्ती छ० २५ जिल्हेज सन समान समानीन भाद्रपद मास.

श्री.

७ सप्टेंबर इ. स. १७८७.

“श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २४ माहे जिलकाद मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः— छ० २२ साबानचें आज्ञापत्र पाठविलें, तें छ० २१ जिलकादीं पावलें. पत्रें उशिरां पाठवावयाचें कारण हेंच कीं, कासीद मार्गीं

दुखण्या पडला होता, सबब दिवसगत लागली; ह्मणोन कासिदानें सांगितलें. त्यास पेशजीं छ० २१ मिनहूस विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं पत्र आलें, त्यांत आज्ञा कीं, "तिकडील वृत्त होत जाईल, तें वरचेवर लिहीत असावें. टिपूकडील वकील सरकारांत राजश्री हरिपंतांकडे व राजश्री तुकोजी होळकर व राजश्री गंगाधरराव रास्ते यांचे विद्यमानें आले आहेत, हें पूर्वीं तुह्मांस लिहिलेंच आहे. त्याजवर वकिलासीं बोलणें जालें कीं, नवाबसुद्धां तह ठरला. सरकारचा चार साला पेशकसीचा ऐवज राहिला, तो द्यावा. बदामी, नरगुंद, कितूर, हे तिन्ही किल्ले तालुकेसुद्धां सरकारांत द्यावे, व नवाबाकडील अदवानी तालुकेसुद्धां सोडावी. परस्परें दिलसफाईनें राहून, कोणी कोणाचे मुलखांत उपद्रव करूं नये. याप्रमाणें तह ठरला. सरकारचे पेशकसीचे ऐवजास तीन हप्ते लाविले. पैकीं दोन हप्त्यांचा भरणा जाला. एक राहिला तोही होईल. बदामी, नरगुंद, कितूर, येथें सरकारचीं ठाणीं बसून, अंमल नवाबाकडील ठाणें अदवानींत बसलें. राजश्री हरीपंत फौजेसुद्धां माघारा फिरोन देशीं आले. तुह्मांस कळावें. पातशाहास अर्ज करावा. उत्तर होईल, तें लिहून पाठवावें." ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणें हें वर्तमान सविस्तर पातशाहास निवेदन केलें. हें ऐकून आज्ञा केली कीं, "म्यां राजश्री पाटीलबावांस शुके लिहून पाठविले कीं, जैपूरकर मथुरेचे व डिगेचे मुक्कामीं मामला करितात, तो करूं न द्यावा, व मथुरेस छावणी करून, चहूंकडे दबाव देऊन, आपले मुलकाचा बंदोबस्त राखून असावें. बादबरसात आह्मीही स्वारीस बाहीर निघूं. मग जे सल्ला असेल, ते करूं. तुह्मी तोफखान्याचा व पलटणाचा भरणा फार केला आहे, हें ठीक नाहीं. पूर्वीये (परभये ?) लोक दगेखोर असतात. यांस भक्षावयास मिळेल, तोंपावेतों उगेच राहतील. नाहींतर दंगा करतील; दगा देतील. ह्मणोन शाहानिजामुद्दीसमागमें सांगोन पाठविलें. आह्मीं दोन गोष्टी सांगितल्या. त्यांतून एकही गोष्ट न मानितां जयपुरास गेले. तेथें तहबारीखालें येऊन पलटणें उठोन जाऊन खराब जाले. याहीवर आह्मीं लिहून पाठविलें कीं, तुह्मीं दिल्लीस येणें. तेंही न ऐकतां कूच करून अलवारेकडे गेले. आह्मांपासीं राजश्री लाडोजी देशमुख शितोळे होते. त्यांचें समाधान व खातरजमा केली कीं, तुह्मीं आपले खातरजमेनें मजपाशीं असावें. रतिभार भय नाहीं. मनांत संशय न आणावा. व शाहानिजामुद्दीस आज्ञा केली कीं, तुह्मी दोन चार हजार स्वार प्यादे ठेवणें. त्याप्रमाणें त्यांनीं स्वार प्यादेही ठेविले. इतकियांत सल्ला ठैरली कीं, यमुनापार स्वारप्यादे उतरून, रोशनदौला गुलामकादरखानासीं झुंजून, काढून

द्यावें. त्यास दोन कंपण्या प्यादे व माधवराव फाळके इतके मात्र यमुनापार उतरले होते. त्यांसीं झुंज जालें. दोन कंपण्यांच्या प्याद्यांपैकीं दहा वीस माणूस मारले गेले. कांहीं बुडून मेले. कांहीं पळून गेले. माधवराव फाळके शाह-दरियांत घुसून दरवाजे बंद करून बसले. हें वर्तमान सविस्तर देशमुखानें व शाहानिजामुद्दीनें पाहून, आह्मांस न पुसतां पळून रात्रीस गेले." याप्रमाणें बोलणें पातशाहाचें होऊन, पुढें श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींची तारीफ केली कीं, "ते आमचे कदीमी फिदवी व पातशाही फर्जंद आहेत. त्यांजकडून सर्वप्रकारें आमची खातरजमा आहे, व ज्या समयीं जो सरदार फौजसुद्धां येईल, त्याचें घर आहे. राजश्री महादाजी शिंदे उगीच आह्मांकडील कांहीं नालिश लिहितील. ते खातेरस न आणावी. तुह्मांखेरीज आह्मांस खैरख्वा दुसरा नाहीं." ह्मणोन बोलणें नवाब मंजूरअल्लीखान नाजर यांचे विद्यमानें होऊन, श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचे नांवें शुका लिहून दिल्हा. आणि आह्मांस आज्ञा जाली कीं, हें बोलणें सविस्तर तुह्मीं त्यांस लिहून पाठऊन, उत्तर सत्वर आणवणें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. तर पातशाहांचे शुक्याचा जाब बहुत खुशामतीचा व शिष्टाचाराचा व नवाब मंजूरअल्लीखान नाजर यांस शिष्टाचाराचा स्नेहवृद्धीचें पत्र-खलिता ऐसीं दोन्ही खलिते व पत्राचीं उत्तरें सत्वर पाठऊन द्यावीं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

पैवस्ती छ० ५ रविलावल सन समान समानीन.


लेखांक २३०.

श्री.

१७ आक्टोबर इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ५ माहे मोहरम मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— आपण छ० १ सवालचें आज्ञापत्र पाठविलें, तें छ० १५ जिल्हेजीं मुक्काममजकुरीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "तिकडील वर्तमान होत जाईल, तें वरचेवर लिहित जावें. टिपूचें सलूख जाल्याचें व राजश्री हरीपंत फौजसुद्धां देशीं आल्याचा मजकूर पूर्वी सविस्तर लिहिला आहे, त्यावरून सर्व कळलें असेल. त्याप्रमाणें पातशाहांस अर्ज करावा. प्रस्तुत पाटिलबावा कोठें आहेत, जैपुरकराकडील वर्तमान काय, राणेखान यांचे विद्यमानें बोलणें लागलें होतें त्याचें काय जालें, पुढें काय करणार, हें सविस्तर लिहून पाठवावें." ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास इकडील बारीक मोठें वृत्त छ० २१ व छ २४ जिल्कादीं



दिल्ली येथील बादशहाच्या वेळचा निमाज.

विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर श्रुत जालेंच असेल. त्यास राजश्री पाटिलबावा तूर्त अलवारेस रावराजा प्रतापसिंग याचे मुलकांत जयपुर प्रांतीं आहेत. विजयादशमी जालियावर कूच करणार, ह्मणोन बोलणें आहे. कूच जालियावर काय करणार, हें प्रत्ययास आलियावर विनंति लिहूं. व राणेखानभाईचे विद्यमानें बोलणें जयपुरकरांचें लागलें होतें. परंतु बोलणें पक्कें ठरलें नाहीं. जयपुरकरांची फौज सोळा कोसांचे अंतरानें मुक्काम करून राजासुद्धां आहे. व टिपूकडील सलूक जाल्याचें व राजश्री हरीपंततात्या पुण्यास आल्याचें वर्तमान सविस्तर पातशाहांस निवेदन केलें. त्याचें उत्तर पेशर्जी पत्रें पाठविलीं आहेत, त्यांजवरून श्रुत जालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, रोशनदौला गुलाम कादरखान रोहिले यांस बक्षीगिरीचीं वस्त्रें देऊन, करार मदार जाला कीं, पातशाही मुलूख व जागीरदारांच्या जागिरा व बेगमा व पातशाहाजादे आदिकरून सर्वांच्या, सोडाव्या ह्मणोन बोलण्यांत येऊन, खानमजकुरानीं जप्त्या केल्या होत्या त्याच्या दरोबस्त सोडचिठ्या देऊन, आपण यमुना उतरून, शाहदरियापाशीं यमुनापार जाऊन मुक्काम केला. इतकियांत खैरुन्निसा बेगम, पातशाहाची बहीण धाकटी, इचा पैगाम खानमजकुरास गेला कीं, "मजपासून बारा लक्ष रुपये घ्यावे. आणि माझे भाऊ आणीक पांच जण आहेत, त्यास एकास पातशाहा करावें." ह्मणोन परस्परें संधान लागलें. त्यास बेगमेचे देवडीवरील दोन प्यादे रवणे होते, त्यांचे विद्यमानें जाबसाल होता. त्यांतून एक प्यादा फुटून, गुलाम कादरखान यांची चिटी आली होती तेच बजिन्नस धरून पातशाहांस दिधली. त्यांतून एक प्यादा पळून गेला, व एक कैदेंत आहे. त्याजवरून पातशाहांची व गुलाम कादरखान यांची बेमजगी होऊन, जितका पातशाही खालसा व बेगमा व पातशाहाजादे वगैरे जागीरदार यांचा मुलूख सर्व अंतर्वेदींतील जप्त केला आहे; आणि पातशाहांसीं झुंजास मुस्तेद आहे. रोहिल्यांपासीं स्वार प्यादा मिळून दहा हजार फौज आहे. आणि इकडे पातशाहापासींही दाहा बारा हजार स्वार प्यादा आहे. दिल्ली शहरचा बंदोबस्त करून आहेत. जर रोहिला यमुना उतरून पार आला, तर त्यासीं झुंजावें. यमुनापार न आला, तर पंचवीस तीस हजार स्वार प्यादा जमा करून यमुना उतरून रोहिल्यांचें पारिपत्य करावें, या विचारांत पातशाहा आहेत. याजकरितां राजश्री पाटिलबावांस दोन शुके पाठविले कीं, तुह्मींच कूच करून दिल्लीस येणें; नाहीं तर कांहीं फौज पाठविणें. त्यास या दोन्ही गोष्टींतून एकही गोष्ट प्रत्ययास न आली. त्यांजपासीं फौजच नाहीं. मग फौज कोठून पाठविणार?

त्यांस तों रजपुतांचा शह सोडून येतां न ये, आणि पातशाहांस तों फौजेची गरज. ह्मणोन नजबकुलीखान व इस्माईल बेग व अनुपगीर गोसावी व इंग्रेज या सर्वांस फौजांविसीं शुके गेले आहेत. त्यांपैकीं नजबकुलीखान कूच करून रेवाडी अलीकडे पाटोदीस आला आहे. दिल्लीस येणार. तो दिल्लीस दाखल जालियावर पातशाहांची मुलाजमत जालियावर पुढें काय सल्ला ठरेल, तें विनंति लिहूं. परंतु यमुनापार गुलाम कादरखान व यमुनावार पातशाहांची फौज, दोहीकडे फौजा झुंजास मुस्तेद आहेत. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. या दिवसांत पातशाहांस फौजेची गरज फार आहे. नित्यानीं विचारितात कीं, "तुह्मांकडील सरदार व ताजी फौज कधीं येणार ?" त्यास आह्मीं विनंति केली कीं, विजयादशमीचे मुहूर्तें तेथून निघोन एका महिनियांत हुजूर येऊन पावतील. ह्मणोन विनंति पातशाहांस केली आहे. प्रत्ययास येईल तें खरें. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति.

कदाचित् आपण आज्ञा करतील कीं, विजयादशमीस तेथून निघोन येणार, हें कशावरून विनंति केली ? त्यास राजश्री पाटिलबावांचे येथें कृष्णराव महादेव यांचे विद्यमानें सरकारचें पत्र आलें कीं, अल्लीबहादर व गणेशपंत बेहेरे यांचे बंधू व शाहाजी भोंसले व वोढेकर व गायकवाडाकडील फौज ऐसी हिंदुस्थानांत रवानगी जाली, ह्मणून लिहिलें आलें. त्याजवरून पातशाहांस विनंति केली. कळावें. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३१.

पैवस्ती छ० ८ रविलावल
सन समान समानीन.

श्री.

२० नोव्हेंबर इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:-

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० ९ माहे सफर मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः- इकडील वृत्त पेशजीं छ० ५ मोहरमीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा दिल्लींत शहरचा बंदोबस्त करून आहेत. गुलाम कादरखान रोहिले पातशाहांसीं बेबदल होऊन, शाहदरियापासीं यमुनापार अंतर्बेदींत मुक्काम करून आहेत. व राजश्री पाटिलबावा रेवाडी पाटोडीवर मुक्काम करून आहेत. राजश्री आंबाजी इंगळे यांस पातशाहापासीं बकलातीस पाठविलें होतें कीं, "गुलाम कादरखान यांनीं बेआदाई केली; ह्मणोन यांचे पारपत्यास आह्मीं

आलों आहोंत. त्यास जैसी मर्जी असेल तैसी वर्तणूक करूं." ह्मणून सांगोन पाठविलें होतें. त्यास, पातशाहांनीं आज्ञा केली कीं, "जुवाबक्ष पातशाहाजादा व अनुपगीर गोसावी व इस्माईल बेग व मलक महमदखान व राजे जयपूरकर वगैरे दिल्लीचे मोंगलीये ऐसे एक विचारें जाले आहेत. यांचें मानस कीं, तुह्मीं दिल्लीस न यावें. हे तुह्मांसीं सर्व दिक आहेत व फिरले आहेत. जर तुह्मी जबरदस्तीनें याल, तर तुह्मांपासीं फौज थोडी. व हे झुंजावयास सिद्ध आहेत. याजकरितां चार दिवस तुह्मीं रेवाडी पाटोदीचें मैदानांतच असावें. व पातशाहाजादा वृंदावनास मथुरेस आहे. त्यास म्यां बोलाविलें आहे. तो मजपासीं दाखल जालियावर मग तुह्मांस लिहून पाठऊं. त्या अन्वयें करावें." ह्मणून पातशाहांनीं आज्ञा केली. व शुकाही या अन्वयें लिहून दिल्हा. व आंबाजी इंगळे यांस खिलत पांच पारचे, मोत्यांची कंठी, जेगा, शिरपेंच, तरवार, येणेंप्रमाणें; व त्याजसमागमील चौघे मुत्सद्दी त्यांस निमअस्तीना व दोन शिरपेंच व चार दुशाले, येणेंप्रमाणें इनायत करून, रुकसत राजश्री पाटिलबावांकडे केलें. ते रेवाडीस गेले. पातशाहांनीं आपलेकडून भले माणूस पातशाहाजाद्यास आणावयास पाठविले आहेत. पातशाहाजादा दिल्लीस दाखल होय तोंपावेतों, राजश्री पाटिलबावा रेवाडीस व गुलाम कादरखान दिल्लीचे आसपास वारपार राहतील. शाहजाद्याची व पातशाहांची भेट जालियावर पुढें येथील काय नक्षा ठरेल, त्याप्रमाणें विनंति लिहूं. वरकड विस्तारें वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार धणी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० ८ सफर

लेखांक २३२.

मार्गशीर्ष.

श्री.

२० नोवेंबर इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ९ माहे सफर मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– पेशजीं इकडील वर्तमान सविस्तर छ० ५ मोहरमीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, ते पाऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा दिल्लीचे शहराचा व किल्ल्याचा बंदोबस्त करून आहेत. गुलाम कादरखान शाहदरियापासीं यमुनापार बदस्तुर आहे. नित्यानीं लढाई रुबरू आहे. राजश्री पाटिलबावा अलवारेहून दिल्लीस यावयाबद्दल कूच करून रेवाडीस आले आहेत.

मार्गीं येतांना बहीर बुणगे मेवाती यांनीं बहुत लुटिलें. त्यास, खासे रेवाडीस मुक्काम करून, राजश्री आंबाजी इंगळे यांस पातशाहापासीं दोनतीनशां रावतांनिसीं पाठविलें आहे. छ० २ मीनहूस यमुनातीरीं राजघाटावर येऊन उतरले आहेत. नाजर मंजुरअल्लीखान याजकडे राजश्री शामराव आपाजीस पाठविलें होतें. बहुताप्रकारें नाजरजीसीं बोलणें राजश्री पाटिलबावांकडील जालें कीं, "आमची बाजी बिघडली आहे. मुरबेगिरी करून, पातशाहांस विनंति करून, पूर्ववत्प्रमाणें आमचा बंदोबस्त होय, तो अर्थ करावा. आह्मीं आपले आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं." ह्मणून शामराव आपाजीचें बोलणें राजश्री पाटिलबावांकडून जालें; व आणभाख-वचनप्रमाण बेलभंडार द्यावयास सिद्ध जाले. परंतु नाजरजीची खातरजमा न जाली. व बोलिले कीं, "राजश्री पाटिलबावा दगाबाज आहेत. राघोगडकर राजास व गोहदकरास व फरोकाबादवाले खानसामा व सुजादिलखान व सुजातखान वगैरे लोकांसीं आणभाख कौल करार करून, बेलभंडार देऊन, दगा करून, कैद करून मारून टाकिलें. याजकरितां आह्मांस भरंवसा पुरवत नाहीं." ह्मणोन बोलणीं बोलून, रावमजकुरास मार्गस्त केलें. त्यांनीं जाऊन सविस्तर वृत्त आंबाजी इंगळे यांस सांगितलें. गोष्टीचा जवा न बसला. पातशाही कारभारी व दिल्लीवाले मोंगलिये या सर्वांचे मतें, राजश्री पाटिलबावांची मुख्त्यारी नसावी. व पातशाहांची मर्जी आहे कीं, सलतनतीचें काम आटोपील ऐसा राजश्री पाटिलबावावांचून दुसरा माणूस नाहीं. ह्मणून पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस बोलाविलें आहे. व नाजर मंजुर-अल्लीखान वगैरे मंडळींची मर्जी कीं, राजश्री पाटिलबावा नसावा. ऐसी दुई लागली आहे. त्याजवरून पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस लिहून पाठविलें आहे कीं, दोन चार रोज तुह्मीं रेवाडीसच मुक्काम करून असावें. व आंबाजी इंगळेही दिल्लीसच आहेत. यांची व पातशाहांची मुलाजमत जाली नाहीं. पातशाहांनीं सल्ला ठैराविली आहे कीं, जुवाबख्त पातशाहाजादा अकबराबादेस आला आहे. त्यास ममतेंत घेऊन, प्रथम दिल्लीस आपलेपासीं बोलवावें. त्याज सांगातें अनुपगीर गोसावी व मलक महमदखान व इस्माईल बेग व राजे जैपूरकर यांची फौज वगैरे पंधरा वीस हजार स्वारांचा जथा आहे. जर पाटिलबावांस प्रथम दिल्लीस बोलवावें, तर हे मंडळी पातशाहाजाद्यापासीं जमा जाली आहे. या सर्वांसीं व राजश्री पाटिलबावांसीं बिघाड आहे. याजकरितां पातशाहाजाद्यावर छत्र फिरवून त्यास आगरियांत पातशाहा केलें, तर त्यांसीं झुंजणें प्राप्त आहे. एक गुलाम कादरखान पांच सात हजार फौजेचा सरदार आहे. तो मसीं बिघडून किल्ल्यांत गोळे टाकितो. त्याचें पारपत्य आमच्यानें होत नाहीं! तेव्हां

वीस पंचवीस हजार स्वार प्यादा समागमें आणि पातशाहाजादा धणी, तेव्हां त्यांसीं कोणीं झुंजावें ? हा विचार करून, अहमदअल्लीखान ह्मणून मातबर माणूस पातशाहांनीं पातशाहाजाद्यास वस्त्रें देऊन पाठविला आहे. त्यास पातशाहाजाद्याच्याही अर्ज्या आल्या आहेत कीं, मी दिल्लीस आपलेपासीं आल्याखेरीज राजश्री पाटिलबावांस न बोलवावें. ह्मणून लिहिलें आहे. त्याजवरून तूर्त राजश्री पाटिलबावांस रेवाडीस राहाणें प्राप्त जालें आहे. पातशाहाजादा दिल्लीस आलियावर व पातशाहांची भेट जालियावर पुढें सल्ला ठैरेल, तें विनंति लिहूं. तूर्त पातशाहापासीं कारभारी नाजर आहे. याची मर्जी आहे कीं, गुलाम कादरखान यास बगलेंत घेऊन, व दिल्लीवाली फौज पातशाही दाहा पंधरा हजार आहे हे सर्व एकत्र करून, पाटिलबावांवर घालून, त्यांस रेवाडीहून हुसकून द्यावें कीं, पुन्हां दिल्लीचें नांव न घेत. याप्रमाणें यांची मर्जी आहे. राजश्री पाटिलबावांपासीं फौज थोडी आहे. कुल फौज दाहा बारा हजार आहे. याजकरितां पातशाहांसही धीर पुरून बेधडक राजश्री पाटिलबावांस बोलावूं शकत नाहीं. याप्रमाणें येथील वृत्त आहे. पातशाहांची व पातशाही मंडळींची मर्जी आहे कीं, नवा दक्षणी सरदार चांगला व फौज मातबर व कारभारी शाहाणा आला, तर त्यासीं रुजूं होऊन आपले घरची मुख्त्यारी सांगावी. परंतु अतःपर राजश्री पाटिलबावांस दिल्लींत दखल देऊं नये. ह्मणोन परस्परें आपसांत बोलणें आहे. प्रत्ययास येईल तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २३३.

श्री. इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे. राणेखानभाई व रायाजी पाटील व जिवबा बक्षी चर्मनवती उतरोन अकबराबादेस गेले. तेथें उमरावगिरी गोसावी मोर्चे लावून होते. त्यांसीं लढाई घेऊन त्यांस पाडाव करून धरून आणिलें. उमरावगीर पाटिलबावांजवळ आल्यावर खातरजमा करून वस्त्रें वगैरे सरंजाम देऊन सांगितलें कीं, राहणें तरी सुखरूप रहावें. जावयाचें असल्यास अवरोध नाहीं. विचारास येईल तैसें करावें. त्याजवरून आपले संतोषानें राहिले आहेत. राणेखानभाई फौजसुद्धां रंजितसिंग जाट यास सामील करून भरतपूर नजीक मुक्काम करून राहिले. जाटांनी चौदा पंधरा हजार जमाव केला आहे. इकडे गुलामकादर व इस्माईल बेग यांसी

परस्परें सख्य होऊन दस्तार बदल जाली. पातशाहातीचा बंदोबस्त उभयतांनीं मिळोन करावा. सांप्रत लढाईस सामील असावें. याप्रमाणें ठैरावून, आपली व जाटाची फौज एक जागा होती, तेथें लढाईस आले. दीड प्रहर जुंज जालें. उभयतां फौजांतील हजार बाराशें माणसें ठार व जखमी बहुत जालें. आपले फौजेचा पाय न टिकला. माघारा डेऱ्यास आले. जाटांकडील दहा बारा तोफा व सरंजाम निशाणें वगैरे गेलीं. तेव्हां जाटांनीं आपले फौजेस निषेध करून राणेखानभाई यांची खातरजमा करून सांगितलें कीं, आजची लढाई न बनली, त्यास चिंता नाहीं. मागतीं आपली फौज संभाळून लढाईची सिद्धता करावी. ह्मणोन जमाव करून मुकाबला जाला. एक वणजारा सात आठशें बैल मार्गीत उतरला होता. त्याजवर आपलेकडील भाई व रायाजी पाटील व बक्षी फौज घेऊन गेले. तिकडून गुलामकादर व इस्माईल बेग आले. त्यांसीं लढाई जाली. त्यांत जखमी व ठार बहुत जाले. नांवनिसी लिहिण्यांत आली नाहीं. मागाहून साकल्य विनंति लेहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३४.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे:– इस्मायल बेग यास रेवाडीकडे नजबकुलीखानाचे पारिपत्यास पाठविलें होतें. त्यास, उभयतांसीं मातबर लढाई होऊन, नजबकुलीस मारून चालविलें. त्यानें दोन मास गांवाचा आसरा धरून लढाई केली. मग सलूख ठरला. त्यानें जागा वांटणी करून दिल्ही. याप्रमाणें एकबारेंत वर्तमान आलें, तें सेवेसीं लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३५.

पैवस्ती छ० १० रविलाखर
सन समान समानीन पौषमास.

श्री. १९ डिसेंबर इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० ८ माहे रविलावल मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– आपलीं आज्ञापत्रें छ० १० व छ० १२ जिल्कादचीं सदरहू दोन पत्रें पाठविलीं, तें छ० १६ सफरीं मुक्काममजकुरीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, "प्रस्तुत राजश्री पाटिलबावा कोठें आहेत, व जैपुरकर कोठें आहेत, व पुढें मन-

सबा काय आहे, तें लिहून पाठविणें. व तिकडील वृत्त वरचेवर लिहित असावें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास छ० ९ माहे सफरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत व एकबारा पाठविल्या आहेत. त्याजवरून सविस्तर श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, राजश्री पाटिलबावा, कौलची झील आगरियाचे अलिकडे बारा कोसांवर आहे, तेथें मुक्काम करून आहेत. आगरियाचे किल्ल्यांत अद्याप राजश्री पाटिलबावांचा बंदोबस्त आहे. इस्माईल बेग यांनीं आगरियाचे किल्ल्याचे आसपास मोर्चे यांचा बंदोबस्त करून, आपण फौजसुद्धां राजश्री पाटिलबावा यांचे मुकाबलियास, सिकंदरा ह्मणोन आगरियाहून चार कोस जागा आहे, तेथें मुक्काम करून आहे. यांचे आगाडीचे फौजेचा व त्यांचे फौजेचा दोन कोसांचा तफावत आहे. झुंज गोळागोळी रूबकार आहे. व जैपूरकर राजे पाटणास लग्न करावयास गेले होते. ते लग्न करून माघारा राजश्री पाटिलबावांचे पिच्छावर आगरियाकडे येणार. जितके हिंदुस्थानी मोंगलिये व राजे जैपूरकर व जोतपूरकर या सर्वांचें मानस कीं, राजश्री पाटिलबावांस अवघे एकत्र होऊन चमेलपार करून द्यावें. व निदान बनल्यास व मऊ लागल्यास ग्वालेर प्रांत देखील खाली करून घ्यावा. ऐसी सर्वांची मसलत आहे. व राजश्री पाटिलबावा यांचें मानस कीं, सर्वस्व वेंचावें, परंतु जैपुरकरांचें व जोतपुरकरांचें पारिपत्य करावें व पातशाहाचे घरची मुख्त्यारी करावी. ऐसें यांचें मानस. समागमें फौज राजश्री शिवाजी विठ्ठल आदिकरून पागनीस व आंबाजी इंगळे व पागे व शिलेदार वगैरे मुत्सद्दी हे सर्व नामाफकत. कोणाचीही चित्तशुद्धता नाहीं. सर्व दाबाखालें व मर्जीनरूप आचरण करून आहेत. याचें कारण हेंच कीं, खुद्दपसंतीनें आजपावेतों जो कारभार करणें तो केला. व पुढेंही खुद्दपसंतीनें करितात. कोणाची सल्ला मसलत पसंत पडत नाहीं. ह्मणोन मंडळी मनोमय खिन्न आहेत. याप्रमाणें श्रवणांत आलें, त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० १० रबिलाखर

लेखांक २३६.

सन समान समानीन पौषमास. **श्री.** १९ दिसेंबर इ. स. १७८७.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० ८ माहे रविलावल मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः— आज्ञापत्रें छ० १० व छ० १२ जिलकादचीं सादर

जालीं. तें छ० १६ सफरीं पाऊन शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, तिकडील वर्तमान वरचेवर लिहित जाणें ह्मणोन आज्ञा. त्यास इकडील वृत्त पेशजीं छ० ९ सफरीं विनंतिपत्रें पाठविलीं होतीं, तें पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, गुलाम कादरखान यास पातशाहांनीं रुकसतीचीं वस्त्रें देऊन बिदा केलें. ते कूच करून दिल्लीपासून सिकंदरा व खुर्जा वगैरे किल्ल्यांत ठाणीं बसवीत कोलजलेश्वराकडे गेले. कोलेंत ठाणें बसवून रामगडावर फौज पाठविली आहे. मोर्चे लाऊन किल्ला खाली करून घ्यावा, या विचारांत आहेत. व पातशाहाजादा जुवाबक्ष दिल्लीस पातशाहापासीं दाखल जाला. परस्परें भेटी होऊन, पातशाहांनीं साता पारचांचा खिलत, बमय सरबस्ता, पागोटें, व जेगा, शिरपेंच व मोत्यांची कंठी, ढाल, तरवार, हत्ती घोडा, व आगरियाची सुभेदारी, येणेंप्रमाणें देऊन सन्मान केला. व पातशाहापासीं फौज होती त्या जमातदारास आज्ञा केली कीं, तुह्मीं पातशाहाजाद्यासमागमें असावें. हे तुमचे पोटाची सोय करून देतील. यांचे आज्ञेनरूप वर्तावें. ह्मणोन आज्ञा जाली. पुढें पातशाहाजाद्याचा विचार कीं, स्वारीस निघोन कांहींएक मसलत करावी. घडल्यांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. वरकड विस्तारें वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्याजवरून व पारसी एकबरा पाठविल्या आहेत त्याजवरून श्रुत होईल. कृपा करणार धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३७.

श्री. इ. स. १७८७.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे- राजश्री आंबोजी इंगळे पाणिपताकडे सरसुभेदार होऊन गेले आहेत. त्यास भंगेलसिंग शीख एकहजार स्वारांचा सरदार, त्यास चौ लक्षा रुपयांचे प्रगणे सरंजामांत लावून दिल्हे आहेत. याजकरितां मशारनिल्हे एक हजार स्वारांनशीं राजश्री आंबोजी इंगळे यांजसमागमें आहेत. डलेवाले कर्मसिंग व गुरुदत्तसिंग वगैरे दहा बारा हजार फौजेनशीं शीख इंगळेमजकुरांचे सन्मुख आले आहेत. यांची त्यांची नित्यानीं गोळागोळीची लढाई होत असते. इंगळे ह्मणतात कीं, सा आणे दरस्वारीं दररोज घेऊन चाकरी करावी. डलेवाले शीख ह्मणतात कीं, ज्याप्रमाणें भंगेलसिंगास परगणे लावून दिल्हे आहेत, त्याप्रमाणें आह्मांसही लावून द्यावे, ह्मणजे उत्तम. नाहींतर अंतरवेदींत आमची रखी दर

रुपयास आठ आणे आहेत, सुरळीत द्यावी. ह्मणजे आह्मी आपले रफिकतींत राहूं. ह्मणून बोलणीं बोलतात. अद्यापि एक तह ठरला नाहीं. गुलामखा, जाबतेखानाचा पुत्र, यांच्या व इंगळेमजकुरांच्या भेटी जाल्या. दोन्ही फौजा मिळोन जमाव भारीच आहे. पुढें डलेवाले शिखांचा तह ठरून परस्परें भेटी होतील, तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २३८.

श्री. इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-पातशाहाची मर्जी कीं, पोटास मात्र लक्ष दीड लक्ष रुपये दरमहा देत जावा. वरकड राजकारभारासीं व दौलतीसीं यांस गरज नाहीं. ऐसी यांची प्रकृत आहे. व यांचे पुत्र वगैरे शाहाजादे मिळून शेंदीडशें असामी आहे. परंतु त्यांतही कोणी जुरतवाला व दैववान् दिसत नाहीं कीं, पातशाहीस आळा घालून दौलत आटोपील. याजकरितां विनंति येथील रीत व प्रकार पाहून लिहिली आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेब प्रारब्धवान् प्रतापवंत आहेत. यांचे दैवेंकडून पातशाहाचे घरची मुख्त्यारी पदरीं पडली आहे. याजकरितां............ हजार फौज सडी चांगली व सरदार मातबर व कारभारी राजश्री त्रिंबकराव मामा व विसाजीपंत बिनीवाले यांचे प्रतीचा शाहाणा माणूस इकडे रवाना जालियास, जितके हिंदुस्थानी लहान थोर आहेत, त्यांस पोटसीं धरून कांहीं दिवस त्यांचें पाळीग्रहण करून, दौलत हाताखालें घालून, जैसें सातान्याचें संस्थान आपले स्वाधीन आहे, तैसें दिल्लीचें संस्थान आपले स्वाधीन राहे, ऐसा समय आहे. या दौलतीस दोन रोग आहेत. एक अबदाली, व एक इंग्रेज. त्यास अबदाली तर दूर, व त्यास त्या प्रांतीं पायबंदी भारी. त्याचें येणें इकडे होत नाहीं. बाकी इंग्रेज समीप आहेत. व ते शाहाणे, बुद्धिवान् आहेत. परंतु तूर्त दिल्लीचे कामांत मुख्त्यारीचा हात घालावा, ऐसी बडे साहेबांची मर्जी नाहीं. त्यांनीं विलायतेस कंपनीस येथील वृत्त लिहिलें आहे. तेथून उत्तर आल्यावर कर्तव्य तें करावें, ऐसें इंग्रेजांचें मानस आहे. इंग्रेजांचा पाय दिल्लींत शिरला ह्मणजे मग आपले हातचें हिंदुस्थान गेलें. जों पावेतों त्यांचा पाय दिल्लींत शिरला नाहीं तों पावेतों...........मर्जीस येईल त्याप्रमाणें येथील बंदोबस्त करावा. जर हें संस्थान आपले काबूंत व हातांत असलें, तर बंगाला आदिकरून इंग्रेजांचे दौलतीवर देखील मालकियत व खाविंदी राहील. त्यास इकडे मुलूक बहुत. परंतु

तीन वर्षें काळ पडला; पांच सा सेर अन्न विकलें. याजकरितां तमाम दुनियेचे लोक रयत मृत्य पावले. उजाडी जाली आहे. कांहीं दिवस सुरळीत बंदोबस्त जालियावर करोडो रुपये आमदानी आहे. पैक्यास कमी नाहीं. तूर्त फौजही पाहिजे, व कांहीं थोडा बहुत पैकाही पाहिजे. तेव्हां जो येथें राहील, त्याची अब्रू राहून, बंदोबस्त होऊन, पातशाहात श्रीमंतांचे घरांत राहे ऐसा समय पुढें येणार नाहीं. सूचनार्थ विनंति लिहिली असे. स्वामी धणी आहेत. उत्तम सल्ला जाणतील ते करतील. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २३९.

श्री.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. महमदबेग हमदानीं जैपूरवाल्याकडे उठोन गेला. त्याचा वकील लछीराम कुटुंबसुद्धां दिल्लीस होता. त्यास राजश्री पाटिलबावांनीं लिहून पाठविलें कीं, जे कोणी हमदानीचे निजबती लोक तेथें असतील, त्यांस कैद करावें, ह्मणून देशमुख व शाहाजीस लिहिलें होतें. त्यास, लछीराम कुटुंबसुद्धां तेथेंच होता. तो राजे दयाराम यांनीं आपलें घरीं मशारनिल्हेस कुटुंबासहित लपविलें होतें. हें वर्तमान शाहाजी व देशमुख यांनीं ऐकून पातशाहांस विनंति केली कीं, हमदानीचा वकील कुटुंबसुद्धां राजे दयाराम यांनीं आपले घरांत ठेविला आहे. परंतु हजुरांत सूचना केली नाहीं. त्याजवरून पातशाहांनीं आज्ञा केली कीं, जे शिक्षा करणें ते करावी. त्यावरून शाहा निजामुद्दीन व देशमुख यांनीं राजे मजकुरास हत्तीचे पायाखालें घालोन मारिलें. व त्याचें घर व जागिरीची जप्ती केली. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४०.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री पाटिलबावांनीं सडी फौज राणेखानभाई वगैरे जैपूरकरांचे मुकाबल्यास दोन कोसांचे अंतरानें आहेत. त्यास छ० २७ माहे रमजानीं राजाकडील फौज व महमदबेग हमदानी व भीमसिंग राठोर वगैरे यांसीं व आपलेकडील राजश्री शिवाजी विठ्ठल व खंडेराव हरी यांजकडील पथकांसी व राजांचे फौजेसीं लढाई जाली. त्यास राजाकडील चाळीस पन्नास

असामी राजश्री शिवाजीपंत बापूचे व खंडेराव हरी यांचे लोकांनीं मारिले. व पन्नास साठ माणसें जखमी केलीं. शेवटीं हमदानी व राठोर माघारे हटून आपले लष्करांत गेले. ते राजश्री बापूकडील पंधरा वीस माणसें जखमी जालीं, व एक शिलेदार मारला गेला. परंतु सरकारचे लोकांनीं रांगड्यांचा मोड करून माघारें हटविलें. राजाकडील दहा बारा घोडीं पाडून आणिलीं. याप्रमाणें जाहलें. राजश्री पाटिलबावांची कन्या अडीच वर्षांची होती. त्यास मळगूद निघोन श्रावण अधिक शु॥ २ स देवआज्ञा जाहाली. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४१.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– लखनऊकडील वर्तमान तरी, वजीर लखनऊस आहेत. हसन रजाखान, त्यांचे कारभारी, लखनऊहून कलकत्यास लाट कलफदानीश सीतेन साहेब इष्टिनचे बदली आला आहे. त्याजकडे पांचा साता लक्षांचा तोफा-ताफ जवाहीर, वस्त्रें, हत्ती घोडे, सोन्याचे रुप्याचे दागिने, पालख्या, अंबाऱ्या, कलाबतू, जर दोनी नुकेसी, वगैरे बहुत नादर तयार करून त्याजकडे पाठविले होते. त्यांनीं सदरहू सरंजाम साहेबमजकुरास गुजराणोन, वजिरास खिलत वस्त्रें वगैरे इंग्रेजी जिन्नस विलायतचा तोफाताफ घेऊन माघारा लखनऊस आले. इंग्रेज हापडसाहेब वगैरे कुल तीन कंपू ज्या स्थळीं आहेत, त्या स्थळींच अद्यापि आहेत. परंतु साहेबमजकूर कलकत्याहून कूच करून श्रीकाशीस येणार. तेथून जवांबख्त पातशाहाजाद्यास बरोबर घेऊन लखनऊस येणार. ह्मणून वर्तमान आहे. ते लखनऊस आलियावर काय मसलत करतील, तें श्रवणांत आलियावर विनंति लिहूं. अद्यापि मसलतीचें वर्तमान जाहीरदारींत आलें नाहीं. ज्यासमयीं खानमजकूर रुकसत जाहाले, त्यावेळेस आज्ञा लाट कलफदानस सीतेन साहेबांनीं केली आहे कीं, तुह्मीं लखनऊस जाऊन फौज ठेवणें. त्याजवरून निगादास्त फौजेची करावी, ह्मणून वजिरांनीं आज्ञा खानमजकुरास केली आहे कीं, फौज ठेवावी. परंतु फौज ठेवून काय मसलत करावी, हें वर्तमान जाहीरदा-रींत समजल्यांत आलें नाहीं. अबदालीकडेही इंग्रेजांचा वकील, हत्ती घोडा, वस्त्रें जवाहीर वगैरे सामान घेऊन, राजश्री पाटिलबावांसीं भेटून अबदालीकडे विलाय-तेस गेला आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४२.

श्री. इ. स. १७८७.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– पातशाहा दिल्लीस आहेत. पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस लिहिलें होतें कीं, तुह्मी एकाएकीं जयपुरासमीप जावयाचें नव्हतें. डिगेस जैपूरकर चौ लक्षांचा मामला करीत होते. तुह्मीं कूच केलें, त्यासमयीं सा लक्षांचा मामला करीत होते. त्यासमयींच मामल्याचा जाबसाल फडशा करून मथुरा डीग या ठिकाणीं राहून, चहूंकडे फौजा पाठवून, दाबाखालीं चहूंकडील कारभाराचा दाब राखायाचा होता, तो अर्थ न घडला. जलदी करून शहरासमीप गेला. तेथून माघारा फिरला. त्यास पर्जन्यकाल नदी नाले भरतील. रसद येऊन लष्करांत पावणार नाहीं. या अर्थीं कूच करून, करील ? बारी लालसोट अलीकडे आहे, तिजला टाकून डिगेपासून विसा कोसांवर येऊन, आपला मुलूख पाठीमागें घेऊन मुक्काम करून असावें. ह्मणजे फौजेंत महागाई होणार नाहीं. आपले मुलकांतून रसद येऊन पावेल. तेथून सड्या फौजा पुढें घालून जैपूरकराचे फौजेसीं गांठ घालावी. व आह्मांस ह्मणाल तर आह्मीही कूच करून येऊं. परंतु स्वारीचें सामान तयार करून पाठवावें. ह्मणून लिहिलें होतें. त्याचें उत्तर यांनीं लिहिलें की, आपण खुश दिल्लींत असावें. रमजानचे दिवस आहेत. त्याजकरितां तसदी न करावी. आपले एकबलानें सर्व मनोदयानुरूप घडून येईल. ह्मणोन लिहिलें आहे. आपले फौजेची व जैपूरकराचे फौजेची सातां कोसांची तफावत आहे. जैपूरकराचे फौजेंत फूट आहे. एकदिल नाहींत. व राजा प्रतापसिंगही साशंकित आहे कीं माघारा जैपुरास जावें. त्यास भीमसिंग नामें बक्षी जोतपूरकराकडील वीसा हजारा फौजेनिशीं कुमकेस आला आहे. त्यानें मात्र राजास दम देऊन थांबवून ठेविलें आहे. या दिवसांत जोधपूरकर प्रतापसिंग या दोहीं राज्यांशीं व सरकारचे सरदारांशीं बिघाड आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक २४३.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:– शाहा अबदाली पिशोरास आहे. त्यांजकडील फौज व त्याचा पुत्र अटक उतरून, किशमीर व झीलम व टवा भकड (?) वगैरे अटक

नदीपार जो मुलूख आहे, त्याचा बंदोबस्त करून आहेत. पुढें पेशकदमी करीत नाहींत, व यंदा करणार नाहींत. याप्रमाणें वर्तमान आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. व हापडसाहेब फिरंगी व वजीर लखनौस पातशाहाजादा जुवांबख्तसुद्धां शिकार खेळून वगैरे ऐषआराम करून आहेत. कांहीं उद्योग करून नाहींत. मागें श्रवणांत वर्तमान आलें होतें कीं, मेहेदीघाटावर पूल बांधून अंतर्वेदींत उतरावें. याचें कारण हेंच कीं, शिखांनीं श्रीगंगापार जाऊन बरेलीचे आसपास कांहीं मुलूख लुटून नेला. ह्मणून गंगातीरीं घाटोंघाटचा बंदोबस्त करावा, या उद्योगांत होते. त्यास हल्लीं सरकारच्या फौजा शिखांचे तोंडावर आहेत. सबब ते आपले जागां स्वस्थ आहेत. सरकारांसीं व वजिरासीं व इंग्रेजांसीं तूर्त सलूख व स्नेह आहे. विशेष असल्यास व ऐकिल्यास विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २४४.

श्री. इ. स. १७८७.

पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– नवाब नजबकुलीखान रोहतकेस आहे. व बदलबेगखान कोटपुतळीकडे आहेत. या दोघां थोकदारांकडेही जैपूरकरांचे संदर्भ आहे. परंतु ते आपलाले ठिकाणीं आहेत. यांचींही बोलावणीं व पत्रें गेलीं आहेत कीं, कूच करून लष्करांत आह्मांपासीं येणें. ह्मणून पत्रें गेलीं आहेत. परंतु ते जैपूरकराकडे कूच करून जातात, किंवा लष्करांत यांजपाशीं येतात, हें कांहीं निवडलें नाहीं. परंतु महमदबेग हमदानी तिकडे गेला, त्यापेक्षां हिंदुस्थानी फौजेचा व सरदाराचा भरंवसा पडत नाहीं. व येथें तो सर्व प्रकारें भरंवसा तोफखान्याचा व पलटणाचा व हिंदुस्थानी फौजेचा आहे. समयास घडेल व प्रत्ययास येईल तें खरें. याप्रमाणें वृत्त आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २४५.

श्री. इ. स. १७८७.

विनंति ऐसीजे:– पातशाहांनीं आपले चिरंजीवास व बेगमास बोलावून आणिलें कीं, गुलाम कादरखान यानें तमाम मुलूक जप्त केला, त्यास काय करावें? पंधरा वीस हजार स्वार प्यादा जमा जाला आहे, त्यास भक्षावयास पाहिजे.

आणि कोणी एक जणानें हिंमत धरून, हे फौजा आटोपून खानमजकुराचें पारपत्य केलें पाहिजे. त्यास, बेगमांनीं उत्तर दिल्हें कीं, आमचा दरमहा आहे; त्यास जों पावेतों खानमजकुरांचे पारपत्य होय व महालांची अमदानी ये, तोंपावेतों आह्मी खर्चास मागणार नाहीं. व पातशाहाजाद्यांनीं उत्तर दिल्हें कीं, जो आह्मांपाशीं आसबाब आहे तो हजरतचे कृपेचा आहे. हा घेऊन फौजेचे खर्चांत आणावा. व आह्मांस पातशाहीची गरज नाहीं. ज्यास आज्ञा कराल, तो फौज घेऊन जाऊन, सरकारचाकरी करावयास व आपला प्राण द्यावयास तयार आहे. आपले आज्ञेखेरीज दुसरा अर्थ नाहीं. ह्मणून विनंति सर्वांनीं केली. हें ऐकून पातशाहांनीं, कलंदरबेग फराशखान्याचा दारोगा आहे, त्यास ताकीद केली कीं, पेशखेम्याची तयारी करणें व जोतिषास बोलावून मुहूर्त बाहेर निघावयाचे विचारले आहे. जोतिषांनीं विनंति केली कीं, मुहूर्ताचा निश्चय करून विनंति करूं, ह्मणून विनंति केली. त्यास मुहूर्ताचा निश्चय होऊन पातशाहा कुणीकडे कूच करतील, हे प्रत्यास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २४६.

श्री. इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– अनुपगीर गोसावी यांची अर्जी पातशाहास आली होती व आपले मतलबाची यादी पाठविली होती. त्याजवरून पातशाहांनीं अर्जीचा दरजबाब लिहून दिल्हा, व मतलबाचे यादीवर दसकत करून दिल्हें कीं, सरकार सारंगपूर बारा परगणे तुह्मांस जायदादी सरंजामांत दिल्हे आहेत. तर तुह्मीं आपले जमावानिसीं हजुरांत येणें. गुलाम कादरखान निमकहरामीस प्रवर्तला आहे. त्याचें पारपत्य करणें जरूर. ह्मणोन मशारनिल्हेचा सरंजाम त्याजकडून दूर करून, तुह्मांस सरकार सारंगपूर सरजामांत दिल्हें आहे. ह्मणून मतलबाची याद दसकती व शुका पातशाहाचा गेला आहे. परंतु गोसावी मजकूर पेरोजाबादेचे किल्ल्यास मोर्चे लावून बसला आहे. किल्ला भांडतो. परंतु कोठून कुमक जाऊन पोंहचेल आणि किल्ला थांबेल, हा भरंवसा नाहीं. तेव्हां गोसावी किल्ला फत्ते करून, तिकडील बंदोबस्त करून, मग दिल्लीस येणार. याप्रमाणें वृत्त आहे. व इंग्रेज बडेसाहेब यांसही शुके गेले आहेत कीं, गुलाम कादरखान याजकडे सरकार सारंगपूर व गोसगड वगैरे महाल आहेत; तरी

श्रीगंगापथरगडापासीं चार पलटणें वार उतरून, सदरहू महालांची जप्ती करणें. ह्मणोन शुके गेले आहेत. परंतु अद्याप इंग्रेजांचीं पलटणें किंवा गोसावी यांची फौज हे कोणीही सारंगपूर गोसगडाकडे गेले नाहींत. आपलाले स्थळीं आहेत. पुढें होईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २४७.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- येथें श्रवणांत आलें कीं, सरकारची डांक पुण्याहून ते राजश्री पाटिलबावा यांचे लष्करपावेतों बसली आहे. त्यास डांकवाल्यास ताकीद होऊन राजश्री पाटिलबावांचे लष्करापासून तो दिल्लीपावेतों चार पांच मजला जमीन आहे. येथेंही डांक दिल्लीपावेतों बसली तर वरचेवर येथील वृत्त स्वामींस निवेदन होत जाईल. याचें कारण हेंच कीं, येथील पातशाहांची दौलत जेफ ह्मतारी जाली आहे. एक पातशाहाचें नांव व गादी मात्र आहे. जो कोणी यांची मर्यादा करून हे दौलत सांभाळील, तर साडेबावीस सुभ्यांवर हुकूम व फौजबंद असल्यास जबरदस्ती चालेल. याप्रमाणें येथील स्थित जाली आहे. पातशाहींत कोणी माणूस व फौज नाहीं कीं, या दौलतीस आव घालील. ह्मणून सूचनार्थ विनंति लिहिली आहे कीं, अजून पातशाहा व दिल्लीचें स्थळ आपले काबूंत आहे. आतां इंग्रेज, व वजीर, व पातशाहाजादा समीप फरोकाबादेस आले आहेत. कदाचित् त्यांचा पाय दिल्लींत, व पातशाहींत इंग्रेज शिरले, ह्मणजे सर्वांस भारी पडेल; व सर्वांवर हुकूम व जबरदस्ती करतील. मग मसलत आटोपणार नाहीं. ह्मणोन विनंति लिहिली असे. जलदीनें फौज व एक सरदार आलियास आपली काबू राहील. याहीवर स्वामी सर्वज्ञ आहेत. उत्तम सल्ला असेल तें करतील. येथील वृत्त कच्चें स्वामींस श्रुत व्हावें, ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २४८.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- मुंडसानचा किल्ला पोहपसिंग जाट यानें घेतला, व पेरोजाबादेचे किल्ल्यास अनुपगीर गोसावी लागला आहे. किल्ला मजबूत चांगला आहे.

परंतु उपराळा होत नाहीं. याजकरितां तोही सुटेल ऐसें आहे. खुर्जाचा किल्ला खुर्जेवाल्या पठाणानें घेतला. व मलक महंमदखान व अनुपगीर गोसावी यांनीं दरोबस्त मुलूख शिकंदऱ्यापासून तों पेरोजाबादेपावेतों कोलचें शहर व किल्ल्यासुद्धां राजश्री पाटिलबावांचीं ठाणीं उठोन दिधलीं व आपला बंदोबस्त केला आहे. सरकारांत एक आगरें व एक रामगड मात्र दोन किल्ले राहिले आहेत. वरकड सर्व किल्ले व सर्व मुलूख ज्याचे हातीं लागला, त्यानेंच दाबून घेतला. याप्रमाणें गर्दी जाली आहे. पुढें सरकारची फौज येऊन बंदोबस्त होईल, तो सुदिन असे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २४९.

श्री. इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, लखनौहून वृत्त आलें कीं, राजश्री सदाशिव मल्हार यांनीं लाट कलफदान सितेन साहेब इंग्रेजांस विनंति केली कीं, दोन कंपू आमचे कुमकेस द्यावे; पन्नास लक्ष रुपये आह्मांपासून घ्यावे. त्यास इंग्रेजांहीं उत्तर दिल्हें कीं, ''तुह्मांपासीं पैका असता, तरी तुमची फौज बिघडून हा फजीता कां होता?'' त्यास, राजश्री सदाशिव मल्हार यांनीं उत्तर इंग्रेजांसी केलें कीं, आपण ''आज्ञा केली हे खरीच आहे. आह्मांपासीं पैका नाहींच. परंतु माळव्याचा मुलूक आमचा आहे. तो तुह्मांस पन्नास लक्षांत लाऊन देऊं. जों पावेतों तुमचा पैका फिटे, तों पावेतों माळव्याचे महालांत आपला अंमल. अथवा आह्मीं आपला आमील ठेऊन तुमचा पैका आदा करून देऊं.'' ह्मणून परस्परें बोलणें होऊन, पामरसाहेब इंग्रेजास याजसमागमें बडेसाहेबांनीं दोन कंपू यांचे तैनातीस एक वर्ष द्यावे ऐसा करार जाला, ह्मणून वर्तमान श्रवणांत आलें. व दुसरें वर्तमान कीं, इंग्रेजांहीं मख्ता करार न केला. ह्मणाले कीं, ''जो मुलूक तुह्मांकडे आहे त्यापैकीं सा आणे आह्मांस द्यावे, व दहा आणे तुह्मीं घ्यावे. व नवा मुलूक तुह्मी आह्मी मिळून घेऊं. त्यांतही याप्रमाणें हिस्सा द्यावा.'' ह्मणोन इंग्रेजांनीं स्वाल केला. त्याजवरून जितका राजश्री पाटिलबावांकडे माळव्याचा वगैरे मुलूक आहे, त्यांत सा आणे हिस्सा द्यावा व भडोच किल्ला गुजरातप्रांतीं आहे, तो द्यावा. येणेंप्रमाणें सदाशिव मल्हार यांचे विद्यमानें करारमदार होऊन, कंपू समागमें घेऊन येणार ह्मणोन, हेंही वर्तमान ऐकिलें आहे. त्यास दोहींतून मख्त्याची गोष्ट करार जाली, किंवा हिस्सा द्यावा हे गोष्ट करार जाली, हा निश्चय



जुन्या दिल्लीचा उत्तर दरवाजा.

समजल्यांत आला नाहीं. प्रत्ययास आलियावर विनंति लिहूं. दोन्हीं वर्तमानें पातशाहांचे येथें श्रवणांत आलीं. त्याजवरून लिहिलें आहे. त्यास, सर्व, राजश्री पाटिलबावांचे बदकौलीमुळें त्यांसी बहुत दिक आहेत. कोणीही हे गोष्ट इच्छीत नाहीं कीं, पुन्हां राजश्री पाटिलबावांनीं पातशाहाचे घरची मुख्त्यारी करावी. हें मानस कोणाचेंही नाहीं. आणि राजश्री पाटिलबावांची मर्जी कीं, सर्वस्व द्यावें आणि फौज जमा करून जैपूरकर व मारवाडकर रजपुतांचें पारपत्य करावें; आणि पातशाहांचे घरची मुख्त्यारी करावी. हे गोष्ट न घडली तर सर्व बुडवून आपण बुडावें. परंतु दुसऱ्याचा पाय, दक्षण्याचा, हिंदुस्थानांत शिरूं देऊं नये. ऐसी यांची मर्जी आहे. श्रवणांत आलें तें वर्तमान श्रुत व्हावें ह्मणोन विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५०.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– कलकत्तेकर लाट कलफदानीश सितेन साहेब कलकत्त्याहून कूच करून लखनौस येतो. त्यास, फरोकाबादेस कंपू व इंग्रेज आहेत, यांस पत्रें पाठविलीं कीं, आह्मी सत्वर येतों. श्रीभागीरथीतीरीं आमचे छावणीची तयारी करावी. त्याजवरून फरोकाबादेस बंगले आदिकरून छपरबंदीची तयारी आहे. साहेबमजकूर लखनौस अथवा फरोकाबादेस दाखल जाल्यावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५१.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे:– जवांबक्ष शाहाजादा वजिराचे येथें होते. खर्चवेंच चालवीत होते. त्यास आपले फौजेची घालमेल ऐकून नवाबासीं सख्त जाबसाल करून स्वार जाले. मार्गांत दहाबारा हजार फौज जमा करून, मथुरा वृंदावन वगैरे ठाणीं मार्गांत लागलीं, तीं कायम करून, आपण दिल्लीस जाऊन पातशाहांची मुलाजमत केली. जाबसालांत पितापुत्रासीं रहस्य न बनलें. तेव्हां माघारे लखनौस आले. हासनगंजास मुक्काम केला, आणि नवाबास सांगून पाठविलें. त्याचें उत्तर जालें कीं, "जाण्याचें प्रयोजन काय होतें? गेल्यास यावयाची जरूरी

काय आहे ? आमचे वस्तु खर्चवेंच चालत नाहीं." याअन्वयें निरोप गेल्यावर बहुत लाचार जाले. फिरंग्याकडील आईफसाहेब जाऊन आले. नवाबासीं मुलाजमत जाली. मेजमानी करून नवाब अयोध्येस गेले, आणि साहेबांकडे सांगून पाठविलें कीं, शाहाजादे लखनौस रहातील तोंपावेतों आमचें येणें होणार नाहीं. हें वर्तमान ऐकिल्यावर शाहाजादे तीन दिवस राहून काशीस गेले. तेथील साहेबांकडे सांगोन पाठविलें कीं, आमची रहावयाची सोय करून द्यावी. त्यांनीं वकील पाठवून विनंति केली कीं, कलकत्त्यास पत्रें पाठविलीं आहे. उत्तरें आल्यावर करणें तें करूं. तोंपावतों आपण मुक्काम करून रहावें. त्याप्रमाणें आजपावेतों होतों. आतां उत्तरें आलीं कीं, हवेली खाली करून द्यावी. जेथें विचारास येईल तेथें सुखरूप राहावें. त्याजवरून हवेली राहावयास सिद्ध करून दिल्ही. ते राहिले आहेत. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५२.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—इंग्रेज लाट कलफदानस सितेन साहेब कलकत्त्याकडून कूच करून श्रीकाशीस आले. जुवांबख्त पातशाहाजादा यांची भेट घेतली. एकशें एक मोहोर शाहाजाद्यांस नजर केली, व कांहीं तोफा तायेफ इंग्रेजी सरंजाम नजर केला. पातशाहाजाद्यांनीं साता पारच्यांचा खिलत, व हत्ती, व जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी बमय उरवसी, व तरवार येणेंप्रमाणें इनायत केलें. पांच मोहोरा तरवारीची नजर बडेसाहेबीं केली. तेथून पातशाहाजाद्यासमागमें घेऊन लखनौस कूच केला. इतक्यांत वजीर असफद्दोले लखनौहून सामोरा निघाले. मार्गीं त्यांच्या यांच्या भेटी जाल्या. दरमजल लखनौस आले. वजीर असफद्दौला यांनीं इंग्रेजांस मेजमानी केली. व इंग्रेजांनीं वजीरास केली. परस्परें वस्त्रें, हत्तीघोडे, जवाहीर, शिष्टाचार जाला. तेथून शहाजाद्यासुद्धां त्रिवर्गेही कूच करून फरोकाबादेस श्रीभागीरथीतीरीं आले आहेत. फरोकाबादेस छावणी बंगले आदिकरून छपरबंदी जाली आहे. तेथें कांहीं दिवस स्थिरता आहे. तेथें राहून पुढें काय मसलत ठरेल, तें श्रवणांत आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५३.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः-

विनंति ऐसीजेः—पातशाहाजादा जुवांबख्त फरोकाबादेहून कूच करून पिरोजाबादेस आले. तेथें अनुपगीर गोसावी व मलक महमदखान यांची मुलाजमत जाली; व सल्ला ठैरली कीं, अकबराबादेस जाऊन अकबराबादेचा किल्ला हाताखालें घालून, इस्मायल बेग यांस समागमें घेऊन दिल्लीस जावें. याप्रमाणें अनुपगीर गोसावी यांचे विचारें सल्ला ठैरली आहे. परंतु आगऱ्याचा किल्ला अद्याप मजबूत आहे. थोडक्याच दिवसांत कांहीं कुमक राजश्री पाटिलबावांकडून जाली तर किल्ला राहील. जर कुमकेस दिवसगत लागली, तर किल्ला राहणें कठीण. याप्रमाणें वृत्त आहे. येथूनही पातशाहाजाद्यास बोलावणीं पातशाहाचीं गेलीं आहेत कीं, किल्ल्यास न आटकतां येणें. गुलामकादरखान यांनीं बेअदबी करून किल्ल्यांत तोफांचे गोळे टाकिले, आणि नित्यांनीं झुंझतो. त्याचें पारपत्य करणें जरूर. याजकरितां बमय फौज व तुह्मांसमागमें येणार आहेत त्यां सुद्धां, तेथें भोजन करीत असाल, तरी दिल्लीस येऊन हात धुणें. येणेंप्रमाणें जरूरीचीं पत्रें गेलीं आहेत. ते दिल्लीस आलियावर जो नक्षा ठरेल तो विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५४.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः-

विनंति ऐसीजेः- वजीर असफद्दौला लखनौस आहेत. पातशाहाजादा जुवांबख्त लखनौस दाखल जाले. वजिरानें पातशाहाजाद्यांस, पंचमहाला ह्मणोन मोठी मातबर जागा लखनौंत आहे, ते खाली करून पातशाहाजाद्यांस रहावयास हवेली दिधली. हे कुटुंबसुद्धां तेथें जाऊन राहिले. एकशें एक मोहोर पातशाहाजाद्यांस व एकवीस एकवीस मोहोरा तिघे मुरशदजाद्यांस व पंचावन्न खोन कापड व चार खोन जवाहीर व हत्ती दोन व घोडे पांच येणेंप्रमाणें सन्मान करून, महालांत दाखल करून, आपण आज्ञा घेऊन, वजीर हवेलीस दाखल जाले आहेत. वजिराचे बहिणीचें लग्न कर्तव्य ह्मणून पातशाहाजाद्यापाशीं आज्ञा घेऊन अयोध्येस आजीपाशीं लग्नास जाणार. व लाट कलफदानस सितेन साहेब इंग्रेज कलकत्त्याहून पुन्हां लखनौ, फरोकाबादेकडे येणार, ह्मणून वर्तमान आहे.

अद्यापि कलत्त्याहून कूच केला नाहीं. व राजे प्रतापसिंग जैपूरकर यांजकडून दौलतराम हलदिया व रोडाराम दरजी ऐसे दोघेजण, राजे बिजेसिंग जोतपूरकर यांजपाशीं गेले आहेत. त्यांचें यांचें बोलणें शरीरसंबंधाचें व पुढें दक्षण्यांची मसलत करणें हा मजकूर ठैरावून, राजे प्रतापसिंगास पत्रें आलीं आहेत. त्याजवरून राजेमजकूर कूच करून पुष्करास जाणार. तिकडून जोतपुरीहून पुढें राजे बिजेसिंग सामोरा पुष्करास येऊन, राजास जोतपुरास घेऊन जाऊन, नातीचें लग्न करून, पुढें मसलत करणें ते करावी ह्मणून बोलणें ठरलें आहे. व राजे बिजेसिंग यांनीं आपले वकील राजश्री पाटिलबावांकडे पाठविले आहेत कीं, "तुमचा आमचा पूर्वस्नेह आहे त्याप्रमाणेंच असावा. ज्याप्रमाणें पूर्वापर आह्मांपासून मामला घेत आला आहांत, त्याप्रमाणें घ्यावा. आणि तुह्मी आह्मी एक विचारें असोन हिंदू राज्य असावें; म्लेंच्छांचा नाश असावा." ह्मणून बोलणीं बोलून वकील पाठविला आहे. ह्मणोन श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. तैमूरशा पातशाहा अबदाली यांजकडील फौज दोन दस्ते राजे बिकानेरकर यांचे सरहद्देस आली आहे. त्या प्रांतीं रहिमखान ह्मणून कोणी सिद्दी आहे, त्यासीं कांहीं बिघाड मामल्याचा जाला आहे, ह्मणोन बंदोबस्तास फौज पाठविली आहे. दुसरें, तैमूरशाहांनीं शहाअलम पातशाहास नामा स्नेहवृद्धीचा पाठविला आहे कीं, आमची फौज बिकानेराचे सरहद्देस आली आहे. त्यास आपल्यास फौजेचें प्रयोजन असिल्यास बोलावून घ्यावी, ह्मणून लिहिलें आहे. परंतु उष्ण काळ दिवस, बिकानेरापासून तो जोतपुरापावेतों पाणी नाहीं. याजकरितां फौज येणें कठीण. हें जाणून शिष्टाचार मात्र लिहिला आहे. शीख तमाम सरहद्देपासून तो कोलजलेश्वर पावेतों अंतरवेदींत महालांतून चौथा हिस्सा घेऊन बंदोबस्त करून आहेत. पुढें श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५५.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे.— लाट कलफदानस साहेब इंग्रेज कलकत्त्याहून सहल करीत मुलूक पहात फरोकाबादेस आले. तेथें आठ पंधरा दिवस राहून वजीर असफउद्दौले यांजकडील पैका येणें त्याचा बंदोबस्त हसेबंदी करून, तेथें पहिलें इंग्रेजांकडून हापड साहेब पैक्याचे तहसिलीस होते, त्यास समागमें घेऊन, त्याची

बदली दुसरा इंग्रेज लखनौस वजिरापासीं ठेवून, पातशाहाजाद्यास दिल्लीकडे रवाना करून, आपण कूच करून माघारा कानपुरास भागीरथीतीरास गेले. मजल दरमजल कलकत्त्यास माघारा जाणार. ह्मणोन वर्तमान पातशाहाचे येथें आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. राजश्री सदाशिव मल्हार यांनीं आपलेकडून एक छोटेखानी गृहस्त सेणवाई बडे साहेबांचे स्वारीसमागमें बातनी लेहून पाठवीत जावी ह्मणून दिधला आहे. व आपण तूर्त वजिरापासीं आहेत. पुढें श्रवणांत येईल तें वृत्त मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५६.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे.—लाट कलफदानस सितेन साहेब कलकत्त्याहून निघाले, ते मुलकाची सहल करीत, श्रीकाशी व लखनौस येऊन फरोकाबादेस आले. तेथें राजे जैपूरकर यांचे वकील, व राजश्री सदाशिव मल्हार राजश्री पाटिलबावांकडील, व पातशाहाजादा जुवांबख्त, या सर्वांनीं आपले मतलबाविसीं विनंत्या केल्या कीं, आमची कुमक करावी. त्यास इंग्रेज बडेसाहेब यांनीं सर्वांस उत्तर दिल्हे कीं, "आह्मांस कंपणीची आज्ञा नाहीं कीं, कोणासीं बिघाड करावा व कोणाची कुमक करावी. ऐसी आह्मांस आज्ञा नाहीं. सर्वांसीं आमचा स्नेह. कोणासींही आम्हांस बिघाड करणें नाहीं." ह्मणून साफ सर्वांस उत्तर दिल्हें. आणि कांहीं दिवस फरोकाबादेस राहून माघारा कूच केला. कानपुरीं श्रीभागीरथीतीरीं जाऊन मुक्काम केला आहे. पुढें कलकत्त्याकडे कूच मुक्काम करीत, मुलकाची सहल करीत जाणार. ह्मणोन वृत्त पातशाहांचे येथें बातमी आली, त्याजवरून विनंति लिहिली आहे. बडेसाहेब कानपुरीहून पुढें कूच करून श्रीकाशीस गेले. पुढें मकसुदाबादेस जाऊन सत्वरच कलकत्त्यास दाखल होणार, ह्मणून वर्तमान आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५७.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—लखनऊकडील वर्तमान, तर लाट कलफदानास सितेन साहेब

श्रीकाशीहून कूच करून कलकत्त्यास गेले. वजीर असफद्दौला लखनऊहून कूच करून सहलशिकारीस कुटुंबेंसुद्धां गोमतीतीरीं झिलेवर जाऊन मुक्काम करून शिकार खेळत फिरतात. इंग्रेजांचा बंदोबस्त वजिराचे मुलकांत होता, तो सर्व इंग्रेजांनीं आपला उठऊन, वजिराचा जिमा करून दिल्हा; व आपले सा आणीच्या हिशाचा मक्ता ठैराऊन पैका घेत जावा. हैदरबेगाची निशा ठैराऊन गेले. याप्रमाणेंच अहंमदखा बंगस फरोकाबादवाले यांचा पुत्र मुजफरजंग यासींही स्नेह शिष्टाचार बहुत बडेसाहेबांनीं करून, त्याचाही मुलूख त्याचे स्वाधीन करून, आपला ऐवज सा आणीचा करारमदार करून, त्याजकडीलही खातरजमा करून गेले. एक बंगाल्याचा मुलूख कदीम पातशाही सुभा नवाब कासमअल्लीखान बंगाल्यांत राहात होता. मकसुदाबाद वगैरे भवानी राणीचा मुलूख आदिकरून तितका मात्र इंग्रेजांहीं आपले खाजगीखालें ठेविला. वरकड सादुलाखान रोहिल्यासुद्धां तमाम मुलूख सोडून, ऐवजाचा मखता ठैराऊन, शिबंदीचा खर्च तोडून माघारा कलकत्त्यास इंग्रेज गेला आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५८.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विज्ञापना ऐसीजे:- नवाब वजीर, बकराझील ह्मणोन जागा अयोध्येहून पुढें पन्नास कोस आहे, तेथें हत्ती, गेंडे वगैरे जनावरें शिकार येतात, त्यांचे शिकारीकरितां गेले आहेत. चैत्रमासीं माघारां येणार. तेथील दिनचर्येचें वर्तमान, एकबार पाठविली आहे त्याजवरून निवेदन होईल. फिरंगी आपले स्थलीं आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २५९.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:- छ० १० जिलकादीं राजश्री सदाशिव मल्हार सेणवाई यांस लखनऊस वजिराकडे व इंग्रेज लाट कलफदानस सितेन साहेब यांजकडे रवाना केले आहेत. याचें कारण हेंच कीं, जो आपला पूर्व स्नेह आहे तो पक्का असावा. आणि जे कोणी आह्मांसीं बदमामली करितात, त्यांस ताकीद करावी

कीं, यांचा आमचा स्नेह, तुह्मी यांचे मुलकांत दंगा केलियास कामास येणार नाहीं. ह्मणोन गुलाम कादरखान व अनुपगीर गोसावी यांस ताकीदपत्रें इंग्रेजांचीं पाठवावीं. आणि जैपूरकरांनीं आपला वकील नंदराम हळदीया तुह्मांपासीं पाठविला आहे. त्यास आपण नादीं लाऊन ठेविलें आहे. त्यास साफ सांगावें कीं, राजश्री पाटिलबावांसीं व आह्मांसीं स्नेह आहे. त्यांसीं राजांनीं बेआदाई केली आहे हें ठीक नाहीं, ह्मणोन त्यांसीं बोलून, त्याजकडील जैपूरकरांचा नाद आहे तो तोडून टाकावा; ह्मणोन सदाशिवबावांस रवाना केलें आहे. याखेरीज अंतस्थ आणीक बारीक बोलणें असेल, तें समजल्यांत आलें नाहीं. याजसमागमें तीर्थस्वरूप राजश्री दामोदर देवराव यांसही करून दिल्हें आहे कीं, सरकारचीं वस्त्रें वजिरास आहेत, तें जाऊन गुजराणणें. ह्मणोन आज्ञा जाली. व वजिरास व हापड साहेब इंग्रेज यांसही पत्रें लिहून दिल्हीं आहेत. त्याजवरून पंत मशार-निल्हेही समागमें गेले आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६०.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः— राजश्री पाटीलबावांनीं वजिरास व लाट कलफदानस सितेन साहेब यांस हत्ती घोडे वस्त्रें जवाहीर वगैरे तोफा तायफ राजश्री सदाशिव मल्हार यांसमागमें सरंजाम त्यांस द्यावयास दिल्हा आहे. त्यांच्या यांच्या भेटी जालियावर व बडेसाहेब लखनऊस फरुकाबादेस आलियावर, कदाचित् इंग्रेजांनीं आड घातली कीं, कराराप्रमाणें पातशाहाजादा जुवांबख्त यांस आगरियाचा किल्ला द्यावा, व आगरियाखाले तालुके आहेत ते द्यावे, ऐसेंही बोलणें पडल्यास कबूल करावें. याप्रमाणेंही राजश्री सदाशिव मल्हारास आज्ञा जाली आहे. ह्मणोन श्रवणांत आलें आहे. पुढें प्रत्ययास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६१.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः— उमरावगीर गोसावी राजे अनुपगीर गोसावी यांचे ज्येष्ठ बंधू आगरियाहून धरून, राणेखान, रायाजी पाटील घेऊन गेले होते. त्यास राजश्री

पाटिलबावांपासीं पावते केलें. राजश्री पाटिलबावांनीं बहुत सन्मान करून, हत्ती व घोडे व वस्त्रें जवाहीर वगैरे देऊन, शिष्टाचार करून देऊन, शपथप्रमाण बेलभंडार जाला कीं, तुह्मीं आह्मांपासीं असावें; तुमचे पूर्ववत्प्रमाणें चालवूं. ह्मणून करारमदार जाला आहे. त्यांनीं राजे अनुपगिरासही बोलावणियाचें पत्र पाठविलें आहे कीं, तुह्मीं कूच करून येणें. ह्मणून लिहिलें होतें. तेंच पत्र अनुपगिरांनीं पातशाहास दाखविलें. पातशाहा बहुत संतोष जाले कीं, बहुत उत्तम जालें कीं, पाटिलबावांची व तुमची एकवाक्यता जाली. त्यास पातशाहांचें मानस कीं, गुलाम कादरखान व इसमाईल बेग यांचें पारिपत्य करून राजश्री पाटिलबावांनीं येऊन आमची भेटी घ्यावी; आणि पूर्ववत्प्रमाणें मुख्त्यारीचा कारभार आटोपावा. ह्मणून यांची मर्जी अजुर आहे. सरकारआज्ञेप्रमाणें वारंवार विनंति करून राजश्री पाटिलबावांकडे बदस्तुर मर्जी कायम असावी ह्मणून विनंति करीत असतों. पुढें होईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६२.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजे प्रतापसिंग यांजकडून गोसावी अनुपगीर व बक्षी नंदराम ऐसे दोघेजण दोन तीन हजार फौजेनिसीं पातशाहापासीं दिल्लीस येणार. याचें कारण हेंच कीं, राजश्री पाटिलबावा बदकौली आहे. यांचा विश्वास नाहीं. याजकरितां आह्मीही जिलीबींत फौजसुद्धां आहोंत, आणि आपण खासा स्वारी बाहेर निघोन दरोबस्त पातशाही सलतनतीचा व मुलकाचा बंदोबस्त करावा. हरोलीस आह्मी दोन्ही राजे हजर आहोंत. जर आपली मर्जी बाहीर निघावयाची नसली, तर जुवांबक्ष पातशाहाजादा तोही आह्मांसमागमें करून द्यावा. दरोबस्त मुलकांचा बंदोबस्त करणें आमचा जिमा आहे. ह्मणून घाट घडून, गोसावी हिंमतबहादर व बक्षी नंदराम दिल्लीस येणार आहेत. येथें आलियावर पातशाहांची मुलाजमत जालियावर काय नक्षा ठरेल, ती विनंति मागाहून लिहूं. याप्रमाणें वृत्त जैपूरकर राजे यांचे दरबारचें आलें. त्याजवरून विनंति लिहिली. पुढें प्रत्ययास येईल तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६३.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे. हिंमतबहादर अनुपगीर गोसावी, जैपूरकर राजे याजपासीं होते. तिकडून निघोन पातशाहापासीं येऊन मुलाजमत केली. पंधरा दिवस राहून गुलाम कादर याजकडे जाण्यास आज्ञा मागितली. त्याचें उत्तर सांगितलें कीं, "प्रस्तुत तुह्मीं आह्मांपासींच राहावें. आठा पंधरा दिवशीं रुकसत केली जाईल." ह्मणोन ठेऊन घेतले आहेत. इंग्रेजांनीं सामील व्हावें ह्मणोन राजश्री पाटिलबावांनीं सदाशिव मल्हार यांस पाठविलें आहे. यांनीं जाबसाल केला. त्याचें उत्तर केलें कीं, "कोणी एक मसलत करावयास सांप्रत आमचें सामर्थ्य राहिलें नाहीं. यास्तव आह्मी उभयतांकडेही बोलत नाहीं. तुमचा आमचा स्नेह आहे तो बनलाच आहे. परंतु फौजेची सरबरा प्रस्तुत होत नाहीं." सदाशिव मल्हार येथेंच आहेत. नवाब आल्यावर आज्ञा घेऊन माघारे जाणार. नवाबाचे तेथील कारभार सर्व इंग्रेजांचे स्वाधीन आहे. हैदरबेगखान कारभारी आहेत. तेही इंग्रेजांचें सूत्रांत आहेत. कलकत्त्याहून थोरला साहेब लाट कलफदान सितेन साहेब गुदस्तां वजिराचे भेटीकरितां आले होते. त्यांनीं यांसीं बहुत सलुखाचे जाबसाल बोलून, साहा आणे घ्यावयाचा ठराव होता त्याचेपैकीं दोन आणे माफ करून चार आणे घ्यावयाचा करार करून दिल्हा. व लखनऊस कोठी होती ते उठवून घेतली; व फिरंग्यांस अंमल माफ होता, तो घ्यावा या अन्वयेंकरून स्वस्थळीं गेले. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६४.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पाटिलबावांस पातशाहांनीं खिलत व शिरपेंच, समशेर व हत्ती घोडा याप्रमाणें गोविंदराव, शाहा निजामुद्दीकडील गृहस्थ आहेत, त्यांजबराबर रवाना केलें. नाजर व रामरतन व अनुपगीर गोसावी यांचा एक विचार आहे. त्यांचे मनांत कीं, इस्माईलबेग गुलामकादर यांचा उपराळा करून, पाटिलबावांचा बंदोबस्त न होय तें करावें. पातशाहांची मर्जी त्यांचे ठिकाणीं दुरुस्त नाहीं. रामरतन याचे कबिले निघोन गेले. व राय सितलदास, नाजराकडील कारभारी, यांचेही कबिले पळोन गेले. नाजरही त्या तजविजेंत आहेत. पातशाहांची

मर्जी गुलामकादर व इस्माइलबेग यांचे ठिकाणीं ठीक नाहीं. अनुपगीर गोसावी यांनीं पाटिलबावांकडेही सूत्र लाविलें आहे. यांनींही खातरजमा केली. परंतु त्याचा धीर पुरता दिसत नाहीं. सविस्तर मागाहून विनंति लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६५.

श्री. इ. स. १७८७.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– विलायतेकडील वर्तमान तरी, शाहा अबदाली व त्याचा पुत्र तैमूरशाहा आपलाले ठिकाणीं बदस्तुर आहेत. व शीख मंडळीही लाहोरापासोन तों सरहद्दपावेतों बदस्तुर आपले स्थळीं आहेत. गुलाम कादरखान सारंगपूर बुढीयास छावणी करून आहेत. यांचीं पत्रें बोलावणीचीं गेलीं होतीं. त्याचें उत्तर आलें कीं, "माझे मुलकांत शिखांचा दंगा होणार आहे. याजकरितां येणें होत नाहीं." ह्मणून उत्तर पाठविलें, व नजबकुलीखान रोहतकेस होता. तेथून कूच करून दिल्लीचे रुखवर आला आहे. येथीलही त्यास बोलावयाचीं पत्रें गेलीं आहेत. पाहावें, येईल किंवा नाहीं. मेरट प्रांतीं शिखांचा दंगा फार आहे. नित्य लुटितात. वाट चालत नाहीं. शीख दिल्लींत शाहदरयापावेतों लुटतात. मुलकांत बदआमली जाली आहे. राजे बिजेसिंग यांजकडील दाहा हजार फौज आणीक भीमासिंग याचे कुमकेस जैपूरकरांस सामील होणार. अद्यापि आली नाहीं. परंतु अवाई आहे. आपले लष्करांत माहागाई फार आहे. रसद येऊं पावत नाहीं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६६.

श्री. इ. स. १७८७.

" पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– राजे बिजेसिंग यांनीं आपला वकील तैमूरशाहा अबदाली याजकडे पाठवून पैगाम केला आहे कीं, हिंदुस्थानची पातशाहात जइफ जाली आहे. तमाम मराठे मोहित जाले आहेत. याजकरितां आपण खांसा स्वारी हिंदुस्थानास यावें. लाहोराकडून शीख मार्ग देणार नाहींत, तर आह्मी आपले स्नेही आहोंत. आह्मी आपले मुलुखांतून मार्ग देऊन, आह्मीही आपले फौजेसुद्धां समागमें होऊं. दरोबस्त हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा. जर आपली मर्जी यावयाची नसली, तर हमाऊं शहाजाद्यास परवानगी द्यावी कीं, फौजसुद्धां हिंदुस्थानांत

जावें. राजे बिजेसिंगही समागमें येतील. त्यांचे विचारें दक्षणियांस नर्मदापार करून देऊन आपला बंदोबस्त करावा. ह्मणोन शहाजाद्यास परवानगी द्यावी. ह्मणून बोलणें जालें. त्यावरून तैमूरशहा अबदाली यांनीं वकीलास आज्ञा केली कीं, आमचे मुलुखांत हंगामा हमेशा रहातो. याजकरितां इकडे मुलूख रिकामा टाकून तिकडे आमचें येणें व हमाऊं शाहाचें पाठविणें घडत नाहीं. जर तुह्मांस जरूरच असेल तर, आह्मी आपला बक्षी दहा हजारां फौजेनिसीं राजे बिजेसिंग यांजपाशीं पाठवितों. मग त्याचे विचारास येईल त्याप्रमाणें बंदोबस्त करितील. ह्मणोन बोलणें होऊन, राजे बिजेसिंग यांचे पत्राचे जाब व वकिलाचीं पत्रें ऐसीं राजेमजकुराकडे अबदालीपासून रवाना जालीं आहेत. यांची पुन्हां अर्जी अबदालीस व वकिलास पत्रें जातील. तेथून वर्तमान आलीयाउपर श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. तात्पर्य, अबदालीस विलायतीकडील लोकांचा पायबंद भारी आहे. याजकरितां अबदालीस पांच स्वार वेगळे करूं सकत नाहीं, ह्मणोनही श्रवणांत आलें आहे. पुढें निदर्शनास आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६७.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः– बुधसिंग नामें काइत वकील, बिजेसिंगाकडून पातशाहांपासीं आला आहे. तो भेटीस आमचे घरीं आला होता. त्यानें सविस्तर वृत्त राजे बिजेसिंगाकडील व राजे प्रतापसिंग जयपुरकर यांजकडील सांगितलें कीं, राजश्री पाटिलबावा ग्वाल्हेरीस होते त्या समयीं, व गुजराथेंत इंग्रजांचे मोहिमेस होते त्या समयीं, आह्मीं आपल्याकडील खंडणीचा ऐवज कराराप्रमाणें पावता करून, आह्मीं स्नेह व घरोबा रक्षिला. त्यास राजे प्रतापसिंग यांचे मामलयास जामीन होऊन, आठ लक्ष रुपये खंडणी ठैरावीत होतों. त्यांपैकीं तीन लक्ष रुपये नख्त व लाख रुपयांचें जवाहीर एकूण चार लक्ष, बाकी चार लक्ष रुपये राहिले, ते चौ महिन्यांनीं देऊं ह्मणून कररमदार करीत होतों. ह्या गोष्टी न मानितां, राव राजा प्रतापसिंग यानें बाहकाविल्यावर, खामखां आह्मी जयपुरांत ठाणें बसवून राजास काढून देऊं ह्मणोन बोलूं लागले. निदान वकील गेला होता, त्यास देखील लष्करांतून काढून दिल्हें. तेव्हां लाचार राजे बिजेसिंग जाले; आणि बक्षी भीमसिंगास दहा हजारा फौजेनिसीं जयपुरकरांचे कुमकेस पाठविलें. एक दोन लढायाही जाल्या.

निदान हा परिणाम जाला कीं, तमाम हिंदुस्थानी फौज व पलटणें यांचे बदकौलीमुळें फुटून हे खराबी केली कीं, तमाम पातशाही मुख्त्यारी व मुलूख गमावून हलके जाले. त्यास आह्मीं पूर्वींच राजश्री पाटिलबावांस विनंति केली होती कीं, राजे जयपुरकर व राजे बिजेसिंग यांसीं सख्य राखून, पातशाहाचे घरची मुख्त्यारी व मुलूखदार करून असावें, हे सल्ला उत्तम आहे. ऐवजाची वृद्धि जालियास तुमचे व आमचे धर्मास योग्य नाहीं. ह्मणून राजे बिजेसिंग यांचें बोलणें, आमचे द्वारें करून, व पत्रें लिहिलीं आलीं. परंतु यांचे खात्रेस कांहींएक गोष्ट न आली. त्यास हल्लीं पातशाहाजादा जुवाबक्ष व अवघे जितके हिंदुस्थानी, मोंगलीये वगैरे यांचें मानस हेंच कीं, राजश्री पाटिलबावा चमेलपार करून द्यावे, आणि दरोबस्त मुलूख खाली करवून, आपला काबू करावा. ह्मणून यांचें मानस आहे. त्यास, आह्मीही दोन्ही राजांची फौज यांस शामील आहोंत. परंतु आमचे राजाची मर्जी कीं, हिंदु राज्य असावें, हा पक्ष उत्तम आहे. त्यास, जयपुराकडील वकील पुण्यांत आहेत. त्यांचे हातून उभयतां राजांचा तेथेंच जोड करून स्नेहवृद्धि करावी. अथवा आह्मीही राजाचा खलिता श्रीमंतांचे नांवें आणून तुह्मांपासीं देतों. येथून पकाई करून हिंदु राज्य व्हावें हें उत्तम आहे. सरकारांतून दुसरा सरदार पाठवावा. त्याची ताबेदारी आह्मी करून हजर राहूं. ह्मणोन बुधसिंगाचें बोलणें जालें. त्यांनीं सांगितलें कीं, हें वृत्त तुह्मीं सविस्तर आपले हजुरांत लिहावें. त्याजवरून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २६८.

श्री. इ. स. १७८७.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजाकडील वकील तालकटोऱ्याचे मुकामीं आले. नाजर मंजूरअलीखान यांच्या भेटी दिल्लींत जाल्या. मेहता लालजी व मीठालाल बक्षी यांस निम अस्तिन् व गोशवारा व शिरपेंच व........दोघांस देऊन, पातशाहाकडे बिदा केले. पातशाहाची मुलाखत अद्याप जाली नाहीं. पातशाहा तालकटोऱ्याहून रेवाडीकडे कूच करून........आहेत. तेथें वकिलाची मुलाखत जाल्यावर काय सल्ला ठरेल ते विनंति लिहूं. या दिवसांत दरोबस्त यवन मंडळी दक्षण्यांसीं बेबदल जाली आहे. ज्याप्रमाणें पानिपताचे समयीं सर्व हिंदुस्थान मिळून दक्षण्यांसीं दुश्मनगी केली, तेच अवस्था आतां जाली आहे. या दिवसांत

मलकाजमानी, महंमदशाहाची बायको, इनें हवेलीविशीं आह्मांसीं कजिया मांडला आहे कीं, हवेली खाली करून देणें. आणि आह्मांस तों अहंमदशाहा पातशाहानें इनाम फरमान करून दिल्हा आहे. त्यास फरमान मनास न आणितां तगादा केला आहे. याजकरितां एक अर्जी पातशाहांस लिहून पाठवावी कीं, आमचे वकिलांसीं कोते अंदेश जमान्याची हवा पाहून, हरएकविशीं उपद्रव देतात. त्यास, आपण खाविंद समीप असतां, कोते अंदेशांनीं उपद्रव द्यावा हें ठीक नाहीं. आपण पूर्वापर हरएकविसीं यांचा गौर करीत आलां आहां, त्याप्रमाणेंच पुढेंही गौर करीत जावा, ह्मणोन एक अर्जी पाठविणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २६९.

श्री. इ. स. १७८७.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– शाहाजादा पळाल्याचें वर्तमान राजश्री पाटिलबावांनीं श्रवण करून खंडोजी शिंदे यांजवर बहुत इतराजी करून, शाहा निजामुद्दी पूर्वीं तेथें कारभारास ठेविले होते, त्यास हल्लीं तिकडे पाठवावें ऐसा विचार आहे. परंतु शाहाजी यांचें बोलणें आहे कीं, तेथील खर्चाची बेगमीचा बंदोबस्त करून दिधला, तर तिकडे जाईन. नाहीं तर माझें जाणें घडत नाहीं. याप्रमाणें वृत्त आहे. पेशजीं छ ५ माहे मजकुरीं विनंतिपत्रें सेवेसीं डाकेंत सरकारच्या पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वर्तमान श्रुत होईल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७०.

श्री. १ जानेवारी १७८८.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राजश्री पाटीलबावा छ० १० माहे रविलावलीं इस्माईलबेग याचा मोहरा लढाईचा सोडून, कूच करून ग्वाल्हेरीस गेले आहेत. ग्वाल्हेरीअलीकडे आठ कोस कुवारी नदी आहे. तेथें मुक्काम करून आहेत. त्या मुक्कामींच पामर साहेब इंग्रज येऊन भेटला. जाबसाल कंपू चाकर ठेवायाचा कराराआदार करून, कलकत्त्यास पत्रें इंग्रेजांचीं व राजश्री पाटीलबावांचीं गेलीं आहेत. तेथून जाबसाल ठेरून आलियावर कंपू यांजपाशीं दाखल होतील.

राजश्री पाटीलबावा नदी चमेल पार गेलीयावर, अजमेरचा किल्ला राजे बिजेसिंग यांनीं घेतला. व डिगेचा किल्ला राजे रंजीतसिंग जाट यांस दिल्हा. व अल्ली-नगरचा किल्ला झुलफुकारखान खानजादा यास दिला, व कृष्णगडचा किल्ला जीवाराम जाट याचे पुत्रास दिला. रेवाडीपाशील गोकुळगड आहे, तो नजब कुलीखान यांनीं घेतला; व खुर्ज्याचा किल्ला गुलाम कादरखान यांनीं घेतला. मुंडसानचे किल्ल्यास गुलामकादरखान यांहीं मोर्चे लाविले आहेत व रामगडासही मोर्चे लाविले आहेत. व पेरोजाबादचा किल्ला अनुपगीर गोसावी यांनीं घेतला. व आगरियाचे किल्ल्यास इस्मालबेग व जुवाबक्ष पातशाहाजादा यांनीं मोर्चे लाविले आहेत. जर जलदीनें फौज कुमकेस सरकारची आली, तर रामगड व आगरे दोन्ही स्थळें राहतील. जर फौज जलदीनें न आली तर + + दोन्ही किल्ले राहूं शकत नाहींत. व हतरसचे किल्ल्यास गुलाम कादरखान यांनीं मोर्चे लावून हतरसवाल्यापासून एक लाख चौतीस हजार रुपये घेतले. व कौल वगैरे मोहालाचा बंदोबस्त करून रामगडापाशीं आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति.”

लेखांक २७१.

श्री. ५ जानेवारी इ. स. १७८८.

“पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. येथें वर्तमान श्रवणांत आलें कीं, पामर साहेब राजश्री पाटील-बावांपाशीं आले. त्यांच्या यांच्या भेटी जाल्यावर परस्परें शिष्टाचार वस्त्रें, हत्ती, घोडा जवाहीर दिले; आणि दोन कंपू चाकर इंग्रेजांचे ठेविले. त्यास सरंजामांत गोहदचा व मालवणचा मुलूख महाल लाऊन द्यावे, ह्मणून करारमदार जाला आहे. त्यास, राजश्री पाटीलबावांचीं पत्रें व पामरसाहेब इंग्रेजाचीं पत्रें, लाट कलफ दानस साहेब कलकत्त्यास गेले आहेत, त्यांजकडे पाठविलीं आहेत. त्यास तेथील पोख्तगी जाली ह्मणजे दोन कंपू ग्वाल्हेरीस राजश्री पाटीलबावांपाशीं येऊन दाखल होतील. याप्रमाणें वृत्त श्रवणांत आलें, त्याजवरून विनंति लिहिलें आहे. व पातशाहाजादा जुवाबक्ष दिल्लीहून पातशाहाची आज्ञा घेऊन आगऱ्यास छ १४ रबिलावलीं कूच करून गेले. इस्माइलबेग व पातशाहाजादा एक विचारें आहेत. पातशहाजाद्याची मर्जी आहे कीं, गुलाम कादरखान व इस्माइलबेग व आपण व राजे प्रतापसिंग वगैरे सर्वत्र एकोपा करून, चमेलीअलीकडे तो बंदोबस्त जालाच आहे, पुढें मऊ सांपडल्यास ग्वाल्हेरीपावेतोंही हात घालावा. जर

तिकडे सरकारचे फौजांचा व राजश्री पाटीलबावांस भरणा भारी, आडल्यास तिकडील रोंख सोडून, व वजीर असफद्दौला याचे मुलुखांत इटावा वगैरे कडा कुरा यांजकडे जाऊन, तमाम मुलूख आपले काबूंत करून घ्यावा. याप्रमाणें पातशाहाजादा जुवाबक्ष यांनीं सल्ला ठरवून दिल्लीहून आगरियास गेले आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति.''

लेखांक २७२.

श्री. जानेवारी इ. स. १७८८.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजश्री पाटीलबावांकडील दोन कंपू व तोफखाना उठून राजे प्रतापसिंग जैपूरकर यांजकडे गेले होते. त्यांपैकीं एक कंपू, इस्मालबेग यांचे तैनातीस, आग्र्याकडे आले त्या समयीं गेला होता; व एक कंपू राजापाशीं बमय तोफखाना होता, त्यास या दिवसांत नजबकुलीखान राजास जाऊन भेटला. यांनीं कंपूस फितावून आपलेकडे तोफखाना व कंपू आणून द्यावा ऐसा फितवा राजाचे लष्करांत केला. त्याजवरून राजेमजकुरांनीं नजबकुलीखानास तों नजरबंद करून कैद केलें, व कंपूसीं लढाई राजासीं जाली. हें वर्तमान पातशाहांनीं श्रवण केलें. त्याजवरून शहामीरखान ह्मणून मातबर माणूस सुजाउद्दवल्याचे भाऊबंदांत आहेत. त्यास राजाचे लष्करांत रवाना केलें आहे कीं, कंपू व तोफखाना घेऊन यावा; व कांहीं मोंगलीये वगैरे दिल्लीवाली फौजही राजापाशीं आहे, त्यासही फोडून आणावें. या अन्वयें पाठविले आहेत. कंपू व तोफखाना, मोंगलीये वगैरे फौज फोडून पातशहापाशीं येतील. तें मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे ही विनंति.''

लेखांक २७३.

श्री. जानेवारी इ. स. १७८८.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– इकडील वर्तमान बितपसील:– इस्माईल बेग आगरियांत किल्ल्यास मोरचे लाऊन सात आठ हजार स्वार प्यादांनसीं आहेत. किल्ला बदस्तुर आगरिया + + + इस्माईलबेगाचे मोर्चे लागू जाले नाहींत.

१

गुलाम कादरखान रामगडास मोरचे लाऊन आहेत. वीस पंचवीस हजार स्वार प्यादे रोहिले त्याजसमागमें आहेत. रामगडास मोरचे समीप लागू जाले

आहेत. बहुतेक किल्ला खाली करून घेईल. किल्लेदार बोलतो कीं, "आह्मांस सरंजामसुद्धां काढून द्यावे." गुलामकादरखान ह्मणतो कीं, "एका वस्त्रानिसीं निघावें." ह्मणून बोलणें लागलें आहे. गुलामकादरखान यांनीं हरिद्वारापासून तों पेरोजाबादपावेतों सर्व अंतर्वेदींत जितका पातशाही मुलूख होता, तो सर्व गुलामकादर यांनीं आपला बंदोबस्त केला आहे. व जुवांबख्त पातशाहाजादाची नाचक्की जाली. त्याजवरून तोही उठोन गुलामकादरखान यास सामील जाला आहे. पातशाहाजादा व खानमजकूर तूर्त एकविचारें आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं.

१

राजेश्री पाटिलबावा बदस्तुर ग्वालेरीस आहेत. कांहीं तोफखाना ग्वालेरीहून उतरला आहे. तयारी करितात. व पामर साहेब इंग्रेज त्यांजपासीं आला आहे. त्याचे विद्यमानें कलकत्त्यास थोरले इंग्रेजास पत्रें पाठविलीं आहेत. इंग्रेजांचे दोन कंपू चाकर ठेऊन, जैपूरकरांचें वगैरेचें पारपत्य करून, पूर्ववत् हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा, ह्मणून दक्षणेहून नवी फौज सरकारांतून अलीबहादर व तुकोजी होळकर येणार. व यांनींही आपली खाजगी फौज राजश्री बाळाजी जनार्दन यांचे विद्यमानें देसीहून ठेऊन आणविली आहे. तिची मार्गप्रतीक्षा करून आहेत. देसच्या फौजा येऊन सामील जाल्या, ह्मणजे चमेल उतरून आगरियाकडे इस्माईलबेगाचे मुकाबलियास यावें ह्मणून वर्तमान ऐकिलें आहे. त्याजवरून विनंति लिहिली आहे.

१

रंजितसिंग जाट फौजेची निगादास्त करितो. सात आठ हजार स्वार प्यादे जमा केले आहेत. व इस्माईलबेगाचीं एक दोन ठाणींही उठोन दिधलीं आहेत. व राजश्री पाटिलबावांसही पत्रें पाठविलीं आहेत कीं, आपणही चमेल उतरून यावें. तुह्मी आह्मी सामील होऊन इस्माईलबेगाचें पारपत्य करूं. ह्मणून श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति लिहिली आहे.

वरकड किरकोळी वर्तमान पारसी अकबरा पाठविल्या आहेत, त्यांजवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७४.

श्री. ४ फेब्रुवारी १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—येथील वर्तमान तरी, छ २५ रविलाखरीं राजे प्रतापसिंग

मुक्काम मजकुरीं येऊन पातशाहाची मुलाजमत केली. एकशें एक मोहोर नजर पातशाहास व मुरशद्जाद्यास पांच पांच मोहोरा नजर केल्या. पातशाहानीं साता पारच्यांचा खिलत व मोत्यांची कंठी व जेगा शिरपेंच बमय परगिरी, व ढाल-तरवार व हत्ती घोडा, येणेप्रमाणें सन्मान केला. व दौलतरामास पांचा पारच्यांचा खिलत व एक शिरपेंच व भीमसिंग बक्षी बिजेसिंगाकडील यास पांचा पारच्यांचा खिलत व शिरपेंच व हमराई सरदार यांस पंचाण्णव दुशाले व गोशवारे येणें-प्रमाणें देऊन डेरियास बिदा केले. त्याजउपरीं दोन वेळां पातशाहाचे दर्शनास आले. खिलबत जालें कीं, "आह्मीं बंदगींत हजर आहोंत. जिकडे मर्जीस येईल तिकडे चालावें. परंतु फौजेस पोटास पाहिजे." त्याजवरून पातशाहानीं उत्तर दिल्हें कीं, "तुह्मीं आह्मांस दिल्लीहून बोलाविलें, त्यास आह्मांस व आह्मांसमागमें फौज आहे ईस, खर्चाची बेगमी करून द्यावी; आणि तुह्मीं समागमें चालावें. जिकडे घेऊन जाल, तिकडे यावयास सिद्ध आहोंत." हें उत्तर राजांनीं ऐकून विनंति केली कीं, "विचार करून अर्ज करूं." ह्मणून विनंति करून आज्ञा घेऊन आपले डेरियास गेले. त्यास, दोन लाख रुपये पातशाहास खर्चास देऊन, माघारां जयपुरास जावें, या विचारांत राजे आहेत. त्यास, राजाचे घरीं भक्षावयास नाहीं. व इकडे पातशाहाचीही हेच अवस्था आहे ! पैका कोठें दृष्टीस पडत नाहीं ! नित्यानीं अनुपगीर गोसावी यांचे विद्यमानें राजांस तगादा खर्चाविशीं होतो. त्यांत पंचविसा हजारांची टीप आणून दिधली आहे. त्यापैकीं पांच हजार रुपये पटले. बाकी पटावयाचे आहेत. या घालमेलीस एक महिना जाला. पैका कोठेंही दिसत नाहीं. पातशाहासमागमें पांच सात हजार स्वार प्यादा आहे. त्यांतून उपासाकरितां नित्यानीं शेंपन्नास माणूस उठोन जातें. रेवाडी व गोकुळगड नजबकुलीखानापाशीं आहे त्यास पातशाहाची मर्जी आहे कीं, रेवाडी व गोकुळगड सरकारांत द्यावा. त्यास नजबकुलीखान पांचसात हजार स्वार प्याद्यांनशीं रेवाडीपासून एका कोसावर मुक्काम करून आहेत. रेवाडी व गोकुळगड सोडीत नाहीं. ह्मणतात कीं, ज्याप्रमाणें नवाब नजबखान साठ हजार रुपये दरमहा महालांत खर्चास देत होते, त्याप्रमाणें मजपासून घ्यावे, आणि मजला मुखत्यारीचा कारभार सांगावा. ह्मणून बोलणें होतें. परंतु तो जातीनशीं लबाड आहे. कारभार पार पाडील न पाडील, ह्मणून पातशाहा अंदेशांत आहेत. अद्यापि नजबकुलीखान यांची व पातशाहाची मुलाजमत जाली नाहीं. पातशाहा रागें भरतात कीं, गोकुळगड व रेवाडी सोडीत नाहीं. त्यास राजेही येथें, पातशाहाही येथें, आणि नजबकुलीखान

सातआठ हजार माणसांनशीं एका कोसावर. परंतु त्याचें पारिपत्य करून रेवाडीचा व गोकुळगडचा बंदोबस्त होत नाहीं. इतकी पातशाहात हलकी जाली आहे. कांहीं ताळ राहिला नाहीं. राजे प्रतापसिंग यांस राजे बिजेसिंग यांची नात यांस दिधली आहे. लग्नाचा विचार आहे. ह्मणून वारंवार राजे बिजेसिंग यांचीं पत्रें प्रतापसिंगास व भीमसिंग बक्षीस येतात कीं, तुह्मीं पातशाहासीं सामदाम करून सत्वर पुष्करास येणें. मुलीचें लग्न जालियावर पुढें सल्ला पडेल तें करूं. ह्मणून वारंवार पत्रें येतात. त्यास येथील प्रकार राजे प्रतापसिंग कैसा ठैरावून रुसकत होतील, तें प्रत्यास आलियावर मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७५.

श्री. ५ फेब्रुवारी इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य देवराव महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत ता २६ रविलाखर मुक्काम वेहलालवाडी प्रो डांगरी थालनेराहून नवकोस. तापी दक्षिण तीर प्रांत खानदेश स्वामीकृपेंकरून यथास्थित असों. विशेषः— स्वामीनीं कृपाकरून जासूदजोडीसमागमें छ ५ रविलाखरचें पत्र पाठविलें, तें छ १७ मिनहूस दोनप्रहरां पावलें. साकल्यार्थ कळला. आज्ञेप्रमाणें राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांनीं कूच करून, तापी दक्षिणतीरास मुक्काम मजकूरपावेतों आले. पुढें दरमजल येत आहेत. साकल्यार्थ पुरवणीपत्रीं विनंति लिहिली आहे. व सुभेदार यांनीं पत्र स्वामीस लिहिलें आहे. त्याजवरून श्रुत होईल. विशेष काय लिहिणें, कृपा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विनंति."

लेखांक २७६.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः—नाजर मंजूरअल्लीखान, व रामरतन मोदी, सीतळदास नाजरजीचा पेशकार यांचें मानस कीं, पातशाहांनीं इस्माइलबेग व गुलाम कादरखान यांचे सामील व्हावें. त्यास, पातशाहांची मर्जी नाहीं. व कारभारी यांचें मानस कीं, कसेंही करून दिल्लीहून कूच पातशाहांचें करवून पातशाहांस नमूद करून राजश्री पाटीलबावांचें पारपत्य करावें याप्रमाणें यांचें मानस. त्यास,

पातशाहांची मर्जी कीं, गुलाम कादरखान व इस्माईलबेग यांचें पारपत्य व्हावें. या अर्थी दुखण्याचें सोंग घेऊन महालांत असतात. प्रातःकाळीं मात्र एकवेळ क्षणभर निघोन सर्वांचे मुजरे घेतात. फिरून महालांत जातात. पुन्हा बाहीर निघत नाहींत. याप्रमाणें आठ दहा रोज गुजरले आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २७७.

पैवस्ती छ० ९ जमादिलाखर. **श्री.** २५ फेब्रुवारी इ. स. १७८८.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० १७ माहे जमादिलावल मुक्काम रेवाडी जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः— आपलीं आज्ञापत्रें छ० १७ जिल्हेज व छ० २० मोहरम व छ० ५ सफर एकूण तीन पत्रें पाठविलीं. ते छ० ११ रविलाखरीं पावलीं. पत्रीं आज्ञा कीं, ''पलटणाचे फितुरीमुळें राजश्री पाटीलबावांनीं विचार करून डिगेस आले. चांगलें केलें. पुढें मसलत पाहातील, तैसें करतील. सरकारांतून राजश्री पाटिलबावांचे कुमकेस अलीबहादर यांजबराबर सरंजामी व इतलाखी मातबर फौज देऊन रवाना होत आहेत. डेरेदाखल जाले आहेत. पातशाहांची मजबुती कसी आहे? याची बारीक रीतीनें चौकशी करून लिहून पाठवावें. व प्रस्तुत पाटिलबावांकडील व जैपुरकराकडील वर्तमान काय आहे तें ल्याहावें. व कलकत्तेकर इंग्रेज लखनऊस येणार, त्याजकडील बातनी राखून, कोठपर्यंत आला, लखनऊस कधीं येणार, हें लिहून पाठवावें. पुढें होत जाईल तें वरचेवर लिहित जावें. व तुह्मीं लिहिल्या अन्वयें पातशाहांचे पत्राचें उत्तर अर्जी पाठविली आहे. व नवाब मंजुरअल्लीखान यास खलितापत्र पाठविलें आहे. प्रविष्ट करावीं. दोहीं पत्रांतील मजकूर तुह्मांस कळला पाहिजे. याजकरितां हिंदवी नक्कल पाठविली आहे. त्याजवरून कळेल. त्या अन्वयें तुह्मीं बहुत तऱ्हेनें पातशाहांस अर्ज करून, राजश्री पाटिलबावांकडील संधान पूर्ववत् राहे ऐसें करावें. गुलामकादरखानाचा मजकूर लिहिला तो कळला.'' ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास इकडील वर्तमान पेशजीं छ० ५ मोहरम व छ० ९ सफर व छ० ८ रबिलावल व छ० ६ रविलाखर एकूण चार विनंतीपत्रें पेशजी पाठविलीं आहेत. त्याजवरून पातशाहांकडील व राजश्री पाटिलबावांकडील व इंग्रेजांकडील वगैरे वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, पातशाहांची मर्जी बारीक

रीतीनें मना आणिलियास पातशाहा राजश्री पाटिलबावांवर बहुत संतोष आहेत. याचें कारण हेंच कीं, पाटिलबावांनीं पैका पातशाहास दिल्हा आणी राजी ठेविलें. ऐसें नवाब नजबखान यांनीं व अफराशाहबखान यांनीं कोणीही मुख्त्यारींत पैका दिल्हा नाहीं. व पातशाहांस राजी ठेविलें आहे. त्याअन्वयें राजश्री पाटिलबावांनीं पैकाही (फाटलें आहे) + + + + + + + व आतांही राजश्री पाटिलबावा व अलीबहादर पातशाहांपासीं येऊन दाखल जाले. ह्मणजे पातशाहा पूर्वत्रत्प्रमाणेंच हजर आहेत. यांत रतीभार गुंता नाहीं. याप्रमाणें बोलणेंही करारांत आणिलें आहे............यांत संशय रतिभारही नाहीं. व पातशाहांनीं सरकारचे अर्जीचा जाब शुका दिल्हा आहे, तो पाठविला आहे. त्याजवरूनच ममतेचा प्रकार ध्यानास येईल. परंतु पातशाहांची प्रकृत ऐसी आहे कीं, जैसी सासूखाले सून आज्ञेनरूप चालते, त्याप्रमाणें जो मुख्त्यार समीप राहेल, तो जैसें बोलवील तैसें बोलतील. याप्रमाणें मुखत्याराचे मर्जीनरूप चालतात. ऐसी यांची प्रकृत आहे. जातीनसीं नेट देऊन एखादा कारभार करावा, ऐसा अर्थ नाहीं. येथील शेवटचा प्रकार येऊन बजखाक आहे. अखेरीस कांहीं बाकी राहिली नाहीं. कोणी एक जबरदस्त यांजपासीं राहून, यांस पोटास मात्र देऊन यांजला समागमें घेऊन, मनास येईल त्याप्रमाणें सलतनतीचा बंदोबस्त करावा, ऐसा समय आहे. कोणी एक जबरदस्त यांजपासीं येऊन मिळाला, तरी पातशाहा त्याचे काबूंत गेलियावर पुढें मसलत भारी पडेल. आतां जागा रिकामी आहे. कोणी माणूस ऐसा नाहीं कीं, सलतनतीस आळा घाली. याप्रमाणें येथील प्रकार आहे. स्वामींस श्रुत व्हावें ह्मणून कच्चें वृत्त येथील लिहिलें आहे. याहीवर स्वामी धणी आहेत. जे सल्ला उत्तम जाणतील, ते करतील. जैसें सातार्‍याचें संस्थान आपले हातीं आहे, तोच प्रकार येथीलही प्रस्तुत आहे. परंतु येऊन सत्वर सांभाळणें सल्ला आहे. मातबर फौज व शाहाणे माणूस सरदार कीं, सर्वांस वरीस दोन वरसें मायेंत घेऊन अवघ्या मुलकांत आपला काबू करून घेतला ह्मणजे पुढें मर्जी येईल त्याप्रमाणें करावें. पुणें व दिल्ली एक होऊन जाईल ऐसा समय आहे. पाहिला प्रकार विनंति लिहिली आहे. जे उत्तम सल्ला असेल ते धणी करतील. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७८.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– राव राजा प्रतापसिंग व नजब कुलीखान दोघे एकत्र होऊन,

तमाम मेवातचा बंदोबस्त करून, आपलीं ठाणीं बसविलीं. आणि कृष्णगडांत राजश्री पाटिलबावांकडील अंमल आहे. तेथें कृष्णगडास मोर्चे लाविले आहेत. व राजे प्रतापसिंग जैपूरकर लग्न करावयास जोतपुरास जाणार ह्मणून दोन कोस जयपुरीहून बाहीर मुक्काम करून आहेत. राजे बिजेसिंग बदस्तुर जोतपुरीं आहेत. बिकानेरकर राजा मृत्यु पावला ह्मणोन त्याचा पुत्र राज्यीं बसला. त्यास, राजे बिजेसिंग यांनीं आपलेकडून राज्याचा टिका देऊन, भला माणूस पाठविला आहे. सीख लाहोरापासून तों पाणीपतपावेतों, आपलाले ठिकाणीं बदस्तुर आहेत. कांहीं शीख शहाबादवाले येऊन, तमाम अंतरवेदींत गुलामकादरखान याचा अंमल व पातशाही अंमल व जागीरदार आहेत, यांच्यापासून घासदाणा दर-सेंकडा रुपये पंचवीसप्रमाणें अंमल करून, रुपाया वसूल करून घेतला. दिल्लीचे आसपास तमाम सिखांचा अंमल चौथाईचा बंदोबस्त आहे. वजीर असफद्दौला बद-स्तुर लखनौस आहेत. इंग्रेज कलकत्त्यांतआहेत. आपलेकडील फौज राजश्री पाटिल बावांकडील धारराव शिंदे वगैरे कांहीं मथुरेस येऊन, रोहिल्यांचा अंमल उठऊन देऊन, मथुरा वृंदावन वगैरे आपलीं ठाणीं बसविलीं; व कांहीं फौज देवजी गवळी वगैरे श्रीयमुना उतरून कोलेकडे गेली. कोलेचे ठाणें रोहिल्याचें कापून काहा-डिलें. दोनप्रहरपर्यंत कोलेचा कसबा मराठ्यांनीं लुटला. हें वर्तमान गुलाम-कादरखानानें ऐकून, कांहीं फौज रोहिल्यांचीही पार उतरली आहे. आपण खासा व इस्माइल बेग मिळून, आगरियास मोर्चे लाऊन आहेत. पुढें श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. आगरियाचे किल्ल्यांत या दिवसांत धान्याची कमती जाली आहे ह्मणून ऐकिलें आहे. श्रीमंत साहेबांचे प्रतापेंकरून यवनाचें पारिपत्य लौकरच होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २७९.

श्री. ५ मार्च इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. हिंदुस्थानचे दलाल रामरतन मोदी वगैरे यांनीं व दौलतराम हलदीया, राजे प्रतापसिंगाकडील, यांनीं बटेबाजी करून पातशाहांस दिल्लींतून बाहेर काढून रेवाडीस आणिलें. जैपुराकडून राजे प्रतापसिंग व भीमसिंग जोत-पूरकराकडील बक्षी यांसही रेवाडीस घेऊन आले. पातशाहांस भासविलें कीं, आपण रेवाडीस चालावें, ह्मणजे प्रतापसिंगास दाबून दोन चार लाख रुपये त्याजपासून घेऊन व जैपूरकरांची व जोतपूरकरांची फौज समागमें घेऊन, तमाम

मुलुखगिरी करून, आपला खालसा करावा. ह्मणून यांस भासविलें. तिकडे राजास भासविलें कीं, राजश्री पाटिलबावांसीं तुह्मांसीं विपट पडलें आहे. तेव्हां मागें पुढें दक्षणी फौजा येऊन तुमचें पारपत्यच करतील. याजकरितां पातशाहांस सामील करून त्यांजला समागमें घेऊन पुरतें दक्षण्यांचें पारपत्य करावें. व उज्जेनपावेतों बंदोबस्त करावा. हा विचार ठैराऊन दिल्लीहून पातशाहांस आणिलें. आपण जैपुराकडून आले. परस्पर भेटी जाल्या. पातशाहांनीं राजास वस्त्रें देऊन सन्मान केला. शेवटीं पातशाहांचे येथें खर्चाची वोढ. तेव्हां खर्चास मागूं लागले. सक्त तगादा केला. तेव्हां राजांनीं साफ जाब दिल्हा कीं, आह्मांस राजश्री पाटिलबावांनीं खराब केलें आहे. त्यांनीं आमचे घरीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. याप्रमाणें पातशाहांस विनंति केली. त्याजवरून छ० २६ जमादिलावलीं राजास सरबस्ता पागोटें व भीमसिंग बक्षी यास एक दुशाला गोषवारा व दौलतरामास एक दुशाला गोषवारा देऊन बिदा केलें. त्यासमयीं राजांनीं कांहीं नक्त व कांहीं कापड एकूण अवघें पन्नास हजारांचें वित्त दिधलें. आणि पातशाहांपासून नालकी व आलवरचे किल्ल्याची फर्द दसकत करून घेतली. आणि आज्ञा घेऊन आपले डेरियास गेले. दुसरे दिवशीं दरकूच जयपुरास गेले आहेत. त्यास बिजेसिंगाचें पत्र आलें होतें कीं, तुह्मीं तिकडून सामरास येणें. आह्मी इकडून सामरास येतों. फाल्गुन वद्य ५ मीचें लग्न विजेसिंगानीं आपले नातीचें राजे प्रतापसिंगासीं नेमिलें आहे. याजकरितां पुष्कर तीर्थावर लग्न करून, पुढें हे सल्ला ठैराविली कीं, तिकडून अलीबहादर व तुकोजी होळकर राजश्री पाटिलबावांचे कुमकेस येतात. त्यास, त्यांजकडे आपले वकील पाठऊन सामदाम करून सलुक करावा. जर हे गोष्ट जैपूरकरांनीं न ऐकली, तरी दोन लाख रजपूत दोही राज्यांतील आहेत, इतकें मरूं; तेव्हां कोणी आमची जमीन घेईल व राज्यभ्रष्ट करील. याप्रमाणें बोलणें करारांत आलें आहे ह्मणून भीमसिंग बक्षी यांनीं आह्मांस मुजरद बोलाऊन सांगितलें कीं, आह्मी पातशाहांस व यवनाचे राजास राजी नाहीं. यांची अधर्माची वर्तणूक हे आमचे राजास माफकत पडत नाहीं. याजकरितां श्रीमंतांची पांच रुपये अधिकउणे आह्मां पासून खंडणी घेतील ते आह्मांस पुरवेल; परंतु यवनाची सेवा पुरवत नाहीं. व आह्मांस कोणी राज्यभ्रष्टच करील आणि आमची जमीन हिराऊन घेईल, तर आह्मांस मरणें प्राप्त आहे. याप्रमाणें आह्मांसीं गोष्टी बोलून, आपण कूच करून राजे प्रतापसिंगासमागमें गेले. याप्रमाणें इकडील वृत्त आहे. स्वामींस निवेदन व्हावें, ह्मणून विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.

अलवरचा किल्ला सांप्रत रावराजा प्रतापसिंग याजपासीं आहे. त्याजपासून जैपूरकरांचे हातीं लागणें कठीण आहे. तूर्त पातशाहांपासून दसकत मात्र करून घेतले आहेत. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पहिजे हे विनंति."

लेखांक २८०.

श्री. मार्च इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. गुलाम कादरखान यांनीं रामगडचा बंदोबस्त करून आंतरोली, डबईकडे बंदोबस्तास गेले आहेत. पंचवीस तीस हजार स्वार प्यादा समागमें आहे. हिंदुस्थानांत एक गुलाम कादरखान मात्र राजश्री पाटिलबावांसीं बदआमली जालियावर बळावला आहे. वरकड इस्माइलबेग आगरियाचे आसपास माहालावर अंमल करून पांच हजार स्वारप्यादांनसीं आहे. व नजबकुलीखान पांचसहा हजार स्वार प्याद्यांनिसी कानोड रेवाडी पाटोदी वगैरे माहाल दाबून आहे. हे तिघेहीजण पातशाहांसीं रुजू नाहींत. पातशाहांच्यानें यांचें कांहीं होत नाहीं. याजकरितां पातशाहा आपले फौजेची मार्गप्रतीक्षा करून आहेत. नित्यानीं एका दो रोजां पुसतात कीं, "तुकोजी होळकर व अलीबहादर कोठपर्यंत आले?" त्याजकडे निजध्यास फार लागला आहे. राजश्री पाटिलबावांबराबर फौज आहे इचा आब हिंदुस्थानांत गेला आहे. याजकरितां या फौजेचा इतबार पातशाहांस पडत नाहीं. बोलून देखील दाखविलें कीं, "बाबा, या फौजनें कांहीं होणार नाहीं. नवी फौज येईल ते काय करील तें करो." ह्मणून बोलतात. याप्रमाणें इकडील वृत्त आहे. पुढें विशेष श्रवणांत आलियावर विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८१.


श्री. ११ मार्च इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २ माहे जमादिलाखर मुक्काम रेवाडी जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः— आपण छ० ७ रबिलाखरचें पत्र पाठविलें, तें छ० २९ जमादिलावलीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "पातशाहाजवळ इकडील प्रकर्णीं घरचेवर बोलत जावें. अलीबहादर यांची रवानगी केली आहे. मजल दरमजल पाटिलबावांजवळ जाऊन पोहोंचतील. याउपर दिरंग लागणार नाहीं. पातशा-

ह्यांची कायेमी पाटिलबावाविसीं पक्की असावी. त्यांत वांकडें असूं नये. इंग्रेजही माघारा कलकत्त्यास गेला. श्रीमंतांचे प्रतापें सर्व बंदोबस्त पाटिलबावा करतील. वरचेवर वर्तमान होत जाईल तें लिहित जावें." ह्मणोन पत्रीं आज्ञा. त्यास, नबाब अलीबहादर मातबर फौजेनसीं हिंदुस्थानांत आले, हें वर्तमान पातशाहांनीं ऐकून श्रीमंतास शुका व अलीबहादरास शुका ऐसे लिहून, आमचे स्वाधीन केले; व अनुपगीर गोसावी हिंमतबहादर यांनीं आपले खलिते स्नेहवृद्धीचे लिहून दिल्हे. त्याप्रमाणें सरकारचे नांवाचा खलिता व शुका व आपले नांवाचा खलिता ऐसे पाठविले आहेत. त्याजवरून सविस्तर ध्यानारूढ होईल. उत्तरीं लोभ करणार स्वामी समर्थ आहेत. पातशाहांची कायममिजाजी ह्मणावी तरी राजश्री पाटिलबावा रेवाडीस आले. आणि मोंगलिये वगैरे मंडळी समीप होती, त्यांच्या ह्मटल्यानें पाटिलबावांस लिहून पाठविलें कीं, तुह्मीं तूर्त दिल्लीस न यावें. त्याचें फळ आतां दृष्टीस पडलें, कीं जयपूरकर राजे आले. दोन महिने घोळ पडला. शेवटीं पातशाहा दिक जाले. राजाकडून कांहीं प्राप्त न जालें. ते रुकसत होऊन माघारा जयपुरास गेले. आतां नजबकुलीखान यांचा घोळ पडला आहे. पातशाहांची मर्जी कीं रेवाडी व गोकुळगडचा किल्ला सोडावा. व नजबकुलीखान किल्ला व रेवाडीचा परगणा सोडीत नाहीं, नजबकुलीखान चौकोसांवर एक हजार स्वार व पांच पलटणें प्यादे व पस्तीस तोफा या सरंजामानसीं उतरला आहे. तो पातशाहांपासीं मुलाजमतीस येत नाहीं. यांच्यानें त्याचें पारपत्य होत नाहीं. पातशाहांपासीं दोन हजार स्वार व तीन पलटणें व तीस पस्तीस तोफाही आहेत. परंतु भक्षावयास नाहीं, ह्मणून माणूस मात्र दिक आहे. यांचे कायम मिजाजीचा प्रकार ह्मणावा तरी मेणाचें नाक यांचा मिजाज आहे. जो जबरदस्त मातबर मुखत्यार जवळ राहेल, तो जैसें यांस नाच नाचवील, तैसें जातील. याप्रमाणेंच तीस वरसें पातशाहात केली आहे. आतां खर्चाची तंगी; फौजेची तडातोड; याजमुळें बहुत दिक आहेत. कोणीं एकजणानें येऊन आह्मांस भक्षावयास मात्र द्यावें, आणि मनास येईल त्याचें पारिपत्य करून मुलकाचा बंदोबस्त करावा, ऐसें यांचें मानस आहे. पुढें घडल्यांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.

पातशाहांनीं आपला शुका व अकबरशाहा पातशाहाचा पुत्र यांनीं स्नेहवृद्धीचें पत्र श्रीमंत साहेबांस लिहिलें आहे. व गोसावी अनुपगीर हिंमतबहादर तूर्त पातशाहापासीं आहेत. यांनीं आपला खलिता पाठविला आहे. त्यास तीही पत्राचा मजकूर मनन करून उचीत असेल त्याप्रमाणें उत्तरें पाठवावीं. सर्वांस श्रीमंत साहेबांकडील उर्जिताची उमेद आहे. कळावें बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."



औरंगजेब.

(वृद्धावस्था.)

पैवस्ती छ० ३ रज्जब
समान समानीन चैत्र

लेखांक २८२.

श्री. ११ मार्च इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० २ माहे जमादिलाखर मुक्काम रेवाडी जाणून स्वानंद-लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः—सरकारचें आज्ञापत्र छ० ७ रविलाखरचें सादर जालें, तें छ० २९ जमादिलावलीं पावलें. शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, "तिकडील वर्तमान वरचेवर लिहित जाणें. व चिरंजीव अली-बहादर यांची रवानगी फौजसुद्धां केली असे. दरमजल तिकडे येऊन पोहोंचतील." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास इकडील वर्तमान, पेशजीं छ० १७ जमादिलावलीं विनंति-पत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, नवाब अलीबहादर यांचें येण्याचें वर्तमान पातशाहांनीं ऐकून, नवाब अलीबहादर यांस शुका लिहून दिल्हा आहे. तो त्यांजकडे रवाना करून दिल्हा. व आह्मींहि येथील वर्तमान त्यांस लिहिलें आहे. व आपणासही पातशाहांनीं शुका पाठविला आहे, त्याजवरून सविस्तर कळेल. व राजे हिंमतबहादर अनुपगीर गोसावी यांनीं आपले स्नेहवृद्धीचा खलिता पाठविला आहे. उत्तरीं लोभ करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड इकडील वृत्त सविस्तर राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्याजवरून ध्यानारूढ होईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८३.

श्री. मार्च इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. जुवाबख्त पातशाहाजादा दिल्लीहून कुटुंब घेऊन, आगरियास इस्माइलबेगापासीं गेले. त्यासीं बनाव न बसला. तेथून कूच करून गुलाम कादरखान यांजपासीं गेले. त्यांसींही बिधन बसली. निदान तेथूनही कूच करून फरोकाबादेस गेले. तेथें गेलियावर वजिरास पत्रें पाठविलीं. त्यांनीं एक लाख रुपयांची हुंडी खर्चास पाठविली, आणि अर्जी पाठविली कीं, हें घर आपलें आहे, सुखरूप यावें. त्याजवरून पातशाहाजादा लखनऊस गेला आहे. तेथें कुटुंब ठेऊन आपण कलकत्त्यास जाणार. ह्मणून वर्तमान आहे. त्याज-वरून विनंति लिहिली आहे. वजीर असफदौला बदस्तुर लखनऊस आहेत.

इंग्रेज लाट कलफदान सितेन साहेब बदस्तुर कलकत्यास आहेत. सीख लाहोरापासून तों पाणिपतपावेतों बदस्तुर आपलाले ठिकाणीं आहेत. कांहीं किरकोळी सीख दिल्लीचे आसपास लुटीत फिरतात. व तहमूरशाहा अबदाली कंदारापलीकडे मुलुखगिरीस गेले आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८४.

श्री. मार्च इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राजे बीजेसिंग यांस पातशाहांनीं साता पारचांचा खिलत व हत्ती घोडा व जवाहीर, जेगा, शिरपेंच, मोत्याची कंठी, तरवार येणेप्रमाणें सर्फराज + + + याजसमागमें सरंजाम देऊन पाठविला आहे. त्याचें कारण कीं, त्यांनीं कांहीं खर्चास पाठवावें. ह्मणून इतका शिष्टाचार करून पाठविला आहे. भीमसिंग बक्षी यांनीं अजमेरचे किल्ल्याविसीं फर्द पातशाहांस दिधली कीं, आह्मांस बक्षीस द्यावा. तूर्त अंमलही त्यांचाच अजमेरींत आहे. त्या फर्देवर पातशाहांनीं दसकत केलें कीं, माकुल पेशकस सरकारांत दिधलिया देऊं, ह्मणून दसकत करून दिल्हें आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८५.

श्री. ५ एप्रील इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—छ २७ जमादिलाखरीं राजश्री पाटीलबावांची फौज देवजी गवळी व राणेखान भाई वगैरे चमेल उतरून, ढवळपुराअलीकडे आगरियासमीप आली. आगरियाहून इस्मायलबेग कूच करून ढवळपुराकडे गेला. इस्मायलबेगाशीं थोडी बहुत करोली फौजेची होऊन, राजश्री पाटीलबावांची फौज माघारा चमेल उतरून गेली. इस्मायलबेग चमेलेचे कांठीं ढवळपुरावर मुक्काम करून होता. त्यास, राणेखान व रायाजी पाटील वगैरे फौज, करोलीचे रोखें चमेल उतरून आग्र्यास आले. तेथें इस्मायलबेगाचा बाप व उमरावगीर गोसावी आगरियाचे बंदोबस्तास होते. यांसीं लढाई जाली. उमरावगीर जखमी जाला. उमरावगिराचें पथक लुटून, उमरावगिरास धरून घेऊन, आगरियापासून आठ कोंस भरतपुराचे रोखें इछनेरा गांव आहे तेथें

घेऊन जाऊन, तेथून उमरावगिराची रवानगी राजश्री पाटीलबावांकडे चमेलपार केली. व आगरियाचे किल्ल्यांत अंमल बदस्तुर पाटीलबावांचा आहे, व शहरांत बंदोबस्त इस्मायलबेगाचा आहे. आग्र्यास उमरावगिराशीं लढाई जाली, त्यास धरून नेलें, हें वर्तमान इस्मालयबेगानें ऐकून, माघारा कूच करून आगरियास आला. गुलामकादरखान यमुनापार होते. त्यासीं एकवाक्यता करून, त्यांचे फौजेचा उतारा करून आगऱ्यास एकत्र जाले. तेथून गुलामकादरखान यांनीं पातशाहांस अर्जी पाठविली होती कीं, आगरियास राजश्री पाटीलबावांची फौज दाखल जाली; पुढें आह्मांस काय आज्ञा? त्याजवरून, तूर्त येथें मुखत्यार नाजरजी व रामरतन आहेत, यांनीं पातशाहांचा शिक्का व आपलीं पत्रें गुलामकादरखान यांस लिहून पाठविलीं कीं, तुह्मीं व इस्मायलवेग एकत्र होऊन, आगरियाचा किल्ला आपले काबूंत ठेवून, राजश्री पाटीलबावा चमेल उतरेत तें करणें; व त्यांची फौज आछनेरास उतरली आहे, तीस चमेल पार करून देणें; ह्मणोन पत्रें गेलीं आहेत. व पातशाहांची मर्जी आहे कीं, पाटीलबावांचा पुन्हां बंदोबस्त होऊन, आह्मीं त्यांनीं एकत्र होऊन, गुलामकादरखान व नजबकुलीखान व इस्मायलबेग यांचीं पारपत्यें करावीं. व नाजरजीचें व रामरतन मोदी वगैरे मंडळी आहे यांचें मानस कीं, राजश्री पाटीलबावा नसावे. इस्मायलबेग व गुलामकादरखान हे असावे. असे दोन प्रकार एका घरांत जाले आहेत. धन्या चाकराची चित्तशुद्धता नाहीं. पुढें अंमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८६.

श्री. २४ एप्रिल इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:— इस्माईलबेग, महमदबेग अमदानी याचा पुतण्या, पांच सात हजार स्वारप्यादा समागमें घेऊन, राजे प्रतापसिंग जयपूरकर यांजपासून आज्ञा घेऊन अकबराबादेस आले. त्यास निळोबा ह्मणून शेणवाई, राजश्री बाळोबा पागनिसाकडून अकबराबादेस किल्लेदार आहे, व राजश्री रायाजी पाटील शिंदे सात आठ हजार स्वार प्याद्यांनिसीं अकबराबादेबाहेर होते, त्यांसीं व इस्माईलबेगासीं लढाई जाली. शेवटीं रायाजी पाटील पळून भरतपुरास गेले. इस्माईलबेग यानें शहरांत अंमल करून, आगरियाचे सराफांपासून पस्तीस हजार रुपये दंड घेतला. व नौबतराय खत्री, राजश्री पाटीलबावांकडील कारभारी,

त्याचें घर जप्त केलें व खणती लाविली. त्याचे हवेलींतून सा हजार मोहोरा व शालेचे गठ्ठे, व बनातीचे गठ्ठे, व सोनें रुपें मिळून दोन लक्षांचें वित्त सांपडलें. व राजे नारायणदास, अफराशाहाबखान याचा दिवाण, त्याचेंही घर आगरियांत होतें, तेंही खाणिलें. त्यांतूनही लाखा दिढा लाखांचें वित्त सांपडलें. तेणेंकरून तमाम फौज ताजी होऊन, नवी निगादास्त करितो. वीस पंचवीस हजार स्वार प्याद्यांचा जमाव जाला आहे. व शहरांतून मोर्चे लागू करून, किल्ल्याचे दरवाजापाशीं जुम्मा महजद आहे, तेथें जाऊन मोर्चे लागू जाले आहेत. किल्ल्याचा दरवाजा व खिडकी बंद जाली आहे. परंतु निळोबानें किल्ला अद्यापि राखिला आहे. जर जलदीनें उपराळा जाला, तर आगरियाचा किल्ला रहातो. नाहीं तर मग कोठेंही दम घ्यावयास जागा नाहीं. राजश्री रायाजी पाटील व कांहीं फौज रंजितसिंग जाटाची जमा होऊन, दहाबारा हजार आगरियाचे आसपास फिरतात. परंतु इस्माईलबेगाचे फौजेवर हात पडत नाहीं. व त्याचे फौजेवर आपले कडील फौजेची इभ्रतही नाहीं. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक २८७.

श्री. २९ एप्रील इ. स. १७८८.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २२ माहे रज्जब मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:— पेशजीं छ २१ जमादिलाखरीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन वृत्त श्रुत जालें असेल. सरकारचें आज्ञापत्र छ० २९ रविलाखरचें सादर जालें. तें छ० ७ रज्जबीं मुक्काममजकुरीं पाऊन सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, ''राजश्री पाटिलबावा ग्वालेरीस आले. तिकडे कोणी नाहीं. मोकळें पडलें. त्याअर्थीं ज्याचें मनास जैसें येतें, तैसें करितो. व पातशाहांचेंही अंतःकरण स्थिर नाहीं. असो. तुह्मीं पातशाहासीं इकडील लक्षाविसीं बोलत जावें. सरकारांतून राजश्री पाटिलबावांचे कुमकेस अलीबहादर मातबर फौजेनसीं रवाना जाले. गंगा उतरल्याउपर लौकर पाटिलबावांकडे जातील. व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार यांचीही रवानगी होत आहे. श्रीमंतांचे प्रतापेंकरून सर्व गोष्टी घडोन येतील. पातशाहांचा मात्र खमीर असावा. त्यांत चलबिचल होऊं नये.'' ह्मणोन लिहिलें. त्यास येथील प्रकार तर, जो कोणी

पातशाहांपासीं राहील, त्याचेंच लक्षावर सर्व बंदोबस्त आहे. व पातशाहांचा खमीर पक्का नाहीं. मेणाचें नाक आहेत. जो जबरदस्त जवळ येऊन राहील, त्याचे मर्जीप्रमाणें पातशाहांनीं वर्तावें. दुसरा अर्थ रतीभार नाहीं. याप्रमाणें येथील प्रकार आहे. या दिवसांत हिंदुस्थानांत श्रीभागीरथीअलीकडे गुलामकादरखान रोहिले व इस्माईल बेग आगरियाचे आसपास ऐसा उभयतांनीं मुलुख दाबिला आहे. उभयतांपासीं फौज बारा तेरा हजार व प्यादे पंचवीस हजार व शें सवाशें तोफा येणेंप्रमाणें जमाव दोघां मिळून आहे. हे मोंगली फौज हमेशा सरकारचे फौजेनें मारलेली आहे. हिंदुस्थानी फौजेचा जमाव आहे. व राजश्री पाटीलबावापासीं वीस पंचवीस हजार स्वारप्यादगान मिळून आहे. व तोफा दोन अडीचशें आहेत. याखेरीज राजे रंजितसिंग जाट यांचा जमाव पंचवीस तीस हजार स्वारप्यादा आहे. ते व राजश्री पाटिलबावा एकविचारें आहेत. परंतु राजश्री पाटिलबावा चमेलपार कुवारी नदीवर आहेत. व रंजितसिंग जाट भरतपुराजवळ आहेत. याप्रमाणें दोघे सरदार दों ठिकाणीं आहेत. दोघाकडील फौजा मात्र गुलामकादरखान व इस्माईल बेग यांचे फौजेचे आसपास आठदाहा कोसांचे अंतरानें आहेत. जिकडे हे दोघेजण रूख करितात, तिकडे फौज ठरत नाहीं. राजश्री पाटिलबावाकडील व रंजितसिंगाकडील फौज पळून जाते. याप्रमाणें अवस्था आहे. राजश्री पाटिलबावांची व रंजितसिंगाची फौज मिळून पन्नास साठ हजार स्वारप्यादा आहे. परंतु रोहिले व इस्माईलबेग यांजवर शेर आहेत. मांड धरून झुंज पावत नाहींत. याप्रमाणें वृत्त आहे. पुढें नवाब अलीबहादर व राजश्री तुकोजी होळकर सुभेदार या दोघांतून कोणी एक फौज येऊन, राजश्री पाटिलबावांचे फौजेचे सामील जालियावर, यवनांचें पारिपत्य होणें तें होईल. परंतु तूर्त यवनांचे फौजेचा दाब राजश्री पाटिलबावांचे व रंजितसिंग जाट यांचे फौजेवर आहे. ह्मणोन वरचेवर वर्तमान पातशाहांचें येथें आहे. त्याजवरून विनंति लिहिली आहे. व पातशाहांचें अंतःकरण तर आपलेकडे कायेवाचेमनेंकरून आहे. व राजश्री पाटिलबावाकडे आस्थाही विशेष आहे. परंतु तूर्त नाजर मंजुरअलीखान व रामरतन मोदी व सितलदास नाजरजीचा पेशकार हे जबरदस्त हजुरांत आहेत. याजकरितां पातशाहांकडून मनस्वीपणें ज्यास जो शुका लिहविणें तो मुनसीकडून लिहून, पातशाहांपासून मोहर करून घेऊन पाठऊन देतात. याजकरितां पातशाहांची कायममिजाजी दृष्टीस पडत नाहीं. व पातशाहांची जुरत ऐसी नाहीं कीं, तुह्मीं हें पत्र गैरवाजवी लिहविलें आहे; याजवर मी मोहर करून

देत नाहीं. याप्रमाणें परिछिन्न पातशाहांच्यानें बोलवत नाहीं. ह्मणून पातशाहा मुखत्याराचे हातून विकले जातात. याप्रमाणें येथील वृत्त आहे. आह्मीं आपले आज्ञेप्रमाणें आपले कडील लक्षाविसीं पातशाहांसीं विनंति करून यांचें चित्त आपलेकडे हमवार करून ठेविलें आहे. श्रीमंतांचे प्रतापेंकडून सर्व बंदोबस्त पूर्ववत प्रमाणें घडून येईल. चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंति."

लेखांक २८८.

श्री. एप्रिल इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– इस्माईलबेग व गुलामकादरखान आगरियाहून कूच करून भरतपुरास गेले. भरतपूरचे पेटेवर लढाई जाटासीं जाली. निदान तीन हजार माणूस परस्परें मारलें गेलें. तेथें उभयतांचा यत्न न चालतां, तेथें खटे होऊन कुंभेरीस आले. कुंभेरचा किल्ला खाली होता. तें शहर लुटून कूच करून डिगेस गेले. डिगेचे किल्ल्यास मोर्चे लाविले. किल्ल्यांतून जाटाकडील लोक निघाले. त्यांनीं तमाम मोर्चे मारून, दोन तीन हजार रोहिला मारला गेला. आपले कडील फौज राणेखानभाई व रायाजी पाटिल आदिकरून यांनीं रसदबंद केली. पांचशेर अन्न रोहिल्याचें लष्करांत जालें. तेव्हां डिगेहून कूच करून माघारा आगरियास उभयतां आले आहेत. आगरियाचे आसपास आपले सरकारची फौज पांचा साता कोसांवर रसदबंद करून आहे. आगरियाचे शहर इस्माईलबेगानें तमाम लुटून मारून ताराज केलें आहे. वस्तीचे लोकांत कोणांत हाल ठेविला नाहीं. पुढें काय मसलत करतील तें मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २८९.

पैवस्ती छ० ४ रमजान सन तिसा समानीन ज्येष्ठमास. श्री. १६ मे इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ९ माहे साबान मुक्काम लष्कर नजिक श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखाज्ञान केली पाहिजे. विशेषः– स्वामीनीं कृपा करून

पत्रें छ० २१ रबिलावलचें व छ० १४ रबिलाखरचें तीळशर्करायुक्त पाठविलें, तें छ० ४ माहे साबानीं पाऊन तीळ शर्करा स्वीकार करून सनाथ जालों. पेशजीं विनंतिपत्रें छ० २९ जमादिलाखरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, राजश्री पाटिलबावांनीं भुजंगराव बाजी यांस राजश्री सुभेदारांकडे रामपुऱ्यास पाठविलें आहे. व पत्रें पाठविलीं त्यांत मजकूर कीं, आपली मर्जी असली कीं दोन तीन मजला आह्मींच पुढें यावें, अथवा राजश्री आबा चिटणीस यांस पाठवावें, ऐसें असलयास येथून सिद्धताच आहे. नाहीं तरी आपण लौकर स्वार होऊन येथें यावें. येथें आल्यावर कित्येक जाबसाल आहेत, ते आपले आल्याखेरीज घडत नाहीं. याप्रमाणें पत्रें पाठविलीं आहेत. तेथून राजश्री सुभेदारांचीं पत्रें येतात कीं, येथील गुंता उरकोन सत्वरच तिकडे येतों. राजश्री पाटिलबावांचें मानस आहे कीं, राजश्री सुभेदार आल्यावर हें सर्व सलतनत नवाब अलीबहादर व राजश्री सुभेदार यांचे स्वाधीन करून, आपण छावणीस उज्जनीस जावें. व राजश्री आंबोजी इंगळे यांजबरोबर दहा पंधरा हजार फौज ठेऊन, येथें नवाब अलीबहादर यांचे तैनातीस ठेवावें. ऐसी सलाह ठरली आहे. जोतपूरकराकडील वकील, राजश्री सुभेदार यांजपासीं येऊन, जाबसाल करितात कीं, आपण अथवा नवाब अलीबहादर यांणीं सरकारसंबंधीं मामला करून घ्यावा. व राजश्री पाटिलबावांनीं आमची सफाई करून द्यावी. त्यास अद्यापि कांहीं अमलांत आलें नाहीं. राजश्री पाटिलबावांजवळही वकील जोतपूरवाल्याकडील येणार ह्मणून वदंता आहे. हिंमतगीर गोसावी यांस राजश्री पाटीलबावांनीं फेरोजाबाद सादाबाद वगैरे दोन अडीच लक्षांचा सरंजाम लाऊन दिल्हा आहे. राणेखानभाईबरोबर तेथें सर्वांचे जाबसालांत आहेत. सरकारची अर्जी पातशाहास पाठविली. त्यास हजुरांत पावती करून, उत्तर घेऊन सेवेसीं पाठवितों. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणी पत्रावरून व अखबरा पाठविल्या आहेत त्यांजवरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.

सेवेसीं—विनंति सेवक गंगाधर शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार धनी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.”

पैवस्ती छ० ४ माहे रमजान

लेखांक २९०.

सन तिसा समानीन ज्येष्ठमास. श्री. १६ मे इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ० ९ माहे साबान मुक्काम लष्करनजिक श्रीमथुरा जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:– स्वामीनीं कृपा करून पत्र व तीळ शर्करायुक्त पाठविले, ते छ० १ माहे मजकुरीं पाऊन शिरसा वंदून सनाथ जालों. पेशजीं विनंतिपत्रें छ० २९ जमादिलाखरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहलेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, राजश्री सुभेदार रामपुऱ्यास मुक्काम करून आहेत. जैपूरवाल्याकडील मामला रूपकर आहे. राणेखानभाई यांणीं पांच कोस अलीकडे कूच करून आलेत. लवकरच लष्करांत येणार आहेत. इस्मायलबेग कानोड ....गीर्द किल्ल्यास मोर्चे लाऊन आहे. राजश्री बाळोजी शिंदे व अहमद अल्लीखान राजश्री पाटिलबावांपासीं आले आहेत. शाहानिजामुद्दी यांस पातशाहापासीं कारभारी ठेवावें ऐसा विचार राजश्री पाटिलबावांचा आहे. सेवेसीं श्रुत होय.

वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे. त्याजवरून ध्यानारूढ होईल.................पत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९१.

श्री. २२ मे इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. सर्फराज खोजा, राजे बिजेसिंग याजकडे, रेवाडीचे मुकामीहून पातशाहांकडील खिलत वगैरे सरंजाम घेऊन गेला होता. त्यास, बिजेसिंगास खिलत वस्त्रें देऊन माघारा आला. राजे मजकुरांनीं, खोज्यास वस्त्रें व नख्त साहाशें रुपये खर्चास देऊन, पातशाहांस दोन नागोरी गाई देऊन, बिदा केला. येतेसमयीं खोजानें राजांस विनंति केली कीं, पातशाहांस कांहीं तोफा ताहेफ पेशकस द्यावयाविसीं काय आज्ञा ? त्यास, राजेमजकुरांनीं सांगितलें कीं, "जे पातशाहांस तोफा ताहेफ पाठविणें ते मागाहून आह्मी आपले वकिलासमागमें

देऊन पाठवूं." ह्मणोन बोलून यास बिदा केलें. तो दिल्लीस छ० १५ साबानीं पातशाहांपासीं येऊन दाखल जाला. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९२.

श्री. मे-जून इ. स. १७८८

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं.

पोष्य दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील. कुशल तागाईत छ माहे साबान मुक्काम लखनौ जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– अलीकडे पत्र येऊन सांभाळ न जाला, तेणेंकरून सचिंत असे. तरी पत्रीं सनाथ केलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमानः– सरकारांतून वजिराचे नजराण्याकरितां हत्ती राजश्री बाळाजी गोविंद यांजकडून देविला होता. त्यास हत्ती येण्यास दोन तीन मास लागले. नंतर आह्मी निघोन लखनौस आलों. त्यास, नवाब वजीर अयोध्येस गेले आहेत. आह्मांस येथें रहावयास सांगितलें. पिराची ज्यारत करून, आखर शाबान येणार, ह्मणून पत्रें आलीं होतीं. त्यांचें येणें जाल्यावर नजराणा गुजरून देऊं. यावर राजश्री पाटीलबावांकडील वर्तमान डाकेंत आलें, तें पुरवणी बंदावरून निवेदन होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९३.

श्री. १४ जून इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ९ माहे रमजान मुक्काम दिल्ली जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– आपलें पत्र छ १० जमादिलाखरचें आलें, तें छ ४ साबानीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "अलीबहादर यांजबराबर फौज देऊन रवाना जाले आहेत. ते बऱ्हाणपूरचे सुमारें गेले. महेश्वराकडून राजश्री पाटिलबावांकडे जातील. व राजेश्री तुकोजी होळकर यांचीही रवानगी फौजसुद्धां जाली आहे. तेही लौकर तिकडे येतील. पातशाहांचा मिजाज मात्र कायम असावा. याविसीं तुमचें बोलणें होतच असेल. श्रीमंतांचे प्रतापेंकरून सर्व यथास्थित होईल." ह्मणून लिहिलें. त्यास, इकडील वर्तमान पेशजीं छ० २२ रजबीं पत्रें पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त कळलेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा

दिल्लींत आहेत. इस्माइलबेग व गुलामकादरखान आगरियांत आहेत. त्यांचे आसपास आपली फौज, राजश्री पाटिलबावांकडील पांचा साता कोसांवर रसदबंद करून आहेत. राजश्री पाटिलबावा खुद्द चमेलपार कुवारी नदीवर ग्वालेरीनजिक आहेत. इस्माइलबेग व गुलामकादरखान यांनीं आपलेकडून गुलमहमदखान व सिलेमाबेगखान ऐसे दोघे जमातदार पातशाहांपासीं पाठविले आहेत कीं, आपण कूच करून आगरियास यावें. त्यास येथें नाजर मंजुरअलीखान व शितलदास व रामरतन मोदी व राजे हिंमतबहादर अनुपगीर गोसावी ऐसे पातशाहापासीं आहेत. हे सर्व गुलामकादरखान व इस्माइलबेग यांसीं मिळाले आहेत. राजश्री पाटिलबावांसीं प्राणापावेतों आकस ठेवितात. त्यास यांचेंही मानस कीं, पातशाहांनीं बाहीर निघावें; आगरियास चालावें; ह्मणून वारंवार पातशाहांस विनंति करितात. त्यास पातशाहांनीं साफ उत्तर दिल्हें कीं, "हे दिवस गरमीचे आहेत. आमचें जाणें आगरियास होत नाहीं." याप्रमाणें जाब देऊन आपले फौजांची व सरदारांची मार्गप्रतीक्षा करून आहेत. पातशाहांचा मिजाज आपलेकडे अद्याप कायम आहे. आह्मीही समय पाहून पातशाहांस विनंति कायम मिजाजीविसीं करितों. हें वर्तमान नाजरास समजलें. व राजश्री पाटिलबावांकडे आह्मीं पत्रें पाठविलीं होतीं, त्यांचे जाब आह्मांकडे येत होते, ते नाजराचे येथें धरले गेले. त्याजवरून नाजरानें राजश्री शंकराजी सखदेव याजवर इतराजी करून घरीं बसविलें. आणि आमचे घरचा गुलाम लल्लू ह्मणून आहे. हा पंत मशारनिल्हेसीं फुटून, नाजरासी मिळून वकालतेचे कारभारास प्रवर्तून आतां दरबारास तोच जात असतो. त्यास, नाजरास व शितलदासास कांहीं पत्रें तीर्थस्वरूप राजश्री देवराव तात्यांचीं व राजश्री दामोदरपंत यांचींही आलीं आहेत कीं, शंकराजी सखदेव आमचे चाकर नाहींत. तुह्मीं त्यांचे हातून काम न घ्यावें. ह्मणून पारसी पत्रें लल्लूनें नाजरास व शितलदासास गुजराणलीं. तो दस्तऐवज यांनीं धरून, पंत मशारनिल्हेस घरीं बसविलें आहे, आणि लल्लू गुलामाचे हातून नाजर काम घेतो. याप्रमाणें येथें बखेडा जाला आहे. आपले आज्ञापत्राची मार्गप्रतीक्षा करितों. ज्याप्रमाणें आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें करूं. पारसी पत्रें लल्लूनें नाजरास तीर्थस्वरूपाचें नांवचीं गुजराणलीं. मग हें पत्रें खरीं त्यांजकडून आलीं, किंवा यानें खोटीं पत्रें करून आपण पेश पडावें ह्मणून खोटीं पत्रें मोहरा करून गुजराणलीं, हें कांहीं समजलें नाहीं. कच्चें वृत्त आपल्यास कळावें, ह्मणोन विनंति लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९४.

श्री. १४ जून इ. स. १७८८

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ९ माहे रमजान मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनें-करून यथास्थित असे. विशेषः– आज्ञापत्र छ १० जमादिलाखरचें सादर जालें, तें छ ४ साबानीं शिरसा वंदून सनाथ जालों. पत्रीं आज्ञा कीं, "याप्रमाणें पुढें होत जाईल तें वरचेवर लिहीत जाणें." ह्मणून आज्ञा. त्यास, इकडील सविस्तर छ २२ रजबीं विनंतिपत्रें पाठविलीं आहेत, तें सेवेसीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा दिल्लींत आहेत. गुलाम कादर-खान व इस्माइलबेग आगरियांत आहेत. आपले सरकारच्या फौजा राजश्री पाटिलबावांकडील आगरियाचे आसपास पांचा साता कोसांवर रसद बंद करून आहेत. गुलाम कादरखान व इस्माइलबेग यांनीं आपलेकडून गुलमहमदखान व सिलेमा बेगखान ऐसे दोन जमातदार पातशाहांकडे पाठविले आहेत कीं, आपण कूच करून आगरियास यावें. त्यास, पातशाहांनीं उत्तर साफ दिल्हें कीं, आमचें येणें या गरमीचे दिवसांत होत नाहीं. नाजर मंजूरअल्लीखान व रामरतन मोदी व राजे अनुपगीर गोसावी यांचेंही मानस आहे कीं, पातशाहांनीं आगरियास जावें. त्यास, पातशाहांचें लक्ष आपल्याकडे व सरदार व फौजाकडे आहे. याजकरितां हे दिल्ली बाहीर निघत नाहींत. पुढें ठरेल तें विनंति लिहूं. कृपा करणार धणी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक २९५.

श्री. १५ जून इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ १० माहे रजमान मुक्काम दिल्ली स्वामींचे कृपावलोकनें-करून यथास्थित असे. विशेषः– पेशजीं विनंतिपत्रें पै दरपै सेवेसीं पाठविलीं होतीं, तें सेवेसीं प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, पात-शाहा दिल्लींत आहेत. नबाब नाजर मंजूरअल्लीखान कारभारी आहेत. गुलाम-कादरखान रोहिला व इस्माइलबेग यांनीं डिगेस मोर्चे लाविले होते; तेथून गडां-

तून जाटाचे लोक बाहीर निघाले. व बाहेरून राणेखानभाई वगैरे फौज राजश्री पाटीलबावांकडील त्यांनीं चांगली जरब दिल्ही. तेथून जरब खाऊन, हळू हळू हिकमतीनें आगरियास येऊन मसलत केली कीं, आधीं आगरियाचा किल्ला हस्तगत करावा व पातशाहांस दिल्लीहून बोलावून किल्ल्यांत ठेवावें; आपण पुढें चमेल नदीवर येऊन झुंजावें. हा निश्चय ठैरावून, तमकीनखान खोजा नाजराकडील उभयतांपासीं जाबसालास होता, त्यास व नसीमखान व सजनखान वगैरे चार जमातदार पायदळ रोहिले ऐसे दिल्लीस पाठविले आहेत कीं, पातशाहांस अर्ज करून अंतरवेदचे परगणे पातशाहांचे खर्चास देऊन, पातशाहांचें कूच आगरियास करवावें. त्यास एकदोन दिवसांत अवघे येऊन दिल्लीस पोंहचतील. पातशाहांचे मनांत सहसा दिल्लीबाहेर निघावयाचें नाहीं. या गुलामाचें तोंड पाहूं नये. अंतस्थ लक्ष एकनिष्ठ राजश्री पाटीलबावांकडे लाविलें आहे. सरकारची फौज राजश्री तुकोजी होळकर सुभेदार व अलीबहादर यांचे यावयाचें वृत्त हजुरांत अर्ज केला. त्यास मर्जी बहुत प्रसन्न जाली. नित्य वर्तमान पुसतात. पातशाहा सरकारचे फौजेची वाट पाहतात. दुसरा अर्थ नाहीं. चमेल अलीकडे फौज आली ह्मणजे हे खोलून शामील होतील. अलीबहादर व होळकर यांस खिलत जवाहीर वगैरे पाठविणें ठैरलें आहे. राजे हिंमतबहादर अनुपगीर गोसावी हजुरांत आहेत. फौजेची मुख्त्यारी यांस होणार. तेही सरकारचाकरीस तत्पर आहेत. गुलाम कादर व इस्माइलबेग, तमकीनखानखोजा वगैरे यांस इकडे रवाना करून, आगरियाचे किल्ल्यास मोर्चे निकडीनें लाऊन बसले आहेत. परंतु किल्ला मजबूत आहे. बाहेरून राणेखान भाई वगैरे राजश्री पाटीलबावांकडील फौज दोनदोन कोस चहूंकडून रसद बंद करून उभे राहतात. श्रीकृपेनें गुलामावर दाब बहुत बसला आहे. देवजी गवळी वगैरे फौज पांच सात हजार श्रीमथुरेवरून यमुना उतरून अंतरवेदींत मारामार (करितात) लुटतात. तमाम मुलकांत हुल्लड जाला, यास्तव गुलामकादरखानही घाबरला आहे. यमुना उतरून अंतरवेदींत जाणार. वरकड सविस्तर वृत्त नानांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून निदर्शनास येईल. होईल तें वृत्त मागाहून विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति."

लेखांक २९६.

श्री. जून इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः— लखनऊहून वर्तमान आलें कीं, जवाबख्त पातशाहाजादा

श्रीकाशीस छावणीची तयारी तेथें करविली होती. त्यास छ २५ साबानीं पोटांत दरद जाला ! हकिमानीं फस्त सोडविली, तत्क्षणीं प्राण निघोन गेला ! पातशाहांनीं हें वृत्त श्रवण करून बहुत दुःख पावले ! दोन तीन दिवस दरबार वगैरे कामें महकूफ आहेत. असफद्दौला वजीर व फिरंगी यांस शुके ताकिदीनें लिहिले आहेत कीं, शाहाजाद्याचा ताबूद व त्याचीं मुलें माणसें येथें पाठऊन देणें. पातशाहांनीं शोक बहुत केला. वरकड पारसी एकबरा पाठविल्या आहेत, त्यावरून श्रुत होईल. पेशजीं घराऊ वृत्त वरचेवर विनंति लिहिली आहे. कृपा करून आमचा बंदोबस्त करून पाठवावा. येथें आमची आबाळ फार आहे. तीर्थस्वरूप राजश्री देवराव तात्याही हजुरांत आले असतील. त्यांस आज्ञा करून आमचा बंदोबस्त यथास्थित अमलांत ये ऐसें करावें. सर्व प्रकारें भरंवसा स्वामींचे पायांचा आहे. आमचा समाचार घेणें योग्य आहे. दिवसगत लागल्यास उपाय नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.”

लेखांक २९७.

श्री. १६ जून इ. स. १७८८.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विज्ञापना ऐसीजे, गुलामकादर व इस्माइलबेग फौजसुद्धां डिगेस गेले. तेथें किल्यावर हल्ला पाय उतारा केला. त्यास तिकडून गांवचे लोक व किल्यांतील वगैरे यांणीं तोफा व बंदुखा व दगड व विटा वगैरे मार देऊन, हल्ला बाहेर मोडून घातला ! या अवसरीं राणेखान वगैरे फौजा तयार होऊन बुणग्यावर आले. हें वर्तमान हालकाऱ्यानें सांगतांच माघारें आपले मुक्कामास गेले. तेही फिरोन गेले. परंतु दोन तीन हजार माणसें ठार व जखमी जाले ! कांहीं उपाय न चालला ! तेव्हां मसलत ठरली कीं, अकबराबादेस जाऊन खर्चाची सरबरा करून पाटीलबावांशीं लढाई घ्यावी, ह्मणजे किल्ले वगैरे सहजांत सुटतील. ह्मणोन दरकूच आगऱ्यानजीक फत्तेपूर आहे तेथें मुक्काम आहे. राणेखान वगैरे फौजा त्याचे पाठीवर सात आठ कोस आहेत. पाटीलबावांनीं इकडून आणखी फौज जांबगांवींहून आली आहे, ती पार उतरून आजऊचे नदीवर मुक्काम करून आहेत. राणेखान यांचे फौजेस सामील व्हावें ह्मणोन त्यास लिहिलें आहे. मागाहून आपणही चमेल उतरावें याप्रमाणें मनसबा आहे. अद्याप अलीकडेच मुक्काम करून आहेत. उमरावगीर गोसावी आगऱ्याचे मोर्च्यांतून धरून आणिले होते. ते आजपावेतों लष्करांत होते. छ ११ साबानीं निघोन गेले. त्यांस धरून आणिलें, त्या समयीं बहुत खातरजमा करून ठेविलें. वचनप्रमाण जालें. त्या

विश्वासावर बेफामी जाली. याजमुळें दगाबाजीनें निघोन गेला ! हिंमतबहाद्दर अनुपगीर गोसावी दिल्लीस पातशाहापासीं आहेत. गुलामकादरखान याजकडे यावयाकरितां दोन मजली आले. परंतु चित्तशुद्धता पक्की नाहीं. व पाटीलबावांकडील पत्रें गोसावी यांसीं गेलीं कीं, तुह्मी खुळांत न यावें. आह्मांकडील फत्ते जाल्यानंतर तुह्मांसीं दुसरा अर्थ होणार नाहीं. ह्मणोन वचन प्रमाण करून लिहिलें. याजमुळें मशारनिल्हे माघारा गेले. गुलामकादर व इस्माइलबेग यांचे लष्कराची रसद बंद आहे. याजमुळें पांच शेर धारण रुपयाची आहे. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९८.

श्री. जून इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—गुलामकादरखान व इस्माइलबेग यांस दिल्लीहून नवाब मंजूरअल्लीखान यांनीं पत्रें पाठविलीं कीं, तुह्मीं उभयतां एकविचारें राहावें, पाटीलबावांसीं झुंजावें. जर वेगळे वेगळे राहिल्यास दोघे सिकस्त खाऊन मारले जाल, आणि पुन्हां राजश्री पाटीलबावा सलतनतींत काबीज होईल. ह्मणून वारंवार पत्रें पाठवून हमवार केलें. त्याजवरून गुलामकादरखान यमुना पार होते ते आगऱ्यास यमुना उतरून येऊन, इस्माइलबेगाची भेट घेतली. परस्परें शपथ प्रमाण कुराण होऊन पगडीबदल भाऊपणा जाला आहे. इस्माइलबेगाची फौज ढवळपुराकडे वगैरे गेली होती, ते सर्व एकत्र आगऱ्यावर जाली आहे. व गुलामकादरखान यांचीही फौज यमुना उतरून आगऱ्यास दाखल आहेत. दोन्ही फौजा एकत्र जाल्यावर आगऱ्याहून कूच करून, रूपबस ह्मणोन आगऱ्याहून आठ कोस ढवळपुराचे रोखें जागा आहे, तेथें डेरेदाखल जाले आहेत. राजश्री पाटीलबावांकडील सडी फौज राणेखानभाई व रायाजी पाटिल रूपबसास आले होते, ते माघारा सरकून ढवळपुराकडे गेले. राश्रजी पाटीलबावा चमेळ पार कुवारी नदीवर मुक्काम करून आहेत. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक २९९.

श्री. जून इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—नजबकुलीखान यांनीं रेवाडी वगैरे महालांचा बंदोबस्त करून, गोकुळगड रेवाडीचा किल्ला आहे, तेथें मोर्चे लाविले आहेत. तोही दि-

ल्लीस येणार. व अल्लीनगरचा जुलफुकारखान खानजादा याजपासून अल्लीनगर सरकारांत घेतलें होतें, तें त्यास माघारें दिल्हें. त्यास, अल्लीनगरीं खानमजकुरांनीं आपला बंदोबस्त केला. किल्ले डीग येथील अंमल मिर्जा रहिमबेग याजकडे होता. त्यांजकडून दूर करून आंबाजी इंगळे यांजकडे बमय महाल डिगेचा सुभा सांगितला आहे. तेथें राजश्री बापूजी मल्हार, मशारनिल्हेचे दिवाण, शेणवाई आहेत, त्यांनीं आपला बंदोबस्त केला आहे. वरकड चहूंकडे गव्हार. गर्दी बदअमली जाली आहे! वाट चालत नाहीं! लष्करांत रसद पोंचत नाहीं! याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३००.

श्री. ११ जुलई इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

पोष्य दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाइत छ.७ माहे सव्वाल मुक्काम लखनौ येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–बहुत दिवस जाले, आज्ञापत्र येऊन सांभाळ न जाला. तेणेंकरून चित्त सचिंत असे. तरी पत्रद्वारें सनाथ केलें पाहिजे. इकडील वर्तमान, आह्मी येथें आलों. नवाब वजिरांची भेटी जाली. आपल्याकडील खुषीचें वर्तमान पुसिलें. बहुत स्तुति करण्यांत आली. श्रीमंतांचे प्रतापाची तारीफ केली. आह्मीं नजरेचा सरंजाम आणला तो गुजराणला. बहुत संतोष जाले. कांहीं दिवस रहावयास सांगितलें आहे. सेवेसीं श्रुत होय. दुसरें, गुलामकादर व इस्मालबेग उभैता एका विचार होऊन डिगेवर हल्ला केला होता. तेथें कांहीं उपाय चालला नाहीं. तेव्हां आगऱ्याचे किल्ल्यास वेढून चहूंकडून जेर केला. चौ दिवसांत किल्ला सुटावयास आला. तेव्हां राणेखानभाई व रायाजी पाटील व जिवबा बक्षी फौजसुद्धां रंजितसिंग जाट यांस सामील करून भरतपुरनजीक मुक्काम करून होते. त्यांनीं कांहीं फौज तीन चार हजारपावेतों, महाबनाकडे गुलामकादर याचीं ठाणीं होतीं, तिकडे रवाना केलीं. त्यांनीं महाबनाचें ठाणें घेरून दोन पलटणें मारून काढिलें! दोन तोफा आणिल्या! येणेंकरून त्याचे मुलकांत बदमामली जाली. त्या बंदोबस्ताकरितां गुलामकादर आपली फौज घेऊन, यमुना उतरून त्या पारीं मुक्काम केला. हे बातमी राणेखान यांनीं राखोन, जाटाची व आपली फौज तयार करून, प्यादगानाची लढाई समोर लाऊन, आपण सडी स्वारीनशीं कंबरगा मारून फौजेचा मोड केला. तोफखाना सर्व


जेथील तेथेंच राहिला. सडा इसमाइलबेग दोन हजार स्वारांनशीं नांवेवर बसून गुलामकादराचे लष्करांत गेले. बायको हत्तीवर बसोन जात होती. ते यमुनेंत बुडोन मेली ! आपण मात्र दाखल जाले. तेथेंही राहावयास विश्वास न पडेसा जाला. तेव्हां उठोन शुकाहाबादेस वजीरांचे मुलकांत आले. यांस पत्रें लिहिलीं कीं, आमची मदत या समयीं आपण करावी.”........(अपूर्ण)

लेखांक ३०१.

श्री. ११ जुलई इ. स. १७८८.

“पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विज्ञापना ऐसीजे, त्याजवरून येथील कारभारी यांनीं आह्मास वर्तमान सांगितलें कीं, इस्मायलबेगाचे + + आहे. यास उत्तर तुह्मी सांगाल त्याप्रमाणें देऊं. त्याजवरून आह्मीं सांगितलें कीं, + + स्वामीचा जाला. स्नेह पूर्वीपासून चालत आला आहे. त्यापक्षीं याचा विचार आपणच करावा. आणि उत्तर करणें तें करावें. त्याजवरून कमाविसदारांस परिछिन्न ताकीद लिहिली कीं, इस्माइलबेगास सांगावें कीं, आमचे मुलकांत तुह्मीं न रहावें. दुसरे स्थलीं जाऊन तुह्मांस कर्तव्य तें करणें. येथें न रहावें. आमचे मुलकांत राहिल्यास दगा पावाल. त्याजवरून त्यांनीं मागतीं गुलामकादराकडे सूत्र लावून, वचन प्रमाण क्रिया घेऊन, त्याजकडे रामगडास गेले. त्याची भेटी घेऊन एक होऊन, गुलामकादररामगडाहून जकीऱ्याचा सरंजाम करितात. मोठाल्या तोफा जमीनींत पुरून टाकितात. व जकिरा सरंजामाचे तजविजेंत आहेत. आणि इस्माइलबेगास दिल्लीस रवाना केलें. किल्ल्यांत शाहापाशीं राहून मऱ्हाठ्यांकडील जाबसाल उडवून द्यावा. ते दिल्लीस आले. पातशाहांस अर्ज जाली. त्यांनीं उत्तर केलें कीं, निमकहरामाचें आह्मीं दर्शन घेत नाहीं. आह्मी बोलाविलें, त्यासमईं न आले. आतां प्रयोजन नाहीं. त्यांनीं शहरांतून निघोन जावें. त्याजवरून स्वार होऊन बहुत खिन्नतेनें पटपरगंजांत राहिले आहेत. एका दो दिवशीं माघारा जातील. गुलामकादराचे फौजेसीं धीर पुरत नाहीं. लोक उठोन जातात. आतां मैदानांत लढाईची सुरत दिसत नाहीं. राजश्री पाटीलबावा चमेल उतरोन आगऱ्यानजीक आठा कोसांवर मुक्काम आहे. जिउबा बक्षी पांच हजार फौजेनशीं दिल्लीस रवाना जाले. ठाणीं कायम जालीं. पिरोजाबाद वगैरे जागा खाली पडली. याजमुळें जमीदारांची पत्रें पाटिलबावांस गेलीं कीं, ठाणीं आटोपावीं. इकडेही बंदोबस्त करतील. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति.”



बादशहाच्या वेळची जुनी दिल्ली.

लेखांक ३०२.

पै॥ छ २९ जिल्हेज. **श्री.** ११ जुलई इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना तागाइत छ० ७ सवाल मुक्काम लखनऊ स्वामींचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे. विशेषः—इकडील वर्तमान राजश्री नानांचें पत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून निवेदन होईल. व दिनचर्येचे वर्तमानाची अकबार पाठविली आहे. मनन जाल्यावर ध्यानास येईल. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे ही विज्ञप्ति."

लेखांक ३०३.

पैवस्ती छ० १६ जिल्काद

तिसा समानीन श्रावणमास **श्री.** ता. २० जुलई १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० १६ माहे सवाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः– इकडील वर्तमान पेशजी पैदरपै विनंतिपत्रें छ ९ रमजानीं पाठविलीं आहेत, ते पाऊन सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, छ १४ माहे रमजानीं आगरियाहून पातशाहांचें येथें वर्तमान आलें कीं, आगरियाचे किल्ल्यांत जकीरा सरला. ह्मणून राजश्री लखबा किल्लेदार यांनीं पाटिलबावांस पत्र पाठविलें कीं, किल्ल्यांत भक्षावयास नाहीं. आतां आमच्यानें किल्ला राखवत नाहीं. ह्मणून लिहिलें. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं रंजितसिंग जाटास सांगून पाठविलें कीं, किल्ल्यांत जकीरा जलद पोहोंचेल तें करणें. त्याजवरून रंजितसिंगानीं तीनशें उंट गल्ला व हजार दोन हजार बैल भरून, आपली फौज समागमें देऊन, गल्ला आगरियास रवाना केला. आणि राणेखान व रायाजी पाटील शिंदे वगैरे फौज इस्माइलबेगाचे आसपास होती, त्यांस राजश्री पाटिलबावांनीं ताकीद लिहून पाठविली कीं, रंजितसिंगानीं गल्ला रवाना केला आहे, हा किल्ल्यांत दाखल करून देणें. जर किल्ला इस्माइलबेगाचे हातास गेला, तरी ठीक नाहीं. ह्मणून निक्षून लिहिलें. त्याजवरून राणेखान व रायाजी पाटील व जाटाकडील फौज मिळून तीन चार गोल केले. एक गोल श्रीयमुनापार उतरून, बैल गल्ला भरून आणविले होते ते, नावा भरून यमुनेंतून किल्ल्यांत दाखल केले. हें वर्तमान इस्माइलबेग यांनीं ऐकून गुलामकादरखान यासीं विचार केला कीं, तुह्मीं

आपली फौजसुद्धां यमुना उतरून पार जाऊन, तिकडून किल्ल्याची रसद बंद करावी. आह्मी इकडून रसद बंद करितों. ह्मणजे किल्ला जेर होऊन आपल्या आपण खाली करून देतील. ह्मणून विचार करून गुलाम कादरखानास फौजसुद्धां पार उतरले. त्यांनीं जाऊन पारल्या काठीहून किल्ल्यांत रसद न पोहोंचे हा बंदोबस्त केला. दुसरे दिवशीं राणेखान व रायाजी पाटील यांनीं तीनशें उंट पुढें घालून, जाटाकडील फौज समागमें घेऊन, एक गोल फौजेचा उंटासमागमें देऊन, आगरियाचे किल्ल्यांत उंट गल्ल्याचे दाखल जाले. आणि दोन गोल फौजेचे इस्माइलबेगाचे फौजेसीं झुंजास उभे राहिले. त्यांसीं यांसीं गोळागोळी होतांच, मराठियांनीं व जाटांनीं मोठी छाती करून त्यांचे फौजेंत घोडे घातले. दोन घटका तरवार चालली. निदान इस्माइल-बेगास तीन जखमा जाल्या होत्या. बेताब होऊन साता रावतांनसीं पळून यमुनेंत घोडे घातले. त्यांजपैकीं तीन स्वार यमुनेंत बुडाले. चौ स्वारांनसीं पळून गुलाम कादरखान याचे फौजेंत दाखल जाले. गुलाम कादरखान सामोरा येऊन, घेऊन, एक डेरा व पालखी व हत्ती व पांच घोडे व दहा उंटें वगैरे वस्त्रें पात्रें देऊन, जखमा सेकून, सन्मान करून आपलेपासीं ठेविले. व इस्माइलबेग याजकडील शे शवाशें तोफ व पलटणें पेशजीं जैपूरचे मुकामीं राजश्री पाटिलबावांकडील फुटोन जैपूरकराकडे गेलीं होतीं, ते तमाम + + खिजमतगार राजश्री पाटिलबावांनीं पेशजीं आठ दहा रोज फोडाफोड करावयास पाठविला होता. त्यास, झुंजाचे समयीं पलटणें व तोफखाना उठोन राणेखान व रायाजी पाटील यांजपाशीं येऊन दाखल जाले. वरकड मोंगली फौज वगैरे डेरे दांडे दरोबस्त लष्कर इस्माइलबेगाचें तमाम लुटून ताराज केलें! आपले फौजेंत हत्ती घोडे तोफखाना वगैरे सरंजाम लुटीचा बहुत आला. आगरियाचे किल्ल्याचा बंदोबस्त करून, आपली फौज राणेखानभाई व रायाजी पाटील तेथून कूच करून श्रीमथुरेस आले. हें वर्तमान राजश्री पाटिलबावांनीं ऐकून, आपणही कुवारी नदींतून कूच करून, श्रीमथुरेस येऊन छावणी केली. हें वर्तमान पातशाहांनीं श्रवण करून दिल्लीहून राजश्री पाटिलबावांस मुख्यारीचीं वस्त्रें साता पारचांचा खिलत बमय सरबस्ता पागोटें कलगी परगिरीसुद्धां व जेगा शिरपेंच, मोत्यांची कंठी, ढाल, तरवार, हत्ती घोडा येणेप्रमाणें सरंजाम हमेशा देत आले आहेत त्याप्रमाणें, मौवलवी अताउल्ला व बजुदीखान, हिसामुदीखान यांचा बंधू, यांसमागमें देऊन पाठविले आहेत. तेही श्रीमथुरेस जाऊन पावले आहेत. आगरियाचे किल्ल्यांत नवाब आबदुल अहदखान कैदेंत होते, त्यांसही बोलाऊन मथुरेस आणिलें आहे. राजश्री पाटिलबावांची मर्जी आहे कीं, पातशाहांकडून

मुखत्यार आबदुल अहदखान व आपलेकडून राजश्री लाडोजी देशमुख शितोळे नरसिंगराव या उभयतांस दिल्लीस पातशाहाकडे रवाना करावें, ह्मणून तजवीज आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ २९ जिल्काद

लेखांक ३०४.

तिस्सा समानीन—भाद्रपद मास. **श्री.** २४ जुलई इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ता॥ छ २० माहे सव्वाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंदलेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेषः– पूर्वीं विनंतिपत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जालीं असतीलच. हल्लीं वर्तमान तर, पातशाहा दिल्लींत आहेत. आगरियावरून गुलामकादरखान व इस्मायलबेग राजेश्री पाटीलबावांकडील फौजेशीं शिकस्त खाऊन, दिल्लीस येऊन, शाहादऱ्याजवळ मुक्काम केला. पातशाहांनीं साफ तोडून लाविलें. व हुकूम केले कीं, उठून जावें. राजश्री पाटीलबावांकडून रवळोजी शिंदे, व भगीरथजी शिंदे दोन हजार राऊतांनशीं पातशाहाचे हुजूर आले होते. राजे हिंमतबहादर गोसावी यांचे विद्यमानें हुजुरांत मुलाजमत केली. पातशाहांची मर्जी बहुत प्रसन्न जाली. पातशाहा गुलामाशीं खुलून छ ११ मीनहूनीं उभयतां गुलाम यमुना पायाब पाहून बोराडीजवळ उतरले. येथून हिंमतबहादर व रवळोजी शिंदे वगैरे व मोंगल पातशाही जुंजावयास गेले. शेवटीं मोंगल दगा करून गुलामाशीं जाऊन भेटले. हें पाहून, हिंमतबहादर व रवळोजी माघारा येऊन, पातशाहांशीं न भेटतां कूच करून, रातोरात फरीदाबादेस गेले. पातशाहा फार घाबरले. गुलाम शहरांत आले. पातशाहांनीं किल्याचा बंदोबस्त केला. मग नवाब मंजूरअल्लीखान नाजर यांचे विद्यमानें गुलामाच्या भेटी जाल्या. गुलाम हरामखोर, शहर लुटावयास व पातशाहांसीं बेअदबी करावयास तयार! पातशाहापासीं कोणी नाहीं. लाचार होऊन सिलेमा शिको शाहाजादा पातशाहांनीं बरोबर देणें निश्चय केलें. त्यास आज उद्यां गुलाम शाहाजाद्यास घेऊन फरीदाबादेस कूच करणार. राजश्री पाटीलबावा मथुरेस आहेत. हें वृत्त श्रवण करून, राणेखान भाई यांची फौजसुद्धां फरीदाबादेस रवानगी करणार. व राजश्री रायाजी पाटीलाची अंतरवेद प्रांतीं रवानगी केली. आपण पाठीमागून कूच करणार. फरीदाबादेजवळ युद्धप्रसंग होणार. मागाहून अमलांत येईल तें विनंति लिहूं. पारसी एकबारही पाठविल्या आहेत. त्याजवरून श्रुत

होईल. खर्चाचे आबाळीचा मजकूर वारंवार विनंति लिहिली, त्यास तीर्थस्वरूप राजश्री देवरावही हुजुरांत आहे. आमचे बंदोबस्त करून पाठविणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहावें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३०५.

श्री. जून इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे:–ग्वाल्हेर प्रांतीं दतियेकर राजा वगैरे गुजर आदिकरून गवारगर्दी केली आहे. याजकरितां राजश्री खंडेराव हरी यांजकडील फौज पथकें खाशासुद्धां तिकडे बंदोबस्तास अटकले आहेत. तिकडून फौज खंडेराव हरीकडील व खाशांची सुटका होऊन आगरियाचे किल्याची कुमक करावी ऐसा योग घडत नाहीं. जर आगरियाचा किल्ला सरकारांत असला, तर पुन्हा जटवाडा आदिकरून मुलुखाचा बंदोबस्त करावयास दिसगत लागणार नाहीं. आणि आगरियाचा किल्ला इस्माइलबेगाचे हातीं लागला, तरी पुन्हां बंदोबस्त या प्रांतीं करावयास दिसगत लागेल, व बळ फार पडेल. याप्रमाणें आहे. घडेल ते विनंति मागाहून लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंति."

लेखांक ३०६.

श्री. जुलई १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—गुलामकादरखान, स्वार प्यादे सा हजार घेऊन, दिल्लीस तुरकमान दरवाजा बाहीर उतरला आहे. आणीक फौज जमा करावी या विचारांत आहे. परंतु एका दिवसाचें भक्षावयास नाहीं, हे अवस्था याची आहे! पातशाहांची व नवाब नाजरजींची खातरजमा गुलामकादराकडून रतिभार नाहीं कीं, सलतनतीचा बंदोबस्त करून कांहीं दिवस चालवील. याजकरितां यांची मर्जी आहे कीं, पंचवीस हजार फौज चांगली, व एक सरदार राजश्री हरीपंततात्यासारखा इकडे येईल, तर सलतनतीचा बंदोबस्त होऊन कांहीं दिवस आह्मी सुखाची भाकर खाऊं. ऐसें यांचें लक्ष आहे. हिंदुस्थान सर्व राजश्री पाटीलबावांनीं मेळविलें होतें, तैसें थोडक्याच दिवसांत गमाविलें. त्यास अजूनही दोन तीन महिन्यांत हजूरची फौज येऊन, किल्ले कोट आहेत, तों पावेतों येऊन पोंहचली, तरी पुन्हां आपले सरकारचा कबजा होऊं शकतो. परंतु

दुसरा सरदार आल्याखेरीज पातशाहांची तसल्ली होत नाहीं. राजश्री पाटील-बावांची मर्जी खुद्दपसंदी व खुशामततलबी बहुत. कोणी डोईजड माणूस जवळ कारकर्ता नाहीं. जें करणें तें स्वतः जातीनशींच करावें. कोणाचीही इतबार नाहीं. हलकें माणूस तोंडी लावून लोभास प्रवर्तून कामाची घाण केली. पातशाहा दिक् जाले. याप्रमाणें येथील वृत्त आहे. तें सेवेसीं विनंति लिहिली आहे. यांतून एक रतिभर गोष्ट राजश्री पाटीलबावांकडील वकिलास, अथवा त्यांचें ममतेचे माणसास समजल्यास, आमचें पारपत्य प्राणांत करितील! याचें कारण हेंच कीं, हिंदुस्थानांत मजवांचून कोणी कोणाशीं बोललें, किंवा लिहिलें, तर त्याचा प्राण घ्यावा, बेअब्रू करावें, हें यांचें लक्ष आहे. आपण पातशाहांस हत्ती, वस्त्रें, जवाहीर, नजर घोडीं पाठविलीं होतीं, ते गुजराणून त्याचा बदला पातशाहांनीं करावा ह्मणोन त्यांची मर्जी. त्याजवरून कारभारी यांनीं आह्मांस पुसिलें कीं, "श्रीमंतास काय द्यावें?" आह्मीं विनंति केली कीं, "पालखी नालखी, माहीमरातब, तोग तुमन वगैरे जें मर्जीस येईल तें श्रीमंतांस द्यावें. या योग्यतेच पात्र आहेत. दुसरें स्थळ नाहीं." इतकी गोष्ट मात्र बोलिलों. त्याजवरून इतराजी बहुत केली. रामरामास देखील योग्यता राहिली नाहीं. हे अवस्था जाली! तेव्हां परस्परें निखालसता जाली कीं, यांनीं कांहीं कपट करून विनंति केली नाहीं. सहजांत त्यांनीं पुसिलें. यांनीं त्याजवरून विनंति केली. तेव्हां रामरामास उजागिरी जाली. ऐसी यांची मर्जी आहे. ह्मणोन सूचनार्थ विनंति लिहिली आहे. आमची अब्रू, जीव वांचविणार स्वामी समर्थ आहे. कच्चें वृत्त स्वामींस कळावें ह्मणून विनंति लिहिली आहे. पत्रांचीं उत्तरें ल्याहावयास आज्ञा होईल, त्यास मालोमामत जमेस न धरतां उत्तरें सत्वर पाठवावीं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३०७.

श्री. जुलै इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:-राजे रंजितसिंग जाट यासीं व राजश्री पाटिलबावासीं करारमदार जाला आहे कीं, ज्याप्रमाणें पूर्वीं जाटाकडे मुलुख होता, त्याप्रमाणें त्याचा त्याजकडे मुलूख करार करून, पूर्वींपासून खंडणी घेत आले आहेत त्याप्रमाणें जाटांपासून खंडणी घ्यावी. ह्मणून करारमदार होऊन, जाटानें व राजश्री पाटिलबावांनीं एकविचारें असावें ह्मणून श्रवणांत आलें. त्याजवरून विनंति

लिहिली आहे. व नाजर मंजुरअल्लीखान यांनीं व रामरतन मोदी यांनीं व शितलदास नाजराचा गुमास्ता यानें, गुलामकादरखान यांसीं संकेत करून, दिल्लींतून लाडोजी देशमुख शितोळे यांस काढून दिल्हें; व गुलामकादरखान यांनीं पातशाहाचे किल्ल्यावर गोळे मारले; आणि मीरबक्षीगिरीचीं वस्त्रें घेऊन तमाम अंतरवेदींत आपला बंदोबस्त केला. आणि राजे जैपूरकर यांसही पत्रें पाठऊन त्यांस तिकडून बोलाविलें. इकडून रेवाडीचे मुक्कामीं पातशाहांस घेऊन गेले. याप्रमाणें या त्रिवर्गांनीं बखेडे केले. ह्मणून यांचे मनांत आतां राजश्री पाटिलबावांची फत्ते जाली. पूर्ववत्प्रमाणें दिल्लींत पातशाहांचे येथील मुख्त्यारी जाली. हे आमचें पारपत्य करतील. याप्रमाणें वसवास खाऊन साशंकित आहेत. त्याजवरून नाजरानें आपलेकडून कुराण, व रामरतन व शितळदास यांनीं आपलेकडून श्रीगंगाजळी, येणेंप्रमाणें देऊन, व जुदीखान अल्ली नकीखान यांचे पुत्रासमागमें पाठविली आहे कीं, राजश्री पाटिलबावांनीं आह्मांविसीं निखालस स्वच्छ असावें. आह्मी अतःपर कांहीं राजश्री पाटिलबावांसीं दुसरा अर्थ करूं, तरी आह्मांस कुराणाची व गंगाजीची शपथ आहे. ह्मणून सांगून पाठविलें आहे. व मागाहून रामरतनास धीर न पुरे, ह्मणून आणखीही दिल्लीहून कूच करून, श्रीमथुरेस राजश्री पाटिलबावापासीं गेला आहे. तेथें जाऊन राणेखानभाई वगैरे सरकारचे मुतसद्दी आहेत, त्यांचें साधन करून राजश्री पाटिल-बावांकडील स्वच्छता करून घ्यावी, या विचारावर गेला आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३०८.

श्री. जुलै इ. स. १७८८.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:-आपली फौज श्रीयमुनापार गुलामकादरखान व इस्मायलबेग यांचे फौजेचे आसपास कोसीं दोन कोसीं रसद बंद करून होते. निदान गुलाम कादरखान व इस्मायलबेग यांस धीर न पुरे, ह्मणून तेथून कूच करून रामगडास आले. तेथील चांगल्या चांगल्या तोफा किल्ल्यांतून काहाडून, स्वारी समागमें घेऊन, दरकूच दिल्लीसमीप यमुना पार शाहादरीयापाशीं मुकाम करून आहेत. शाहादरीयाचे व पडपडगंजाचे व गाजुदीनगरचे तमाम वाणी धरून आणून, चार पांच लक्ष रुपये दंड बांधून, पैका उत्पन्न करून, पातशाहासीं स्वाल केला आहे कीं, हजरतांनीं दीनचा पक्ष सोडून मऱ्हाठीयांचा पक्ष धरला

आहे, हे गोष्ट मुसलमानीस ठीक नाहीं. ह्मणून दोन चार काजी व मुलाणे यांजबराबर सांगून पाठविलें. त्यास पातशाहांनीं उत्तर दिल्हें कीं, "मुसलमानास सोबत द्यावी, दीनचा डंका ठेवावा, हें ठीकच आहे. परंतु आज दहा महिने जाले, तुह्मीं दरोबस्त मुलूक व किल्ले आटोपिले, पैका उत्पन्न केला, त्यांपैकीं मजला काय दिल्हें? व मर्सी सलुख काय केला? उलटें आमचे किल्ल्यास व रंगमहालास गोळे मारिले. जितकी शोकी करावयाची तितकी केली! आतां तुमची आमची संगत नाहीं." ह्मणून साफ जाब दिल्हा. त्याजवरून गुलामकादरखान व इस्मायलबेग एक विचारें होऊन झुंजास मुस्तेद आहेत. एक लढाई मराठियांसीं घेऊं, मग जें होणें तें होईल. ह्मणून यमुनेचे कांठीं शाहादरीयाकडे मोरचेबंदी करून, पातशाहांची फौज व तोफखाना व राजश्री पाटीलबावांकडून भगीरथसिंग शिंदे व रवळोजी शिंदे दोन हजार स्वारांनशीं आले आहेत. हे सामील होऊन मोरचेबंदी करून आहेत. राजश्री पाटीलबावांस वरचेवर पातशाहा पत्रें पाठवितात कीं, "मातबर फौज व सरदार पाठऊन द्याल, तरी दिल्लीची स्थीत राहेल. नाहीं तरी रोहिला दिल्लींत दाखल जालीयावर, आग्र्याचे शहरची खराबी केली, त्याप्रमाणें दिल्लीचीही अवस्था होईल." ह्मणून वारंवार लिहून पाठवून फौजेची मार्गप्रतीक्षा करून आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३०९.

पैवस्ती छ० २७ जिल्हेज सन तिसा. **श्री.** १ आगष्ट इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २८ माहे सवाल मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं पै दरपै विनंतिपत्रें पाठविलीं, ते प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, गुलामकादरखान, इस्माइलबेग दिल्लींत येऊन, पातशाहासीं शपथ कुराण इमान करून, सिलेमासिको पातशाहाजादा बरोबर घेऊन, पातशाहाची आज्ञा घेतली. शहरा बाहेर रेतींत शाहाजाद्याचा डेरा करविला. परंतु कूच न केलें. शहरांत मातबर असामी पाहून धराधर करूं लागले. पातशाहांनीं आज्ञा केली कीं, "शहरचे लोकांस उपद्रव देणें ठीक नाहीं. तुह्मीं आज्ञा घेतली, शाहाजादा घेतला, आतां जाऊन हरिफासीं मुकाबला करावे." त्याजवरून उभयतांनीं अर्ज केले कीं, "शहर लुटावयास

मना करितां, तर पैका जवळून देवावा." ऐसीं भाषणें होतीं. छ० २५ मीनहूनीं उभयतां गुलाम स्वार होऊन किल्ल्यांत आले. दोन हजार माणूस आंत घेतले. व पातशाहासीं अर्ज केले कीं, "फौजेस पैका देवावे. व आपण पत्रें राजश्री महादजी शिंदे यांस लिहितां, ते बजिन्नस धरलीं आहेत. यास्तव किल्ल्याचा बंदोबस्त आमचे हवाला करावे." लाचार होऊन पातशाहांनीं आज्ञा केली कीं, "किल्ल्याचा बंदोबस्त तुह्मीं करावा." उभयतांनीं किल्ल्याचा बंदोबस्त करून दिवाणखान्यापावेतों बंदोबस्त करून पातशाहांस घेरलें. रात्रौ घेऊन ठेविलें. छ० २७ मीनहूनीं चार घटका दिवस आल्यावर पातशाहास धरलें, व कैद केले व दिष्टर(?)शाहा नामें महमदशाहाचा नातू, यास काढून तख्तावर बसविलें. मग गुलामकादर यांनीं सांगितलें कीं, "पातशाही बेगमातचा झाडा घ्यावे." इस्माईलबेगांनीं ह्मटलें कीं, "हे गोष्ट कधींही जाली नाहीं. आह्मी करूं देणार नाहीं." ऐसीं भाषणें होऊन दोघांत बिघाड जालें. इसमाईलबेग स्वार होऊन किल्ल्याबाहेर गेला. डेऱ्यांत जाऊन, तोफा फौज तयार करून, कूच करून तालकाटोऱ्यावर जाऊन राहिला. गुलामकादर किल्ल्यांतच राहिला. मलकाजमानी व साहेबमेहेल बेगम हे किल्ल्यांत आली. गुलामकादरानीं अर्ज केले कीं, रुपये देवावे. उभयतां बेगमानीं ह्मटलें कीं, "बारा लक्ष रुपये देणें करार आहेत. पांच लक्ष इस्माईलबेगास व सात लक्ष तुजला देऊं; परंतु किल्ल्यांत व महालांत जसी एक रतिमात्र न करावी. व इस्माइलबेगास बोलाऊन घ्यावे. त्याचे रुपये त्याजला देऊं. तुमचे तुमच्या स्वाधीन करूं." राजे हिंमतबहादूर व पलटणें व भगीरथ शिंदे वगैरे राजश्री महादजी शिंद्याकडील फरिदाबादेस होते. त्यांसीं इस्माइलबेगासीं एकोप्याचा जाबसाल आहे. आज निश्चय ठरून रातोरात फरिदाबादची फौज दिल्लीस येणार. इस्माइलबेग व ते एक होऊन गुलामकादरसीं झुंजणार. मागून होईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१०.

श्री. ४ आगष्ट १७८८.

"सेवेसीं आज्ञाधारक गंगाजी अव्हाड व विठ्ठल हरी अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत श्रावण शुद्ध तृतीया भोमवार मु॥ लष्कर श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखन आज्ञा करावी. विशेषः—दिल्लीचें वर्तमान तरी राजश्री पाटिलबावांस पत्र श्रावण शुद्ध प्रतिपदा मंदवारीं आलें. त्याचा मजकूर आह्मांस सांगितला इस्मायलबेग गुलामकादर दिल्लीवर पातशाहा

जादा घेऊन बाहीर उतरले होतेः– त्यास, दररोज दोन हजार लोक बरोबर घेऊन, पातशाही दरबारास जात असत. तेव्हां किल्ल्याचे दरवाज्याजवळ जाऊन लोक बाहीर ठेवावे. आपण उभयतां शागीर्दपेशाचे लोक थोडके बरोबर घेऊन दरबारास जात असेत. ऐसी चाल घातली. नंतर त्या उभयतांस नाजर मिळून मसलत सिद्ध केली. दुसरे दिवशीं आषाढ वद्य १४ गुरुवारीं प्रातःकालीं दोन तीन हजार लोक समागमें घेऊन दरबारास आले. तसेच स्वारीसुद्धां किल्ल्याचे दरवाज्याआंत गेले. तेथें तरवार चालली! तों वीस पंचवीस माणूस कापून दरवाज्याचा बंदोबस्त करून, पुढें महालांत जाऊन पातशाहा धरला! त्याचे पुत्र अठरा साहेबजादे धरले! पातशाहांचें कुटुंबसुद्धां धरून एका महजदेंत कैद केलें. किल्ल्याचा दिल्लीसुद्धां बंदोबस्त करून, शुक्रवारीं नवा पातशाहा बेदरशाहा तख्तीं बसविला. हा पातशाहा अहमदशाहाचा नातू ऐसें ह्मणतात. याजवर सोमवारीं दोन प्रहरीं अकबार आलें. त्यांत लिहिलें कीं, गुलामकादर किल्ल्यांत आहे, तो महालांत द्रव्य काढतो. इस्मालबेग बाहीर शहरांत धराधर करतो. गुलामकादर यास इस्मालबेग यांणीं सांगोन पाठविलें कीं, आह्मी येऊं तोंवर तेथील माल न काढणें. यावरून उभयतांचा वाद वाढला आहे. आपले फौजेंत पैक्यामुळें खर्चाचा गवगवा आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति!"

लेखांक ३११.

श्री. १३ आगष्ट इ. स. १७८८.

"सेवेसीं आज्ञाधारक गंगाजी आव्हाड व विठ्ठल हरी अनुक्रमें साष्टांग नमस्कार व दंडवत विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ १० जिल्काद श्रावण शुद्ध द्वादशी मुक्काम लष्कर श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखनआज्ञा करावी. विशेषः– दिल्लीकडील वर्तमान तरी, गुलामकादर याणें आषाढ वद्य अमावसेचे दिवशीं स्वारी तयार होऊन, लाहोरी दरवाज्यास किल्ल्याचे आला. तो तिकडे बंदोबस्त पातशाई पलटणें होतीं, हें ऐकून उभा राहिला. तेव्हां आंतून खोज्यानें सांगून पाठविलें कीं, दिल्लीदरवाज्यानें आंत येणें. मग तिकडून चार हजार रोहिल्यासुद्धां आंत जाऊन दिवाणखासेंत बसून, हजरतास बाहेर बोलाविलें. आणि निमाज जुमेची पढावयास संगी महजदींत तेथेंच केलें. आणि पातशाहाजादे आवघे पांच सहा आणून बसविले. सिलेमासीको बाहेर इस्मायलबेगाजवळ होता. त्यासही आणून कैद केलें. तोषखाना वगैरे पागा हत्ती मुदबख वगैरे जप्त केलें!

पातशाही माणसें उठवून आपलीं बसविलीं. दुसरे दिवशीं पातशाहांच्या बेगमांचा वगैरे असबाब बाहेर दिवाणखासेंत बसोन आणूं लागले. बादशाहाजाद्यांस व बेगमांस तसदी केली. बारा प्रहर पाणी पिऊं दिलें नाहीं! बायकांचे झाडे जरजवाहीर तमाम घेतले. उन्हांत गच्चीवर उभ्या करोन मारविलें. रूबरू तमाम नगदी व जवाहीर कापड पशमीना वगैरे जप्त करोन, गोसगडास रवाना नगदी चौदा उंट भरोन, हजार रोहिले देऊन पाठविले. आणखी निघतच गेलें. हें ऐकोन इस्मायलबेग यांस राग आला. त्याचा आपसमध्यें बिघाड जाहला. दोन दिवस कजिया होता. शेवटीं कांहीं हिस्सा द्यावयाचा ठरविला. समजूत केली. शंभर मोहरा खर्चास दिल्या. पुढें कांहीं निघेल त्यापैकीं द्यावें घ्यावें, ऐसें केलें. किल्ल्यांत रोहिल्याचा बंदोबस्त आहे. शहरांत निम्मे दरवाजे यावर इस्मालबेगाचे लोक आहेत. निम्मे दरवाज्यावर रोहिल्याकडील लोक आहेत. ऐसा बंदोबस्त शहरचा करोन, सवासें आसामी शहरांतील धरून किल्ल्यांत नेऊन बसविलीं आहे. खंड मागतात. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय. तदनंतर राजश्री सुभेदार व अल्लीबहादर मेवाड प्रांतीं जावदेवर आलेत. पुढें कृष्णगडाकडे जाणार आहेत. जालें वर्तमान सेवेसीं विनविलें. होईल तें मागाहून लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति!"

लेखांक ३१२.

श्री. आगष्ट इ. स. १७८८.

"विज्ञापना ऐसीजे, द्वादसी रविवारचे वर्तमान आलें. किल्ला खाली करून गुलामकादर आपले लोक घेऊन पार फौजेंत गेला. रात्रौ दिवस निघाल्यावर कळतांच आपले लोक चढोन किल्ला घेतला. पातशाहाजादे व मलकाजमानी वगैरे कुटुंब पार नेलें. अलमशाहाचे डोळे काढिले होते. त्यास टाकून वरकड झाडून नेलें. कांहीं पहिले पातशाहांचें नातें पोतें किल्ल्यांतही ठेऊन गेला. पुढें आपल्या फौजा पार उतरल्या, व कांहीं नावेंतोन उतरतात. शत्रूचा जमाव घोडे व पायेचे लोक मिळोन पंधरा सोळा हजार आहेत. शिवाय तोफा व जरब मिळोन नव्वदपावेतों आहेत. कूच करून एक कोस गोसगडाचे सुमारें चालला. तेथें मुक्काम करून आहे. याजवर जें घडेल तें मागाहून विनंति लिहून पाठवितों. तदनंतर मेवाड प्रांताकडे राजश्री सुभेदारास व अल्लीबहादर यास इकडे येण्याविशीं पत्रें निकडीचीं जातात. तरी त्यांजकडीलही वर्तमान आलें आहे कीं, एकदोन कूच त्याचे इकडच्या सुमार जालेत. इस्मालबेग फुटोन

इकडे मिळाला आहे. परंतु त्याचा बंदोबस्त केला नाहीं. त्याजजवळ जमाव पांच सात हजारपावेतों आहे. दोन वेळ राणेखानभाईचे भेटीस आला. वरकड दुरूनच आहे. जालें वर्तमान सेवेसीं विज्ञापिलें. श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ति."

लेखांक ३१३.

श्री. २६ सप्टंबर इ. स. १७८८.

"छ० २५ जिल्हेज रोज शुक्रवार राजश्री पाटीलबावा यांचे लष्करांतून बातमीचें पत्र आलें. गुलामकादर यानें रोहिल्यास इशारत करून ठेवली. आपण इस्मालबेगाचे डेऱ्यास जातों. तो व आह्मी माघारें शहरांत येऊं. मार्गांत तलबाचा गवगवा करून मारून टाकावा, अशी सूचना करून आपण इस्मालबेगाचे येथें जाऊन, उभयतां बागामध्यें जाऊन खलबत करून, उभयतां एक हत्तीवर बसोन शहरांत येत होते. तों रोहिल्याची बद नजर पाहून, इस्मालबेग हत्तीखालीं उडी टाकून, आपले लोकांत आला. गुलामकादर शहरांत जाऊन मोरचेबंदी केली. इस्मालबेग याणें गोटांत येऊन मोरचेबंदी केली. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना."

लेखांक ३१४.

पैवस्ती छ० १ सफर सन तिसा समानीन कार्तिक मास.

श्री. २९ सप्टंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २८ माहे जिल्हेज मुक्काम लष्कर नजिक श्रीमथुरा जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—बहुता दिवशीं स्वामींनीं कृपा करून पत्र छ १ साबानचें पाठविलें, तें छ० १३ माहे मजकुरीं पावलें. पत्रीं आज्ञा कीं, "अलीबहादर याजबरोबर फौज देऊन रवाना जाहाले, व राजश्री तुकोजी होळकर यांसही फौजसुद्धां रवाना केले आहेत. लौकरच त्या प्रांतीं पोहोंचतील. रंजितसिंग जाट याचा जाबसाल कैसा ठरला, तें साकल्य लिहून पाठवणें. आणि तुमचे व्रतबंध करावयाचे आहे. त्यास तेथील कामकाजाचा बंदोबस्त करून देशीं यावें. वरकड राजश्री देवराव यांनीं लिहिलें आहे, त्याप्रमाणें तेथील उलगडा पाहून देशास यावें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास इकडील सविस्तर वृत्त पेशजी विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत जाहालेंच असेल. दिल्लींत गुलाम

कादरानीं पातशाहांसीं दगाबाजी करून कैदेंत केलें, व डोळे सुरीनें काढून अनेक प्रकारचीं विपत्य केलीं, त्याचा तपसील पूर्वीं सेवेसीं विनंति लिहिलीच आहे. शहरांत मोठा उपद्रव केला, व साहुकार धरून पैका घेतला. आणि पातशाहांच्या वगैरे माहालच्या बेगमा धरून नग्न करून झाडे घेतले. कित्येक लोक मारतां मारतांच मेले. पातशाहांची जप्ती केली. त्यांत नऊ लक्ष रुपये नख्त व एक कोटीचें जवाहीर व जामदारखान्यांत तीन चार लक्षांचा जिन्नस व याशिवाय आणीक सरंजाम निघाला. तो सर्व जप्त करून हल्लीं किल्ल्यांत जागा खणून पाहात आहे. एक जागा किल्ल्यांत खणली. त्यांत रुप्याचीं भांडीं व कांहीं मोहोरा व वस्त्रें वगैरे सरंजाम निघाला. त्याजवरून आतां सर्व जागा खणून पाहावी, ऐसें मानस गुलामकादरखान रोहिल्याचें आहे. सर्व शहर पळोन गेलें! मोठा उपद्रव शहरांत केला आहे! राजश्री पाटिलबावांनीं फौज अंतरवेद वगैरे रवाना केल्या आहेत. ईश्वरकृपेनें श्रीमंत स्वामी प्रतापवान् आहेत. शत्रूचे पराजय होऊन सर्व बंदोबस्त मनोदयानुरूप घडून येईल. वरकड सविस्तर वृत्त पुरवणी-पत्रावरून ध्यानारूढ होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१५.

पैवस्ती छ० १ सफर. **श्री.** २९ सप्टेंबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, राणेखानभाई यांस राजश्री पाटिलबावांनीं, पंधरा दिवस जाहाले, दिल्लीकडे रवाना केले आहेत. त्यास फौजेचे खर्चाचा बंदोबस्त नव्हता, ह्मणून होडलचे मुक्कामीं मुक्काम करून आहेत. हल्लीं राजश्री खंडेराव हरी यांजकडून कछवाघार, भदावर वगैरे प्रांत + + + (फाटलें आहे) जिवबा दादा बक्षी यांनीं शिबंदीची बेगमी केली व पै दर पै फौजेची रवानगी भाई मजकुराकडे होते. हल्लीं राजश्री जिवबा बक्षी यांस राजश्री पाटिलबावांनीं फौजसुद्धां भाईकडे रवाना केले आहेत. सांप्रत सलाह ठरली आहे कीं, सर्व फौजा दिल्लीचे गीर्द जाऊन रसद बंद करावी, आणि ऐवजाचा पिच्छा करून पारपत्य यथास्थित करावें. शाहा निजामुद्दी व राजश्री पाटिलबावा यांसीं खलबत होऊन याप्रमाणें सलाह ठरली आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. राजश्री सुभेदार यांचीं पत्रें राजश्री पाटिलबावांस आलीं आहेत कीं, आह्मी सत्वरच येतों. व येथूनही पत्रोत्तर गेलें आहे कीं लवकर आलें पाहिजे. या जाबसलांत राजश्री आंबोजी इंगळे तेथें आहेत. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१६.

पैवस्ती छ० १ सफर **श्री.** २९ सप्टेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–गुलामकादरखान रोहिला यांनीं पांच हजार रोहिले यमुनापार उतरून दिल्हे. आणि नावा पाठऊन तोफखाना वगैरे सर्व सरंजाम उतरोन द्यावा व मागाहून आपणही दिल्लीहून निघोन गोसगडास जावें, ऐसें मानस गुलामकादरखानाचें आहे, कीं तेथें जाऊन निगादास्त करून लढाईस यावें. इसमायलबेगासीं व रोहिल्यासीं चित्तशुद्धता नाहीं. यास्तव हे विचार करून दिल्लीहून निघणार, ऐसी वदंता आहे. व इसमायलबेगाचें बोलणें हिंमतगीर गोसावी याचे विद्यमानें राजश्री पाटिलबावांसीं आहे कीं, मी सेवेसीं चाकरीस हजर आहें. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. त्याजवरून राजश्री पाटिलबावांनीं विचार केला आहे कीं, गुलामकादराची मसलत सांगोन त्याचे मुलकांत पाठवावें. ऐसें श्रवणांत आलें आहे. प्रत्यास येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३१७.

पैवस्ती छ० १ सफर **श्री.** २९ सप्टेंबर इ. स. १७८८.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. बघेलसिंग व नानुमल वगैरे शिखाकडील पत्रें राजश्री पाटिलबावांस आलीं आहेत कीं, आह्मांस खर्चास पाठवावें, ह्मणजे आह्मी फौजसुद्धां चाकरींत हाजर होतों. याप्रमाणें गुलामकादरखानासीं शिखांचें बोलणें आहे. जिकडून पैका पावेल तिकडे सामील होतील. गुलामकादरखान यासीं सूत्र शिखांचें लागलें आहे. सांप्रत रसद पावती केली असे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१८.

पैवस्ती छ० १ सफर. **श्री.** २९ सप्टेंबर इ. स. १७८८.

पु॥ "श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे. पूर्वीं राजश्री सदाशिव मल्हार यांस राजश्री पाटिलबावांनीं श्रीस पाठविलें होतें कीं, राजश्री आबा चिटणीस यांस घेऊन यावें. त्याजवरून मशा-

रनिल्हे श्रीस जाऊन, राजश्री आबा चिटणिसांस घेऊन ब्रह्मावर्तपावेतों आले आहेत. आठा चौ रोजां लष्करांत येणार आहेत. येथें आल्यावर काय ठरेल तें विनंति लिहूं.

राघोगडवाला राजा पूर्वीं कैदेंत होता, त्यास राजश्री पाटिलबावांनीं लष्करांत बोलाविलें आहे. आज उद्यां येथें येणार आहे. मशारनिल्हे येथें पावल्यावर काय जाबसाल ठरेल ते विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३१९.

पैवस्ती छ० १ सफर श्री. २९ सपटेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—जैपूरकर राजे संस्थानींच आहेत. दौलतराम फौज घेऊन राव राजे प्रतापसिंग यांचे मुलूक काबीज करून आपला बंदोबस्त केला, व किल्ले वगैरे जागा राहेल्या आहेत, त्यांचेही घ्यावयाचा उद्योग आहे. हल्लीं राजे मजकूर व दौलतराम यांनीं पत्रें राजश्री सुभेदार यांस पाठविलीं आहेत. व घोडे वगैरे कांहीं सरंजाम अलीबहादर यांस नजर पाठविला आहे. परंतु अद्यापि तिकडून कांहीं उत्तर आलें नाहीं. जैपूरकराकडील वकील राजश्री पाटिलबावांकडे जाबसालास येणार, ऐसी वदंता आहे. प्रत्ययास येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२०.

पैवस्ती छ० १ सफर. श्री. २९ सपटेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. दिल्लीकडे राजश्री भागीरथराव शिंदे व रवळोजी शिंदे व हिंमतबहाद्दर गोसावी व समरूचीं पलटणें व तोटा फिरंगी ऐसी बारा पंधरा हजार फौज राजश्री पाटिलबावांनीं पूर्वीं रवाना केली होती. ते फरिदाबादेवर दिल्लीहून बारा कोस आलीकडे मुक्काम करून आहेत. नित्य रोहिल्याचे फौजेसीं गोळागोळी मात्र होते. सडी फौज दिल्लीचे गीर्द जाऊन, रसद बंद केली आहे. व कजाकी करून आणितात. दिल्लीचे वाटेंत होडल बलवल वगैरे तीन परगणे आहेत, ते अजितसिंग जाट, बलमगढवाल्याकडे राजश्री पाटिलबावांनीं जप्ती सांगोन, मशारनिल्हेचा बंदोबस्त अद्यापि ठेविला आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२१.

पैवस्ती छ० १ सफर. **श्री.** २९ सप्टेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. इसमायलबेग, हमदानीचा पुतण्या, दिल्लीबाहेर दाहा बारा हजार स्वार प्यादगान जमा करून आहे. परंतु शिबंदीचा गवगवा सख्त! लोकांस भक्षावयाची मोठी विपत्य आहे. गुलामकादरखान यांनीं कांहीं जवाहीर हमदानी मजकुराचे खर्चास पाठविलें होतें. यावरून इसमायलबेग बेदिल होऊन बोलले कीं, आह्मी तुह्मांस सामील असतां, आमची विपत्य या प्रकारची; व आपण सर्व पातशाहीची दौलत आपले हस्तगत करून गोसगडास जाणार. असो. आह्मांस जो पैका देईल त्याची ताबेदारी करूं. तात्पर्य, रोहिल्यासीं व मशारनिल्हेसीं विरुद्धता अंतःकरणापासोन आहे. यास्तव गुलामकादरखान यमुना उतरून गोसगडास जाणार ऐसी वदंता आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२२.

पै॥ छ०१ सफर. **श्री.** ३० सप्टेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—जवानब्ख्त शहाजादा पूर्वीं श्रीकाशींत मृत्यु पावला. त्याचे तिघे साहेबजादे श्रींत होते. त्यास हालीं वजिरांनीं पातशाहांचें वर्तमान ऐकून, बहुत क्रोधायमान होऊन, दरबार-आम बोलले कीं, "राजश्री पाटीलबावांनीं रोहिल्यांचें पारपत्य यथास्थित केलें तरी उत्तम आहे. नाहींतरी आह्मीं .... स्वारी करून रोहेल्यांसीं तंबी देऊं." व दुसऱ्या दिवशीं आपले फौजेची हाजरी घेऊन श्रीकाशीहून साहेबजाद्यास बोलावून घेतलें, व सामोरे जाऊन बहुत सन्मान केला, व आपले घरीं आणून मेजवानी केली. व हत्ती घोडे जवाहिर वस्त्रांच्या किस्त्या नजर केल्या. उपरांतीक साहेबजाद्याचे डेऱ्यापावेतों नवाब खवासींत बसोन आलेत. त्यास दसऱ्यापर्यंत इकडील प्रकार काय होतो त्याप्रमाणें मानस आहे कीं, दिल्लींत पातशाहा बरतख्त बसवावा. परंतु अगोदर राजश्री पाटीलबावा बंदोबस्त कैसा करतात हें पाहोन, मग चाल करणार ऐसी वदंता आहे. प्रत्यास येईल तें मागाहून विनंति करूं बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंति."

पैा छ० १ सफर सन तिस्सा समानीन कार्तिक मास.

लेखांक ३२३.

श्री.

३० सपटेंबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ २९ माहे जिल्हेज मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंद-लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—बहुत दिवस जाहाले, स्वामीकडून कृपापत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं ह्मणोन चित्त उद्विग्न असे. तरी सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. हल्लीं वर्तमान तरी, गुलामकादरखान दिल्लीचे किल्ल्यांत बंदोबस्त करून आहे. व इस्मायलबेग हमदानी शहराबाहेर मुक्काम करून आहेत. येथून राजश्री पाटिलबावांनीं फौजा त्या प्रांतीं रवाना केल्या आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्याजवरून ध्यानारूढ होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

पै॥ चंद्र २ सफर सनतिस्सा समानीन कार्तिक मास.

लेखांक ३२४.

श्री.

७ आक्टोबर इ. स. १७८८.

"सेवेसीं विज्ञापना ऐसीजे. छ० ६ मोहरम मंगळवार प्रहर दिवसाचें वर्तमान आकबाराचें आलें. याचा तपशीलः—

सोमवारीं मागील चार घटिका दिवस राहतां गुलामकादर त्याचे फौजेंतून किल्ल्यांत आला. रुस्तमखां वगैरे रिसालदार याची बहुता प्रकारें खातरी केली. अकबरशाहा वगैरे पातशाहाजादे यांस आपले रूबरू पार लष्करांत पाठविलें. मग त्याचे कारखान्यांतील वस्तभाव काढून पसंद केल्या. मनियारसिंग कुमेदानास सांगितलें कीं, जिन्नस पार करून द्यावें. मग नवा महेला ठिकाण पातशाही तेथें जाऊन, चीजवस्त पसंद करून, पार आपले लष्करांत घेऊन गेला.

१

हिंमतबहादर गोसावी याचें वर्तमान दोन तोफा व आपले लोक घेऊन, नाले उतरून यमुनेच्या रेतींत मुक्काम करून आहे. नंतर भाईनें आपले लोक रवळोजी शिंदे व इस्मालबेग वगैरे यांस ताकीद करविली कीं, यमुनेच्या रेतीमध्यें जाऊन उतरावें. डेरे तेथें करावे.

१

इस्मालबेगाचें वर्तमान, याचा बाप येऊन त्यांणीं सांगितलें कीं, तुह्मी गाफील बसले आहां; तुमचे कंपूचे लोक फुटोन पाटीलबावांकडे मिळाले. तुह्मांपासीं कोणती जमीयत राहिली आहे ? तुह्मीं आपलें बरें काय विचारिलें ? इस्मालबेगांनीं त्यास उत्तर केलें कीं, जे आमचें नशीबांत होणार तें जालें. परंतु आह्मी पाटीलबावांचे रफीक आहों. नंतर त्यास खर्चास रु॥ ५० देऊन बिदा केलें.

१

राणेखानभाईस पारचें वर्तमान हरकाऱ्यांनीं सांगितलें कीं, पटपरगंजावर रायाजी पाटीलांचे लोकांसीं व गुलामकादराचे लोकांसीं करोलीस लढाई जाली. वीस घोडे रोहिल्याचे नेले व आपणाकडीलही पांच चार घोडीं रोहिल्यानें नेलीं. आणि पाटिलांचे लोकांनीं तोफखान्याचे बैल घेरून नेले. बापू जनार्दन यांचेही लोक होते.

१

मंगळवारीं रामरतन मोदी यांणीं भाईस अर्ज केला कीं, एक रथवान पातशाही होता. तो आह्मांपासीं आला. त्यानें सांगितलें कीं, गुलामकादर याणें किल्ल्यांतून शहाजादे घेऊन पार गेला. तेव्हां शामदीखान बोलला कीं, अकबरशास किल्ल्यांतून उगेच आणिलें. माल असबाब तर तुह्मीं जप्त केला. यास आणून हे येथें काय करतील ? बहुत रदबदली करून अकबरशाहा वगैरे माघारा किल्ल्यांत आणिले, आणि त्यास सतरा सरदीं अंडीं खावयास घातलीं.

१

सदरहूप्रमाणें अकबार आली. त्याजवरून सेवेसीं विनंति लिहिली असे. श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ति."

पैवस्ती छ० २ सफर सन तिसा समानीन कार्तिकमास.

लेखांक ३२५.

श्री.

८ आक्टोबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० ७ माहे मोहोरम मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—आज्ञापत्र छ २५ रजबचें सादर जालें, तें छ० २ मोहरमीं पाऊन सनाथ जालों. "पातशाहांनीं शुका सरकारांत दिल्हा तो व अनुपगीर गोसावी यांनीं स्नेहवृद्धीविषयीं खलिता पाठविला तो पावला. त्यांचीं पारसीं उत्तरें लिहून

पाठविलीं आहे. त्यांतील मजकूर सविस्तर तुह्मांस कळावयाकरितां त्यांच्या हिंदवी नकला करून पाठविल्या आहेत. त्यांवरून सविस्तर कळेल. सारांश, सरका लक्षाविसीं पातशाहांची कायमी मजबूत असावी. त्यांत वांकडें असूं नये. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावें. व अलीबहादर यांजकडेही लिहीत जावें." ह्मणून पत्रीं आज्ञा. त्यास पातशाहांचें व रोहिल्याचें निमकहरामीचें वृत्त पूर्वी सविस्तर विनंति लिहिलीच आहे. हल्लीं वर्तमान, गुलामकादरखान यांनीं पातशाहांस कैद केल्यावर डोळे सुरीनें काढले! आज दोन महिने जाहाले, किल्ल्याचा व बेगमात व पातशाहाजादे व सलातीन व नाजर यांची जप्ती केली! एकेक पांघरूण आंगावर मात्र सोडिलें. वरकड दरोबस्त जिन्नस जवाहीर नगदी वस्त्रें दरोबस्त घेतलीं! दोन शत अडीच शत वर्षांची पातशाहत होती. ऐसी फजिती व दुर्दशा सलतनतीची कधींही जाली नवती! दाहा बारा करोडचें वित्त रोहिल्यांचे हातीं लागलें. इस्माइलबेगास तिसरा वांटा देऊं केलें होतें. तें बदमामली करून कांहीं न दिल्हें! यास्तव इस्मायलबेग राजश्री माहादजी शिंदे यांसीं मिळाला. राणेखानभाई वगैरे फौज शिंदेकडील फरिदाबादेस आली. इस्मायल-बेगासीं पुर्तेपणें एकोपा जाला. तेव्हां छ० ३० जिल्हेजीं फरिदाबादेहून राणेखान वगैरे कूच करून दिल्लीस आले. गुलामकादर यांनीं बाहेरील लोक सर्व किल्ल्यांत घेतले, व सालेमगढांत दरवाजा यमुनेकडे आहे, त्यामार्गें यमुनाचा उतरा प्रारंभ केला. राणेखान व इस्मायलबेग यांनीं शहरचा बंदोबस्त करून किल्ल्यास मोर्चे लाविले! त्याजवरून गुलामकादर फार घाबरला. छ० १ मोहरमीं दोन प्रहर रात्र जाल्यावर, मनियारासिंग व हातुअल्लीखान यांस किल्ल्यांत देऊन, आपण यमुना उतरून शाहदरयाजवळ मुक्काम केला. व किल्ल्यांतील जिन्नस जप्तीची होती, त्यास उतरवायास रात्रीं नावा तयार करून प्रारंभ केले. बेदरशाहा आतां पातशाहा केला होता, त्यासही घेऊन गेला. किल्ल्यांत अन्नाची मोठी विपत्य आहे! छ २ मोहरमीं मोर्चे कुरसीया बागेकडे व अबदुल आहदखानाची हवेलीस लावले. आतां यमुना उतरावयाचे घाटही बंद जाले. किल्ल्यांतील लोक बहुत घाबरले आहेत. आज उद्यां किल्ला रिकामा होईल. अंतरवेदप्रांतीं राजश्री रायाजी पाटील दहा बारा हजारांचे जमावानसीं आहेत. तिकडे त्यांनीं येऊन युद्धप्रारंभ केलें आहे. पुढें अमलांत येईल तें मागाहून विनंति लिहूं. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२६.

श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"सेवेसीं विज्ञापना ऐसीजेः– छ ८ मोहरम विजयादशमीचें वर्तमान आकबारचें आलें. गुलामकादरपासून नावा घेऊन किल्ल्याखालीं येऊन नावेंत जिन्नस घालून पार फौजेंत पाठविला. नाजराचे हवेलींत दोन कोटे अन्नाचे निघाले. त्यांपैकीं एक कोटा किल्ल्यांतील लोकांस वांटून दिल्हा. व एक कोट्यांतील अन्न नावेंत भरून पार पाठविलें. व आपण पार जाऊन, पांच हजार फौज तयार करून, तोफा बरोबर घेऊन, पटपरगंजावर जाऊन, बाजार जाळून माघारा फौजेंत आला. तेच दिवशीं लखनऊचें वर्तमान त्याचे लष्करांत आलें कीं, मंदराजाहून चार पलटणें व सत्तर गोरे हस दुवर (?) घेऊन पटणेस आला. बडे साहेबाची चख्ती कलकत्त्याहून कानपुरच्या कंपूस व फरकाबादेच्या कंपूस आली कीं, तुह्मीं, मिर्जाअमानी कूच करतील,त्याचा साथ करणें. त्यास मोहरम दहा तारखेनंतर जे सल्ला होईल ते कळेल. शहाजादा लखनऊस आहे. तो येवज साहेब लखनऊचा सरदार त्याचे घरास गेला होता. त्यांणीं नजरनपाज केली. घोडे हत्ती दिल्हे व वस्त्रें दिल्हीं. खातरजमा केली. याप्रमाणें वर्तमान आलें. तें सेवेसीं लिहिलें. श्रुत होय. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति."

लेखांक ३२७.

पै॥ छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, शाहाअलम पातशाहाचे शाहाजादे अकबरशा व सिलेमासिको व हसनबक्ष वगैरे शाहाजादे आजमासें १९ गुलामानें धरून आपले बरोबर नेले; व पातशाहांसही नेत होता. परंतु मनीहरसिंग ह्मणोन पलटणवाला यवनाकडे चाकर होता, त्यानें मोठे रदबदलीनें सोडोन देविलें. त्यास हल्लीं किल्ल्यांत अंध होऊन आहेत. एक बेगम मात्र सोडून गेला आहे. परंतु त्याची दुर्दशा फार केली. ते कोठवर लिहावी? माणूस मात्राची गैरहुकमत करून पैका दर एकाजवळोन घेतला. दो कोटींचें जवाहीर व नख्त सलातीनापासोन निघालें. पैकेपूर होऊन पार उतरोन गेला. पुढें गोसगडास जावेंसें आहे. परंतु चहूंकडून घेऱ्यांत पडला आहे. पहावें, पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२८.

पैवस्ती छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—दयाराम जाट हातरसवाला यांची मामलत शाहानिजामुद्दी यांचे विद्यमानें ठरली कीं, दीड लक्ष रुपये नख्त द्यावे. पैकीं साठ हजार रुपये तूर्त दिल्हे. बाकीचे चैत्रमासीं पावेतों द्यावे, ऐसा ठराव जाला आहे. पुढें श्रवणांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३२९.

पैा छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—नजब कुलीखान रेवाडी व गोकुळगड वगैरे जागा दरोबस्त दाबून आहे. दिल्ली प्रांतीं सरकारचा बंदोबस्त जाला ह्मणोन जमीदारांनीं मशारनिल्हेसीं बदमामली करून रेवाडी प्रांतीं बखेडा जाला आहे. राव राजे प्रतापसिंग माचेडीवाले यांचे विद्यमानें नजबकुलीखानाचें राजश्री पाटिलबावांसीं सलूकाचें बोलणें आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३०.

पै॥ छ० ५ सफर श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे—राघोगडवाला राजा लष्करांत आला. राजश्री पाटीलबावा एक कोस सामोरे जाऊन डेऱ्यास आणून, हत्ती, घोडा, जवाहीर वगैरे बहुमान करून, राजश्री शिवाजी विठ्ठल बापूंचे स्वाधीन केलें. त्याजवरून जाबसाल होऊन राघोगड बदस्तूर पहिल्याप्रमाणें मशारनिल्हेस द्यावें. त्यास याप्रमाणें ठराव होऊन एक लक्ष रुपये नख्त ठरले. त्याची निशा राजश्री शिवबा जामदार, पाटीलबावांचे जामदार खान्यावर असतात, त्यांची निशा ठरली आहे. पुन्हां मशारनिल्हे राघोगडाकडे जाणार. राजेमजकुराची जाटानीं बुंदीवाल्यानीं केली आहे. पुढें अंमलांत येईल तें विनंति करूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३१.

पै॥ छ ५ सफर. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे जयपूरकर राजे बदस्तुर शहरांत आहेत. दौलतराम कारभारी मात्र, राव राजाचे मुलुकांत धामधूम करून, गड किल्ले काबीज करून बंदोबस्त केला. राव राजा अलवारचे किल्ल्यांत आहे. नजबकुलीखान व मशारनिल्हे एक विचारें जाले, व फौज जमा करून पुन्हां जयपूरकरांचे मुलकांत जाऊन उपद्रव करणार. व मशारनिल्हेकडील वकील जीवनखां राजश्री पाटीलबावांपाशीं जाबसालाकरितां आला आहे. पुढें काय ठरेल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३२.

पै॥ छ० ५ सफर. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, जवांबख्त शाहाजादा याचा पुत्र मिर्जा हाजी यांस पूर्वीं काशीहून वजिरांनीं लखनौस आणिलें होतें. त्यास हल्लीं मिर्जा मजकुराचे सरंजामाची तयारी होते. एक कंपू दारानगराहून भागीरथी उतरून अलीकडे अनुपशहरांत दाखल जाला, व तेथील राजाकडून खंडणी घेऊन पुन्हां कंपू दारानगरास कूच करून गेला. दोन पलटणें मात्र अनुपशहरांत आहेत, व लखनौंत फौजेची निगादास्त होते, ह्मणून श्रवणांत आलें आहे. अंमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३३.

पैा छ० ५ सफर. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे—नवाब मंजूरअल्लीखान नाजर व राय सीतलदास व रामरतन मोदी यांनीं पूर्वीं गुलामकादरखानासीं सूत्र लावून दिल्लींत बोलाविलें, व सर्व पातशाही गारत केली. त्यास, गुलामानें मंजूरअल्लीखानांशीं बदमामली करून शासन केलें, व त्याचे घरची जप्ती केली. त्यांत वीस पंचवीस लक्षांचा सरंजाम बगदी निघाला. सीतलदास व रामरतन यांनीं युक्तीनें आपलीं कुटुंबें दिल्लींतून काहाडून पटण्यास रवाना केलीं. सीतलदास पटण्यास गेला, व रामरतन पळोन इकडे राजश्री पाटिलबावांचे लष्करांत आला. येथें ममतेंत शिरून राणेखानभाई-

कडे जाऊन, दिल्लीचे करोडगिरीचे हसलपैकीं पंचवीस हजार रुपये सरकारांत देऊन, करोडगिरीची खिजमत कबूल केली. श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३४.

पैा छ० ५ सफर **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे- पटालेवाले शीख व लाहोर अटक वगैरेकडे गुलामाचीं पत्रें गेलीं आहेत कीं, तुह्मीं वीस हजार स्वारांनशीं येऊन आह्मांस सामील व्हावें, ह्मणजे खर्चाची बेगमी करून देऊं. याप्रमाणें शिखाकडे पत्रें व वकील गेला आहे. गुलामानेंही नजीबखानाप्रमाणें डौल रचला आहे. पहावें, पुढें काय प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. कलम १.

कृष्णगडवाला राजा बिसनसिंग राजश्री पाटीलबावांबरोबर दोन वर्षें होता. त्यास, कृष्णगडास राठोडांनीं मोर्चे लावून सर्व जागा हस्तगत केली. एक किल्ला मात्र राहिला आहे. राजेमजकुरांनीं राजश्री पाटीलबावांचे अनुमतें कांहीं पैका देऊन राठोडांशीं मामलत केली. आणि राजे मजकूर राजश्री पाटीलबावांशीं निरोप घेऊन वृंदावनास आले. दुसऱ्या दिवशीं मृत्यु पावले! राजा मान, नातू राजे मजकुराचा, ग्वालेरप्रांतीं राजश्री पाटीलबावांनीं ठेविला आहे. श्रुत होय. कलम १.

राजश्री पाटीलबावांनीं लखनौस वजिरास व इंग्रेजांस पत्रें लिहिलीं आहेत कीं, हल्लीं दिल्लीचा बंदोबस्त किल्ल्यासहित आह्मीं केला. गुलाम शाहादऱ्यास गेला. फौजा सरकारच्या गिर्द आहेत. रसद बंद करून लौकरच पारपत्य होईल. त्यास आतां दिल्लींत पातशाहा बसविला पाहिजे. त्यास, आपला आमचा विचार ठरेल त्याप्रमाणें अमलांत आणूं. लौकर पत्रोत्तर पाठवावें. त्या अन्वयें केलें जाईल. याप्रमाणें वजिरास व इंग्रेजांस पत्रें गेलीं आहेत. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. कलम १.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३५.

पै॥ छ० ५ सफर. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजेः—गुलामकादराची मातुश्री शिखांकडे जाऊन सूत्र लाविलें

आहे कीं, आमची मदत करावी. त्याजवरून कांहीं खर्चासही मशारनिल्हेनीं पाठविलें आहे. परंतु अद्याप कांहीं ठराव जाला नाहीं. पुढें अंमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३६.

पै॥ छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—शिखांनीं अटक नदीपासोन सर्व मुलकांत आपला बंदोबस्त पानिपतपावेतों करून, अंतरवेदींत चौथाई रखीचा अंमल ठरावून जबरदस्तीनें घेतात. हल्लीं राजश्री पाटीलबावांनीं बघेलसिंग शीख कुरुक्षेत्रकर यास पत्रें बोलावण्याचीं गेलीं आहेत कीं, तुह्मीं फौज घेऊन तिकडून गुलामाचे रोखावर राणेखानभाईजवळ येऊन सामील होणें. तुमचा बंदोबस्त सर्व गोष्टींचा केला जाईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३७.

पै॥ छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—मिर्जा शाहारुख, नादरशाहाचा नातू, यांनीं तैमूरशाहा अबदाली यांसीं लढाई करून सर्व प्रांतांत आपला बंदोबस्त केला. व अबदाली मजकुरास खारीज केलें आहे. त्या प्रांतींही आपसांत लढाई चालली आहे, ह्मणून श्रवणांत आलें. तें विनंति लिहिली असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३८.

पै॥ छ० ५ सफर श्री ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री रायाजी पाटील हिंडण नदी उतरून गुलामकादराचे गिर्द होऊन चहूंकडील रसद बंद केली आहे. व नित्य गोळागोळीचा प्रसंग होतो. यवनांचे लष्करांत चारशेर अन्न विकतें व दिल्लीहून राजश्री जिवबा बक्षी यांची व तोटा फिरंगी वगैरे फौजांची यमुनापार उतारा लागला आहे. हे सर्व फौजा, पार उतरोन, लढाई करून यवनांचें पारपत्य करावें

या उद्योगांत आहेत. व राजश्री पाटीलबावांचीही वरचेवर ताकीद आहे कीं, रोहिल्यास जिवंत धरून आणावें. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३३९.

पैवस्ती छ० ५ सफर श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:–

विनंति ऐसीजे:– इस्माईलबेग यांस राजश्री पाटिलबावांनीं पन्नास हजार रुपये खर्चास पाठविले. व आणीक लक्ष रुपयांची तजवीज आहे. पुढें गोसगडाकडील मुलुख गुलामकादरखानाचा मशारनिल्हेस सरंजामांत द्यावा ऐसें बोलणें ठरलें आहे. व मशारनिल्हेचे फौजेचा उतारा यमुनापार लागला आहे. प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४०.

पैवस्ती छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:––गुलामकादरानीं बेदारबक्ष महमदशाहाचा नातू पातशाहा केला होता. त्यास व त्याचे चौघे बंधू होते त्यांस आपल्याबराबर घेऊन गेला. आणि नाजरासही समागमें धरून नेलें आहेत. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४१.

पैवस्ती छ० ५ सफर. श्री. ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना साहेब स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:––विलायतेहून वर्तमान आलें कीं, मुरादशाह पैई बगदादचा पातशाह तैमुरशाहावर चढून आला. युद्धप्रसंग जाले. तैमुरशाहानीं शिकस्त खाऊन पिशावरास आला. मुरादशाहानीं माहालपावेतों बंदोबस्त केले. पुढें पिशावरांस येणार. तैमुरशाहा, लाहोर प्रांतीं मातबर शीख आहेत त्यांस कुमकेस बोलावितो. त्यास शीख पैका मागतात. पुढें अंमलांत येईल तें विनंति लिहूं. अनुपगीर गोसावी यास सरकारचा खलिता दिल्हा. तो बहुत प्रसन्न जाला. हरयेकविशीं सरकारचाकरीस तत्पर आहेत. कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४२.

पै॥ छ० ५ सफर. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे:—इस्माइलबेग हमदानी याचा जाबसाल हिंमतबहादर गोसावी यांचे विद्यमानें राजश्री पाटीलबावांसीं बोलणें होऊन ठराव जाला कीं, दीड लक्ष रुपये नख्त द्यावे, व सरंजाम फौजेचे खर्चास लावून द्यावा. याप्रमाणें ठराव होऊन, करारमदार शपथपूर्वक ठरोन यांजकडे मिळाला, व दिलीचे शहरांत हमदानी मजकुरानें रवळोजी शिंदे यांचा बंदोबस्त करून दिल्हा. त्यास दहा पंधरा दिवस किल्यासीं लढाई राहिली. शेवटीं छ० १० मोहरमीं गुलामकादरानें आपले लोकांस सांगून पाठविलें कीं, किल्ल्यांत जे वस्तभाव आहे, त्यास अन्न देऊन निघोन येणें. त्याजवरून रोहिल्यांनीं किल्याची खराबी करून निघाले. ते समयीं हिंमतबहादर गोसावी वगैरे मोर्चे होते, त्यांसीं लढाई जाहाली. अखेर शेंपन्नास माणसें उभयपक्षीं लढाईंत ठार जाले, व रोहिले निघोन गेले. किल्यांत राजश्री जिवबा बक्षी दाखल होऊन आपला बंदोबस्त जाला. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४३.

पैवस्ती छ० १ सफर तिसा समानीन कार्तिक मास. **श्री.** ९ आक्टोबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० १४ माहे मोहरम मुक्काम लष्कर नजिक श्रीमथुरा जाणोन स्वानंद लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष:—पेशजीं विनंतिपत्रें सरकारांत सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, राजश्री पाटिलबावांनीं आगरियाच्या वगैरा नावा दरोबस्त पैदरपै फौजा यमुनापार करावयास दिल्लीस पाठविल्या आहेत. त्या नावा दिल्लीस पावल्या. राणेखानभाई व जिवबा बक्षी व समरूचीं पलटणें वगैरे फौजेचा उतारा अंतरवेदींत लागला आहे. व इस्माइलबेगास गुलामाचें पत्र आलें होतें कीं, दोन लक्ष रुपये सध्यां नख्त घ्यावे, व आह्मांस येऊन सामील व्हावें. त्याजवरून इस्माइलबेगानीं तें पत्र बजिन्नस राणेखानभाईकडे पाठऊन दिल्हें, आणि गुलामास साफ उत्तर सांगोन पाठविलें कीं, आह्मांस तुमचा इतबार नाहीं. निमकहराम आहां! ऐसें उत्तर पाठविलें. पूर्वीं महमदबेग हमदानीचें कुटुंब आग-

रियाचे किल्ल्यांत ठेविलें होतें. सांप्रत इस्मायलबेग इकडे सामील जाला ह्मणोन त्याचें कुटुंब मशारनिल्हेकडे पाठऊन दिल्हें. यानंतर जैपूरकर राजे यांनीं इस्मायलबेगास पत्रें पाठविलीं आहेत कीं, तुह्मीं दाहा हजार फौज घेऊन आह्मांकडे यावें. येथें तुमचे खर्चाची व जायेदादीची बंदोबस्त करून देऊं. याप्रमाणें पत्रें आलीं आहेत. त्यास येथूनही वरचेवर इस्मायलबेगास राजश्री पाटील-बावांचीं पत्रें खातरजमेचीं जातात. व खर्चाची तरतूद आहे. दुसरे अलीबहादर व राजश्री तुकोजी होळकर यांनीं मारवाडांतून पांच कोस अलिकडे करोलीचे रोखें कूच केलें आहे. जैपुरकर राजे यांनीं आपल्याकडून वकील बहिरजी नामें राजश्री पाटीलबावांकडे रवाना केले आहेत. परंतु अद्याप येथें लष्करांत आले नाहींत. मशार-निल्हे आलियावर अमलांत येईल तें विनंति लिहूं. आमचें वर्तमान तर, गुलाम-कादराच्या भयामुळें जीव मात्र वांचऊन मुक्काम मजकुरीं आलों. सदोदित कृपापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड वृत्त पुरवणीपत्रावरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २३ सफर तिसा समानीन.

लेखांक ३४४.

श्री.

२६ आक्टोबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ० २५ माहे मोहरम मुक्काम दिल्ली जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः— पूर्वीं विनंतिपत्रें पाठविलीं, तें प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, राणेखान वगैरे यांनीं किल्ल्यास मोरचे लावल्यावर रोहिला यमुना उतरून गेला होता. पुन्हां किल्ल्यांत येऊन अकबरशाहा वगैरे आठ असामी, व बेदरशाह नवा पातशाहा केला होता तो, व सात असामी त्याचे भाऊ वगैरे, व नवाब नाजर ऐसे घेऊन गेला. छ० १० मिनहूनीं किल्ल्यांत अग्न लागून दारूगोळ्याचा कोठा उडाला. रोहिले बहुत उठून गेले. मग घाबरून किल्ल्यांतून रोहिले पळून यमुनापार गेले. दोन प्रहरानंतर हिंमतबहादूर गोसावी व रवळोजी शिंदे किल्ल्यांत दाखल जाले. दोन पलटणें तेथें ठेऊन बंदोबस्त केले. शाहाअलम पातशाहा आंधळा आहे. त्यांसी भेटून अर्ज केले कीं, "तुह्मींच पातशाहीवर असावें. तुमचे लेंक, गुला-माचें पारपत्य करून आणूं, तेव्हां अकबरशहास तख्तावर बसवूं". हें वर्तमान गुलामांनीं ऐकून, बेदारशाहा पातशाहा केला होता त्यास कैद करून, अकबरशा-हास पातशाहा करून, येथें आंधळ्यास सांगून पाठविलें कीं, "तुमचे लेंकास

पातशाहा केलें आहे. घोडीं हत्ती वगैरे सरंजाम दरोबस्त देतों. माझी तकसीर माफ करावी. आंधळ्यानीं राणेखानांस सांगून पाठविलें कीं, "गुलाम माझे लेंक देतो. तुह्मी ह्मणाल तर त्याजला बोलावून तकसीर माफ करून लेंकास आणवूं." त्याजवरून राणेखान वगैरे यांनीं बहुत विषम मानून बोलिले कीं, "आंधळे जाले परंतु बट्टेबाजी अद्यापि गेली नाहीं. त्यांनीं अकबरशाहास गुलामांनीं पातशाहा केलें, तें प्रमाण नाहीं. आह्मी पारपत्य करून शाहाजाद्यास आणून पातशाहा करूं, तेव्हां प्रमाण आहे." त्याजवरून आंधळा उगाच राहिला. व गुलामाचा माणूस आला, त्यास तंबी करविली. हें वर्तमान राजेश्री माहादजी शिंदे यांनीं ऐकून राणेखानांस ताकीद दिली कीं, जलदीनें यमुना उतरून गुलामाचें पारपत्य करावें. व आंधळ्याची खातरदारी करावी. त्यास येथें हिंदुस्थानी फौज पलटणें वगैरे यांनीं राणेखानासीं तलबेचा हंगामा केला. यास्तव पार उतरावयाचें कठीण जालें. मग राणेखान यांनीं कर्ज घेऊन जैसे तैसे फौजेची समजाविश केली, व नावाही जमा करून उतरावयाची सिद्धता केली आहे. रायाजी पाटील वगैरे आठ दहा हजार फौज अंतरवेदींत आहेच. आणीख बावीस तोफा व आठ दाहा हजार स्वार पायदळ रणजितसिंग जाटाकडून शेरगढाजवळ यमुना उतरून आले आहेत. आज उद्यां रायाजी पाटीलचे शामील होईल. वीस हजार स्वार पायदळ राणेखानांपासीं आहे. श्रीकृपेनें गुलामाचें पारपत्यच होईल. नवाब असफदौले यांनींही एक कंपू रवाना केला. परंतु त्यास पोहोंचावयास दिवसगत पाहिजे. छ० २१ माहे मजकुरीं राणेखान वगैरे सर्व किल्ल्यांत आंधळे पातशाहांपासीं येऊन नजर वगैरे शिष्टाचार केले, व अर्ज केले कीं, "आपण दिवाणखासांत गादीवर बसावें. व जिवाबख्त तुमचा नातू आहे, त्यास पुढें घेऊन बसावें. दरबार शिरस्त्याप्रमाणें करीत जावें." ऐसें ठराऊन जोशास मुहूर्त पाहावयास ताकीद केली. आंधळ्यानें सांगितलें कीं, "तुह्मीं येथें बंदोबस्त ऐसे करितां. हें वर्तमान गुलामानीं ऐकून, शाहाजादे त्याच्या कैदेंत आहेत त्यांसीं बदसलूखी केल्यास उपाय काय?" त्याजवरून हे निश्चय ठरले कीं, आधीं त्याचें पारिपत्य करावें, मग जें करणें तें करावें. त्यास येथून साता कोसांवर यमुना पायाबश पडली आहे, तेथें फौज उतरून गुलामाचें पारपत्य सत्वरच करितात. पुढें अंमलांत येईल तें विनंति लिहूं. सविस्तर तीर्थस्वरूप राजेश्री देवराव विनंति करतील. बहुत काय लिहावें. कृपा केली पाहिजे हे विनंति.

गोसावी हिंमतबहादूर यांनीं खलिता पाठविला आहे. त्याचें उत्तर यथास्थित पाठविणार स्वामी समर्थ आहेत हे विनंति."

लेखांक ३४५.

श्री. आक्टोबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः–

विनंति ऐसीजे. येथील मंडळी राजश्री पाटिलबावांस इच्छित नाहींत. राजे जैपूरकर व जोतपूरकर व नवाब नाजर व रामरतनमोदी इतक्यांचा भरंवसा त्यांस इच्छित नाहींत. व पाटिलबावा असावे ऐसें पातशाहा व रंजितसिंग जाट व रावराजा व हिसामुदीखानाचा भाऊ वगैरे सर्व मंडळी पाटिलबावांस इच्छितात कीं असावें. सर्व मंडळी लहान थोर राजश्री सुभेदार तुकोजी होळकर वगैरे आपले सरकारचा सरदार अलिबहादर आदिकरून श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींकडील जो कोणी येईल, त्यासीं सर्व हिंदुस्थान हजर आहे. याप्रमाणें मोंगलिये आदिकरून सर्वांचें मानस आहे. नवाब नाजर, राजे जैपूरकर यांची मुलाजमत करून द्यावी ह्मणून दिल्लीहून आले होते. राजाची मुलाजमत करून आठ दहा रोज येथें राहून, राजाकडील जाबसालाचा व नजबकुलीखान याजकडील जाबसालाचा गुंता उरकून मग दिल्लीस जावें. याप्रमाणें पातशाहांचें व नाजरजींचें मानस होतें. त्यास राजाकडील जाबसालाचा व नजबकुलीखान याजकडील जाबसालाचा गुंता उरकोन मग दिल्लीस जावें, ह्याप्रमाणें पातशाहांचें व नाजरजीचें मानस होतें. पातशाहांचे मर्जीप्रमाणें वर्तत नाहींत, ह्मणून लाचार होऊन पातशाहांनीं दिल्लीस रवाना केलें. याचें कारण हेंच कीं, दिल्लीचा किल्ला खाली, शहरांत कोणी नाहीं, हें जाणून खबरदारीस पाठविलें. याजकरितां त्याचे खलित्याचा जाब पाठविला नाहीं. दिल्लीहून उत्तर आणविलें आहे. आलियावर मागाहून पाठऊन देऊं. पातशाहांनीं ताकीद केली आहे कीं, "शुक्याचा जाब सत्वर आणवणें." याजवरून विनंति लिहिली आहे. तरी शुक्याचा जाब सत्वर रवाना करावा. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४६.

श्री. १ नोव्हेंबर इ. स. १७८८.

"आज्ञाधारक गंगाजी आव्हाड व विठ्ठल हरी अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ कार्तिक शुद्ध तृतीया ता॥ छ १ माहे सफर मुक्काम लष्कर श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखन आज्ञा करावी. विशेषः— येथील वर्तमान, इस्मायलबेग यास जायजाद रेवाडी प्रांत देऊन, नजबकुलीखान याजवर पाठविलें होतें. हे जाऊन यांणीं नूरगडास मोरचे लाविले होते. त्याजवरून

नजबकुलीखान याजवर जमाव, फौज स्वार दोन तीन हजार व तोफा अठरा, याशिवाय पायदळचे लोक दहा पंधरा हजार गवार मेळवून चालून आला. इस्मालबेगाजवळ जमाव स्वार दीडहजार व पायाचे लोक तीन हजार, तोफा सव्वीस, व आपले मऱ्हाटे लोक शंभर स्वार तैनातीस दिल्हे होते. इतक्या लोकांनिसीं नजीक रेवाडीचे—प्रसंग आश्विन वद्य चतुर्दशीचे दिवशीं प्रातःकालपासोन सायंकालपावेतों तोफेची मारगिरी व गोळागोळी होऊन, अस्तमानीं इस्मालबेग त्याजवर चालून गेला. लोक परस्परें पडले. व जखमीही बहुत काय जाले. नजबकुलीचा मोड होऊन, तो पळोन गांवाचे आसऱ्यास गेला. प्रहर रात्र जाली. त्याजकडील तोफा आठ आणिल्या. याप्रमाणें वर्तमान आलें. त्यावरून राजश्री पाटिलबावांनीं आह्मांस लिहावयास सांगितलें. सेवेसीं श्रुत होय बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विज्ञप्ति."

लेखांक ३४७.

श्री. ८ नोव्हेंबर इ. स. १७८८.

" श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ९ माहे सफर मुक्काम लष्कर नजिक मथुरा जाणोन स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—इकडील वृत्त पेशजीं छ० १५ मोहरमीं विनंतिपत्रें सेवेसीं पाठविलीं होतीं, ते प्रविष्ट होऊन वृत्त श्रुत जालें असेल. हल्लीं वर्तमान तर, छ० ६ रोजीं आंबोजी इंगळे लष्करांत येऊन नवाब अलीबहादर समीप आल्याचें वर्तमान साकल्य राजश्री पाटिलबावांपासीं बोलले. दुसऱ्या रोजीं छ० ७ माहे मजकुरीं गुरुवारीं राजश्री पाटिलबावा तीन चार कोस पेशवा जाऊन परस्परें भेटी जाल्या. तेथून स्वार होऊन नवाब अलीबहादर गंजामागें डेरदाखल जाले. व राजश्री पाटिलबावा छावणीस आले. राजश्री आंबोजी इंगळे इकडून हरयेक जाबसालांत आहेत. सांप्रत नवाब अलीबहादरांचें बोलणें हेंच कीं, अगोदर यमुनापार उतरून गुलामाचें पारपत्य लौकरच केलें पाहिजे. सरकारफौजेची आमदानी व शोहरत ऐकून राणेखानभाई वगैरे फौजा त्वरेनें यमुनापायाब उतरून गुलामाचे मुकाबल्यावर गेले. तिकडून गुलामही लढाईस सिद्धच आहे. गोळागोळीची लढाईस प्रारंभ जाला आहे. सरकारची फौज व सरदार आले आहेत. या दबावानेंच गुलामाचें पारपत्य मनोदयानरुप प्रतापेंकरून श्रीमंत स्वामींचे घडून येईल. सरकारचे फौजेचा दबाव ऐकून गुलामानें दहशत खाऊन पळावयाच्या

संधानांत आहे. कूच करून गाजियाबादेकडे गेला. मार्गीं जातांना देवजी गौळी राजश्री पाटिलबावांकडील यांनीं बुणगें लुटिलें, ह्मणोन वदंता आहे. निदर्शनास येईल तें लिहूं. राणेखानभाई व रायाजी पाटील वगैरे फौजा राजश्री पाटिलबावांकडील गुलामाचे गीर्द आहेत. रसद बंद आहे. आठा चहूं दिवसांत गुलामास धरतील, ऐसें दिसतें. दिल्लीची सुभेदारी, राजश्री रवळोजी शिंदे, राजश्री धारराव शिंदे यांचे कनिष्ठ बंधू, यांची नेमणूक जाली आहे. व कांहीं पलटणा व फौज़ मराठी, शहरांत बंदोबस्तास आहे. लखनऊहून वजिराचीं पत्रें शिष्टाचाराचीं राजश्री पाटिलबावांस आलीं कीं, "तुह्मी उत्तम जाणाल तें कराल. इकडून दुसरा प्रकार नाहीं." याप्रमाणें पत्रें आलीं आहेत. यांनीं पूर्वीं पत्रें पाठविलीं त्यांचें प्रत्योत्तर आलें नाहीं. लखनऊस जवाबख्त शाहाजादा यांचा पुत्र आहे. त्याचे सरंजामाची तयारी होते ह्मणोन वदंता आहे. रंजितसिंग जाट भरतपुरास आहेत. त्यांनींही मेजमानी नवाब अलीबहादरांची केली. एक दिवस समशेरबहादराचे दरगाहाचे उरसाकरतां मात्र भरतपुरीं मुक्काम केला होता. वरकड दरमजल मथुरेस दाखल जाले. वरकड वृत्त, पुरवणीपत्रें व येकबारा पारसी सेवेसीं पाठविल्या आहेत, त्यांवरून श्रुत होईल. पुढें विचार ठरेल तें विनंति लिहूं. छ० मजकुरीं राजश्री पाटिलबावांनीं नवाब अलीबहादर यांचे मेजमानीची तयारी केली आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४८.

श्री. नोव्हेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—दिल्लीचें वर्तमान तर, शाहाअलम पातशाहांस राणेखानभाईंनीं किल्ल्यांत ठेविलें आहे, व सलातीन लोक होते त्यांसही वस्त्रें प्रावर्णें सर्वांस दिल्हीं. व पातशाहांस विचारिलें कीं, "कोणता शाहजादा तख्तावर बसवावा?" त्यावरून पातशाहांनीं उत्तर केलें कीं, "विचार करून सांगूं." इतकियांत हें वर्तमान गुलामास समजल्यावर बेदारबक्षास दूर करून, अकबरशाहा पातशाहांचा पुत्र समागमें नेला होता, त्यास तख्तावर बसवून, आपण खवासींत बसोन शिक्का अकबरशाहाचा जारी केला; आणि पत्रें शाहाअलम यांस लिहिलीं कीं, "अकबरशाहास पातशाहा केलें. आपण शिक्कागज पाठवून द्यावा, व शहरांत वगैरे सर्वत्र शिक्का यांचा जारी करावा." याप्रमाणें पत्र यांस लिहिलें. त्यावरून पातशाहांनीं हें पत्र पाहोन बहुत संतोषास प्राप्त जाले. तें पत्र राणेखानभाईकडे पाठऊन दिल्हें. भाई मजकुरानीं पातशाहांचे

खुशीचें वृत्त श्रवण करून बहुत बेदिल होऊन बोलले कीं, "अद्याप हिंदुस्थानीं माणसांस सुचत नाहीं. गुलामानें सर्व पातशाहत गारत केली असतां, आतांही आश्रा तुटत नाहीं. त्यास हल्लीं दिल्लीचे किल्ल्यांत व शहरपन्नाचे बंदोबस्ताकरितां नवी शिबंदी दोन तीन हजार प्यादे ठेऊन, किल्याचा व शहराचा बंदोबस्त अजितसिंग बलमगडवाला यांस सांगितला. त्यास मशारनिल्हेनीं किल्ल्यांत जाऊन आपले लोक कायम केले. व शहरच्याही दरवाजावर बंदोबस्त करून आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३४९.

श्री. नोव्हेंबर १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:--

विनंति ऐसीजे:—गुलामानें राजे हिंमतबहादर गोसावी यांस पत्र लिहिलें आहे कीं, राजश्री पाटिलबावांची व आमची सफाई करून द्यावी. त्यावरून दुसरे रोजीं गोसावीमजकूर राणेखानभाई जवळ येऊन, तें पत्र बजिन्नस दाखविलें. आणि गुलामाकडील निरोप सांगितला कीं, "पातशाही गारत केली, ते सर्व नाजर व आणिक कितेक लोकांचीं पत्रें येविशीं आह्मांस आलीं होतीं, तें पाहावीं. त्यावरून मीं तेथें जाऊन त्याप्रमाणें बंदोबस्त केला. व नाजराचेंही पारपत्य केलें तात्पर्य, पातशाहांचें जन्मांतरीं ऐसेंच होतें. त्यास जो सरंजाम व नगदी वगैरे बमोजीब यादीप्रमाणें आह्मांकडे आला असेल, तो तुह्मीं माघारा घ्यावा. आणि माझा मुलूख मजकडे बदस्तुर बाहाल ठेऊन, वरकड आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. परंतु शोध करून पाहावा. मजकडे अन्याय नाहीं. सर्वांचें अनुमतें होणें तें जालें. बदनामीचा मात्र टिका आमचे दैवीं आला. त्यास आज्ञा कराल तर बिलासराव वकील पाठऊन देतों." याप्रमाणें गुलामानें हिंमतबहादर यांचे विद्यमानें बोलणें लाविलें आहे. परंतु राजश्री पाटिलबावांचें मानस व इरादा हाच कीं, जिवंत धरून आणावें. व वरचेवर ताकीद आहे कीं, "लौकर पार उतरून गुलामाचें पारपत्य करावें." गुलामानें त्या पारीं दहा बारा कोस तमाम घाटावर आपला बंदोबस्त केला आहे. त्यास दिल्लीहून अलीकडे आठा कोसांवर एक घाटाचा शोध लाऊन, राणेखानभाई व जिवबा बक्षी वगैरे उतरले. व कांहीं फौज व तोफखाना कुरसियाबागाजवळ पायाब उतरले. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३५०.

श्री. नोव्हेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:–जयपूरवाल्याचे व जोतपूरकराचे वकील सुभेदारांकडे गेले आहेत कीं, आपली मामलत परभारें आह्मांसीं करून द्यावी. राजश्री पाटीलबावांसीं संबंध न ठेवावा. पूर्वापर आह्मी आपले स्थापित आहोंत. त्यावरून कांहीं बोलणें लागलें आहे, परंतु अद्याप निश्चय ठरल्यांत आला नाहीं. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. कलम १.

बंघेलसिंग वगैरे शीखांकडील वकील, राणेखानभाईजवळ येथें राजश्री पाटील-बावांपाशीं आले आहेत. इकडे बोलणें लागलें आहे. परंतु पैका मिळेल तिकडे शामील होतील. कलम १.


राजश्री खंडेराव हरी यांची मामलत दूर करून, दुसरे कमाविसदाराकडे कछवाघार वगैरे सर्व सांगितलें. त्यास गोहद वगैरे प्रांतीं जमीनदारांनीं दुंडी केली आहे. त्यावरून हल्लीं राजश्री पाटीलबावांनीं राजश्री लक्ष्मणराव हरी पारोळकर यांजबराबर दोन पलटणें व एक हजार स्वार देऊन, ग्वाल्हेर गोहद वगैरे प्रांतीं जमीनदारांचे पारपत्यास रवाना केले आहेत. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. कलम १.

रोहिल्यांनीं नवी निगादास्त करून, सर्व रोहिले जमा करून, पंधरा वीस हजारपावेतों स्वार प्यादगान जमा केली आहे. व तोफखान्याची लढाई करितो. व शीखांकडे सूत्र लाविलें आहे. प्रत्यास येईल ते विनंति लिहूं. कलम १.

राजश्री भाऊ फडणीस व भवानीशंकर पोतनीस कांहीं कापड घेऊन उज्जनीहून आले आहेत. परंतु नख्त ऐवज नाहीं. राजश्री पाटीलबावांनीं सर्व मुलूख लोकांस जायदादेंत दिल्हा. सांप्रत समय गांठला आहे. पहावें, पुढें काय विचार ठरेल तें लिहूं. कलम १.

गुलामकादरानें काबूल कंदारेस शहास पत्रें लिहिलीं आहेत कीं, "आपण या प्रांतीं यावें. दिल्ली वगैरे संस्थानचा बंदोबस्त करावा. मी सेवेंत हजर आहें. खर्चास लागेल तें आह्मी देऊं; परंतु आपला दीन कायम ठेवावा हें उत्तम आहे. मराठ्यांचा बंदोबस्त जाल्यावर पुन्हां आपले धर्म व दीन रहाणें कठीणच आहे. त्यास सत्वर स्वारी आली पाहिजे." याप्रमाणें पत्रें तिकडे गेलीं आहेत. पुढें निदर्शनास येईल ते विनंति लिहूं. कलम १.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."



कुतुबमिनार.

(जुन्या चित्रावरून.)

लेखांक ३५१.

श्री. डिसेंबर इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

दिल्लींत बदस्तूर राजश्री खळोजी शिंदे सुभे आहेत. शहाअलम पातशाहा यांणीं, बेदारबक्ष यास पूर्वीं गुलामकादर यांणीं मलकाजमानी व नवाबनाजर यांचे अनुमतें पातशाहा केला होता व वरकड शहाजादे सर्व कैदेंत होते ह्मणून, त्या उद्देशानें बेदारबक्षाचे पायांत बेड्या घालोन कैदेंत ठेविले आहेत. अर्धशेर अन्न मात्र भक्षावयासी देतात. पातशाहांचें मानस हें कीं, अकबरशाहास पातशाहा करावा. याप्रमाणें राजश्री पाटिलबावांस पत्रेंही आलीं. परंतु यांची मर्जी हे कीं, गुलामानें त्यासही चार दिवस पातशाहा केला होता, त्यास आणिक दुसऱ्या शहाजाद्यास पातशाहा करावें ऐसा विचार मात्र आहे. पातशाहा अंध जाले, परंतु दुराशा सुटत नाहीं. आतां सर्व किल्ल्यांचा झाडा बेगमात व सलातिनासुद्धां घेतात. सेवेसीं श्रुत होय.

राजश्री पाटिलबावांनीं दिल्लीस एक कारकून व मुत्सद्दी पाठविला आहे कीं, पातशाहांचे हुजूरचा व सलातीन व बेगमात वगैरे शहाजादे यांजकडील सरंजाम काय, व जवाहिर वगैरे नगदी जे गुलामाकडे वगैरे लुटींत गेली असेल तें, शोध करून सर्वांची यादी करून आणावी. त्यास, कारकून तेथील किल्ल्याचा वगैरे महालांतील चौकशी करितात. त्याप्रमाणें यादी तयार होऊन येथें येणार. त्या यादीबमोजीब गुलामासीं जाबसाल होईल ऐसा प्रकार आहे. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं.

तैमूरशाहा यांणीं भावलपुराहून कूच करून दहा कोस मुलतान अलीकडे मुक्काम करून, तेथील सुभ्याचा बंदोबस्त केला. सुभेदार तेथील येऊन रुजू जाला. व मेजमानी शाहाची केली. शाहांनीं सर्फराजी करून तेथील सुभेदारास वस्त्रें खिलत दिल्हा. हल्लीं पुन्हां विलायतेस कूच करून जावें ऐसा विचार आहे. परंतु राजे बिजेसिंग यांजकडील वकील आहेत, त्यांणीं अर्ज केली कीं, अगोदर हिंदुस्थानाकडे कूच करावें. सर्व सरंजामाची तयारी केली आहे. त्यावरून शाहांनीं कारभारी यांसीं विचार करून, बिजेसिंगाकडील वगैरे वकिलास उत्तर दिल्हें कीं, "हिंदुस्थानची अवस्था आह्मांस सर्व कळली आहे. तेथें जाऊन व्यर्थ जेरवार व्हावें; वरकड अर्थ नाहीं." ऐसें साफ उत्तर दिल्हें. व वकिलास निरोपही होणार आहे. परंतु राजे बिजेसिंग व जैपूरकर यांणीं पुन्हां पत्रें पाठविलीं आहेत. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री जिवबा बक्षी व हिंमतबहादर गोसावी हे उभयतां हरिद्वारपावेतों जाऊन, तेथील बंदोबस्त करून, राणेखानभाईस सामील जाले. राणेखानभाई यांणीं हरिद्वार वगैरे दो लक्षांची जागा हिंमतबहादर यांचे सरंजामांत लावून द्यावी. त्यास सनदापत्रें येथें करून दिल्हीं. येथें राजश्री पाटीलबावांनीं मोतीगीर वगैरे महंत चार पांच हजार प्याद्यांनशीं आहेत, त्यांसीं करारमदार केला कीं, तीर्थांचें संरक्षण करावें, व गोसगढास जो सुभा राहील, त्याचे चाकरींत हजीर असावें. तिकडे शिखांचा वगैरे उपद्रव होऊं न पावे. याप्रमाणें महंतांनीं राजश्री पाटिलबावांसीं कबूल करून, तिकडील हरिद्वार वगैरे पावणे दोन लक्षांची जागा सरंजामांत लावून घेतली. सनदा दिधल्यात. व राणेखानभाईस लिहिलें आहे कीं, न पुसतां काम करतां हें ठीक नाहीं. तर जें करणें तें लिहून पाठवीत जाणें. येथून उत्तर जाईल त्याप्रमाणें करीत जावें. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.''

लेखांक ३५२.

श्री. दिसेंबर इ. स. १७८८.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—इस्माइलबेग यांस राजश्री पाटीलबावांनीं नजबकुलीखानाचा मुलूख रेवाडी वगैरे जागा दरोबस्त जायदाद करून दिल्ही. त्यावरून मशारनिल्हे दिल्लीहून रेवाडीचे रुखावर कूच करून, उडगांव ताख्तताराज केला; व दोन गांवांत दोन लक्षांचा सरंजाम नक्त मिळाला, तो फौजेस देऊन, तेथून कूच करून रेवाडीचे प्रांतांत जाऊन बंदोबस्त केला. हें वर्तमान नजबकुलीखानानें ऐकून, आपली फौज जमा करून व रावराजे माचेडीवाला याची फौज कुमकेस समागमें घेऊन, इस्माइलबेगाचे मुकाबल्यास आला. दोन दिवस गोळागोळीची लढाई जाहली. इस्माइलबेगाचा घोडा गोळी लागून पडला. व गुलमहमद व मोतीसिंग पलटणवाला ऐसे दोन तीन सरदार इस्माइलबेगाकडील गोळी लागून जखमी जाले. व नजबकुलीखानाकडील दहा पांच असाम्या चांगल्या ठार जाल्या. अखेर इस्माइलबेगानीं तोफखाना पुढें करून नजबकुलीवर हल्ला केला. उभयपक्षीं दोन चारशें लोक ठार जाहले. शेवटीं नजबकुलीखानानीं ताब लढाईची न आणितां, माघारें हटोन गढीचा आश्रा धरून आहे. इस्माइलबेगानीं चहूंकडून रसद बंद केली. साता शेरांची धारण नजबकुलीचे लष्करांत आहे. इस्माइलबेगानें फौजेचा जमाव केला आहे. परंतु

भक्षावयास नाहीं ह्मणून लाचार होऊन, राणेखानभाईस पत्रें पाठविलीं कीं, "दारू-गोळा व खर्चास नाहीं. त्यास लौकर खबर घ्यावी. तर नजबकुलीखानाचें पारपत्य करून, इकडील बंदोबस्त कायम करून, गुलामाचें पारपत्यास हाजीर होईन." याप्रमाणें राजश्री पाटिलबावांस व राणेखानभाईस पत्रें आलीं आहेत. त्यावरून भाईमजकुरानीं दोन हजार स्वार कुमकेस व पांच छकडे दारूगोळे व कांहीं खर्चास इस्माइलबेगाकडे रवाना केले. व येथूनही राजश्री पाटिलबावांनीं खातरजमेचें पत्र लिहिलें आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३५३.

श्री. दिसेंबर इ.स.१७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:– शाहा निजामुद्दी यांस पातशाहांजवळ कारभारास ठेवावें, ऐसा विचार राजश्री पाटीलबावांनीं केला आहे. परंतु मशारनिल्हेचें बोलणें हें कीं, तेथील संस्थानचे खर्चाचा बंदोबस्त करून दिधल्यास आमचें जाणें होईल. त्यास तीन लक्षांची जहागीर, मेरट वगैरे महाल संस्थानचे खर्चास लावून द्यावे व शाहाजीस पाठवावें, ऐसी सलाह राजश्री पाटीलबावांनीं ठैरावली आहे. राजश्री रवळोजी शिंदे व अहंमदअल्लीखां दिल्लीहून लष्करांत आले आहेत. त्यांसींही नित्य जाबसाल होतो. पुढें अंमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३५४.

श्री. इ. स. १७८८.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—गुलामानें आपले बुणगे व सरंजाम गोसगडाकडे दोन हजार रोहिले समागमें देऊन रवाना केले होते. त्यास, हें वर्तमान राजश्री रायाजी पाटील यांनीं ऐकोन, कांहीं फौज आपली व कांहीं गुजर जमा करून, गुलामाचे बुणगे लुटले. यावरून गुलामानें आपले फौजेंत तयारी करून, हिंडणनदीपावेतों लढाईचा मुकाबिला केला. दहा पांच माणसें उभयपक्षीं ठार जाहलीं, व दिल्ली-कडील सर्व घाट बंद करून आपले मोर्चे दिल्लीकडे कायम केले आहेत. इक-

डून कांहीं लोक पूर्वीं उतरले होते, ते तिकडील दबाव पाहून फिरून माघारे आले. श्रुत होय. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

पै॥ छ० २१ जमादिलावल. **लेखांक ३५५.**

तिस्सा समानीन इस्तें अजूरदार. **श्री.** दिसेंबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ. २३ माहे रविलाखर मुक्काम लष्कर नजीक मथुरा जाणून स्वानंद-लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं विनंतिपत्रें छ. २२ रविलावलचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, गोसगढ, साहारणपूर वगैरे रोहिल्यांचा मुलूक वसुली वीस पंचवीस लक्षांचा नवा सुटला आहे. राणेखानभाई यांनीं राजश्री रायाजी पाटील यांसी तिकडील जप्ती सांगून बंदोबस्त केला. व नवाब अल्लीबहादूर व राणेखानभाई फौजसुद्धां यमुना पायाब उतरून कुंजपुऱ्यास दाखल जाले. तेथील पठाण वगैरे सिखांकडील वकील हजीर जाले आहेत. कुंजपुऱ्यावाल्यानें येऊन उभयतांची भेट घेतली. त्यावरून रोहिल्यांकडील पांचसा असामी कुंजपुऱ्यांत होत्या, ते व तेथील पठाण-सुद्धां राणेखानभाई यांणीं कैद केले आहेत. व पट्याळाकडे शिखांवर शह दाखवून तिकडील मामला, भंगेलसिंग सीख राणेखानभाई बरोबर आहे त्याचे विद्यमानें, पन्नास हजार रुपये ठरण्यांत आले आहेत. त्या प्रांतीं सिखांचे मुलखांतले दोन चार गांव खराबींत आले. यास्तव लाहोराहून बुढामल ह्मणून सिख आहेत, त्यांणीं सतलज नदी उतरून याचे रुखावर येणार ऐसी वदंता आहे. रामरतन मोदी यांस राजश्री खळोजी शिंदे यांणीं येथील इशाऱ्याप्रमाणें मशारनिल्हेस धरून कैद केलें, व पांच असाम्या आणीकही कैद केली आहेत. त्यास एकदों रोजां सर्व येथें येतील. राजश्री पाटीलबावांनीं नवाब अल्लीबहादर व राणेखान-भाई यांस पै दरपैं पत्रें पाठविलीं आहेत कीं, तिकडील गुंता लौकर उरकोन येथें यावें. त्यावरून तिकडूनही नवाब अल्लीबहादर यांचीं पत्रें येतात कीं, येथील मामला करून व बंदोबस्त राखोन सत्वरच येतों. राजश्री पाटीलबावांचा इरादा हे कीं, नवाब अल्लीबहादर व राणेखानभाई येथें आल्यावर जैपुराकडील मुलकांत अथवा इस्माइलबेगावर पाठवावेंसें आहे. राणेखानभाई यांणीं बादलबेग व सलेमाबेग यांसी धरून कैद केलें. राजश्री पाटीलबावांनीं रामगढ व आगऱ्याचे किल्ल्यासहित सट चिट्या नवाब अल्लीबहादर यांचे नांवें करून पाठविल्या आहेत.

परंतु अद्यापि अंमल दखल जाला नाहीं. राजश्री आंबोजी इंगळे फौजसुद्धां हातरस वगैरे जाट अंतरवेदींत आहेत, त्यांसी खंडणी घेतात. राजश्री पाटीलबावांनीं रंजितसिंग जाट यासीं कांहीं पैक्याचा पैगाम केला, त्यावरून परस्परें चित्तशुद्धता नाहीं. जाट मजकूर यांणीं डिगेस जाऊन किल्ल्यांत जकिरा वगैरे पोख्त सरंजामाची तयारी केली आहे, व इस्माइलबेगाकडेही सूत्र लाविलें आहे. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रावरून व येकबारा पाठविल्या आहेत त्यावरून ध्यानारूढ होईल. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसीं पाठविले आहेत, ते स्वीकारून पत्रोत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० २१ जमादिलावल तिस्सा समानीन. हस्ते अजूरदार.

लेखांक ३५६.

श्री.

दिसेंबर इ. स. १७८८.

"श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ. २३ माहे रविलाखर मुक्काम लष्कर नजीक मथुरा जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं विनंतिपत्रें छ. २२ रविलावलचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालें असेलच. हल्लीं वर्तमान तर, गुलामकादर व नवाब नाजर वगैरे यांस राजश्री पाटीलबावांनीं पायांत बेड्या घालून कैदेंत ठेविले आहेत. नवाब अल्लीबहादर, व राणेखान भाई फौजासुद्धा यमुनापायाब उतरून कुंजपुऱ्यापावेतों सिखांचे प्रांतांत पावले. गुलाम कादर याचे कुटुंब लाहोरप्रांतीं निघोन गेले. शाहाअलम पातशाहा व अकबरशाहा वगैरे शाहजादे सुद्धां दिल्लीचे किल्ल्यांत आहेत. तैमूरशाहा यांणीं मुलतानचे सुभ्याचा बंदोबस्त करून भावलपुरास कूच केला. पुढें विलायतेस जावयाचा उद्योग आहे. राजश्री पाटीलबावा सांप्रत मुक्काम मजकुरींच आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे, त्यावरून श्रुत होईल. रविसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त सेवेसीं पाठविले आहेत. ते स्वीकारून उत्तरीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

लेखांक ३५७.

पै॥ छ ९ रविलाखर सन
तिस्सा पोष्य मास.

श्री.

१६ दिसेंबर इ. स. १७८८.

"सेवेसीं भिकाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना त॥ छ २० रविलावल मु॥ श्रीक्षेत्र मथुरा स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेषः–इकडील वर्तमान तर छ १७ रविलावलीं गुलामकादर याणें रात्रौ पळून जावें ऐसें केलें होतें. हें वर्तमान आपले कडील फौजेंत समजण्यांत आलें. त्याजवरून राजश्री अलीबहादुर बाबा व पाटिलबावांकडील फौजा तयार होऊन हल्ला करून शहर घेतलें. व तोफखाना वगैरे सरंजाम पाडाव केला. व कांहीं त्याजकडील मातबर माणूस धरिलें. शहरांतील गढी हवेलीदाखल लढत आहे. आंत चारपांचशें माणूस आहे. गुलामकादर याचें ठिकाण नाहीं. रोहिले बहुत मारिले गेले. त्यांत मारिला किंवा गढींत आहे, कीं पळाला, हें पुर्तें ठिकाण अद्याप लागलें नाहीं. याप्रमाणें बातनी आली. त्याप्रमाणें सेवेसीं विनंति लिहिली आहे. पुर्ती बातनी आल्यावर मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ३५८.

श्री.

१९ दिसेंबर इ. स. १७८८.

"साहेबांचे सेवेसीं राणेखानभाई विनंति विज्ञापना त॥ छ २० रविलावल रोज शुक्रवार प्रातःकाल चार घटका दिवस जाणून साहेबांचे कृपेंकरून सर्व वर्तमान यथास्थित असे विशेष. गुलामकादर येथून सात कोसांवरी एके गांवांत बसला होता. पळाल्याची बातनी आली. उपरांतीक फौज पाठीमागें पाठविली होती. राजश्री अलीबहादर याचीं पथकें गेलीं होतीं. त्यास एक जमीदारांनीं बातनी सांगितली कीं, गुलाम गांवांत आहे. ह्मणून अलीबहादर याचे लोकांस सांगितलें. तेव्हां जाऊन त्यांनीं धरून आणिला. साहेबांस कळावें ह्मणून लिहिलें असे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ३५९.

पै॥ छ १७ रविलाखर.

श्री.

१९ दिसेंबर इ. स. १७८८.

"सेवेसीं राघो अनंत गोखले व बच्चाजी नारायण फडके कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २० रविलावल मु॥ कसबें मेरट वर्तमान यथास्थित असे. विशेषः—गुलामकादर मेरटेंत होता. त्याचे पारिपत्यास महादजी शिंदे

याजकडील फौज येऊन मोर्चेबंदी केली होती. त्यास आपली फौज आल्यावर मोर्चे पुढें चालवून मारगिरी जबरी जाहाली. त्यामुळें हवलदिक होऊन छ १८ रविलावलीं सायंकाळीं पळोन गोसगडाकडे जावयास निघाला. तों विहिरींत घोडा पडोन, पायउतारा होऊन, मौजे जादीगांव पार मेरट येथें राहिला होता. त्याची बातमी गांवकरी यांणीं सांगतांच, काल सायंकाळीं दोन प्रहर रात्रीस पुरंधरे व पवार धारकर यांस पाठवून धरून आणिला. शाहाजादे मण्यारासिंग गुलामकादराकडील जमातदार याजजवळ होते. ते काल तिसरे प्रहरीं लढाई करून सोडवून आणिले. राजश्री भिकाजीपंत बाबा पाळंदे मथुरेस पाटीलबावांपासीं आहेत. फौजा गोसगडाकडे रवाना होणार आहेत. वरकड वर्तमान मागाहून सेवेसीं लिहूं. श्रुत होय हे विज्ञापना."

लेखांक ३६०.

पै॥ छ १० रविलाखर सन तिस्सा पौष ह॥ डाक.

श्री.

२० दिसेंबर इ. स. १७८८.

"आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी अव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल त॥ छ २१ माहे रविलावल मंदवार दोन प्रहर रात्रपावेतों मुक्काम लष्कर श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखन आज्ञा करावी. विशेषः—गुलामकादर मेरटेंत घेरला. राजश्री अलीबहादुरबाबा पोंहचल्यावर त्यास भेववीत आणिलें. छ १८ मिनहूस बुधवारीं हल्ला केल्याचें वर्तमान पेशजी लिहिलें, तें पत्र पावलें असल. आजचें वर्तमान आलें त्याची नक्कल करून घेऊन सेवेसीं पाठविली. मागाहून वर्तमान येईल तें लिहून पाठवीन. शामलीस धरला. पालखींत टाकून आणितात हें वर्तमान पारसी पत्र आलें. आपले फौजेंतून मागाहून लिहून येईल. आपणास वर्तमान कळावें ह्मणून हें पत्र सत्वर रवाना केलें. राजश्री पाटीलबावांचींही पत्रें येतील तें रवाना करून देतों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना."

लेखांक ३६१.

पै॥ छ १० रविलाखर

श्री.

२० दिसेंबर इ. स. १७८८.

"विनंति ऐसीजे.— सेवक विठ्ठल हरि व गंगाजी अव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल त॥ छ २१ माहे रविलावल रोज मंदवार दोनप्रहर रात्रपावेतों मु॥ लष्कर श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखन

आज्ञा करावी. विशेषः– आपण रवानगीपत्रें बऱ्हाणपुरचे मुक्कामींहून छ २५ सफरचीं पाठविलीं, तीं छ मजकुरीं मिनहूस प्रहर दिवसा पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर विदित जाहाला. कमाविसदाराचें नांवें शामराव विनायक वगैरे यांचे नांवें ताकीदपत्रें घेऊन मागाहून पाठवीन. याउपरी येथील गुलामकादर याजवर हल्ला छ १८ रोज बुधवारीं केल्याचें वर्तमानाचीं पत्रें पेशजीं पाठविलीं असेत. तें पावलीं असतील. हल्लीं तपशीलवार वर्तमानचीं पत्रें नांवनिसीचीं धरून आणिले याची यादी गुलामाची आली, त्याची नक्कल करून पाठविली. त्याजवरून ध्यानास येईल. आजच दोन घटका दिवस राहतां राजश्री आबाजी रघुनाथ चिटणीस दाखल होऊन राजश्री पाटिलबावांचे भेटीस आले. व रामचंद्र भाऊ बक्षी हेही आले. आजही बावांनीं खुशीच्या तोफा सोडोन लोकांनीं नजरा केल्या. नंतर आंतील दिवाणखान्यांत जाऊन बसले. आह्मांसही नेलें. आपाजीरावही होते. इतक्यामध्यें राजश्री सदाशिवपंत आस्वलकर व भिकाजीपंत पाळंदे हेही आले. धरून आणिलेल्यांच्या यादीची नक्कल त्यांसही लिहून दिल्ही. व आपाजीराव यांसही लिहून दिल्ही. बाबा ह्मणालेत, "आतां इकडे निरवेध जाहला. आतां याचा बंदोबस्त राखणें तो सरकारांत लिहून, राजश्री अलिबहादूर बाबा याचा बंदोबस्त करून द्यावा. आमचें राहणें होणार नाहीं. लोकही आतां गवगवा करतील. आमचे भाऊ सुभेदार त्यांसही पत्रें पाठवितों आणि सरकारांत लिहितों. व तुह्मींही याअन्वयें पत्रें निक्षून लिहावीं." त्याजवरून विनंतिपत्र लिहिलें असे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना."

लेखांक ३६२.

पै॥ छ १० रविलाखर सन तिस्सा पौष ह्य॥ डाक.

श्री.

२० दिसेंबर १७८८.

"सेवेसीं भिकाजी नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ २१ रविलावल मु॥ श्रीक्षेत्र मथुरा स्वामींचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असो. इकडील वर्तमान तरी छ १९ रविलावल गुरुवारीं मेरटहून पत्र आलें जे, गुलामकादर छ १७ रविलावलीं मुक्काम मजकुरीहून अडीचशें स्वारांनिसीं पळून जात होता. त्यास सरकारची फौज व राजश्री पाटीलबावा यांजकडील फौज पाठिलागास जाऊन गांठ घातली. तों तो सामलची गढी मेरटेहून तीस कोस होती तेथें जाऊन त्यास जिवंत धरिला. व वरकड फौज लुटून दरोबस्त पस्त केली. त्याजकडील बहुत माणूस मारिलें गेलें. पातशाहाजादे त्याणें धरून नेले होते

ते आणिले. व त्यांजकडील मातबर माणूस धरून आणिलें. त्यांची नांवनिसी वगैरेः— बितपशील.

१	गुलाम कादर खुद्द.	१७	पातशाहाजादे.
१	अहमदखान रोहिला.	१	हकीम बदुअल्लीखान दरोगा तोफाचा.
१	नसीबखान रोहिला.	१	सहामुदी बनबक्षी.
१	बिलासराय दिवाण.	४	कानगा मेरटचे असामी.
१	नाजर खोज्या पातशाही त्यास सामील जाला होता तो.	१	मण्यारसिंग पलटणवाला.
१	कुसलावाला.	१	खाजे याकुत.
१	सजनखान रोहिला.	३३	हत्ती.
१	अबदुलखान रोहिला.	८०	तोफा.
८		१३८	
		०	घोडीलूट आली त्याची याद आली नाहीं.
		१३८	

येणेंप्रमाणें पातशाहाजादे यांस सोडवून आणिलें. व तोफा हत्ती पाडाव दोनी फौजा मिळोन आणिल्या. व गुलामकादर वगैरे रोहिले यांस कैद करून आणिलें. वरकड झाडून रोहिले मारिले, लुटले गेले. सर्व श्रीमंतांचे प्रतापें शत्रूचें पारिपत्य होऊन महत्वयश प्राप्त जालें. आपले कडील लोकांनीं बहुत करून काम काज स्वामींचे मर्जीनुरूप नक्षानेंच केलें. राजश्री सदाशिवपंत दिवाणजी येथें आले. पाटिलबावांची भेट जाली. बोलणें चालणें जाहालें. उदईक कूच करून पुढें फौजेंत जाणार. मागाहून वर्तमान होईल तें सेवेसीं विनंति लिहून पाठवीन. सेवेसीं श्रुत होय हे विनंति.”

पै॥ छ १० रविलाखर सन तिस्सा पौष **लेखांक ३६३.**

ह॥ सदाशिव दिनकर यांनीं आणून दिल्हें. **श्री.** २१ दिसेंबर इ. स. १७८८.

“आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ २२ रबिलाबल रविवार दोन प्रहर दिवस यथास्थित जाणून लेखन आज्ञा करावी. विशेषः—काल गुलामकादराचें मजकुराचें पत्र यकबारावरून वर्तमान लिहिलें. भाईचें पत्र आलें नव्हतें. सांप्रत

राणेखानभाईचें पत्र आलें. त्याची नक्कल करून पाठविली आहे. राजश्री अलीबहादरबाबाकडील लोक, यशवंतराव नाईक निंबाळकर वगैरे, पाठिलाग करून गेले. यांणींच धरून आणिलें, ऐसें बोलतात. इस्मालबेगाकडील वर्तमान तरी, नजबकुली मागील प्रहर रात्र राहतां, कूच करून कनोडाकडे गेला. हें वर्तमान इस्मालबेगास कळतांच यांणींही तयारी करून, त्याचे मागें गेला. हें वर्तमान आलें. त्याजवरून सेवेसीं लिहिलें. मागाहून पक्कें वर्तमान येईल तें लिहून पाठवूं. रामगडचेंही ठाणें खाली होईल. राजश्री सदाशिवपंत आस्वलकर यांस उदईक निरोप देऊन पुढें पाठविणार आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति."

लेखांक ३६४.

पै॥ छ १३ रविलाखर. **श्री.** ता. २३ दिसेंबर इ. स. १७८८.

"आज्ञाधारक विठ्ठल हरी व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल त॥ छ २४ रविलावल मार्गशीर्ष वद्य एकादशी भौमवार तृतीय प्रहरपावेतों यथास्थित, मुक्काम श्रीमथुरा जाणोन लेखनआज्ञा करावी. विशेषः– गुलामकादर यांणीं पातशाहांसीं बहुत बेअदबी केली. सर्व नाश केला. त्याचे दिवस भरावयाचे होते, ते भरल्यानंतर त्या हरामखोरास फळ तैसेंच जाहालें. जितके हरामखोर, त्याजबरोबर साथ दिल्हा होता, त्यांत एकही न मेला. जीवंतच श्रीमंतांचे प्रतापेंकरून सर्व हातास आले. राजश्री अलीबहादरबाबा येथें आल्यानंतर त्यांची रवानगी सत्वरच शत्रूवर केली. आणि तेथें जें पथकें होतीं व कारभारी होते, त्यांस लिहून पाठविलें कीं, तुह्मीं रसद बंद करून त्यांस तंग करून ठेवावें. बाबा तेथें आलीयावर त्यांचे विचारें जें करणें तें करावें. राजश्री अलीबहादर बावांचे हातून शत्रूचें पारिपत्य व्हावें, हेंच बाबांचें अंतःकरणीं बहुत होतें. तेंच घडलें. यांचेच लोकांनीं धरून आणिला. त्याजवरून बावांनीं बहुत संतोष मानिला, व अलीबहादर बाबांस संतोषाचीं पत्रें पाठविलीं. हरामखोरास व त्याचे बरोबर जे धरले त्या सर्वांस येथें फळें भोगावयासी (पुढें फाटलें आहे)."

लेखांक ३६५.

पै॥ छ १५ रविलाखर सुम्मा तिस्सा समानीन मया व अलफ. सदाशिव दिनकर यांनीं आणून दिल्हा. **श्री.** २७ दिसेंबर इ. स. १७८८.

"आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २८ रविलावल मंदवार मु॥ लष्कर

श्रीमथुरा यथास्थित जाणून लेखनआज्ञा करावी. विशेषः–गुलामकादर व त्याची मंडळी धरून आणिली. त्यास येथें आणावयासी पत्रें पाठविलीं आहेत. येथें आल्यावरी शत्रूस पूसगवस करून पारिपत्य करतील. गोसगडाकडे फौजा धांवल्या. हें वर्तमान गुलामाचे आईस समजल्यावर, रांडापोर व गुलामाचा भाऊ आहे, त्यांस घेऊन कुंजपुऱ्याकडे जाऊं लागले. पुढें त्यास पत्र पाठविलें. त्यांणीं उत्तर लिहिलें कीं, "तुह्मी पातशाही हरामखोर आहां, इकडे न येणें." त्याजवरून बेटांत यमुनेच्या राहिले आहेत. हें वर्तमान यकबारेचें आलें. त्यावर भाईचें पत्र आलें कीं, गुलामाच्या चिठ्ठया त्याचे आईचे भावाचे नांवें घेऊन पाठविल्या कीं, तुह्मीं लष्करांत येणें. सर्व बंदोबस्त करून देतील. त्या चिठ्ठयांच्या नकला करून बावांकडे पाठविल्या. त्याचें उत्तर येथून गेलें कीं, तुह्मीं मेरटेंत राहाणें. फौजा अलीबहादरसुद्धां त्याचे शोधास जाऊन धरून आणावें. गोसगडास ठाणें आपलें बसलें. पुढें सहारनपुरासही फौजा जावयास लिहिलें आहे. राजश्री सदाशिवपंत आस्वलकर व गोविंदराव बारवकर व जाधव, येथून कूच करून यमुनापार उतरून गेले. मजल दरमजल राजश्री अलीबहादरबाबांकडे जातील. राजश्री पाटिलबावांसीं व सदाशिवपंतांसीं बोलणीं होऊन, त्यांस सरकारांत पत्र लिहावयासी सांगितलें. त्यांणीं पत्रें सेवेसीं लिहिलीं आहेत, त्यांजवरून श्रुत होईल. नजबकुली कानोडास गेला. त्याचे मागें इस्मालबेग लागला आहे. रामगडासही आपलें ठाणें बसलें. जालें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विज्ञापना."

लेखांक ३६६.

श्री. १ जानेवारी इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य दामोदर देवराव व गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ. ४ रविलाखर मुक्काम नजीक कालपी येथें स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेषः–आज्ञापत्र पाठविलें तें पावोन शिरसा वंदिलें. पत्रीं मजकूर बातनी पाठविली ती पावली. पुढें लिहीत जाणें ह्मणोन आज्ञा. त्यास इकडील वर्तमान तर, दिल्लीहून राणेखानभाई वगैरे फौजा पुढें जाऊन गुलामकादर याचे मागें पाठलाग केला. तो पुढें, हे मागें, झांबडाझांबड करून मेरटपावेतों गेले. गुलाम मेरटचे कोटाचा आश्रा करून आजपावेतों राहिला. मागाहून राजश्री अलीबहादर फौजसुद्धां दाखल जाले.

ते सामील जाल्यावर गुलाम पांचशें स्वारांनशीं रात्रीं पळोन, गोसगडचे मार्गें अली-बहादर व राणेखानभाईकडील पागा धांवोन, गोसगडनजीक सात आठ कोसांवर धरून आणिला. व मनीयारसिंग—त्याचा कारभारी व तेरा असामी रोहिले याप्रमाणें मेरटेंत राणेखानभाईनीं कैदेंत केलें. शाहजादे सत्रा असामी आणिले. वरकड लूट जिकडील तिकडे गेली. राजश्री पाटीलबावा मथुरेसच आहेत. पुढें बंदोबस्त होईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा कीजे हे विनंति."

लेखांक ३६७.

श्री. ६ जानेवारी इ. स. १७८९.

"आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ९ माहे रविलाखर ऊर्फ पौष शुद्ध एकादशी मुक्काम लष्कर श्रीमथुरा क्षेत्र यथास्थित जाणून लेखनआज्ञा करावी. विशेषः—गुलामकादर मेरटेंतून पळोन गेला. मागें फौजा लागल्या होत्या. त्यांनीं धरून आणिल्यावर, तेथें राजश्री अलीबहादरबाबा यांचें लष्करांत ठेवून, यांणीं द्रव्यार्थ गुलामास पुसला. तेव्हां त्यांणीं सर्व खर्चच सांगितला. आणि त्याजवळ ह्मणाला कीं, "मला सोडल्यास कोठें कांहीं द्रव्य वांचलें असेल तें देतों." हें सर्व वर्तमान राजश्री पाटिलबावांस लिहिलें होतें. त्याजवरून येथून पत्रें गेलीं कीं, गुलामास धरून आणिलें, त्यास जे बंदवे आले असतील त्यांसुद्धां बंदोबस्तीनें इकडे पोंहचवून देणें; आणि तुह्मीं पैलीकडे गुलामाची आई गेली आहे, तिचा शोध करून हस्तगत होईल तें करावें. व गोसगड साहरनपुर सुद्धां ठाण्याचा बंदोबस्त करावा. ऐसीं पत्रें जात गेलीं. त्यांचीं उत्तरें राजश्री अलीबहादरबाबा यांचीं येत गेलीं कीं, गुलामास बंदोबस्त करून पाठविला आहे. हा पांच रुपये बोलतही आहे. तरी सांप्रत याची बेआब न करितां, रुपये साधून मग जें कर्तव्य तें करावें. गुलामाची आई पुढें गेली. तिला शीख आडवे येऊन, कुंजपुऱ्याअलीकडे बेहडांत होती, तिला घेऊन गेले. दोन छकडे मालाचे बरोबर होते, ते यमुनेंत बुडाले. गोसगड सहारनपुर येथें ठाणीं बसविलीं. पुढें शिखांचा जमाव भारी, तीस चाळीस हजारपावेतों आहे. पुढें एखादा शहास गुंतल्यावर मसलत लांबेल. त्यास नजबकुली, रांगडे राजे आहेत. पुढें काय करावयाचें याचा विचार करून, लिहून पाठवावें. तदनुरूप वर्तणूक होईल. याअन्वयें पत्रें आलीं. येथील मजकूर तरी, गुलाम येथें आला. त्याजबरोबर बंदवे पाठविले. त्यांची यादी व सविस्तर पेशजीं पत्रीं विनविलें होतें. यापैकीं गुलाम मजकूर व बिलासराय दिवाण व हकीम बुअल्ली व

नाजर खोज्या या चार आसाम्या आहेत. वरकड ताबेदार आहेत. यांस वाड्यांत आणून भय प्रीत दाखविली, आणि पूसतपास केली. परंतु कांहीं विशेष दिसत नाहीं. नंतर येथें राजश्री भिकाजी नारायण पाळंदे राहिले आहेत, त्यांस बोलावून आणून, वाड्यांत मग राजश्री आप्पाजीराव दाभोळकर यांस बोलाविलें. आम्ही उभयतां त्यांची मंडळी बसोन, राजश्री भिकाजीपंतास किल्ले संस्थानाचे खर्चाचे नेमणुकीच्या यादी समजाऊन देऊन, राजश्री अलीबहादरबाबाकडे रवाना करावें. त्याजवरून कल्पना निघाली कीं, यास दिवसगत लागतील. त्याजवरून राजश्री बावांसच पत्रें येण्याविषयीं गेलीं. चार पांचसें स्वारांनसीं सडे यावें. तिकडील बंदोबस्त राखून यावें. येथें आलियावर जो विचार ठैरल्यांत येईल, तो मागाहून लिहून पाठवीन. दुसरे तपोनिधि मोतीगीर गोसावी याची जमात पूर्वीं इंग्रजांचे लढाईबाबद ठेवून घेतले होते. तो गोसावी जमातसुद्धां फिरोन बावांकडे आला. त्यास यांणीं ठेऊन घेऊन, गुलामाचे मुलकाचे सिऱ्यावर हरिद्वारचा नाका आहे, तेथें जायजाद नेमून देऊन हरिद्वारचा बंदोबस्त सांगितला. ऐलीकडे कमाविसदार राहातील त्यांचा उपराळा करावा. याप्रमाणें ठरून गोसावी याची रवानगी केली. इस्माइलबेगाकडील वर्तमान तरी, नजबकुली पळोन कानोडा अलीकडे गडदापरी सात कोस आहे तेथें राहिला. त्याजकडील पलटणचे लोकांनीं तलबेकरितां दंगा बहुत केला. आणि लोकांनीं कंपूचे सरदारांची बेआब केली. किल्ल्यासभोंवते घेरून बसले आहेत. इस्माइलबेग कोसलीगांव तेथें मुक्काम आहे. दहा कोसांचा मुकाबला आहे. पुढें होईल तें सेवेसीं लिहिलें जाईल. जालें वर्तमान सेवेसीं लिहिलें. श्रुत होय बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति.''

लेखांक ३६८.

पै॥ छ १४ जमादिलावल.
तिस्सा समानीन सदाशिव
दिनकर यांणीं आणून दिल्हा.

श्री.

२४ जानेवारी इ. स. १७८९.

''आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २७ माहे रविलाखर श्रीमथुराक्षेत्र यथास्थित जाणून लेखनआज्ञा करावी. विशेषः— येथील वर्तमान तरी, आपल्या फौजा, गुलामाची आई व रांडापोर पळोन शिखाचे मुलकांत गेले होते. तो कांहीं मुद्दा कुंजपुऱ्यावाला याच्या अंगीं लावून त्यास कैद केलें. हें वर्तमान पेशजीं पत्रीं विज्ञापिलें होतें. सांप्रत फौजा तेथेंच आहेत. गुलामाची आई आंबाल्यास शिखांचे पाठीशीं बसली आहे. तिकडे शिखांनींही जमाव फौजांचा केला. हें वर्तमान राजश्री

अलीबहादरबावा व राणेखानभाई यांणीं लिहिलें आहे. त्याजवरून येथून पत्रें त्यांजकडे रवाना जाली कीं, सांप्रत पुढें जावयाचें प्रयोजन नाहीं. दिल्लीचें वर्तमान, तेथें यांणीं येथून कारकून पाठविला होता. कोणा कोणाचें काय गेलें तें लिहून द्यावें. गुलाम येथें आणिला आहे. याची तहकीकात करून हातीं लागल्यास ज्याचें त्यास देवऊं. त्याजवरून तेथें पातशाहांनीं यादी करून दिल्ह्या. त्या यादी कारकून येथें घेऊन आला. यादीवर बहुतच लिहिलें आहे. याची रुजवात करतील तें मागाहून लिहून पाठवूं. याजवर पातशाहांनीं यांस लिहून पाठविलें होतें कीं, "रामरतन मोदी हाही खुळांत होता. याजकडे तिसा वर्षांचा कारभार आहे." त्यावरून येथून राजश्री रवळोजी शिंदे यांस लिहिलें कीं, रामरतन मोदी यास हस्तगत करून इकडे मजबुतीनें पाठवून द्यावा. त्यांणीं हस्तगत करून येथें पाठविला. तो दोन रोज जाले कीं येथें आला. कैदेंत ठेविला आहे. याचा पांच रुपयांचा भ्रमही आहे. पुढें त्यास पुरसीस करणार. याची रांडापोर वगैरे माल-मालियत यांणीं अगोदरच लखनऊस पाठविली. व सीतलदासही कारभारांत होता. तोही लखनऊस जाऊन राहिला आहे. पांच रुपयांची वसीयत त्याजपासीं आहे. याजवरून येथून राजश्री पाटीलबावांनीं पत्रें इंग्रजांस वजीराकडे पाठविलीं आहेत कीं, या उभयतांचीं मूलमाणसें चीजवस्त कोठें जाऊं न पावे; व सीतलदासास हस्तगत करून इकडे बंदोबस्तानें पाठवून द्यावें. त्याचें काय उत्तर येईल तें मागाहून लिहून पाठवीन. राजश्री अलीबहादर बाबाकडे किल्ले रामगड व आगरें यांच्या सोडचिठ्या दिल्ह्या, त्या त्याजकडे येथून रवाना केल्या. व खर्चाविसीं त्यांनीं लिहिलें होतें, त्याजवरून येथें तजवीज नेमली होती कीं, गुलामांचा मुलूख सुटला; गोसगड सहारनपूर तेथें रबीचा ऐवज येईल, तो तालुका त्याजकडे द्यावयाचें ठराविलें होतें. परंतु सरकारचीं पत्रें यांस आलीं. त्यांचा मजकूर समजल्यावर दोन दिवस स्तिमित राहिले. गोसगड सहारनपुरच्या चिठ्या दिल्ह्या नाहींत. बाबांकडे पत्र पाठविलें आहे कीं, तुह्मीं सडे दोनचारसें स्वारांनशीं लवकर यावें. तेही पत्रावरून लवकरच येतील. येथें आल्यानंतर जें यांचे विचारें ठरेल, तें लिहून पाठवीन. इस्माइलबेगाकडील वर्तमान तरी, नजबकुलीचे मुकाबिल्यावर आहे. त्याचे मुलकाचीं ठाणीं घेत आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री होळकरांचे लष्करांतून बातमीचें पत्र आलें. त्यांत मजकूर लिहिला कीं, उदेपुरचे राजाकडील पैका कबूल केला, तो न आला. सबब फिरून जालमसिंग कोटेकर याची जमीयत काढली होती, ती फिरोन उदेपुरास ठेवावी. व सरकारचे हुजरे-ही आलेत. पत्रें लिहिलींत कीं, तुह्मीं लवकर राजश्री पाटीलबावांकडे जाणें व

सुभेदाराचे वकिलाचींही पत्रें पुण्याहून याच अन्वयें येतात. ह्मणोन बातमी आली. जालें वर्तमान सेवेसीं लिहिलें. श्रुत होय. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति.''

पैवस्ती छ १० जमादिलाखर सन तिसा.

लेखांक ३६९.

श्री.

१७ फेब्रुवारी इ. स. १७८९.

''श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ. २१ माहे जमादिलावल मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः— स्वामींनीं कृपापत्र छ० १७ रविलावलचें पाठविलें, तें छ० २७ रविलाखरीं पावून सनाथ जालों पेशजीं विनंतिपत्रें छ २४ रविलाखरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, नवाब अलीबहादर छ० १७ माहे मजकुरीं येथें दाखल जाले. राजश्री पाटिलबावांच्या भेटी जाल्या. इस्मायलबेग व नजबकुलीखान यांचा मुकाबिला लागला आहे. जयपुरकर राजे प्रतापसिंग यांणीं कांहीं फौज जमा करून, रावराजे प्रतापसिंग माचेडीवाला यांचे मुलकांत पाठविलें आहे. जोतपूरकर राजे यांचे वकील, शाहापासीं जाऊन जाबसाल करितात कीं, आमची कुमक करावी. परंतु अद्यापि कांहीं ठरलें नाहीं. बिरसकूट साहेब फिरंगी, फरुकाबादेहून दिल्ली आग्र्याची सैर करावयास या प्रांतीं आले आहेत. राजश्री पाटिलबावांची भेट जाली. पातशाहा अंध दिल्लीचे किल्ल्यांत राहातात. राजश्री पाटिलबावा सांप्रत मुक्काम मजकुरींच आहेत. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त राजश्री नानांचे पत्रीं लिहिलें आहे, त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

पैवस्ती छ १० जमादिलाखर सन तिसा समानीन फाल्गुन मास.

लेखांक ३७०.

श्री.

१७ फेब्रुवारी इ. स. १७८९.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पो॥ गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागाईत छ ० २१ माहे जमादिलावल मुक्काम लष्कर नजिक श्रीमथुरा जाणून

स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः– बहुतां दिवशीं स्वामींनीं कृपापत्र छ ० १७ रविलावलचें पाठविलें, तें छ ० २७ रविलाखरीं पावून सनाथ जालों. पेशजीं छ ० २४ रविलावलचीं विनंतिपत्रें सरकारांत सेवेसीं पाठविलीं आहेत, तें पावून सविस्तर वृत्त श्रुत जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, नवाब अली-बहादर मुक्काममजकुरीं दाखल जाले. राजश्री पाटिलबावांच्या परस्परें भेटी जाल्या. राजश्री पाटीलबावांनीं येथें बोलाविलें, त्याचें कारण हें कीं, जर नवाब मजकुरांनीं सर्व मुलूख व सलतनत किल्ले वगैरे जागा यांचा बंदोबस्त राखिला, तरी त्यांचे स्वाधीन करून, आपण उज्जनीस जावें. कदाचित् हे गोष्ट न घडल्यास, त्यांचे खर्चापुरता मुलूख मेरट वगैरे अंतरवेदचा लावून द्यावा; व आपण फौजेचा फडशा करून, कार्याकारण फौज दाहा पंधरा हजार ठेवून, राहावयाचे मसलत पडल्यास, मसलतसंबंधीं खर्च पडेल त्याचा जाबसाल नवाबांनीं हमी भरल्यास पक्का करून घ्यावा व त्याचा जिमा ठेऊन पूर्ववत्प्रमाणें आपला बंदोबस्त कायम ठेवावा. व राजश्री आबा चिटणीस यांस दिवाणीचा कारभार सांगोन प्रांताचा बंदोबस्त करावा. आणि राजश्री सदाशिव मल्हार यांस बक्षीगिरीचें काम सांगून फौजेची तोड त्यांचे हातें व्हावी. ह्मणून एक महिन्या-पासोन नित्य खलबत आहे. धारराव शिंदे व हैबतराव फाळके यांणीं दोन दिवस धरणें बसून, चौतिसा महिन्यांची तलब होती त्याचा फडशा निमेवर ठरला; आणि आदा पडला असेल तो यांत घ्यावा, शाईशिरस्ता वजा होऊन फडशा करून द्यावा, याप्रमाणें तोड ठरण्यांत आली. त्याचा वायदा पंधरा रोजांचा जाहला आहे. व राजश्री खंडेराव हरि यांचें बोलणें बापूजी नाईक यांचे विद्यमानें राजश्री पाटिलबावांसीं आहे कीं, कछवाघार, भदावर, ग्वालेर वगैरे सर्व मुलूख इजारी-यानें दिधल्यास कबूल करूं. परंतु मागील हिशेबाबद्दल वीस लक्ष रुपये फाजील आहेत, त्यांची वाट करून द्यावी. कछवाघार वगैरे पंचविसां लक्षांचा मुलूख आहे. राजश्री पाटिलबावांचें बोलणें हें कीं, निमे ऐवज नख्त तूर्त द्यावा, व बाकी शिबंदी वगैरेच्या वराता करूं, त्याची खातरी करावी. याप्रमाणें बोलणें आहे. व राजश्री लालाजी बल्लाळ यांजकडून कोट्याचे मामलतीसंबंधीं पांच लक्षपावेतों निमे नख्त, निमे वराता येणेंप्रमाणें बंदोबस्त करून, शिबंदीचा फडशा करावा ऐसा विचार आहे. इंग्रेजांचा पाय या प्रांतीं फार शिरला आहे. तमाशा, सैर करण्याचे बहाण्यानें येऊन येथील नक्षे लिहून घेतले. पहिले नजबखानाचे वेळेस इंग्रजांनीं या प्रांतीं यावयाचा बहुत प्रयत्न केला होता. परंतु नवाब मशारनिल्हेंनीं

इकडे प्रवेश होऊं न दिल्हा. नवाब अलीबहादर यांसीं व राजश्री पाटिलबावांसीं दोन दिवस खलबत आहे. परस्परें बोलणें लागलें आहे. अद्यापि कांहीं ठरण्यांत आलें नाहीं. नानुमल पटयालेवाला पांच लक्ष रुपये मामला देतो, ह्मणून वदंता आहे. सेवेसीं श्रुत होय.

वरकड सविस्तर वृत्त पुरवणीपत्रांवरून व यकबारांवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.

सेवेसीं विनंति सेवक गंगाधर शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसाजे. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार धनी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.''

लेखांक ३७१.

श्री.

''पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे— इस्मायलबेग यांनीं गोकुळगडाचा बंदोबस्त करून नारनोळ वगैरे जागा हस्तगत केली व दोनचार गांव घेरून खंडणी घेतली. पुढें कोटपुतळीकडे जाऊन तेथील बंदोबस्त करावा. तेथील बंदोबस्त केल्यावर कांनोडचे किल्ल्यासी मोरचे कायम करावे, ऐसा विचार आहे. राजश्री पाटिलबावांपासीं वकील पाठविला कीं, मी आपल्या शिवाय दुसऱ्याची गरज ठेवीत नाहीं. आपण कांहीं कल्प चित्तांत न आणावें. याप्रमाणें अर्जी पाठविली आहे. त्यास खर्चाची आबाळ बहुत. फौज बेदिल. यास्तव ऐशांत कांहीं मदत खर्च व्हावा. व कृष्णगड घ्यावयाचा करार मदार आहे, त्याप्रमाणें देविला पाहिजे कीं, कुटुंबास तेथें ठेवून नजबकुलीचे पारिपत्य करावयास मुस्तेद होईन. याप्रमाणें मशारनिल्हेचे अर्जींत मजकूर. त्यावरून राजश्री पाटिलबावांनीं खातरजमेचीं पत्रें लिहून पाठविलीं आहेत कीं, कांहीं चिंता न करणें. खर्चाची बेगमी जालियावर तुह्मांसही पाठविलें जाईल. परंतु आणीक कोणाकडे सूत्र न लावणें. त्यास इस्मायलबेगाचें सूत्र बिजेसिंग व जैपूरकर यांसीं अंतस्थ आहे. व उभयतां सरदारांचे वकील आहेत त्यांसीं बोलणें लागलेंच आहे. परंतु इकडून कृष्णगड हस्तगत व्हावा तोंपावेतों एकनिष्ठता दाखवून, काम जाल्यावर मग बुद्धीचें शाश्वत राहाणें कळलेंच आहे. महंमदबेग हमदानीची कन्या होती, तिसीं इस्मायलबेगांनीं लग्न केलें. सेवेसीं श्रुत होय. पुढें प्रत्यास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ३७२.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. गुलामकादर यास नवाब अलीबहादर यांचे लोकांनीं जाऊन धरून आणिला. व राणेखानभाईनीं पिच्छा न केला. सबब यांची मर्जी आठ दहा दिवस बेजार होती. त्याजवरून नवाब अलीबहादर यांणीं गुलामास व नाजर वगैरे सर्व मंडळी, हैबतराव फाळके यांस दोन हजार स्वारांनशीं बरोबर देऊन, राजश्री पाटीलबावांपासीं मथुरेस पावते केलें. दुसऱ्या रोजीं राजश्री पाटिलबावांनीं गुलामास व नाजरास वगैरे सर्वांस डेऱ्यास बोलावून अनेका प्रकारें दहशत दाखविली. तेव्हां गुलाम भयभीत होऊन राजश्री आंबोजी इंगळे वगैरे यांसीं बोलणें लाविलें कीं, जे वस्तवाणी व जवाहीर वगैरे सरंजाम होता, तो सर्व गोसगढास आईकडे पाठवून दिल्हा. त्यास माझी इज्जत ठेवाल, तर जें राहिलें असेल तें हजीर करून देतों. त्यावरून राजश्री पाटिलबावांनीं गुलामाकडून यादी करून घेतल्या आहेत. नाजरास व बिलासराय व मनीहारासिंग यास जेरबंदाचा मार दिल्हा. त्यास नाजरानें राजश्री बाळाजीपंत मिर्जा यांसीं बोलणें लाविलें आहे. यास्तव तैसेंच बेड्या सर्वांचे पायांत घालोन कैदेंत ठेविले आहेत. परंतु अद्यापि कांहीं ठरण्यांत आलें नाहीं. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३७३.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८९.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, रामरतन मोदी वगैरे धरले आले आहेत. त्यांचा जाबसाल अद्यापि कांहीं ठैरण्यांत आला नाहीं. राजश्री पाटिलबावा दोन लक्ष रुपये मागतात; परंतु सांप्रत जाबसाल करारांत आला नाहीं. मोदी मजकुराची कांहीं वस्तवाणी मथुरेंत चिमनलाल साहुकार याचे घरीं रोहिल्याचे दुंडींत ठेविली होती. त्याचा शोध राजश्री पाटिलबावांनीं लावून जप्त केली. कापड वगैरे सरंजाम निघाला, व दिल्लींतही चहूंकडे तलाशांत आहेत. एका दो ठिकाणीं मशारनिल्हेचा सरंजाम ठेविला होता, तोही राजश्री खंडोजी शिंदे यांनीं शोध करून जप्त केला. काय जिन्नस सांपडला, हें कांहीं प्रत्यास आलें नाहीं. निदर्श-

नास येईल ते विनंति लिहूं. रामरतन मोदीबद्दल आसामी धरल्या आल्यांत त्यांचा तपशीलः—

१ चिमनलाल दिल्लीकर	१ जिवालाल
१ जुगलराम	१ लछमनसिंग
१ धोकलसिंग	१ गुलबेग
१ इंदामल	३
४	

एकूण सात आसाम्या कैद आहेत. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३७४.

श्री. फेब्रुवारी इ. स. १७८९.

"पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसींः—

विनंति ऐसीजेः—राजे बिजेसिंग यांणीं मलक महंमदबेग यांसी जैपुरकर राजे यांजकडे पाठविलें कीं, गुलामकादर जिवंत धरून घेतला. आतां तुह्मीं सावध राहावें. व आपली फौज जमा करून बंदोबस्त मुलकांत ठेवावा. राजश्री पाटीलबावा स्वस्त जाले आहेत. कदाचित् तुह्मांकडे स्वारी होईल, यास्तव खबरदारीनें असावें. त्यास जैपुरकर राजे प्रतापसिंग यांणीं मलक महंमद-बेगास वस्त्रें वगैरे बहुमान केला, व दहा बारा हजार फौज जमा केली. व पुढें सर्वांस पत्रें गेलीं कीं, लौकर शामील व्हावें हें उत्तम आहे. इस्माइलबेगाकडे वकिलास पाठविला आहे कीं, राजश्री पाटीलबावांनीं गुलामकादराची काय गत्य केली, हें प्रत्यक्ष पाहतां. पुनः तेथील उमेदीवर आहांत. तरी आतांही आह्मांकडे उठोन यावें. ह्मणजे मुलूख सरंजामांत लाऊन देतों व खर्चास नगदी एक लक्ष रुपये देऊं. याप्रमाणें बंदोबस्त केला जाईल. परंतु जैपुरकराकडे पैकाची ओढ बहुत आहे. सर्व शहरचे लोकांसीं डाळ घेऊन निर्वाह होतो. इस्माइलबेगांनीं वकिलास लावून ठेविला आहे. पुढें अमलांत येईल ते विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३७५.

श्री. फेब्रुवारी. इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे, गोसगड वगैरे नवा प्रांत सुटला आहे. त्याची जप्ती सांप्रत राणेखानभाईकडे आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

गुलामाचा माल आसबाब कांहीं मेरटचे शहरांत पुरला आहे, ह्मणून राजश्री पाटिलबावांनीं एक कारकून तिकडेही मेरटेस पाठविला आहे. त्यास तेथील शहरची जागा खणून पाहातात. कांहींक वस्तवाणीही निघाली ह्मणून वदंता आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

नवाब असफद्दौले मकराझीलचे शिकारीस गेले होते. हल्लीं गुलामाचें धरल्याचें वृत्त श्रवण करून आतां लखनऊस आले आहेत. व जवांबख्त शाहाजाद्याचे पुत्र आहेत, त्यांचे खर्चास बावीस हजार रुपये नख्त पाठविले. आणि कलकत्त्यास इंग्रेजांस पत्रें पाठविलीं आहेत. तेथून उत्तर आल्यावर प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री पाटिलबावांनीं राजश्री सुभेदार यांस पत्रें लिहिलीं आहेत कीं, गुलामास जिवंत धरून आणिला. आतां मातोश्री त्याची पळून गेली आहे. त्यास तिचेंही पारपत्य करणेंच आहे. आतांही इकडे आलें पाहिजे. याप्रमाणें पत्रें पाठविलीं आहेत. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

नवाब अलीबहादर यांचा इरादा आहे कीं, जर नानुमल अगोदर येऊन सामील जाला, तरी त्यास बरोबर घेऊन, आणिक शिखांचें पारपत्य करून, सतलज नदीपावेतों आपला बंदोबस्त कायम करावा. कदाचित् नानुमल सामील न जाला, तरी आणीक शिखांसीं सूत्र लाऊन, पटयाला वगैरे जागा हस्तगत करावी ऐसा विचार आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

गुलामास जिवंत धरून आणिल्याचें वर्तमान रामगडचे किल्लेदारानें ऐकोन दुसऱ्या दिवशीं किल्ला खाली करून दिल्हा. राजश्री रायाजी पाटील यांचा बंदोबस्त किल्ल्यांत आहे. सेवेसीं श्रुत होय. राजश्री पाटिलबावांचा विचार आहे कीं, रामगड व आगऱ्याचा किल्ला नवाब अलीबहादर यांचे स्वाधीन करावा. व जुजबी प्रांतही वहिवाव्यांपैकीं लावून द्यावा. ऐसा विचार आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

राजश्री सुभेदार अद्यापि मेवाडप्रांतींच तिकडील बंदोबस्तांत आहेत. इकडे यावयाची जलदी कांहीं दिसत नाहीं. जैपूरवाल्याकडील व जोधपूरवाल्याकडील

वकील येथें हजीर आहेत. परंतु आज तागाईत कांहीं जाबसाल नाहीं. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३७६.

श्री. फेब्रुआरी इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

"विनंति ऐसीजे. बिकानेरकर राजे सुरतसिंग यांसीं व राजे बिजेसिंगांसीं आपसांत विरुद्धता आहे. ह्मणून बिकानेरवाल्यांनीं वकील राजश्री पाटीलबावांपासीं पाठविलें कीं, आमची मदत करावी. त्यावरून यांणींही आपल्याकडून कारकून त्यांजकडे पाठविले आहे. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

गुलामाची आई व कुटुंब पटयाल्याकडे शिखांचे मुलखांत होते. त्यांस इकडील फौजेची आमदनी ऐकोन, शिखांस कांहीं पैका अंतस्थ देऊन, लाहोराकडे निघोन गेले. ह्मणोन राणेरखानभाई यांणीं तिकडे शिखांसीं दावा केला आहे. परंतु तिकडे शिखांचा जमाव भारी. लढाईस मजबूत आहेत. यास्तव तूर्त तिकडील खंडणी घेऊन माघारे येथें येणार आहेत. सेवेसीं श्रुत होय.

येथून राजश्री पाटिलबावांनीं गुलामाचे हातून पत्रें लिहोन, लाहोरास त्याच्या आईकडे कासदजोडी पाठविली आहे. तेथून उत्तर आल्यावर निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३७७.

श्री. फेब्रुआरी इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. गुलामाचा जाबसाल कांहींका दिवसापासोन सुस्त पडला आहे. राजश्री पाटिलबावांनीं दोन चार पत्रें याचे हातून मशारनिल्हेचे आईस व भावास लिहोन पाठविलीं. त्याचें उत्तर गुलामाचे आईनें लिहिलें कीं, "पातशाही सरंजाम कांहीं राहिला आहे, तो आपले स्वाधीन करितें. परंतु गुलाम तुमचा; पूर्वीपासून आपण संरक्षण करून प्रतिपाळ केलेले. हल्लीं त्याजकडून अपराध घडला, त्यास माफ करून आपल्या सेवेंत ठेऊन चाकरी ध्यावी मजपासीं सरंजाम असेल तो हजीर करीन." परंतु तात्पर्य हें कीं, अगोदर राजश्री पाटिलबावांपासोन गुलामाची बंदखलासी करून करारमदार ठरल्यावर

मग उमेदवारी ठेवावें. येथील मानस हें कीं, कांहीं पैका त्यांजकडून हस्तगत जाल्यावर मग जे तंबी करणें ते करावी. ऐसा विचार पडला आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं.

राजश्री पाटिलबावांनीं नवाब नाजरास बहुता प्रकारची दहशत दाखविली, परंतु अद्यापि प्रथम दिवस आहे. सेवेसीं श्रुत होय.

मनिहारसिंग व बिलासराय यांचें बोलणें बावीस हजार रुपये यावर मामलतीचा जाबसाल राजश्री बापूजी नाईक यांचे विद्यमानें लागलें आहे. परंतु ठरण्यांत आला नाहीं. पुढें प्रत्ययास येईल तें विनंति लिहूं.

दिल्लीची करोड व कोटापारचा व टांकसाळ व अंतरवेदांतील मेरट वगैरे गोसगडपावेतों सायर याचा इजारा, धीरजराम नामें यावर, राजश्री पाटीलबावांपासोन मक्ता करून घेतला. त्यापैकीं दोनशें रुपये रोजीना खर्चास पातशाहाकडे नेमून दिल्हा. व साठ हजार रुपये यांची वरात राजश्री खळोजी शिंदे यांचे मागील खर्चाबद्दल देविले. बाकीच्या चिठ्या किरकोळी जाल्यात. त्यावरून पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस लिहिलें कीं, "पूर्वीं तुह्मीं नेमणूक करून दिल्ही होती, त्याप्रमाणें चाले तें करावें. अथवा कुटुंबसुद्धां आह्मांस तेथें बोलवाल तरी येऊं. नाहीं तरी सर्वांस मक्क्यापावेतों पावतें करून द्यावें." याप्रमाणें एक दोन पत्रें आलीं होतीं. येथून खातरजमेचीं पत्रें जातात. पुढें आतां काय विचार ठरेल ते विनंति लिहूं.

रामरतन मोदी यावर पांच सात महिने अगोदर सितलदासासमागमें आपले कुटुंबास व जप्ती व सरंजाम सर्व लखनऊहून पाठवून दिल्हाच होता. आपण सडा मात्र राणेखानभाईचे ममतेंत शिरून राहिला होता. वीस पंचवीस वर्षें करोड मोदीगिरीचा वगैरे कारभार केला आहे. असामी मातबर, दो चौ लक्ष घ्यावयायोग्य आहे. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३७८.

पैवस्ती छ० २४ जमादिलाखर. **श्री.** ५ मार्च इ. स. १७८९.

"आज्ञाधारक विठ्ठल हरि व गंगाजी आव्हाड अनुक्रमें दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० ७ माहे जमादिलाखर मुक्काम लष्कर श्रीमथुराक्षेत्र यथास्थित जाणून लेखनआज्ञा करावी. विशेषः— इकडील मजकूर तरी, गुलामकादर याजला इतके दिवस ठेवून द्रव्यांश पाहिला. तो

कांहीं साधला नाहीं. नंतर फाल्गुन शुद्ध चतुर्थीस त्याचे पांच पाट काढून, उंटावर बसवून लष्करांत फिरविला. दुसरे दिवशीं नासिकहीन केलें. मागतीं फिरविला. तिसरे दिवशीं सर्व अंगहीन करून, डोळे काढून पातशाहाकडे पाठविलें. व त्यास बाहीर काढून मारून टाकिला. त्याजबरोबर नाजरखान खोजा व बिलासराय दिवाण वगैरे मंडळीस भय घातलें कीं, तुह्मांस जीवाची आशा असली तर खंड दंड करा. परंतु त्याचे होश जात राहिलेत. पुढें पाहावें. गुलामाचे दशेप्रमाणेंच करतील, ऐसें दिसतें. याजवर मोठामल,–गोहदच्या राजाचा कारभारी, पूर्वीं यांत मिळून त्याचे हातून राज्याचें पारिपत्य जालें,–तो आजपावेतों राजश्री पाटीलबावांचे कृपेंत होता. दरबारी दहा पांच माणसें बरोबर घेऊन येत होता. बावांचे जवळ बसावें, इकडील माहितगारी त्यास पुसावी, ऐसी योग्यता होती. त्यांणीं फितुराचीं पत्रें मारवाड्यांस पाठवीत होता. व मारेकरीही तयार केले होते. याचा शोध लागला. नंतर हे दोष त्याचे आंगीं लावून, दारूनें त्याचे हाताचीं बोटें जाळलीं. त्याचीं कुटुंबें ग्वालेरीस आहेत. पंचवीस पन्नास हजार लाख रुपयांपावेतों भ्रम आहे. तो घेऊन सुळीं चढवितील ऐसें बोलतात. आपल्या फौजा राणेखानभाई वगैरे कुरूक्षेत्रापुढें दहा वीस कोसावर आहेत. राजश्री अलीबहादर बाबा सडे पांचशें लोकांनसीं येथें आलेत. यांणीं पेशजीं विनंतिपत्रें सरकारांत इकडील मजकुराचीं वायद्याची जोडी पाठविली, त्याजवरून सविस्तर ध्यानास येईल. पैकाची वोढ बहुत आहे. लोक धरणीं पारणीं करीत असतात. पातशाहाचे पुत्र गुलामाजवळून आणिले, ते दिल्लींत दाखल जाले. नंतर एक पुत्र सिलेमान सिको तेथून निघोन गेला. तो कोणीकडे गेला याचे बातमीस पाठविलें. ठिकाणीं लागल्यावर लिहून पाठवीन. इस्मायलबेग नजबकुलीच्या मुलकांत आहे तैसाच आहे. होळकर जेथील तेथेंच आहेत. जालें आढळलें वर्तमान सेवेसीं लिहिलें. श्रुत होय बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञप्ति.”

लेखांक ३७९.

श्री. मार्च इ. स. १७८९.

“पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. राणेखानभाई व राजश्री सदाशिवपंत आस्वलकर फौजसुद्धां करनालच्या जिल्ह्यांत थानेश्वरच्या मुक्कामीं आहेत. शिखांकडील जाबसाल मामलतीचा रुबकर आहे. परंतु राणेखानभाईचें बोलणें हें कीं, गुलामाकडील माल

आसबाब तुह्मांपाशीं असल्यास हुजूर दाखल करावा. नाहीं तरी मुचलका लिहून द्यावा कीं, पुन्हां कोठें शोध लागल्यास, तुमचे जिमे शाबीत जाल्यास सरकारांत गुन्हेगारी द्यावी. त्यावरून शीख नित्य कजाकी करून, कही मारून नेतात. व बुढामल वगैरे शीख सर्व एक होऊन जमाव केला आहे. नानुमल याजकडून वकील राणेखानभाई यांजपाशीं येऊन मामल्याचा जाबसाल करितो. परंतु अद्यापि रुजू होत नाहीं. अमीनगड किल्ला कुंजपुऱ्याचे गीर्द होता. त्यास भाईंनीं मोर्चे लावून किल्ला फत्ते केला. हल्लीं सरकारचा बंदोबस्त आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८०.

श्री. ७ मार्च इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ५ जमादिलाखर जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:- पेशजीं विनंतिपत्रें सरकारांत व सेवेसीं चंद्र २१ जमादिलावलचीं पाठविलीं आहेत, तें पाऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, गुलाम कादर याचे डोळे नाक कान काहाडून, दिल्लीस पातशाहाकडे राजश्री पाटीलबावांनीं पाठवून दिलें व मशारनिल्हेचे बंद बंद वेगळे करून जीवें मारिला! नवाब नाजर याचेंही येणेंप्रमाणेंच पारिपत्य व्हावें, ऐसा विचार आहे. रामरतन मोदी कैदेंतच आहे. अद्यापि कांहीं जाबसाल ठेरला नाहीं. गुलामाची आई व बंधू सतलज नदी उतरून लाहोराकडे गेले. राणेखानभाई पटयाल्याहूनदहाबारा कोस अलीकडे शहाबादेस मुक्काम करून आहेत. नानूमल येऊन भेटला. तिकडील शिखांचा मामला कांहीं ठेरण्यांत आला नाहीं. नानूमलाचें बोलणें हिंमतबहादर गोसावी यांचें विद्यमानें लागलें आहे कीं, आमची कुमक करावी; ह्मणजे मामला फडशा करून देऊं. येथून राजश्री पाटीलबावांची ताकीद आहे कीं, पुढें जाऊन मसलत लांबेनम (?) याप्रमाणें आहे. मोटामल खत्री गोहदवाल्याकडील राजश्री पाटीलबावांपासीं होता. त्याणें जोतपुराकडे पत्रें पाठवून, सूत्र लाविलें होतें कीं मीं येथें दगा करितों. हें वृत्त पाटीलबावांनीं श्रवण करून मशारनिल्हेस कैद केलें व सख्ती फार आहे. त्याचेंही पारिपत्य गुलामाप्रमाणेंच करावें ऐसा विचार आहे. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे ही विनंति."

लेखांक ३८१.

श्री. ९ मार्च इ. स. १७८९.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० ११ माहे जमादिलावल मुक्काम श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—स्वामींनीं कृपापत्र छ० १० व २४ रविलाखरचें पाठविलें, तें छ ० ८ माहे मजकुरीं पावून सनाथ जालों. पेशजीं विनंतिपत्रें छ० २१ जमादिलावलचीं सरकारांत व सेवेसीं पाठविलीं आहेत. तें पावून सविस्तर वर्तमान ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, रामरतन मोदी याचे मामल्याचा जाबसाल लागला आहे. राजश्री पाटिलबावा पांच लक्ष रुपये तलब करितात. मशारनिल्हेचें बोलणें मोघम आहे कीं, लखनऊस कुटुंब वगैरे सरंजाम असेल, तो सर्व आपणापाशीं हाजीर करितों. पुढें मर्जीस येईल तैसें करावें. यावर अद्यापि कांहीं ठरण्यांत आला नाहीं. ....(फाटलें आहे) ....व राजश्री खंडेराव हरीकडे मामलतीसंबंधीं फाजील मशारनिल्हेचे दोन तीन लक्ष रुपये निघाले होते. ते सर्व राजश्री पाटिलबावांनीं जप्त केले. पुढें त्यांस जिवें मारावा ऐसा विचार आहे. राणेखानभाई यांसी नानुमल शीख (यानें) नवाब अलीबहादूर यांचे पत्रावरून येऊन भेट घेतली. खाजगत मामला चार लक्ष रुपये कबूल करितो. परंतु भाई मजकूर यांचें मानस साहा लक्ष पावेतों. वरकड शीख कजाकी करून लष्करचे गिर्द लुटून नेतात. सहारनपूर वगैरे गोसगड प्रांतीं एक कारकून नवाब मशारनिल्हेकडीलही तेथें राहिले आहेत. राजश्री सदाशिवपंत आसवलकर राणेखानभाईजवळ आहेत. रंजितसिंग जाट याजकडे मथुरा वृंदावन वगैरे पांच सात महाल आमानी होते. त्यास, मशारनिल्हेकडून पैका सरंजाम न होय, व नित्य लबाडी कारभार, यास्तव रंजितसिंग जाटाकडील सर्व महाल जप्त केले; व आपले कमाविसदारांसीं रसदा घेऊन बंदोबस्त केला. ह्मणून जाट मजकूरही बेदिल आहेत. राजश्री सुभेदार शहाबादेचे गिर्द गढ्यास मोर्चे लावून मामला घेतात. सांप्रत इकडे यावयाचा विचार नाहीं. राजश्री पाटिलबावा छावणीच्या तयारींत आहेत. सध्या खांसा स्वारी करावी, ऐसें मानस दिसत नाहीं. रावराजे प्रतापसिंग भागीरथीस्नानास गेले होते. तेही माघारे दो चौ दिवसांत येणार आहेत. मशारनिल्हे आल्यावर काय विचार ठरून अमलांत येईल तें विनंति लिहूं. वरकड सविस्तर वर्तमान

पुरवणी पत्रावरून व अकबारा पाठविल्या आहेत त्यावरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हें विनंति."

लेखांक ३८२.

श्री. ९ मार्च इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:-

विनंति ऐसीजे. रंजितसिंग जाटाकडे मथुरावृंदावन वगैरे जागा होती, ते सर्व राजश्री पाटिलबावांनीं सोडून घेऊन, आपले कमावीसदारांसीं रसदा घेऊन प्रांत लावून दिल्हा. जाटांसीं पैक्याची सरबराह न होय. यास्तव मुलूख यांणीं स्वाधीन करून दिल्हा. राजश्री गोपाळराव त्रिंबक आहिरवाड्याहून दरकूच लष्करांत दाखल जाले. राजश्री पाटिलबावा सामोरे गेले होते. इस्माईलबेग वगैरे यांचें वर्तमान बदस्तुर आहे. नवाब अलीबहादर उदयीक आग्र्याची जागा व किल्ला वगैरे फत्तेपूर पाहावयास जाणार आहेत. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८३.

श्री. ९ मार्च इ. स. १७८९.

"श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे सेवेसीं:—

विनंति सेवक गोविंदराव पुरुषोत्तम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ० ११ माहे जमादिलाखर मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणोन स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेषः—पेशजीं विनंतिपत्रें छ० २१ जमादिलावलीचीं सेवेसीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तरी, गुलामकादर यांस राजश्री पाटिलबावांनीं बंद अंध (?) वगैरे करून जीवें मारिलें. सिलेमासिको शाहाजादा दिल्लीचे किल्ल्यांतून निघोन, रेवाडीचे मार्गें जोतपूरकराकडील लोकांनीं बिजेसिंगाकडे घेऊन गेलेत. राणेखानभाई शहापुरचे मुक्कामींच आहेत. नवाब अलीबहादर आग्र्याचा किल्ला पाहावयाकरितां तेथें गेले आहेत. सेवेसीं श्रुत होय.

वरकड सविस्तर वर्तमान राजश्री नानांचे पत्रीं विनंति लिहिली आहे त्यावरून ध्यानारूढ होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

पैवस्ती छ० साबान सन तिसा समानीन वैशाख.

लेखांक ३८४.

श्री.

२७ मार्च इ. स. १७८९.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ० २९ माहे जमादिलाखर मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः— पेशजीं विनंतिपत्रें सरकारांत सेवेसीं छ० ११ तारखेचीं पाठविलीं आहेत. तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जाहालेंच असेल. हल्लीं वर्तमान तर, सिलेमासिको शाहाजादा दिल्लीचे किल्ल्यांतून निघून गंगापार फैजुलाखान रोहिल्याचे प्रांतांत पळून गेला. रोहिले मजकुरांनीं हें वर्तमान श्रवण करून, सामोरे येऊन आपले घरास घेऊन आला व बहुत सन्मान करून ठेविलें आहे. परंतु शाहाजाद्याचें मानस आहे कीं, वजिराकडे लखनऊस जावें. तेथें कांहीं सोय जालियास कालक्षेप तेथें करावा. नाहीं तरी कलकत्त्यास इंग्रेजांकडे जाऊन राहावें, ऐसा विचार आहे. राणेखानभाई व राजश्री सदाशिवपंत आसवलकर फौजसुद्धां कोट कछवा ह्मणून पटयाल्याचें गीर्द तेथें मुक्काम करून आहेत. नवाब अलीबहादर यांणीं आपली फौज येथें बोलाविली आहे. कारण हें कीं, तेथें खर्चाची वोढ; गवगवा होईल. यास्तव पत्रें पाठविलीं आहेत. राजश्री पाटिलबावांचीं पत्रें राणेखानभाईसही याप्रमाणेंच गेलीं आहेत. पालमर साहेब व बिरसकूट साहेब वगैरे फिरंगी यांणीं पातशाहांचा निरोप घेऊन येथें आले आहेत. दहा हजार रुपये नख्त व कांहीं सरंजाम पातशाहांस नजर केला, व बहुत खातरजमा केली आहे. राजश्री रवळोजी शिंदे यांणीं दरोबस्त महालांत व किल्ल्यांत देखील बायका महालांत ठेऊन तेथील बंदोबस्त आपला केला. पातशाहांनीं राजश्री पाटिलबावांस लिहिलें आहे कीं, तीनशें रुपये रोजांत गुजर होत नाहीं. परंतु येथून अद्यापि कांहीं नेमणूक अधिक नेमली नाहीं. यास्तव पातशाहा बहुत हैराण आहेत. नवाब वजीर बदस्तुर लखनऊस आहेत. राजश्री पाटिलबावांचें कुटुंब संवत्सर प्रतिपदेचे मुहूर्तें येथें दाखल होणार आहेत. राजश्री बाळाजी गोविंद बुंदेले महायात्रा करून काल्पीस आलेत. येथें सांप्रत छावणीची तयारी सर्वत्र होते. सेवेसीं श्रुत होय. वरकड वृत्त, पुरवणीपत्रांवरून व यखबरा पाठविल्या आहेत त्यांवरून श्रुत होईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८५.

श्री. मार्च इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः—बिलासराय व मनिहारसिंग यांस ग्वालेरचे किल्ल्यावर पाठविलें. व नाजरास सांप्रत येथें ठेविलें आहे. अद्यापि कांहीं फडशा जाला नाहीं. परंतु नाजराचें बोलणें आहे कीं, माझी ठेवी दोन तीन लाख रुपये सितलदासाकडे आहे. त्यास मशारनिल्हे रोहिल्याचे दंग्यांत पळोन लखनऊस गेला होता. त्यास हल्लीं नाजरावर जप्ती गुजरली. तेव्हां सांगितलें कीं, तो ऐवज सितलदासाजवळोन आणून घ्यावा. त्यावरून राजश्री पाटिलबावांनीं नवाब वजिरास व इंग्रेजांस येविसीं पत्रें पाठविलीं कीं, सितलदासाकडे नाजराची ठेवी अमानत आहे, ते घेऊन पाठवून द्यावी. त्यावरून नवाब वजीर व इंग्रेज बहुत बेदिल आहेत. सेवेसीं होय श्रुत होय. पुढें प्रत्यायास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८६.

श्री. इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः—धारराव शिंदे पूर्वीं पानिपताकडे गेले होते. त्यांचे शरीरीं समाधान नव्हतें. ह्मणोन व भंगेलसिंग शीख दोन हजारा स्वारांचा सरदार आहे, त्यास राजश्री अंबाजी इंगळे यांचे विद्यमानें, चौ लक्षा रुपयांचे परगणे पानिपताकडे सरंजाम लाऊन दिल्हा आहे. जो सरदार यांजकडून पाणिपताकडे जाईल, त्यानें भंगेलसिंगाचे विचारें चालावें ह्मणोन येथील आज्ञा. त्यास धारराव शिंदे यांसीं व भंगेलसिंगासीं तिकडील खंडण्याचें कामाकाजामुळें कटाक्ष कारभार-संबधीं लागले. याजकरितां धारराव यांनीं विनंति केली कीं, मजला मुखत्यार करून पाठवाल, तर मी जाईन; नाहींतर आपलेपासीं आहे. त्याजवरून विठोजी इंगळे, अंबाजी इंगळ्याचे कनिष्ठ बंधु, यांजसमागमें फौज देऊन पानिपताकडे बंदोबस्तास पाठविलें आहे. पुढें श्रवणांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३८७.

श्री. मार्च इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीः—

विनंति ऐसीजेः—जाटाकडील मुलूख दरोबस्त आपले स्वारीखर्चाकडे ठेऊन, पात-

शाही खालसा कौल व सिकंदरा व मेरट वगैरे बत्तीस महाल यांचा मक्ता करार करून, सिबंदी व महाल मजकूर व नानकार वगैरे जहागीरदार, रोजीनदार वजा करून, व नजराणा बाद घालून, निखालस सोळा लक्ष चौऱ्याण्णव हजारावर कमाविसदारांस मामलत इजारीयानें बिन्‌मक्ता सांगितलें. पातशाहास एक लाख तीस हजार रुपये दरमहा देणें लागतो. त्याचा हवाला राजश्री बापूजी नाईक भावे यांचा दिल्हा आहे. याजकरितां पातशाही महालांची मामलत विल्हेस लावून, परस्परें कमाविसदारांकडून राजश्री बापूजी नाईक भावे करवितात. याप्रमाणें वर्तमान आहे. वजिरांनीं पहिली मोहोर वकील-मुतलखीची केली होती, ते जामदारखान्यांत ठेवून दुसरी मोहोर केली आहे. तिची नक्कल फर्द हिंदवी, पारसी, पाठविली आहे. त्याजवरून कळून येईल. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ३८८.

श्री. १५ एप्रिल इ. स. १७८९.

''श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ १८ रज्जब मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनआज्ञा केली पाहिजे. विशेषः- पेशजीं विनंतिपत्रें छ १६ माहे मजकूरचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानारूढ जहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तर, राजश्री काशीबा होळकर व बाळोजी इंगळे यांसीं व गैबसिंग, तारासिंग वगैरे शीखांसीं आपसांत लढाई जहाली. दोन अडीचशें लोक ठार राहिले. इंगळे मजकूर सैदाबादेनजीक पटयाला येथें मुक्काम करून आहेत. शीख साहेबसिंग वगैरे सर्व एकत्र होऊन लढाईस रुबकार आहेत. ह्मणून राजश्री पाटीलबावांकडे पत्रें आलीं. त्यावरून यांनीं, राणी इंद्राणीचे वकिलास निक्षून ताकीद केली. शीखांनीं मिर्जाकडील वृत्त ऐकोन पुन्हां जमाव केला आहे. व रोहिले पांच चार हजार जमा होऊन, शीखांस शामील जाले आहेत. राजश्री पाटीलबावांनीं पेशोराकडे सुजरद जोडी पाठविली आहे. शाहाकडील वर्तमान आल्यावर सेवेसीं विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ३८९.

श्री. २९ एप्रील इ. स. १७८९.

"श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

पोष्य गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत छ ३ माहे साबान मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणून स्वानंदलेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष:—बहुतां दिवसीं स्वामींनीं कृपा करून पत्रें रविलावल व रविलाखरचीं पाठविलीं, तीं छ २६ रज्जबीं पावून सनाथ जालों. पेशजीं विनंतिपत्रें छ १६ रज्जबचीं सेवेसीं पाठविलीं आहेत, तें प्रविष्ट होऊन सविस्तर वृत्त ध्यानरूढ जाहालेंच असेल. हल्लीं इकडील वर्तमान तरी, राजश्री पाटीलबावांचा विचार आहे कीं, नवाब अलीबहादर यांस आग्रा वगैरे दहा लक्षांची जागा तोडून द्यावी. परंतु मागील बाकीचा जाबसाल अद्यापि ठेरला नाहीं. यास्तव बोलणें लागलें आहे. ठेरल्यावर फौजेची रवानगी होईल. हिंमतबहादर गोसावी याचे जायदाद द्यावयाचा जाबसाल होत आहे. परंतु येथील जाबसाल ठेरण्यांत आला नाहीं. पालमर साहेब निरोप घेऊन आग्र्यास गेले. टिपूची मसलत इंग्रजास भारी पडली आहे. ह्मणून त्यांजकडील कंपूचें येणें तुरूत होत नाहीं. याप्रमाणें साहेबमजकुरानें राजश्री पाटीलबावांस सांगितलें. नवाब वजीर लखनौस स्वस्थ शेर शिकार करून आहेत. तैमुरशाहांनीं त्रिवर्ग सरदारांस खिलत वस्त्रें देऊन पेशोराहून वकिलास इकडे रवाना केलें, ह्मणून श्रवणांत आलें. त्यास, वकील मजकूर येथें दाखल जाल्यावर, काय बोलणें होऊन प्रत्यास येईल, तें विनंति लिहूं. हात्रसवाला दयाराम जाट याचा मामला एक लक्ष पस्तीस हजारावर जाला. सेवेसीं श्रुत होय. वरकड सविस्तर वृत्त, पुरवणीपत्रावरून व अखबारा पाठविल्या आहेत त्यांवरून श्रुत होईल. सदोदित कृपापत्रीं सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३९०.

श्री. एप्रिल इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—विलायतेहून वर्तमान आलें कीं, मुरादशाहा (पैर्व ?) बगदादचा पातशाहा तैमूरशाहावर चालून आला. तैमूरशाहांनीं शिकस्त खाऊन पिशोरास आला. मुरादशाहा यांनीं काबलपावेतों बंदोबस्त केले. पुढें पिशोराकडे कूच

करावयाचा मानस आहे. तैमूरशाहा शीखांस बोलावितो. परंतु शीख ह्मणतात कीं, यवनांस आह्मीं शामील होत नाहीं. दुसरे, अमरासिंग जाट पटालेकर यांसीं व शीखांसीं बिघाड जाला आहे. नानूमल, अमरसिंगाचा दिवाण, यांनीं तीस चाळीस हजार स्वार व पायदळ व तोफा जमा करून, शीखांवर गेला आहे. नित्य युद्धप्रसंग आहे. पहावें काय ठैरतें? इस्मायलबेग यास रेवाडी वगैरे नजबकुलीचा मुलूख जायदाद देऊन, येथून वाटें लाविलें. त्यास इस्मायलबेग, नुरगस ह्मणून मातबर जागा होती तेथें जाऊन, मोर्चे लावून आठां दिवसांत गढ घेतले. तेथें ठाणा ठेवून रेवाडीस गेला. तिकडून नजबकुलीखान यांनीं कानोडहून कूच केलें आहे. यासीं व इस्मायलबेगासीं जुंज होईल, ऐसें आहे. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. राजश्री अलीबहादर यांस वरचेवर येथील वर्तमान लिहीत असतों. रांगड्यांची मामलत करितां त्यांचे तिकडे ठैराव जाले. या समयांत येथें यावयाचें जालें असतें तर उत्तम होतें. येथील पातशाही बंदोबस्त सर्व त्यांचे विद्यमानें घडतें. आतांहि सत्वर येणें होय तर उत्तम आहे. राजे हिंमतबहादर गोसावी सरकारचाकरीस बहुत तत्पर आहेत. राजश्री महादजी शिंदे यांनीं पुन्हां बदस्तुर जायदाद देऊन राजे मजकुरांचे बंदोबस्त केले आहे. परंतु गोसावी यांचें मानस आहे कीं, हजुरांतून नेमणूक व बंदोबस्त होऊन, सरकारचे चाकर ऐसें जाल्यास आमची अब्रू वाढेल. हें गोसावी यांनीं आह्मांस बोलावून विनंति लिहिण्यास सांगितलें. त्याजवरून विनंति लिहिली असे. पातशाहास मुबारकबादची अर्जी अगत्य लिह्वावी. बहुत काय लिहावें, कृपा केली पाहिजे हे विनंति.''

लेखांक ३९१.

श्री.

''पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे:—राजश्री सुभेदार यांचें बोलणें आहे कीं, सहारनपूर, गोसगड वगैरे रोहिल्याची जागा घेतली आहे. त्याची वांटणी आह्मांस करून द्यावी. नवीन जागा जयपूर प्रांतांत हस्तगत होईल त्यांतून वांटणी घेऊं. याप्रमाणें राजश्री पाटीलबावांकडे जाबसाल करितात. त्यावरून यांनीं उत्तर केलें कीं, आह्मांस मसलतीमुळें खर्च बहुत जाला आहे. त्यास, साहुकाराचे देण्यापासोन सुटल्यावर वांटणी करून घ्यावी. याप्रमाणें परस्परें बोलणें जालें. त्यावरून राजश्री सुभेदारांची मर्जी उदास आहे. व सडे फौजेंत राजश्री

काशीराव होळकर व बापूजी होळकर यांसीं व राजश्री पाटीलबावांकडील सरदारांशीं आपसांत चित्तशुद्धता नाहीं. जाहीरदारी मात्र परस्परें आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें अमलांत येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे पाहिजे हे विनंति."

लेखांक ३९२.

श्री. एप्रिल इ. स. १७८९.

"पु॥ श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसीं:—

विनंति ऐसीजे. पालमर साहेब वगैरे चार फिरंगी फरुकाबादेहून दरकूच दिल्लीस छ० १३ मिनहूस दाखल जाले. छ० १५ माहे मजकुरीं पातशाह्यांची मुलाजमत केली. सात किस्ती मुशजर बनात वगैरे विलायती जिन्नस व एक संदुख पिस्तोल येणेंप्रमाणें साहेबांनीं हजुरांत गुजराणून एकवीस मोहरा साहेब मजकुरांनीं व पांच पांच मोहरा डाकतर वगैरे फिरंग्यांनीं व दोन बिबियांनीं पांच पांच मोहरा नजर केल्या. हजुरांतून साहेबमजकुरास पिस्तार सरबस्ता गोशवारा आलखालक वगैरे सा पारचे खिलत व वरकड फिरंगी यांस पांच पांच पारचे व मुनशीस तीन तीन पारचे खिलत इनायत जाले. शाहाजींनीं पामर साहेबांची मेजमानी केली. अकरा किस्ती पोशाकी व एक एक किस्ती वरकड इंग्रेजांस व दोन किस्ती मुनसीस व एक शालजोडी येणेंप्रमाणें बहुमान केला. नंतर छ० १९ माहे मजकुरीं साहेबांनीं शाहाजीची मेजमानी केली. त्यास त्यांनींही बहुमान त्याप्रमाणेंच केला. दुसरे रोजीं छ० २० तारखेस साहेबमजकुरांनीं पातशाहाचा निरोप घेतला. व अनुपशहरास कूच करून गेले. तेथून पामरसाहेब कलकत्त्यास जाणार ह्मणून वदंता आहे. परंतु आठ चार दिवस राजश्री पाटिलबावांची मार्गप्रतीक्षा करून मग जातील, ऐसा विचार आहे. सेवेसीं श्रुत होय. पुढें निदर्शनास येईल तें विनंति लिहूं. बहुत काय लिहिणें, कृपा केली पाहिजे हे विनंति."

लेखांक ३९३.

श्री. १७ आगष्ट इ. स. १७८९.

"आज्ञाधारक विठ्ठल हरि साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २५ माहे जिल्काद मुक्काम लष्कर श्रीमथुरा क्षेत्र यथास्थित जाणून लेखनआज्ञा

करावी. दिल्लीकडील पातशाहाचें वर्तमान, गुलामकादर यांणीं महमदशाहाचा नातू बिदारबख्त यास तक्तावर बसविलें होतें. त्यास व त्याचा बंधु उभयतांस मारून टाकिलें तरवारीनें. शहाजीस येथून बोलावणें गेलें. त्यास पातशाहांनीं पाठविलें. मथुरावृंदावन येथील सनदा करून पाठविल्या. इस्माइलबेग मोडला ह्मणून खिलत पाठविला. सात पारचे चारकुबेसुद्धां, सिरपेंच, जेगा बमय कलगी, तुरा मुकेसी, माळा मोत्यांची, वस्त्रें हे देऊन शहाजी दाखल जाले. खिलत आणिला हें वर्तमान सांगितलें. दुसरे दिवशीं राजश्री सुभेदार यांस सांगोन पाठविलें. त्याजकडोन राजश्री नारो गणेश आले. "खिलत पातशाहाचा आला आहे. याचा कसा विचार?" त्यांणीं उत्तर केलें, जैसी आपली मर्जी असेल तैसें करावें. नंतर आपले घरचे मुत्सद्यांस पुसलें. त्यांणीं विनंति केली, ऐसा खिलत पातशाहांनीं दोघांस द्यावा. वजीर अथवा बक्षी याअन्वयें आहे. त्याजवरून खिलत पाहून जामदारखान्यांत ठेविला आहे. शहाजीस वस्त्रें दिल्हीं. पांच किस्ती सिरपेंच, माळ मोत्यांची, याचे पुत्रास चार किस्ती व सिरपेंच दिल्हा. पातशाहाकडील लोक आले. मोलवी आताउल्ला व अहंमद सुजा वगैरे यांस वस्त्रें दिल्हीं. पन्नास असामी समरूचे बेगमेचीं पलटणेंही यांजबरोबरच येथें दाखल जालीं. त्यांसही वस्त्रें दिल्हीं. इकडील फौजेचें वर्तमान, सेकावटींत राजश्री लखबा आगरेवाले फौज पांच सात हजार घेऊन गेले होते. त्यांनीं कांहीं ठाणीं बसविलीं. जे भेटले त्यांजजवळ खंडणी घेतली. राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ व डभई साहेबांचा कंपू तोफासुद्धां मारवाडी यांणीं जमाव केला. सामर मारोट यांचे मध्यें मुक्काम करून होते. त्याजवर जातांच त्यांची फौज कूच करून अजमेरकडे गेली. आपले फौजेनें सामरास ठाणें बसविलें. पुढें मारोटावर कूच केला. तेथील जमीदार येऊन ठाणें घेऊन गेलें. जैपुरचें वर्तमान, आपली फौज, किरकोळी लोक व पेंढारी हे नित्य जाऊन, दो कोसांवर लुटतात. जैपुरकर उगेच बसले आहेत. खजाना वडिलाचे हातचा आहे. ज्या कोठड्यावर तलाख लिहिली आहे, त्या कोठड्या देखील उघडल्या. परंतु पैका कोठेंही निघाला नाहीं. ऐसे अकबारचें वर्तमान येत आहे. राजश्री अंबोजी इंगळे ग्वालेरीहून आले आहेत. जैपुरकराकडे आणखी फौज पाठविण्याचा विचार केला. त्यांत सरदार पाहिजे. यास्तव राजश्री लाडोजी देशमुख शितोळे यांस सांगितलें. छ०१९ मिनहूस डेरे बाहीर करविले आहेत. यांनीं दिल्लीचे बंदोबस्तास राजश्री रवळोजी शिंदे यांस सांगितलें व सहारनपुर दोन्ही तालुक्याचा मख्ता करून देतात. याप्रमाणें बोलण्यांत आलें आहे. यांणींही डेरे बाहीर केले आहेत. राव राजे यांचा

वकील आला. त्याणें पत्रें दिल्हीं. मथुरेस हवेली राहावयास जागा मागितली. यांणीं कबूल केलें. जागा देतात. राजाही येणार आहे. राजश्री रघुनाथराव बळवंत सडे येथें आलेत. फौज राजश्री भगीरथराव शिंदे शेरसिंगाचे पारिपत्यास राघोगडाकडे पाठविले, त्यांचे मदतीस ठेविली. रामरतन मोदी याचा फैसल्ला चार लक्ष रुपये ठरले. शिवाय खर्च. यास राजश्री राणेखानभाई व बाळोबा पागनीस घेऊन गेले. हजामत करविली. वस्त्रें दिल्हीं. नाजर खोजा आगरियांत कैदेंत ठेविला होता, त्यास आणिलें. राजश्री बाळोबा पागनीस याचे जिम्मेस आहे. त्याजजवळ कांहीं ऐवज मिळेल ऐसें दिसत नाहीं. उभयतां राजे यांजकडील राजश्री पाटीलबावाकडे येणार, ऐसीं पत्रें आलीं होतीं. येथून त्यास मना करविलें आहे. पामर साहेब फिरंगी आला आहे. त्याचेंही खिलबत जालें. तो ह्मणतो, इकडचा बंदोबस्त करून दक्षणच्या मोहिमेस आपण चालावें. राजश्री दौलतराव वाबळे यांची रवानगी अंतरवेदीकडे केली आहे. यमुना उतरून पार गेले. तिकडील मवास जमीदार यांणीं पैका कमाविसदारास दिल्हा नाहीं. याजकरितां चार तोफा कांहीं किरकोळी लोक तैनातीस देऊन पाठवितात. तहमूरशहा दुराणी पातशा व बलकबुखार येथील पातशाहाची लढाई सुरू जाली आहे. हेंही वर्तमान येथें आकबारेचें आलें आहे. आफरासाहेब मेला, त्याची धाकटी बेगम येथें होती. तिजकडे कांहीं आरोप आला ह्मणून चौकी बसविली होती. तिनें पांच रकमा जवाहिराच्या दिल्ह्या व पंचवीस शालजोड्या. नंतर चौकी उठविली. राजश्री अलीबहादर बाबाकडील वर्तमान तूर्त दोन लक्ष रुपये खर्चास द्यावे ऐसें ठरलें आहे. श्रावण शुद्ध दशमीस निम्मे, वद्य दशमीस निम्मे द्यावे. खुशालचंद्र अंबाईदास यांजवर रुपये देविले. फौज चाकरीवर पाठवावी. राजश्री सदाशिवपंत आसवलकर फौजेसमागमें द्यावे. फौज चाकरीवर गेल्यानंतर साडेबारा लक्षांचा मुलूख इस्मायलबेगापैकीं द्यावा ऐसें ठरलें आहे. जालें वर्तमान लिहिलें. श्रुत होय बहुत काय लिहिणें करावा हे विज्ञप्ति."